३५ म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

भाग २

सन

३५

इति

Damodhar Anant Sathe
Bombay 8/7/69

TO

EDWARD I. HOWARD, ESQ. M. A.

DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION

IN THE BOMBAY PRESIDENCY,

This Volume

IS INSCRIBED

IN ACKNOWLEDGMENT OF HIS LIBERAL PATRONAGE

OF VERNACULAR LITERATURE,

BY HIS MOST OBEDIENT & OBLIGED SERVANT,

THE TRANSLATOR.

मेहेरबान एडूवर्ड ऐ. हावर्ड साहेब इस्क्वायर एम्. ए.

डैरेक्टर् आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन्

इलाका मुंबई

यांस,

हा ग्रंथ,

त्यांचा परम नम्र व आभारी सेवक भाषान्तरकर्त्ता,

याणें,

साहेबमवसूफांनीं एतद्देशीय व्युत्पत्तीस जो उदार

आश्रय दिला ते उपकार प्रसिद्धपणें

कबूल करण्याचा उद्देशानें,

नजर केला असे.

पृष्ठ.

काबूलांतील बंड मोडलें. . . ५३
सर टामस रो या नावाचा इंग्रेज वकील आला. १६१५. ५३
जहान्गीराचा राज्याचें, दरबाराचें, व स्वभावाचें, त्याणें केलेलें, वर्णन. . . ५४
शाहजादा खुशरू. . . . . . . ५९
शाहजहान हा लोकांस आवडत नसे. . . . . . . . . . ६०
शाहजादा परवीझ. . . . . . ६०
आपल्या मागें शाहजहानास गादीचा वारिस ठरविला. १६१६. . . . . . . . . . . ६१
शाहजहान दक्षिणेचा बंदोबस्तास गेला. . . . . . . ६१
पादशाह मांडू एथें निघून गेला. १६१६ . . . . . . ६१
त्याचा कूचाविषयीं रोनें केलेलें वर्णन. . . . . . . . . ६१
शाहजहानास पूर्ण जय प्राप्त झाला. १६१७. . . . . . . ६२
बादशाह शाहजहानासुद्धां गुजराथेंत जाऊन राहिला. १६१७।१८. . . . . . . ६३
दक्षिणेंत पुनः बखेडे उत्पन्न झाले. १६२१ . . . . . . ६३
ते बंद करण्यास शाहजहान पुनः निघाला. . . . . . . ६४
त्याची फत्ते झाली. . . . . . . ६४

पृष्ठ.

त्याणें मलिकंबराशीं तह केला. १६२१ . . . . . . . . ६५
पादशाहास मोठा भयंकर रोग झाला. . . . . . . . . . ६५
परवीझ व शाहजहान यांचा कृति . . . . . . . . . . . . ६५
खुशरूचा मरणाविषयीं वहमा. ६५
नूरजहानचें शाहजहानाशीं विटलें. . . . . . . . . . ६६
इराणी लोकांनीं कंदाहार घेतलें. . . . . . . . . . . ६७
पादशाहानें तें परत घेण्याची शाहजहानास आज्ञा केली. ६७
शाहजहान हिंदुस्थानांतून जाण्यास कांकूं करूं लागला . . . . . . . . . . . . ६७
तें काम शाहजादा शाहरियारास सोंपून शाहजहानाचें बहुतेक लश्कर त्याचा तैनातीस दिलें. . . . . . . ६८
राणीनें मोहबत खानास दरबारांत बलाविलें. . . . ६८
बादशाह व शाहजहान, यांचा एकमेकांवर आणखी बेभरवसा झाला. १६२२. ६९
शाहजहानानें बंड केलें १६२२. ६९
बादशाह पुढें चालून आला. ६९
शाहजहान परत गेला. . . . ६९
त्याचा परत जाण्यापासून झालेले परिणाम. . . . . ६९

पृष्ठ.

तो तैलंगणांत निघून गेला.. ७०

तिकडून बंगाल्यास गेला. १६२४........... ७०

त्याणें बंगाला व बहार हे प्रांत घेतले ........ ७१

शाहजादा परवीझ व मोहबत खान, यांणीं त्याचा पाठलाग केला. .. ७१

तो पराजित होऊन दक्षिणेंत पळून गेला. .... ७१

दक्षिणेंतील राज्यांची स्थिति ७१

शाहजहान मलिकंबरास मिळाला. .......... ७२

परवीझ व मोहबत, यांणीं त्याजवर लगट केला... ७२

त्याची फौज त्यास सोडून गेली ७२

तो बादशाहास शरण आला. १६२५........... ७३

बादशाहानें रोशनये लोकांवर काबूलांत स्वारी केली.. ७६

राणीनें मोहबत खानचा छल केला ........ ७३

मोहबताचा इतिहास. .... ७३

त्यास दरबारांत बलाविलें. १६२५ ........ ७४

बादशाहानें त्याचा जांवयाचे हाल केले. ........ ७४

पृष्ठ.

त्याणें पादशाहास पकडलें. १६२६.......... ७५

नूरजहानचें धैर्य. ...... ७७

तिणें मोहबताचा छावणीवर हल्ला केला ........ ७८

बादशाह कैदेंत असतां ती जाऊन त्यास मिळाली. .. ८०

मोहबताची सत्ता डळमळित होती. ........... ८१

जहान्गीराचें कपट. .... ८१

राजपूतलोक व बादशाहाचे पाहरेकरी यांचा कलह.. ८२

नूरजहानची मसलत व तयारी. .......... ८३

तिणें जहान्गीराची सुटका केली. सेपटेंबर १६२६. ८४

मोहबत खानाचें बोलणें कबूल केलें, तो प्रकार. .. ८५

त्याचा व बादशाहाचा बेबनाव होऊन तो शाहजहानास मिळाला. १६२६ चा अखेरीस. ...... ८६

जहान्गीराचा आजारीपणा, १६२७ .......... ८६

तो मरण पावला. ...... ८६

## प्रकरण दुसरें.

### शाहजहानाची कारकीर्द, इ० स० १६५७ पर्यंत.


| | पृष्ठ. |
|---|---|
| असफखान शाहजहानास मिळाला. १६२७ | ८८ |
| त्याणें राणीस कैद केलें. | ८८ |
| शहरियार पराजित होऊन मारला गेला. | ८९ |
| शाहजहान दक्षिणेंतून आला. जान्युआरि. १६२८. | ८९ |
| त्याचा नावानें आग्रा एथें द्वाही फिरली. | ८९ |
| प्रान्तांमध्यें बखेडे. | ९१ |
| खान जहान लोदी, याची हकीकत | ९१ |
| तो आग्र्याहून पळून गेला. | ९३ |
| त्याची दक्षिणेंतील हकीकत. | ९४ |
| बादशाह फौजेनिशीं त्यावर निघून गेला. १६२९. | ९४ |
| तिकडील राज्यांची स्थिति. | ९४ |
| खान जहानास मोगलांनीं अहमदनगरचा मुलुकांतून घालविलें. | ९६ |
| अझीम खानानें त्याचा पाठलाग केला. | ९६ |
| विजापुरचा राजानें त्यास आश्रय दिला नाहीं | ९६ |
| त्याचा दोस्त अहमदनगरचा राजा याचा पराजय झाला १६२९. | ९७ |
| नंतर तो दक्षिणेंतून पळाला. | ९७ |
| तो बुंदेलखंडांत मारला गेला. १६३०. | ९८ |
| अहमदनगराबरोबर लढाई चालतच होती. | ९८ |
| दक्षिणेंत दुष्काळ व पटकी आली. | ९८ |
| विजापुरचा राजा येऊन अहमदनगरचा राजास मिळाला. १६३१. | ९९ |
| अहमदनगरचा राजास त्याचा प्रधान फत्तेखान याणें मारिलें. | १०० |
| आणि आपण बादशाहास शरण गेला. | १०० |
| शाहजहानानें आपलें लश्कर विजापुराकडे पाठविलें. | १०० |
| विजापुरास वेढा दिला. १६३२. | १०१ |
| तो उठविला. | १०१ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| बादशाह दिल्लीस परत गेला. | १०२ |
| मोगलांची दक्षिणेंत चलती झाली नाहीं. १६३४.. | १०२ |
| शाहजी भोंसल्यानें अहमदनगरचा राज्याचा जीर्णोध्दार करण्याचा यत्न केला. ........ | १०३ |
| बादशाह दक्षिणेंत परत आला. १६३५. .... | १०३ |
| त्याची विजापुरावरील दुसरी स्वारी फसली. .. | १०४ |
| विजापुरकरांशीं तह केला. १६३६. ...... | १०४ |
| शाहजी भोंसला शरण आला. ... ...... | १०५ |
| बादशाहानें गोंवळकोंडें एथील राजापासून खंडणी घेतली. ...... | १०५ |
| शाहजहान दिल्लीस परत गेला. १६३७. .... | १०५ |
| उत्तरहिंदुस्थानामधील बखेडे. .......... | १०५ |
| कंदाहार मोगलांस परत मिळाला. ........ | १०६ |
| अलिमर्दान खानाविषयीं. | १०६ |
| बल्कप्रांतावर स्वारी.१६४४. | १०७ |
| हिंदुकुशपर्वतामध्यें राजपूतांनीं केलेले पराक्रम. | १०७ |
| शाहजहान काबूलास गेला. १६४५. ...... | १०८ |
| शाहजादा मुराद व अलिमर्दान खान यांणीं बल्कप्रांत सर केला. .. | १०८ |
| तो प्रांत वक्षूपलीकडील उझबेगांनीं लुटला. .. | १०८ |
| बादशाहानें त्यांवर औरंगझेबास पाठविलें.१६४७. | १०९ |
| त्यास बल्क एथें उझबेगांनीं कोंडिलें. १६४७. .. | १०९ |
| शाहजहानानें नवीन घेतलेला मुलुक सोडून दिला. | १०९ |
| परत येतांना औरंगझेबाचे हाल झाले ...... | ११० |
| इराणी लोकांनीं कंदाहार पुनः परत घेतलें १६४८. | ११० |
| तें परत घेण्यास बादशाहानें औरंगझेबास पाठविलें १६४७. ........ | १११ |
| कंदाहाराचा वेढा फसला .. | ११२ |
| औरंगझेबानें कंदाहारावर दुसरी स्वारी केली. १६५२. ........ | ११३ |
| ती फुकट गेली. ...... | ११३ |
| शाहजादा दाराशेखोची मोठी स्वारी. ...... | ११३ |
| त्याणें कंदाहारास वेढा दिला. | ११४ |
| तो पराजित होऊन परत आला. १६५३. .... | ११५ |
| वजीर सादुल्ला खान मरण पावला ........ | ११६ |

पृष्ठ.
औरंगझेबानें दक्षिणेंत पुनः लढाई सुरू केली. १६५५. ११६
गोवळकोंडें एथें औरंगझेबाचा मसलती. .... ११७
मीरजुमला, याची हकीकत. ११७
औरंगझेबानें विश्वासघातानें हैदराबादेवर हल्ला केला. .......... ११८
गोवळकोंड्याचा राजा शरण आला. ...... १२०
विजापुरकरांशीं निमित्ताशिवाय लढाई. १६५६.. १२०

## प्रकरण तिसरें.

### इ० स० १६५७ पासून शाहजहान पदच्युत होईपर्यंत.

पादशाह अत्यावस्थ झाला. १२२
त्याचा मुलांचे स्वभाव आणि मसलती. ...... १२२
दाराशेखो. ........ १२२
शुजा. ............ १२३
औरंगझेब. ........ १२३
मुराद ............ १२५
शाहजहानाचा मुलींविषयीं. १२६
पादशाहाचा हाताखालीं दारा कारभार पाहूं लागला. .......... १२६
शुजाचें बंड. ........ १२७
मुरादाचें बंड ........ १२७
औरंगझेबाचे सावधगिरीचे उपाय .......... १२७
त्याची मीरजुमला याशीं मसलत. ........ १२८
औरंगझेब मुरादास मिळण्याकरितां निघून गेला. १६५७. ........ १२८
दारानें आपल्या बचावासाठीं केलेले बंदोबस्त... १३०
शाहजहान पुनः राज्य करूं लागला. ...... १३०
शुजा आग्र्यावर चढून आला. .......... १३०
सुलेमानानें त्याचा पराजय केल्यावर तो बंगाल्यास गेला. .......... १३०
औरंगझेब व मुराद यांणीं उज्जनी एथें बादशाही फौजेचा पराजय केला. एप्रिल. १६५८,.... १३१

पृष्ठ.

शाहजहानास तंटा मिटण्याची काळजी लागली. १३२

त्याचा इच्छेविरुद्ध दारा लढाईस गेला. ...... १३३

दारा दिल्ली एथें पळून गेला. .......... १३८

औरंगझेब आग्र्यांत शिरला. .......... १३८

शाहजहान दाराचा पक्ष धरून राहिला. .... १३८

त्यास त्याचा महालामध्यें नजरकैद ठेविलें. .... १३९

पृष्ठ.

औरंगझेबानें मुरादास कैद करून उघड रीतीनें राज्य धारण केलें. आगष्ट. १३९

शाहजहानाचा कारकीर्दींत हिंदुस्थानाची चढती कळा. .......... १४०

त्याचा दरबाराची शोभा. . . १४४

त्याणें बांधलेल्या इमारती. १४४

ताजमहाल. ........ १४५

त्याची खर्चाविषयीं व्यवस्था. .......... १४६

त्याचा स्वभाव. ...... १४७

---

# भाग आठवा.

## औरंगझेब पादशाह.

## प्रकरण पहिलें.

### ( इ० स० १६५८ पासून १६६२ पर्यंत. )

जयसिंग व दिलीर खान हे सुलेमानास सोडून गेले. १६५८. ...... १४८

तो श्रीनगर एथें गेला; तेथिल राजानें त्यास कैद केलें. ........ १४९

औरंगझेब दाराचा पाठलाग करण्याकरितां दिल्लीहून निघाला. जुलै. १५०

दारा लाहोराहून पळाला. १५१

औरंगझेब दिल्लीस परत गेला. नोवेंबर ...... १५१

तो शुजावर स्वारी करून गेला. .......... १५१

त्याचा सामानावर जसवंतसिंगानें कपटानें हल्ला केला. .......... १५२

सुजाचा पराजय झाला. जान्युआरि. १६५९. . १५३

पृष्ठ.
जसवंतसिंग, आपल्यांतील लोकांस भेवडावून, मारवाडाकडे निघून गेला. १५४
दारा शेखो गुजराथेंत गेला, व तेथील लोकांनीं त्यास बादशाह कबूल केला. .......... १५५
तो जसवंतसिंगास मिळण्या करितां निघाला .... १५६
औरंगझेबानें जसवंतसिंगास आपणाकडे मिळवून घेतलें. ......... १५६
व दारावर हल्ला करून त्याचा पराजय केला. .. १५७
दारा पळून गुजराथेंत जात असतां त्यास झालेले अपाय. ........ १५८
त्यास बर्नियर नामें प्रवासी भेटला. ........ १५८
त्याचा अहमदाबादेंत प्रवेश होणें बंद झाला.... १५९
तो सिंधेकडे पळून गेला. १५९
जूं एथील अधिकाऱ्यानें त्यास विश्वासघातानें धरून औरंगझेबाचा स्वाधीन केलें. .... १६०
त्यास दिल्लीस आणिलें. जुलै. .......... १६१
लोकांस त्याची दया आली. १६१
शाहजादा सुलतान व मीरजुमला याची शुजाशीं लढाई. जून. ...... १६२
सुलतान शुजाकडे जाऊन मिळाला. जान्युआरि. १६६० ........ १६३
तो परत आला. ...... १६३
त्यास औरंगझेबानें कैदेंत ठेविलें. ........ १६४
शुजा आराकानप्रांतांत गेला. .......... १६४
त्याचा शेवट कसा झाला याचा निश्चय होत नाहीं. १६४
सुलेमानास श्रीनगरचा राजानें औरंगझेबाचा स्वाधीन केलें. .... १६५
मुराद बंदिखान्यांतच मारला गेला. १६६१, नोवेंबर. .......... १६६
मीरजुमला याची आसाम एथें स्वारी. ...... १६७
तो मरण पावला. १६६३, मार्च. .......... १६८
औरंगझेबाचा जीवावरील दुखणें. ........ १६८
तो बरा झाला. १६६२, डिसेंबर. .......... १६९
दक्षिणेंतील बखेडे. १६६२. १७०
महाराष्ट्रदेशाचें वर्णन. .. १७०
मराठ्यांची हकीकत.... १७३
भोंसल्यांचा वंशाची उत्पत्ति १७६

| | पृष्ठ. |
|---|---|
| शाहजी भोंसल्याविषयीं | १७७ |
| शिवाजी भोंसल्याविषयीं. | १७८ |
| त्याचा चोऱ्या | १७८ |
| त्याचे आश्रित | १७९ |
| त्याणें छापा घालून तोरणा-किल्ला घेतला | १७९ |
| त्याणें आपल्या बापाची जाहगिरी बळकाविली. | १८० |
| त्याणें पुष्कळ किल्ले घेतले. | १८० |
| विजापुरचा सरकारावर बंड केलें. | १८१ |
| उत्तरकोंकण घेतलें. (इ० स० १६४८.) | १८२ |
| त्याची हिंदुधर्मावर श्रद्धा. | १८२ |
| विजापुरचा सरकारानें शाहजीस पकडून त्याचा मुलाचा बऱ्या वर्तणूकेकरितां ओलीस ठेविलें. (इ०स०१६४९.) | १८२ |
| शाहजीची सुटका झाली. (इ०स०१६५३.) | १८४ |
| शिवाजीनें पुनः हल्ले सुरू केले. | १८४ |
| तो मोगलांचे प्रान्त लुटूं लागला. | १८५ |
| त्यास औरंगझेबानें क्षमा केली. (इ०स०१६५८.) | १८५ |
| अफूझलू खानास विजापुरकरांनीं पाठविलें. | १८६ |
| शिवाजीनें त्याचा प्राण घेतला. | १८७ |
| व त्याचा लश्कराची वाताहत केली. (इ०स०१६५९) | १८७ |
| विजापुराहून दुसरी फौज आली. | १८८ |
| तेथील राजानें स्वतः स्वारी केली. | १८९ |
| आणि शिवाजीचा बहुतेक मुलुक परत घेतला. (इ० स० १६६१.) | १८९ |
| शिवाजीनें आपणास हितावह तह केला. | १८९ |
| त्याचा राज्याचा विस्तार. | १८९ |

## प्रकरण दुसरें.

### ( इ० स० १६६२ पासून १६८१ पर्यंत. )

| | |
|---|---|
| शिवाजीचें मोगलांशीं वांकडें पडलें. १६६२. | १९१ |
| शाइस्ते खान त्यावर स्वारी करून आला. | १९१ |

पृष्ठ.

तो पुणें एथें राहिला .... १९१

तेथें शिवाजीनें रात्रीस केलेला पराक्रम. .... १९२

शाहजादा मोअज्जिम यास शिवाजीवर पाठविलें .. १९३

शिवाजीनें सुरत लुटली. १६६४, जान्युआरि. .. १९४

शाहजी मरण पावला. .. १९४

त्याची दक्षिणहिंदुस्थानांतील जाहगीर. .... १९४

शिवाजीचा समुद्रांतील लढाया. .......... १९४

तो आपणास राजा म्हणवूं लागला ........ १९५

औरंगझेबानें राजा जयसिंगास त्याजवर पाठविलें. .......... १९५

तो मोगलांस शरण आला. १६६५. ........ १९६

तो जयसिंगाबरोबर विजापुरकरांशीं लढाईस गेला. १९७

तो दिल्लीस गेला. .... १९७

औरंगझेबानें गर्वानें त्याचा सत्कार केला नाहीं. .. १९८

तो कैदेंतून पळून गेला. .. २००

रायगडास पोंचला. १६६६ डिसेंबर ........ २०१

शाहजहान मरण पावला. २०१

औरंगझेबाचा राज्याचा उत्कर्ष. .......... २०२

पृष्ठ.

जयसिंगानें विजापुरावर हल्ला केला, तो फसला. २०३

तो मरण पावला. ...... २०३

मोअज्जिम व जसवंतसिंग परत दक्षिणेंत आले. २०३

शिवाजीची चढती. .... २०४

त्याणें औरंगझेबाबरोबर तह केला. ........ २०४

त्याणें विजापुर व गोंवळकोंडें एथील राजांपासून खंडणी घेतली ...... २०४

त्याचा राज्याचा आंतील बंदोबस्त. ........ २०५

त्यास फसविण्याचा औरंगझेबाचा मसलती .. २००

औरंगझेबानें तह मोडिला. २०७

शिवाजीनें सिंहगडावर छापा घातला ...... २०७

त्याणें मोगलांचा मुलुक लुटला.......... २०७

चौथाईविषयीं. ...... २०८

त्याणें मोगलांस समोरासमोर लढाईत हटविलें. १६७२. ........ २०९

खानजहान यास दक्षिणेंतील सरसुभेदार केला. २०९

दक्षिणेंतील लढाईची जारी बंद पडली. ...... २०९

ईशान्येकडील अफगाणांशीं लढाईत औरंगझेब गुं-

पृष्ठ.

तला. १६७३ तागाईत १६७५. ........ २१०
तो दिल्लीस परत आला. १६७६. ........ २१२
सतनरामी बैराग्यांचें बंड. २१२
औरंगझेबाचा दुराग्रह.‥ २१४
त्याची हिंदुलोकांशीं त्रासदायक वर्तणूक. .... २१५
त्याणें पाखंडी लोकांवर जजिया ऊर्फ शिरगणतीचा कर पुनः सुरू केला. १६७७. ........ २१७
सर्व हिंदु हवालदिल झाले. २१८
राजा जयसिंगाचा विधवेवर व मुलांवर जुलूम. २१९
तीं दिल्लीहून पळून गेलीं. २१९
राजपूतांचा कट........ २२१
त्यांजवर बादशाह चालून आला. जान्युआरि. १६७९, ........ २२१
मेवाडचा राण्यास फार झीज न देतां त्याशीं बंदोबस्त केला. ...... २२१
उदेपुरचा राण्यानें तह मोडला. जुलै. १६७९‥ २२२
राजपूतांचा मुलुकाचा विध्वंस. .......... २२३
राजपूतांचें व मोगलांचें अगदीं विटलें. .... २२३
शाहजादा अकबर आपल्या फौजेनिशीं राजपूतांस मिळाला. .... २२४
तो बादशाह झाला अशी द्वाही फिरली. ...... २२५
तो औरंगझेबावर चालून गेला. .......... २२५
बादशाहाची भयप्रद स्थिति. २२५
त्याचें धारिष्ट. ......... २२६
अकबराची फौज त्यास सोडून गेली. ...... २२६
अकबर मराठ्यांकडे पळून गेला. .......... २२७
राजपूतांबराबर पुढें लढाई लांबत चालली. .... २२७

## प्रकरण तिसरें.

### इ० स० १६८१ पासून १६९८ पर्यंत.

दक्षिणेंतील वर्तमान पुढें चालु .......... २३०
शिवाजीनें विजापूरकरांचा कांहीं मुलुक घेतला.‥ २३०

| | पृष्ठ. |
|---|---|
| त्यास विशेष समारंभानें रायगडावर राज्याभिषेक झाला. १६७५, जून. . . | २३१ |
| त्याणें मोगलांचा मुलूकावर हल्ला केला. . . . . . . . | २३१ |
| मराठे लोक प्रथम नर्मदा उतरले. १६७५. . . | २३२ |
| शिवाजीनें दक्षिण हिंदुस्थानांत स्वारी केली. | २३२ |
| त्याणें जिंजी किल्ला घेतला. १६७७. . . . . . . | २३३ |
| वेलूर किल्ला घेतला. . . . . | २३४ |
| आपल्या बापाची महिसूर प्रांतांतील सर्व जाहगीर घेतली. . . . . . . . . | २३४ |
| दिलीर खानानें गोंवळकोंड्यावर स्वारी केली. १६७८. . . . . . . . . | २३५ |
| त्याणें विजापुरास वेढा दिला. १६७९. . . . . | २३५ |
| शिवाजीचा पुत्र संभाजी मोगलांकडे पळून गेला. | २३६ |
| तो आपल्या बापाकडे परत आला. . . . . . . . . . . | २३७ |
| विजापुराचा वेढा उठला. | २३७ |
| शिवाजी मरण पावला. . . | २३७ |
| त्याचा स्वभाव. . . . . . . | २३७ |
| संभाजीस गादीवर न बसविण्याविषयीं जो यत्न झाला तो फुकट गेला. | २३९ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| लोकांनीं संभाजीस राजा असा कबूल केला. . . | २३९ |
| त्याचें क्रौर्य. . . . . . . . . | २४० |
| जंजिऱ्यास वेढा देण्याविषयीं त्याचा हिंका . . . . | २४० |
| शाहजादा अकबर येऊन त्यास मिळाला. १६८१. | २४१ |
| त्याचा विरुद्ध फितूरें. . . . . | २४१ |
| त्याणें लोकांस मारून टाकिलें. . . . . . . . . . . | २४१ |
| तो कलुशा नामें ब्राह्मणाचा स्वाधीन झाला. . . | २४१ |
| त्याची जंजिऱ्यावरील मसलत फसली. १६८२. . . | २४२ |
| मराठ्यांची दक्षिणेंत पडती दशा आली. . . . . | २४२ |
| औरंगझेब दक्षिणेंत आला. १६८३. . . . . | २४३ |
| त्याचे उद्देश. . . . . . . . | २४३ |
| त्याची प्रथमची लढाई. १६८४. . . . . . . . . | २४४ |
| शाहजादा मोअझिमाचा फौजेचा कोंकणांत नाश झाला. . . . . . . . . | २४५ |
| त्याणें विजापुरकरांवर स्वारी केली. . . . . . . . . | २४६ |
| पादशाहाचा पिछाडीचा मुलुक संभाजीनें लुटला. १६८५. . . . . . . . . | २४६ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| वीजापुरावरची स्वारी फसली. | २४७ |
| संभाजीनें भडोच लुटलें. | २४७ |
| औरंगझेबानें गोंवळकोंड्यावर स्वारी केली. | २४८ |
| तेथील राजाशीं तह केला. | २४९ |
| औरंगझेब स्वतः विजापूरावर चालून गेला | २४९ |
| १६८६, आकटोबर ता० १५ | २४९ |
| आणि ती राजधानी घेऊन त्या राज्याची समाप्ति करिता झाला. | २४९ |
| त्याणें गोंवळकोंड्याचा राजा बरावरील तह मोडिला. १५८७. | २५० |
| आणि गोंवळकोंडें घेऊन त्या राज्याची समाप्ति केली. सेपटेंबर. | २५१ |
| त्याणें मोअझिमास कैदेंत टाकिलें | २५१ |
| हीं राज्यें घेतल्याचे परिणाम. | २५२ |
| दक्षिणेंतील मुलुकाची अव्यवस्थित स्थिति | २५२ |
| औरंगझेबानें गोंवळकोंडें व विजापुर या राज्यांच्या तंजोरापर्यंत मुलुक सर केला १६८८ | २५३ |
| संभाजीची सुस्ती | २५४ |
| शाहजादा अकबर इराणांत गेला | २५४ |
| संभाजीस मारून टाकलें १६८९, आगस्ट | २५६ |
| मराठ्यांचें दौर्बल्य. | २५६ |
| औरंगझेबानें रायगडास वेढा देण्यास फौज पाठविली. | २५७ |
| राजारामाची कारभारीपणाची कारकीर्द. | २५७ |
| मोगलांनीं रायगड घेतला. १६९० | २५७ |
| राजाराम जिंजी एथें पळून गेला | २५८ |
| त्याणें राजा असा किताब घेतला | २५८ |
| मराठ्यांनीं स्वसंरक्षणार्थ योजिलेले उपाय. १६९२ | २५८ |
| जिंजी घेण्यास औरंगझेबानें झुल्फिकार खान पाठविला. | २६० |
| मोगल व मराठे यांचा लष्करांची तुलना. | २६२ |
| बादशाहानें जिंजी घेण्याचें काम शाहजादा कामबक्ष यास सांगितलें. १६९४. | २६७ |
| झुल्फिकार खान त्रासून गेला | २६७ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| त्याणें वेढ्याचा कामांत हरकत आणिली. .... | २६८ |
| संताजी घोरपडा वेढा उठविण्याकरितां निघून गेला. १६९७ ...... | २६८ |
| कामबक्षास झुल्फिकारानें कैद केलें ........ | २६९ |
| औरंगझेब भीमेवर छावणी देऊन राहिला. .. | २७० |
| त्याणें कामबक्षास बंदींतूनमुक्त केलें ........ | २७० |
| झुल्फिकार अधिक बेदिल झाला .......... | २७० |
| त्याणें वेढ्याचें काम सुरू केलें, पण लांबणीवर घातलें .......... | २७१ |
| बादशाहास क्रोध आला .. | २७१ |
| मोगलांनीं जिंजी किल्ला घेतला. १६९८, जान्युआरि. ........ | २७१ |

## प्रकरण चौथें.

### ( इ० स० १६९८ पासून औरंगझेबाचा मरणा पर्यंत. )

| | |
|---|---|
| मराठ्यांमध्यें कलह माजले | २७२ |
| संताजी घोरपडा मारला गेला. .......... | २७२ |
| औरंगझेबाची नवी शिस्त- | २७३ |
| मोगललोक थकून गेले . | २७४ |
| बादशाहानें स्वतः चालविलेले वेढे ........ | २७४ |
| त्याणें सातारा घेतला १७०० | २७४ |
| राजाराम मरण पावला .. | २७५ |
| औरंगझेब किल्ले घेत चालला. १७०१ ...... | २७५ |
| त्याची बुद्धि व मनोनिग्रह. | २७५ |
| त्यास जा सोसाव्या लागल्या त्या अडचणी व संकटें .......... | २७५ |
| त्याचा अव्याहत उद्योग .. | २७७ |
| त्याचें लक्ष कच्चा कामावर असे .... ..... | २७७ |
| जवळचा सर्व लोकांविषयीं त्याचा बेभरवसा .... | २७८ |
| त्याणें आपल्या मुलांचा केलेला बंदोबस्त . .. | २७८ |

पृष्ठ.
व दरबारी लोकांचा बंदोबस्त ........... २७९
राज्यांत बखेडे माजले.. २८२
मराठ्यांची बढती. १७०२ २८२
ते लोक किल्ले परत घेऊं लागले. १७०५ .... २८३
बादशाही फौज थकून गेली २८३
बादशाहाचा खजीन्यांत धांदल झाली......... २८३
त्याचा फौजेवर मराठ्यांनीं फार लगट केला.... २८४
तो अहमदनगरास परत गेला. १७०६. .... २८५
त्याची शक्ति क्षीण होत चालली. ........ २८६
पृष्ठ.
शाहजहानासारिखी आपली गति होईल अशी त्यास भीति पडली...... २८६
त्याचा मुलांविषयीं त्यास वहेम आले ...... २८७
मृत्यु जवळ आला असें पाहून त्यास भीति उत्पन्न झाली ........... २८७
तो मरण पावला. १७०७, फेब्रुआरि ......... २८९
त्याचा स्वभाव. ....... २८९
त्याचा पत्रांविषयीं. .... २९२
किरकोळ वर्तमानें....... २९३

# भाग नववा.

## औरंगझेबानंतर झालेल्या बादशाहांचीं वर्तमानें.

## प्रकरण पहिलें.

### महमदशाह गादीवर येईपर्यंत झालेल्या बादशाहांची हकीकत.

### बहादुरशाह.

शाहजादा अझीम व त्याचा वडील भाऊ मोअझिम यांचा तंटा.१७०७, जून. .......... २९६
मोअझिम, ऊर्फ बाहदुरशाह याचा जय झाला .. २९७
शाहजादा कामबक्ष याणें दक्षिणेंत बंड केलें .. २९७

| | पृष्ठ. |
|---|---|
| त्याचा पराजय होऊन तो मरण पावला. १७०८, फेब्रुआरि. ...... | २९८ |
| बहादुरानें दक्षिणेंत केलेलीं कृत्यें. .......... | २९८ |
| मराठ्यांची स्थिति | २९८ |
| राजा शाहू व ताराबाई, यांचा कळचा...... | २९८ |
| दाऊद खान पन्नी यास झुल्फिकार खानाचा वतीनें दक्षिणेंत पाठविलें ......१७०८ | २९९ |
| त्याणें मराठ्यांशीं तह केला | ३०० |
| राजपूत लोकांशीं बंदोबस्त | ३०० |
| त्यांशीं तह केला १७०९ | ३०१ |
| सीक लोकांची उत्पत्ति (पंधराव्या शतकाचा अखेरीस.)........ .... | ३०२ |
| त्यांचा पंथ गरीब होता... | ३०२ |
| मुसलमान लोक त्यांचा छल करूं लागले. १६०६. | ३०२ |
| त्यांणीं बंड केलें ...... | ३०३ |
| गुरु गोविंदाविषयीं. .... | ३०३ |
| त्याणें सीक लोकांचें एक लोकसत्ताक राज्य केलें. | ३०३ |
| त्याचीं मतें व रीतिभाती. | ३०३ |
| प्रथम ते अगदीं दबून गेले. १७०९. ........ | ३०५ |
| त्याचें धर्मपिसें ...... | ३०६ |
| बंधूचा हाताखालीं त्याणीं जय मिळविला, लूट केली, व क्रूर कर्मे आचरलीं. | ३०६ |
| बहादुरानें त्यांवर स्वारी करून त्यांस पहाडांत पळविलें. १७१०. .... | ३०७ |
| बंधु पळून गेला ...... | ३०८ |
| बहादुरशाह मरण पावला. १७१२, फेब्रुआरि .... | ३०८ |
| त्याचा मुलांचें भांडण. .. | ३०८ |
| झुल्फिकाराचा मसलती .. | ३०९ |
| त्याणें जहांदरशाहाचा जय करून दिला ...... | ३०९ |

## जहांदरशाह.

| | |
|---|---|
| तो गादीवर बसला १७१२ मे अथवा जून .... | ३०९ |
| त्याचा नाकर्तेपणा .... | ३०९ |
| झुल्फिकाराचा दरारा .. | ३१० |
| सर्व लोकांत बेदिली उत्पन्न झाली ........ | ३१० |
| शाहजादा फरुख्शीरानें बंगाल्यांत बंड केलें .. | ३११ |

पृष्ठ.

बहार व अलाहबाद एथील सुभेदारांनीं त्यास मदद केली ........ ३११
त्याणें बादशाही फौजेचा पराजय केला. .... ३११
झुल्फिककारानें विश्वासघात करून जहांदरास शत्रूचा स्वाधीन केलें; परंतु फरुखूशीरानें जहांदराबरावर त्यासहि मारून टाकलें. १७१३, फेब्रुआरि. .......... ३१२

## फरुखूशीर.

सय्यद अब्दुला व हुसेन अली यांचा मोठा अधिकार. .......... ३१३
बादशाह त्यांचा द्वेष करूं लागला. ........ ३१३
त्याचा मसलती .... .. ३१४
त्याणें मारवाडचा राजा अजीतसिंग याजवर हुसेन अलीस पाठविलें. ३१४
त्याजबरोबर त्याणें अबू व चावून तह केला .... ३१४
त्यांचा एकमेकांविषयीं विशेष बेभरवसा झाला. ३१५
पादशाह सय्यदांस शरण गेला ........ .. ३१५
हुसेन अली दक्षिणेंत निघून गेला ......... ३१६
त्यास हरकत करण्याविषयीं फरुखूशीरानें दाऊदखान पन्नी यास सांगितलें. ३१६
दाऊदाचा पराजय व मृत्यु. ३१७
सीक लोक पुनः विध्वंस करूं लागले ...... ३१८
त्यांस पराजित करून त्यांचें बहुतेक वाटोळें केलें ३१८
बंधूस फार क्रूरतेनें मारिलें. ३१९
मराठ्यांची बढती. .... ३२०
चीनकिलिच खान ऊर्फ असोफजा याविषयीं . . ३२०
हुसेनानें शाहूबरोबर तह करून चौथाई देण्याचें कबूल केलें. १७१७ . ३२२
वरील तह कायम करण्यास फरुखशीर नाकबूल झाला. .......... ३२३
दिल्लीचा दरबाराची स्थिति. ३२३
सय्यद अब्दुल्ला खान याविषयीं. .... .... ३२३
फरुखूशीराचा मसलती . . ३२३

पृष्ठ.

त्याणें आपल्या मदतीस मोठ्या मानकऱ्यांचा कट केला. १७१७. .... ३२४
फरुखशीराचा पाऊल बुद्धीपणा. .......... ३२५
त्याचे साथी त्रासले. .... ३२६
हुसेन अली १०,००० मराठ्यांनिशीं परत आला. १७१८, डिसेंबर. ३२६
फरुखशीरास पदच्युत करून मारून टाकिलें. .. ३२७
सय्यदांनीं बसविलेले नामधारी पादशाह. .... ३२८
रफी उदरजात. १७१९, फेब्रुआरि. ...... ३२८
रफी उद्दौला. मे. १७१९ .. ३२८

# प्रकरण दुसरें.

## महम्मद गादीवर बसल्यापासून नादिरशाह हिंदुस्थानांत येऊन परत जाईपर्यंत झालेलें वर्तमान. १७१९. सेपटेंबर.

सय्यदांविषयीं लोकांत संताप उत्पन्न झाला. .. ३२९
त्यांचा पक्षांतील लोकांत भांडणें चाललीं. .... ३२९
बंडावे झाले. ........ ३३०
असोफजाचीं कृत्यें. .... ३३०
त्याणें आपली सत्ता दक्षिणेंत स्थापली. १७२०, एप्रिल. .......... ३३२
त्याणें सय्यदांचा फौजा पराजित केल्या. १७२० जुन व जुलै. ...... ३३२
दिल्ली एथें धास्ती पडली. ३३३
महम्मदशाहाची शहाणपणाची वर्तणूक. .... ३३३
त्याचा सय्यदांविरुद्ध मसलती. .......... ३३३
महम्मद अमीन खान यांविषयीं .......... ३३३
सादत खानाविषयीं. .. ३३४
हुसेन अली बादशाहास बराबर घेऊन असोफजावर निघून गेला. .. ३३४
हुसेन अली मारला गेला. १७२० आकटोबर. .. ३३५
बादशाहानें राज्य धारण केलें. .......... ३३५

| | पृष्ठ. |
|---|---|
| अब्दुल्ला खान याची कठीण अवस्था. .... | ३३६ |
| त्याणें नवा बादशाह गादीवर बसविला. ...... | ३३६ |
| त्याणें फौज जमा केली. .. | ३३६ |
| त्याचा पराजय झाला. नोवेंबर .......... | ३३७ |
| नवा वजीर अकस्मात् वारला. १७२१, जान्युआरि. | ३३७ |
| बादशाहीचा मोड त्वरेनें होत चालला. ...... | ३३८ |
| असोफजाविषयीं. १७२२. | ३३९ |
| बादशाहाचा आळस. .... | ३४० |
| त्याचा प्रीतींतील लोक. .. | ३४० |
| त्याची असोफजाविषयीं अनावड. .......... | ३४० |
| असोफजास गुजराथेचा बयादखोर सुभेदारावर पाठविलें. १७२२. .. | ३४१ |
| त्याणें तें बंड मोडून तो प्रांत आपल्या ताब्यांत ठेविला | ३४१ |
| भरतपुर एथील जाटांवर स्वारी. ...... .. | ३४१ |
| असोफजा त्रासला, व राजीनामा पाठवून दक्षिणेंत गेला. १७२३. .. | ३४२ |
| हैदराबाद एथील सुभेदार मुबारिझ खान यास असोफजास हाकून लावण्यास उद्युक्त केलें. .. | ३४२ |
| मुबारिझ पराजित होऊन मरण पावला. १७२४. | ३४३ |
| असोफजाची मराठ्यांशीं वर्तणूक. ......... | ३४३ |
| मराठ्यांची सत्ता दृढ झाली. | ३४४ |
| बाळाजी विश्वनाथ पेशवा- | ३४४ |
| त्याणें शाहूचें वर्चस्व स्थापन केलें. ........ | ३४५ |
| तो मरण पावला. .... | ३४५ |
| त्याणें केलेलें महसूलाचें अवडंबर. ......... | ३४६ |
| बाजीराव पेशव्याविषयीं. | ३४७ |
| त्याची साहसी कृति. .... | ३४८ |
| शाहूचा स्वभाव. ...... | ३४९ |
| बाजीरावाचा स्वभाव. .. | ३४९ |
| त्याणें गुजराथचा सुभेदारापासून चौथाई मिळविली. .......... | ३५० |
| असोफजानें मराठ्यांत कळ पेटविली. ...... | ३५० |
| बाजीरावानें असोफजावर हल्ला करून त्यापासून करार करून घेतले. १७२५. ........ | ३५२ |
| शाहू व संभाजी यांची समजूत झाली. १७३०. | ३५२ |
| असोफजाची आणखी मसलती. ........ | ३५३ |
| दाभाडा पेशव्यास पदच्युत करण्यास निघाला. .. | ३५३ |

पृष्ठ.

त्याचा पराजय व मृत्यु. १७३१. ........ ३५३
गुजराथेचा बंदोबस्त. .. ३५४
पंवार, होळकर व शिंदे, यांचा वंशांची उत्पत्ति. ३५४
बाजीराव व असोफजा यांचा तह झाला. .... ३५५
मेवाडचा राजा अभिसिंग गुजराथचा सुभेदार झाला. .......... ३५५
त्याणें पिलाजी गाइकवाडास मारेकरी घालून मारिलें. १७३२. .... ३५६
त्याचा मराठ्यांनीं सूड उगविला. ........ ३५६
अभिसिंग मेवाडास परत गेला. १७३२. .... ३५७
बाजीरावाची माळव्यांत फत्ते झाली. ........ ३५७
त्याणें रोहिलखंडांत मुलुक मिळविला. ...... ३५८
दुसऱ्या राजा जयसिंगानें माळवा मराठ्यांस दिला. १७३४. ...... ३५९
बाजीरावानें आपली मागणीं वाढविली. १७३६. ३५९
बादशाहानें मराठ्यांस आणखी देहेनग्या दिल्या. ३६०
असोफजा भयाभीत झाला. ३६०
त्याची व बादशाहाची एकी झाली. .... .... ३६०
बाजीराव दिल्लीसमोर आला. १७३७. ...... ३६१
तो परत गेला. ........ ३६२
असोफजा दिल्लीस आला. ३६२
व बाजीरावावर चालून गेला. .......... ३६३
परंतु पराजय पावून मराठ्यांस देहेनग्या देता झाला. १७३८. .... ३६४
नादिर शाहाची स्वारी. १७३८. ........ ३६५
इराणांतील पूर्वींचें वर्तमान. ३६५
पश्चिमेकडील अफगाणांविषयीं. .......... ३६६
खिल्जी लोकांविषयीं. .. ३६७
अब्दाली लोकांविषयीं. .. ३६७
खिल्जी लोकांचें बंड. (१७०८) ...... ३६७
इराणदेश खिल्जी लोकांनीं घेतला. (१७२०-२२). .......... ३६८
त्यांची जुलमी कारकीर्द. .. ३७१
तुर्क व रूस या लोकांबराबर त्यांचा लढाया. .. ३७३
नादिरशाहाची उत्पत्ति. .. ३७४
त्याणें खिल्जी लोकांस घालवून अब्दाली लोकांपासून खुरासान घेतलें. (१७२९) ...... ३७४

पृष्ठ.

सलाबतजंग पुण्यावर आला. ( डिसेंबर १७५१ ) ४०८
त्याचें वर्चस्व. . . . . . . . . ४०९
मोशूर बूसी. . . . . . . . . ४०९
सलाबताच्या फौजेंत बंड झाल्यामुळें बाळाजीचा बचाव झाला. . . . . . ४०९
लढाई मवकूफ झाली. १७५२ ४१०
दिल्लीकडील हकीकत पुढें चालू. . . . . . . . . . . ४१०
रोहिल्यांचा उदय. . . . . ४११
त्यांवर बादशहाची स्वारी. ( १७४५ ) . . . . . . ४११
दुराणाकडून नवे हल्ले. . . ४११
नादिरशाहाचा जुलूम. १७४८. . . . . . . . . ४१२
त्यास शिया लोकांची भीति. . . . . . . . . . . ४१२
त्याणें आपल्या मुलाचे डोळे काढिले. . . . . . . . . ४१३
त्याचें दुःसह क्रौर्य. १७४८. ४१४

पृष्ठ.

तो अफगाणांवर कृपा करूं लागला. . . . . . . . . . ४१४
त्यास दुराणी लोकांनीं मारिलें. ( १७४७, जून ) ४१५
अफगाण लोक परत गेले. ४१६
अहमदखान अब्दाली याविषयीं. . . . . . . . . ४१६
त्यास कंदाहार एथें राज्याभिषेक झाला. १७४७ ( आकटोबर, ) . . . . ४१७
त्याणें अब्दाली हें नाव फिरवून दुराणी ठेविलें. ४१७
व आपली बेकैद रयत सुयंत्र वागविली. . . . . ४१८
त्याचे हिंदुस्थानाविषयीं विचार. . . . . . . . . . . ४१८
त्याणें पंजाब घेतला. . . . . ४१९
पुढें त्याचा पराजय झाला. ४२०
महम्मदशाह मरण पावला. १७४८, एप्रिल. . . . . ४२१

## प्रकरण चौथें.

(मोगलांचा राज्याची समाप्ति होईपर्यंत.)

अहमदशाह बादशाह. . . ४२२
वजीर सफ्दरजंगानें रोहिले लोकांस जिंकण्याचा यत्न केला. १७४८, डिसेंबर. . . . . . . . ४२३
तो पराजय पावला. १७५० ४२३
त्याणें मराठ्यांस मदतीस बोलाविलें. १७५१, . . ४२४
त्यांणीं रोहिल्यांस जेरीस आणिलें. . . . . . . . . ४२५

पृष्ठ.
पादशाही लश्कराचा मेवाडांत पराजय झाला... ४२५
अहमदशाह दुराणी याची दुसरी स्वारी....... ४२५
त्यास पंजाबप्रांत तोडून दिला. १७५२. .... ४२५
वजीर सफदरजंग नाखुश झाला........... ४२६
त्याणें मारेकरी घालून जवीद मारिला....... ४२६
धाकट्या ग्यासुद्दीनाविषयीं. ४२६
तो वजीराचा आड येऊं लागला. ........ ४२७
त्याणें मराठ्यांचा मदतीनें वजीरास हाकून लाविलें ४२८
त्याविरुद्ध बादशाहाचा मसलती. ......... ४२८
तो पराजित व पदच्युत झाला. १७५४. .... ४२८

## दुसरा अमलगीर पादशाह.

ग्यासुद्दिन वजीर झाला. जून, १७५४...... ४२९
त्याची व्रात्य राजरीति. . ४२९
एका बंडापासून त्याचा जीवास जोखम उत्पन्न झालें ४२९
त्यास बादशाहाचा वहमा आला ........... ४३०
त्याणें अहमदशाह दुराणी याचा पंजाबांतील सुभेदार विश्वास घातानें पकडला. १७५६........ ४३०
अहमदशाहाची तिसरी स्वारी ............ ४३१
त्याणें दिल्ली घेतली..... ४३१
तेथील लोकांची कत्तल केली, व जुलूमानें द्रव्य घेतलें........... ४३२
तो आपल्या राज्यांत परत गेला. १७५७ जून... ४३३
नजीबउद्दौल्यास सेनापति केला......... ४३३
ग्यासुद्दीनानें मराठ्यांस मदतीस बलाविलें. .... ४३३
मराठ्यांचें पूर्वीचें वर्तमान. ४३४
पेशव्याचा धाकटा भाऊ राघोबा ग्यासुद्दीनाचा मदतीस निघून गेला. ४३५
त्याणें दिल्ली घेतली. .. ४३५
बादशाहीचा वारीस व नजीब हे निसटून गेले. .. ४३५

| | पृष्ठ. |
|---|---|
| राघोबानें पंजाब घेतला. १७५८. ......... | ४३५ |
| सर्व हिंदुस्थान घेण्याचे मराठ्यांचे बेत. .... | ४३७ |
| मुसलमान रजवाड्यांनीं कट केला. ...... | ४३७ |
| मराठ्यांची रोहिलखंडावर स्वारी. .... १७५९. | ४३८ |
| अहमदशाहाची चौथी स्वारी. १७५९ सेपटेंबर. | ४३८ |
| दुसऱ्या अलमगीराचा खुन झाला. ...... | ४३९ |
| मराठ्यांचा उत्तरहिंदुस्थानांतील लश्करास अहमदशाहानें पिटून लाविलें | ४४० |
| मराठ्यांचा सत्तेचा कळस झाला. ........... | ४४१ |
| त्यांची फौज. ......... | ४४२ |
| उत्तरहिंदुस्थानांतिल .. लढाईची मोठी तयारी. | ४४३ |
| सदाशिवरावभाऊचा उद्धटपणा ........... | ४४३ |
| त्याणें दिल्ली घेतली. .... | ४४५ |
| अहमदशाहाचें शुजाउद्दौल्याबरोबर बोलणें झालें | ४४६ |
| शुजा मुसलमानांचा कटांत येऊन मिळाला. .... | ४४६ |
| अहमदशाह सदाशिवरावभाऊवर गेला. .... | ४४६ |
| तो धीटपणें यमुना उतरला. आकटोबर. १७६०. | ४४७ |
| मराठे पाणिपत एथें खंदक खणून छावणी देऊन राहिले .......... | ४४७ |
| त्यांची संख्या. ...... | ४४७ |
| अहमदशाहाची फौज. .. | ४४८ |
| लढाईचें काम लांबावलें. .. | ४४९ |
| मराठ्यांस दाणावैरणीचा तोटा पडला. .... | ४४९ |
| पाणिपतची लढाई. जान्युआरि ता० ६. १७६१. | ४५३ |
| मराठ्यांचा फौजेचा नाश झाला. ......... | ४५७ |
| ते निराश झाले. ...... | ४५८ |
| पेशवा मरण पावला. .. | ४५९ |
| मुसलमानांचा कट फुटला. | ४५९ |
| मोगलराज्याची समाप्ति. | ४५९ |


## पुरवणी.


| | |
|---|---|
| दिल्लीचें राज्य मोडल्या नंतर जीं राज्यें झालीं त्यांविषयीं. ...... | ४६१ |
| दक्षिणेंतील ब्राह्मणी राजे. | ४६१ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| विजापुर एथील आदिलशाही वंशाविषयीं.... | ४६४ |
| अहमदनगर एथील निजामशाही वंशाविषयीं. .. | ४६९ |
| गोंवळकोंडें एथील कुतुबशाही वंशाविषयीं.... | ४७२ |
| वऱ्हाड एथील इमादशाही वंशाविषयीं. ...... | ४७५ |
| बेदर एथील बरीदशाही वंशाविषयीं......... | ४७६ |
| गुजराथचें राज्य. .... | ४७७ |
| माळव्याचें राज्य. .... | ४९५ |
| खानदेशचें राज्य. .... | ४९९ |
| बंगालचें राज्य. ...... | ५०१ |
| जवानपुरचें राज्य. .... | ५०२ |
| सिंधदेशाविषयीं. ...... | ५०३ |
| मुलतानचें राज्य....... | ५०३ |

ग्र. ३५८ ३०
२

# हिंदुस्थानाचा इतिहास.

## भाग सहावा.

## प्रकरण तिसरें.

### अकबराची राजनीति.

मनुष्यमात्रांस सुख देण्याकरितां जे उत्तम प्रतीचे राजे निर्माण झाले, त्यांत अकबराचा राजनीतिवरून याची गणना करितात; त्या नीतीचा योगानें धर्मसंबंधीं व इतर राजकीय व्यवस्थेसंबंधीं निरनिराळ्या रीतींचे फेरफार झाले. अकबर धर्माविषयीं निराग्रही होता आणि असा याचा कल याचा कारकीर्दीचा आरंभींच दिसून आला; आणि मुसलमानी धर्म हा ईश्वरप्रणीत आहे याविषयींचा संशय येऊन याचा मनामध्यें असा ग्रह झाला होता, असें कांहीं नाहीं. तथापि अशी याची प्रकृति होती, यामुळें हा अन्य धर्मांचीं मतें पक्षपाताशिवाय ऐकून घेत असे; आणि या निराग्रही स्वभावामुळें स्वधर्मांतील दुराग्रही लोकांशीं याचें वांकडें पडलें; व याच कारणामुळें याचा मूळचा भरवसा उडून कुराणाचा आज्ञा निर्विवाद सत्य आहेत, असें नाहीं, असा संशय याचा मनांत येऊं लागला. जांत आपल्या

अकबराची धर्मसंबंधी व मुलूकी कामाची रीति.

याचा निराग्रहीपणा व निःपक्षपातीपणा.

सर्व रयतेचा समावेश होईल, असा एक नवा धर्म काढिला असतां, त्यापासून राज्याचें पुष्कळ हित होईल हें याचा मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. आपल्या कारकीर्दीचा आरंभीं हा मोठ्या तत्परतेनें पवित्र स्थानांचा यात्रा करित असे, आणि साधूंचीं दर्शनें घेत असे; आणि आपल्या राज्याचा २१ व्या वर्षींहि हा मकेचा यात्रेस जाण्याचा घाट मोठ्या बेतानें घाटित होता. पुढें २४ व्या वर्षीं ( ह्मणजे इ० स० १५१९ मध्यें) याणें आपलीं निरहंकारी मतें उघड रीतीनें प्रकट केलीं.

याचा धर्मसंबंधी मतांचा पालट.

मुसलमानांमध्यें कांहीं पंथांचा फकीरांत धर्माविषयीं असेच निराग्रही विचार असून त्यांतून कोणा एकाची व याची भेट झाली नसेल, असें ह्मणवत नाहीं. परंतु फैज़ी व त्याचा भाऊ **अबुल् फज़ल्** या दोघांनीं अकबराचा मुसलमानपणा बिघडला, असा दोष त्या दोघां भावांवर सर्व मुसलमान ग्रंथकार आणितात. हे दोन्ही मख्यात पुरुष मुबारिकनामक एका विद्वान् पुरुषाचे पुत्र होते. मुबारिक हा बहुधा नागोर एथील राहणारा असून, तो एका काळीं आग्रा एथें आपल्या रीतीचें धर्मशास्त्र व अध्यात्मविद्या, यांची शाळा पढवित असे. तो प्रथम सुनी होता, परंतु पुढें शिया झाला. नंतर प्राचीन काळचा लोकांचे शास्त्रीय ग्रंथ वाचूं लागून तो निराग्रही मताचा झाला. त्यास त्याचे द्वेष्टे नास्तिक ह्मणूं लागले, यामुळें लोकांनीं त्याचा इतका छल केला, कीं त्यास आपली शाळा सोडून कुटुंबसुधां आग्र्याहून पळून जावें लागलें. त्याचे मुलगे सर्व प्रकारें मुसलमानी धर्मास अनुसरून वागत

फैज़ीविषयीं.

परंतु त्यांची त्या पंथावर कधींहि मनःपूर्वक प्रीति नव्हती, असें संभवतें.

फैझीनें संस्कृतांतून भाषांतरें केलीं.

हिंदुलोकांची व्युत्पत्ति व शास्त्र यांचा अभ्यास फैझीनें मन लावून पहिल्यानें केला. याचा पूर्वीं दुसऱ्या कोणी मुसलमानानें असा केला नव्हता. या शोधास तो अकबराचा सांगीवरून लागला, अथवा तें काम त्याणें स्वेच्छेनें हातीं धरलें हें कांहीं दिसून येत नाहीं; परंतु ब्राह्मणलोकांचा विद्येचा प्रत्येक शाखेचा जो यथास्थित शोध याणें चालविला, तो बादशाहाचा आज्ञेनें व सहायानें चालविला. त्याणें कांहीं संस्कृत काव्यें व शास्त्रें यांचें भाषांतर केलें, व शिवाय भास्कराचार्यांचें बीजगणित व लीलावती या ग्रंथांचेंहि केलें.

संस्कृत व इतर भाषांतील भाषांतरें याणें आपल्या हाताखालीं करविलीं.

याशिवाय याचा हाताखालीं दुसरे विद्वान् लोक संस्कृतांतून भाषांतरें करण्यास असत; त्यांचीं हा देखरेख पाही. याप्रमाणें त्याणें महाभारत, रामायण, आणि राजतरंगिणीनामक काश्मीरचा इतिहास व निदान एकतरी वेद[2], इतक्या ग्रंथांचीं भाषांतरें केलीं. संस्कृतांत शुद्ध इतिहासपर असा राजतरंगिणी एवढा एकच ग्रंथ आहे.

याप्रमाणें अकबरानें संस्कृतांतूनच ग्रंथ संपादन केले,

---

१ फैझीनें महाभारतांतील नलदमयंतीचा आख्यानाचें भाषांतर केलें. शिवाय त्याणें स्वतः फारसीमध्यें पुष्कळ काव्यें व दुसरे ग्रंथ लिहिले आहेत. अबुल् फझलापेक्षां तो विशेष विद्वान् असे, आणि त्यासारखा प्रापंचिक नसे.

२ मुन्तखबू उल् तवारिख्.

असें नाहीं; याणें गोव्याहून एका ख्रिस्ती उपदेशकास आणवून, युनानी भाषेंतील ग्रंथांचीं फारसींत भाषांतरें करण्याकरितां थोडे तरुण गृहस्थ ठेवावयाचे होते त्यांस शिकविण्याचें त्याकडून कबूल करविलें. या धर्मोपदेशकाचें पाद्री फराबतून या नावानें अबुल् फझल् वर्णन करितो; आणि तो शास्त्रामध्यें व इतिहासामध्यें निपूण होता असें सांगतो; याप्रमाणें बाकीचांस सांगून स्वतः फैझी यास ख्रिस्ती लोकांचा शुभ वर्तमानाचें शुद्ध भाषांतर करण्याची अकबरानें आज्ञा केली होती.[3]

अबुल् फझल् याविषयीं.

अकबराचा कारकीर्दीचा बाराव्या वर्षी याची व फैझीची भेट झाली. पुढें सहा वर्षांनंतर इ० स० १५७४ मध्यें त्याणें अबुल् फझल् यास अकबराजवळ प्रविष्ट केलें.

हे दोघे भाऊ लवकरच बादशाहाचे जिवलग मित्र

---

३ विद्या आणि कौशल्यें यांविषयीं अभिरुचि अकबराचा दरबारांत विशेष वाढली होती: अझीझ उर्फ खाने आझिम हा मोठा विद्वान् होता; बहिराम खान याचा मुलगा मिर्झाखान जास खान खानान हा किताब होता, व जो अकबराचा दुसऱ्या पायरीचा सरदार होता, त्याणें तुर्की भाषेमधून बाबराचा हकीकतीचें उत्कृष्ट फारसींत भाषांतर केलें; तें अद्यापि प्रसिद्ध आहे. त्या वेळचा प्रसिध्ध पुरुषांमध्यें तानसेन ह्मणून एक प्रख्यात गवई होता, असें सर्व इतिहासकार वर्णन करितात. त्याचा गाण्याची लोक अद्यापि विशेष तारीफ करितात. झैन खान हा हुशार व चपल सरदार असून, लढाईचा कामांत पुष्कळ वेळा गुंतलेला असे; तथापि तोहि पुष्कळ वाद्यें चांगलीं वाजवित असे. अकबर शाळांस उत्तेजन देत असे; त्यांत हिंदूी व मुसलमानी दोन्ही तऱ्हांची विद्या शिकवित असत आणि "जशी जाची स्थिति असेल, आणि जास पुढें जसा धंदा करावयाचा असेल, त्याप्रमाणें त्यास शिकवित असत."

३३४४ स ३४९



झाले; त्यांस तो क्षणभरहि विसंबेना. धर्मसंबंधीं जे आपले नवीन विचार ते अकबर त्यांस मन मोकळें करून सांगत असे; शिवाय परदेशांमधील, व स्वदेशांमधीलहि विद्वानांस आश्रय कसा द्यावा याविषयीं तो त्यांचा अभिप्राय घेत असे; आणखी मोठमोठ्या राजकारभारांविषयींहि यांजबरोबर मसलत करून यांस तीं कामें सांगत असे. दक्षिणेंत स्वारी करण्याचा पूर्वी तिकडील राजांकडे फैझी यास मुद्दाम वकालतीचा कामावर पाठविलेला होता. अबुल् फझल् यास तर पहिली लष्करी पदवी प्राप्त होऊन मुख्य प्रधानगिरीहि मिळाली होती. अबुल् फझल् मरण पावला, तेव्हां अकबरास किती दुःख झालें त्याचें पूर्वींच वर्णन केलें आहे; परंतु फैझी मरणपावला त्या वेळीं अकबरानें काय काय केलें, याविषयीं एका त्याचा शत्रूनें हकीकत लिहिली आहे, ह्मणून ती विशेष भरवसा ठेवण्याजोगी आहे. फैझी अत्यावस्थ झाला आहे, असें अकबरास मध्यरात्रीस वर्तमान समजलें; तेव्हां हा लागलाच घाईघाईनें त्याचा खोलींत गेला; परंतु पाहतो तों, तो पूर्वींच बहुधा बेसावध होऊन गेला होता. अकबर, त्याचें डोकें सांवरून धरून, प्रीतिकर वाणीनें त्यास बोलिला“ शेखजी ! मी अल्ली वैद्य तुह्मांजवळ आणिला आहे. तुह्मी कां बोलत नाहीं ? ” यास तो उत्तर देईना; असें पाहून अकबरानें आपलें पागोटें जमीनीवर आदळलें आणि शोक करून आकांत केला. त्या वेळीं फैझीचा भाऊ अबुल् फझल् हा तेथून जरा एकीकडे गेला होता; मग जेव्हां अकबर जरा स्वस्थ झाला, तेव्हां अबुल् फझलापाशीं गेला, आणि कांहीं

या भावांवर अकबराची अत्यंत प्रीति.

वेळपर्यंत त्याचें सांत्वन करून मग आपल्या महालांत परत गेला.[४]

फैझी व अबुल् फझल् यांशिवाय सर्व धर्मांमधील

---

[४] हा वृत्तान्त अब्दुल् कादिर याणें मुन्तखब् उल् तवारिख् नामें ग्रंथांत लिहिला आहे. त्यांत अब्दुल् कादिर लिहितो, कीं अगदीं मरावयाचा वेळींहि फैझी हा धर्मास शिव्या देत होता, आणि तो शेवटीं कुत्र्यासारखा भुंकला; त्याचें तोंड छिन्न विछिन्न झालें, आणि ओठ काळे पडले; जसा कांहीं पुढें त्यास जो नरकवास प्राप्त होणार त्याचा त्यावर अगोदरचा ठसा बसून गेला कीं काय? फैझीनें अब्दुल् कादिरचा वतीनें अकबरास एक शिफारसपत्र दिलें होतें, त्यावरून, आपल्या मित्रांविषयीं फैझीस किती आस्था असे तें स्पष्ट समजतें. त्या पत्रांत, पत्र नेणार (ह्मणजे अब्दुल् कादिर) याणें किती चाकरी केली, असें असून तो दुर्दैवानें रूपास चढला नाहीं याविषयीं पुष्कळ लिहिलें आहे; हा माझा ३७ वर्षांचा अत्यंत स्नेही आहे; हा खरा आणि विश्वासू मित्र, व या पुरुषांत पुष्कळ सद्गुण व कौशल्यें आहेत, याविषयीं त्याणें मोठ्या गौरवानें लिहिलें आहे; आणि शेवटीं पादशाहाजवळ त्याची मोठी शिफारस केली आहे. हें पत्र अब्दुल् कादिरानें वरील ग्रंथांत घातलें आहे. आपल्या उपकार करणाऱ्यावर याणें अशी कृतघ्नता केली आणि तो मरण पावल्यानंतर त्याची अपकीर्ति केली, या दोषाचें निराकरण अब्दुल् कादिर असें करितो कीं हें जें मी काम केलें, तें ईश्वर व धर्म यांस स्मरून मला जरूर करणें आलें ह्मणून मी केलें. अब्दुल् कादिर हा फैझी अबुल् फझल् यांजवळ धर्माचा बाबदींत भांडत असे, तथापि त्यामुळें अकबराजवळ त्याची अप्रतिष्ठा झाली, असें दिसत नाहीं; कारण फैझी मेल्यानंतर त्याचा ग्रंथसंग्रहाची याद करण्यास अकबरानें यास लाविलें होतें; त्या पुस्तकालयांत ४०६० ग्रंथ नीट शोधलेले, आणि मजबूद बांधलेले होते, व काव्य, इतर व्युत्पत्तिविषय, नीतिशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, आणि धर्मशास्त्र, या सर्व विषयांवर त्यांत ग्रंथ होते असें त्याणें वर्णन केलें आहे.

पुष्कळ विद्वान् लोक यांचा दरबारांत होते; त्यांस जमवून शास्त्रीय विषयांवर वाद करण्याची अकबरास मोठी हौस असे; आणि तो त्यांजबरोबर साऱ्या रात्रीचा रात्री बसून काढित असे. अकबराचा शास्त्रीय व धर्मसंबंधी सभा. त्या सभा भरण्याचा नियमित वार शुक्रवार असे; परंतु शिवाय तो पुष्कळ वेळा एकटाच ब्राह्मण किंवा एकटाच मुसलमान मुफ्ती यांस बोलावून त्यांचा निरनिराळ्या पंथांचा मतांविषयीं पुष्कळ शोध करित असे.

एशियाखंडांतील नानाप्रकारचा धर्मांविषयीं " दबिस्तान " ह्मणून फारसींनध्यें एक मोठा प्रौढ ग्रंथ आहे; त्यांत या मंडळ्यांमध्यें जे वादविवाद होत असत त्यांचे कांहीं नमूने दिले आहेत. ते बहुधा खऱ्या झालेल्या मंडळ्यांमधील वाद नाहींत; काल्पनिकांमधील आहेत असें संभवतें.

एक ब्राह्मण, एक मुसलमान, एक अग्निपूजक, एक यहुदी, एक ख्रिस्ती, आणि एक तत्वज्ञानी, या इतक्यांमध्यें जो संवाद झाला तो मात्र यथास्थित वर्णन केला आहे. त्यांत प्रत्येक धर्मवाद्याचा मताचें उपपादन करून, सर्व धर्मांचें एकेकामागून खंडन केलें आहे; त्यांतून कांहींचे स्थापक लबाड होते, त्यामुळें त्यांस दोष दिले आहेत; आणि सर्वांचीं मतें बुद्धीस विरुद्ध, आणि त्यांत सांगितलेले जे चमत्कार त्यांस प्रमाण नाहीं; ह्मणून सर्वांसच दूषण लाविलें आहे. त्यांत तत्ववेत्त्यानें केवळ विवेक आणि सत्य यांचा मात्र पायावर धर्माची रचना करून तो सर्वांनीं स्वीकारावा अशी शिफारस करून तो संवाद पुरा केला आहे; या प्रकारचा एक खरा संवाद " अकबरनाम्यामध्यें " दिला आहे. तो सर्व धर्मांमधील विद्वान् लोकांचा समाजासमोर पाद्री रेदिफ

नामें ख्रिस्ती धर्मोपदेशक व कांहीं मुसलमान मुल्लालोक यांमध्यें झाला. त्यांत त्या ख्रिस्तीनें आपला वाद सामोपचारानें व न्यायानें चालविला होता असें स्पष्ट लिहिलें आहे. त्या वादाचा शेवटीं अकबरानें मुल्लालोकांची त्यांचा दुराग्रहाविषयीं निर्भर्त्सना केली आणि विवेकास अनुसरून चाललें तरच ईश्वराची बराबर भक्ति होईल, लोकांनीं ह्मटलेल्या ईश्वरप्रणीत धर्मावर डोळे बांधून विश्वास ठेविल्यानें होणार नाहीं, असा माझा अभिप्राय आहे, असें सांगितलें.

---

५ या सभेमध्यें एक गोष्ट घडून आली, तिजविषयीं मुसलमानी व ख्रिस्ती ग्रंथकार निरनिराळ्या रीतीनें वर्णन करितात, आणि प्रत्येक जी गोष्ट सांगतो, ती त्याचाच धर्मनिष्ठेस विशेष बाधक होत्ये, हा या वादामध्यें विशेष चमत्कार आहे. अबुल् फझल् असें वर्णन करितो, कीं आपआपलीं शास्त्रें ईश्वरप्रणीत आहेत य विषयीं त्या पक्षकारांचा वाद झाला; त्या वेळीं, जर मुसलमानलोक कुराणावर भरवसा टेवून माझा प्रमाणें करितील, तर मी हातांत बैबल ( ह्मणजे ख्रिस्ती शास्त्राचें पुस्तक ) घेऊन पेटलेल्या अग्निकुंडांतून चालत जाईन, असें त्या पाद्रीनें सांगितलें. त्यास मुल्लालोकांनीं शिव्या मात्र दिल्या. ते पाद्री असें सांगतात, कीं वरील बोलणें प्रथम मुसलमानांकडून निघालें आणि अकबराचा इच्छेविरुद्ध तें आपण नाकबूल केलें. उभय पक्षांचें वेडेपण बाहेर काढून आपलें मनोरंजन करून घ्यावें एवढाच बहुधा वरील वादांत अकबराचा उद्देश असावा असें दिसतें; ख्रिस्ती लोकांची निर्भर्त्सना करावी असा त्याचा उद्देश होता, असें अगदीं दिसत नाहीं. अकबरास आपण आपल्या धर्मांत आणूं अशी त्या पाद्रींस मोठी आशा लागली होती; तिचा भंग झाल्यामुळें ते कोपायमान झाले, आणि त्यांस शेवटीं असें वाटलें, कीं आपलीं चित्रें व मूर्ति हीं पाहून आपली तृप्ति करून घ्यावी, आणि आपणास दरबारांत आणून आपला डौल वाढवावा, हाच आपणास उत्तेजन देण्यामधील अकबराचा उद्देश असावा. सर्व पंथांतील धर्मसंबंधीं मतें जाणण्याविषयीं अकबराची अत्यंत आर्तता असे; परंतु त्यांतहि ख्रिस्ती धर्माचा तो वास्तविक आदर करित असे

११८६ ३५८

वरील इतिहासावरून अकबराचा धर्म काय होता याचें अनुमान करितां येईल. अकबर शुद्ध एकेश्वरवादी होता; परंतु मनुष्याचा बुद्धीची दुर्बलता मनांत आणून कांहीं संस्कार करावे असें त्याचें मत असे. जें ईश्वराचें ज्ञान आपल्या विवेकबुद्धीनें आपणास प्राप्त होतें, त्यावरून त्याचें एकत्व व उदारत्व हीं चांगल्या रीतीनें सिद्ध होतात; यास्तव त्या ज्ञानाप्रमाणें आपण त्याची भक्ति करावी: तशीच त्याची आपण सेवा करावी; आणि आपले लोभादिक मनोविकार जिंकून मनुष्यमात्रांवर उपकार घडत अशा सत्कृत्यांनीं आपलें परलोकसुख साधावें; परंतु आपणाप्रमाणेंच सर्व मनुष्य दुर्गुणास व चुकीस पात्र आहेत, याकरितां कोणीहि मनुष्याचें प्रमाण मानून त्याचा धर्म स्वीकारणें, अथवा कांहीं संस्कार करणें, या कर्मास आपण प्रवृत्त होऊं नये, असें याचें धर्ममत असे. आपलें मन ईश्वराकडे लागण्यास कांहीं साधनीभूत पूजेचा दृश्य पदार्थ जर मनुष्यांस अवश्यकच पाहिजे असेल, तर सूर्य, ग्रह, अथवा अग्नि, हीं ईश्वरी चिन्हें पूजावीं, असें अकबराचें सांगणें असे. त्याचा वेळीं धर्मोपदेशक नसत; तो प्रसिद्धपणें नमाज पढत नसे, आणि अल्लाविषयीं त्याचा निर्बंध नसे; परंतु बुद्धीचें गांभीर्य वाढण्याकरितां उपोषण करावें असें हा सांगत असे; सूर्यास नमस्कार करणें, मध्यरात्रीं व

अकबराचा धर्मसंबंधीं मतांविषयीं.

---

हें विशेष होतें, असें अबुल् फझल् व अब्दुल् कादिर हे दोघेहि सांगतात. त्याणें आपला मुलगा मुराद यास ख्रिस्तीधर्मांतील "शुभ वर्तमान शिकविलें; आणि त्या पाठास आरंभ करत्ये वेळीं नेहमींचा पद्धतीप्रमाणें अल्लाचें नाव न घेतां येशुख्रिस्ताचें घेऊन आरंभ करावा, असा क्रम चालला होता.

सूर्योदयीं नमाज पढणें, आणि दोन प्रहरीं सूर्याचें ध्यान करणें एवढे काय ते याचे नियम असत. या प्रकारचा नियमांनीं भक्ति केल्यानें सिद्धि होत्ये असा याचा भरवसा पटला होता असें नाहीं; परंतु अशा रीतीनें लोकांनीं आचरण करावें असें जें हा सांगत असे, तें केवळ लोकांचा वेड्या समजुती मनांत आणून हा तसें करित असे, व लोकांस करूं देत असे. एके वेळीं पावसाकरितां ईश्वराची प्रार्थना करावी अशी लोकांनीं याची विनवणी केली; तेव्हां हा ह्मणाला, कीं आह्माला कशाची गरज आहे व आमचें मनोगत काय आहे, याची माहिती आमचापेक्षां ईश्वरास विशेष आहे, आणि आमचा कल्याणार्थ आपलें सामर्थ्य खर्च करण्यास त्यास आठवण करावयास नको; असें ह्मणून याणें स्तुति करणें नाकबूल केलें, असें अबुल्‌फज़ल्‌ वर्णन करितो; परंतु अकबर हा स्वतः सर्व धर्मसंबंधीं नमाजादि संस्कार करित असे, व लोकांस करूं देत असे, त्यावरून याचा मनावर त्या संस्कारांचा कांहीं ग्रह झाला नव्हता, कीं होता याविषयीं अंदेशा आहे. कारण अकबर स्वभावानें भक्तिमान्‌ होता ह्मणून याची बुद्धि जरी पुष्कळ शोधक व संशयी असे तरी याच्या विवेकबुद्धीनें जो धर्म पसंत केला होता, त्यापेक्षां जा थोथांडांनीं ईश्वराचा व आपला संबंध विशेष निकट होईल असें लोकांचें ह्मणणें असे, त्यांकडे याचें मन विशेष धांवत असे, असें दिसतें. याच वृत्तीमुळें, जेव्हां ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं येशु ख्रिस्त व मार्य कुमारी यांचा प्रतिमा यास दाखविल्या, तेव्हां याला धाक पडून मोठ्या भक्तीनें याणें त्यांची पूजा केली; ही एक गोष्ट, शिवाय अशाच दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत.

५-६. ३७८

अकबराचे दरबारी लोक त्याची फार स्तुति करितात आणि त्याचा धर्मसंबंधीं वाक्यांतहि कांहीं तसे उल्लेख आहेत, तथापि ईश्वरानें स्वतः मला कांहीं विलक्षण प्रेरणा केली आहे असें दर्शविण्याचा याचा अगदींच कधींहि हेतु नव्हता असें दिसतें. पैगंबर मुळींच नाहींत हें याचें मुख्य मत होतें. कोणत्याहि वेळीं प्रमाण काढावयाचें झाल्यास हा मनुष्याचा विवेकबुद्धीकडे वळे, आणि आपण मुलूकी व्यवस्थेमध्यें बंदोबस्त ठेविणार कामगार आहों, या नात्यानें लोकांचा धर्मांत हात घालण्यास काय तो आपणास अधिकार आहे असें याचें मत होतें.[६] हे फेरफार प्रसिद्ध करण्यापूर्वी याणें मुख्य मुसलमानी धर्मशास्त्र्यांचे शास्त्रीय रीतीनें अभिप्राय मिळविले होते; त्यांत पादशाह धर्माचा अध्यक्ष आणि त्याणें आपल्या विचाराप्रमाणें धर्मसंबंधीं व्यवस्था करावी आणि त्या धर्मांतील लोकांचे आपसांतील सर्व कज्जे निवडावे असा त्यास अधिकार आहे, असें मत मिळवून ठेवण्याची सावधगिरी याणें पूर्वीच करून ठेवली होती.

नंतर धर्मसंबंधी जें नवीन लोकांनीं ह्मणावयाचें वचन तें याणें केलें; तें असें कीं "केवळ एक ईश्वर आहे, दुसरा नाहीं, आणि अकबर हा त्याचा खलीफा आहे." (इ० स० १५७९, हि० स० ९८७, माहे रज्जब.)

आपल्या मतांचा प्रसार करणें तो अकबर लोकांची समजूत घालून करित असे; त्यामुळे याचा दरबारांतील लोक

६ आपल्या शिष्यांवर फुंकर घालणें इत्यादि याचे कांहीं पाठ असता त्यांवरून हा अद्भुत चमत्कार करण्याचा आव घालित असे, असें ह्मणतात परंतु हे प्रकार तर हिंदुस्थानांतील सर्व धर्मोपदेशक गुरु साधारणरीत्या करित असनात.

व दुसरे कांहीं विद्वान् लोक हे खेरीज करून दुसऱ्या लोकांमध्यें जरी याचा मतांचा प्रसर झाला नाहीं, तरी याचा पूर्वीं मुसलमानी धर्माविषयीं लोकांवर जी कायद्याचा जोरानें सक्ती होत असे, ती नाहींशी झाली. नमाज पढणें, रोजे ऊर्फ उपोषणें, धर्म, यात्रा, आणि मशीदींत देवाचा स्तव, हीं जाचीं त्याणें आपल्या इच्छेनें करावीं. अमंगळ जनावरांचा निषेध, तसेंच मित मद्यपान व फांशांनीं जुवा खेळणें यांविषयींचा हरकती याणें दूर केल्या; आणि बारा वर्षे पर्यंत कोणाची सुंता करूं नये; मग पुढें जाला तो विधि करावयाचा तो त्याचा योग्यतेविषयीं विचार करील, अशी याणें आज्ञा केली.

मुसलमान लोकांचा चमत्कारिक चालींकडे याणें पाठ केली.

यांशिवाय अकबरानें दुसऱ्या कांहीं गोष्टी केल्या, त्या याचा निरभिमानाचाहि पलीकडे गेल्या, आणि मुसलमानी धर्माची पायमळणी करण्याची याची इच्छा होती असें त्यांवरून दिसूं लागलें. याणें हिजरी सन व आरबी महिने फिरविले, आणि आपण गादीवर बसला त्या तारखेचा अगदीं जवळ जो महाविषुवाचा दिवस त्या दिवशीं आरंभ करून सौर मानाचें वर्ष केलें, आणि त्याचे महिने पाडून त्यांस जुन्या इराणी महिन्यांचीं नावें दिलीं; आरबी भाषेचा अभ्यास कोणी केला असतां, त्यास उत्तेजन देणें त्याणें कमी केलें; महम्मद, अल्ली, इत्यादि आरबी नावांची वहिवाट कमी केली; 'सलाम आलेकूम' (तुमचें कल्याण होऊ) असा जो रामराम करावयाचा पाठ असे तो फिरवून 'अल्लाहु अकबर' (ह्मणजे ईश्वर अति मोठा आहे) असें सुरू केलें; आणि जो सलाम घेईल त्याणें 'जिल्ली

जलालेहू' ( त्याचें तेज प्रकाशित होऊ ) असें त्याचें उत्तर द्यावें, असें याणें ठरविलें. दाढी राखण्याविषयीं कुराणामध्यें आज्ञा केली आहे; परंतु त्या चालीचा अकबरास इतका त्रास असे, कीं तीप्रमाणें जो चालेल त्यास हा आपल्या समोरहि येऊं देत नसे. तसेंच कितीएक प्रसंगीं पादशाहासमोर साष्टांग नमस्कार घालणें ( अथवा जमिनीचा मुका घेणें असें जा चालीस ह्मणत असत ) ही इराणी चाल सुरू करण्याचा कायदा याणें केला; परंतु एवढा मान केवळ ईश्वरासच योग्य आहे असें मुसलमान मानितात, त्यामुळें या चालीनें आणि वरील दाढी न राखण्याचा चालीनें मुसलमानांस अकबराचा विलक्षण कंटाळा आला.

हिंदूंचा थोथांडांची अकबरानें बंदी केली.

त्या वेळीं हिंदूंस सरकारचा आश्रय नव्हता त्यामुळें अकबरास त्यांचा धर्मांत हात घालण्याचें विशेष कारण पडलें नाहीं; तशांत त्यांचा धर्मांत विशेष दुराग्रह नाहीं, आणि त्यांपासून उपद्रवहि विशेष होत नाहीं, त्यामुळें त्यांत हात घालण्याची यास फारशी इच्छा झाली नाहीं, असें दिसतें. तथापि दिव्य करणें, लहान मुलींचें लग्न करणें, व होमाकरितां पशु मारणें, हीं सर्व याणें बंद केलीं. याणें हिंदुशास्त्राचा विरुद्ध विधवांस पुनर्विवाह करण्याची परवानगी दिली; खुशीशिवाय सती जाणें अगदीं मना केलें, आणि कोणी सती जाण्याचा निश्चय केल्यास तो तिणें खुशीनें केला आहे, आणि त्या कामांत कोणी आपलें वजन

७ या भाषणामध्यें बादशाहाचें नाव जल्लालुद्दीन अकबर याचा समावेश होतो.

खर्चिलें नाहीं याचा शोध लावण्याविषयींचा याणें चांगला बंदोबस्त ठेविला होता; हें याणें सर्वांहून विशेष मोठें कृत्य केलें. एके वेळीं जोदपुरचा राजा सती जाण्याविषयीं आपले सुनेवर जुलूम करित आहे असें याणें ऐकिलें, तेव्हां ती सती बंद करण्याकरितां हा लागलाच घोड्यांची डाक ठेवून तेथें गेला.

याची हिंदुलोकांवर साधारण कृपा.

याणें हिंदूंविषयीं जे मोठे बंदोबस्त केले, ते शुद्ध त्यांचा हिताचेच होते; परंतु आपल्या धर्मांत फेरफार करूं लागण्यापूर्वींच पुष्कळ वर्षांवर ते याणें सुरू केले होते. हा गादीवर बसल्यापासूनच मुसलमानांप्रमाणेंच हिंदुलोकांस चाकरीस ठेवूं लागला. पुढें आपल्या कारकीर्दीचा सातव्या वर्षीं याणें जझिया नामें अन्यधर्मी लोकांपासून जी शिरगणती घेत असत, ती बंद केली. हा कर मोठा त्रासदायक असे. तेणेंकरून पादशाही धर्माचे लोक, व त्यांचा हाताखालचे लोक, यांमध्यें वैमनस्य पडत असे. त्या सुमारास यात्रेकरू लोकांवरील देणेंहि याणें काढून टाकिलें. त्याविषयीं तो असें ह्मणत असे कीं हा कर व्यर्थ थोथांडावर पडतो खरा; परंतु एकाच ईश्वराची भक्ति करण्याचे सर्व मार्ग योजिले आहेत, यास्तव भक्तिमान् लोकांचा मार्गांत अडथळा आणून त्यांचा उत्पन्नकर्त्या ईश्वराजवळ व्यवहार करण्याची त्यांची रीति मोडून टाकणें हें नीतीस विरुध आहे.

याहून पूर्वीं इ० स० १५६१, त लढाईत धरलेल्या लोकांस गुलाम करूंनये अशी मनाई करण्याविषयीं एक दयाळू कायदा याणें केला; हा कायदा अमुकच जातीचा लोकांस लागू होता असें नाहीं; परंतु त्यापासून मुख्यत्वेंकरून

व्यवहारांत हिंदूंचें हित झालें. पूर्वींचा बखेड्यांत या द्वाड चालीपासून इतका अनर्थ होत असे, कीं जा ठिकाण-चे किल्लेकरी हल्ल्याचा वेळीं लढून अडथळा करीत, त्यांचा बायका मुलांसच मात्र गुलामगिरी करण्यास विकित असत असें नाहीं, तर कोणत्याहि शत्रूचा मुलूखांतील सर्व निरुपद्रवी लोकांस पकडून त्यांस गुलामगिरी करण्यास विकून टाकीत, असा पाठ असल्याचें दिसून येतें. हें सर्व अकबरानें अगदीं मना केलें.

मुसलमान लोकांत नाखुशी उत्पन्न झाली.

अकबरानें जे धर्मसंबंधी फेरफार केले ते सर्व एकदमच सुरु केले नाहींत, आणि त्यांतूनहि जे लोकांस विशेषेंकरून सदोष असे दिसले, ते त्याणें रद्द केले, अथवा त्यांची व्याप्ति राजवाड्यामध्यें मात्र ठेविली, तथापि त्या योगानें जे विशेष निर्शीम मुसलमान होते त्यांमध्यें व मुख्यत्वेंकरून मुल्लालोकांमध्यें मोठा गवगवा झाल्यावांचून राहिला नाहीं; तशांतहि जेव्हां अकबरानें सर्व राज्याचा महसूलाचा बंदोबस्त केला, त्या वेळीं जे फेरफार झाले त्यांचा योगानें धर्मादाय खात्यांचा जमिनींचा स्थितीमध्येंहि कांहीं तफावत पडली; तेणेंकरून तर मुल्लालोकांस अधिकच वीट आला. या सर्वलोकांचीं गाराणीं “ मुन्तखब् उल् तवारिख् ” या ग्रंथाचा कर्त्ता अब्दुल् कादिर, जाविषयीं पूर्वीं पुष्कळ वेळा लिहिण्यांत आलें आहे, त्याणें मोठ्या उत्सुकतेनें सांगितलीं आहेत. अकबराची शिस्त मुसलमानी धर्माचा छेद करण्याची होती, आणि त्या धर्मास अवलंबून राहिलेल्या प्रख्यात पुरुषांचा छलहि तो करित असे, असा आरोप कादिर अकबरावर आणतो. आतां जे लोक यास अडथळा

करण्याविषयीं विशेष उद्योग करित असत त्यांविषयीं याचा मनांत वांकडें असे, असें संभवत नाहींसें नाहीं, आणि जे विशेष मिळाऊ रीतीनें वागत त्यांस हा आश्रय देत असे, हेंहि खचित आहे; परंतु जाजा लोकांशीं कठीण भाषण व वर्तणूक केल्याचीं उदाहरणें कादिरानें दिलेलीं आहेत, त्या सर्व लोकांनीं कांहीं तरी अपमान किंवा दंगेखोर वर्तणूक अशीं विवक्षित कृत्यें केल्यामुळें अकबरानें जें केलें तें योग्यच असें दिसतें. सदरील उदाहरणें मुल्ला लोकांचींच आहेत असें नाहीं. एका मुख्य उमरावानें अकबराचा कृत्यांस दोष दिला, आणि, यांविषयीं दुसऱ्या देशांतील वास्तविक धर्मानें चालणारे राजे काय ह्मणतील याविषयीं तुह्मास काय वाटतें ? असें बादशाहास विचारिलें. त्यावरून याणें त्यास राजमहालांतून हांकून लावण्याची आज्ञा केली; तसेंच दुसऱ्या एका उमरावानें बादशाहाचे प्रधान हे पापरूपी पुरुष आहेत असें ह्मटलें; तेव्हां अशा उत्तराबद्दल तुला एक ठोंसा मिळणें योग्य आहे, असें त्यास अकबरानें सांगितलें. या फसाद करणाऱ्या लोकांपैकीं 'खाने-आझिम' नामें पदवीचा सरदार अझीझ हा मुख्य होता. तो अकबराचा दुधभाऊ असून त्याचा उत्तम सरदारांपैकीं सरदार होता. हा मानकरी गुजराथचा सुभ्यावर जाऊन फार दिवस राहिला होता, त्यावरून त्याचा आईनें आग्रह करून अकबराकरवीं त्यास दरबारांत येण्याकरितां बोलावणें पाठविलें. अझीझानें न येण्याचें कांहीं निमित्त सांगितलें; परंतु दाढी काढून टाकणें व नमस्कार घालणें ही त्याची खरी हरकत आहे असें दिसून आलें; तेव्हां अकबरानें त्यास सामोपचारानें उपदेशपर पत्र

लिहिलें; परंतु अझीझानें आग्रह धरल्यावरून त्यास दिल्ली एथें येण्याविषयीं अकबरानें सक्त हुकूम पाठविला. त्यावरून अझीझ याणें आपलें काम टाकून दिलें, आणि अकबरास एक उद्धट व निंदापर पत्र लिहिलें. त्यांत त्याणें यास असें विचारलें, कीं तूं जो गर्व करून औद्धत्यानें नवा धर्म चालू केला आहेस, त्या तुला कांहीं धर्मपुस्तक स्वर्गांतून प्राप्त झालें आहे काय? अथवा महम्मदासारिखे अद्भुत चमत्कार करून दाखविण्याची तुझामध्यें शक्ति आहे काय? याकरितां मी तुला सावध करितों, कीं तूं अक्षयी नरकवासास जाण्याचा पंथास लागला आहेस; त्या पत्राचा शेवटीं अकबरास तरणोपायाचा मार्गावर ईश्वरानें पुनः आणावें ह्मणून त्याची प्रार्थना करून पत्र पुरें केलें आहे. याप्रमाणें आपल्या औत्सुक्याचा तडाका मारून अकबराची परवानगी न घेतां, अथवा यास न कळवितांहि जहाजांत बसून तो मक्केस गेला; परंतु तेथें थोड्याच दिवसांमध्यें त्याला आपल्या स्थितीचा कंटाळा आला, ह्मणून तो हिंदुस्थानांत परतून येऊन अकबरास शरण गेला; त्यावर अकबरानें पूर्ववत् कृपा करून तसाच भरवसा ठेवला.

अकबराचा धर्माचा प्रसर विशेष झाला नाहीं.

याप्रमाणें जेजे अडथळे आले त्यांतून अकबर पार पडला, तथापि याचा धर्म केवळ बुद्धिग्राह्य व निर्गलितार्थ होता, त्यामुळें सर्व लोकांस तो विशेष प्रिय झाला नाहीं. थोडे तत्ववेत्ते, व कांहीं स्वार्थसाधक धर्मोपदेशक व दरबारी लोक यांणीं मात्र त्याचा स्वीकार केला होता, त्यापलीकडे त्याची कधींहि गति झालीसें दिसत नाहीं. पुढें अकबर मरण पावल्यावर, त्याचा धर्माचाहि आपसुखानेंच

काळ झाला, आणि जहान्गीर बादशाहाचा कारकीर्दींत हळू हळू गोंगाट न्होतां मुसलमानी आचार पुनः सुरू झाले. सौर मानाचें वर्ष अकबरानें सुरू केलें ह्मणून तें जास्तवेळपर्यंत राहिलें असें नाहीं, तर त्यापासून वस्तुतः विशेषच फायदे होते, यामुळें तें साल कांहीं दिवस पुढें चाललें. अकबराचा शिस्तीमुळें लोकांत उदार शोधक बुद्धि उद्भवली; आणि पुढें जरी ती शिस्त नाहींशी झाली, तथापि ती शोधक बुद्धि तशीच शेष राहिली, आणि जर बाह्य कारणांनीं तिचा गतीस प्रतिबंध झाला नसता, तर ती पक्व दशेस येऊन, त्या वेळचा थोथांडांत पुष्कळ चांगली सुधारणूक झाली असती.

जीं अकबराचीं मतें होतीं, तीं त्याणें शोधून काढिलीं असा त्याचा आपल्याचानें वर्णव करवत नाहीं. कारण वास्तविक पाहूं गेलें असतां ईश्वर एक आहे असें हिंदूंमधील विद्वानांचें मत पूर्वीपासूनच होतें, आणि ते आपल्या धर्मांतील कादंबरीचा गोष्टींवर विश्वास न ठेवितां त्यांस मान मात्र देत असत. अकबरापूर्वीं सुमारें १०० वर्षांवर कबीरनामक साधूचा अनुगाम्यांचा **कबीरपंथ** ह्मणून निर्माण झाला होता. त्या पंथांतील लोकांचे विचार वरील हिंदु विद्वानांचा विचारांपेक्षांहि अकबराचा विचारास अधिक मिळते येत असत आणि त्यांपासून यागें आपले कांहीं धर्म संबंधी स्वेच्छाचारी नियम घेतले होते, असें दिसतें. तथापिहि पूर्वींचा सर्व बादशाहांपेक्षां ईश्वराचा स्वरूपाविषयीं याचे विचार फार चांगले होते. जर एकादा बैरागी गुहेमध्यें राहणारा असून त्याणें कधीं धर्मामध्यें सुधारणा केली, तर लोक बहुधा त्याचाच छल करितात; तेव्हां असा मनुष्य धर्मांत फेरफार

करावयास इच्छित असून त्याणें लोकांस आपापल्या मतांप्रमाणें चालण्यास मोकळीक दिली, तर त्यांत त्याणें एवढें औदार्य केलें असें ह्मणतां येत नाहीं; परंतु अकबरासारख्या बलाढ्य राजानें जर अशी परवानगी दिली, तर त्याचें पोट मोठें थोर असें ह्मटलें पाहिजे.

याचा राज्यकारभाराचा प्रकार व महसूलाची शिस्त.

अकबराचा महसूली शिस्तीनें हिंदुस्थानाचें पुष्कळ कल्याण झालें अशी तिची कीर्ति आहे. तथापि त्या शिस्तींत याणें कांहीं नवीन कल्पना काढली असें दिसून येत नाहीं; पूर्वींचा बंदोबस्त विशेष सफाईनें व नियमितपणानें तडीस नेला एवढेंच मात्र याणें केलें. वास्तविक पाहूं गेलें असतां शीरशाहानें जी वहिवाट सुरू केली, तिचा सर्व राज्यांत फैलावा करण्यास त्याची कारकीर्द थोडे दिवस चालल्यामुळें त्यास फुरसूद झाली नाहीं, व मागाहून अकबरानें तीच पुढें चालविली.

(१) जमीनीची बराबर मोजदाद करणें; (२) दर बिघ्यास उत्पन्न काय होतें याचा तपास करून त्यांतून सरकारास काय द्यावें त्याचें प्रमाण ठरविणें; आणि (३) त्या ठरविलेल्या ऐनजिन्नशीं उत्पन्नाबद्दल त्याचा किम्मतीचा मानानें पैका किती द्यावा याचा ठराव करणें; हे अकबराचा बंदोबस्तांत मुख्य उद्देश होते.

१ पूर्वीं सरकारी अंमलदारहि जमीन मोजण्याचीं निरनिराळीं मापें बाळगित असत; तीं याणें काढून जमीनीची बराबर मोजदाद होण्याकरितां जिकडे तिकडे एकसारखें माप सुरू केलें; तशींच क्षेत्रफळ करण्याचीं यंत्रेंहि फेरफार करून चांगलीं केलीं; आणि नंतर सर्व राज्यामधील लागवड

जमीनीची पुरी मोजदाद करण्याकरितां लोक पाठवून दिले.

२ — मोजदादीप्रमाणें जमाबंदीचें काम इतकें सरळ नव्हतें. जमीनीचा मकदुराप्रमाणें तिचा तीन प्रति केल्या होत्या. त्यांतून दर प्रतीचा बिघ्यास किती उत्पन्न होईल त्याचे निमताने काढले होते, आणि तिन्ही प्रतींचा निमतान्यांची सरासरी करून तितकें एका बिघ्याचें उत्पन्न असें धोरण बांधिलें होतें, आणि त्या उत्पन्नांतून एक तृतीयांश सरकारचें देणें असें ठराविलें होतें.[८] परंतु ही जमाबंदी सरकारचें शिकस्त देणें ठरविण्याकरितां मात्र केली होती, असें

---

८ उदाहरण जर आपण एक बिघाभर गव्हाचें शेत घेतलें, आणि त्याचें मणांचा मापानें उत्पन्न धरिलें, तर—

| | मण | शेर | |
|---|---|---|---|
| पहिल्या प्रतीचा जमीनींत .. | १८ | ,, | उत्पन्न होईल. |
| दुसऱ्या ............ | १२ | ,, | ,, |
| तिसऱ्या ............ | ८ | ३५ | ,, |
| एकंदर ... | ३८ .... | ३५ | |

त्यास तिहींनीं भागलें असतां १२ मण, ३८⅓ शेर सरासरी येत्ये; आणि तीस पुनः तिहींनीं भागलें असतां ४ मण, व १२⅞ शेर इतकें दर बिघ्यास सरकारी देणें आकारतें.

जर एक बिघा कापसाचा शेताचा उत्पन्नाचा अजमास धरला तर-

| | मण | शेर | |
|---|---|---|---|
| पहिल्या प्रतीचा जमीनींत ... | १० | ...... | उत्पन्न होईल. |
| दुसऱ्या ............ | ७ | ....२० | |
| तिसऱ्या............ | ५ | | |
| एकंदर | २२ | ....२० | |
| तिन्ही प्रतींची सरासरी | ७ | ....२० | |
| बादशाही देणें ( सदरील सरासरीची तिजाई ) | २ | .... २० | |

एक मण ह्मणजे ४० रतलांहून कांहीं कमी आहे.

दिसतें. कारण आपणावर वसूल वाजवीपेक्षां जास्त बसतो असें जास वाटेल, त्याणें प्रत्यक्ष मोजदाद करून पिकाचे विभाग करण्याविषयीं सरकाराजवळ अड धरावी अशी मोकळीक होती. एकसारख्या मकदूराचा जमिनींची दुसऱ्या कांहीं रीतींनीं निराळी स्थिति असे; या कारणामुळें पूर्वीचा प्रतबंदींत खालीं लिहिल्याप्रमाणें फेरफार झाले होते.—१. जी जमीन कधींहि ओसाड टाकावी लागत नसे, तिजवर दर पिकास भरदस्त द्यावा लागत असे. २ जी ओसाड टाकावी लागत असे तिचें लागवडीचा सालीं मात्र देणें पडे. ३. पाण्यानें धुपून गेल्यामुळें किंवा अशाच दुसऱ्या कारणामुळें जा जमीनींचें नुकसान झालें असेल, अथवा जा जमीनींत तीन वर्षें लागवड झाली नसून ती पुनः लागवडीस आणण्यास कांहीं खर्च लागेल, अशा जमीनींवर पहिल्यावर्षीं $\frac{2}{5}$ देणें बसे आणि पांचव्या वर्षापर्यंत तें हळू हळू वाढून, नंतर ती जमीन भर दस्तास येई. ४ जी जमीन ५ हून जास्ती वर्षें ओसाड पडली असेल, ती पुनः लागवडीस आल्यापासून प्रथम चार वर्षेपर्यंत तिचें देणें याहूनहि स्वल्पवार पडत असे.

जमीनींचा मकदूराचा प्रति कशा बांधित असत त्याविषयीं "ऐनिअकबरी" नामें ग्रंथांत कांहीं सांगितलेलें नाहीं. प्रत्येक गांवचा लोकांचा सम्मतानें (निमतानें बांधून) त्या त्या गांवचा (अव्वल, दुम, शीम, अशा जमीनीचा तीन) प्रती ठरवित असत. तशांत हिंदुस्थानामध्यें प्रत्येक गांवचे लोक आपसांतील वहिवाटी करितां स्वतःच प्रती लावित असत, अशी फार प्राचीन काळापासून वहिवाट असे; तेणेंकरून सरकारची प्रतबंदी करावयास

फार सोपें पडत असे. गांवचा लोकांचा स्वतांचा मतबं-दींत सर्व गांवचा जमीनीचा, तिचा तिचा मगदूराप्रमाणें, काळी, राती, रेंवसट, रेतड, काळी खडकळ, इत्यादि पुष्कळ प्रति पाडित असत. शिवाय कोणत्या जमीनीजवळ पाण्याची कशी सोय आहे, गांवापासून जमीनीचा पल्ला किती आहे, इत्यादि गोष्टींचाहि विचार करित असत; आणि सर्वांस सारखा फायदा व्हावा अशा रीतीनें पुष्कळ मेहनत घेऊन निरनिराळ्या प्रतींची जमीन शेतकरी लोकांस वांटून देत असत.

३ सरकारचें ऐनजिन्नस देणें किती हें ठरल्यानंतर त्याबदल नक्द देणें किती ठरवावयाचें तें काम चाललें. त्याकरितां सदरील पाहणीचा पूर्वीचा १९ वर्षांचा निरखांचा कैफियती शहरांतून व खेड्यांतून आणविल्या आणि त्या कैफियतींतील दरांची सरासरी काढून वरील ऐन जिन्नसी देण्याचें नक्द ठराविलें होतें; त्या नक्दाचा ठरावांत प्रसंगवशात् बाजारदराप्रमाणेंहि पुनः तपास पाहून फेरफार करित असत. जर नक्दीचा ठराव जरब आहे असें कोणास वाटलें, तर त्यास ऐनजिन्नस वसूल देण्याची मोकळीक असे.

प्रथम हे सर्व ठराव वर्षाचा वर्षास करित असत; परंतु ते वारंवार होऊं लागल्यापासून लोकांस त्रास होतो असें समजुतींत आल्यामुळें पूर्वीचा दहा वर्षांचा उत्पन्नाची सरासरी करून त्यावरून पुढें दहा वर्षांचा ठराव केला होता. हा पुष्कळ मुदतीचा ठराव केल्यामुळें वरील बंदोबस्तामध्यें जो एक साहजिकच दोष आहे तो कांहींसा कमी झाला. कारण जा जा जातीचें पीक करावें त्या त्या मानानें कमजास्त जमाबंदी द्यावी लागत असे; त्यामुळें

भारी किम्मतीचें पीक लागलें असतां जरी पुष्कळ फायदा होण्याची आशा असे, तरी पुढील जमाबंदीस जास्त देणें द्यावें लागेल या भीतीनें तें पीक उत्पन्न करण्याची शेती लोकांस इच्छा उत्पन्न होत नसे.

वरील पाहणीची व प्रतबंदीची सर्व यथास्थित नोंदणी ठेविली असे, आणि तिजवरून प्रत्येक गांवचा पत्रकांत जमीनीचे धडे कसे पाडलेले असत, व वसूलांत कमजास्ती काय होई त्याचा तपशील लिहिलेला असे. वरील बंदोबस्तच वस्तुतः चांगला होता त्यामुळें हिंदुस्थानापैकीं जो मुलुक अकबराचा वेळीं मोगलांचा ताब्यांत नव्हता तेथेंहि पुढें त्याची शुरुवात होऊन, अद्यापि तेथें व दुसऱ्याहि प्रांतांत ती वहिवाट चालू आहे. याप्रमाणें जा वेळीं अकबरानें जमाबंदी करून जमीनीचा देण्यामध्यें वरील रीतीनें सुधारणूकी केल्या, त्या वेळीं याणें पुष्कळ त्रासदायक बाबी, व अम्मलदार लोकांस द्याव्या लागत अशा पट्या, बंद केल्या.

तसेंच त्याणें एक कोट ( १००,००,००० ) दाम ह्मणजे २५०,००० रुपये, इतक्या उत्पन्नाचे सर्व मुलुकाचे महसूली तालुके पाडिले. त्या प्रत्येक तालुक्यांतील तहसीलदारास क्रोडी ( ऊर्फ कोटी ) असें ह्मणत असत. हा बंदोबस्त फार दिवस चालला नाहीं, आणि प्राचीन हिंदुलोकांनीं जसे विभाग पाडले होते तसे पुनः सर्वत्र झाले.

या बंदोबस्तानें सरकारचा जमाबंदींत तूट पुष्कळ पडली, परंतु पूर्वीं वसूल करत्ये समयीं जमाबंदीचा बेरजेस नुकसान पोंचत असे ती सरकारचा वसूलाची चोरी कमी झाली; तेणेंकरून हल्लींचा बंदोबस्तानें जरी सरकारचा फायदा जितक्यास तितका राहिला तरी लोकांचा बोजा पुष्कळ

कमी झाला. शीरशाह हा आपण उत्पन्नाची चौथाई घेतों असें ह्मणे, आणि अकबर तर तिजाई घेत असे; असें असतां त्याचापेक्षां अकबराची जमाबंदी त्याचा जमाबंदीहून अधिक झाली होती, असें अबुल् फझल् सांगतो.

अकबरानें आपल्या तहसीलदारांस जे वहिवाटीचे हुकूम दिले होते, ते अद्यापि आपणास उपलब्ध आहेत; त्यांवरून ही आपली जमाबंदीची शिस्त त्यांणीं मोकळ्या हातानें चालवावी, आणि आपल्या लोकांस इजा न पडतां सुख व्हावें, यांविषयीं हा काळजी वाहत असे, असें दिसतें. याची वहिवाट कशी चालली असे त्याविषयींहि वरील हुकुमांत कांहीं तफ्सील आढळतो. कोणत्याहि प्रकारचा महसूलाचा मक्ता देऊं नये, आणि तहसीलदारांनीं कबूलाती घेत्ये वेळीं व वसूल करत्ये वेळीं प्रत्येक शेत्याबराबर प्रत्यक्ष व्यवहार करावा आणि डोळे मिटून गांवचा पाटलावर किंवा कुळकरण्यावर भरवसा ठेवूं नये, असा त्या लोकांस हुकूम दिला होता. या मोठ्या बंदोबस्तानें त्या वेळचा लोकांची पुष्कळ सौख्यवृध्धि झाली, तथापि त्यांमध्यें पुढें दिवसेंदिवस अधिकाधिक सुधारणूक होण्याचें कांहीं तत्व नव्हतें, यामुळें दुसऱ्या धंद्यांत शिरून अथवा आपल्याच धंद्यांत मेहनत करून, बढती करून घेण्याची आशा शेतकरी लोकांस नव्हती. वंशपरंपरेचा वारशाचा संबंधानें जेथपर्यंत जमिनीचे विभाग होताहेत तेथपर्यंत कोणचाहि रीतीनें बंदोबस्त केला असतां रयतेची स्थिति चांगली होण्याचे उद्देश तडीस जाणार नाहींत, हें सहजच आहे; कारण जमीनीचे पुष्कळ हिस्से पडल्यामुळें शेतकीचा कामामध्यें मोठाल्या सुधारणुका बंद

पडतात, आणि जे लोक व्यापारामध्यें किंवा दुसऱ्या धंद्यामध्यें कदाचित् लागले असते, ते शेतकीलाच धरून बसतात. तेच जर दुसऱ्या कामांत लागते, तर कच्चा मालाचा भाव वाढून शेतकरी लोकांचा मजूरीचा दर चढता; कारण इतर व्यापारांमध्यें लोक पडूं लागल्यामुळें या धंद्यांत खपाचा मानाप्रमाणें मजूर लोक कमी झाले असते.

तोडरमल्ल.

वरील जमाबंदीचा बंदोबस्त **राजा तोडरमल्लानें** केला; त्याचाच नावानें तो अद्यापि सर्वत्र प्रसिद्ध आहे. या प्रधानानें जे लढाईंत पराक्रम केले, त्यांविषयीं पूर्वींच वर्णन झालें आहे. हा पुरुष अगदीं निर्लोभी व निष्कपटी होता, परंतु याचा स्वभाव दुसऱ्याचें वाईट इच्छिण्याचा आणि सूड घेण्याचा होता; आणि हिंदुधर्मांतील उपासतापासांचा भारुडावर याची इतकी निष्ठा असे, कीं अकबरानेंहि तिजबाबद त्याला छेडिलें होतें.

सरसुभे व तेथील अम्मलदार;-लश्करी, इनसाफ खात्यापैकीं, व मुलूकी बंदोबस्ताचे.

अकबरानें महसूलाचा खात्याचा बंदोबस्त कसा केला, त्याविषयीं जशी आपणास तफ़ूसीलवार हकीकत सांपडत्ये, तशी इतर खात्यांमध्यें याचा बंदोबस्त कसा होता त्या प्रकर्णीं समजत नाहीं; तथापि याणें आपल्या अम्मलदारांस जे हुकूम दिले आहेत, त्यांवरून साधारण धोरण बांधतां येईल.

सर्व राज्याचे १५ प्रांत ह्मणजे सुभे केले होते. त्यांतून प्रत्येकावर सिपाहसालार नामें सरसुभेदार नेमला

१ यांतून उत्तरहिंदुस्थानांत बारा होते आणि दक्षिणेंत तीन होते. जेव्हां विजापुर व गोंवळकोंड हीं राज्यें मोगलांनीं घेतलीं, तेव्हां दक्षिणेंतील सुभे वाढून सहा झाले. अकबराचा कारकीर्दीनंतर सिपाहसालार हा किताब

होता, आणि त्याचा हातांत सर्व दिवाणी व फौजदारी अम्मल असे; व त्याजवर बादशाहाची हुकमत असे.

सरसुभेदाराचा हाताखालीं वर लिहिल्याप्रमाणें तहसीलदार असत; शिवाय परगण्यांतील लश्करी अम्मलदार असत, त्यांस फौजदार ह्मणत. त्यांचा अधिकार त्यांचा त्यांचा हद्दींतील लोकांवर, तसाच त्यांचा हद्दींतील लश्करी कारणांकरितां नेमून दिलेल्या जमीनींवर व सर्व लश्करी नेमणूकांवर, आणि त्याचप्रमाणें त्या परगण्यांत जी नेमणूकी बादशाही फौज आली असेल तिजवरहि असे. वरील सरहद्दीमध्यें, लश्कर लावून मोडण्याजोगे असे जे बखेडे होतील, ते बंद करण्याचें काम यांजकडेस असे.

तसेंच प्रत्येक प्रांतांत न्याय करण्याकरितां **मीर आदिल**, व काजी यांचें एक कोडत असे; त्यांत काजी हा चौकशी चालवून त्या बाबदींत शास्त्रार्थ सांगत असे, आणि 'मीर आदिल' हा निवाडा ठरवित असे. त्यांतून '**मीर आदिल**' याचा अधिकार विशेष होता, असें दिसतें. वास्तविक मुसलमानी कायद्याप्रमाणें काजीचा द्वारानें इनसाफ व्हावा; परंतु बादशाहाचा मर्जीप्रमाणें, व देशरिवाजाप्रमाणें त्या मूळ कायद्यामध्यें फेरफार होऊन, वर लिहिल्याप्रमाणें कामांचा भेद झाला होता.

मोठमोठ्या शहरांतील बंदोबस्ताचा, ह्मणजे पोलीसचा, लोकांवर कोतवालाची नेमणूक असे; लहान शहरांमध्यें ते

---

मोडून सुभेदार हा किताब दिला गेला, आणि त्याचा हाताखालीं महसूलाची तपासनिशी करण्याकरितां, दिवाण या पदवीचा एक दुसरा अम्मलदार दिला. तो सुभेदाराचा हाताखालीं असे, परंतु त्याची नेमणूक बादशाहाकडून होत असे.

पोलीसचे लोक तहसीलदाराचा हाताखालीं असत, आणि खेड्यांपाड्यांमध्यें, सहजच, त्या त्या गांवचा अधिकाऱ्याकडे तो अम्मल असे.

या सर्व अम्मलदारांस जे समजूतीचे हुकूम दिले आहेत, ते न्यायी, व लोकहितेच्छु बुद्धीनें दिले आहेत. तथापि या प्रकारचा एशियाखंडांतील लेखांत जो स्वाभाविक क्षुल्लकपणा व पाणचटपणा असतो, तो दोष यांमध्यें केवळ नाहींसा नाहीं.

एकसत्ताक ह्मणजे स्वैच्छिक राज्यांत पोलीसचा लोकांचा स्वभाव जिकडेतिकडे टेहळाटेहळी करण्याचा, व जांत त्यांत हात घालण्याचा असतो. अकबरानें कोतवालांस जे हुकूम दिले होते, ते याप्रमाणें होते. त्यांत दुसऱ्या लोकांपूर्वी धान्य वगैरे पडत्या बाजारांत खरीद करणें व पुढें महागाईनें विकणें, इत्यादि मना केलें होतें, आणि दुसरेहि चांगले समजूतीचे हुकूम दिले होते. असें असून त्यांमध्यें एक असा हुकूम दिला होता कीं जो कोणी फांशीं देणाराचा प्याल्यांतून पाणी पिईल त्याचा हात कलम करावा. हा कायदा कदाचित् मनूचा योग्य होता; परंतु अकबरानें जे सर्व कायदे इनसाफ करण्याकरितां ठराविले होते, त्यांचा रोंख उदार व दयालु होता; असें असून एवढाच कायतो क्षुद्र नियम याणें केला हा विशेष चमत्कार आहे. गुजराथ प्रांताचा एक निराळा इतिहास आहे, त्यामध्यें तेथील सुभेदारास अकबरानें पाठविलेलें शिक्षापत्र दिलें आहे; त्यांत त्याणें लोकांस बिड्या घालाव्या, फटके मारावे, व देहान्त शासन करावें, एवढ्या शिक्षा करण्याचा मात्र त्याकडे अधिकार ठेविला होता. त्यांतहि ठार मारण्याची शिक्षा हात

राखूनच करावी, आणि, मोठ्या भयंकर बंडाचे गुन्हे खेरीज करून, बाकीचा कज्जांत कच्ची हकीकत दरबारांत पाठवून, पादशाहाची मंजूरी आल्याशिवाय कोणास ठार मारूं नये, अशी त्यास आज्ञा केली होती. देहान्त शासन करणें झालें तरी गुन्हेगाराचे हात पाय इत्यादि अवयव तोडूं नये, अथवा दुसऱ्या रीतीनें त्याशीं क्रूरत्वानें वर्तूं नये, असा अकबराचा हुकूम होता.

लश्करसंबंधीं फेरफार व नवी सुधारणूक.

दुसऱ्या खात्यांची व्यवस्था करित असतां, आपल्या लश्कराची व्यवस्था करावयास **अकबर** विसरला नाहीं. प्रथम त्या लोकांवर कैद बसवायास यास पुष्कळ दिवस झुजावें लागलें, आणि ती वेळ अपाय होण्यासारिखी होती. तसेंच पुढें त्या लश्कराचा बंदोबस्त राखण्यास विशेष खर्च न लागून लश्कराची तयारी चांगली राहवी, असें करावयास त्याहून कमी श्रम लागले नाहींत.

पूर्वीं सरदार लोकांस जमिनी द्याव्या अथवा महसूलापैकीं नेमणूक तोडून द्यावी, आणि नंतर नेमणूकवाल्यानें पाहिजे तसा, कांहीं आडकाठीशिवाय, पैसा वसूल करून घ्यावा, अशी वहिवाट होती; असें असून हजेरीचा नियम नसे, आणि तींत लबाडीहि पुष्कळ होई; पुष्कळ वेळा हजीरीचा दिवशीं उसनवार घोडे आणून त्यांवर चाकर व बाजारबुणगे लोक बसवून भर करून दाखवित असत.

जेथें जेथें चालण्याजोगें होतें तेथें तेथें खजिन्यांतून रोकडा पगार द्यावा असें ठरविलें, आणि जेथें लोकांचा नेमणूकींबद्दल जाहगीरी लावून दिल्या होत्या, त्यांचीहि दरखोरी ठेवण्याचा बंदोबस्त केला. या रीतीनें वरील पहिली

अव्यवस्था अकबरानें मिटविली. नंतर पगार देण्यापूर्वी पत्रकें तयार करून लोकांची हजीरी घ्यावी; त्या पत्रकांत प्रत्येक मनुष्याचा चेहरामोहरा दाखल करावा; आणि जो घोडा बादशाहाचा तैनातीस लागेल त्यावर राजचिन्हाचा डाग द्यावा; अशा तजविजांची योजना करून याणें दुसऱ्या अपायास उपाय केला. तशींच उंटें, बैल, गाड्या, व यांशिवाय लश्कराचा कूचाचा तयारीस जा सर्व वस्तु लागावयाचा त्या सर्वांचींहि पत्रकें करून, त्यांस नेमणूकी करून दिल्या.

परंतु जरी अकबरानें कितीहि बंदोबस्त केला, तथापि लश्कराची घडी बराबर बसली नाहीं. कारण अमुक परिमित मानाचे जांत लोक असावे, व त्यांत अमुक मानानें अम्मलदार असावे, अशीं पलटणें केलेलीं नव्हतीं; जसे बादशाहाचा मर्जीस येतील तसे तो अम्मलदार नेमित असे; त्यांस मनसबदार असें ह्मणत. त्यांतून दहा हजार लश्करवाले, पांच हजारवाले, इत्यादि दहा लोकवाल्यांपर्यंत त्या सरदारांचा प्रती बांधलेल्या असत. त्यांतून अगदीं खालचा प्रतीचे सरदार खेरीज करून बाकीचा लोकांची संख्या उगाच सांगावयाची असे. वास्तविक पाहतां त्या संख्येवरून त्या सरदारांचा पदव्या व पगार एवढीं मात्र मुकरर करित असत. प्रत्येकास जितके लोक ठेवण्याचा पादशाहाचा खसूस हुकूम असे, तितके मात्र लोक तो ठेवित असे; आणि तेवढ्या लोकांची हजेरी घेऊन हुजूर खजिन्यांतून त्यांस पगार पोंचत असे. पदवीचा नावाप्रमाणें जितके लोक असावे, त्याचा दशांशहि केव्हां केव्हां कोणाजवळ लोक नसत. या सर्वांचा तैनातीचे लोक मिळून बादशाही फौज

होती. जेव्हां फौज लढाईस जात असे, तेव्हां पादशाह सेनापतीची व कांहीं मुख्य सरदारांची नेमणूक करित असे त्यांचा खालीं बहुधा एकाखालीं एक असा वर्गांचा अनुक्रम नसे; फक्त ज्याचा त्याचा लोकांवर ज्याचा त्याचा अम्मल असे. बादशाहाचा मुलांशिवाय दुसरे कोणी पांच हजारांवरचे सरदार नसत, आणि पांच हजारांचा सरदारांत कांहीं शाहजादे व राजपूत राजे मिळून त्या भर्तीचे तरी सगळे तीस सरदार होते. एकंदर २०० लोकांचा सरदारांपर्यंत सर्व सरदारांची संख्या ४५०चा आंत होती[१०].

प्रत्येक मनसबदारानें स्वारांचा निमे पायदळ ठेवावें, त्यांतून चतुर्थांश बंदुकवाले असावे, मग बाकीचे तिरंदाज असले तरी चिंता नाहीं; अशी व्यवस्था होती.

या मनसबदारांचा हाताखालचा लोकांशिवाय, एकेकटे चाकरीस राहणारे असे अहदी नामें एकांडे पुष्कळ स्वार असत. ते उत्कृष्ट घोडेस्वार असत. त्यांचा पगार त्यांचा योग्यतेप्रमाणें असे, परंतु साधारण घोडेस्वारांचा पेक्षां पुष्कळ जास्त असे. त्यांतून सिंधुनदापलीकडून जे येऊन चाकरीस राहत त्यांस दरमाह २५ रुपये पगार मिळे, आणि हिंदुस्थानामधील असले, तर २० मिळे. बरकंदाजांस शिकस्त ६ रुपये पगार असे, आणि तिरंदाजांचा २३ पर्यंतहि हलका असे.

---

१० ऐनी अकबरी ग्रंथांत याद आहे, तिजवरून या संख्या उतरून घेतल्या आहेत; परंतु अकबराचा कारकीर्दीत कोणत्या वेळीं असे लोक होते, याचा निश्चय करवत नाहीं. अकबराचा फौजेंत कैद नसे व कवाईत शिकविलेली नसे; त्यामुळें, व त्याचे जे घोडेस्वार असत, ते शिलेदार लोक असत, व ते दुसऱ्या नेमणूकी फौजांतील साधारण घोडेस्वारांपेक्षां हुशार असत, यामुळें त्या फौजेंत थोडे सरदार पुरत असत.

मनसबदार लोकांचे पगार चांगले होते;[११] परंतु त्यांची कमाई किंवा हुद्दा वंशपरंपरेनें चालत नसे. कोणी सरदार मेला ह्मणजे बादशाह त्याचा मुलास प्रथम थोडासा हुद्दा लावून देई, आणि जर बापाची योग्यता विशेष असली तर थोडेंसें पेनशनहि देई.

अकबराचें लश्कर किती असे त्याचा अजमास करण्याचें साधन आपल्याजवळ कांहीं नाहीं. पुढील कारकीर्दींत औरंगझेबाजवळ २००,००० तयार घोडेस्वार, शिवाय तोफखाना, व शिवाय बेकवायदी पायदळ, इतकी फौज होती असें अनुमान करितात; परंतु अकबराजवळ एवढी होती असें संभवत नाहीं. प्रांतांतील शिबंदी ४४,००,०००, होती असें अबुल् फझल् ह्मणतो. परंतु प्रसंगवशात् गरज लागल्यास जांणीं बादशाहाची चाकरी करावी अशा रीतीनें जा लोकांस जमीनींचा नेमणूका होत्या, त्यांचा संख्येची ही वरील अतिशयोक्ति आहे. शिकारीचा वेळीं रान हाकण्याकरितां एक दोन दिवसपर्यंत या लोकांवर चाकरीची तलब झाली तर झाली; याहून विशेष चाकरी असे थोडेच लोक करित असतील. पुष्कळ लोक पहाडी राजांचा तैनातींतील व दुसऱ्या पहाडी लोकांमधील निःसंशय असावेः ते मुळींच चाकरी करित नसत.

अटक एथील किल्ला अकबरानें बांधला असें पूर्वी

११ 'ऐनी अकबरी' नामक ग्रंथांतील यादींत जा रकमा लिहिल्या आहेत, त्या खुद् सरदार लोकांचा खास नेमणूकाच नसतील; परंतु बरनीयर याणें असें लिहिलें आहे, कीं त्याचा यजमान दानिश्मंद खान याची पांच हजार स्वारांची असामी असून त्याचा हाताखालीं खरेखुरे ५०० लोक होते, व त्याचा पगार दरमाह ५,००० क्रौन ह्मणजे १२,५०० रुपये होता.

किल्ले व दुसरीं लोकोपयोगी कामें.

लिहिलें आहे. त्याशिवाय याणें पुष्कळ लष्करी इमारती बांधल्या, त्यांतून आग्रा व अलाहबाद एथील तट व तेथील बालेकिल्ले हे सर्वांहून उत्कृष्ट बांधिले आहेत. कांतींव दगडाची तटबंदी करून त्यांत बुरूज बांधून तीं कामें केलीं आहेत, त्यांसभोंवार खोल खंदक असून शिवाय हिंदुस्थानी रीतीप्रमाणें लहानलहान बुरूज, घुमट, आणि बाहेरून कठडे यांची शोभा आणिली आहे; आणि राजवाड्यांत शिरतांना जसा प्रथम चौक असावा तशी प्रत्येक दिंडीदरवाजा ही एक भव्य इमारतच आहे. शिवाय अकबरानें फत्तेपुरसिक्री हें शहर बांधून त्यास तटबंदी केली; तें याचें मुख्य राहण्याचें ठिकाण असे. हें शहर हल्लीं ओस पडलें आहे; तथापि पूर्वी जें हिंदुस्थानाचें वैभव होतें, त्या वेळचे जे मोठे प्रचंड कारखाने त्यांतील हें एक उत्कृष्ट ठिकाण आहे.[१२]

अकबराचा घरची व दरबारची स्थिति.

अकबराचा सर्व कारखान्यांतून वर सांगितल्याप्रमाणें बंदोबस्ताची शिस्त होती. याचा मुलूकी, दिवाणी, व लष्करी बंदोबस्ताची वरील सर्व हकीकत ऐनी अकबरी ( ह्मणजे अकबराचे

१२ हें शहर उंच डोंगरावर आहे; त्याचा समोरील बुरुजावर जाण्यास पायठण्यांची उत्कृष्ट रांग आहे; त्यांतील राजवाडा मोठा विस्तीर्ण असून त्यावर उमदें नकशीकाम आहे, व सर्वांत एक सर्वोत्कृष्ट अशी भव्य मशीद आहे. या सर्वांचें बिशप् हीबर याणें वर्णन केलें आहे. याच ग्रंथकारानें आग्र्यांतील इमारतींचें वर्णन केलें आहे; त्यांत एक संगमरमरी दगडाची सुंदर मशीद ( जिची साधी सफाई फारच सरस आहे ती ) व त्याच दगडाचा राजवाडा ( जांत कांहीं उमदे महाल आहेत तो ) या मुख्य आहेत. दिल्ली एथें हूमायूनाची जी कबर अकबरानें बांधविली आहे, ती याचा मुख्य मुख्य इमारतींतील एक होय.

कायदे) या ग्रंथांतून बहुतकरून घेतली आहे. त्यांत टंकसाळ व हुजूर खजीना यांपासून तों फळफळावळीची जागा, सुगंधी कारखाना, फुलांचा कारखाना, मुद्पाकखाना, आणि कुत्रे बांधावयाची जागा एथपर्यंत प्रत्येक कारखान्यासंबंधीं लोकांचें, व त्यांहीं जा रीतीनें चालावें त्या नियमांचें सूक्ष्म रीतीनें वर्णन केलें आहे. त्यामध्यें प्रचंड समुदाय असून, गडबड न होतां त्यांची व्यवस्था केली आहे, आणि खर्चाची विपुलता असून काटकसर ठेविली आहे; असें वैभव व चांगला बंदोबस्त, हीं पाहून आपणास आश्चर्य वाटतें.

ऐनी अकबरी नामें जो ग्रंथ वर सांगितला, त्यावरून व त्या वेळचा इतिहासकारांवरून[१३] अकबराचा पदरीं वरील खात्यांतून लोक वगैरे किती होते हें समजतें; परंतु जा युरोपीयन लोकांनीं त्याचा किंवा त्याचा मुलगा जहान्गीर याचा कारकीर्दींत दिल्लीचें दरबार पाहून त्याचें वर्णन केलें आहे, त्यावरून वरील परिवाराची शोभा किती पडत असे, हें उत्तम रीतीनें समजून येतें.

याचा छावणीचा सामानांत डेरे, व उचलून नेण्याजोगीं घरें असत. त्यांचा वाटोळा गोणताटाचा पडद्यांचा उंच तट बांधून बंदिस्तीकरितां वेष्टन केलें असे; त्यांत लोकांचा भेटी घेण्याकरितां मोठे दिवाणखाने, खाण्याचा जागा, हवा घेण्याकरितां पडव्या, आणि एकांताचीं ठिकाणें, अशी त्या छावणींत सर्व व्यवस्था असे. या सर्व छावणीचें सामान अतिशय उमदें व मोठा ऐषआराम भोगण्यास योग्य असें असे.

---

(१३) ५००० हत्ती व १२००० घोडे यांहून अकबराचा तबेल्यांत कमी कधींहि नसत, व शिवाय शिकारीकरितां ठेविलेला पुष्कळ परिवार असे; असें फिरिस्ता लिहितो.

वरील वेष्टनाचें क्षेत्रफळ १५३० चौरस यार्ड होतें. सर्व डेरे आणि बाहेरील तट हे आंतून नाना प्रकारचा रंगांचे व निरनिराळ्या नमून्यांचे असत; परंतु बाहेरून सर्व लाल रंगाचे असत आणि त्यांचा शिखरांस सोनेरी मुलाम्याचे गोल, आणि कळस असत; त्यांमुळें छावणीचा मध्यभागास अकबराचा डेऱ्याची किल्ल्यासारखी शोभा पडे. जर कोणी उंच डोंगरावरून याची छावणी पाहिली, तर नाना प्रकारचा रंगांचा डेऱ्यांचें एका शेवटापासून दुसऱ्या शेवटापर्यंत सुमारें अडीच कोश पसरलेलें, आणि कांहीं अव्यवस्था न होतां जांत रस्ते लावून दिलेले आहेत असें हें सुंदर शहरच दृष्टीस पडे; आणि पाहणारांस चमत्कार वाटण्याजोगें असे.

महाविषुवाचा दिवशीं, व बादशाहाचा वाढदिवशीं जो मोठा वार्षिकी उत्साह होई, त्या वेळचें वैभव अतिशय असे. ते समारंभ पुष्कळ दिवस चालत; आणि त्या वेळीं मोठी यात्रा भरे; पुष्कळ स्वाऱ्या निघत; व दुसरेहि डामडौलाचे तमाशे होत. पादशाहाची नेहमींची बसण्याची जागा मोठ्या उमद्या तंबूंत असे. त्यांत बाहेरून सूर्यकिरण न पडावे ह्मणून पडदे लावून मोठी शोभा आणित असत; याप्रमाणें निदान दोन एकर पर्यंत सोनें, मोत्यें, व जवाहीर यांचें काम केलेल्या उंच मखमालीचे पडदे व बैठका असत. उमराव लोकांचेहि असेच डेरे असत, तेथें ते जाऊन एकमेकांचा भेटी घेत व केव्हां केव्हां पादशाहहि त्यांचा भेटीस येत असे. त्या उत्साहाचा प्रसंगीं पोशाक, जवाहीर, घोडे, हत्ती, असे मानकरी लोकांस पादशाह बक्षीस देत असे. तसेंच

सोन्याचा कांट्यामध्यें बादशाहास बसवून सोनें, रुपें, सुगंधि द्रव्य, व दुसरे पदार्थ यांचा एकामागून एक तुळा करीत, आणि त्या जवळचा लोकांस वांटीत. सोन्याचे व रुप्याचे बदाम व दुसरीं फळें हीं बादशाह स्वतः हातानें उडवित असे, आणि वस्तुतः जरी त्यांचें मोल विशेष नसे, तरी दरबारची मंडळी तीं मोठ्या उत्सुकतेनें टिपित असे. प्रत्येक उत्साहाचा मोठ्या दिवशीं संगमरमरी दगडाचा महालामध्यें बादशाह आपल्या सिंहासनावर बसत असे; आणि त्याचा सभोंवार क्रौंच पक्ष्याचा उंच पिसांचे मुकुट घातलेले मानकरी असत; त्यांचा जवाहिराची "लकाकी नक्षत्रमंडळासारखी झळकत असे"[१४] उत्कृष्ट शृंगारलेले शेंकडों हत्तीयाचा समोरून टोळ्या टोळ्यांनीं जात; त्यांतून दर टोळीचा मोरकाढ्या हत्तीचा मस्तकास व छातीशीं लावलेलीं माणकें व पाच यांहीं खचित अशीं सोन्याचीं पिंपळवणें असत. त्यानंतर साज केलेल्या घोड्यांचा हारींचा हारी मागाहून येत, आणि त्यांचा मागून गेंडे, सिंह, वाघ, बिबळ्ये वाघ, शिकारी चित्ते, कुतरे, व ससाणे हे येत असत; आणि सर्वांचा मागून भरगच्ची सोनेरी कपडेदार अपार घोडेस्वारांचा लोट सुटे.

या सर्व वैभवामध्यें जसा अकबराचा डौल असे, तसाच त्याचा साधेपणाहि असे. दोन युरोपीयन गृहस्थांनीं याचा दरबारची शोभा प्रत्यक्ष पाहिली; त्यांणीं वर लिहिल्याप्रमाणें तिचें वर्णन केलें आहे. त्यांचा हकीकतींतून

१४ "अशी अपार संपत्ति मी कधींहि पाहिली नाहीं, असें मी कबूल करितों;" याप्रमाणें सर टामस रो ह्मणून एक इंग्रेज याचा दरबारांत आला होता त्याणें वर्णन केलें आहे.

कांहीं मजकूर घेऊन हें अकबराचें वर्णन मी पुरें करितों. एशियाखंडांतील दुसऱ्या राजांपेक्षां याचा डामडौल थोडा असे, हा इनसाफ करण्यास तक्ताखालीं उभा राही, अथवा बसत असे. याप्रमाणें वर्णन करून, पुढें ते असें लिहितात कीं “ तो बोलण्याचालण्यांत साधा असून भव्य आहे; दयालु असून कठोर आहे; बंदुका करणें, तोफा ओतणें, इत्यादि शिल्पविद्येमध्यें तो निपुण आहे; तो मिताहारी आहे; प्रत्येक दिवशीं तीन तास मात्र झोंप घेतो; विलक्षण उद्योगी आहे; गरीबगुरिबांशीं मोठ्या मन मिळावू रीतीनें बोलतो, आणि उमरावांपेक्षांहि त्यांचा व त्यांचा नजराण्यांचा फार सत्कार करून त्यांवर आपला कृपाकटाक्ष दाखवितो; त्याची रयत त्याजवर प्रीति करित्ये, व त्याची दहशत बाळगित्ये; आणि तो शत्रूंचा काळ आहे. ”

# भाग सातवा.

## जहान्गीर व शाहजहान यांचा

### कारकीर्दींतील वर्तमानें.

## प्रकरण पहिलें.

### जहान्गीर पादशाह.

**सिलीम** याणें आपला बाप मेल्यानंतर राज्य धारण केलें, आणि **जहान्गीर** ह्मणजे जगातें जिंकिणार असा किताब घेतला.

इ० स० १६०५, अकटोबर हि० स० १०१४, जमादिउल् आखर.

एवढ्या मोठ्या राज्यामध्यें जितका स्वस्थपणा असावा, तितका **नर्मदेचा उत्तरेकडे** जें याचें राज्य होतें त्यांत सर्वत्र होता; **बंगाल्यांत उस्मान** याचें बंड चालू होतें, परंतु तें त्या प्रांताचा एका कोंपऱ्यास होतें; **उदेपुरचा** राण्याबराबर जी लढाई चालली होती ती तरी परराज्यांशींच होती; आणि तींत याची जरी पुरी फत्ते झाली नव्हती, तथापि **मोगलांचा** पगडा वरच होता; **दक्षिणेमध्यें मोगलांनीं अहमदनगरचा निजामशाही** सरकारापासून त्याची राजधानी घेतली होती; त्यामान्यानें तें राज्य जेरीस आलेलें पुनः सावध

जहान्गीर गादीवर आला त्या वेळीं हिंदुस्थानाची स्थिति.

होऊन मोगलांचा शस्त्रांनीं त्याचें वाटोळें न होतां त्यांणीं घेतलेला मुलुक पुनः मिळविण्याचा तें संधानांत होतें; याप्रमाणें तिकडील वर्तमान उत्तरहिंदुस्थानाप्रमाणें हुशारीचें नव्हतें.

याणें आपल्या कारकीर्दीचा आरंभीं केलेलीं विचाराचीं कृत्यें.

जहान्गीर याणें आपल्या बापाचा वेळचा जुन्या अंमलदारांस त्यांचा त्यांचा जागीं कायम केलें; अकबराचा बंदोबस्तांतूनहि निभावून जा कांहीं त्रासदायक बाबी चुकून राहिल्या होत्या त्या याणें सोडून दिल्या; सावकार लोकांचा मालाचे गठे त्यांचा वास्तविक खुशीशिवाय अंमलदारांनीं सोडून पाहूं नये अशी मनाई केली; लश्करचे लोक व दुसरे सरकारी नोकर यांणीं जाऊन सुखवस्तु लोकांचा घरांमध्यें बिऱ्हाडें धरूं नये, अशी आज्ञा केली; नाक, कान कापून टाकण्याचा शिक्षा बंद केल्या, आणि दुसरे पुष्कळ लोकहितावह कायदे केले हा स्वतः बदफैली असतां कोणीहि मद्यपान करूं नये असा याणें सक्त हुकूम दिला; अफीण खाण्याविषयीं नियम ठरविले; आणि आपल्या नियमांविरुद्ध जे लोक चालतील त्यांस कठीण शिक्षा देण्याचा ठराव केला. याप्रमाणें याणें जीं प्रथम कृत्यें केलीं तीं लोकहिताचीं व विचारशील पुरुषानें जशीं करावयाचीं तशीं होतीं; अशीं याचा हातून होतील अशी कोणी अपेक्षा ठेवली नव्हती.

जहान्गीर याणें आपल्या नाण्यावर मुसलमानी धर्माची निशाणी पुनः चालू केली, आणि त्याप्रमाणेंच त्या धर्मांतील बहुतेक आचारहि पुनः सुरू केले; परंतु कांहीं नियमित दिवशीं मुळींच मांस खाऊं नये, असे जे अकबराचे नियम होते, ते मात्र कायम राखिले. तसेंच अकबराचा वेळचे जे कांहीं भोळ्या भावाचे भक्तिमार्ग होते

तेंहि तो पाळित असे. आपल्यास भेटावयास येतील त्या लोकांनीं साष्टांग नमस्कार घालावा, अशी याची सक्ती असे; आणि जरी सर्व मुसलमानांप्रमाणें मोठ्या विरक्त शैलीचा डौल घालून याणें ग्रंथ लिहिले आहेत, तरी हा कधींहि धार्मिक असा झाला नव्हता, व बहुधा याचा मनांतूनहि तसें होण्याचें नव्हतें. बहुधा साधारण लोकांचा असा ग्रह होऊन गेला आहे, कीं जहान्गीर, हा अकबराहून विशेष भोळेभाऊपणा करित असे, परंतु त्याचा इतका हा आसक्त नव्हता, आणि सर्व प्रकारचीं विवक्षित मतें एकीकडेस ठेवून, शुद्ध निर्गलितार्थ धर्माकडे तर याची बुद्धि अगदींच नव्हती.

अर्जदार लोकांस सोप्या रीतीनें आपणाजवळ फिर्यादी करण्याचा मार्ग मिळावा ह्मणून याणें आपल्या प्रथमचा बंदोबस्तांमध्यें एक तजवीज केली. ती अशी, कीं बालेकिल्ल्याचा तटावरून एके ठिकाणीं सांखळी सोडून दिली होती; तेथें पाहिजे त्या प्रकारचा लोकांस जाण्यास कांहीं अडचण नसे. त्या सांखळीस लागून बादशाहाचा खास महालांमध्यें एक सोन्याचा घंटांचा झुडूप असे; आणि कोणी मनुष्यानें तो सांखळदंड हालविला कीं आवाज होऊन कोणी अर्जदार आला आहे, अशी बादशाहास खबर लागे, त्यामुळें कोणीहि अम्मलदाराचा मनांत कांहीं बातमी छपावून ठेवावयाची असली, तरी बादशाह पराधीन होत नसे. ही युक्ति, योजिलेलें काम पार पाडण्याजोगी होती, यास्तव तारीफ करण्यास लायक होती; आणि ती आपण शोधून काढली ह्मणून बादशाहहि गर्व वाहत असे.

शाहजादा खुशूरू पळून गेला.

जहान्गीर व त्याचा वडील मुलगा याचें फार दिवस जें वैमनस्य होतें, तें जहान्गीर राज्यपदावर येण्यापूर्वीं जीं वर्तमानें झालीं त्यांहींकरून कांहीं कमी झालें नाहीं; आणि तेव्हांपासून खुशूरू हा खुनसी व विरस झाला होता, आणि जहान्गीर याणें त्याशीं जी वर्तणूक चालविली, ती बहुधा त्याचा वृत्ति शांत होण्यासारखी असेल असें संभवत नाहीं. जहान्गीर सिंहासनारूढ झाल्यापासून सुमारें चार महिन्यांहून जास्त मुदतपर्यंत यास खुशूरूचा वर्तणूकेविषयीं कांहीं वहमा आला नाहीं. पुढें एके दिवशीं मध्यरात्रीस जहान्गीरास लोकांनीं जागें करून वर्तमान सांगितलें, कीं खुशूरू हा थोड्या लोकांनिशीं पळून दिल्लीचा रस्त्यानें गेला, तेव्हां याणें लागलेच त्याचा पाठलाग करण्याकरितां थोडे लोक रवाना केले, आणि प्रातःकाळीं जमववले तितके लोक गोळा करून मागाहून आपण निघाला.

इ० स० १६०६, मार्च; हि० स० १०१४ झिल्हाज, चं० ८.

आग्र्याहून निघाल्यावर थोडक्याच वेळांत तीन शें घोडेस्वार राजधानीस कूच करून येत होते, ते खुशूरूस मिळाले. नंतर तो आपल्या लश्कराची उपजीविका लुटीनें चालवून दिल्लीचा रस्त्यानें गेला; तो पंजाबांत पोंचेपर्यंत त्याचें लश्कर दहा हजारांवर जमलें. लाहोरचा किल्लेदारांनीं फितूर होऊन तें शहर याचा हातांत दिलें; आणि तो बालेकिल्ला सर करण्याचा उद्योगास लागला होता, इतक्यांत त्याचा बापाचा आघाडीची फौज येऊन पोंचली, यामुळें त्याची धांदल झाली. जेव्हां ते लोक आल्याचें वर्तमान त्यास समजलें, तेव्हां तो

खुशूरूनें बंड केलें.

आपली फौज घेऊन लाहोराबाहेर आला, आणि बादशाही फौजेवर हल्ला करिता झाला. याचा हा प्रसंग बादशाही फौजेचा एकाच टोळीशीं होता; एवढी सवड असतांहि तिशीं त्याचानें टकर देववली नाहीं. त्या लढाईंत त्याचा अगदीं मोड झाला, आणि तो काबूलाकडे पळून जात असतां, जहिलमनदींतून नावेंत बसून जात होता, तीं नाव धड्यावर लागली, तेव्हां त्यास शत्रूंनीं धरून बिड्या घालून बापासमोर आणिलें; याप्रमाणें एका महिन्याचा आंत या बंडाची समाप्ति झाली.

बंडवाले लोकांचें क्रूर शासन.

जेव्हां खुशूरूचे मुख्य मसलतदार व त्याचे साधारण अनुयायी हे बादशाहाचा हातांत सांपडले, तेव्हां यास आपलें स्वाभाविक क्रौर्य प्रकट करण्याची संधि मिळाली. मग याणें त्यांतील ७०० बंदीवान् लाहोरचा दरवाजापासून एका रांगेनें सुळीं देवविले, त्यांस जीं फार वेळ घोर दुःखें झालीं त्यांविषयीं हा आपल्या हकीकतीमध्यें मोठें वर्णन करितो; आणखी त्यासमयीं याणें आपला मुलगा खुशूरू एका हत्तीवर बसवून त्या सर्व हारीनें नेवविला, आणि त्यापुढें वेडावण्याकरितां आपल्या नोकरांचे सलाम घ्यावे अशी मोठ्या गंभीर वाणीनें ललकारणी देत एक चोबदार पाठविला; असें कृत्य करून जहान्गीरानें आपल्या दुष्टपणाची सीमा केली.

खुशूरूस बंदिखान्यांत टाकलें.

त्या दुर्दैवी खुशूरूनें अन्नास न शिवतां तीन दिवस रडून व ओरडून काढिले, आणि पुढेंहि फार दिवस त्याचा मनास अतिशय दुःख खात असे.

पूर्वीं गादीवर बसल्यावर लागलाच बादशाहानें आपला दुसरा मुलगा शाहजादा परवीझ याचा बराबर असफ

खान यास देऊन उदेपुरचा राण्याशीं लढाई करण्याकरितां पाठविला होता. पुढें खुशरू पळून गेल्यावर त्यास परत बलाविलें होतें; परंतु तितक्या थोड्या मुदतींत त्या राण्याशीं बंदोबस्त करून तो सांप्रत आपल्या छावणींत येऊन मिळाला.

इ० स० १६०६, मार्च, हिं० स० १०१५, झिहाज.

दुसऱ्या वर्षी अवेलीस जहान्गीर काबूल एथें गेला; तेथें राहत असतां याणें खुशरूवर कांहीं कृपा करून त्याचा शृंखला काढून टाकविल्या, आणि वरचा बालेकिल्ल्यांतील बागामध्यें फिरण्याची त्यास परवानगी दिली; पुढें थोडक्या वेळानें बादशाहास मारेकरी घालून मारून खुशरूस सोडवावें अशी मसलत चालली होती, ती उमगल्यामुळें बादशाहाचा मनांत जर कांहीं आणखी क्षमा करावयाची इच्छा असली, तरी ती बंद पडली.

इ० स० १६१७, हिं० स० १०१६ मेवाड व दक्षिण यांमधील लढाया.

नंतर जहान्गीर परत आग्र्यास आल्यावर उदेपुरचा राण्याबराबर पुनः लढाई सुरू झाली होती; याजकरितां मोहबत खान याचा हाताखालीं फौज देऊन त्याजवर पाठवून दिली; आणि खान खानान याचा हाताखालीं दुसरी फौज देऊन त्यास दक्षिणेंतील बंदोबस्त करण्यास पाठविलें. मागाहून शाहजादा परवीझ यास या दुसऱ्या फौजेचा सेनापति केला, परंतु तो वास्तविक अधिकार चालविण्याजोगा मोठा नव्हता.

एका ढोंग्यानें खुशरूचें सोंग घेऊन बंड केलें.

पुढें एका अति नीच मनुष्यानें पाटणा एथें खुशरूचें सोंग घेऊन बखेडा केला; तेथील शहरचा अम्मलदारांचा सुस्तीमुळें तें शहर बळकावून पुष्कळ

लोक जमा केले; आणि त्या प्रांताचा सरसु-भेदाराबरोबर उभें राहून लढाई केली; पुढें कांहीं वेळानें त्यास पाटणा या शहरांत परत हटवून कैद करून मारून टाकिलें; परंतु इतक्या कृत्यास कांहीं वेळ लागला. एवढीच पुढील तीन वर्षांमध्यें सांगावयासारखी गोष्ट घडून आली.

इ॰स॰१६०७ पासून इ॰ स॰ १६१० पर्यंत;व हि॰ स॰ १०१७ पासून हि॰ स॰ १०१९ पर्यंत.

इ० स० १६१० चा सुमारास दक्षिणेमध्यें मोगलांवर बेतल्ये असें दिसून आलें. अहमदनगर मोगललोकांनीं घेतल्यावर,तेथील नव्या राज्याचा कारभार मलिकंबर नामें एका हबशाचा हातांत आला. सांप्रत जेथें औरंगाबादशहर आहे त्या ठिकाणीं या प्रधानानें एक नवीन राजधानी वसविली, आणि निजामशाही सरकारचा, देखत पडता काळ आल्यावरहि, पुष्कळ वर्षेंपर्यंत बचाव केला. हा केवळ लढाईचा कामांत हुशार होता इतकेंच नाहीं; कदाचित् तोडरमल्ल याचें पाहून किंवा कसें असेल तें असो, परंतु याणें दक्षिणेंत नवी जमाबंदी सुरू केली. तेणेंकरून जशी तोडरमल्लाची उत्तरहिंदुस्थानांत प्रसिद्धि झाली आहे, तशीच याचाहि नावाची दक्षिणेंत सर्वत्र कीर्ति झाली आहे. खान खानान, व मोगललोकांचे दुसरे सरदार यांमध्यें कांहीं तंटे लागले ती संधि साधून याणें असा तडाका मारिला, कीं पुष्कळ वेळा मोगलांचा पराजय करून अहमदनगर परत घेतलें; तेव्हां खान खानान यास हटून बऱ्हाणपुरावर माघार घ्यावी लागली. हें वर्तमान होतांच जहान्गीरानें

दक्षिणेंतील लढायांमध्यें मोगलांचा मोड झाला.

मलिकंबराचें वर्णन.

त्याणें अहमदनगर परत घेतलें.

खान खानान यास परत बोलावून तें काम खान जहान यास सांगितलें.

इ० स० १६११, हि० स० १०२०. नूरजहान इज बरावर बादशाहाचें लग्न झालें.

राज्यावर आल्यापासून सहाव्या वर्षी जहान्गीरानें मख्यात नूरजहानबराबर लग्न केलें; तेव्हांपासून पुढें जहान्गीर याचा कारभारांत तिचें वजन पडूं लागलें.

नूरजहान इचा इतिहास.

नूरजहानचा आजा इराण देशांतील तेहरानशहरामधील राहणारा होता; आणि तेथील राज्यांत याकडेस मोठा दिवाणी हुद्दा होता. त्याचा मुलगा मिर्झागयास याची पुढें गरीबी आल्यामुळें त्याणें आपली बायको, दोन मुलगे, व एक मुलगी एवढें कुटुंब घेऊन हिंदुस्थानांत निघून जाऊन तेथें उदरपोषण करावें, असा निश्चय केला. त्याप्रमाणें तो निघून जात असतांहि त्याचें दुर्दैव त्याचा पाठीस हात धुवून लागलें; तो जा कारवानाबरावर येत होता तें कंदाहारास पोंचलें, इतक्यांत त्याची मोठ्या विपत्तीची दशा आली. कारण तो शहरांत पोंचल्यावर लागलीच त्याची स्त्री नूरजहान इतें प्रसवली. त्या वेळीं त्याची इतकी निकृष्ट दशा आली होती कीं आपल्या अर्भकास नेण्याची तजवीज करण्याचें अथवा त्याचा आईकडून त्याचें पोषण होई, असें त्याचा आईचें पोषण करण्याचेंहि नूरजहानचा आईबापांस सामर्थ्य नव्हतें. त्यामुळें दुसऱ्या दिवशीं जा रस्त्यानें तें कारवान जावयाचें होतें, त्या रस्त्यावर या भावी राणीस तिचा बापानें नेऊन ठेविलें. मग त्या कारवानांतील एका मुख्य सावकाराचा दृष्टीस ती पडली, तेव्हां तिची त्यास दया आली, आणि तिचें सौंदर्य पाहूनहि तो चकित झाला; मग त्याणें तिला उचलून

घेतलें; आणि तिचा आपल्या मुलाप्रमाणें सांभाळ करण्याचा निश्चय केला.

त्या कारवानामध्यें दाईपणाचें काम करण्याजोगी बायको मिळणें मुश्कील, तेव्हां नूरजहानचाच आईची त्या कामावर योजना झाली, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असें झालें त्या योगानें त्या कुटुंबाचा विपत्तीकडे त्या सावकाराचें लक्ष लागून त्याणें त्यांस जें तुर्तातूर्त सहाय पाहिजे होतें तें देऊन त्यांचा सांभाळ केला; आणि नूरजहानचा बाप व त्याचा वडील मुलगा हे त्यांचा सांप्रतचा स्थितीपेक्षां मोठ्या पदवीचा योग्यतेचे मनुष्य आहेत असें त्याचा समजुतींत येऊन, तो त्यास आपलें कामकाज सांगूं लागला; असें होतां होतां त्यांजवर त्याची फार आवड बसली. पुढें त्याचा द्वारानें त्यांची व अकबराची गांठ पडली; आणि त्यांस पादशाहानें प्रथम कांहीं दुसऱ्याचा हाताखालीं लहानशीं कामें सांगितलीं. पुढें ते लवकरच आपल्या हुशारीनें वाढले.

इकडे नूरजहान ही दिवसेंदिवस वाढूं लागली, तेव्हां तिचें सौंदर्य व श्री हीं पाहून लोक आश्चर्य करूं लागले. तिचा आईला अकबराचा जनानखान्यांत जाण्यास सदर परवानगी असे, तेव्हां तिजबरोबर पुष्कळ वेळा ही जात असे; त्या वेळीं जहान्गीर हा शाहजादा सिलीम असतां त्याची तेथें इजवर दृष्टि पडली. त्याचा वर्तणूकेनें नूरजहानचा आईस इतकें वाईट वाटलें, कीं जा शाहजादीस ती भेटावयास गेली होती, तिजजवळ सिलीमाचा वर्तणूकेविषयीं ती बोलण्यास उद्युक्त झाली. नंतर त्या शाहजादीचा द्वारानें ती गोष्ट अकबराचा समोर आल्यावर त्याणें आपल्या मुलास

सोडिलें; आणि नूरजहानचें लग्न करून आपल्या मुलाचा नजरेपासून दूर करावी अशी अकबरानें त्या वेळीं शिफारस केली. त्याप्रमाणें शीर अफगाण खान नामें एक तरुण इराणी नुक्ताच बादशाहाचा चाकरीस राहिला होता, त्याशीं तिचें लग्न लावून अकबरानें त्यास बंगाल प्रांतांत जाहगीर करून दिली.

इतकेहि उपाय केले, तथापि जहान्गीराचा मनावर जो ग्रह झाला होता तो निघून गेला नाहीं. पुढें हा गादीवर येऊन सुमारें एक वर्ष झाल्यावर याचा दूधभाऊ कुतबुद्दीन हा बंगालचा सरसुभ्यावर जावयास निघाला, तेव्हां ती संधि पाहून नूरजहान आपणास साध्य होई अशी तजवीज करावी, असें याणें त्यास सांगितलें.

नूरजहान इचा नवऱ्याकडून अडथळा झाल्यास कांहीं आबादाबीनें व कांहीं फुसलावणीचीं वचनें देऊन त्याचें कांहीं चालूं देणार नाहींत, असें पूर्वीपासूनच बहुधा लोकांस वाटत होतें; परंतु शीर अफगाण याचें सत्व विशेष होतें; त्यास यांचा उद्देशाचा संशय येतांच त्याणें आपल्या चाकरीचा राजीनामा दिला, आणि आपण आतां बादशाहाचा चाकरींत नाहीं असें दाखविण्याकरितां, त्याणें हत्यारबंद राहण्याचें सोडून दिलें. पुढें हकीकत कशी झाली तें दिसून येत नाहीं; परंतु शीर खान यास भीति पडली, असें दिसतें; कारण तो जेथें राहत होता, त्या प्रांतांत कांहीं निमित्त काढून तो सरसुभेदार गेला, आणि त्याणें यास आपल्या भेटीस बोलाविलें. तेव्हां हा आपल्या पोषाकांत कटार लपवून घेऊन त्यास भेटावयास गेला. जा भेटीस याप्रकारें आरंभ झाला, तिचा शेवटीं रक्तस्राव व्हावा हें सहजच

होतें. त्या वेळीं त्या सरसुभेदारानें जे बेत यास सांगितले, ते याचा मनास लागले, आणि पुढें त्याणें भीति दाखविल्यावरून यास संताप आला, व याणें लागलाच आपल्या कटारीनें त्या सुभेदाराचा प्राण घेतला; तेव्हां तत्क्षणींच जवळचा लोकांनीं यासहि अन्य लोकास पाठविलें.

याप्रमाणें त्या सुभेदारास मारिलें, हें कांहीं पूर्वीं फितूराची मसलत करून मारिलें असें लोक म्हणूं लागले; तेणेंकरून त्या मारणाराचा कुटुंबाची जी पुढें बादशाहानें अपेक्षा केली, ती शोभून गेली. बादशाहाचा लोकांनीं नूरजहान इला पकडून कैद करून दिल्लीस पाठविलें. तेथें आपणाशीं लग्न करावें, असें जहान्गीर याणें लवकरच बोलणें लाविलें, आणि तिचें सांत्वन करून मर्जी संपादण्याकरितां जितकी आपली हुशारी होती तितकी खर्च केली; परंतु नूरजहान ही मोठी पाणीदार व तशीच कपटी स्त्री होती; यावरून या पुरुषानें आपल्या नवऱ्याचा खून केला अशा दृष्टीनें जहान्गीराकडे पाहून, त्याकडून जीं बोलणीं आलीं तीं सर्व इणें मनःपुरःसर नाकबूल केलीं असतील असें नाहीं संभवतसें नाहीं. तिणें जहान्गीराविषयीं आपली अनावड इतक्या स्पष्ट रितीनें प्रकट केली, तेणेंकरून तोहि त्रासून गेला. शेवटीं याणें आपल्या आईजवळचा लोकांत तिला ठेविलें, आणि याचा मनांतून तिजविषयींचा विचार अगदीं निघून गेला होता, असें दिसतें.

असें झालें तथापि पुनः यास तिजविषयीं इच्छा उत्पन्न झाली, आणि विचारांतीं याचा प्रीतिपात्रेनेंहि याचा बोलण्याकडेस विशेष मेहेरबानीची नजर केली. नंतर जहान्गीर व नूरजहान यांचें लग्न मोठ्या समारंभानें झालें,

आणि पूर्वी कधींहि हिंदुस्थानांतील कोणत्याहि राणीस मान मिळाला नव्हता इतका तिला मिळाला[1]. तेव्हांपासून

तिचें वजन.

तिचा बेहद पगडा चालू झाला. तिचा बापास मुख्य प्रधानगिरी मिळाली; तिचा भावास बादशाहानें मोठें काम दिलें; तिचा सल्ल्याशिवाय बादशाह अगदीं पाऊल टाकीनासा झाला, आणि जा कामाविषयीं तिला कांहीं आस्था असे त्यांत तर, तिची मर्जी तो कायदा, असें झालें. तिचें मान वाढल्यापासून शेवटीं परिणाम वाईट झाले, तथापि एकंदराखालीं त्यापासून हितच झालें; कारण तिचा बाप हा शहाणा व एकमार्गी प्रधान होता; आणि प्रथम थोड्या वर्षांनंतर जहान्गीराचीहि वर्तणूक जी बरीच सुधारली ती कांहीं अंशीं तरी इचा योगानें सुधारली असावी; अद्यापिहि तो लहरी असे, आणि जुलूम करी; परंतु पूर्वीं जशीं याणें घोर दुष्ट कर्में केलीं, तसे दोष पुढें याचा हातून घडले नाहींत; आणि जरी अद्यापि हा अतिशय मद्यपान करून अगदीं बेसावध होऊन पडत असे, तरी याची अशी स्थिति रात्रीस, व याचा खासमहालांत होत असे. हा सारा दिवसभर धंद्यामध्यें गुंतून लोकांचा दृष्टीसमोर असे, तेव्हां बऱ्याच डौलानें आणि कांहीं बेढब काम न करितां आपल्या अब्रूचा बचाव करित असे. नूरजहान इची शोभा व सौंदर्य जशीं वर्णनीय होतीं, तशी तिची बुद्धिहि विलक्षण होती. स्त्रियांस योग्य अशा कामांमध्यें व राज्यकारभारामध्येंहि ती हात घालित असे. तिचा रसिकतेनें पादशाहाचा दरबाराची शोभा वाढली, आणि तिचा चांगल्या व्यवस्थेनें

१ तिला जीं पुष्कळ राजचिन्हें प्राप्त झालीं, त्यांमध्यें तिचें नाव बादशाहाचा नावाबरोबर नाण्यावर चालू झालें हें एक होतें.

तेथील खर्च कमी झाला. तिणें कल्पना चालवून राजमहालांतील सामानांत चांगले फेरफार केले; पूर्वीचापेक्षां बायकांस साजत असे स्त्रियांचे पोषाग सुरू केले; आणि सांप्रत जास गुलाबी अत्तर ह्मणतात, तें तिणें शोधून काढिलें किंवा तिचा आईनें शोधून[२] काढिलें, याविषयीं हिंदुस्थानांतील लोकांस संशय आहे. ती शीघ्रकवि असे; त्यामुळें व दुसऱ्या गुणांनीं तिणें जहान्गीरास मोहित केलें होतें.

हें लग्न झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं उसमानाचा पराजय होऊन, तो मरण पावल्यावर बंगाल्यांतील बखेडे मोडले; या गोष्टीनें जो हर्ष झाला त्याहून दक्षिणेंतील लढाईमध्यें मागें पाय आल्यामुळें दुःखाचें पारडें विशेष दाबून गेलें. पूर्वीं जी आपली ढिलाई झाली, ती साधून घेण्याकरितां सर्व प्रांतांतील लश्कराचा कट करून एकदम चोहोंकडून हल्ला करावा असा याणें निश्चय केला. त्यांत गुजराथेचा सुभेदार अब्दुल्ला खान, याणें त्या प्रांतांतून मलिकंबराचा मुलुकावर स्वारी करावी, आणि त्याच वेळीं शाहजादा पर्वीझ आणि खान जहान लोदी यांणीं राजा मानसिंगाची कुमक घेऊन खानदेश व वऱ्हाड प्रांत यांतून त्यावर चाल करावी असा बेत झाला; परंतु ही चांगली तयार केलेली घाटाघाट, त्याप्रमाणें वर्तणूक

इ० स० १६१२, हि० स० १०२१.

मलिकंबरावर कट करून हल्ला केला.

२ खाफी खान असें लिहितो कीं औरंगझेबाचा राज्याचा आरंभीं एक तोळा अत्तरास ८० रुपये पडत; व पुढें याणें इतिहास लिहिला तेव्हां ७। ८ रुपयांस तें मिळूं लागलें. यावरून पुढें बरीच सुधारणूक झाली असावी असें दिसतें.

न झाल्यामुळें फुकट गेली. अब्दुल्ला खान हा नेमलेल्या वेळेपूर्वींच गुजराथेंतून आला. ही त्याची चुकी पाहून आपलें कार्य साधण्यास मलिकंबर क्षणभरहि विसंबला नाहीं. मलिकंबराची लढाईची रीति अर्वाचीन काळचा मराठे लोकांप्रमाणेंच बहुतकरून होती. त्याचा नजीक युरोपीयन लोकांचीं बंदरें असत; तेणेंकरून बादशाहाचापेक्षां त्याचा तोफखाना शिरां होता; त्यामुळें त्याचा तोफखान्याचा आश्रयास येऊन जमण्यास त्याचा फौजेस हमेशा ठिकाण सांपडत असे; परंतु शत्रूंस प्रत्यक्ष दुःख देण्याचें याचें हत्यार घोडिस्वार असत. तेणेंकरून तो मोगलांची दाणापाणी वगैरे सामग्री छापा घालून पकडी; तसेंच ते कूच करून जात असतां त्यांस उपद्रव देई; त्यांणीं तळ दिला ह्मणजे फौजेवाटोळा गरुडासारखा फिरत असे; हल्ले करतों असें खोटेंच दाखवून त्यांस भेंवडावी, पुष्कळ वेळा छावणीमध्यें कोठें कोठें खरेखुरेच हल्ले करून पुष्कळ लूट नेई; आणि हमेशा शत्रूंचा लश्करांत बखेडे करून दबदबा पाडी. या प्रकारचा लढाईनें अब्दुल्ला खान इतका जेर होऊन गेला, कीं त्याणें लवकरच परत जाण्याचा निश्चय केला; परंतु आतां शत्रूंचा समोरून मागें हटून जाण्यानें परिणाम कसे होतील, हें भविष्य समजणें कांहीं कठीण नव्हतें. तो परत जाण्यास निघाल्या दिवसापासून, त्याचीं संकटें वाढत चाललीं; त्याचा पिछाडीचा पाहऱ्याचे मलिकंबरानें तुकडे तुकडे करून टाकिले; शेवटीं त्याचें कूच करणें एकीकडे राहून, त्यास पळण्याचा प्रसंग जवळ जवळ आला; इतक्यांत त्यास बागलाणप्रांतांतील पहाडांत व जंगलांत आश्रय सांपडला; नंतर तेथून तो इजा न होतां

गुजराथेंत निघून गेला. इतक्यांत दुसऱ्या फौजा समरांगणांत येऊन पोंचल्या होत्या, परंतु आपल्या सहाकाऱ्याचा पराजय करून मलिकंबर विजयश्री मिळवून परत येत आहे असें पाहून तशीच आपली दुर्दशा न व्हावी ह्मणून शहाणपण करून ते लोक बऱ्हाणपुर एथें आपला जमाव करून राहिले. इ० स० १६१२, हि० स० १०२१.

इकडे दुसरी उदेपुरचा राण्याबरोबर लढाई चालली होती, तिजमध्यें जहान्गीराची बरीच फत्ते झाली, आणि तशांतहि ती याचा प्रीतींतील मुलाचा हुशारीनें झाल्यामुळें, तेणेंकरून बादशाहास विशेष प्रिय वाटलें; पूर्वी मोहोबत खान यास त्या कामाकरितां पाठविलें होतें, आणि त्याणें तेथील राण्याचा पराजय केला होता; परंतु तो चालीप्रमाणें पहाडांमध्यें व जंगलांत पळून जाई, तेणेंकरून त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नव्हतें. पुढें मोहोबत खान याचा मागून अब्दुल्ला खान याची त्या कामावर नेमणूक झाली; परंतु त्याचीहि तशीच गति झाली. नंतर शाहजादा खुरम ऊर्फ शाहजहान[३] यास २०,००० लोकांनिशीं पाठविलें. त्याणें राजपूतलोकांचा लश्करावर इतक्या शौर्यानें हल्ला केला, आणि त्या देशांतील जंगलाची वगैरे मजबूदी, आणि तेथील खराब हवा यांस न जुमानून, इतक्या निग्रहानें लढाई चालविली, कीं शेवटीं मेवाडचा राजाबरोबर लढाई.

३ या शाहजाद्याचें नाव खुरम होतें; आणि जेव्हां याचा बाप गादीवर बसला तेव्हां याचें दुसरें कांहीं नाव नव्हतें; परंतु हा गादीवर बसण्यापूर्वीच फार दिवस यास शाहजहान हा किताब मिळाला होता यास्तव गोंधळ होऊं नये, ह्मणून पहिल्यापासूनच त्याचें शाहजहान या नावानें वर्णन केलें आहे.

त्या राण्यानें तहाचें बोलणें लाविलें.. तें लागलेंच कबूल झाल्यावर तो स्वतः शाहजहानास भेटावयास आला, आणि शरण आलों असें दाखविण्याकरितां त्याणें नजराणे केले, आणि त्या शाहजाद्याबरोबर दिल्ली एथें आपला मुलगा पाठविला. या प्रसंगीं शाहजहान अकबराचें कारस्तान विसरला नाहीं. राण्यानें मुजरा केल्यानंतर शाहजहानानें त्यास स्वहस्तें उचलिलें, आणि आपल्याजवळ बसवून सर्व प्रकारें त्यास मान देऊन, व त्याची उजूतवाजू राखून त्याशीं वर्तला आणि अकबरानें स्वारी केल्यापासून जो त्याचा मुलुक घेतलेला होता, तो सर्व परत दिला. पुढें जहान्गीरानें त्याचा मुलाचा मोठ्या आदरानें सत्कार करून, आपल्या राज्यांतील जे लश्करी सरदार त्यांमध्यें त्यास मोठी पदवी दिली.

शाहजादा खुरम ऊर्फ शाहजहान याची फत्ते, व त्याचा अल्पसंतोषीपणा. उदेपुरचा राणा, योग्यता राखून तह केल्यावर, शरण आला. इ० स० १६१४, हि० स० १०२३.

ही लढाई शाहजहान याणें तडीस नेली, यास्तव त्याबद्दल त्याचीच तारीफ केली पाहिजे. कारण बादशाहानें अझीझ यास त्याचा मदतीस पाठविलें होतें, परंतु त्याणें फार उद्धटपणा केल्यामुळें त्यास दूर करून; कांहीं वेळपर्यंत कैदेंत ठेवणें जहान्गीराचा कपाळीं आलें.

शाहजहान याचें वजन वाढलें.

यास नूरजहान इची मदत पोंचली.

या पराक्रमानें शाहजहान याची इभ्रत शिकस्त चढून गेली; तशांत त्याणें नुकतेंच नूरजहानचा पुतणीशीं लग्न केलें होतें, तेणेंकरून तिचाहि बलाढ्य आश्रय त्यास सांपडून, आपल्या मागें हा गादीवर बसावा असें पादशाहानें ठराविलें, असें लोकांस वाटूं लागलें.

हें वर्तमान होत असतां राजा मानसिंग दक्षिणेंत मरण पावला.

इ० स० १६११ मध्यें रोशनये लोकांचें काबूलांत बंड झालें होतें, त्यापासून काबूल शहरासहि कांहीं भीति होती. सांप्रत त्यांतील मुख्य अहदाद नामें बायझीद याचा नातू, व गादी चालवणारा, हा मेल्यामुळें त्या बंडाची समाप्ति झाली. गुजराथच्या सरसुभेदार अब्दुल्ला खान याणें त्या प्रांतांत जुलूम केला, आणि पादशाहाचा अखबरनवीस ( म्ह० बातमी लिहिणारा ) याची त्याणें अप्रतिष्ठा केली. त्यामुळें त्यावर जहान्गीराचा क्रोध होऊन त्यास पकडून राजधानीस पाठवून द्यावें असा याणें हुकूम केला. तो हुकूम येण्याचा पूर्वींच अब्दुल्ला खान पायीं निघाला, आणि आपलें लश्कर व बरोबरचे दुसरे लोक मागून पुष्कळ अंतरावर ठेवून येत असे. तो अनवाणी व बिड्या घालून दरबारांत आला, आणि बादशाहाचा पायीं पडला; मग जहान्गीरानें त्यास क्षमा केली आणि शाहजहानानें रदबदली केल्यावरून पुढें लवकरच त्यावर कृपा केली.

काबूलांतील बंड मोडलें.

वरील दक्षिणेंतील स्वारी करून शाहजहान परत गेल्यावर इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याजकडून सर टामस रो नामें एक वकील मोगलांचा दरबारांत आला[४] होता.

सर टामस रो नामें इंग्लिश वकील आला.

त्या वेळीं दर्याकिनाऱ्यावरील बंदरांत व जकातीचा

( ४ ) तो ता० २३ डिसेंबर सन १६१५ या रोजीं अजमीर एथें पोंचला; आणि बादशाहाबराबर मांदू एथें व गुजराथ प्रांतांत जाऊन इ० स० १६१८ चा असेरीस निघून गेला.

जहान्गीराचा राज्याचें, दरबाराचें, व स्वभावाचें त्याणें केलेलें वर्णन.

कामामध्यें भरपूर जुलूम चालत असे; आणि मर्जीस येईल ती किंमत देऊन सुभेदार जिन्नस पकडित असत. रो याचें दुसऱ्या रीतीनें चांगलें आगतस्वागत व सन्मान झाला, तथापि याचा सामानसुमानाचा झाडा घेऊन त्यांतून कांहीं वस्तु सुभेदारानें घेतल्या.

त्यास सुरतेहून, बऱ्हाणपुर व चितूरचा वाटेनें, अजमीर एथें जावयाचें होतें; परंतु त्या वेळीं दक्षिणेमध्यें लढाई चालत होती, आणि उदेपुरचा राण्याचा मुलुकांतून जावयाचें तेथील तर लढाई नुकतीच बंद झाली होती; तथापि पहाडी लोक खेरीज करून दुसऱ्या कोणापासून यास वाटेनें कांहीं अडथळा किंवा भीति झाली नाहीं; हल्लींचा प्रमाणेंच तेव्हां तरी बंडावा झाला, ह्मणजे रस्त्यांमध्यें लोकांस जाण्यास त्या पहाडी लोकांपासून भीतिच असे.

दक्षिणेमध्यें देश उध्वस्त होऊन पडित झाला होता, असें त्या वेळीं स्पष्ट दिसून येत होतें. बऱ्हाणपुर हें पूर्वीं चांगलें शहर होतें, व तसेंच पुढेंहि झालें आहे; त्यांत त्या वेळीं मातीचा झोंपड्यांची भरती झालेली असून सगळीं चार किंवा पांच चांगलीं घरें होतीं. शाहजादा परवीझ याचें दरबार त्या शहरांत होतें, तेंहि विशेष वर्णन

५ तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, कीं त्या वेळचा सुभेदार झुल्फिकार खान हा इंग्लिश लोकांस प्रतिकूळ होता. त्याणें नुकताच पोर्तुगीस लोकांबराबर करार केला होता; त्यांत इंग्रेजांचीं तारवें आपल्या बंदरांत येऊं देणार नाहीं, असें त्याणें लिहून दिलें होतें. तो करार बादशाहानें मंजूर केला नाहीं; त्यामुळें रो हा परराज्यांतील वकील ह्मणून, आपल्या सरकाराशीं कसें वर्तावें तो धर्म मनांत आणून, त्याशीं बाहेरून सामोपचारानें वर्तणें झुल्फिकार खान यास जरूर आलें.

करावयाजोगें नव्हतें. दुसऱ्या ठिकाणींहि कित्येक शहरें मोडकळीस येऊन, तेथील वस्ती उठून गेली होती, आणि इतर कांहीं शहरांचा भरभराट झाला होता. अशी त्यांची परस्परविरुद्ध दशा पाहून यास आश्चर्य वाटलें. जीं वरील मोडून गेलेलीं शहरें होतीं त्यांतून कांहीं पूर्वीं राजधान्या असून ओस पडल्या होत्या[६]; यामुळें त्यांची जरी उतरती कळा आली होती, तरी त्यावरून साधारण देशाची बढती नव्हती असें ह्मणावयास कांहीं कारण नाहीं.

अकबराचा कारकीर्दीनंतर देशांतील कारभार लवकरच पुनः खराब झाला होता; सुभे मक्तयानें देऊं लागले, आणि सुभेदार लोक रयतेपासून सक्तीनें वसूल करून घेऊन जुलूम करूं लागले.

रो हा शहाणा व सावध ग्रंथकार होता; तथापि त्याणें जी दरबारची शोभा वर्णन केली आहे ती अतिशयच आहे. तेथील उमराव लोक मोठ्या गृहस्थाईनें वागत याविषयीं, आणि याला त्यांणीं मेजवान्या केल्या त्यांतील व्यवस्था व सफाई यांविषयीं याणें मोठी स्तुति केली आहे. याणें विशेष नजराणे दिले नाहींत व याचा परिवारहि थोडाच होता, आणि मोगली दरबारांत तर सर्वत्र डामडौलाचें माहात्म्य, त्यामुळें याचा सत्कार होईल असें संभवत नव्हतें; तथापि याचें सर्वप्रकारें अति आदरातिथ्य होऊन याचा सन्मान झाला. नमस्कारादि सर्व खेदकारक आचारांची

६ याप्रमाणें मांदू व तोदा हीं शहरें होतीं. रो हा त्या दोहींची अतिशय तारीफ करितो. मांदू ही पूर्वीं माळव्याची राजधानी होती, ती अद्यापिहि बहुधा प्रसिद्ध आहे, परंतु तोदा ह्मणून जी अजमीर प्रांतांतील एका राजपूत रजवाड्याची राजधानी, तिची तशी ख्याति नाहीं.

यास माफी होऊन, मोठ्या प्रसंगीं दरबारांत यास अति श्रेष्ठ ठिकाणीं बसण्याची परवानगी मिळाली, आणि पुष्कळ वेळा खुद्द बादशाहाबरोबरहि अगदीं सलगीचा रीतीनें याची भेट झाली.

तो एकांतीं बादशाहास भेटे त्या वेळीं तो जी स्थिति पाही, ती त्या बादशाहाचा इतर वैभवाशीं चमत्कारिक रीतीनें विरुद्ध दिसे. त्या मंडळीमध्यें हिरे, मोत्यें, व माणकें यांहीं खचित अशा सखल सिंहासनावर बादशाह बसे, आणि त्या वेळीं रत्नखचित सोन्याचीं ताटें, भांडीं, व प्याले, यांचा तेथें मोठा समारंभ असे. त्या प्रसंगीं मंडळीची दोरी सैल सुटलेली असे, आणि सर टामस व दुसरे थोडे गंभीर लोक, जे हात राखून असत, ते मात्र शुद्धीवर असत; बाकी सर्व छाकटे होऊन जात. जहान्गीरास पितां पितां झोंप लागे, तेव्हां याचें मद्यपान राही; नंतर चाकर लोक दिवे मालवून टाकीत, आणि लोक निघून जात. या वेळीं जहान्गीर मोठ्या प्रेमांत येत असे, आणि तें प्रेम मद्यपानाचा योगानें विशेष होत असे; एका वेळीं सर्व धर्मांविषयीं मोठ्या मोकळेपणानें त्यांचें भाषण झालें, तेव्हां "तो रडूं लागला आणि त्यास नाना प्रकारचे उद्गार आले; त्यामुळें त्यांस मध्यरात्र होऊन गेली."

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळ झाला, ह्मणजे ती याची मनमिळाऊ वृत्ति नाहींशी होई. एके दिवशीं एका उमरावानें पूर्वरात्रीचा मद्यपानाची, सभेमध्यें अविचारानें, गोष्ट काढिली; तेव्हां जहान्गीरानें आश्चर्य झाल्यासारिखें सोंग दाखविलें, आणि याप्रमाणें कायदा तोडण्याचा कामांत दुसरे कोण कोण होते त्याचा तपास करून, जांचीं नांवें त्याणें

सांगितलीं त्यांस अतिशय मार देवविला; त्या योगानें त्यांतून एक मरणहि पावला. हा लोकांमध्यें प्रसिद्ध रीतीनें वागतांना मोठा निक्षीपणा दाखवित असे, आणि जा मनुष्याचा तोंडाचा घाणीवरून, अथवा दुसऱ्या रीतीनें, तो दारू पित होता असें दिसून येई, त्याला आपल्या हुजुरांत येऊं देत नसे. परंतु हें त्याचें गांभीर्य फुकट जात असे; कारण सांप्रतचा मोठ्या लोकांप्रमाणें हाहि बातमीदारांनीं घेरलेला असे; त्यामुळें याचीं अति गुप्त कृत्यें व अगदीं क्षुल्लक अशा याचा हातून घडलेल्या गोष्टी, झाल्यापासून थोडक्या वेळानें, राजधानींतील सर्व मनुष्यांस कळून येत असत.

वरील कलमांत सांगितलेल्या दुष्ट कर्मांशिवाय जहान्गीरानें दुसरींहि कांहीं निर्दय कृत्यें केलीं होतीं; तथापि एकंदराखालीं जहान्गीराची वृत्ति चांगली होती, व समज बरा होता, असा रो याचा अभिप्राय होता, असें दिसतें. परंतु सर टामस याणेंच त्याचें एक कृत्य वर्णन केलें आहे, त्यामध्यें त्याचा बुद्धीचा हलकटपणा दिसून येऊन वरील गुण त्याचा अंगीं होते असें ह्मणवत नाहीं. ती गोष्ट अशी कीं,—एके वेळीं सुरतेहून सर टामस याकडे बादशाह व त्याचा दरबारचे लोक यांकरितां नजराण्यांचें सामान घेऊन कांहीं लोक येत होते. तेव्हां यांचा सोबतीनें जावें ह्मणून दुसरे सावकार लोकहि बराबर येत होते. नंतर ते रो याचा जवळ पोंचण्याचा पूर्वी पादशाहानें त्यांस पकडलें, आणि आंत काय आहे हें पाहण्याकरितां पोरकट स्वभावानें आपण स्वतः त्या गठड्यांची उसकटाउसकट केली. याप्रमाणें साधारण प्रमाणिकपणावरहि याणें लात मारिली असें पाहून, रो यास संताप आला; तेव्हां त्याजवळ

लाडीगोडी लावून त्याचें सांत्वन करण्याकरितां पादशाहास अगदीं नीचपणानें क्षमा मागावी लागली.

कांहीं विवक्षित मोठ्या लोकांविषयीं रो हा कांहीं अंशीं तारीफ करितो; परंतु त्यांचा सर्व जातींत अगदीं सत्व नाहीं, आणि लालूच दाखविली असतां सर्व वश होणारे आहेत, असें तो लिहितो. त्याला जो तहनामा करावयाचा होता, तो दोन वर्षांवर तसाच पडून राहिला होता; शेवटीं त्याणें एक मोलदार मोतीं असफ खान यास लांच दिलें; नंतर सर्व यथास्थित होऊन गेलें. त्या काळीं पूर्वींचा मुसलमानलोकांचा रणोत्सव पुष्कळ कमी झाला होता, आणि राजपूत व पठाण एवढेच काय ते शूर शिपायी नजरेस पडत होते, असें रो व दुसरे त्या वेळचे फिरस्ते लोक वर्णन करितात.

त्या वेळीं हस्तकौशल्यसंबंधींहि कलांची चढती स्थिति होती, आणि केवळ देशांतील कामांमध्येंच त्यांची निपुणता होती असें नाहीं. रो याणें जो नजराणा केला, त्यांत एक गाडी होती, ती पाहून थोडक्याच वेळांत तेथील लोकांनीं दुसऱ्या पुष्कळ गाड्या तयार केल्या, त्यांचें सामान या चीचाहून सरस व कारीगरींतहि कांहीं कमी नव्हतें. सर टामस याणें बादशाहास एक तसबीर दिली; नंतर लवकरच बादशाहानें त्याला तिचा पुष्कळ प्रती दाखविल्या. त्यांतून अस्सल उमगून काढण्यास त्याला फार पंचाईत पडली. त्या वेळीं युरोपीयन लोकांचा लोट सुटला असे,

७ त्याणें नजराणे करण्याचा जिन्नसा कोणत्या असाव्या त्याविषयीं सांगितलें आहे; त्यांत इतिहासपर चित्रें, दिव्याचा उजेडानें पाहावयाचीं चित्रें, आणि मनोरंजक प्रदेशांचीं चित्रें हीं असावीं, परंतु तीं चांगलीं असावीं

आणि त्यांचा धर्मासहि पुष्कळ उत्तेजन मिळत असे; जहान्गीरानें आपल्या स्मरणीचा मेरूवर, ख्रिस्त व मार्य कुमारी, यांचा तसबिरा काढविल्या होत्या; आणि त्याचा दोघां पुतण्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला होता, त्याविषयीं याचा पुरा अनुकूल अभिप्राय होता.

त्या वेळीं दरबारची भाषा फारसी होती, परंतु सर्व प्रतींचे लोक हिंदुस्थानी बोलत असत. हाकिन्स नामें एक इंग्रेज याचा दरबारांत गेला होता, त्यास तुर्की भाषेची मात्र माहिती होती, परंतु त्या भाषेमध्यें स्वतः बादशाह व खानि खानान हे चांगले वाकीफ होते, असें त्याणें पाहिलें.

शाहजादा खुशूरू. शाहजादा खुशूरू याची काय दशा होत्ये, याकडे रो याचें व दरबारी लोकांचें जसें लक्ष लागलें होतें, तसें दुसऱ्या कोणत्याहि वस्तूवर नव्हतें. त्याची दुर्दशा झाल्यामुळें त्याचा सर्व वाईट गुणांचा विसर पडला; तो सर्व सद्गुणांची खाण आहे असें वाटूं लागलें; जेव्हां बादशाहाची त्यावर कांहीं कृपा होण्याचें लक्षण दिसे, तेव्हां लोकांस अतिशय आनंद होई; आणि तो शत्रूंचा हातांत सांपडला ह्मणजे लोकांत तसाच संताप उत्पन्न होई. शाहजहान याचा वजनामुळें, आणि असफखान व नूरजहान यांचा कपटामुळें जरी बादशाहाची बुद्धि फिरण्याचे यत्न होत होते, तथापिहि बादशाहाची खुशूरूवर प्रीति होती असें ह्मणत असत. शाहजहानास राज्य मिळावें ह्मणून

कारण ते आपल्या प्रमाणेंच त्यांविषयीं जाणते आहेत, असें तो लिहितो.

८ एके वेळीं खुल्या कैदेंत असतां खुशूरू लश्कराबराबर जात होता;

खुशरूस द्यावयाचें नाहीं, असें दिसल्यामुळें लोकांस विशेष वाईट वाटे; कारण कीं "शाहजहानाची कांहीं हांजीहांजी करित असत, दुसरे हेवा करित असत, परंतु त्यावर प्रीति कोणीच करित नसत,"

शाहजहान हा लोकांस आवडत नसे.

असें रो सांगतो; तो धर्माविषयीं हटाग्रही व जुलमी होता, असें रो वर्णन करितो; परंतु त्याचा वर्तणूकेवरून तर त्याची हुशारी व सफाई दृष्टीस पडत्ये; तेव्हां हा जो लोकांस अप्रिय झाला होता, तो याचा नीरस व दराऱ्याचा वर्तणूकेमुळें झाला असावा, असें संभवतें; इतक्या स्तब्ध वृत्तीचा चेहरा आपण कधींहि पाहिला नाहीं; तसेंच यासारखें सार्वकाळ गांभीर्य राखून कधींहि हंसावयाचें नाहीं, अथवा आपल्या दृष्टीनेंहि कोणास मान द्यावयाचा, किंवा लोकांचें तारतम्य ठेवावयाचें असेंहि कांहींच नसून, यामध्यें केवळ गर्व भरला असे, आणि सर्व लोकांस हा तुच्छवत् मानित असे; असें तो वकील स्वतः लिहितो; परंतु त्या शाहजाद्याची तर त्या वेळीं पंचवीसांहून जास्त उमर नसावी.

आपला वडील भाऊ परवीझ हा आपणास मोठा प्रतिस्पर्धी होईल असें शाहजहानास कदाचित् वाटलें असावें; परंतु जरी केव्हां केव्हां त्या शाहजाद्याविषयीं याला द्वेषबुद्धि उत्पन्न होत असे,

शाहजादा परवीझ.

तेव्हां त्याची व सर टामस रो याची गांठ पडली. तो उन्हाचा वेळीं एका वृक्षाचा छायेखालीं राहिला होता, आणि सर टामस हा जवळ होता. तेव्हां यास त्याणें बलावूं पाठविलें. त्याचें शरीर सुंदर, मुखचर्या आनंदभरित आणि त्याची दाढी कमरेपर्यंत वाढलेली होती. त्या वेळीं काय चाललें होतें, तें कांहींच त्यास माहित नव्हतें, आणि इंग्रेजलोक व त्यांचा वकील यांविषयींहि त्याणें कांहीं ऐकिलें नव्हतें, असें वर्णन आहे.

तरी शाहजहानाचा विशेष बुद्धिमत्तेपुढें, व त्यांतूनहि राणीच्या यास आश्रय असे, यामुळें वास्तविक भीति वाटण्याजोगें याचा आड येण्याचें परवीझ याचें सामर्थ्य नव्हतें.

पुढें जेव्हां शाहजहान दक्षिणेंत मोठी स्वारी करावयास निघाला त्या वेळीं त्यास बादशाहानें शाह असा किताब दिला. त्यामुळें परवीझ यास जर कांहीं आशा असल्या, तर त्यांचा शेवट होऊन गेला. त्या प्रसंगीं शाहजहान यास बादशाहानें पुष्कळ अधिकार दिला, आणि जरूर लागल्यास मदत करण्यास आपण जवळ असावें, ह्मणून स्वतःहि कूच करून मांदू एथें गेला.

आपल्या मार्गें शाहजहान यास गादीचा वारीस ठरविला.

शाहजहान दक्षिणेचा बंदोबस्तास गेला.

पादशाह मांदू एथें निघून गेला

त्या स्वारींत रो हा बादशाहाचा बराबर गेला होता; त्याणें त्या स्वारीचें जें वर्णन केलें आहे, तें पूर्वीचा तारीकिचा अगदीं उलट आहे. छावणीचा तळ पडला, ह्मणजे मग दरबारांत व लश्करांत नेहमींप्रमाणें सर्व नियमित असे; परंतु बारबरदारीचा जनावरांची हाक पडली, ह्मणजे जो तो प्रथम आपल्यासाठीं ओढाताण करी, त्यामुळें गोंधळ होई. एका वेळीं इराणचा वकील व रो यांचें सामान नेण्यास कांहीं वाहन मिळेना, त्यामुळें ते अजमीर एथें कांहीं दिवस मागें राहिले, आणि एके वेळीं बराबर चांगलें सामान नसतांनाहि, शिपाई लोक व लश्कराबराबरचे दुसरे लोक यांणीं कूच करून पुढें जावें ह्मणून त्यांजवर सक्ती करण्याकरितां, त्यांचा तंबूस आग

इ० स० १६१६ अकटोबर; हि० स० १०२५, झिकाद.

बादशाहाचा कूचाविषयीं सर टामस रो याणें केलेलें वर्णन.

---

१ या वेळापासून पुढें या शाहजाद्यास कोणी ग्रंथकार शाहखुरम व कोणी शाहजहान असें ह्मणतात.

लावून दिली. तसेंच लश्कर अगदीं चालू झालें, तरी त्याच-प्रमाणें बंदोबस्त नसे. कोणे वेळीं पाण्याची कमताई पडे, आणि केव्हां केव्हां जंगलांतून व डोंगरांतून लांबीचा पल्यावर अडचणीचा वाटेनें कूच करून जात असतां, मकाणास पोंचण्याची शक्ति नाहींशी होऊन, पुष्कळ रथ, गाडे, व उंटें, हीं रानोमाळ पडलेलीं असत.[10]

शाहजहानास पूर्ण जय प्राप्त झाला.

दक्षिणेंतील राज्यांची त्या वेळची स्थिति शाहजहानास अनुकूल होती. मलिकंबरासारिख्या साधारण स्थितींतील मनुष्याची बढती झाली, तेणेंकरून त्याचा साथ्यांचा मनांत, व त्याचा स्वतांचा सरदारांतहि द्वेष उत्पन्न झाला. या कलहांमुळें त्याचा पराजय झाला; आणि तेणेंकरून मागाहून त्याचा मित्रांचा आणखी हिरमोड झाला. त्यामुळें पुढें शाहजहान दक्षिणेंत

इ॰स॰ १६१७, मार्च; हि॰स॰ १०२६, रबी उल् अव्वल.

आला, तेव्हां तिकडील राजांचा कट फोडून विजापुरचा राजास वेगळा काढण्यास त्यास विशेष आयास पडला नाहीं. याप्रमाणें आपले सर्व मददगार आपणास सोडून गेले असें पाहून, मलिकंबरास, आपला नामधारी राजा निजामशाह याचा वतीनें, मोगलांस शरण यावें लागलें, आणि अहमदनगराचा किल्ला, व दुसरा सर्व देश, जो यानें मोगलांकडून परत घेतला होता, तो त्यांस परत द्यावा लागला.

---

१० "वाईट राज्य आणि कठीण हवा हीं जेथें असतात तेथें मनुष्यास जा इजा होतात, त्या सर्व बादशाहाचा स्वारीबरोबर जातांना मला भोगाव्या लागल्या ", असें रो ह्मणतो.

याप्रमाणें या लढाईत कीर्ति मिळवून अजमीराहून निघाल्यापासून बारा महिन्यांआंत शाहजहान मांडू एथें परत जाऊन आपल्या बापास मिळाला. इ०स०१६१७ सेपटेंबर; हि०स१०२६, शवाल.

त्यानंतर सांप्रत आपण इतके जवळ आलों असें पाहून जहान्गीर गुजराथेंत गेला; तेथें सुमारें एक वर्षपर्यंत राहिला, आणि पूर्वी जो मुलुक शाहजहानाकडे होता त्यांत गुजराथचा सरसुभा आणखी भिडवून देता झाला बादशाह शाहजहानासुद्धां गुजराथेंत जाऊन राहिला.

तो इ० स० १६१८ चा सेपटेंबर महिन्यांत गुजराथ सोडून गेला. पुढें पंजाबांत एक बंड झालें; हिमालय पहाडाखालच्या नगरकोटच्या किल्ला याणें घेतला; आणि पादशाह एकदां काश्मीरास गेला होता; यांशिवाय पुढील दोन वर्षांत दुसऱ्या सांगावयासारिख्या गोष्टी घडून आल्या नाहींत. हि० स० १०२७, रमझान.

बादशाह काश्मीर देशांत असतां दक्षिणेंत पुनः लढाई सुरू झाली असें यास वर्तमान लागलें. या समयीं आपल्या शत्रूंची ढिलाई आहे असें पाहून मलिकंबरानें लोभानें उद्युक्त होऊन ती लढाई मुद्दाम उकरून काढिली; त्या वेळीं मोगललोकहि सुस्त झाले होते, असें दिसतें; कारण मलिकंबरास विशेष आयास न पडतां, त्याणें सर्व मैदानप्रदेश हस्तगत करून घेऊन, मोगलांचा सरदारांस बऱ्हाणपुरास पळविलें. तेथें जाऊन आपणास कुमक पाठवावी म्हणून त्यांणीं बादशाहाची फार विनवणी केली; तेव्हां जहान्गीरानें दक्षिणेंत पुनः बखेडे उत्पन्न झाले. इ० स० १६२१, हि० स० १०३०.

ते बंद करण्यास शाहजहान पुनः निघाला.

शाहजहानास मोठी फौज घेऊन जाण्याविषयीं आज्ञा केली, आणि तो सरहद्दीवर पोंचल्यानंतर त्यास पुरवठा पाडण्याकरितां पुष्कळ द्रव्य जमा केलें. त्याचा मनांत कांहीं संशय उत्पन्न होऊन आपला भाऊ शाहजादा खुश्रू यास माझा हवालीं केल्याशिवाय, आणि मजबराबर त्यास दक्षिणेंत जाऊं दिल्याशिवाय, मी दक्षिणेंत जाणार नाहीं, असें त्याणें सांगितलें. ती त्याची इच्छा पुरी झाल्यानंतर, त्याणें आपल्या नेहमींचा हुशारीनें नेमलेल्या कामांत मन घातलें. तो माळव्यांत जाऊन पोंचे तों, मलिकंबराचा एका टोळीनें नर्मदा उतरून मांडूशहराचा बाहेरील वेशीचीं घरें भाजून टाकिलीं; पुढें हा शाहजादा जसा पुढें जात चालला, तसतसा मलिकंबरास मागें हटवित चालला; असें होतांहोतां हा नर्मदा उतरून, त्यांस त्यांचाच देशांत उपद्रव करूं लागला. मलिकंबरानें आपली नेहेमींची युद्धाची रीती चालू केली: मोगलांचा सैन्याचें सामानसुमान येत असेल तें पकडावें, व त्यांस कांहीं मिळूं देऊं नये, त्यांचा लहान टोळ्या सांपडल्यास कापून टाकाव्या; त्यांचें लश्कर चालत असतां त्यांचा जवळपास राहून त्यांस इजा द्यावी; आणि लांबलांब व जलद कूच करून छापे घालावे, असे त्याणें यत्न केले. परंतु शाहजहान हा सार्वकाळ सावधच असे,

शाहजहानाची फत्ते झाली.

त्यामुळें धारिष्ट करून समोर लढाई देऊन नशीबाची परीक्षा पाहणें त्यास भाग आलें; व तींत त्याचें फार नुकसान होऊन पराजय झाला.

याप्रमाणें रणामध्यें शाहजहानानें आपलें वर्चस्व पक्कें स्थापन केलें; तथापि सर्व देश भिकार होऊन गेल्यामुळें

त्यास मोठी अडचण पडूं लागली. त्यामुळें आणखी मुलुक हवालीं करून कांहीं द्रव्य देतों तें घेऊन तह करावा, असें जें बोलणें मलिकंबरानें लाविलें होतें, तें याणें मोठ्या आनंदानें मान्य केलें.

त्याणें मलिकंबराशीं तह केला.

मोगलांस हा जय प्राप्त झाल्यावर थोड्याच दिवसांत, बादशाहास मोठा कठीण दम्याचा उपद्रव झाला; त्या रोगापासून पुढें त्यास आमरणान्त फार क्लेश झाले. कांहीं वेळपर्यंत त्याचा जीवास धोकाच होता, तेव्हां लवकरच गादी रिकामी होत्ये असें लोकांस वाटूं लागलें.

पादशाहास मोठा भयंकर रोग झाला.

त्या प्रसंगीं परवीझ हा जलदीनें दरबारांत आला; त्यास रागावून बादशाहानें त्याचा हुद्यावर परत पाठवून दिलें. शाहजहान यास तसें करण्यास अवसरच मिळाला नाहीं, आणि इतक्यांत पादशाह बरा झाल्याचेंहि त्यास वर्तमान लागलें; तथापि त्याच संधीस शाहजादा खुशूरू, ( जास त्याचा स्वाधीन करून ठेविलें होतें तो ) अकस्मात् मरण पावला; ती वेळ अगदीं टाळ्याटिपणास मिळाल्यावरून, त्याचा प्रतिस्पर्धी शाहजहान याणें त्यास जबरीनें मारविलें, असा लोकांस मजबूद अंदेशा आला. तथापि शाहजहानानें आपल्या सगळ्या उमरींत दुसरें असें दुष्ट कर्म केलें नाहीं; यावरून एवढ्या घोर कर्माचा डाग या पुरुषानें आपल्या अंगास लावून घेतला असेल, असें आपण एकाएकी जलदीनें प्रमाण मानूं नये, हें योग्य आहे.

परवीझ, व शाहजहान, यांची कृति. इ०स० १६२१, सेपटेंबरचा सुमारें; हि०स०१०३०.

खुशूरूचा मरणाविषयीं वहमा.

ही गोष्ट घडून आल्यामुळें पुढें शाहजहानास गादी

नूरजहान इ-चें शाहजहा-नाशीं विटलें.

मिळण्याचा अगदींच संशय राहिला नाहीं असें दिसत होतें; परंतु वास्तविक पाहतां या गोष्टीपासून त्यास एकामागून एक असे अपाय व विघ्नें माप्त झालीं, तेणेंकरून त्याचा नाश होण्याचें जवळ जवळ आलें होतें. हा वेळपर्यंत त्याचा स्वतांचा वजनाशिवाय, सर्वप्रकारें घडामोड करण्याचें जिचें सामर्थ्य, अशा नूरजहान राणीचें त्यास सहाय होतें; परंतु पुढें तो दक्षिणेंत जाण्याचा सुमारास तिणें जहान्गीराचा अगदीं धाकटा मुलगा शाहजादा शहरियार यास आपल्या पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी देण्याचें केलें; तेवढ्या संबंधानेंच शाहजहान हा तिचा अधिक दूरचा सगा झाला; यामुळें त्याचा पक्षावर जी तिची मीति होती, ती उडून जाण्यास हें एकच सबळ कारण पुरे झालें. त्याशिवाय तिचा पगडा सांमत जास्त पडत चालत होता, तसा शाहजहानासारिख्या उद्योगी व बुद्धिमान् बादशाहावर बसणें अशक्य, असें पाहून तिची आणखीहि बुद्धि फिरली. तिचा बाप जीवंत होता, तेव्हां तो आपल्या शहाणपणाचा उपदेशांनीं तिचा अावर करित असे; तो या सुमारास वारला, तेव्हां ती बादशाहास पाहिजे तसा आडकाठीशिवाय खेळवूं लागली. तिचा भाऊ असफखान, जाचा मुलीशीं शाहजहानाचें लग्न झालें होतें, तो अगदीं तिचा हुकुमांत वागत असे. या प्रकारची अपार सत्ता हातांतून जाऊं देण्यास नाखुश होत्साती, शाहजहान यास राज्य न मिळूं देण्याविषयीं साधेल त्या रीतींनीं जितका आपल्याचानें अडथळा होईल तितका करण्याचा तिणें निश्चय केला; आणि खूशूरू मरण

पावल्यामुळें व बादशाहाची प्रकृति अन्यावस्थ झाल्यामुळें, ही सावध झाली; आणि जी शक्ति शाहजहानाकडे राहूं दिल्या असतां, तो पुढें आपणास अनिवार होईल, त्या तोडून टाकण्याचा, एक क्षण न विसंबतां, यत्न केला पाहिजे, असें तिला वाटलें. तो बेत सिद्धीस नेण्याची तिला लवकरच संधि प्राप्त झाली.

तो प्रकार.— या सुमारास इराणी लोकांनीं येऊन कंदाहार जिंकून घेतलें; तेव्हां ज्या योद्ध्यानें दक्षिण देश जिंकिला, त्यास हें काम करण्यास योग्य, यास्तव तो जुना मुलुक घेण्याविषयीं बादशाहानें शाहजहान यास सांगितलें. प्रथम शाहजहानानें तें बोलणें मान्य केलें, परंतु पुढें थोडक्या दिवसांत त्याचा नजरेस आलें, कीं ज्या देशांत आपली छाप बसली आहे, तेथून आपणास काढून लावून, लांबीचा पल्यावरचें व कठीण काम आपणास द्यावें, असा बादशाहाचा उद्देश आहे; तेव्हां आतां पुसूमीचे दिवस नाहींत व आपल्या लश्कराची स्थिति नीट नाहीं, असें निमित्त सांगून कूच करण्यास तो दिवसगत लावूं लागला; आणि हिंदुस्थानांतून जाण्याचें साहस करण्यापूर्वीं मला कांहीं जामीनगती द्याव्या, असें त्याणें बोलणें लाविलें. या बोलण्यावरून शाहजहानाची स्वतंत्र होण्याची मसलत आहे, असें त्याचा शत्रूंनीं बादशाहास समजाविलें; तेव्हां बादशाहानें त्यास असें उत्तर पाठविलें, कीं शहरियार याजकडे कंदाहार घेण्याचें काम सोंपविलें आहे; याजकरितां तुह्मी आपली बहुतेक फौज

इराणी लोकांनीं कंदाहार घेतलें; इ० स० १६२१, हि० स० १०३१.

बादशाहानें तें परत घेण्याची शाहजहानास आज्ञा केली.

शाहजहान हिंदुस्थानांतून जाण्यास कांकूं करूं लागला.

त्याकडे पाठवावी. त्या वेळीं शाहजहानाचा छावणींतील मुख्य सरदारांनीं त्याचें लश्कर सोडून शहरियाराचा लश्करास जाऊन मिळावें, असे बादशाहानें परभारे त्यांस हुकूम पाठविले; त्यावरून शाहजहानानें तकरार केली, आणि बापाजवळ भेटण्याची परवानगी मागितली; परंतु त्याचा बापानें त्यास दक्षिणेंत परत जाण्याचा सक्तीनें हुकूम केला.

तें काम शाहजादा शहरियार याजवर सोंपून शाहजहानाचें बहुतेक लश्कर शहरियाराचा तैनातीस दिलें.

हे वादविवाद चालले असतां शाहजहानास कांहीं न विचारतां, त्याचा उत्तरहिंदुस्थानांतील जाहागिरी शहरियारास दिल्या; आणि त्यांचाबदल तितकाच मुलुक त्याणें दक्षिणेंत व गुजराथेंत पसंत करून घ्यावा असें बादशाहानें त्यास सांगून पाठविलें. याप्रमाणें बाणीचा प्रसंग जवळ आला, तेव्हां आपल्या भावामध्यें एवढें लश्करी चातुर्य नाहीं, व या कामामध्यें त्याची उत्सुकताहि नसेल असा तिला अभरवसा उत्पन्न होऊन, त्या नूरजहान राणीची दृष्टि **मोहबत खान** या सरदारावर गेली. **मोहबत खान** हा त्या वेळीं अतिशय प्रख्यात सरदार होता; परंतु ही वेळपर्यंत त्याचें व राणीचा भाऊ **असफ खान** याचें अतिशय वांकडें होतें.

मोहबत खान यास राणीनें दरबारांत बोलाविलें.

त्याप्रमाणें **मोहबत खान** हा **काबूल**चा सुभ्यावर होता तेथून राणीनें त्यास दरबारांत बोलावून आणून त्यावर सर्व प्रकारें कृपा केली व पुढें ती त्यावर भरवसा ठेवूं लागली.

इ०स० १६२२, अकटोबरचा सुमारास; हि०स० १०३१.

कांहीं दिवसांपूर्वी **जहान्गीर** पुनः **काश्मीर** एथें गेला होता, तो या वादास आरंभ झाल्यानंतर परत येऊन, आपलें स्वतांचें कारण लागल्यास जवळ असावें ह्मणून, **लाहोरास** दरबार करून राहिला.

दरम्यान शाहजहान व बादशाह यांमध्यें निरोप खेळत होते; परंतु त्यांपासून त्या दोघांच्या समेट बनून आला नाहीं; तेणेंकरून, आपल्या मुलाबराबर फितूर केलें आहे अशा वहम्यानें जहान्गीरानें पुष्कळ लोकांचे प्राण घेतले. शेवटीं आपलें नशीब फुटलें असें पाहून शाहजहान मांदू एथून आपल्या लश्करासहित आग्र्याकडे कूच करिता झाला. तें वर्तमान समजतांच जहान्गीर लाहोराहून निघाला, आणि राजधानींतून जाऊन दिल्लीचा दक्षिणेस वीस कोशांवर बलोचपुर ऐथें बंडवाल्यांची फौज पडून राहिली होती तिजपासून दहा कोशांचा पल्यावर आला; तेव्हां शाहजहान हा जवळचा मेवातप्रांतांतील डोंगरांत मागें हटून गेला, आणि आपल्या शोधार्थ बादशाहानें जी फौज पाठविली तिचा आंत प्रवेश होऊं नये, ह्मणून तिकडील वाटा बंद करण्याचा बंदोबस्तानें त्याणें आपल्या फौजेची व्यवस्था केली. तेथें एक अर्धवट व परिणामशून्य अशी एक लढाई झाली, आणि त्यानंतर तहाचीं बोलणीं लागलीं असें ह्मणतात. शेवटीं परिणाम असा झाला कीं शाहजहान हा परत जाण्याचा निश्चय करून मांदू एथें जाण्यास निघाला.

बादशाह आणि शाहजहान, यांचा एकमेकांवर अणखी बेभरवसा झाला.

शाहजहानानें बंड केलें. बादशाह पुढें चाल करून आला. इ०स०१६२३ फेब्रुआरि; हि०स०१०३२.

शाहजहान परत गेला.

असें पाऊल टाकण्यास तो कोणत्या कारणानें उद्युक्त झाला तें दिसून येत नाहीं; परंतु जा आपसांत लढाया होत असतात, त्यांमध्यें मागें हटलें असतां जे हमेशा परिणाम होतात, ते याचा अशा करण्यापासून झाले. जहान्गीर स्वतः

त्याचा परत जाण्यापासून झालेले परिणाम.

अजमीरपर्यंत चालून आला, आणि मागें हटून जाणाऱ्या बंडवाल्यांचा पाठलाग करण्याकरितां शाहजादा परवीझ व मोहबत खान, यांस बराबर देऊन एक मोठी मजबूद फौज पाठविता झाला. चंबळेवरील पहाडांतील प्रदेशाचें संरक्षण करण्याकरितां शाहजहानानें रुस्तुम खान यास ठेविलें होतें; तोहि फितून शत्रूस मिळाला; याचा गुजराथेंतील सुभेदारास तेथील लोकांनीं हांकून दिलें; आणि बादशाही लश्कर पुढें चाल करून आल्यामुळें यास नर्मदा उतरून बऱ्हाणपुर एथें माघारें यावें लागलें. तेथें तरी यास शत्रूंनीं फार दिवस स्वस्थ राहूं दिलें नाहीं. मोहबत खान याणें कांहीं लबाडीनें तहाचें बोलणें लावून याचा डोळ्यांस पडदे बांधिले, आणि तो नर्मदा उतरून आला; तेव्हां खान खानान, जो तेथपर्यंत शाहजहान याचा पक्षास होता तोहि, मोहबत खान यास जाऊन मिळाला. त्या वेळीं पावसाळ्याचा भर होता; असें असून, वरील प्रकार घडून आल्यामुळें शाहजहान हा तेलंगणांत जावयास निघाला. तो बंगाल्यांत जाण्याचा इराद्यानें मच्छलीपट्टणचा रस्त्यास लागेपर्यंत, त्याचें बहुतेक लश्कर त्यास सोडून गेलें; तथापि लांबीचा व कठीण पल्ला मारून दुसऱ्या वर्षाचा अवेलीस तो बंगाल्यांत पोंचला. तो राजमहाल एथें जाईपर्यंत त्यास कोणी आड आला नाहीं. पुढें राजमहाल एथें बंगालचा सुभेदारानें त्याशीं युद्ध केलें; तेव्हां मोठी लढाई होऊन त्या सुभेदाराचा पराजय झाला. त्या योगानें बंगालप्रांत शाहजहानास मिळून, त्यास सामर्थ्य आल्यावरून

शाहजहान तेलंगणांत निघून गेला.

तिकडून बंगाल्यास गेला. इ॰ स॰ १६२४, हि॰ स॰ १०३३.

बहार प्रांतहि त्याणें घेतला; आणि उदेपुराचा राण्याचा भाऊ भीमसिंग याजबराबर कांहीं लोक देऊन अलाहबादेचा किल्ला मिळविण्याचा यत्न करण्याकरितां त्यास पुढें पाठविता झाला.

शाहजहानानें बंगाल व बहार हे प्रांत घेतले.

शाहजादा परवीझ व मोहबत खान यांणीं शाहजहानास दक्षिणेंतून पळवून लाविल्यावर, पावसाळा आला त्यामुळें ते बऱ्हाणपुर एथें छावणी देऊन राहिले होते; पुढें शाहजहान हा बंगाल्यास पोंचून त्याची तेथें बढती झाली, हें वर्तमान ऐकतांच ते अलाहबादेकडेस जाण्यास निघाले. त्यांशीं युध्धप्रसंग करण्याकरितां शाहजहान हा गंगा उतरला; परंतु त्या देशचे लोक बादशाहाशीं वांकडे होण्यास नाखुश होते, त्यामुळें ते याचा छावणींत शिधासामग्री वगैरे आणीतना, आणि गंगेवरील नावांचा द्वारानें त्याचा डांका चालू ठेवण्यासहि मदत करीतनासे झाले, त्यामुळें त्याचा लश्कराची नाउमेद होऊन हाल झाले. तेणेंकरून शाहजहान याणें बंगाल्यांत ठेविलेले जे नवीन लोक होते, ते त्यास सोडून गेले, आणि शेवटीं जेव्हां तो शत्रूंशीं लढाईस उभा राहिला, तेव्हां त्यांणीं त्याचा सहज मोड करून, त्याचा लश्कराची वाताहत करून सोडिली; त्या समयीं त्यास आपला बचाव करण्याकरितां पुनः दक्षिणेंत पळून जावें लागलें. त्या वेळीं दक्षिणेंतील राज्यांची स्थिति यास अनुकूल होती. प्रथम हा जा वेळीं दक्षिणेंत पळून आला, त्यावेळीं विजापुरचा राजा व मलिकंबर हे दोघेहि केलेल्या कराराप्रमाणें जहान्गीराशीं मिळून राहिले होते; आणि हा तैलंगणप्रांतांतून पळून

शाहजादा परवीझ व मोहबत खान, यांणीं त्याचा पाठलाग केला.

शाहजहानाचा पराजय होऊन तो दक्षिणेंत पळून गेला.

दक्षिणेंतील राज्यांची स्थिति.

जात असतां, यास मदत करण्याविषयीं गोवळकों-ड्याचा राजानेंहि आपली इच्छा दाखविली नाहीं; पुढें म-लिकंबर व विजापुरकर यांचा एक तंटा लागला, त्यांत मोगलांनीं विजापुरकरांचा पक्ष स्वीकारिला. त्याचा सूड उगविण्याकरितां मलिकंबरानें मोगलांचा मुलुकांत स्वाऱ्या करून बऱ्हाणपुराजवळपर्यंत देश लुटला. या कारणा-स्तव शाहजहानाचा स्वीकार करण्यास तो अगदीं हात पसरून तयार होता, आणि त्याणें बऱ्हाणपुर शहरास वेढा द्यावा ह्मणून त्यास आग्रह करण्याकरितां मलिकंबरानें पत्र लिहिलें. त्याचें बोलणें शाहजहानानें कबूल करून वेढ्याचें काम सुरू केलें; परंतु तेथील लोकांनीं हट्टास पेटून युद्ध केलें, आणि शेवटीं परवीझ व मो-हबत खान हे परत नर्मदेवर येऊन पोंचल्यामुळें त्यास वेढा उठवून आपल्या बचावाचा उद्योग पाहवा लागला. या वेळीं पूर्वींपेक्षां याचे पु-ष्कळ लोक यास सोडून गेले, आणि याची प्रकृति बिघडल्या-मुळें व दुर्दैव पाठीस लागल्यामुळें, याणें हतवीर्य होऊन बापाजवळ क्षमा मागितली आणि तुह्मी आज्ञा कराल तसें करण्यास मी सिद्ध आहें, असें लिहून पाठविलें. बहारप्रांतांतील रोठस व दक्षिणें-तील अशीरगड हे दोन किल्ले अद्यापि त्याचा ताब्यांत होते ते स्वाधीन करून, आपल्या बऱ्या वर्तणूकेचा जामीनकीस आ-पल्या मुलांपैकीं दारा शेखो व औरंगझेब यांस दरबारांत ओलीस पाठवावें अशी जहान्गीरानें त्यास आज्ञा केली. हीं त्याचीं सर्व बोलणीं शाहजहानानें कबूल केलीं. पुढें जी एक

शाहजहान हा मलिकंबरास मिळाला.

परवीझ व मोहबत खान यांणीं त्याजवर लगट केला.

त्याची फौज त्यास सोडून गेली.

गोष्ट घडून आली तेणेंकरून सर्व राज्यांत कल्होळ झाला, त्यामुळें शाहजहानाचें बादशाह काय करणार होता, तें आपल्याचानें सांगवत नाहीं.

तो बादशाहास शरण आला. इ०स० १६२५, हि०स० १०३४.

जेव्हां शाहजहान प्रथम दक्षिणेंत पळून आला तेव्हां जहान्गीर अजमीराहून दिल्लीस परत गेला; आणि आपल्या राज्यास आतां कांहीं विशेष मोठा अपाय येण्याजोगा नाहीं असें पाहून, तो चालीप्रमाणें काश्मीरास गेला. दुसऱ्या वर्षींहि तो तसाच तिकडे गेला; तिसऱ्या वर्षीं रोशनयेलोकांचें नवें बंड झाल्यावरून तो काश्मीर एथें न जातां काबूलास जाण्याचा निश्चय करिता झाला. पुढें लवकरच तें बंड मोडल्याचें वर्तमान यास समजलें, आणि त्यांतील मुख्य अहदाद याचा मुलगा अहमद याचें डोकेंहि लोकांनीं यास आणून दिलें; तथापि याणें तिकडे जाण्याचा आपला निश्चय फिरविला नाहीं.

बादशाहानें रोशनयेलोकांवर काबूलांत स्वारी केली.

परंतु ही याची स्वारी स्वस्थपणें होईल असा ईश्वरी संकेत नव्हता; कारण शाहजहान हा जेरीस आला तों इतक्यांत नूरजहान इचा दराऱ्याचा स्वभावामुळें नवे शत्रु उत्पन्न झाले; त्यांत मोहबत खान हा मुख्य होता. मोहबत खान हा घोरबेग नामें एका काबूलचा गृहस्थाचा पुत्र होता. तो अकबराचा कारकीर्दींत ५०० चा सरदाराची पदवी पावला होता आणि त्यास जहान्गीरानें वाढवून अति मोठे हुद्दे व कामें दिलीं होतीं; पुष्कळ दिवसांपासून

राणीनें मोहबत खानाचा छल केला.

मोहबत खानाचा इतिहास.

लोकांमध्यें त्याचें मोठें वजन असे; आणि तो या वेळीं बादशाहाचा रयतेमध्यें अति उंच पदवी पावलेला पुरुष होता, असें ह्मटलें असतां चालेल. नूरजहान इचा व याचा द्वेष पडण्यास एवढेंच कारणहि पुरे होतें; परंतु त्याचें व तिचा भावाचें जुनें वैर होतें, आणि तो अलीकडे परवीझ याशीं मिळालेला होता, यामुळेंहि तिचा मोहबतावर बेभरवसा झाला असेल, असें संभवतें. त्यांचा काय उद्देश असेल तो असो, परंतु तो बंगालप्रांतांत असतां त्याणें जुलूम केला व सरकारचा पैका खाल्ला अशी त्याजवर तोहमत आणून, त्याचा जबाब घेण्याकरितां त्यास दरबारांत बोलाविलें. त्याणें प्रथम न येण्याकरितां कांहीं बयाद सांगून पाठविले, आणि त्यास परवीझ याणेंहि मदत केली; परंतु आपणास आलेंच पाहिजे असा आग्रह बादशाहानें धरिलासें पाहून, त्याणें तजवीज करून जे ५,००० राजपूतलोक आपल्या पदरीं ठेविले होते, त्यांनिशीं तो जावयास निघाला.

त्यास दरबारांत बलाविलें.

तो दरबारामध्यें पोंचण्यापूर्वीं त्याणें, बादशाहाची प्रथम परवानगी घेतल्याशिवाय, बरखोरदारनामक एका तरुण उमरावाशीं आपल्या मुलीचें लग्न केलें. एवढ्या मोठ्या लोकांमध्यें लग्नें करावयाचीं झालीं, ह्मणजे प्रथम बादशाहाची परवानगी मागण्याची चाल असे; त्यामुळें मोहबतानें ही आपली उघड अवगणना केली, असें जहान्गीरास वाटून क्रोध आला; आणि अद्यापिहि यास दुष्टपणाचा लहरी येत असत, तशा लहरींत बेफहम होऊन बरखोरदार यास याणें बोलावून आणिलें, आणि त्यास नग्न करून आपल्या देखत

बादशाहानें त्याचा जांवयाचे हाल केले.

कांत्र्यांनीं मारविलें. इतकें करून त्यास जें मोहबताकडून आंदण मिळालें होतें तें बळकाविलें, आणि त्याची दुसरी सर्व मत्ता जप्त केली.

जेव्हां मोहबत हा बादशाहाचा छावणीजवळ आला, तेव्हां बादशाहाचा हुजूरांत येण्यास आपणास परवानगी मिळणार नाहीं; असें त्यास समजलें. त्या समयीं शत्रूंनीं आपला नाश करावयाचा संकल्प केला आहे असें पाहून आपल्या फौजेची व आपली फुटाफूट होईपर्यंत वाट न- पाहतां, धीटाई करून हात मारिला असतां आपलें बरेंच कार्य होईल असें त्यास वाटून, त्याणें तसा प्रयत्न करण्याचा निश्चय केला.

त्या वेळीं जहान्गीर हा जहिलमनदीवर छावणी देऊन होता; तो काबूलास जाण्याकरितां नावांचा पुलावरून नदी उतरून जाण्याचा तयारींत होता. त्याणें प्रथम आपली फौज पलीकडे पाठविली, आणि सर्व लोकांची गर्दी, व गडबडाट संपल्यावर, मागाहून स्वस्थपणीं आपण उतरावें, असा त्याचा बेत होता. त्याप्रमाणें त्याचें सर्व लश्कर पलीकडे उतरलें, आणि पादशाह, खास पाहऱ्यानिशीं व इतर चाकरलोकांनिशीं, मागें राहिला होता. इतक्यांत सूर्योदयाचा कांहीं पूर्वी मोहबत खान याणें आपलें लश्कर तयार करून, तो पूल आपल्या हातांत घेण्यास २,००० लोक पाठविले; आणि स्वतः होईल तितकी जलदी करून बादशाह डेरे देऊन राहिला होता तेथें आला. ती जागा लवकरच त्याचा लोकांनीं वेष्टिली, आणि तो २०० निवडक लोक घेऊन स्वतः समोर

मोहबतानें बादशाहास पकडलें. इ० स० १६२६, मार्च; हि० स० १०३५, जमादि, चं० २.

बादशाहाचा डेऱ्यावर घुसला. हा कशाचा हल्ला आला आहे हें बादशाहाचा लोकांस समजण्याचा पूर्वीं त्यांणीं त्यांचें कंदन करून वाताहत केली. जहान्गीर हा पूर्वरात्रीचा मद्यपानापासून मुक्त होऊन, अद्यापि साफ शुद्धीवर आला नव्हता. त्याचा बिछान्याभोंवताले हत्यारबंद लोक झपाट्यानें आले, तेणेंकरून तो जागा झाला, दचकून वर उठला, आणि आपली तलवार उचलून भ्रमिष्टासारखा सभोंवार निरखून पाहून, आपली दशा काय झाली हें समजून ह्मणाला— "अरे ! **मोहबत खाना** ! राजद्रोह्या ! हें काय ?" **मोहबत खान** याणें जमीनीवर साष्टांग नमस्कार घालून उत्तर दिलें, कीं शत्रूंनीं माझा छल केल्यावरून माझा धन्याची गांठ घेण्याकरितां मला अशी जबरदस्ती करावी लागली; ह्मणून मी मोठा दुःखी आहें. जहान्गीरास त्याचाच राग प्रथम माईना; परंतु एवढी गरीबी दाखवित असतां **मोहबत खान** हा आपली लटपटपंची ऐकत नाहीं असें समजून, याणें काळाप्रमाणें हळूहळू आपली स्थीति केली, आणि आपणास पकडणाराची मर्जी संपादण्याचा यत्न केला. नंतर **मोहबतानें** त्यास सुचिवलें, कीं हा आपला नेहमींचा घोड्यावर बसण्याचा वेळ आहे, यास्तव लोकांची भीति दूर करण्याकरितां, व दुष्ट लोकांचा कुकल्पना बंद पाडण्याकरितां, आपण लोकांचा नजरेस पडावें हें बरें आहे. जहान्गीरानें तें कबूल केलें, आणि कपडे करण्याचें निमित्त करून जनानखान्यामध्यें **नूरजहान** इची मसलत घेण्याची संधि सांपडेल या आशेनें तिकडे जाण्याचा यत्न केला; परंतु तो उद्देश तडीस जाण्यास हरकत झाल्यामुळें, हा जागचा जागींच, तयार झाला; आणि प्रथम **राजपूतलोकांचा** मध्य-

भागीं स्वतांचा घोड्यावर येऊन बसला. त्या लोकांनीं नम्रतेनें सलाम करून बादशाहाचा आदर केला; परंतु आपल्या विश्वासांतील महात जा हत्तीवर असेल त्यावर बादशहास बसविला असतां जास्त बंदोबस्त राहून लोकांसहि बादशाह चांगल्या रीतीनें दृष्टीस पडेल असा विचार करून, मोहबत खानानें हत्तीवर बसण्याविषयीं बादशाहास आग्रह केला, आणि त्याचा बाजूंस दोन हत्यारबंद राजपूत बसविले. त्या वेळीं पादशाहाचा मुख्य महात राजपूतांचा फळींतून रस्ता काढित बादशाहाचा खासगत हत्तींतून एकावर यास बसविण्याचा यत्न करित होता. इतक्यांत मोहबतानें खूण करितांच जवळचा लोकांनीं त्यास ठार मारिलें. बादशाहाचा दुसऱ्या एका खासगी चाकरास वाटेंत एक वार झाला, तथापि तो हत्तीशीं जाऊन पोंचला; त्यास त्याचा धन्याजवळ हत्तीवर बसूं दिलें. त्याचप्रमाणें बादशाहाचा जीविन्वास आवश्यक असा जो दारूचा शिसा व प्याला, तो जा चाकराचा हवालीं होता, त्यासहि हत्तीवर बसण्याविषयीं परवानगी मिळाली.

हरकत केली असतां परिणाम काय होतो त्याचीं वरील उदाहरणें पाहून बादशाहास पुरी दहशत पडली, आणि तो अगदीं निमूटपणीं मोहबत खान याचा डेऱ्यांत गेला.

नूरजहान इचें धैर्य.

इकडे हा अकस्मात् घात झाल्यामुळें नूरजहान भयाभीत झाली; तथापि तिचें धारिष्ट नाहींसें झालें नाहीं. पादशाहाशीं जाण्याचे सर्व रस्ते बंद झाले असें पाहून, तिणें लागलेंच सोंग घेतलें, आणि अतिशय हलक्या मतीचा डोलींत बसून ती पुलाकडे गेली. कोणी जाणारा झाला तर त्यास जाऊं द्यावें,

परंतु कोणासहि परत येऊं देऊं नये, असा पाहरेकऱ्यांस हुकूम होता; त्यामुळें कांहीं हरकत न होतां ती नदी उतरून लवकरच पादशाहाचा छावणीमध्यें सुरक्षित पोंचली. तिणें लागलाच आपला भाऊ व दुसरे मुख्य सरदार यांस बलाविलें, आणि तुह्मी आपल्या डोळ्यांदेखत पादशाहास शत्रूकरवीं कैद करूं दिलें, या त्यांचा नामर्दीविषयीं व हयगयीविषयीं तिणें त्यांची फार निर्भर्त्सना केली. ती नुसत्या शिव्या देऊनच स्वस्थ राहिली नाहीं; परंतु आपल्या बाहुबळानें नवऱ्यास सोडवून आणण्याची तयारी करिती झाली. इकडे त्या गुलीमध्यें आपणास कांहीं इजा होईल अशी बहुधा खरीखुरी धास्ती पडून, **मोहबत खान** याजवर हल्ला करूं नये अशी **जहान्गीर** याणें तिला विनंती करण्याकरितां आपली मुद्रा देऊन एक जासूद पाठविला; परंतु हा निरोप **मोहबत खान** याणें लबाडीनें पाठविला असें तिणें मानिलें, आणि शत्रूंचा छावणीची वास्तविक स्थिति समजे आणि तींत कोणत्या ठिकाणीं बादशाह राहिला आहे हें कळेपर्यंत, तिणें आपली तयारी तहकूब ठेविली. त्या रात्रीस थोडे घोडेस्वार घेऊन नदी पोहून **जहान्गीरास** पळवून नेण्याकरितां **फिदाई खान** नामें एका उमरावानें यत्न केला; परंतु तो येत आहे हें शत्रूंस उमगलें, आणि त्याचे पुष्कळ सोबती मरून व नदींत बुडाले जाऊन, तो शर्तीनें निभावून गेला.

तिणें मोहबत खानाचा छावणीवर हल्ला केला.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं सर्व फौज हल्ला करण्यास निघाली, तींत तोंडासच **नूरजहान** ही खुद, एक तीरकमठा व दोन बाणांचे भाते घेऊन, एका उंच हत्तीचा हौद्यांत बसून आली होती. पूर्वी **राजपूतांनीं** नदीवरील पूल जाळून टाकिला होता,

त्यामुळें तेथून कांहीं खालीं एका ठिकाणीं नदीस उतार आहे असें त्यांस समजलें होतें; त्या रस्त्यानें तिचें लश्कर नदी उतरूं लागलें. ती उताराची जागा उथळ होती, परंतु अरुंद होती आणि दुबाजूस ओंड पाणी असून मध्येंहि भयंकर डोह पुष्कळ होते, तेणेंकरून नदी उतरतांना ती फौज अतिशय अस्ताव्यस्त झाली; पुष्कळांस पोहून यावें लागलें. सर्व पलीकडे उतरून गेले तों त्यांची दारू दमसरली, आणि त्यांचे कपडे व चिलखती पाण्यानें चिंब होऊन त्यांणीं जों पलीकडचा किनाऱ्यावर नीटसा पाय ठेविला नाहीं, तों शत्रु येऊन त्यांशीं भिडले. नूरजहान ही आपल्या हत्तीवर बसून अगदीं तोंडावरचा लोकांत होती, आणि तिचा भाऊ व दुसरे कांहीं मुख्य सरदार हे तिचा वाटोळे होते. ती शिकस्त करून पलीकडे उतरली, परंतु शत्रूंशीं लढून आपल्याचानें कांहीं होणार नाहीं असें तिचा नजरेस आलें. त्या वेळीं समोरचा राजपूतलोकांची रणभूमीची जागा इचा पेक्षां चांगली होती; त्यामुळें इचें लश्कर उतरणावरून उतरत असतां, त्यांणीं गोळ्या, तीर व बाण यांचा पाऊस पाडिला, आणि जे जमीनीवर पोंचून दुसऱ्या तडीस उतरत होते, त्यांजवर ते तलवारा घेऊन घुसले, आणि त्यांस पाण्यामध्यें परत हटविते झाले.

त्या वेळीं एकच गोंधळ व कल्होळ झाला; त्या उतरणामध्यें घोडे व हत्ती यांची अगदीं गरदी झाली; कितीएक पडून पायांखालीं तुडविले गेले; कित्येक डोहांत बुडाले, आणि त्यांस पुनः तारा मिळाला नाहीं; पुष्कळ नदीमध्यें उड्या टाकून, गेलों तर पोहून जाऊं, अथवा कदाचित् बुडाले जाऊं, अशा बुद्धीनें पाण्यांत घुसले. नूरजहान इजवर शत्रूंनीं मोठ्या निकराचा हल्ला केला. तिचा हत्तीचा सभोंवतीं

रजपूतलोकांनीं जमाव करून अगदीं गराडा घातला; तिचा पाहरेकऱ्यांस हटवून तिचा हत्तीचा पायांजवळ तोडून टाकिलें, गोळ्या व बाण तिचा हौद्याचा सभोंवार येऊन दाट पडूं लागले, त्यांतून एक बाण शहरियाराची लहान मुलगी तिचा मांडीवर बसली होती तिला लागला. शेवटीं तिचा महात मारला गेला, आणि हत्तीचा सोंडेवर एक वार झाल्यामुळें तो निसटून नदींत शिरला, आणि लवकरच ओंड पाण्यांत बुडून ओघानें खालीं वाहत गेला. तो शेवटीं पुष्कळ गचकळ्या खाऊन पोहून तीरास पोंचला, तेव्हां नूरजहानचा दासी ओरडत ओरडत व शोक करित तिचा सभोंवार येऊन जुडल्या, आणि पाहतात तों तिचा हौदा रक्तानें भरला आहे, आणि त्या लहान मुलीस लागलेला बाण काढून तिची जखम बांधण्याचा कामांत ती गुंतली आहे. या लढाईचा गुल्लीमध्यें, शत्रूंचा मनांत नाहीं अशा ठिकाणीं त्यांचा छावणींत शिरून, बादशाहास घेऊन जाण्याविषयीं फिदाई खानानें पुनः यत्न केला, आणि तो इतका पुढें आला होता, कीं त्याचा गोळ्या व त्याचे बाण हे जहांगीर बसला होता त्या तंबूंत येऊन पडले; परंतु सर्व लश्कराचा मोड झाला, तेव्हां त्यास परत जाणें जरूर आलें. त्याप्रमाणें तो परत गेला, त्यांत त्यास वार झाले, व त्याचे पुष्कळ लोकहि मेले गेले. फिदाई हा रोठस नामें जवळचा किल्ल्याचा सुभेदार होता, तेथें तो लागलाच निघून गेला.

बादशाह कैदेंत असतां त्यास नूरजहान जाऊन मिळाली.

नूरजहान इणें पाहिलें तों बळजोरीनें आपला नवरा हातीं येण्याची आशा राहिली नाहीं; तेव्हां तो बंदीमध्यें असतां त्यास जाऊन मिळावें, आणि पुढें त्याची सुटका करण्याचा

दैवावर व आपल्या कसबावर भरवसा ठेवावा, असा तिणें निश्चय केला.

मोहबत खान याची सत्ता डळमळित होती.

याप्रमाणें मोहबत खान यास जाहिलम नदीवर जय मिळाल्यावर, असफ खान अटक एथें गेला होता तेथें तो चालून गेला. त्याची सत्ता चांगली बसून लश्करांतील बहुतेक लोकांनीं कबूल केली होती; शेवटीं असफ खान व जे दुसरे सरदार त्यास न जुमानून राहिले होते, त्यांस मोहबत खानास शरण जाऊन कैद कबूल करावी लागली. मोहबत खान याचा अधिकार मोठा व निर्भय असा जसा वाटत होता, तसा कांहीं नव्हता. जे त्याचे प्रतिस्पर्धी होते, त्यांशीं त्याची वर्तणूक दराऱ्याची व तापट होती, ती त्यांचा ह्रदयांत बिंबून गेली होती. तसेंच राजपूतलोकांचें मान वाढल्यामुळें लश्करांतील दुसऱ्या लोकांस राग आला होता, आणि सर्व सुभे अद्यापि बादशाहाशीं नेकीनें होते, व जहान्गीराचा मुलांपैकीं दोघे मोकळे होते, त्यामुळें मोहबतास जहान्गीराशीं मोठ्या तजविजीनें वर्तणूक करावी लागत होती, आणि, भीति न दाखवितां, व सक्ती न करितां, पोटांत शिरूनच त्यास आपलें कार्य साधून घ्यावें लागत असे.

जहान्गीराचें कपट.

जहान्गीरानें नूरजहान इचा शिकवणीनें, त्या वेळचा त्याचा स्थितींतील जेवढ्या गोष्टी त्यास अनुकूल होत्या, त्यांपासून झालें तितकें आपलें कार्य करून घेतलें: आपल्या नेहमींचा शितापीनें मोहबतखान याचें बोलणें कबूल केलेंसें ढोंग दाखविलें; असफ खानाचा मजवर विशेष जुलूम होता त्यांतून आतां सुटल्यामुळें मला आनंद झाला असें तो सांगूं लागला; आणि मोहबत

**खानास** इतकेंहि कपट करून सावध केला, कीं जसें माझें तुजविषयीं चांगलें मन आहे, तसेंच **नूरजहान** इचेंहि आहे असें तूं समजूं नको; आणि प्रसंगवशात् तुझे बेत मोडून टाकण्याकरितां लहान लहान बंडें होतील, त्यांविषयीं खबरदारी राख, अशी त्याणें **मोहबतास** कपटानें सूचना केली. याकपटांनीं **मोहबताचा** डोळ्यांस पडदे बांधले, आणि आपल्याजवळ बादशाह खऱ्या रीतीनें चालेल असें त्यास वाटून, लोकांचा मसलतींविषयीं त्याणें तितकी काळजी वाहिली नाहीं.

हीं कृत्यें चाललीं असतां, बादशाहाचें लश्कर **काबूलापर्यंत** जाऊन पोंचलें; त्या वेळीं त्या मुलुकांत **अफगाणलोक** नजीक असत त्यांपासून भीति असे, यामुळें बादशाहीहुजूरचा पाहरा वाढवावा लागला; ती संधि पाहून, त्या चाकरींत राहण्याविषयीं आपल्या हितेच्छु लोकांनीं कांहीं अंदेशा येऊं न देतां **मोहबत खान** यास अर्ज करावा, अशी **नूरजहान** इणें तजवीज केली. या वेळीं **जहान्गीरास** हत्तीवर बसून गोळीबार करण्यास जाण्याची परवानगी मिळाली होती; परंतु त्याचा सभोंवार सार्वकाळ **राजपूतलोकांचा** गराडा असे; त्यांत एक होता, तो जसा कांहीं पडसावलीसारिखा पादशाहास चिकटूनच राही, आणि कधींहि त्यास दृष्टीवेगळा होऊं देत नसे. याप्रमाणें एके वेळीं बादशाह फिरावयास गेला असतां, त्या बराबरील **राजपूतलोकांत**, व जी एक निवडक **अहदीनामक** एकांडे स्वारांची टोळी बादशाहाचा हुजूरांत हमेशा असे तींत, तंटा झाला. बादशाहाबराबरील लोकांत **राजपूतांचा** जमाव पुष्कळ होता, त्यामुळें त्यांणीं

राजपूतलोक, व बादशाहाचे पाहरेकरी, यांमध्यें कलह झाला.

अहदी लोकांचा पराभव करून त्यांतून पुष्कळांस मारून टाकिलें; त्यावरून त्या अहदी लोकांनीं मोहबत खानाजवळ फिर्याद केली. तेव्हां त्याणें जबाब दिला, कीं जा लोकांनीं गुन्हा केला ते अमुक, असें जर तुह्मी दाखवून द्याल, तर मी त्यांचें खुशीनें शासन करीन. हें त्याचें धरसोडीचें बोलणें ऐकून, अहदी लोकांस संताप आला, आणि आपले सर्व लोक जमवून ते राजपूतांचा एका टोळीवर जाऊन पडले, आणि त्यांतून पुष्कळांस मारून बाकीचांस पहाडांत पळविते झाले; तेथें हजारे लोकांनीं त्यांस धरून बंदीवान् केलें. या बखेड्यांत आपणावरहि शेकत्ये, अशी मोहबत खानास भीति वाटून, नाइलाजास्तव तो बादशाहाचा डेऱ्यांत येऊन आश्रयास राहिला. दुसऱ्या दिवशीं मुख्य दंगेखोर लोकांस मोहबतानें शिक्षा केल्या, तथापि त्या वेळापासून अहदी लोकांचें व राजपूतांचें उघड वैर पडून राहिलें; राजपूतांची संख्या कमी झाली, आणि जवळपासचे अफगाणलोक हेहि पादशाहास सामील होतील अशी त्यांची वृत्ति सर्व प्रकारें दिसून आली. त्यामुळें पूर्वींचा इतका अडथळा नाहींसा होऊन, व आपली मसलत लोकांस समजण्याचीहि धास्ति कमी होऊन, नूरजहान इला आपली मसलत चालवायास संधि सांपडली. चांगले मजबूद लोक दूर दूर अंतरावर ठिकठिकाणीं ठेवण्याकरितां, तिणें कारभारी नेमिले; आणि तेथून कित्येकांनीं जसें कांहीं चाकरीचा शोधास जातात तसें फुटून फुटून छावणींत यावें, आणि बाकीचांनीं आपआपल्या नेमलेल्या जागीं दुसरा हुकूम होईपर्यंत राहवें, अशी तिणें मसलत केली. नंतर

नूरजहानची मसलत व तयारी.

सर्व जाहगीरदारांचा लश्करांची हजीरी घ्यावी, असें जहान्गीराकडून सुचवविलें, आणि जेव्हां इला आपली फौज दाखविण्याचा हुकूम झाला, तेव्हां इतर रयतेची व माझी बरोबरी केली ह्मणून संतापल्याचें सोंग दाखवून ह्मणाली कीं, तर मग माझी हजीरी माझें नाक खालीं करणार नाहीं अशा रीतीची होई,अशी मी तजवीज ठेवीन. असें ह्मणून आपलें जुनें लश्कर थोडें आहे असें उघड दिसावें या हेतूनें तिणें त्या लश्करचा शिपाईलोकांस निराळ्या रीतीचे पोषाक दिले; आपल्या तैनातीचे लोक पुरे करण्याचा मिषानें नवे लोक ठेवले; आणि आपल्या लश्करचा भरतीस प्रांतांतील लोकांनीं दोन दोन तीन तीन असे येऊन फौजेंत मिळावें, असा त्याच वेळीं तिणें हुकूम केला. हें सर्व कृत्य पाहून मोहबत कांहींसा भयाभीत झाला, परंतु त्या वेळीं सक्ती करून शत्रूंचा मोड करण्याची त्याची शक्ति राहिली नव्हती; तेव्हां नूरजहान इचा तैनातींतील लोकांचा हजीरीचा वेळेस आपला जीव धोक्यांत न घालण्याकरितां बादशाहाचें ऐकून मोहबत हा त्याबरोबर गेला नाहीं. मग त्या फौजेचा तपास करण्याकरितां जहान्गीर एकटाच गेला. तो मध्यभागाचा सुमारास पोंचला नाहीं, इतक्यांत तिचा लश्करानें त्यास गराडा घातला; त्याचा सभोंवतील पाहऱ्याचा राजपूत घोडेस्वारांस कापून टाकिलें; नंतर त्यांस लवकरच त्यांचे साथी लोक मिळाल्यावर, बादशाहास पकडण्याचा यत्न करणें हें मोहबत खानास अशक्य झालें. त्या वेळीं आपली सत्ता जाऊन ती पुनः मिळण्याची आशा राहिली नाहीं, असें मोहबत खान यास समजलें. नंतर तो लागलाच आपल्या लश्करानिशीं

नूरजहान इणें जहान्गीराची सुटका केली.

तेथून पल्लंग्यावर गेला, आणि बादशाहानें आपणास क्षमा करावी, व आपल्या जीवास धोका न लागूं द्यावा, असें त्याणें बोलणें लाविलें.

या पराक्रमाचा योगेंकरून **जहान्गीर** पुनः मुक्त होऊन **नूरजहान** इला पुनः सत्ता प्राप्त झाली. विपत्तिकालामध्यें असतांहि तिणें आपले उद्देश सोडून दिले नव्हते, आणि हल्लीं तिचा भाऊ **मोहबत खाना**जवळ कैदेंत होता यामुळें त्याशीं सल्ला करणें तिला जरूर होतें; यास्तव एका शत्रूस क्षमा करून त्याचा द्वारें दुसऱ्याचा नाश करून घ्यावा, असा तिणें निश्चय करून, **मोहबत खाना**स सांगून पाठविलें, कीं जर तूं **शाहजहाना**बरोबर लढाई करण्याकरितां बादशाहाचा तर्फेनें लागलीच चाकरी पतकरशील, तर तुझी व बादशाहाची मी एकी करून देईन.

मोहबत खान याचें बोलणें कबूल केलें; तो प्रकार.

त्यास शाहजहानावर पाठविलें.

इकडे **शाहजहान** हा, **बादशाहा**स शरण आल्यावर, आणि **बादशाह मोहबत खाना**चा कैदेंत सांपडल्यावर, फकत हजार स्वारांनिशीं **दक्षिणें**तून **अजमीरा**स आला होता. मी जसजसा पुढें जाईन तसतशी माझी फौज वाढत जाईल अशी त्यास आशा होती; परंतु त्याचा मुख्य आश्रित राजा **किसणसिंग** हा **अजमीर** एथें मरण पावल्यामुळें, त्याला जे नवीन लोक येऊन मिळावयाचे ते राहून, होते त्यांतूनच निमे नाहींसे झाले; तेव्हां आपल्या देहाचा बचाव करण्याचा आतां एवढाच उपाय आहे असें जाणून, त्यास **अजमीरा**पलीकडील **वैराण** ओलांडून **सिंधे**मध्यें पळून जावें लागलें. त्या वेळीं त्याची अगदीं निराशा होऊन गेली होती,

आणि जर त्याचा शरीरीं कांहीं विकृति होती ती नसती, तर तो इराणदेशांत निघून गेला असता. परंतु यापुढें त्याचें नशीब उदयास येऊं लागलें; त्याचा भाऊ परवीझ हा बऱ्हाणपुर एथें मरण पावल्याचें वर्तमान त्यास लागलें; आणि मोहबत खान याचें व बादशाहाचें पुनः फाटून, पूर्वी तो आपला पाठलाग करण्याकरितां येत होता तें एकीकडेच राहून, त्याचाच पाठलाग करण्याकरितां बादशाहाची फौज गेली आहे, असें वर्तमान त्यास समजलें.

त्याचा व बादशाहाचा बेबनाव होऊन, तो शाहजहानास मिळाला.

या वरील गोष्टींनीं त्यास उत्तेजन येऊन तो गुजराथेंतून दक्षिणेंत जायास निघाला. इतक्यांत बादशाहाकडे न जातां याजवळ राहिलेली होती तितकी फौज घेऊन मोहबत त्यास मिळाला.

जहान्गीराचा आजारीपणा.

वर सांगितल्याप्रमाणें जहान्गीराची सुटका झाल्यावर तो लौकरच काबूलाहून परत लाहोरास आला. नंतर कांहीं वेळपर्यंत राज्याचा प्रत्येक खात्याचा पूर्ववत् बंदोबस्त करून, तो सर्व नीट झाल्यावर, दरसालप्रमाणें हा काश्मीरास जाण्याकरितां निघाला.

काश्मीर एथें पोंचल्यावर कांहीं वेळानें शहरियारास अतिशय दुखणें लागून त्यास काश्मीर सोडून परत लाहोरचा उष्ण हवेवर यावें लागलें. तो निघाल्यावर लवकरच जहान्गीराचा दमा पुनः अतिशय उचलला, आणि याचा जीवास धोका बसण्याचीं चिन्हें लवकरच दिसूं लागलीं. नंतर यास लाहोरास आणूं लागले, इतक्यांत डोंगरी वाटेमुळें व हालचालीमुळें याचें दुखणें फार होऊन

इ० स० १६२७, ता० २८ अकटोबर; हि० स० १०३७, ता० २८ सफ्फर. तो मरण पावला.

एकंदर मजलेचा एक तृतीयांश होण्यापूर्वींच ऐके दिवशीं मुक्कामास पोंचल्यावर लागलाच हा मरण पावला. त्या वेळीं याचें वय ६० वर्षांचें होतें.

अकबराचा वेळचे पुष्कळ मोठे लोक जहान्गीर मरण्याचा पूर्वीं नुकतेच मरण पावले होते. अझीझ हा मोहबत खानानें राज्य बळकाविण्याचा पूर्वीं मेला; मलिकंबर हा मोहबताचें बंड चाललें असतां मरण पावला, आणि मिर्झा खान ह्मणजे खानि खानान हा तें बंड मोडल्यावर मेला.

सांप्रत एशियाखंडांत तंबाकूचा प्रचार सर्वत्र आहे, तो जहान्गीराचा कारकीर्दींत नवीनच चालू झाला. ही नवाई बंद करण्याकरितां जहान्गीरानें एक ठराव प्रसिध्द केला. आतां बहुतेक पूर्वेकडील देशांत "टोबाको" या वनस्पतीची प्रसिद्धि 'तंबाकू' या नावानें आहे; तेवढ्यावरून तो अमेरिकाखंडांतून आणिला असें दिसून येतेंच; व या पादशाहाचा कारकीर्दींत त्याची प्रथम सुरुवात झाली, असें वरील गोष्टीवरून समजतें; ह्मणून जहान्गीराचा कारकीर्दींत जा मख्यात गोष्टी झाल्या त्यांत वर सांगितलेला ठरावहि लक्षांत ठेवण्याजोगा आहे.

# प्रकरण दुसरें.

## शाहजहान पादशाह.

### याचा कारकीर्दींत इ० स० १६५७ पर्यंत

### झालेलीं वर्तमानें.

असफ खान शाहजहानास मिळाला.

नूरजहान इचा सत्तेचा तिचा नवऱ्याबरोबर काळ झाला; आणि तिणें जा मसलती फार दिवस केल्या होत्या, त्यांचें फळ एका क्षणांत नाहींसें झालें. जेव्हां जहान्गीर वारला, तेव्हां तिचा प्यारा शहरियार हा तेथें नव्हता, आणि असफ खानाचा पूर्वींपासून शाहजहानास मदत करण्याचा निश्चय होता; ह्मणून त्याणें यास दक्षिणेंतून बलावून आणण्याकरितां लागलाच जासूद पाठविला. इतक्यांत इकडे आपलें करणें कायदेशीर दिसावें ह्मणून, त्याणें, खुशूरूचा मुलगा शाहजादा दावर यास, बंदींतून मुक्त करून, सिंहासनावर बसवून त्याचा नावानें द्वाही फिरविली. नूरजहान इणें शहरियाराचा पक्षास मदत करण्याचा यत्न केल्यावरून, तिचा भावानें तिला तूर्त अटक ठेविलें; तेव्हांपासून पुढें पुष्कळ वर्षें ती जीवंत होती;

त्याणें राणीस कैद केलें.

परंतु पुनः तिचें नाव इतिहासांत कधींहि आलें नाहीं.[1]

शहरियाराचा पराजय केला, व तो पुढें मारला गेला.

मग असफ खान पुढें लाहोराकडे चालला; त्या शहरांत शहरियार हा पूर्वीच होता. त्याणें सरकारी खजीना बळकाविला, आणि तेथील लश्करी लोकांस लांच देऊन आपलेसे केले. नंतर त्याचा चुलता मयत शाहजादा दानियल याचा दोघां मुलांशीं समेट करून, असफ खानाजवळ लढण्याकरितां तो बाहेर आला. त्या लढाईत त्याचा पराजय होऊन, तो बालेकिल्ल्यांत पळून गेला. नंतर त्याचा जवळचा लोकांनीं त्यास असफ खानाचा स्वाधीन केल्यावर, तो व दानियलाचे मुलगे हे सर्व शाहजहानाचा हुकुमानें मारले गेले.[2]

शाहजहान दक्षिणेंतून आला, आणि याचा नावानें आग्रा एथें द्वाही फिरली.

शाहजहान हा असफ खानाचें बोलणें लागलेंच मान्य करून मोहबत खानास बरोबर घेऊन दक्षिणेंतून

---

१ तिला दरसाल २५,००,०००, रुपयांची नेमणूक करून दिली होती आणि मरेपर्यंत तिचा मान राखित असत. जहान्गीर मरण पावल्यावर ती सफेत कपडे वापरित असे, इतर रंगांचे वापरित नसे; आणि तेव्हांपासून तिणें, ख्यालीखुशाली सोडून एकनिष्ठेनें आपल्या नवऱ्याचें स्मरण करून, आपलें आयुष्य घालविलें, असें दिसतें. पुढें इ० स० १६४६ ह्मणजे हि० स० १०५५ त ती मृत्यु पावली, तेव्हां, लाहोरास जहान्गीराचा कबरेजवळ दुसरी कबर तिणें बांधून ठेविलीच होती, तींत तिला पुरलें.

२ दावर शेखो ऊर्फ बोलाकी, जास पूर्वीं असफ खानानें बादशाह केलें होतें, तो संधि साधून इराणांत पळून गेला; तेथें त्यास इ० स० १६३३ मध्यें होलस्टैन वकीलांनीं पाहिलें होतें.

इ० स० १६२८ जान्यु-आरि, ता० २६; हिं० स० १०३७ जमादिउल्अखेर, चं० ७.

निघाला, आणि आग्रा एथें आल्यावर आपल्या नावाची द्वाही फिरवून रीतीप्रमाणें सिंहासनारूढ झाला.

असफ खान व मोहबत खान, यांस बादशाहानें अतिशय मोठ्या पदव्या दिल्या आणि आपले मित्र व आश्रित यांचे पगार पुष्कळ वाढवून, त्यांस पुष्कळ द्रव्य बक्षीस केलें. याणें साष्टांग नमस्कार घालण्याची शिस्त मोडली; साधारण पत्रव्यवहारामध्यें मुसलमानी चान्द्रमानाचें वर्ष पुनः सुरू केलें; आणि मुसलमानी धर्मास अनुकूल पडत असे कांहीं फेरफार केले. हे याणें प्रथमचे पराक्रम केले.

पुढें आपली सत्ता पक्की बसल्यावर शाहजहानानें आपण भोगलेल्या दुःखांचें व इजेचें उटें काढून घेतलें, आणि मोठमोठे वाडे व फार खर्च करून केलेल्या मेजवान्या जांची यास आवड होतीच, ती मनःपूर्वक तृप्त करून घेण्याचा उद्योग केला. याणें आपल्या मुख्य मुख्य शहरांमध्यें राजवाडे बांधले, आणि आपण गादीवर बसल्याचा पहिल्या वर्षदिवशीं काश्मीराहून तयार करून आणविलेले डेरे उभारिले. ते ठोकण्यास दोन महिने लागले असें याची हकीकत लिहिणारा वर्णन करितो. शिवाय याणें पैसा उधळण्याचा नवीन तऱ्हा सुरू केल्या. त्या अशाः— पूर्वी जवाहीर इत्यादि द्रव्याचा तुळा करण्याचा पाठ असे; शिवाय पुढें सांगितल्याप्रमाणें आपण धर्म केल्यानें आपणास संकटें येणार नाहींत, असा त्या वेळीं लोकांचा भोळा भाव असे, त्याप्रमाणें हा रत्नांनीं भरलेलीं भांडीं आपल्या मस्तकासभोंवतीं ओंवाळून, अथवा तीं रत्नें आंगावर ओतून टाकित असे, आणि या कार्यास लाविलेलें सर्व द्रव्य लागलेंच

जवळचा लोकांत उडवून देत असे, अथवा तें दुसऱ्या कोणास बक्षीस देत असे. त्या समयीं वांटलेला पैका, रत्नें, उमदे पोषाक, व उत्कृष्ट हत्यारें, हत्ती, घोडे, इत्यादि मिळून त्या समारंभासंबंधीं सर्व खर्च १,६०,००,००० रुपये होत असे; असें त्याच इतिहासकारानें वर्णिलें आहे.

प्रांतांमध्यें बखेडे.

एके वेळीं हे उत्साह चालले असतां, उझबेगलोकांनीं येऊन काबूलावर स्वारी केली तेणेंकरून याचा समारंभास विघ्न आलें. त्यांणीं सर्व देशाचा सत्यानास करून काबूल शहरास वेढा दिला; इतक्यांत बादशाहानें प्रथम थोडेसे लोक पाठवून मागाहून मोहबत खान यास फौजेनिशीं पाठविलें; तेव्हां ते लोक परत निघून गेले. या हल्ल्यानंतर नरसिंगदेव, जाणें अबुल् फझल् याचा खून केला, त्याणें बंड केलें, आणि बुंदेलखंडांत पुष्कळ दिवसपर्यंत बखेडा केला; शेवटीं खान जहान लोदी याचा मदतीनें मोगलांनीं त्यास जेर केलें.

मोहबत खान हा काबूलास जाण्याकरितां सरहिंदपर्यंत गेला होता; इतक्यांत उझबेगलोक परत गेल्याचें वर्तमान आल्यावरून बादशाहानें त्यास लागलेंच राजधानीस बलाविलें, आणि दक्षिणेंत जाण्याची तयारी करण्याविषयीं हुकूम केला.

खान जहान लोदी याची हकीकत.

वर खान जहान लोदी याविषयीं सांगितलें, तो एका नीच कुळांतील अफगाण होता. परंतु जसे हिंदुस्थानांतील अफगाणलोक असतात, त्यांप्रमाणेंच यामध्यें गर्व व बेकैदपणा होता. जहान्गीराचा कारकीर्दींत त्याणें दक्षिणेंत मोठीं लष्करी कामें केलीं होतीं; आणि पुढें शाहजादा परवीझ

मरण पावला, तेव्हां त्याचा हाताखालीं दक्षिणेंतील फौजेचा अधिपति हा होता, त्यामुळें याजकडे कुलमुखत्यारी येऊन, आपल्या किंवा कदाचित् सरकारचा हिताकरितां, त्या वेळीं निजामशाही सरकारचा मुख्य कारभारी मलिकंबराचा मुलगा होता त्याशीं तह करणें हें बरें समजून, शाहजहानानें घेतलेल्या मुलुकापैकीं जो कांहीं मुलुक अद्यापि मोगलांकडे राहिला होता तो परत देऊन, त्याणें आपल्या शत्रूंशीं तह केला.

जेव्हां शाहजहान गादीवर बसण्याकरितां दक्षिणेंतून जावयास निघाला, तेव्हां खान जहान, याबराबर जाणें नाकबूल करून माळव्यांत स्वारी करून गेला, आणि मांडूशहरास वेढा देता झाला; त्यावरून तो स्वतंत्र होण्याचा यत्न करित आहे असें दिसून आलें. जेव्हां शाहजहानास राज्य खचित मिळालेंसें झालें, तेव्हां तो पुनः बादशाहाचा हुकूम मानूं लागला; तेव्हां शाहजहानानें प्रथम दूरदृष्टीनें त्याचें काम त्याकडे कायम ठेविलें. नंतर कांहीं वेळानें त्यास दक्षिणेंतील सुभ्यावरून काढून माळव्याचें काम त्यास सांगितलें, आणि दक्षिणेंत मोहबत खानाची नेमणूक केली, आणि त्या वेळीं ती गोष्ट तितकीच ठेविली.

पुढें जेव्हां राजा नरसिंगदेवास जिंकण्यास त्याणें मदत केली, तेव्हां बादशाहानें त्यास दरबारांत बोलावून त्याचा मोठा सन्मान केला; परंतु त्यास दरबारांत येऊन फार दिवस झाले नाहींत, इतक्यांत तुझा नाश करण्याचा मसलतींत पादशाह आहे, आणि तूं बेसावध सांपडशील अशी तो संधि मात्र पाहत आहे, असा त्याचा कांहीं दोस्तांकडून त्यास इशारा पोंचला. ही सूचना खरी असो,

किंवा खोटी असो, परंतु खान जहान हा स्वभावानें संशयी होता; त्यामुळें ती गोष्ट त्याचा मनास लागली. तेव्हां तो बादशाहाकडे जाईनासा झाला, आणि तो राहत होता त्या महालासमोर आपले लोक जमावून आपणावर कोणी हल्ला केला असतां आपला बचाव करण्याचा तयारीनें राहता झाला. नंतर बादशाहाचें व त्याचें बोलणें लागलें तें नीट होऊन सर्व वैमनस्य नाहींसें झालें असें दिसलें; इतक्यांत कांहीं नवीन गोष्ट घडून आल्यावरून, खान जहानाचा मनांत पुनः अंदेशा आला. तेव्हां, जा लोकांवर आपल्याचानें विश्वास ठेववत नाहीं, त्यांचा ताब्यांत राहण्यापेक्षां, होईल तें होऊ, असा विचार करून त्यांचा ताब्यांतून सुटून जाण्याचा त्याणें निश्चय केला. नंतर एके रात्रीं अंधार पडल्यावर, आपलें सर्व लश्कर जमा करून, आपलीं बायका माणसें मध्यभागीं हत्तींवर बसवून, आपल्या २,००० शूर अफगाणलोकांनिशीं आपल्या मुलांपैकीं १२ असामी बराबर घेऊन उघडपणीं नगारे वाजवित तो आग्र्यांतून निघून गेला. त्यामागून दोन तासांचा आंत बादशाही स्वारांची एक मजबूद टोळी जाऊन तिणें लगट करून त्यास चंबळेवर गांठलें. त्याणें नुकतींच आपल्या कुटुंबाचीं माणसें पलीकडल्या तीरास उतरलीं होतीं. इतक्यांत त्याचा मागून पाठलाग करित बादशाहाचें मोठें लश्कर आलें. त्या लश्करानें पुढें गेलेल्या लोकांचा पाठलाग न करावा, ह्मणून त्याशीं त्यास युद्धप्रसंग करावा लागला. या लढाईत अफगाणलोकांचें व राजपूतांचा एका टोळीचें मोठें निकराचें युद्ध झालें; त्यांत आपल्या लोकांचा चालीप्रमाणें घोड्यावरून उतरून भाले

तो आग्र्याहून पळून गेला.

घेऊन त्यांणीं युद्ध केलें. त्यांत राजा पृथीसिंग राठोर व खान जहान यांचें स्वतः एकमेकांबराबर युद्ध झालें, त्यांत दोघांसहि जखमा लागून मग ते निराळे सरले. याप्रमाणें पुष्कळ वेळपर्यंत युद्ध करून शेवटीं खान जहान नदींत उडी टाकून पार पडून गेला. त्या वेळीं त्याचे कांहीं लोक बुडाले व कांहीं लढाईत मारले गेले. प्रथम त्याचा पाठलाग करण्यास बादशाही फौजेस धीर झाला नाहीं. पुढें त्यांस कुमक येऊन पोंचली, तेव्हां पुनः पाठलाग करण्याची त्यांस हिम्मत आली. तेवढ्यांत खान जहान हा पुढें निसटून बुंदेलखंडाचा रस्त्यानें गोंडवणचा ओसाड व जंगली मुलुकांत निघून गेला, आणि तेथून आपला जुना दोस्त अहमदनगरचा राजा याजवळ लवकरच बोलणें सुरू करिता झाला.

त्याची दक्षिणेंतील हकीकत.

हा बखेडा इतका मोठा वाढला, कीं तो मोडण्याकरितां स्वतः लढाईस जावें, असें शाहजहानास जरूर वाटलें. तेव्हां तो एक मोठी सेना घेऊन दक्षिणेंत आला, आणि स्वतः बऱ्हाणपुर एथें मुक्काम करून तेथून पुढें शत्रूचा मुलुकांत तीन टोळ्या,— किंबहुना तीन फौजा[३]— पाठविता झाला.

बादशाह त्यावर फौजेनिशीं निघून गेला.

इ०स० १६२९ अकटोबर हि० स० १०३९, रबीउल अवल.

तिकडील राज्यांची स्थिति.

त्या वेळीं दक्षिणेंतील तिन्ही राज्यांनीं पुनः आपल्या जुन्या सरहद्दींप्रमाणें मुलुक मिळविला होता. खान जहान याणें मुलुक परत

---

३ दरएक फौजेंत पन्नास पन्नास हजार लोक होते असें एतद्देशीय इतिहासकार वर्णन करितात.

देण्याचा ठराव केला असतां **अहमदनगरचा** किल्लेदारांनीं तो किल्ला **निजामशाही** सरकारचा स्वाधीन अद्यापि केला नव्हता; तो किल्ला आणि **खानदेशचें** पूर्वार्ध व त्याजवळचा वऱ्हाडप्रांतांतील प्रदेश, एवढाच मात्र मुलुक मोगलांकडे राहिला होता; त्या वेळीं दक्षिणेंतील अति मोठें राज्य **अहमदनगरचें** होतें. तें मोगलांचा मुलुकास लागून होतें. तेथील राजा **मुर्तिझा निजामशाह** यास मलिकंबरानें गादीवर बसविलें, असें पूर्वीं वर्णन आहे. पुढें मलिकंबर मरण पावला, तेव्हां पादशाहाचा मनांत आपला कारभार स्वतः करण्याचें आलें. तशांत मलिकंबराचे मुलगे आपल्या बापासारिखे बुद्धिमान् नव्हते. तसें नसतें तर **मुर्तिझा** नामधारीच राहिला असता. मुर्तिझा याणें मलिकंबराचा मरणानंतर, त्याचा वडील मुलगा **फत्ते खान** यास कामावरून दूर करून कैद केलें, आणि तो स्वतः कारभार करूं लागला; परंतु त्यामध्यें विशेष अक्कल नव्हती, त्यामुळें, राज्यामध्यें फळ्या पडून, शत्रूंचें फावलें.

मलिकंबर मेला त्याच सुमारास **विजापूरचा** राजा **इब्राहिम आदिलशाह** याचा काळ झाला. मरणसमयीं त्याचा मुलुकाची **अहमदनगरचा** राज्यापेक्षां बरीच बढती होती. त्याचा मागून त्याचा मुलगा **महम्मद आदिलशाह** हा गादीवर बसला. **गोंवळकोंडें** एथील राजा **अब्दुल्ला कुतुबशाह** हा बहुधा आपल्या शेजारचे तैलंगणांतील हिंदु राजे यांचा मुलुक घेऊन आपलें पोतें भरण्याचा उद्योगांत असावा, असें दिसतें. हा राजा दुसऱ्या मुसलमान राजांचा तंट्यांत पडला नाहीं.

शाहजहान बऱ्हाणपुरास पोंचे तों **खान जहान** हा

गोंडवणप्रांतांतून अहमदनगरचा मुलुकांत गेला होता, त्यामुळें मोगलांचा वरील फौजा त्या देशांत कूच करून गेल्या, आणि त्यांस त्या वेळीं गुजराथेकडूनहि कुमक आली. खान जहान व त्याचे दोस्त यांणीं या अचाट फौजेबराबर टकर मारण्याचे कांहीं यत्न केले; ते व्यर्थ गेल्यावर तो दक्षिणेकडे पळाला, आणि ठिकठिकाणीं फिरता राहून मोगललोकांचा हातांत सांपडला नाहीं. शेवटीं शाहजहानाचा सरदारांपैकीं अझीम खान नामें एक अति हुशार सरदार होता, त्याणें लागोपाठ मोठमोठ्या मजला मारून एके दिवशीं खान जहानाचा छावणीवर छापा घातला, त्याचें बारबरदारीचें सामान घेतलें, आणि त्याला पहाडांत व जंगलांत आश्रयाकरितां पळविलें; तेथें शत्रूंचा सर्व फौजेचा मारा त्यावर चालेना, त्यामुळें तो, जेव्हां चांगली संधि सांपडे तेव्हां लढाई करून, आपल्या शत्रूंस हटवी, आणि केव्हां केव्हां पल्लेदार व अकस्मात् कूच करित असे. याप्रमाणें तो मागें हटत हटत विजापुरास गेला.

*खान जहान यास मोगलांनीं अहमदनगरचा मुलुकांतून घालविलें.*

*अझीम खानानें त्याचा पाठलाग केला.*

तेथील राजा आपला पक्ष स्वीकारी, असा आपण त्यास मथवूं, अशी यास उमेद होती; परंतु महम्मद आदिलशाह अशा तंट्यांत पडण्यास अगदीं नाखुश होता. हें त्यास समजतांच नाइलाज होऊन तो पुनः अहमदनगरचा राजाचा मुलुकांत आला. दरम्यान अहमदनगरचा राजा मुर्तिझा निजामशाह यावरहि शत्रूंनीं सक्त लगट केला होता, आणि त्याचे दोन अति मोठे हिंदु सरदार त्यास

*खान जहान यास विजापुरचा राजानें आश्रय दिला नाहीं.*

सोडून जाऊन शत्रूंस मिळाले होते; तरी अद्यापि एक वेळ लढाई देण्याची त्यास हिम्मत होती. ह्मणून त्याणें आपली फौज दौलताबादेस जमविली, आणि जवळील खिंडीमध्यें मजबूद ठिकाणीं ठाणें धरून राहिला. त्याचा शत्रूंची संख्या विशेष होती, त्यामुळें जाग्याची अनुकूलता होती तरी त्याचानें टिकाव धरवला नाहीं. त्याचा पराजय झाला, आणि त्यास आश्रयाकरितां आपल्या किल्ल्यांत जाऊन राहवें लागलें. पुढें तो ठिकठिकाणीं हलक्या लढाया देऊं लागला; याप्रमाणें त्याचा दोस्तांचे पराजय झाले, त्यांचा मुलुकाचा नाश झाला, आणि शिवाय दुष्काळ व जरीमरी, हे अनर्थ प्राप्त झाले; असे त्यावर विपत्तीचे डोंगर कोसळल्यामुळें खान जहान याणें तो मुलुक सोडून जाण्याचा निश्चय केला, आणि तो पेशावराजवळ ईशान्येकडील अफगाणलोक त्या वेळीं लढत होते त्यांचा आश्रयास राहण्याकरितां जाणार असें ह्मणूं लागले. जरी असा त्याचा उद्देश असला, तरी तो त्याचानें तडीस नेववला नाहीं. कारण गुजराथेचा सरहद्दीजवळ नर्मदा उतरून सर्व माळवाप्रांत ओलांडून बंडावा करण्याचा उद्देशानें तो बुंदेलखंडांत गेला, परंतु तेथील राजा उलटा त्याजवर फिरून त्याचा पुष्कळ दिवसांचा खातरीचा व जिवलग दोस्त दर्या खान यास व त्याचा हाताखालचा पिछाडीचा फौजेस तोडून टाकिता झाला. पुढें त्याचाहि लगट करून मोगलांनीं त्यास गांठल्यावरून त्याणें आपल्याजवळचा घायाळ झालेल्या लोकांस पुढें रवाना करून दिलें,

त्याचा दोस्त अहमदनगरचा राजा याचा पराजय झाला.

नंतर खान जहान दक्षिणेंतून पळाला.

आणि त्याजवळ सगळे चार शें अफगाण बाकी राहिले होते त्यांनिशीं तो लढाईस उभा राहिला. त्या वेळीं तो जीवाची आशा सोडून फार वेळपर्यंत लढला; परंतु तें सर्व व्यर्थ जाऊन त्याचा टोळींतील कित्येक लोकांस मारिलें, व कित्येकांची वाताहत करून सोडिली; तेव्हां जीवास जीव देणाऱ्या अशा थोड्या लोकांनिशीं त्यास पळून जावें लागलें. नंतर त्याणें कालिंजरचा किल्ल्यांत धट्टाईनें जाण्याचा एलगार केला. त्या प्रसंगीं त्याचा मुलगा मरण पावून, शत्रूंनीं त्यास हटवून लाविलें. शेवटीं तो पळून जात असतां थकून, एका खडकाजवळ विसावा घेत होता तेथें त्यास मोगलांनीं गांठलें. तेथें त्याणें आपल्या नेहमींचा शौर्यानें युद्ध केलें, त्यांत पुष्कळ वार झाले, शेवटीं एका राजपूतानें त्याला आरपार भाला मारला, तेव्हां तो मरण पावला. नंतर त्याचें शिर ही बादशाहास मोठी आवडती भेट ह्मणून पाठवून दिली.

तो बुंदेलखंडांत मारला गेला. इ० स० १६३०, हि० स० १०४०.

अहमदनगराचरावर लढाई चालतच होती.

यामप्रमाणें निजामशाही सरकाराबरोबर वरील लढाईचें मूळ कारण जो खान जहान तो मरण पावला; तथापि ती लढाई संपली नाहीं.

दक्षिणेंत दुष्काळ व पटकी आली.

या सुमारास दक्षिणेमध्यें दुष्काळ पडून देश उध्वस्त झाला. प्रथम इ० स० १६२९ मध्यें वर्षाप्रमाणें पाऊस पडला नाहीं त्यामुळें दुष्काळास आरंभ झाला, आणि पुढें दुसऱ्या वर्षीं ( इ० स० १६३० मध्येंहि ) तसेंच अवर्षण पडल्यामुळें दुष्काळाची सीमा होऊन भयंकर परिणाम झाले: हजारों लोक परागंदा झाले; पुष्कळ लोक सुपीक प्रांतांत जाऊन पोंचण्याचा पूर्वीं मरून

गेले; अपार लोक जागचा जागीं मरण पावले; प्रांतांचे प्रांत ओसाड पडले, आणि हा जो धक्का पोंचला, त्यापासून पुन: सुधारून पूर्वस्थितीवर येण्यास कितीएक ठिकाणीं चाळीस वर्षेंहि पुरलीं नाहींत. या दुष्काळांत वैरणहि नाहींशी झाली, व सर्व गुरें मरून गेलीं. बहुधा दुसरे असे अपाय प्राप्त झाले ह्मणजे त्यांमागून जरीमरी येत असत्ये, तशी येऊन लोकांचा विपत्तीचा कळस झाला. हा संहार चालला असतां इकडे **अझीम खान** हा **मुर्तिझा निजामशाहा**-बराबर लढाई करितच होता; तेव्हां ही सर्व आपली दुर्दशा आपल्या प्रधानाचा मूर्खपणामुळें होत्ये, असें ह्मणून त्याणें त्यास कामावरून दूर केलें, आणि **मलिकंबराचा** मुलगा **फत्ते खान** यास मुद्दाम बंदींतून मुक्त करून प्रधानगिरी दिली.

आपल्या वंशपरंपरेचा शत्रूचें नाक चिरडल्यामुळें **विजापुरचा** राजा **महम्मद आदिलशाह** यास प्रथम आनंद झाला; परंतु पुढें जेव्हां **निजामशाही** राज्याचें वाटोळें होण्याचा समय जवळ आला असें दिसून आलें, तेव्हां आपल्या शेजाऱ्याचा अगदीं नि:पात झाला असतां आपणास त्यामध्यें खचित अपाय आहे असें समजून, **मोगलांची** वरील चाल पाहून त्यास भीति वाटली. यामुळें त्याणें **मोगलांबराबर** लढाई सुरू करून निजामशाही सरदारास कुमक आणिली; परंतु **मुर्तिझा निजामशाह** याणें जो अविचार केला, त्याचा परिणामापासून त्याचें रक्षण करण्याचा उपयोगीं ही मदत पडली नाहीं. कारण **फत्ते खान** मोकळा झाला, तेव्हां त्यास अलीकडचा उपकारांपेक्षां पूर्वीचा

विजापुरचा राजा येऊन अहमदनगरचा राजास मिळाला.

अपकारांचें विशेष स्मरण होऊन, आणि आपल्या बापाचा जो अधिकार होता तो आपणास मिळावा असा त्यास लोभ सुटून, मुर्तिझानें भरवशानें जी सर्व सत्ता त्यावर सोंपिली होती, तिचा त्याणें त्याचाच नाशार्थ योजना केली. तशांत मुर्तिझा बुद्धिहीन असून लोकांस आवडतहि नसे, त्यामुळें लवकरच फत्ते खानाचें प्राबल्य वाढून त्याणें त्या राजास व त्याचा मुख्य आश्रितांस मारून टाकिलें, आणि राज्याधिकार आपल्या हातांत घेतला. इतकें करून त्या वेळीं फत्ते खानानें लागलाच मोगलांस पुष्कळ करभार पाठवून शरण येतों असें बोलणें लाविलें, आणि एका मुलास गादीवर बसवून त्याणें शाहजहानाचा आज्ञेनें आपलें राज्य चालवावें, असें उघड रीतीनें जाहीर केलें.

अहमदनगरचा राजास त्याचा प्रधान फत्ते खान याणें मारिलें.

शाहजहानानें फत्ते खानाचें बोलणें लागलेंच कबूल केलें, आणि मग आपलें सर्व लश्कर विजापुरकरांवर चालविलें. इकडे फत्ते खान हा आपल्या कबूलातीप्रमाणें चालण्याची घालमेल करूं लागला, तेव्हां त्याजवर मोगलांनीं पुनः हल्ला केला. ह्मणून तो पुनः जाऊन विजापुरकरांचा पक्षास मिळाला. नंतर त्याचा व मोगलांचा पुनः समेट झाला; याप्रमाणें हा विश्वासघातकी व पाऊलबुद्धी असे, त्यामुळें वरील लढाई चालत असतां या प्रकारचे पुष्कळ फेरफार झाले.

आणि तो प्रधान बादशाहास शरण आला.

शाहजहानानें आपलें लश्कर विजापुराकडे पाठविलें.

या गडबडीमध्यें एके वेळीं विजापुरचा राजास त्याचा शत्रूंचा फौजांनीं हटविलें; तेव्हां त्यास आश्रयाकरितां आपल्या राजधानींत पळून यावें लागलें; तेथें एक त्याहून

मोठी फौज घेऊन येऊन असफ खानानें वेढा दिला; अशी त्याची जीवावरची वेळ आली असतां, जर त्यामध्यें बुद्धि, व चलाकी यांचें बळ नसतें, तर त्याची दशा फत्ते खानाप्रमाणें झाली असती; परंतु आदिलशाहानें एकीकडे आपली राजधानी रक्षण करण्याचा व शत्रूंस उपद्रव करण्याचा हर तऱ्हेनें यत्न चालविला; आणि दुसरीकडे आपण नाना प्रकारचा उत्तम रीतींनीं योजलेल्या मसलती काढून तो असफ खानास रिझवून त्याचें लढाइचें काम दिसगतीवर नेऊं लागला. तें असें, कीं केव्हां केव्हां तो स्वतःच तहाचें बोलणें लावी, आणि जास्ती लढाई करून नुकसानींत आल्याशिवायच मी बादशाहाचें बोलणें लागलेंच कबूल करतों असें मधाचें बोट लावी; केव्हां केव्हां याचे सरदार याकडून फितून गेल्याचें सोंग दाखवून आपल्या बंदोबस्तांचा मसलती असफ खानाजवळ करावयास लागत, अशी हा तजवीज करी; केव्हां केव्हां याचा लश्करावर असफ खानाचा हल्ला आला असतां कांहीं लोक यास सोडून मोगलांकडे जाण्याचें सोंग दाखवून त्यांवर जात; अथवा त्यांस फितूर झालों असें दाखवून आपल्या स्वाधीन असलेल्या किल्ल्यांत त्यांस घेऊन तेथें त्यांचा नाश करीत. याप्रमाणें त्याणें असफखानास अपाय केले. हा प्रकार चालला असतां असफ खानाचा छावणींत रोग व दुष्काळ, हे राज्य करित होते; त्यामुळें शेवटीं त्यास शहरचा वेढा उठवावा लागला. त्यानंतर विजापुरकरांचा जो चांगला मुलुक राहिला होता, तो याणें क्रूरतेनें उध्वस्त करून सूड उगविला.

विजापुरास वेढा दिला.

मोगलांनीं विजापुरचा वेढा उठविला.

या सुमारास दक्षिणेंतील सरसुभ्याचें काम मोहबत खान याजवर सोंपून शाहजहान दिल्लीस परत गेला. पुढें मोहबत खानानें लढाई चालवून फत्ते खानास दौलताबादचा किल्ल्यांत कोंडून टाकिलें; तेथें तो लढत राहिला होता, व त्यास केव्हां केव्हां विजापुरकरांकडून कुमक होत असे. या लढाईची अखेरी होईल त्याप्रमाणें निजामशाही राज्याचें दैव उघडणार असें दिसून येत होतें. पुढें सर्व दक्षणी लोकांचा फौजेनें किल्ल्याचा वेढा उठवण्याकरितां मोगलांबरोबर लढाई केली. तींत त्यांचा सर्व एकत्र झालेल्या सैन्याचा मोड होऊन, निजामशाही राज्याचा नशीबाची पारख झाली; पुढें लवकरच फत्ते खान शरण येऊन मोगलांचा चाकरीस राहिला; आणि त्याणें बसविलेल्या राजास मोगलांनीं कैद करून ग्वालेरचा किल्ल्यावर पाठवून दिलें.

बादशाह दिल्लीस परत गेला. इ० स० १६३२ मार्च हि० स० १०४१ रमझान.

इ० स० १६३३, फेब्रुआरि; हि० स० १०४२.

याप्रमाणें विजापुरचा राजा एकटा राहिल्यावर, त्याणें मोगलाशीं तहाचें बोलणें लाविलें. तें त्याचें नाकबूल झाल्यावर तो स्वसंरक्षणार्थ लढाई करितच राहिला, आणि मोहबत खानानें आपलें होतें तितकें सामर्थ्य खर्च केलें, तरी तो हारीं गेला नाहीं. इकडे मोगलांनीं पिरिंद शहरास वेढा दिला होता, तें काम फसल्यानंतर मोहबत खानास बऱ्हाणपुर एथें परत येऊन दुसऱ्यावर हात टाकणें मवकूफ करावें लागलें. यापूर्वींच बादशाहाचा दुसरा मुलगा शूजा हा वयानें लहान होता तरी त्यास याचावर नामधारी हुकमतदार करून ठेविलें होतें; सांप्रत मोहबत खानास

मोगलांची दक्षिणेंत चलती झाली नाहीं.

बादशाहानें परत दरबारांत बलावून, दक्षिणेंतील प्रांताचे दोन विभाग केले आणि तिकडील काम **खान दौरान** व **खान झमान** या सरदारांस सांगितलें.

परंतु या सरदारांचें पूर्वीचा प्रमाणें चाललें नाहीं. विजापुरचा राजा **महम्मद आदिलशाह** हा अद्यापि टिकाव धरून राहिला होता; **फत्ते खान** शरण आल्यावर **निजामशाही** राज्याची समाप्ति झालीसें दिसत होतें, परंतु पुढें **शाहजी भोंसला** नामें एका सरदारानें पुनः त्याचा उदयकाळ आणिला. या सरदाराचा वंशजांनीं पुढें **मराठी** राज्याची स्थापना करून मोठें नाव करावें असा ईश्वरी संकेत होता. **शाहजी भोंसला** हा **मलिकंबराचा** कारकीर्दींत मोठ्या पदवीस आला असून, त्याणें वरील लढायांत मोठी बहादरी केली होती. पुढें **दौलताबादेचा** किल्ला **मोगलांचा** हस्तगत झाल्यावर तो **दक्षिणेमधील** पश्चिमेकडील डोंगरी मुलुकांत निघून गेला; तिकडे कांहीं वेळानंतर फौज जमवून सामर्थ्य आल्यावर त्याणें **अहमदनगरचा** गादीवर एक नवीन आगंतुक बसविला आणि कालेंकरून समुद्रापासून राजधानीपर्यंत त्या राज्यांतील सर्व प्रदेश काबीज करून परत घेतला.

शाहजी भोंसल्यानें अहमदनगरचा राज्याचा जीर्णोद्धार करण्याचा यत्न केला.

याप्रमाणें **दक्षिणेंतील** मुलुक सर करण्याचा प्रथमचाच दिवस आला असें पाहून, तो घेण्याचा पुनः यत्न करावयास आपण स्वतः यावें असें बादशाहास जरूर दिसून आलें. नंतर तो इ०स० १६३५चा अखेरीस **आग्र्याहून** निघाला, आणि **दक्षिणेंत** आल्यावर पूर्वीप्रमाणें आपल्या लश्कराचे

बादशाह दक्षिणेंत परत आला. इ०स० १६३५, नोवेंबर;

हि० स० १०४५, जमादिउल् अव्वल्.

भाग पाडून त्यांस प्रथम अहमदनगरांचा मुलुक परत घेण्याकरितां पाठविता झाला. त्याचा फौजेनें शाहजीस सर्व मैदान मुलुकांतून पळवून लाविलें, आणि त्याचे पुष्कळ मुख्य मुख्य किल्ले घेतले; नंतर शाहजहानानें आपलें सर्व लश्कर विजापुरकरांवर लाविलें; त्यांचीं पुष्कळ मजबूद ठिकाणें घेतलीं; आणि पूर्ववत् महम्मद आदिल्शाहास राजधानींत कोंडून टाकिलें. पूर्वीं जशी मसलत करून त्या राजानें आपला बचाव केला होता, ती युक्ति या प्रसंगीं त्याचा ध्यानांत आल्यावांचून राहिली नाहीं. त्याणें विजापुरासभोंवती दहा कोशपर्यंत मुलुकांतील दाणावैरणीचा फडशा करून देश ओसाड पाडिला, विहिरी होरून टाकिल्या, आणि हौद आटवून टाकिले; याप्रमाणें आपल्या राजधानीवर हल्ला करावयास शत्रु आला असतां, त्याचा फौजेचा निर्वाह होणें अशक्य व्हावें, असा त्याणें बंदोबस्त केला, त्यामुळें मोगलांस त्याचा मुलुकांत शिरून लूट करावी लागली; त्या प्रसंगांमध्यें त्याचा टोळ्या हुशारीनें व शौर्यानें लढत असत, त्यामुळें त्यांस वारंवार नुकसान पोंचे. याप्रमाणें उभय पक्षींचे लोक लढाई करतां करतां थकून गेले, आणि आदिल्शाहानें प्रथम बोलणें लाविल्यावरून तह झाला. त्यांत त्याणें शाहजहानास वर्षास २० लक्ष रुपये खंडणी द्यावी, आणि तिजबद्दल निजामशाही राज्यापैकीं यास मोगलांनीं हिस्सा द्यावा असें ठरलें. तेणेंकरून याचा आवांक्याहून विशेष हितावह तह ठरला; आणि

विजापुरावंर दुसरी स्वारी केली ती फंसली.

विजापुरकरांशीं तह केला; इ० स० १६३६, हि० स० १०४६.

याचा राज्याची उत्तरेकडील व पूर्वेकडील सरहद्दहि पुष्कळ वाढली.

शाहजी हा यांहून कांहीं वेळ आणखी डोकें वर करून राहिला होता. परंतु शेवटीं तोहि शरण आला, आणि आपण बसविलेल्या आगंतुक राजास मोगलांचा हवालीं करून, शाहजहानाचा सल्ल्यानें विजापुरकरांचा चाकरीस राहिला.

शाहजी भोंसला शरण आला.

या स्वारीचा अवेलीसच शाहजहानानें गोंवळकोंड्याचा राजास भेवडावून त्याजकडून इराणचा पादशाहाचें नाव नमाजामधून काढून टाकवून नियमानें खंडणी देण्याचें कबूल करविलें होतें.

बादशाहानें गोंवळकोंडें एथील राजापासून खंडणी घेतली.

हीं कृत्यें संपल्यानंतर शाहजहान राजधानीस परत आला. याप्रमाणें शेवटीं अहमदनगरचें राज्य अगदीं समाप्तीस गेलें.

शाहजहान दिल्लीस परत गेला. इ० स० १६३७; हि० स० १०४६.

शाहजहानाचें लक्ष बहुत करून दक्षिणेंत गुंतून गेलें असतां, किंचित् हलक्या बाबदीचा कांहीं गोष्टी दुसऱ्या ठिकाणीं घडून येत होत्या. तो प्रकार:—कलकत्त्यानजीकचा हुगळी नामें पोर्तुगीस लोकांचा किल्ला बंगालचा सुभेदारानें वेढा देऊन घेतला. ( इ०स० १६३१. ) बुंदेले लोकांनीं बंडें केलीं, त्यांतून पहिल्या बंडांत नरसिंगदेवाचा मुलगा मारला गेला. पूर्वेकडील सरहद्दीवरचा फौजेपैकीं एका टोळीनें धाकटा तिबेट प्रांत याचा बंदोबस्त पुरा केला. ( इ०स० १६३४, व १६३६. ) त्या फौजेंतील दुसऱ्या एका टोळीनें श्रीनगर घेण्याचा यत्न केला. त्यांत तिचा पराजय

उत्तरहिंदुस्थानामधील बखेडे.

होऊन बहुत करून नाश झाला ( इ०स०१६३४ ); तिसरी टोळी बंगाल्यांतून कूचबहार नामें लहानशा संस्थानावर स्वारी करून गेली होती; तो देश तिचा हस्तगत झाल्यावर तेथील हवा खराब यामुळें लोकांस तो मुलुक सोडून द्यावा लागला ( इ०स०१६३७ ); याप्रमाणें वर्तमानें झालीं.

कंदाहार मोगलांस परत मिळाला. अलिमर्दान खान याविषयीं.

या गोष्टींतून कंदाहार प्रांत पुनः मोगलांचा हातांत आला ही मोठी सांगायासारखी गोष्ट झाली. तो प्रकार;— कंदाहारचा सुभेदार **अलिमर्दान खान** यास त्याचा यजमान इराणचा बादशाह याचा जुलुमामुळें इतकी धास्ती होऊं लागली कीं त्याणें कंदाहार शाहजहानाचा स्वाधीन केलें, आणि आपण आश्रयाकरितां दिल्लीस येऊन राहिला. त्याचा मोठा सन्मान करून बादशाहानें स्वीकार केला; आणि पुढें त्यास काश्मीर व

इ०स०१६३७, हि०स०१०४७.

काबूल या प्रांतांचीं केव्हां केव्हां कामेंहि सांगितलीं होतीं, व तसेंच कित्येक लढायांचा व दुसऱ्या कामांत त्यास घातलें होतें. त्याणें लोकोपयोगी कृत्यें करण्यामध्यें जीं आपली बुद्धि व कौशल्य, हीं प्रकट केलीं आणि त्याचप्रमाणें मेजवान्यांचा व समारंभांचा सर्व प्रसंगीं जी विचक्षणा व सफाई दाखविली तेणेंकरून दरबारामधील सर्व लोक त्याची प्रशंसा करूं लागले. मोठ्या कामांमध्यें त्याची नजर किती चांगली होती याविषयीं त्याचा नावाचा जो दिल्ली ऐथें एक कालवा आहे, तो प्रत्यक्षप्रमाणच आहे.

अलिमर्दान खान हा लढाऊ कामांमध्येंहि चतुर होता; त्यास पादशाहानें बल्क व बदकशान या

प्रांतीं स्वारी करावयास पाठविलें. तो प्रकार असा झाला. — बल्कू व बदकूशान हे प्रांत मिर्झा सुलेमानाचा हातांतून गेल्यानंतर उझबेगलोकांचा ताब्यांत राहिले होते. तेथें क्यास्पियन् समुद्रापासून ईमौसपर्वतापर्यंत वक्षुनदीपलीकडील सर्व देशाचा राजा इमाम कूली याचा धाकटा भाऊ नजरमहम्मद हा सत्ताधारी असे. नजरमहम्मदाचा मुलगा अब्दुल् अझीझ यास त्याचा बलाढ्य काकाची फूस मिळून त्याणें बंड केलें; तेव्हां शाहजहानास बरींच वर्षें फुरसूद सांपडली होती; त्यामुळें ही संधि पाहून आपल्या वंशजांचा त्या प्रांतावरील बुडालेला हक्क बजाविण्याचा त्यास लोभ उत्पन्न झाला. त्या कामास त्याणें अलिमर्दान खान यास पाठविलें; तो हिंदुकुशांतून जाऊन बदकूशानप्रांतांत लूट करिता झाला. परंतु पुढें हिंवाळा जडावत चालला, तेव्हां बर्फामुळें दक्षिणेंतील मुलुकाशीं आपला संबंध तुटेल अशी यास भीति पडली. त्यामुळें त्याचा हातून सांगायासारखा पराक्रम न होतां, त्यास परत यावें लागलें. दुसऱ्या वर्षीं राजा जगतसिंग[४] याणें या साहसास हात घातला. त्याचा हाताखालीं १४,००० राजपूतलोक होते. त्यांस त्याणें आपल्या मुलुकांत ठेवलेले असून पगार मात्र बादशाहाकडून पोंचत असे; त्याची भिस्त मुख्यत्वेंकरून त्यांवर होती. या प्रसंगवशात् पडलेल्या स्वारींत जसा राजपूतांचा पराक्रमाचा प्रकाश पडला, तसा कधींहि पडला नव्हता. त्यांणीं हल्ले करून पहाडी नाकीं घेतलीं; बर्फावरून

बल्क प्रांतावर स्वारी.

इ० स० १६४४, हि० स० १०५४.

हिंदुकुशपर्वतामध्यें राजपूतलोकांनीं केलेले पराक्रम.

---

(४) हा बहुधा कोटा संस्थानचा राजा असावा.

मोठमोठ्या मजला केल्या; शत्रूंवर हल्ले करण्याकरितां स्वतः मेहनतीनें सरहद्दीवर किल्ले बांधिले, (त्या वेळीं इतर लोकांप्रमाणें राजा स्वतः हातांत कुदळी घेऊन काम करित असे;) आणि त्या थंड देशांतील वारे वाव्हटळी मोठ्या निग्रहानें सोसून उझबेगलोकांनीं जे वारंवार निकराचे हल्ले केले ते हटविले.

इतकेहि प्रयत्न झाले, तथापि तें काम फार दुर्घट दिसून आलें. तेव्हां शाहजहानानें आपण स्वतः काबूलास जाऊन तेथून अलिमर्दान खानाचा हाताखालीं शाहजादा मुराद याजबरोबर मोठी फौज देऊन बल्कप्रांतांत पाठवावी असा निश्चय केला. ही स्वारी पुरी शेवटास गेली. मुराद यास नजरमहम्मद याचे कांहीं मुलगे येऊन मिळाले, व पुढें तोहि शरण आला; परंतु मुरादानें ती राजधानी आपल्या ताब्यांत घेतली नाहीं, इतक्यांत उभय पक्षांची पुनः फूट पडली; (त्यांत कांहीं मोगलांनीं बेइमानीपणा केला असावा असा थोडा संशय येतो.) त्या वेळीं नजरमहम्मद याजवळ टिकाव धरण्यासारख्या कांहीं जागा राहिल्या नव्हत्या, त्यामुळें त्यास पळून इराणांत जावें लागलें. तेव्हां शाहजहानानें ह्याही फिरवून त्याचा सर्व मुलुक आपल्या मुलुकांत मिळविला. परंतु हा मुलुक फार दिवस यास स्वस्थपणीं भोगावयास सांपडला नाहीं. कारण अब्दुल् अझीझ याणें वक्षूनदीचा पलीकडे फौज जमा करून मोगलांनीं नवीन घेतलेला मुलुक लुटून फस्त करण्याकरितां लुटारू

शाहजहान काबूलास गेला. इ०स० १६४५, हि०स० १०५५.

शाहजादा मुराद व अलिमर्दान खान यांणीं बल्क प्रांत सर केला इ० स० १६४६, जुलै; हि०स० १०५६ जमादिउल् अखेर.

तो प्रांत वक्षू नदीपलीकडील उझबेगलोकांनीं लुटला.

लोकांचा पुष्कळ टोळ्या पाठविल्या. या सुमारास शाहजहान दिल्लीस परत आला होता, आणि मुराद त्या कामास कंटाळून व अलीमर्दान खानाची आपणावर सत्ता नसावी याविषयीं उताविळा होऊन, बादशाहाचा परवानगीशिवाय आपला मुलुक सोडून गेला, ह्मणून त्याची अप्रतिष्ठा करून त्यास दरबारांतून काढून लाविलें होतें. यामुळें वरील बखेड्याचा बंदोबस्त करण्याचें काम शाहजादा औरंगझेब यास बादशाहानें सांप्रत सांगितलें, आणि आपण स्वतः त्यास मदत करण्याकरितां काबूलास निघून गेला. औरंगझेबानें उझबेगलोकांशीं लढाई करून प्रथम मोठा जय मिळविला; परंतु त्यापासून त्या बंडाच्या सफाईचा निकाल झाला नाहीं; इकडे अब्दुल् अझीझ याणें स्वतः वक्षूनदी उतरून मोगललोकांस इतका उपद्रव दिला, कीं जरी औरंगझेबानें कांहीं वेळ तलवार मारली, तथापि शेवटीं त्यास बल्क शहरामध्यें आपणास कोंडून घ्यावें लागलें.

बादशाहानें त्यांवर औरंगझेबास पाठविलें.

इ०स०१६४७, हि०स० १०५७.

त्यास बल्क एथें उझबेगलोकांनीं कोंडिलें.

या सुमारास नझरमहम्मद यास इराणांत मदत मिळाली नाहीं, त्यामुळें तो शाहजहानास शरण गेला. तेव्हां शाहजहानानेंहि पाहिलें, कीं इतक्या लोकांचा व द्रव्याचा नाश होऊन आपलें विशेष हित झालें असें कांहीं नाहीं; ह्मणून त्याणें शहाणपण करून या भांडणांतून मागें पाय काढण्याचा निश्चय केला; आणि त्यामध्येंहि

शाहजहानानें नवीन घेतलेला मुलुक सोडून दिला.

आपली विशेष अप्रतिष्ठा होऊं नये, ह्मणून त्या वेळीं आपल्या दरबारांत शरण आलेला जो **नझरमहम्मद** त्यास त्या मुलुकावरील आपला सर्व हक्क दिला; आणि त्याप्रमाणें, आपल्या ताब्यांत असतील तीं ठिकाणें **नझरमहम्मदाचा** हवालीं करावीं अशी **औरंगझेबास** आज्ञा केली. नंतर **औरंगझेब बल्क** एथून परत येण्याकरितां निघाला. त्या वेळीं **अब्दुल् अझीझाचा** पक्षाचे **उझबेग** लोक हे त्यावर एकामागून एक हल्लेच करित होते. जेव्हां तो **हिंदुकुश** पर्वतांत जाऊन पोंचला, तेव्हां लुटीचा आशेनें **हजारे** या जातीचे पहाडी लोक त्याचा पाठीस लागले. इतक्यांत हिंवाळा मोठ्या झपाट्यानें सुरू झाला, तेणेंकरून तर त्याची पुरी दुर्दशा झाली. शेवटीं तो शाहजादा थोड्या लोकांनिशीं **काबूलास** जाऊन पोंचला, तथापि त्याचा बहुतेक फौजेस बर्फानें अडविलें. नंतर तशा निराश्रित स्थितींत असतां त्यांजवर **हजारे** लोक हे एकसारखे हल्ले करित सुटले, त्यामुळें त्यांस फार इजा झाली आणि त्यांचें सर्व बारबरदारीचें सामान व बहुतेक घोडे इतकें लुटून गेलें, तरी ते लहान लहान टोळ्या करून पार पडून आले, आणि जीव बचावला ह्मणून खुशी झाले.

औरंगझेबाचे परत येतांना हाल झाले; इ० स० १६४७ चा अखेरीचा सुमारास; हि० स० १०५७.

याप्रमाणें बल्क प्रांत सोडून देऊन शाहजहानानें सल्ला करून टाकिला; परंतु इराणी लोकांनीं **कंदाहारावर** हल्ला करून तो सल्ला मोडून बखेडा केला. तो प्रकारः— **शाह सफी** या मूर्ख व जुलमी बादशाहाचा कारकीर्दींत, व त्याचा मुलगा दुसरा **शाह अब्बास** हा लहान असतां, **अलिमर्दान**

इराणी लोकांनीं कंदाहार पुनः परत घेतलें.

खानाचा फितूरीमुळें जो मुलुक मोगलांस मिळाला होता, तो त्यांस स्वस्थपणीं भोगावयास सांपडला; परंतु अब्बास मोठा झाला, तेव्हां आपल्या राज्याचा प्राचीन सरहद्दीपर्यंत पुनः मुलुक घेऊन आपल्या गादीचा प्रताप गाजवावा असें त्याचा प्रधानांनीं त्याचा मनांत भरून दिलें, त्यामुळें तो मोठी फौज जमा करून कंदाहारावर चढून गेला; आणि हिंवाळ्यामध्येंच त्याणें त्या शहरास वेढा दिला. त्याणें हें मोठें शहाणपण केलें, कारण त्या वेळीं मध्यें बर्फ पडल्यामुळें काबूल व हिंदुस्थान एथील वाटा बंद पडल्या होत्या, परंतु कंदाहारचा माफक हवेमुळें तेथें लढाई चालविण्यास त्यास कांहीं अडथळा आला नाहीं. इकडे पादशाहानें मोठ्या घाईनें औरंगझेब आणि वजीर सादुल्ला खान यास पंजाबांतून रवाना केलें, आणि तेहि पुष्कळ श्रम करून पहाडांतून रस्ता काढून गेले; तथापि वरील कारणांमुळें ते जाऊन पोंचत तों अडीच महिने वेढा देऊन इराणी लोकांनीं कंदाहार घेतलें होतें. नंतर यांचीहि फौज हिंवाळ्यांत कूच करतांना थकून गेली होती, त्यामुळें औरंगझेब व सादुल्ला खान यांस काबूल एथें राहून पुनः आपल्या फौजेची मरामत करणें जरूर आलें. इकडे इराणचा बादशाह कंदाहार एथें मजमूद लश्कर ठेवून हिरात एथें परत निघून गेला.

इ० स० १६४८, हि० स० १०५८.

इ० स० १६४९ चा मे महिन्यांत पुनः औरंगझेब फौजेनिशीं कंदाहारासमोर आला; आणि त्याणें लागल्याच तोफा सुरू केल्या. नंतर औरंगझेबाचे लश्करी लोक सुरुंग पाडूं लागले, व एकदम गर्दी करून हल्ले करूं लागले; तसेच

तें परत घेण्यास बादशाहानें औरंगझेबास पाठविलें. हि० स० १०५९, जमादिउल् अवल.

आंतीलहि किल्लेकरी लोक अकस्मात् येऊन मोगलांवर पडूं लागले; याप्रमाणें उभय पक्षीं झपाट्यानें लढाई चालू झाली. त्या वेळीं मोगलांचा वेढा उठविण्याकरितां शाह अब्बास याणें एक फौज पाठविली; तिला हटविण्याकरितां औरंगझेबानें एक टोळी पाठवून आपण शहरासमोर आपल्या छावणींत स्वस्थ राहिला; त्यामुळें त्याचा वेढ्याचा कामास अडथळा आला नाहीं. त्याणें जे लोक पाठविले, त्यांणीं इराणी लोकांस हटवून लाविलें, परंतु त्या इराण्यांनीं वेढा देणाऱ्यांचा वैरणीचा नाश केला, आणि त्यांजकडेस जी सामग्री वगैरे येत होती, ती वाटेसच पाडाव केली; त्या कामास मोगलांचानें प्रतिबंध करवला नाहीं. इकडे कंदाहारचा सुभेदार हाहि मोठ्या कुशलतेनें व हटाग्रहानें लढून शहर रक्षित होता, त्यामुळें शेवटीं वेढा देऊन तोफा सुरू केल्यापासून चार महिन्यांनीं औरंगझेबास वेढा उठवून काबूलास परत यावें लागलें. शाहजहान हा औरंगझेबामागून काबूलास आला होता, तो औरंगझेब परत येण्यापूर्वींच तेथून परत निघाला, आणि लाहोर एथें पोंचेपर्यंत त्यास गांठला नाहीं.

कंदाहारचा वेढा फसला. इ० स० १६४९, सेपटेंबरचा सुमारास. हि० स० १०५९ रमझान.

दुसरें वर्ष अगदीं रिकामें गेलें, त्या वर्षीं बादशाह चालीप्रमाणें काश्मीरास गेला होता; परंतु त्या रमणीय एकान्तवासामध्यें, मेजवान्या, नाच, बागबगीचे, मौज मारण्याकरितां जलक्रीडा, अथवा स्थलक्रीडा, व ( तेथील हवा व सुंदर प्रदेश यांमाफक ) अशाच दुसऱ्या मौजा; यांमध्यें पादशाह आपला

इ० स० १६५१, हि० स० १०६०.

काळ घालवित असे; तो कांहीं उद्योग म्हणावयाचा नव्हे.

दुसऱ्या वर्षीं बादशाहानें औरंगझेब व वजीर सादुल्ला खान यांस पुनः कंदाहारावर पाठविलें; त्यांजबराबर पुष्कळ व चांगल्या तयारीनिशीं सेना दिली, आणि वेढ्यासंबंधीं सर्व प्रकारचें काम चालविण्यास हत्यारें व लोक यांची चांगली तरतूद केली. एवढी मोठी तयारी झाली तथापि पूर्वीप्रमाणेंच ती फुकट गेली, आणि सादुल्ला खान याचें चातुर्य व शौर्य, आणि राजपूतलोकांचा पराक्रम, या सर्वांची पुण्याई खर्चून, औरंगझेबास काबूलास परत यावें लागलें. नंतर बादशाहानें त्यास दक्षिणेंतील सरसुभेदार करून पाठविलें.

औरंगझेबानें कंदाहारावर पुनः स्वारी केली.

इ० स० १६५२, हि० स० १०६१.

ती स्वारी फुकट गेली.

याप्रमाणें वारंवार मोड झाला, तथापि शाहजहानानें निराश न होतां, दुसऱ्या वर्षीं पूर्वींचाहिपेक्षां मोठी स्वारी करण्याची तयारी केली. बादशाह आपला वडील मुलगा दारा शेखो याचें मान दुसऱ्या मुलांपेक्षां विशेष ठेवित असे; तथापि त्यास दरबारांत राहून घेतला असे, त्यामुळें आपल्या दुसऱ्या भावांस बहादरी मिळविण्याचे प्रसंग प्राप्त होत, त्यांविषयीं हा हेवा करित असे, आणि त्यांतहि औरंगझेबाविषयीं तर त्याचा जसा कांहीं उपजतच दावा असे. या विचारांनीं उद्युक्त होऊन कंदाहार शहरास वेढा देऊन

शाहजादा दारा शेखो याणें केलेली मोठी स्वारी.

(५) एवढें मोठें लश्कर मुद्दाम वेढा देण्याकरितां जमाविलें असून त्याजबराबर तट पाडण्याचा तोफा फकत आठ व लहान लहान तोफा वीस एवढ्या मात्र होत्या; ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

आपल्या हुशारीची व नशीबाची परीक्षा पाहण्यास म-ला परवानगी द्यावी, ह्मणून त्याणें शाहजहानास विनंती केली. तेव्हां शाहजहानानें पूर्वींचा सर्व फौजांहूनहि अ-तिशय मोठी फौज याचा हवाली केली. ती फौज इसवी सन १६५२ चा हिवाळ्यांत लाहोर एथें जमा झाली, आणि दुसऱ्या वर्षाचा अवेलीस कंदाहार एथें जाण्यास कूच करून गेली. शाहजहान तिचा मागून चालीप्रमाणें काबूल एथें गेला होता.

इ० स० १६५३, हि० स० १०६३.

कंदाहारास पोंचल्यावर, जोशी यांणीं जो दिवस व जी घटिका नेमून दिली होती, आणि जिजविषयीं लश्कर निघण्यापूर्वींच बादशाहानें ठराव केला होता, त्या वेळीं औरंगझेबाप्रमाणेंच दारानें चर खणण्याचें काम सुरू केलें, आणि त्याबराबर फौजहि मोठीच होती, त्या मानानें कंदाहार शहरास वेढा देण्यास आरंभ केला. आपला गोळा शहरा-वर पोंचावा, ह्मणून त्याणें एक उंच पक्का मातीचा मोरचा बांधून, त्यावर दहा तोफा लागू केल्या. हें वेढ्याचें काम त्याणें आपल्या विलक्षण हिय्यानें चालविलें, आणि त्यांत या प्रसंगीं तर, आपला भाऊ औरंगझेब याविषयींची ईर्ष्या मनांत येऊन, त्याचा अंगीं अधिकच उत्साह चढला होता. त्याणें आपले सर्व सरदार जमा केले, माझा अब्रूचें रक्षण करावें ह्मणून त्यांस विनंती केली, आणि हें शहर घेतल्या-शिवाय मी एथून हालणार नाहीं, असें त्यांस सांगितलें. त्याणें सुरुंगांचें काम मोठ्या जारीनें चालविलें, आणि तटाजवळ कोणत्या रीतीनें जावें त्या वाटा दाखवून दिल्या. एके वे-ळीं किल्ल्यांतील लोकांनीं खुद त्याचा डेऱ्यावर तोफा लागू

कंदाहार शहरास मोगलांनीं वेढा दिला, तो प्रकार.

केल्या, परंतु याचा तोफा त्या तोफांस बंद पाडीत तोंपर्यंत हा आपल्या जाग्यावरून हालला नाहीं. याप्रमाणें त्याणें काम चालवून पुष्कळ वेळा गरदी करण्याचे यत्न केले. ते फुकट जाऊन आपलें काम लवकर साधत नाहीं अशी त्याची निराशा झाली; तेव्हां आपला पराजय व अप्रतिष्ठा होईल या भीतीनें तो अगदीं विरस झाला; दोन वेळा हटून गेलेल्या औरंगझेबाचा पायरीस मला आणूं नये, अशी त्याणें आपल्या सरदारांची विनवणी केली, आणि जादूगर व दुसरे धुतारे लोक यांचेंहि सहाय्य घेऊं लागला. त्या शेवटल्या लोकांनीं तर तें शहर अलौकिक साधनांनीं तुह्माला मिळवून देतों असें दारास कबूल केलें. अशा युक्तींची योजना झाल्यावरून या कामाचा शेवट चांगला होत नाहीं, असें भविष्य दिसून आलें. शेवटीं एके दिवशीं सूर्योदयापूर्वीं त्याणें जीवावर उदार होऊन त्या शहरावर शेवटचा हल्ला केला. त्यांत एकदां त्याचे लोक तटावरहि चढून गेले होते, असें असून तो हल्ला फसला; तेव्हां आपलें चांगलें चांगलें लश्कर गमावून, शहर घेण्याची सर्व आशा सोडून, वेढा उठवून जाणें त्यास भाग आलें. तो परत येत असतां त्यास इराणी व अफगाणी लोकांनीं त्रास दिला; त्यामुळें तो काबूलास येईपर्यंत त्याचें आणखीहि नुकसान झालें. मग काबूलाहून दारा लाहोरास आला. प्रथम बाबरानें हें शहर घेतलें, तेव्हांपासून तरी तेथें मोगलांचा अम्मल डळमळितच होता; तें शहर पुनः घेण्यास जो वरील शेवटचा उपाय मोगलांनीं केला, तो व्यर्थ गेला.

इ० स० १६५३, सेपटेंबर; हि० स० १०६३ शवाल, च० ९.

दाराशको पराजित होऊन परत आला. इ० स० १६५३ नोवेंबर; हि० स० १०६४, मोहरम.

इ० स० १६५३ चा अखेरीपासून इ० स० १६५५ पर्यंत; हि०स० १०६४ व १०६५.

यानंतर शाहजहानाचीं दोन वर्षें स्वस्थपणानें गेलीं. दक्षिणेंतील मुलुकाची पाहणी वीस वर्षेंपर्यंत चालली होती, ती तितक्या मुदतींत संपवून तोडरमल्लानें सुरू केलेल्या शिस्तीप्रमाणें जमाबंदी व वसूल करण्याची वहिवाट चालू करण्याचे हुकूम याणें दिले.

वजीर सादुल्ला खान मरण पावला.

त्याच मुदतींत सादुल्ला खान वजीर हा मरण पावला. यासारिखा अतिशय हुशार व प्रमाणिक प्रधान हिंदुस्थानामध्यें कधींहि होऊन गेला नाहीं. शाहजहानाचा कारकीर्दींत जीं सर्व वर्तमानें झालीं त्यांत हा पुढारी दृष्टीस पडतो, आणि औरंगझेबानें पुष्कळ वर्षें राज्य केलें त्यांतहि, याचा लोकांनीं कित्ता घ्यावा असा हा पुरुष होता, असें तो वारंवार आपल्या पत्रव्यवहारांत याचें वर्णन करितो. खाफी खान हा इतिहासकर्त्ता सांगतो, कीं सादुल्ला खान मेल्यानंतर १०० वर्षांचा सुमारें माझा वेळीं जे त्याचे वंशज होते त्यांचाहि सद्गुणांची व बुद्धिमत्तेची प्रसिद्धि असे, आणि त्या वेळचे दुसरे उमराव लोक हे जसे हतवीर्य व छचोर असत, तसे हे नसून मोठ्या संभावित रीतीनें वागत असत; असें तो त्यांचा व इतर मानकऱ्यांचा व्युत्क्रम स्थितींचें वर्णन करितो.

औरंगझेबानें दक्षिणेंत पुनः लढाई सुरू केली.

दुसऱ्या वर्षीं दक्षिणेमध्यें लढाई पेटून या स्वस्थतेचा हुर्डा वळावा, आणि तिचे कधींहि शमन न होतां, ती सर्व राज्याची राख करून टाकील तेव्हां तिचा शेवट व्हावा असा ईश्वरी संकेत होता, असें दिसतें. तो प्रकारः-वर सांगितल्याप्रमाणें पूर्वीं दक्षिणेंत

स्वस्थता झाल्यापासून गोंवळकोंड्याचा राजा अब्दुल्ला कुतुबशाह हा आपली खंडणी नियमानें देत असे. त्याणें शाहजहानाची मर्जी संपादण्याविषयीं आर्तता दाखविली होती, त्यामुळें त्यास उपद्रव देण्याविषयीं बादशाहाचा मनांत बहुधा कधींहि न येतें; परंतु कांहीं गोष्ट घडून आल्यामुळें त्यास यावर हात टाकण्याची इच्छा झाली.

ती गोष्ट अशी;- अब्दुल्ला कुतुबशाह याचा मुख्य वजीर मीर जुमला नामें होता. तो पूर्वी जव्हेरी असे, आणि त्यास सांप्रतचा मोठा हुद्दा प्राप्त होण्यापूर्वीच, त्याची संपत्ति मोठी व हुशारी फार, यामुळें सर्व दक्षिणेमध्यें त्याची प्रख्याति असून, लोक त्यास मान देत असत. त्याचा मुलगा महम्मद अमीन हा बदफैली, व व्रात्य स्वभावाचा होता. त्यामुळें त्यावर अब्दुल्ला कुतुबशाहाची इतराजी होऊन, मीर जुमलाचें व दरबाराचें त्या कारणानें वांकडें पडलें होतें. त्या वेळीं गोंवळकोंड्याचा राज्याचा पूर्वेकडील भागांत जी फौज होती तिजवर मीर जुमला सर होता. त्याणें, आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या राजापासून पाहिजे तसा बंदोबस्त करून घेण्याची आपली शक्ति नाहीं असें पाहून, मोगलांचा आश्रयास जाण्याचा निश्चय केला, व या हेतूनें त्याणें औरंगझेबास विनंती केली. शाहजहान व औरंगझेब यांची व त्याची पूर्वींचीच ओळख होती. औरंगझेब हा स्वाभाविकच मोठा मसलती असे, तेव्हां त्यास अशी हात घालण्याची संधि मिळाल्यावर त्याचा बुद्धीस दुर्निवार पाशच पडला, आणि मीर जुमला याचा गोष्टीकडे बादशाहानें रहिम नजर करावी ह्मणून

गोंवळकोंडें एथें औरंगझेबाचा मसलती. मीर जुमला याची हकीकत.

त्याणें मोठी मजबूद शिफारस केली. हा उपदेश मनांत भरून आपल्या प्रधानाचें गाऱ्हाणें ऐकून त्यास दाद द्यावी असा शाहजहानानें अब्दुल्ला कुतुबशाहास दराऱ्याचा हुकूम पाठविला; परंतु या गोष्टीनें आपल्या स्वतंत्रतेवर हल्ला झाला असें पाहून, अब्दुल्लास आणखी क्रोध येऊन त्याणें अमीनास बंदींत टाकिलें, आणि मीर जुमलाची सर्व मालमत्ता जप्त केली. तेणेंकरून शाहजहानास तसाच कोप येऊन, आपलें मागणें बाहुबळानें साध्य करावें अशी त्याणें आपल्या मुलास आज्ञा केली. असा परिणाम व्हावा, अशी औरंगझेब मोठ्या उताविळीनें वाट पाहतच होता; मग वरील हुकूम येतांच, मोठ्या उत्साहानें त्या कामांत शिरून आपल्या कपटी स्वभावास सर्व प्रकारें योग्य अशा रीतीनें तो तें काम तडीस नेता झाला. तो प्रकारः-

औरंगझेबानें विश्वासघातानें हैदराबादेवर हल्ला केला. इ०स० १६५६, जान्युआरि; हि०स० १०६६, रबी अल अव्वल.

औरंगझेबाचा भाऊ शाहजादा शुजा हा त्या वेळीं बंगालचा सरसुभेदार होता; त्याचा मुलीशीं आपला मुलगा सुल्तान महम्मद याचें लग्न करून देण्याकरितां त्याचा बराबर इतमामाकरितां बंगाल्यास जावयाचें आहे असें निमित्त करून, दुसरा कांहीं लढाईचा उद्देश बाहेर न दाखवितां, याणें त्याजबराबर एक निवडक फौज पाठवून दिली. तीस वाटेंत गोंडवणचीं रानें न लागावीं, ह्मणून औरंगाबादेवरून बंगाल्यास जावयास मच्छलीपट्टणाचा हेलपट्ट्याचा वाटेनें जावें लागलें. त्यामुळें सहजच गोंवळकोंड्याची राजधानी हैदराबाद तिजपासून थोडक्या पल्ल्यावर तो शाहजादा आला. त्याचा सत्कार करण्याकरितां अब्दुल्लाशाह मेजवानीचा

तयारींत आहे, तों अकस्मात् तो शत्रूप्रमाणें चालून आला तेव्हां तो राजा अगदीं बेसावध असल्यामुळें, त्यास शहरापासून तीन चार कोशांवर गोंवळकोंड्याचा पहाडी किल्ला आहे, तेथें पळून जाण्यास मात्र फुरसूद सांपडली. इकडे हैदराबाद मोगलांचा हातांत सांपडून, त्यांचें लश्कर कैदेंत येईपर्यंत सर्वत्र लूट होऊन अर्ध्या शहराचें जळून भस्म झालें. या पूर्वींच कांहीं खुसपट काढून औरंगझेबानें आपल्या सुभ्यांतील अति नजीकचा ठिकाणावर फौज जमा केली होती; आणखी माळव्यांतून फौज येऊन तीस मिळाल्यावर गोंवळकोंडें एथें कुमक पाठविण्यास त्याजवळ पुष्कळ लोक झाले. कांहीं वेळानें मीर जुमलाहि जवळ येऊन ठेपला, आणि आपल्या धन्याचेंच लश्कर घेऊन त्यावरच उलटण्यास तयार झाला. अब्दुल्लाशाह हा प्रथम किल्ल्यावर पळून गेला, तेव्हांच त्याणें महम्मद अमीनास मोकळा करून त्याचा जप्त केलेला माल सोडून दिला होता; नंतर योग्य रीतीनें बंदोबस्त होईल तसा करून घेण्याचें बोलणें लावण्याविषयीं त्याचानें झालें तितकें त्याणें केलें. इतकें करून एकीकडे विजापुरकरांकडून सहाय्य मिळविण्याविषयीं होईल तितका प्रयत्न करण्यास तो चुकला नाहीं. इतकेंहि केलें तथापि त्यास सहाय्य मिळालें नाहीं, आणि मोगललोक आपला हिंका घेऊन बसले, तेव्हां किल्ल्याचा वेढा बळजोरीनें उठविण्याचे पुष्कळ केलेले प्रयत्न फुकट गेल्यावर त्यास मोगलांनीं ठरविलेले सक्त करार शेवटीं कबूल करणें भाग आलें. ते असे कीं,- त्याणें सुलतान महम्मदास आपली मुलगी

गोंवळकों- ड्याचा राजा शरण आला.

देऊन कांहीं मुलुक व द्रव्य आंदण द्यावें, आणि वर्षास खंडणी देण्याची ठरावून, त्यांतून पहिला हप्ता एक कोटि रुपयांचा आतां द्यावा, आणि पूर्वींचा देण्याची बाकी दोन वर्षांत पुरी करून द्यावी.

इ० स० १६५६, मे; हि० स० १०६६.

शाहजहानानें याहून सोपे करार कबूल केले असते, आणि वास्तविक पाहूं जातां पुढें जे पैक्याचा बाबदींत करार होते त्यांत त्याणें पुष्कळ सूट दिली; परंतु बाकीचे अमलांत आणून औरंगझेब औरंगाबादेस परत आला. मीर जुमला हा पुढें मोगलांचा चाकरीस राहिला, आणि तो पुढें औरंगझेबाचा मोठा मर्जींतील वजीर होऊन, त्याचे महत्वाकांक्षी बेत तडीस नेण्यास अतिशय उपयोगी साधन झाला.

विजापुरकरांशीं निमित्ताशिवाय लढाई.

याप्रमाणें गोंवळकोंडें एथील बेत साधून त्यापासून फलप्राप्ति झाली नाहीं, इतक्यांत जवळचा विजापुरचा राज्यांतहि तसाच लाग साधून घ्यावा अशी औरंगझेबास संधि आली. तो प्रकार :— विजापुरकरांशीं जो शेवटचा तह झाला होता, तेव्हांपासून त्यांमध्यें कांहीं खलेल आलें नव्हतें. तेथील राजा महम्मद आदिलशाह याणें शाहजहानाचा बऱ्या प्रकारें स्नेह संपादन केला होता; परंतु दाराशेखो याची व त्याची विशेष लगत असे, यामुळें औरंगझेबाचा मनांत त्याविषयीं वैमनस्य आलें होतें. पुढें इ० स० १६५६ चा नोवेंबर महिन्यांत महम्मद आदिलशाह मरण पावून त्याचा मुलगा अल्ली हा गादीवर बसला. तो केवळ एकुणीस वर्षांचा होता; तेव्हां हा माजी राजाचा औरस पुत्र नव्हे,

आणि हें राज्य आपल्या मांडलिकांपैकीं, सबब गादीवर कोण बसवावा याविषयीं ठराव करण्याचा अधिकार आपला आहे, असें म्हणण्यास, (आपला मुलगा औरंगझेब याचा शिकवणीनें लोभाविष्ट होऊन,) शाहजहान प्रवृत्त झाला. त्या वेळीं विजापुरचें लश्कर कमी झालें होतें असें नाहीं; तथापि त्यांची लढाईची तयारी नव्हती, आणि त्यांतून बहुतेक फौज कर्नाटकचा हिंदु रजवाड्यांशीं लढायांत पल्ल्यावर गुंतलेली होती; त्यामुळें त्या देशावर हल्ला करण्यास औरंगझेबास फारसें जड पडलें नाहीं. तशांत कांहीं गोष्ट दैववशात् घडून येऊन सरहद्दीवरील बेदरनामक किल्ला त्याचा हातांत सांपडला, तेव्हां त्यास पुढें कांहीं हरकत न होतां तो राजधानीपर्यंत चालून गेला. पूर्वी जेव्हां हल्ले आले, त्या वेळीं, राजधानीजवळील देश ओसाड पाडून, आपलें संरक्षण करून घेण्याची मसलत यांस साधली होती; परंतु हा घाला अकस्मात् आल्यामुळें तोहि मार्ग खुंटला. तेव्हां दुसरा उपाय नाहींसा होऊन अति निकृष्ट ठराव कबूल करून तह करण्याविषयींचें बोलणें लावणें तेथील राजास भाग आलें. तेंहि बोलणें औरंगझेबानें मोठ्या उन्मत्तपणानें नाकबूल केलें, आणि तो लवकरच राजधानी व देश काबीज करून घेता; परंतु इतक्यांत एक गोष्ट घडून आली, ती परराज्यसंपादनापेक्षां त्यास विशेष अगत्याची होती; तिकडे त्याचें लक्ष लागून हा ग्रंथ इतकाच राहिला. ती गोष्ट कोणती याविषयीं पुढील भागांत सविस्तर वर्णन केलें जाईल.

इ० स० १६५७, मार्च; हि० स० १०६७.

# प्रकरण तिसरें.

## इ० स० १६५७ पासून शाहजहान पदच्युत होईपर्यंत झालेलीं वर्तमानें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें औरंगझेब दक्षिणेंत असतां शाहजहानास मोठें जीवावरचें दुखणें आलें; तेव्हां दाराशेखोचा हातीं त्याचा सर्व राज्याचा कारभार आला, आणि राज्यमुकुटहि लागलाच त्यास मिळतो अशी भीति पडूं लागली. असें झाल्यानें आपली पुढें बढती होण्याची सर्व आशा नाहींशी होणार, आणि जीवाचा बचावहि होण्याची पंचाईत पडणार असें पाहून औरंगझेबानें आपले प्रयत्न राजधानीकडे चालविले, आणि पुष्कळ वेळपर्यंत दक्षिणेंतील कारभारांतून आपलें लक्ष काढून घेतलें.

पादशाह अत्यावस्थ झाला.

शाहजहानास एकंदर चार मुलगे होते; ते सर्व परतंत्रता दुःसह होण्याजोग्या उमरीचे होते. दाराशेखो यास बेचाळीसावें वर्ष होतें; शुजा ४० वर्षांचा होता, आणि औरंगझेब ३८ वर्षांचा होता. अगदीं लहान मुलगा मुराद हाहि पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठमोठाल्या कामांमध्यें पडलेला होता.

त्याचा मुलांचे स्वभाव आणि मसलती.

दाराशेखो हा मोकळ्या मनाचा, व शूर शाहजादा होता. त्याची रीतभात संभावित, खर्च अघळपघळ, मतें निराग्रही, आणि वैर करणें, तर समोर; असा तो असे; परंतु मागें पुढें न पाहतां उडी घालणारा, आणि

दाराशेखो.

आपल्या आड कोणी आला असतां तें न साहणारा असा असे. तसेंच साधारण प्रपंचसुज्ञतेचे नियम हीं मूर्खत्वाचीं व कपटाचीं लक्षणें होत असें मानून तो त्यांस तुच्छवत् लेखित असे. त्याचा दराऱ्याचा स्वभावामुळें त्यास शत्रु पुष्कळ झाले, आणि त्याचा साहजिक अविचारामुळें, त्याचा पक्षाचा लोकांची संख्या कमी होऊन राहिलेल्यांचाहि त्याजवरील भरवसा कमी झाला. शुजा यामध्यें बुद्धि नव्हती असें नाहीं; परंतु तो मद्य आणि विषयसुख यांत रत झाला होता. औरंगझेब हा दाराशेखोचा भरपूर व्युत्क्रम होता. तो स्वभावानें नम्र, अंतःकरणाचा पाषाणवत्, सावध, कपटी, मतलबी, आणि ढोंग्यांचा केवळगुरु, असा असे. त्याची बुद्धि तीक्ष्ण व फडवाईकपणाची असे, परंतु त्याचे विचार विशेष दूरवर पोंचत नसत. तो मित्र जोडण्यास व शत्रूंची कृपा संपादन करण्यास सर्वकाळ टपलेला असे. या साधारण गुणांशिवाय त्यामध्यें मोठें शौर्य असे, व लष्करी कवाइतीमध्यें तो निपुण असे. त्याचा बांधा सुंदर होता, परंतु शरीर कसरतीचें नव्हतें; त्याची चालचर्या मनमिळावू व ढबदार आणि त्याचें भाषण रसभरित व मनोरंजक असे. दुसऱ्या सर्व गोष्टींमध्यें तो फार ढोंगी असे, यामुळें धर्माविषयींहि तो ढोंगीच असेल असा कोणी संशय काढितात. आतां त्याचा राजकीय कारभारांत त्याणें धर्माचें नाव पुढें करून त्यापासून आपलें पुष्कळ कार्य करून घेतलें; तथापि तो मनःपूर्वक हटाग्रही मुसलमान होता, ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यास शिकवावयास मोठे मख्यात धार्मिक मुल्लेलोक होते, आणि त्याणेंहि लाहानपणीं भक्तिमार्गाकडेस

शाहजादा शुजा.

औरंगझेब.

आपला कल दाखविला होता. एके वेळीं सर्व प्रपंच सोडून फकीराचा वेष घेण्याची त्याणें इच्छा प्रकट केली होती, आणि आमरणान्त स्वहितापासून दूर अशा पुष्कळ गोष्टींमध्यें, व कांहीं त्यास अतिशय विरुद्ध अशांमध्येंहि, त्याणें आपली धर्मावर वास्तविक श्रद्धा आहे असें दाखविलें. तो नमाज पढत असे, कुराण वाचित असे; धर्माविषयीं संवाद करी; विरक्ति दाखवी, ती इतकी कीं आपल्या हातांनीं मेहनत करून जें मिळेल त्यावर आपला निर्वाह चालवावा असाहि डौल घाली; तशीच आपल्या वर्तणूकेमध्यें नम्रता, कोणी त्रास दिला असतां त्याविषयीं सहनशीलता, आणि दुःखें प्राप्त झालीं असतां शांतता, अशीं यामध्यें असत. या गोष्टींवरून त्याची धर्माविषयीं उत्सुकता किती होती, हें दिसून येतें. तथापि आपल्या धर्माची वृद्धि करून मूर्तिपूजा व पाखंडमतें यांस तोडून टाकण्याविषयीं जे याचे सार्वकाल उत्कंठेचे प्रयत्न चालले असत, त्यांवरून, इतर सर्व गोष्टींपेक्षां चांगल्या रीतीनें, याची धर्माविषयीं आर्तता स्पष्ट होत्ये. परंतु इतकेंहि असून धर्म किंवा नीति हीं जेथें त्याचा लोभाचा आड येत, तेथें त्यांस तो क्षणभरहि उभीं राहूं देत नसे, आणि दुसऱ्या वेळीं जरी त्यास मनामध्यें अंदेशे येत असत, तथापि त्या वासनेची तृप्ति करण्यास जें घोर कर्म करावें लागे, त्याविषयीं तो मागें पुढें पाहत नसे.

त्याणें राजकीय कामांत जो धर्माचा उपयोग केला, तो त्या वेळीं धर्माविषयीं लोकांचा वास्तविक वृत्तींचें मान पाहून केला. अकबरानें जे फेरफार केले, तेणेंकरून बहुतेक मुसलमान खवळले होते; कारण साधारण लोकांस निराग्रही मताविषयीं साहजिकच अनावड असत्ये, तशी

त्यांस असून शिवाय अकबरानें आपल्या धर्मावर घाला घातला, असें त्यांस वाटत होतें. पुढें जहान्गीरानें पूर्वीचे संस्कार सुरू केले, तथापि लोकांची पूर्ण तृप्ति होण्याजोगी त्याचा कृत्यांत उत्साह उत्पन्न करण्याची शक्ति नव्हती. आतां शाहजहान हा जहान्गीरापेक्षां विशेष आर्त मुसलमान होता, तथापि दारा हा उघड अकबराचीं मतें पाळित असे, आणि हिंदु व मुसलमानी धर्मांचीं मतें यांचें एकीकरण करण्याविषयीं त्याणें एक ग्रंथहि लिहिला होता. यास्तव दाराचा धर्मावर अविश्वास आहे हें लिगाड त्याचा मागें लावून दिल्यानें जशी त्याविषयीं लोकांत अप्रीति उत्पन्न होईल, तशी दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें उत्पन्न होणार नाहीं, असें औरंगझेबानें निवडून काढलें, तें बराबर होतें; आणि आपण इस्लामी ( मुसलमानी ) धर्माचा रक्षक या स्वरूपानें त्याचा विरुद्ध पक्ष स्वीकारिल्यास, जसा आपणाविषयीं लोकांचा मनांत चांगला विचार उत्पन्न होईल, तसा दुसऱ्या कोणचाहि रीतीनें होणार नाहीं, असें त्यास वाटलें, हें नीटच होतें. अशा स्वरूपानें औरंगझेब वर्तू लागला, त्यामुळें शाहजादा शुजा यावर त्याची तार चढली; कांकीं शुजाची श्रद्धा शिया मताचा इराणी पंथावर असे, त्यामुळें आग्रही मुसलमानांस त्याविषयींचा त्रास असे.

मुराद हा शूर व उदार होता, परंतु त्याची बुद्धि मंद, व उद्योग,छचोर असत. तो अतिशय गर्विष्ठ व स्वेच्छाचारी असे, परंतु आपल्या तबियतीप्रमाणें चालावें, आणि विषयसुख भोगावें, यांहून विशेष मोठा त्याचा उद्देश नव्हता. शाहजादा मुराद.

---

( १ ) शाहजहानचा मुलांचा स्वभावाचें वरील वर्णन हें मूळ

शाहजहानाच्या मुलींविषयीं.

शाहजहानास वरील पुत्रांचा सहोदर अशा दोन कन्या होत्या; त्यांतून वडील **पादशाह बेगम** इजवर त्याची फार ममता असे. ही मोठी सौंदर्यवान् व बुद्धिमान् होती, आणि **दाराशेखो**चा पक्षास तिचा मोठा टेंका असे. दुसरी मुलगी **रोशनारा** ही इतकी सुंदर नव्हती, व तिचें वजनहि कमी होतें; परंतु ती मसलतीचा कामांत हुशार असे, आणि जनानखान्यांतल्या गुह्य गोष्टी तिला समजत, त्यामुळें आपला आवडता भाऊ **औरंगझेब** यास अतिशय सहाय्य करण्यास ती शक्तिमान् होती. याच शाहजादीनें वर्तमान कळविल्यावरून **औरंगझेबानें** सांप्रत आपला व्यूह रचिला.

बादशाहाचा हाताखालीं दारा कारभार पाहूं लागला.

या सुमारास शाहजहान हा सारा ६७ वर्षांचा झाला होता; तथापि त्याला आळसाची व ख्यालीखुशालीची सवय लागून त्याचें पुढें पुढें कामावरून लक्ष कमी झालें होतें, आणि त्याचा मागून गादीचा जाहीर वारीस **दाराशेखो** यावर,

बर्नियर नामें युरोपीयनाचा ग्रंथावरून घेतलें आहे, व त्यांत, खाफी खानाचा ग्रंथ व औरंगझेबाचा पत्रांतील कांहीं लेख यांवरून, जरूर दिसलें तेथें बदल केला आहे. शाहजहान असें ह्मणतो, कीं "दारा हा बुद्धिमान् सरदार आहे, आणि राजाचा अधिकारास योग्य अशी त्याची प्रौढी आहे; परंतु कोणाचाहि नामांकितपणा त्यास सहन होत नाहीं; यामुळें चांगल्यांस वाईट व वाईटांस चांगला असा जो आहे. शुजा हा शुद्ध मद्यपी आहे; आणि मुराद, खादाड, व विषयी आहे. औरंगझेबाची हातोटी व बुद्धिमत्ता मोठी आहे, व राज्यकारभाराचें गाडें ओढण्यास हा फार योग्य आहे; परंतु हा कपटांनीं भरून गेला आहे, यास्तव यास विश्वासु असा बहुधा कोणीच मिळावयाचा नाहीं." याप्रमाणें शाहजहानाचे त्याचा चार मुलांविषयीं अभिप्राय असत, असें "दस्तूरल अमलू आगाहि" या ग्रंथांत औरंगझेबानें आपल्या मुलास पत्र लिहिलें आहे त्यांत वर्णन केलें आहे.

जें काम आपण स्वतः करावयाचें नाहीं, तें तो सोंपित असे; त्यामुळें दाराचें विशेष वजन पडूं लागलें होतें. याप्रमाणें वर्तमान असतां बादशाहास अकस्मात् मूत्राशयामध्यें रोग झाला, आणि मूत्र अगदीं बंद झालें. तेणेंकरून त्याची काम करण्याची शक्ति अगदीं नाहींशी होऊन लवकरच त्याचा अंतकाळचा समय आला. या प्रसंगीं दारानें सर्व पत्रव्यवहार बंद केला, आणि बादशाहाचा अत्यावस्थेची बातमी देशावरावर प्रसिद्ध करण्याजोग्या सर्व पांथस्थ लोकांस अटकावून ठेविलें. असें केलें तथापि त्याचे भाऊ दक्ष होते, यामुळें त्यांपासून फार दिवस त्यांचानें ही गोष्ट छपावली गेली नाहीं. त्यांत मुख्यत्वेंकरून औरंगझेबास पुढें जो कलह चालला त्यांत त्याचा सर्व कृत्यांची कच्ची बातमी लागत असे.

इ० स० १६५७ अकटोबर; हि० स० १०६७ झिहाज, चं० ७.

या प्रसंगीं बंगालचा सरसुभेदार शाहजादा शुजा याणें प्रथम पाऊल टाकिलें, आणि आपल्या प्रांतांतील फौज जमवून राजधानीवर जाण्याकरितां लागलाच कूच करून बहारप्रांतांत गेला.

शुजाचें बंड.

गुजराथचा सरसुभेदार शाहजादा मुराद याणेंहि लवकरच त्याचा कित्ता धरिला, आणि प्रांतांतील खजिन्यांमधील सर्व द्रव्य बळकावून, सुरत एथील सुभेदार स्वतंत्र होता आणि त्या शहरांत द्रव्याचें पुष्कळ सांठवण होतें असें समजून, त्याणें त्यास वेढा दिला.

मुरादाचें बंड.

औरंगझेबानें विशेष सावधगिरीनें वर्तणूक केली. जसे शुजा व मुराद हे आपणास पादशाह ह्मणवूं लागले होते, तसें याणें केलें नाहीं. वरील वर्तमान लागतांच तो आपल्या उत्तरेचा सरहद्दीवर

औरंगझेबाचे सावधगिरीचे उपाय.

निघून गेला, आणि आपल्या फौजेची तयारी मोठ्या झपाट्यानें चालविता झाला. शेवटीं बादशाहाचा नावानें मीर जुमला, व दुसरे लश्करी सरदार यांणीं याचें पतक सोडून द्यावें, असे दाराकडून हुकूम आले, तेथपर्यंत याणें आपल्या मतलबाची उघडीक केली नाहीं. मीर जुमला

मीर जुमला याशीं त्याची मसलत.

हा मोगलांस येऊन मिळाल्यानंतर त्यास बादशाहानें राजधानीस बलावून त्याकडे कांहीं वेळ अतिशय मोठीं कामें सांगितलीं होतीं. पुढें त्यास दक्षिणेंत माघारें पाठविलें होतें, तथापि त्याचा कुटुंबाचीं माणसें अद्यापि आग्र्यास होतीं. त्यांची गति कशी होईल या भीतीनें पादशाहाचा हुकमाचा विरुद्ध चालण्याविषयीं तो कांकूं करूं लागला; परंतु औरंगझेबानें एक युक्ति सुचविली तेणेंकरून त्याचा मनाची व्यग्रता नाहींशी झाली.

ती अशी कीं पूर्वी ठरविलेल्या मसलतीप्रमाणें औरंगझेबानें मीर जुमला यास आपल्या दरबारांत बलाविलें; याणें प्रथम ढोंग करून दिसगती लाविल्या, आणि घाबरून गेल्याचें सोंग दाखविलें; नंतर औरंगझेबासमोर आला, तेव्हां याणें त्यास कैद करून दौलताबादेचा किल्ल्यांत अटकेस ठेवण्याचा हुकूम केला, आणि इकडे त्याचे मुख्य सरदार आपल्या धन्याचा गुप्त सल्ल्यानें औरंगझेबाकडेसच राहते झाले. नंतर वर सांगितल्याप्रमाणें दाराकडून हुकूम झाल्यावर, जरी याणें आपलें सोंग काढून टाकून वास्तविक स्वरूप प्रकट केलें, तरी आपल्या नेहमींचा शिस्तीप्रमाणेंच तो अद्यापि पुढें

औरंगझेब मुरादास मिळण्याकरितां निघून गेला.

चालूं लागला. दारा व शुजा हे भांडले असतां एकमेकांस बलहीन करितील त्यांत आपलें हित सहजच साधेल, या हेतूनें याणें प्रथम त्यांस एकीकडे सोडून दिलें आणि मुराद हा आपल्या

हातांत मिळाल्यास आपले उद्देश साधण्यास एक साधन होईल, या आशेनें त्याची मर्जी संपादण्याकरितां आपलें सर्व कापट्य हा योजिता झाला. याणें त्यास एक पत्र लिहिलें, त्यांत आपली अतिशय प्रीति दाखवून तुला राज्य मिळालें ह्मणून आपणास मोठा संतोष झाला असें दाखविलें; आणि जग सोडून, एकान्तवासांत ईश्वरभक्तीचें जें मला प्रेम आहे, तें पूर्ण करून घेण्याकरितां मक्का एथें जावें अशी माझी इच्छा आहे,असें दर्शविलें; तथापि त्या अधर्मी दाराशीं लढण्याकरितां मी मोठ्या उत्कंठेनें तुझें सहाय्य करीन असें त्यास सांगितलें; परंतु आपला बाप अद्यापि जीवंत आहे, याजकरितां आपण सर्वांनीं त्याचा भेटीस जावें, आणि जर आपला कृपेनें सत्कार झाला, तर त्याशीं कोणाचें बेशिस्त वजन चालूं देऊं नये अशी आपण तजवीज करून आपल्या कुमार्गवर्ती भावासाठी क्षमा मागण्याविषयींची आपण रदबदली करावी; दरम्यान जसवंतसिंग हा पाखंडी आपणावर युद्ध करण्याकरितां येत आहे त्याशीं लढण्याकरितां दोघांचा फौजा एकत्र करून जावें; याप्रमाणें उपदेशपर पत्र लिहिलें. अशा असंभाव्य सांगण्यानें मुराद ठकला जावा ही गोष्ट अविश्वसनीय दिसत्ये; परंतु ही युक्ति जरी हलकी व समजण्यासारखी होती, तरी तिचें स्वरूप मोठ्या कारागिरीनें झाकलें होतें. तशांत मुराद हा स्वाभाविक अंदेशेखोर नसून, त्याचा पक्ष दुर्बल होता, तेव्हां त्यास सहाय्याची विशेष अवश्यकता होती; यामुळें त्या लोभानें भुलून औरंगझेबानें एकसारख्या लाविलेल्या व्याजस्तुतीस त्याणें मनःपूर्वक कान दिला.

दारानें आपला बचाव करण्याचें केलेले बंदोबस्त.

यापूर्वीं दारानें आपल्या प्रतिस्पर्ध्यांचे जे हल्ले येणार, ते हटविण्याचा बंदोबस्त केला होता. मुराद व औरंगझेब यांवर नजर ठेवण्याकरितां, व जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें, आपल्या सर्व फौजेनिशीं अथवा त्या फौजेचा टोळ्या करून त्यांशीं लढण्याकरितां, त्याणें राजा जसवंतसिंगास माळव्यांत पाठविलें होतें; आणि त्याच वेळीं आपण स्वतः आग्र्यास जाऊन शुजास हटविण्याकरितां आपला मुलगा सुलेमानशेखो याचा मदतीस राजा जयसिंग देऊन त्यास फौजेनिशीं रवाना करिता झाला. इतक्या मुदतींत राज्याचा साधारण कारभार करण्याजोगा शाहजहान हुशार झाला होता; परंतु दुसऱ्या शाहजाद्यांनीं वाईट वर्तणूक केल्यामुळें दारावर त्याचा अधिकच भरवसा पडून गेला. शुजा यास आपल्या कामावर परत जाण्याविषयीं निक्षून आज्ञा केल्याचें त्याणें पत्र लिहिलें; परंतु हाहि हुकूम दारा शेखोचाच सांगीचा असेल असें शुजा ढोंग करूं लागला, आणि बादशाह बरा झाला याविषयींहि त्यास अद्यापि बहुधा अंदेशाच होता; ह्मणून तो पुढें चाल करित होता, तों काशीजवळ त्याची व सुलेमानशेखोची गांठ पडली. तेव्हां तेथें लढाई झाली, तींत शुजाचा फौजेची जरी वाताहत झाली नाहीं, तथापि तो पराजित होऊन त्यास बंगाल्यांत परत जावें लागलें.

इ०स० १६५७, नोवेंबर; हि०स० १०६८, रबी अल अव्वल चं० ४.

शाहजहान पुनः राज्य करूं लागला.

शुजा आग्र्यावर चढून आला.

त्याचा सुलेमानानें पराजय केल्यावर ते परत बंगाल्यास गेला.

इकडे औरंगझेब बऱ्हाणपुर सोडून माळव्यांत निघून गेला, आणि मुरादास जाऊन मिळाला; त्या दोघांचा मिळालेल्या फौजा, राजा जसवंतसिंग उज्जनीजवळ छावणी देऊन राहिला होता, त्याजवर हल्ला करावयाकरितां गेल्या. जसवंतसिंगानें क्षिप्रानदीचा कांठीं आपली फौज तयार केली; ती नदी त्या ऋतूंत बहुतकरून कोरडीच होती; परंतु तिचें पात्र खडकाळ होतें यामुळें अद्यापिहि ती मोठी भयानक दिसत असे. नंतर लढाई झाली तींत राजपूतलोकांस बाकीचा फौजेचें जरी पाठबळ नव्हतें, तथापि ते मोठ्या शौर्यानें लढले; परंतु शेवटीं मुख्यत्वेंकरून मुरादाचा पराक्रमानें त्या दोघां भावांस जय प्राप्त होऊन जसवंतसिंग हा अस्ताव्यस्त होऊन आपल्या मुलुकांत निघून गेला, आणि बाकीचा फौजेची वाताहत झाली. या वेळीं जसवंतसिंगाबरोबर कासिम खान ह्मणून दुसरा सरदार होता, तो फितूर झाला असें बर्नियर हा ग्रंथकार वर्णन करितो. ही लढाई झाल्यानंतर औरंगझेबानें जेव्हां आपल्या सरदारांस इनामें वांटलीं, तेव्हां मुराद हाच काय तो प्रतिष्ठेचें आद्य स्थान असें दाखवून याणें सर्वांस सलामीला त्याकडे पाठविलें. प्रथम जेव्हां हे दोघे भाऊ मिळाले, तेव्हां मी तुझा पक्ष स्वीकारीन अशी औरंगझेबानें मुरादाजवळ शपथ वाहिली होती, आणि सांप्रतहि तशीच गोडी व खरेपणा दाखवून त्याणें पुनः पुनः आणभाका केल्या. या सर्व लढाईमध्यें औरंगझेबाचा हुशारीमुळें सर्व कामाचा

इ० स० १६५८ मार्चअखेर; हि० स० १०६८ जमादिअलू अखेर चं० २.

इ० स० १६५८ एप्रिल; हि० स० १०६८ रजब.

औरंगझेब व मुराद यांणीं उज्जनी एथें जसवंतसिंगाचा हाताखालचा बादशाही फौजेचा पराजय केला.

इ०स० १६५८, मे; हि०स० १०६८ चं २७ रजब पासून चं०२५ शाबान पर्यंत.

वास्तविक अम्मल त्याचा हातांत असे; तथापि तो अद्यापिहि पूर्वीप्रमाणें भक्ति व नम्रता हीं बाहेरून दाखवित असे, आणि मुराद हा आपला श्रेष्ठ असें सार्वकाळ कबूल करून सर्व प्रसंगीं त्याचा अतिशय सन्मान करून, त्याची उजूतवाजू राखित असे. वरील जय मिळाल्यानंतर ते दोघे शाहजादे हळू हळू कूच करित, ग्वालेरीजवळ चंबळेवर येऊन ठेपले. तिजवरील मार्गाचें रक्षण करण्यास दाराशेखो याणें कांहीं तजविजा केल्या होत्या; परंतु त्या औरंगझेबाचा मसलतींनीं फुकट जाऊन, यांचें सैन्य हरकत न होतां नदी उतरलें.

शाहजहानास तंटा मिटण्याची काळजी लागली.

वर सांगितल्याप्रमाणें जसवंतचा पराजय होण्यापूर्वी आग्या एथील हवेची गर्मी शाहजहानास सोसेनाशी होऊन तो दिल्लीस निघून गेला होता; परंतु पराजय झाल्याचें वर्तमान पोंचल्यानंतर तो अगदीं नाखुश होऊन परत आग्र्यास आला. तेथें पाहतो तों आपण गेल्यानंतर मीर जुमला याचा मुलगा अमीन यास दारानें अटकेस टाकिलें; परंतु तें शाहजहानानें नापसंद केल्यावरून त्या शाहजाद्यानेंच स्वतः तो हुकूम फिरविला. या वेळीं शाहजहानाची प्रकृति क्षीण झाली होती, तथापि त्याणें आपले डेरे तयार करण्याचा हुकूम देऊन स्वतः लढाईस जाण्याचा इरादा केला होता. स्वतः गेलें असतां, जवळ असल्यानें व सत्तेचा बळानें, कांहीं बंदोबस्त आपल्याचानें करवेल आणि जा लढाईपासून आपणास व त्या लढाई करणाऱ्या पक्षकारांस पुष्कळ संकटें व अपाय झाल्याशिवाय राहणार नाहींत, अशी

लढाई टळेपर्यंत टाळावी, अशी त्याची इच्छा होती. परंतु त्याचा मेहुणा **शाहिस्ते खान** याणें सांगून हा त्याचा निश्चय मोडिला. जरी बादशाह त्याप्रमाणें करिता, तरी त्यापासून लश्करचा लोकांवर कांहीं ग्रह होता तर होता; परंतु त्या शाहजाद्यांवर कांहीं झाला नसता. कारण सर्व जण आपल्या चालण्याचा नियमांचा हद्दी सोडून फार दूर गेले होते. तेव्हां त्यांचानें परत पाऊल टाकण्याची मुस्कील होती, आणि शाहजहानाचा प्रकृतीचा क्षणाचा भरवसा नाहीं, अशी त्याची स्थिति झाली होती; यामुळें आपल्या रक्षणाची आशा त्याचा जीवितावर ठेवावयाजोगा, त्याचा भरवसा राहिला नव्हता. तशांत **दारास** तर सांप्रत मनःपूर्वक अधिकार मिळाला होता, तो जाऊन राज्याचा कारभार खुद बादशाहाचा ताब्यांत आल्यावर, नेहेमींप्रमाणें व्यवस्था चालू होईल, ह्मणून तशा बंदोबस्ताची **दारासहि** अप्रीति होती. या कल्पनेनें उद्युक्त होऊन, आणि आपणाजवळ पुष्कळ सैन्य आहे असा त्यास धीर येऊन त्या वेळीं आपला मुलगा **सुलेमान** हा बादशाही फौजेचा अति निवडक भागानिशीं **काशीहून** येत होता त्याचीहि वाट न पाहतां, आणि **शाहजहानानें** मोठ्या कळवळ्यानें आज्ञा केली तीहि न ऐकितां, तो आपली फौज घेऊन निघाला. तिची संख्या व तयारी पाहिली असतां ती फौज अनिवार अशी दिसे; परंतु वास्तविक पाहूं गेलें असतां तिचा अधिपति गर्विष्ठ, तींतील सरदार फितूर झालेले, आणि निवडक लढाऊ लोकांचें तींत दुर्भिक्ष्य; यामुळें

शाहजहानाचा इच्छेविरुद्ध दारा आपल्या भावांबराबर लढाई करण्याकरितां निघून गेला.

ती दुर्बल होऊन गेली होती.[२]

नंतर हि० स० १०६८, चं० ६ रमझानचा दिवशीं त्या दोनहि फौजा आग्यापासून एका मजलेवर समगड एथें जवळाजवळ आल्या. दुसऱ्या दिवशीं ते समोरासमोर तयारी करून राहिले. परंतु तिसऱ्या दिवसाचा सकाळपर्यंत लढाई चालू झाली नाहीं. नंतर तिसऱ्या दिवशीं सकाळीं दाराचा घोडेस्वारांपैकीं रुस्तुम खानाचा हाताखालचा एका टोळीनें प्रथम हल्ला करून लढाई सुरू केली. औरंगझेबानें आपल्या लश्करचा तोंडास सांखळदंडानें तोफा गुंतवून रांग केली होती; तींतून त्या टोळींतील स्वारांचानें वटावून जाववलें नाहीं. नंतर स्वतः दारानें पुढें होऊन दुसरा मोठा जबरदस्त हल्ला केला, परंतु तोहि व्यर्थ गेला; तथापि औरंगझेब मध्यभागीं होता त्या भागावर त्याणें पुनः हल्ला सुरू करून खंड पडू न देतां जारी ठेविला होता. इकडे मुरादावर तीन हजार उझबेगलोक येऊन पडले; त्यांणीं त्याजवर इतक्या वेगानें बाणांची वृष्टि केली, कीं त्यांचा समोर टिकाव धरण्यास त्यास मोठे आयास पडले. त्या हल्ल्यांत त्याचा हत्तीनें धर सोडला, तेव्हां त्याणें त्याचे पाय बांधून टाकून आपला मागें फिरण्याचा रस्ता बंद केला, नाहीं तर तो

इ० स० १६५८, जूनचा आरंभीं.

२ त्या फौजेंत आग्या एथें ७०,००० घोडेस्वार, व अगणित हत्ती व तोफा अशा होत्या, असें खाफी खान ह्मणतो. बर्नीयर हा ग्रंथकार बहुत करून एतद्देशीय लोकांचा गणतीवर जरी भरवसा ठेवीत नाहीं तरी वरील फौजेंत १,००,००० घोडेस्वार, २०,००० पायदळ व ८० तोफा इतक्या असाव्या असें त्याचें मत आहे. औरंगझेब व मुराद यांजवळ ३०,००० किंवा ३५,००० घोडेस्वार होते; अशी त्याची गणती आहे.

हत्ती रणभूमीवरून पळून गेला असता. हा उझबेगलोकां-बराबर जो मोठा खरमरित प्रसंग झाला, त्याहून विशेष भयंकर हल्ला त्याजवर आला. तो प्रकार असा:— कीं एक मोठा राजपूतलोकांचा जमाव इतक्या आवेशानें त्या शाहजाद्यावर तुटून पडला, कीं त्यांचा समोर कोणी टिकाव धरीना. त्यांचा राजा रामसिंग हा केशरी झगा घालून व मोत्यांचा शिरपेंच मस्तकीं धारण करून, मुरादाचा हत्तीवर धांवला, आणि हत्तीला बसविण्याकरितां महातास हाक फोडून आपला भाला शाहजाद्यावर फेंकता झाला. मुरादानें तो भाला आपल्या ढालीवर सांवरला, आणि तत्क्षणींच बाण मारून राजाचा शिरच्छेद केला[३]. तो मेल्यामुळें ते राजपूतलोक आणखी कोपायमान झाले, आणि मोठ्या निकरानें जीवाची आशा सोडून लढले; असे कीं त्या शाहजाद्याचा हत्तीसभोंवते त्यांचे ढिगांचे ढीग पडले. या वेळीं औरंगझेब आपल्या भावाचा मदतीस येण्याचा बेतांत होता, परंतु तो जेथें होता तेथेंच त्याला लवकर पुरेसें झालें. कारण शेवटीं दारानें त्याची तोफांची फळी फोडून भर झपाट्यानें त्याचा मध्यभागावर हल्ला केला, आणि आपल्या वेगानें व पुष्कळ फौजेचा योगानें आपल्या समोर कोणाचानें उभें न राहवेसें केलें.

त्या वेळीं औरंगझेब मात्र डगमगला नाहीं. जेथें अतिशय भय दिसे तेथें तो आपला हत्ती घेऊन जाई, आणि "ईश्वर आपणास सहाय आहे आणि आपणास दुसरा

---

३ शाहजहानाचा कारकीर्दीत बुंदी एथील राजा चतुरसाल हा प्रख्यात सरदार असून याच लढाईत मारला गेला; त्याणें हा हल्ला केला असें कर्नल टाड म्हणतो.

आश्रय किंवा पळून जाण्याचें ठिकाण नाहीं" असें तो ओरडून आपल्या फौजेस सांगत असे. ही लढाई भरांत आली असतां राजा रूपसिंग हा, आपल्या घोड्यावरून उडी टाकून औरंगझेबाचा हत्तीजवळ धांवत जाऊन, तलवारीनें त्याचा तंग कापूं लागला. त्याचा धीटपणा पाहून औरंगझेब चकित झाला, आणि एवढ्या अरिष्टाचा प्रसंगांत असतांहि त्याला मारूं नका ह्मणून तो आपल्या लोकांस बोलिला; परंतु त्याचा आवाज ऐकूं येई तों तो राजा पडून त्याचे तुकडे तुकडे होऊन गेले. या घातीचा वेळीं मुरादानें शेवटीं राजपूतलोकांस हटवून फौजेचा मध्याकडे आपलें लक्ष ठेविलें; तेव्हां आपल्या उजव्या बाजूवर हल्ला आला असें पाहून दारा याणें आपल्या समोरचा हल्ल्याचा वेग कमी केला. त्याचें लश्कर पुष्कळ होतें, त्यामुळें अखेरीस त्याचा जय झाला असता; परंतु तो आपल्या हत्तीवर बसून पुढें दाबित चालला होता, आणि आपल्या सर्व फौजेचा नजरेस पडून, तीस आपल्या बोलण्यानें धीर देत होता, व वारंवार हातवारे करून तीस पुढें सरसावण्याविषयीं स्फुरण आणित होता; इतक्यांत त्याचा हत्तीस शत्रूचा सैन्यांतून एक बाण लागून तो महातास जुमानीनासा झाला, तेव्हां त्यावरून उडी टाकून अति त्वरेनें घोड्यावर बसण्याखेरीज दुसरा उपाय त्यास नाहींसा झाला. तो दिसेनासा झाला तेव्हां दूरचा फौजेस अकस्मात् भीति पडून गेली, आणि तो घोड्यावर बसला असतां त्याचा बाणांचा भाता एक खिदमतगार त्याचा बाजूस अडकवित असतां गोळी लागून मारला गेला, त्यामुळें त्याचा अगदीं जवळचा लोकांतहि गोंधळ झाला. ती भीति पसरून तिचे परिणाम सर्व लश्करभर

लवकरच समजून आले. एशियाखंडांत एक पुढारी मेला ह्मणजे बहुधा लढाई फसली असें होतें; आणि कोणी लोकांत आंतल्याआंत फळ्या फुटून लढाई होत असली, ह्मणजे मुख्य सरदार नाहींसा झाला असतां तो पक्ष बुडून जातो, असें आहे. वरील प्रकार घडून आल्यानंतर तलवार मारणें हें निष्फळ आहे असें दिसून आलें, आणि आपण आपलें संरक्षण कसें करावें इकडे सर्वांचें लक्ष लागलें. जें लश्कर लढाईमध्यें गुंतलें नव्हतें तेंहि डळमळूं लागलें, आणि मध्यभागीं गोंधळ झाला असतां औरंगझेब व मुराद हे शाहजादे पुढें सरसावून त्यांणीं समोरचा लोकांस व दारा यासहि पळवून लाविलें.

याप्रमाणें जय खास मिळाला असें झालें तेव्हां औरंगझेब लागलाच गुडघे टेंकून ईश्वरानें आपणावर दया केली ह्मणून त्याचे उपकार मानिता झाला. नंतर लागलाच तो, आपल्या भावाला सलाम करून त्यास राज्य प्राप्त झालें ह्मणून, आपला संतोष दाखविता झाला. मुरादाचा हौद्यास कुंचासारखे बाण लागून गेले आहेत, आणि त्यास पुष्कळ ठिकाणीं वार झाले आहेत असें त्याणें पाहिलें. नंतर मुरादाचा जय झाला ह्मणून अतिशय आनंद दाखवून त्याचा तोंडावरचें रक्त पुसूं लागला, आणि त्याचा दुःखनिवारणार्थ अतिशय ममतेनें श्रम घेऊं लागला.[४]

हें रणभूमीवर चाललें असतां तो दुर्दैवी दारा आग्र्याकडे

(४) मुरादाचा हौदा हा फरुखशीराचा वेळापर्यंत मोठ्या तजविजीनें चमत्कारिक वस्तु म्हणून राखून ठेविलेला होता. तो त्या वेळीं खाफी खान याणें पाहिला; तेव्हां जशीं साळूला साळशिदें आंगभर असतात तसा तो बाणांनीं भरून गेला होता, असें तो वर्णन करितो.

पळून गेला, आणि तेथें दोन हजार स्वारांनिशीं सायंकाळीं पोंचला. त्याणें जी मोठी फौज नुकतीच नेली होती, तींतून एवढे कायते लोक आतां त्याजवळ राहिले होते, व त्यांनहि कांहीं घायाळ झाले होते. त्याणें बापाचा मताची अवगणना केली त्यामुळें असा त्याचा नाश झाला, ह्मणून तो त्यासमोर येण्यास लाजला. तो कांहीं आपल्या महालामधील मोलवान् वस्तु संग्रहास घेऊन आपली बायको व दोन मुलें यांसुद्धां दिल्लीकडे पळून चालला. तो आग्र्यापासून तिसऱ्या टप्पावर पोंचला होता, इतक्यांत त्याचा मदतीस शाहजहानानें ५,००० घोडेस्वार पाठविले होते ते येऊन त्यास मिळाले.

दारा दिल्ली एथें पळून गेला.

वरील लढाईनंतर तीन दिवसांनीं औरंगझेब आग्रा एथें गेला, आणि शहराबाहेर तटासमोर डेरे देऊन शहर ताब्यांत घेता झाला. आणखी कांहीं दिवस मध्यें गेल्यानंतर तो बादशाहाचा घरखटल्यांत हात घालूं लागला; दरम्यान त्याणें आपल्या बापास मोठ्या नम्रतेनें निरोप पाठविले, आणि जरूरीचा कारणास्तव मला असें करणें आलें असें बोलणें लावून मी आपला मान राखण्यांत व पुत्रधर्मांत कांहीं कमती करित नाहीं असें निश्चयपूर्वक कळविलें. आपल्या बापाची समजी करण्याविषयीं औरंगझेबाची मनःपूर्वक इच्छा होती, आणि तो आपल्या नावापेक्षां त्याचा नावानें अधिक खुशीनें राज्यकारभार चालविता; परंतु त्याचा भरवसा आपणावर पटे असें करणें व दारावरील त्याची प्रीति उडविणें हें अशक्य, असें त्याणें पाहिलें.

औरंगझेब आग्र्यामध्यें शिरला. इ० स० १६५८ जून; हि०स० १०६८, रमझान चं० १०

शाहजहान, दाराचापक्षास धरून राहिला.

रमझान चं० १७.

तेव्हां शेवटीं बालेकिल्ला पुरा आपल्या ताब्यांत घेण्याकरितां आणि बादशाहाबरोबर बाहेरील लोकांचा व्यवहार अगदीं बंद करण्याकरितां त्याणें आपला मुलगा महम्मदसुल्तान पाठविला. इतकेंहि झालें तथापि तो शाहजहानाचा अतिशय सन्मान ठेवित असे. पुढें शाहजहान ७ वर्षेंपर्यंत जीवंत होता, तथापि त्याची कारकीर्द एथें समाप्त झाली.

शाहजहानास त्याचा महालामध्यें नजरकैद ठेविलें.

एवढा सामर्थ्यवान् बादशाह असून तो पदच्युत झाला असतां त्याचा जुन्या चाकरांतून कोणीहि त्याचा वतीनें खबरदब केली नाहीं, हें विलक्षण दिसतें; परंतु वास्तविक पाहूं जातां शाहजहान हा विषयासक्तीमुळें बलहीन झाला होता, आणि त्याणें पुष्कळ दिवसांपूर्वीं फौजेबरोबर जाण्याचें सोडून दिलें होतें, त्यामुळें जे शाहजादे पुढारी होऊन लढत आणि जांचा प्रत्यक्ष हातामध्यें सर्व मानपान व इनामती देण्याचें असे. त्यांजकडे सर्व लश्करचा लोकांचे डोळे लागत. तशांत औरंगझेबाचेंहि सामर्थ्य विलक्षण असे. तो सर्व राजकीय कारभारामध्यें हुशार होता; परंतु त्यांतहि लोकांचा मसलती मोडून निरनिराळ्या पक्षांचा लोकांचे बंदोबस्त करण्यामध्यें विशेष कुशल होता; त्यामुळें असें झालें असावें.

नंतर मुरादाचें कांहीं कारण नाहींसें झालें, तेव्हां कांहीं तंटा व फिर्याद यांचें निमित्तहि नसतां औरंगझेबानें त्यास जो पोकळ राज्याधिकार दिला होता त्याजवरून त्यास बर्तर्फ केलें. ते दाराचा पाठलाग करण्याकरितां आग्र्याहून निघाले, तेथपर्यंत त्याणें आपल्या नम्र वर्तणूकेनें, व हमेशा देणग्या देऊन व तर्तूद ठेवून, त्या

औरंगझेबानें मुरादास कैद करून उघड रीतीनें राज्य धारण केलें.

भोळसर शाहजाद्यास तसाच झुलविला होता. पुढें एके दिवशीं त्याणें मुरादास खाण्याकरितां बलाविलें, आणि त्या वेळीं आपण अनमान न करितां दारूचा सुकाळ करून सोडिला; तेव्हां मुरादानें कांहीं मागें पुढें न पाहिल्यामुळें तो लवकरच बापुडा बेसावध होऊन पडला. तसें होतांच त्याचीं हत्यारें उतरून घेतलीं, त्यास त्याणें कांहींच हरकत केली नाहीं; नंतर त्यास बिड्या ठोकून सिलीमगड ह्मणून दिल्लीचा बालेकिल्ल्याचा एक भाग आहे तेथें हत्तीवर बसवून पाठविलें, आणि त्यास कोठें कैदेंत ठेविलें त्याविषयीं लोकांस भ्रांति पडावी ह्मणून तसेच लोक बराबर देऊन तसेच आणखी तीन हत्ती दुसऱ्या तीन निरनिराळ्या ठिकाणीं पाठविले. त्या वेळीं ग्वालेरचा किल्ला हा राजकारणाचे कैदी ठेवण्याची मोठी जागा असे, तेथें मुरादास पुढें पाठवून दिलें. नंतर औरंगझेब दिल्ली एथें गेला, आणि तेथें आपण बादशाह झालों अशी द्वाही फिरविता झाला. तो गादीवर बसल्यास एक वर्ष होईपावेतों त्याणें शिक्क्यावर आपलें नाव घातलें नाहीं व मुकुटहि धारण केला नाहीं; यामुळें त्याचा कारकीर्दीचा तारीखवारींत कांहीं गोंधळ झाला आहे.

इ० स० १६५८, आगस्ट ता० २०; हि० स० १०६८, झिकाद् चं० १.

शाहजहानाचा कारकीर्दींत हिंदुस्थानाची चढती कळा.

याप्रमाणें शाहजहानाची कारकीर्द निष्ठुरतेनें समाप्तीस गेली. याचा वेळीं जशी हिंदुस्थानदेशाची बढती झाली होती, तशी कोणत्याहि कारकीर्दींत नव्हती असें ह्मटल्यास चिंता नाहीं. याचा केव्हां केव्हां बाहेरचा लोकांशीं लढाया चालल्या असत, परंतु याचा राज्यांत बहुधा एकसारखी

स्वस्थता असे, आणि जशी याचा राज्यांत चांगली व्यवस्था असे तशी एशियाखंडांतील लोकांचा नशीबीं मिळणें विरळा.

शाहजहानास स्वस्थपणाची व ऐषआरामाची प्रीति होती; आणि काश्मीरास जाण्यायेण्यामध्यें व जा मोठमोठ्या प्रख्यात इमारती बांधण्याची त्यास हौस असे, त्या बांधण्यामध्यें जरी त्याचा इतका वेळ जात असे, तरी राज्याचा आंतील व्यवस्थेविषयीं तो कधींहि दक्षता कमी करित नसे; तेणेंकरून, व तो मोठ्या शहाणपणानें आपले प्रधान निवडित असे तेणेंकरून त्याणें आपल्या शिस्तींत ढिलाई पडूं दिली नाहीं, आणि दक्षिणेमधील पाहणीसारखे पुष्कळ चांगले बंदोबस्त सुरू केले. त्या वेळची उत्कृष्ट हकीकत लिहिणारा खाफी खान, हा आपला अभिप्राय असा लिहितो कीं अकबर हा मोठा योद्धा व कायदे करणारा होता, ह्मणून त्या रीतीनें तो श्रेष्ठ असो; तरी आपल्या मुलुकाचा व महसूलाचा बंदोबस्त, व व्यवस्था, आणि राज्यांतील प्रत्येक खात्याची चांगली वहिवाट, या कामांमध्यें शाहजहानाची बरोबरी करण्याजोगा असा हिंदुस्थानांत कोणी राजा होऊन गेला नाहीं.

आतां इतर पादशाहांचा कारकीर्दीशीं तुलना केली असतां, याची कितीहि चांगली असो, तथापि एकसत्ताक राज्यांमध्यें जे दोष साहजिक असतात, ते याचामध्यें नव्हते असें समजावयाचें नाहीं. महसूली अम्मलदार कांहीं तरी जुलूमजबरदस्ती करित असतील, व न्यायखात्याचे अम्मलदार थोडा तरी पक्षपात करित असतील, असें अनुमान करण्यास अडचण नाहीं; तसेंच जकातीकडील

कामगार जबरदस्ती करित असत, व प्रांतांचे सुभेदार मनःपूर्वक सत्ता चालवित असत, असें कित्येक युरोपीयन प्रवासी लोकांनीं पाहिलेलें वर्णिलें आहे, त्यावरून समजतें. असें असतां या सर्व सबबी ध्यानीं आणून त्यांपासून किती नुकसान व्हावें त्याचा विचार करून, तें वरील सुखाचा संचयांतून जरी वजा केलें, तरी बाकीवरून एवढी आपली खातरी होत्ये, कीं शाहजहानाचा कारकीर्दींत हिंदुस्थानांतील लोक फार सुखी व संपत्तिमान् होते.[५]

शाहजहानानें दिल्लीसारखी राजधानी वसविली, यावरून त्या वेळीं राजाजवळ व रयतेजवळ पुष्कळ दौलत होती, असें सिद्ध होतें. त्या वेळीं इस्फहानशहराचा महतीचा कळस झाला होता, असें असून त्यापेक्षां आग्रा हें निदान दुप्पट मोठें होतें, व त्यांत उत्कृष्ट सडका, चांगलीं दुकानें, व

५ टावरनीयरनामक एक युरोपीयन प्रवासी हा बहुतेक हिंदुस्थानांत पुष्कळ वेळा फिरला होता. तो असें वर्णन करितो, कीं "शाहजहान हा, राजाप्रमाणें आपल्या रयतेवर सत्ता करित होताअसें नाहीं; तर, जसा बाप आपलें कुटुंब व मुलेंबाळें यांशीं वर्ततो त्याप्रमाणें." तो ग्रंथकार पुढें त्याचा दिवाणी कामाचा सक्त बंदोबस्ताविषयीं स्तुति करितो, आणि त्यामुळें सर्व लोकांस स्वस्थता असे, याविषयींहि मोठा वर्णव करितो. पिएट्रो डेला व्हाली याणें इ० स० १६२३ मध्यें जहान्गीराचा कारकीर्दीचा अखेरीस ग्रंथ रचिला आहे; त्या वेळीं त्याचा मुलाचा कारकीर्दीपेक्षां मुलुकाची स्थिति वाईट होती, असें असून त्या वेळीं तो अशी हकीकत लिहितो कीं, "याप्रमाणें सर्व लोक बहुधा संभावित रीतीनें असतात, आणि इतर मुसलमानी देशांमध्यें जसे बहुधा राजे करितात तसे एथें पादशाह आपल्या रयतेवर खोटे वहमे आणित नाहींत, अथवा कोणी डामडौलानें वागत आहे व त्याजवळ पैसा पुष्कळ आहे असें पाहून त्यास लुटित नाहींत; तेणेंकरून, व तसेंच हिंदुलोकांचा अशा कुशाऱ्याकडे कल आहे यामुळें, ते निर्धास्तपणानें वागतात.

पुष्कळ हमामखाने, व उतारू लोकांचा जागा होत्या, असें **मांडेस्लो** हा युरोपीयन ग्रंथकार वर्णन करितो. पादशाहाचा राहण्याचा ठिकाणींच असा भरभराट असे असें नाहीं. अति दूरचा प्रांतांतील शहरांचीहि शोभा त्या वेळचे सर्व फिरिस्ते लोक वर्णन करितात, व जा प्रांतांमध्यें तीं शहरें असत ते प्रांत सुपीक व धान्यांनीं भरलेले असत, असें सांगतात.

हिंदुस्थानाची हल्लींची स्थिति जे पाहतात, त्यांचा मनांत एतद्देशीय ग्रंथकारांनीं या देशांतील पहिल्या भरभराटीचा स्थितीविषयीं अतिशयोक्तीनें वर्णन केलें असेल, असें येऊ; परंतु ओसाड पडलेलीं शहरें, धुळीस मिळालेले राजवाडे, होरून गेलेले पाण्याचे नळ, तसेच जंगलामध्यें मोठमोठे तलाव व धरणें, व राजरस्त्यांवरील मोडकळीस आलेले पूल, विहीरी व धर्मशाळा, हीं जीं आपण प्रत्यक्ष पाहतों, त्यांवरून त्या वेळचा प्रवासी लोकांनीं जें सांगितलें आहे त्याशीं हा पुरावा मिळून, त्या इतिहासकारांनीं जी स्तुति केली आहे, ती वास्तविक कारणांमुळें केली आहे, अशी आपली खातरी होत्ये.

त्या वेळीं तरी सर्व हिंदुस्थान देशाची एकसारखी स्थिति होती असें नाहीं: मोठमोठाल्या प्रांतांत अद्यापि रानें लागलेलीं होतीं, व पहाडांमधून जंगली व लुटारू लोक पुष्कळ ठिकाणीं राहत असत; चांगल्या साफ झालेल्या, बुंदेलखंडासारख्या, प्रांतांतूनहि शाहजहानाचा कारकीर्दीत ताब्यांतील राजे लोक केव्हां केव्हां बंडें करीत; परंतु तीं लहान लहान प्रांतांत असून भरवस्तीचा मुलुकांत त्यांची दादहि नसे.

शाहजहानासारखा डौलदार बादशाह हिंदुस्थानामध्यें झाला नाहीं. त्याचा परिवार, व त्याचा राज्यांतील नेमणूकी लोक, त्याचा देणग्या व त्याचा दरबाराचा सर्व डामडौल, हीं पूर्वीचा बादशाहांचा वेळेसच अतिशय झालीं होतीं, तथापि त्याहूनहि याचा वेळीं फार वाढलीं. या खात्यामध्यें जो त्यास खर्च लागत असे, त्यामुळें त्याची लोकांवर जास्ती सक्ती होत नसे, व त्याचा खजीन्याचीहि धांदल होत नसे, एवढीच काय ती यामध्यें दोष कमी करण्यास जागा आहे. याणें एक मयूरासन करविलें, तें याचा डामडौलाचें व उधळेपणाचें विलक्षण प्रतीक होय. त्याचें नाव मयूरासन पडण्याचें कारण, तें पुष्कळ हिरे व जवाहीराचें मोठें अवडंबर रचून त्यांत मुख्य मोराची शोभा असे; तो मोर सर्व जवाहीराचा केलेला असून त्याचा पिसारा पसरलेला असे, आणि जसे स्वाभाविक पिसांचे रंग असतात, त्याप्रमाणें नीळ, पाच, व माणकें हीं व दुसरीं योग्य रत्नें यांचें काम करून तसे रंग उठविलेले होते. तें सिंहासन जो पाही, तो दिपावून जात असे. टावरनियराचा धंदा जवाहिऱ्याचा होता; असें असून तो कांहीं जाहीर बेभरवसा न दाखवितां असें सांगतो, कीं तें सिंहासन करावयास साडेसहा कोटी जवळजवळ रुपये लागले, असें लोक ह्मणत असत.

शाहजहानाचा दरबाराची शोभा.

सर्व गोष्टींपेक्षां त्याला इमारती बांधण्याचा अतिशय शोक होता. त्याणें बराबर बेत बसवून, जुन्या शहरांहून अतिशय शोभायमान असें दिल्ली एथें नवें शहर वसविलें; त्यांत तीन मोठे रुंद रस्ते बांधले होते; त्यांतून एक अतिशय लांब असून त्याचा

त्याणें बांधलेल्या इमारती.

बाजूनें काळव्याची व वृक्षांची शोभा असे, आणि त्या रस्त्याला दुकानांचा हारी लागलेल्या असून, त्यांवरून दिसणाऱ्या अशा घरांचा रांगा असत. या तिन्ही रस्त्यांचा शेवटीं एक मैदान होतें, त्याचा मध्यभागास यमुनानदीचा कांठीं पादशाहाचा तटबंदी राजवाडा असे; त्यांतील संगमरमरी दगडाचे बांधलेले मोठमोठे महाल, बसायाचा जागा, व सोनेरी घुमट, यांचें पुष्कळ ग्रंथकारांनीं अतिशय उत्साहानें वर्णन केलें आहे. त्याच शहरांतील जी मोठी मशीद आहे, तिचें सौंदर्य व शोभा हीं विलक्षण आहेत.

ताजमहाल.

शाहजहानानें आग्रा एथें ताजमहालनामक एक कबर बांधिली आहे; तिचा सारखी त्याची एकहि दुसरी इमारत नाहीं. ती एक पांढऱ्या संगमरमरी दगडाचा मोठा नकासगिरीदार कबरच आहे. उंचा सामानाची व अव्यंग नकासगिरीची, व शोभायमान असून गंभीर स्वरूपाची अशी ही इमारत आहे; अशा प्रकारची याहून उत्कृष्ट इमारत युरोप किंवा एशियाखंडांत कोठेंहि नाहीं.[६]

(६) ताजमहाल हा मुमताझमहाल या शब्दाचा अपभ्रंश आहे. मुमताझमहाल ह्मणून शाहजहानाची राणी होती, तिची ही कबर आहे. ती यमुनाकांठीं संगमरमरी दगडाचा पायावर आहे; तिचा दुबाजूंस थोडक्या अंतरावर दोन मशीदी आहेत आणि तिचा वाटोळे विस्तीर्ण बाग आहेत. ती कबर बाहेरून पांढऱ्या संगमरमरी दगडाची आहे, व तिला एक उंच घुमट असून चार मनोरे आहेत. या महालाचा आंतल्या बाजूचा मध्यभागास एका घुमटाखालीं एक उंच वर्तुळाकार खण आहे, त्याचा मध्यभागीं त्या राणीची कबर आहे. तिचा सभोंवता उघडा दगडी कठडा असून त्यावर संगमरमरी दगडाची व चित्रविचित्र रंगांची नकशी काढलेली आहे. त्या कबरेचा भिंती पांढऱ्या संगमरमरी दगडाचा असून त्यांवर चित्रविचित्र रंगांचीं फुलें

त्याची खर्चा-विषयीं व्यवस्था.

त्याणें एवढीं मोठीं कामें इतक्या काटकसरीनें केलीं, कीं त्याणें जा कंदाहारावर मोठ्या स्वाऱ्या केल्या, बल्क प्रांतांत लढाया केल्या, व दुसरे भारी खर्च केले, त्यांचा पैसा वारून आणि दोन लाख घोडेस्वारांची नेमणूकी फौज बाळगून आपल्या खजीन्यांत सहा कोटी रुपये ठेविले होते, असें कोणी ह्मणतात, व कोणी चोवीस कोटी त्याजवळ होते असेंहि ह्मणतात; याशिवाय त्याजवळ सोन्यारुप्याचे अपार दागिने व जवाहीर होतें.[७]

---

काढलेलीं आहेत. त्या चित्रांची एकसारखी शोभा, त्यांतील रंगांचा मिलाफ, आणि वर सांगितलेलीं शोभायमान फुलें काढलीं आहेत त्यांची नियमित संख्या, या तीन गोष्टींनीं त्या इमारतीचा संगमरमरी दगडाचा सौम्य तेजास अधिक शोभा येऊन हें मंदिर विलक्षण मनोहर झालें आहे, आणि त्याच कारणामुळें सर्व जगांतील इमारतींमध्यें याची प्रसिद्धि आहे. वैडूर्य, एका प्रकारची गार, तांबडा अकीक, एका जातीचा सोनेरी दगड (तो काय आहे हें लोकांस बराबर समजत नाहीं), क्याल्सेडोनी व दुसऱ्या जातींचे गोमेद, अकीक, एका जातीची हिरवी गार, व असेच दुसरे नाना प्रकारचे दगड, या इमारतीला लावलेले आहेत. "वरील कळड्यामधील एका फुलांत १०० निरनिराळे दगड आहेत; त्यांतून प्रत्येक जसा पाहिजे तसा कापून उत्तम रीतीनें घोंटून बसविलेला आहे" असें मिस्तर व्हायसी ह्मणतो; आणि इतकेंहि असून बिशप् हीबर असें वर्णन करितो कीं या इमारतींतील प्रत्येक भाग, दिवाणखान्यांतील धुरांड्यावरील शोभेकरितां केलेल्या नकासगिरीसारखा सफाईदार केलेला आहे; तरी या सर्व इमारतीमध्यें छांदारीचा डौल न येतां तिजपासून मनावर गांभीर्याचा ठसा उठतो. या ताजमहालामध्यें जें चित्रविचित्र रंगांचें काम केलेलें आहे, तें इटालिस्थांचा कारागिरीचें आहे असा विशेष संभव आहे. याप्रमाणें इटालिदेशांतील कारीगरांनीं हिंदुलोकांपासून हें कसब शिकून घेतलें असावें ही गोष्ट चमत्कारिक आहे.

[७] बार्नियर हा सहा कोटी रुपये होते असें म्हणतो, आणि खाफीखान चोवीस कोटी होते असें म्हणतो.

शाहजहानाची, लहानपणीं, विशेष भीति बसण्याजोगी चाल नव्हती; तथापि तो सिंहासनारूढ झाला तेव्हां त्याची वर्तणूक निर्दोष होती असें दिसतें. तो आपल्या लोकांचें कल्याण करावें अशा बुद्धीनें बापाप्रमाणें त्यांशीं वागत असे, व बहुतेक पूर्वेकडील राजांचा चालीविरुद्ध त्याणें उदारबुद्धीनें आपल्या पुत्रांवर जो विश्वास ठेविला होता, त्यावरून जवळचा लोकांविषयीं त्याचें दिल किती खुलें असे, हें चांगल्या रीतीनें दिसून येतें.

त्याचा स्वभाव.

शाहजहानानें ३० वर्षें राज्य केलें; तो ६७ व्या वर्षीं पदच्युत झाला, आणि चौऱ्याहत्तराव्या वर्षीं मृत्यु पावला.

# भाग आठवा.

## औरंगझेब ऊर्फ अमलगीर पादशाह याची कारकीर्द.

## प्रकरण पहिलें.

इ० स० १६५८ पासून १६६२ पर्यंत.

जयसिंग व दिलीरखान हे सुलेमान यास सोडून गेले.

गादीवर बसल्यावर औरंगझेबाचा मुख्य उद्देश दाराचा पाठलाग करण्याचा होता, तथापि दाराचा मुलगा सुलेमान हा वरील शेवटचा लढाईचा वेळीं आपल्या बापास मदत करण्याकरितां येत होता त्याकडेसहि याची नजर नव्हती, असें नाहीं. सुलेमान हा २५ वर्षांचा जवान शाहजादा होता. त्यास लश्करचा मदतीस राजा जयसिंग व दुसरा दिलीर खान हे होते. दारा याचा गादीवर हक्क कायदेशीर होता म्हणून, व त्याचीं धर्मसंबंधीं मतें निराग्रही होतीं म्हणून, दुसऱ्या राजपूत राजांप्रमाणें जयसिंग हा त्याचा पक्ष धरून राहिला होता; परंतु तो शुजा याजबराबर जरी निग्रहानें लढला, तरी औरंगझेबाविषयीं त्याचा मतलब निराळा होता. तो औरंगझेबाचा हाताखालीं बल्क प्रांतांत चाकरीस होता, त्यामुळें बहुधा त्याचा

मनाचा कल त्याकडेसच असून, तशांतहि औरंगझेबाचा हातांत गादी होती, यामुळें स्वहितावर दृष्टि देऊन त्यास हरकत करूं नये अशी यास बुद्धि झाली. नंतर त्याणें सुलेमानास सोडून जाण्याचा निश्चय केला, व दिलीर खान याणेंहि तोच विचार केला; याप्रमाणें हे सरदार प्रथम तर फितूर करून निघून गेले, आणि नंतर, तें आपलें वाईट कृत्य शोभविण्याकरितां, क्षुल्लक निमित्तें काढिते झाले; त्यामुळें त्यांची दुष्कृति विशेषच वाईट दिसूं लागली. हे गेल्यामुळें सुलेमानाची बहुतेक फौज नाहींशी झाली, तेव्हां पहाडांचा कगत्यानें राहून औरंगझेबास चुकवून लाहोर एथें जाऊन आपल्या बापास मिळावें, असा त्याणें विचार केला. परंतु औरंगझेबानें त्यास मध्यें तोडून पाडण्याकरितां हरिद्वार एथें एक टोळी पाठवून त्याचा तो बेत फसविला. अशी निराशा झाल्यामुळें त्याचें राहिलेलें बहुतेक लश्कर त्यास सोडून गेलें. नंतर तो श्रीनगरचा राजाचा आश्रयास गेला; परंतु तुझाजवळ जे ५०० घोडेस्वार अद्यापि आहेत ते पाठवून दिल्याशिवाय मी तुला आश्रय देणार नाहीं, असें त्या राजानें सांगितलें. पुढें याणें अलाहबाद एथील किल्ल्यांत परत जाण्याचा निश्चय केला, तो निर्फळ होऊन त्यांत याचा थोड्या राहिलेल्या लोकांतूनहि नाहींसे होऊन २०० बाकी राहिले. नंतर तो श्रीनगरचा राजाचें बोलणें कबूल करून पांचसहा लोकांनिशीं त्याचा किल्ल्यांत शिरला. तेथें त्याचें प्रथम आगतस्वागत होत असे, परंतु आपण येऊन बहुधा कैदेमध्येंच पडलों असें लवकरच त्याचा नजरेस आलें.

तो श्रीनगर एथें गेला; तेथील राजानें त्यास कैद केलें.

वरील कृत्यांचा शेवट होईपर्यंत औरंगझेबानें वाट पाहिली नाहीं. आपला दिल्ली एथील बंदोबस्त करून तो दाराचा पाठलाग करित चालला. तो हतभाग्य शाहजादा, पळून जाण्याचा आरंभीं, थोडे दिवस दिल्ली एथें मुक्काम करून राहिला होता; तेथें त्यास कांहीं द्रव्य मिळालें, आणि त्याणें कांहीं हजार लश्कर जमा केलें. नंतर तो त्वरेनें लाहोरास कूच करून गेला, आणि तेथील बादशाही खजीन्यामध्यें पुष्कळ द्रव्य मिळाल्यावर फौज जमा करूं लागला; परंतु त्याची विशेष जमवाजमव होण्यापूर्वीं आपणावर औरंगझेब चालून येत आहे असें त्याणें ऐकिलें, आणि आपला पाठलाग करण्याकरितां एक पुढें पाठविलेली लहानशी टोळी जवळ आली आहे, असें त्यास लवकरच वर्तमान लागलें. मोहबत खान नामें पूर्वीचा मख्यात सरदाराचा मुलगा मोहबत खान, हा त्या वेळीं काबूलास सरसुभेदार होता, त्यास शाहजहानानें लिहून पाठविलें होतें, तेव्हां त्याजकडून आपणास कांहीं उत्तेजन मिळेल अशी दारास उमेद होती, असें दिसतें. कारण त्या प्रांतांत लश्करहि होतें, व शिवाय, जरूर लागल्यास, तेथील अफगाणांचा आश्रयानें राहण्यास त्वरित ठिकाण मिळण्याजोगें होतें, व तेथून उझबेग अथवा इराणी लोक, यांतून कोणाचाहि मुलुकांत जाण्यास सुलभ मार्ग होता; परंतु असे याचे जर विचार असले, तर ते औरंगझेबाचा त्वरित तजविजेपुढें फुकट गेले; आणि जें लश्कर याजवर पाठविलें होतें, त्यास हटवून लावण्याचें सामर्थ्य

औरंगझेब दाराचा पाठलाग करण्याकरितां दिल्लीहून निघाला.

इ०स० १६५८, जुलै ता० २८; हि० स० १०६८, झिल्काद चं० ७.

नसल्यामुळें तीन चार हजार घोडेस्वार घेऊन दारा लाहोराहून निघाला, आणि सिंध एथें जाण्याकरितां मुल्तानची वाट धरिता झाला. दारा लाहोर एथून पळाला.

औरंगझेब पूर्वींच सतलजनदी उतरून गेला होता, तो हें वर्तमान समजतांच आपला पूर्वींचा जाण्याचा बेत फिरवून मुल्तानाकडे निघाला तो तेथें जाऊन पोंचण्याचा पूर्वीं दारा तेथून कूच करून निघून गेल्याचें वर्तमान त्यास समजलें, आणि त्याचवेळीं आपला भाऊ शुजा हा बंगाल्यांतून चढ करून आला असें त्याणें ऐकिलें. त्यामुळें पश्चिमेस जाण्याचें सोडून दिवसगत न लागूं देतां तो दिल्ली एथें परत आला. औरंगझेब दिल्ली एथें परत गेला. इ० स० १६५८ ता० ३० सेपटेंबर तागाईत नोवेंबर २१; हि० स० १०६९ मोहरम चं० १२ तागाईत रबीअल अवल चं० ४.

इतक्यांत शुजा हा २५,००० घोडेस्वार आणि पुष्कळ तोफखाना यांसुद्धां काशीपर्यंत येऊन ठेपला होता. औरंगझेब वर सांगितल्याप्रमाणें आला तो कांहीं दिवस दिल्ली एथें मुक्काम करून मग त्यास प्रतिबंध करण्याकरितां निघाला. त्यांचा फौजा अलाहबाद, व इतावें यांचा मधोमध कज्व म्हणून ठिकाण आहे तेथें समोरासमोर आल्या, तेव्हां शुजा यास चांगलें ठिकाण मिळालें आणि त्या दोन्ही फौजा समोरासमोर तयारी करून होत्या; परंतु लढाई सुरू करण्यास कोणी प्रथम धजेना. शुजा बंगाल्याहून येत होता त्यावर औरंगझेब स्वारी करून गेला, इ० स० १६५९ ता० ३ जान्युआरि; हि० स० १०६९ दुसरा रबी चं० १७. नंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशीं सूर्योदयापूर्वीं नेहमींचा पाठप्रमाणें आपले लोक गोळा करित असतां अकस्मात् आपल्या छावणीचा पिछाडीस मोठा गोंगाट ऐकून

औरंगझेबाचा सामानावर जसवंतसिंगानें कपटानें हल्ला केला.

औरंगझेब दचकला. तो गोंगाट राजा जसवंतसिंग याणें केला. तो राजा औरंगझेबाचा छावर्णीत चाकरीस नसून त्याणें विश्वासघातानें याचा बारबरदारीचा सामानावर हल्ला केला.

या सरदारानें हल्ला कोणचा कारणानें केला तो प्रकार:- पूर्वीं जेव्हां दाराचा पक्षाची आशा राहिली नाहीं, तेव्हां हा राजा शरण आला होता. परंतु त्याचा अपेक्षेप्रमाणें बादशाहाचा त्यावर भरवसा न बसून त्याचा सन्मानहि झाला नव्हता; तेव्हां शुजा याजबराबर पत्रव्यवहार चालवून अमूक वेळीं मी पिछाडीचा सामानावर येऊन पडतों तेव्हां तुह्मी आघाडीवर हल्ला करावा असें त्याणें वचन दिलें होतें. जर त्यांची एकमेकांस कुमक पुरी मिळती, तर ही हिकमत चांगली शेवटास जाती; कारण शुजा हा जरी वक्तसर आपल्या नेमलेल्या ठिकाणीं पोंचला नाहीं, तरी या राजाचा हल्ल्यानें त्याचा प्रतिस्पर्ध्याचा लश्कराची बहुधा वाताहत होण्याची वेळ आली होती.

वर सांगितल्याप्रमाणें जसवंतसिंग हा अकस्मात् येऊन पडला तेव्हां धांदल झाली, आणि त्या वेळीं काळोख असल्यामुळें व या गोंगाटाचें कारण काय हें न समजल्यामुळें याचें जें लश्कर जमा होत होतें त्यांत गोंधळ झाला; कांहीं लोक रणभूमीवरून निघून गेले, कांहीं आपल्या सामानाचें रक्षण करण्याकरितां धांवले, आणि कांहीं शत्रूकडे जाऊन मिळाले. हा कल्होळ चालला असतां औरंगझेब घोड्यावरून उतरला, आणि आपल्या स्वारीबराबरचा सिंहासनावर बसून, शांत व हस्तमुख होत्साता,

व्यवस्थेविषयीं लोकांस हुकूम देता झाला. तो हल्ला हटवून लावण्याकरितां त्याणें एक टोळी पाठविली, आणि त्या हल्यापासून झालेला मोठा बखेडा मोडण्याचा बंदोबस्त केला. इकडे आपल्यास सहाय्य करण्यास शुजा आला नाहीं असें पाहून, आणि औरंगझेबाचें सर्व लश्कर आपणावर येऊन पडेल असा विचार करून, आणि आपल्या लुटावयास गेलेल्या लोकांस परत बोलावून, पुढील लढाईचा शेवट काय होतो हें आपणास निर्भयपणीं पाहवयास सांपडे अशा ठिकाणीं औरंगझेबाचा हात न पोंचे अशी जागा पाहून तेथें जसवंतसिंग माघारा निघून गेला. इतक्यांत सूर्योदय झाला, तेव्हां शुजा लढावयास येत आहे, असें दिसूं लागलें. नंतर प्रथम तोफांची शुरुवात झाली, आणि मागून लवकरच दोनहि फौजा भिडल्या. औरंगझेबाचा उजव्या बाजूचा लोकांस शुजानें हटविलें, आणि जेथें मध्यभागीं खुद्द औरंगझेब होता, तेथेंहि लगट केला. पुष्कळ वेळा औरंगझेबाचा अगदीं जीवावर प्रसंग आले, आणि एका वेळीं शत्रूकडील एका जोरावर हत्तीनें याचा हत्तीवर उडी टाकिली, त्या वेळीं बादशाहाचा रक्षकांतून एकानें गोळी घालून त्याचा महातास मारिलें, नाहीं तर तो हत्ती औरंगझेबाचा हत्तीस जमीनदोस्त करिता. इतकेंहि झालें, तथापि औरंगझेब शत्रूंचा मध्यभागाकडे चेपित चाललाच होता. याप्रमाणें लढाई होतां होतां शुजाचें लश्कर फुटून त्याचे लोक रणभूमीवरून पळून गेले. त्या समयीं मागें शत्रूंचा एक शें चोदा तोफा व पुष्कळ हत्ती इतकी लूट औरंगझेबास सांपडली.

शुजाचा पराजय झाला.

नंतर शुजाचा पाठलाग करण्याकरितां औरंगझेबानें

आपला मुलगा शाहजादा महम्मद सुलतान यास रणभूमीवरून पाठविलें, आणि थोडे दिवस गेल्यानंतर मीर जुमला याचा हाताखालीं चांगली यथास्थित फौज देऊन त्याचा मदतीस पाठविलें. मीर जुमला यास पूर्वी नावाला कैदखान्यांत ठेविलें होतें; तेथून त्यास मोकळें केल्यावर, तो वरील लढाईच्या पूर्वी एक दोन दिवस लश्करांत येऊन मिळाला होता, आणि त्या लढाईमध्यें औरंगझेबाखालीं दुसरी पायरी त्याची होती. याप्रमाणें बंदोबस्त करून औरंगझेब आग्र्यास परत जाता झाला.

इ० स० १६५९, जान्युआरि ता० १५; हि० स० १०६९, जमादिअलूअव्वल, चं १.

जसवंतसिंग हा आग्रा एथील लोकांस भेवडावून, मारवाडाकडे निघून गेला.

औरंगझेबाचा राज्यापैकीं आग्रा शहर हें अतिशय कमी बंदोबस्ताचें व शत्रूचा हात शिरके असें नाकें होतें; त्यामुळें तेथील लोकांस पुष्कळ भीति व जोखम पोंचण्याचा नुकताच प्रसंग आला होता. तो प्रकार असाः—आपल्या शत्रूंचा जय होतो असें जेव्हां जसवंतसिंगानें पाहिलें, तेव्हां त्याणें आपल्या मुलुकाकडे माघार घेण्यास आरंभ केला, आणि लढाईचा शेवटाची वास्तविक खबर समजण्यापूर्वी तो आग्र्यासमोर उपटला. त्या वेळीं शाहजहानास सोडवून पुनः राजपदावर स्थापण्याची यास शक्ति होती, आणि लोकांचींहि मनें पूर्वींच त्या गोष्टीविषयीं अतिशय आसक्त झालीं होतीं, असेंहि संभवतें; कारण आग्रा एथील सुभेदार शाइस्ते खान हा, निराश होऊन, विष खाऊन मरून जाण्याचा बेतावर आला होता, इतक्यांत, आपण निकरास काम नेलें असतां आपलें नुकसान होईल ह्मणून जसवंतसिंग कूच करून गेला, आणि लवकरच जोदपुरचा पहाडांत

व रेतीचा मैदानांत जाऊन निर्धास्त होऊन बसला. तो निघून गेल्यामुळें शाइस्ते खान काळजींतून मुक्त झाला.

पुढें औरंगझेबानें आग्र्यास पोंचल्यावर जसवंतसिगाचा पाठलाग करण्याकरितां १०,००० लोकांची फौज पाठविली, आणि त्याच सुमारास, शुजाचा सुभेदारानें प्रयागचा किल्ला सोडून दिला, व स्वतः शुजा बंगाल्यास निघून गेला, असें वर्तमान शाहजादा सुलतान याजकडून यास पोंचलें.

इ०स०१६५९ फेब्रुआरि ता० २१ हि०स० १०६९, जमादि अलू अवल चं० १७.

याप्रमाणें औरंगझेबाचे जय झाले; परंतु दाराशेखो याचा कृत्यांचें जें यास वर्तमान लागलें, तेणेंकरून याचें वरील फायद्यांपेक्षांहि विशेष नुकसान झालें. दारा हा सिधुनदावरील बकरनामक किल्ल्यांत आपलें बारबरदारीचें सामान ठेवून होता; तेथें त्याचे लोक त्यास सोडून गेल्यामुळें, आणि त्याचीं ओझाचीं जनावरें मरून गेल्यामुळें त्यास सिधदेशावर स्वारी करण्याची मसलत सोडून द्यावी लागली. तेव्हां आपला पाठलाग करण्याकरितां जे लोक औरंगझेबानें पाठविले होते, त्यांचा हातीं न सांपडण्याचें दुसरें साधन नाहींसें होऊन, त्यास रण उतरून कच्छदेशांत येण्याचा यत्न करावा लागला. याप्रमाणें पूर्वी वर्तमान आलें होतें. सांप्रत असें वर्तमान आलें, कीं तो कच्छमध्यें फार दिवस न राहतां गुजराथेंत गेला; तेथील सर सुभेदार शाहनवाझ खान हा होता; त्याची एक मुलगी मुरादास व एक खुद्द औरंगझेबास दिली होती; तो येऊन दारास मिळाला, आणि मग त्याचा मजबूद मदतीनें सुरत व भडोच या शहरांसुद्धां सर्व

दाराशेखो गुजराथेंत गेला व तेथील लोकांनीं त्यास बादशाह कबूल केला.

तो जसवंतसिंगास मिळण्याकरितां निघाला.

मांत दारा वेष्टिता झाला. त्याणें दक्षिणेंतील राजांशीं बोलणें चालू केलें होतें, परंतु उत्तरहिंदुस्थानांत जावें, आणि जसवंतसिंगास मिळावें, इकडे त्याचें लक्ष तूर्त लागलें होतें. याप्रमाणें त्वरेनें घालमेली झाल्यामुळें औरंगझेबास आश्चर्य झालें; तथापि गुजराथेपासून अजमीरापर्यंत जा राजपूत राजाचा मुलुक लागला होता त्याचें विशेष वाढलेलें महत्व याचा ध्यानांत आल्याशिवाय राहिलें नाहीं; आणि आपलें जेथें हित असेल तेथें तो आपल्या मनोविकारांचें कांहीं चालूं देत नसे, म्हणून जसवंतसिगानें जो नुकताच विश्वासघात करून आपणास त्रास दिला, तो विसरून त्या बंडखोर मांडलिकास वळविण्याकरितां याणें आपलें नेहमींचें कसब सुरू केलें.

जसवंतसिंगास औरंगझेबानें आपणाकडे मिळवून घेतलें.

तें असें, कीं याणें स्वहस्तें जसवंतसिगास एक खुशखबरीचें पत्र लिहिलें, त्यामध्यें, जी पदवी व जा किताबती पूर्वीं देण्याचें नाकारिल्यामुळें जसवंतसिंग नाखुश झाला होता, तें सर्व त्यास दिलें, आणि पादशाहाचा मर्जीवर भरवसा ठेवावा आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा आशारहित पक्षास जे सर्व मिळतील त्यांचा नाश होईल याविषयीं जसवंतसिगाची खातरी व्हावी, ह्मणून त्याचा भाईबंद जयसिंग यास त्याणें मदतीस बलाविलें. याप्रमाणें बोलणें पडल्यावर, व बादशाहाकडून देहेनगी मिळाल्यावर जसवंतसिगावर भार पडला; मग दारा हा अहमदाबादेहून निघून जोदपुरापासून पंचवीस कोशांवर आला होता, तरी त्यास त्याणें सांगून पाठविलें कीं, औरंगझेबाबराबर माझें एकस्याचें टक्कर

इ०स० १६५९ फेब्रुआरि ता० १४; हि०स० १०६९, जमादिअलअवल चं० १.

देण्याचें सामर्थ्य नाहीं असें मला वाटतें, याकरितां जर तूं दुसरे राजपूत राजे वळवून तुझा पक्षास आणशील, तर मी तुला मिळेन, नाहीं तर मिळणार नाहीं. दारानें जसवंतसिंगास पूर्वींचा बोलण्याप्रमाणें, व वचनाप्रमाणें चालण्याचा मार्गावर आणण्याचे वारंवार प्रयत्न केले, ते फुकट गेल्यामुळें त्याची मदत मिळण्याची सर्व आशा सोडून आपली स्वतांचीच मात्र फौज घेऊन जवळचा अजमीर प्रांतांत त्यास जाणें भाग आलें. त्याणें गुजराथेंत पोंचल्यापासून सुमारें एका महिन्यांत वीस हजार लोकांची फौज जमविली होती, आणि तेथून निघाला त्या वेळीं आणखीहि पुष्कळ लश्कर जमवून, ३०।४० तोफांनिशीं निघाला होता. वरील हकीकत झाल्यानंतर तो ही फौज घेऊन अजमीराजवळील पहाडांत मोठें नाक्याचें ठाणें घेऊन बंदिस्ती करून राहिला.

औरंगझेबानें दारावर हल्ला करून त्याचा पराजय केला.

औरंगझेब हा, दाराचीं गुजराथेंतील कृत्यें ऐकतांच, आग्र्याहून निघाला, तो वरील हकीकत झाली त्या वेळीं जयपुरास आला होता; आणि लवकरच दाराचा ठाण्याचा समोर येऊन ठेपला. तेथें प्रथम तीन दिवस त्याणें तोफांचा भडमार सोडिला, त्यांत त्याचाच फौजेचें नुकसान झालें. नंतर त्याणें एकदम हल्ला करावा अशी आज्ञा केली; तो हल्ला दाराचा लोकांनीं पुष्कळ तासपर्यंत मोठ्या हट्टास पेटून हटविला; शेवटीं औरंगझेबाचा लश्करांतील एक स्वारांची टोळी तट चढून आली, इतक्यांत शाहनवाझ मरण पावला, तेव्हां दारा अगदीं हतवीर्य होऊन मोठ्या घाईनें पळून गेला. मग त्याचा लश्कराची

वाताहत झाली; त्याचा अगदीं जवळ जी घोडेस्वारांची टोळी असे तीहि मागें राहत राहत सोडून गेली; आणि तो आपल्या मोडलेल्या संपत्तींतून जें कांहीं द्रव्य बचावून नेत होता तेंहि कित्येकांनीं लुटलें.

तो गुजराथेंत पळून गेला, तेव्हां त्यास घडून आलेले अपाय.

तो आठ दिवस अहोरात्र, बहुधा सतत, कूच करून अहमदाबादेजवळ पोंचला. त्या वेळीं अतिशय उन्हाळीमुळें उष्णता व धुरळा यांहींकरून तो प्रवास त्यास केवळ दुःसह झाला; तशांत पुढें भरीस भर हा पहाडांमध्यें आला, तेव्हां तेथील कोळीलोक याचा दुर्दैवी टोळीसभोंवते टपलेले असत; ते निर्दयपणानें हल्ले करून जो पिछाडीस राही त्याचें वस्त्रपात्र हिरावून घेत, अथवा त्याची कतलहि करीत. या आपत्तीचा प्रसंगीं दारास बर्नियरनामक प्रख्यात प्रवासी भेटला; त्यास नुकतेंच काय वर्तमान होत होतें तें कांहीं माहीत नसून, तो दिल्लीस जात होता. त्या वेळीं दाराचा स्त्रीस वार लागले होते आणि त्याजवळ वैद्य नव्हता; तेव्हां त्याणें बर्नियरास आपल्या बराबर परतविलें. मग ते तीन दिवस एका ठिकाणीं राहिले होते. चौथ्या दिवशीं ते अहमदाबादेपासून एका मजलेवर आले. तेथें जाऊन पोंचल्यावर, राहण्यास निर्भय ठिकाण मिळून इतके हाल झाले आहेत, त्यापेक्षां आतां कांहीं तरी विश्रांति मिळेल, असें त्यांस वाटलें होतें. त्या रात्रीस ते एका धर्मशाळेंत निजले होते. तेथें त्यांस कोळीलोकांची तर धास्ती नव्हती; परंतु ती जागा अगदीं संकोचित होती, त्यामुळें दाराचा कुटुंबांतील बायकामाणसांमध्यें व बर्नियराचा मध्यें एक गोणपाटाचा पडदा मात्र होता. दुसऱ्या

बर्नियरनामक प्रवासी यास भेटला.

दिवशीं सूर्योदयाचा सुमारास ते लोक आपल्या मतें दुःखाचा शेवटचा मजलेची तयारी करित होते, इतक्यांत अहमदाबाद एथें तुह्मास आंत घेणार नाहींत, याजकरितां तुमचा निर्भयतेची तुह्मास कांहीं काळजी असल्यास तुह्मी या क्षणींच हा शेजार सोडून जावें असें त्यांस वर्तमान लागलें.

अहमदाबाद एथें त्याचा प्रवेश होण्याचा बंद झाला.

तें ऐकून दाराचा बायका रडून शोक करूं लागल्या; त्यावरून ती खबर बर्नियरास लागली. नंतर लवकरच भीतीनें अर्धमेला झालेला असा दारा पुढें आला; तेव्हां जवळचे लोक निमूटपणीं उभे राहिले. नंतर सर्व जगानें आपणास सोडून दिलें असें त्याचा मनांत येऊन, आणि आपलें व आपल्या कुटुंबाचें पुढें काय होईल या विचारांनीं त्याचें मन व्यग्र होऊन जेव्हां तो अगदीं हलक्या पायरीचा शिपायापर्यंत जवळचा प्रत्येक लोकाशीं बोलूं लागला, तेव्हां बर्नियराचानें रडें सहन झालें नाहीं. नंतर पुढें आपणास अतिशय दुःख प्राप्त होईल असें भविष्य त्याचा मनामध्यें येऊन जेव्हां बर्नियरानें त्यास जातांना पाहिलें, त्या वेळीं त्याचा बराबर चारपांच घोडेस्वार व दोन हत्ती होते. इतक्यांनिशीं तो कच्छमध्यें गेला. तेथें पन्नास घोडेस्वार व २०० बरकंदाज इतके त्याचा एका विश्वासू आश्रिताबराबर गुजराथेंतून येऊन त्यास मिळाले. जेव्हां दारा प्रथम गुजराथेंत आला, तेव्हां कच्छ एथील अधिकारी याचा पक्षास मनःपूर्वक मिळाला होता. त्याणें सांप्रत याचा विशेष सत्कार केला नाहीं. नंतर तिकडून दारा कंदाहाराकडे निघून चालला. तो सिंधचा पूर्वेकडील सरहद्दीवर जूं ह्मणून लहानसा मुलुक आहे तेथें पोंचला. तेथील

तो सिंधदेशाकडे पळून गेला.

अधिकारी कोणी अफगाण होता असें दिसतें; त्यावर दाराचे पुष्कळ उपकार झालेले होते. सांप्रत त्याणें सर्व प्रकारें गोडी दाखवून दाराचा सत्कार केला, आणि इकडे मनामध्यें तर याचा विश्वासघात करून, यास धरून शत्रूंचा हातीं कसा द्यावा एवढाच त्याचा विचार चालला होता. दाराची बायको ही त्याचा चुलता परवीझ याची मुलगी होती. ती श्रमांनीं व दुःखांनीं या ठिकाणीं मरण पावली; त्या वेळीं याणें वेड भरल्यासारखें करून आपल्या स्थितीचा विचार न करितां आपल्या लहानशा टोळीमधून कांहीं लोक व दोन आपले अतिशय विश्वासू सेवक देऊन तिचा प्रेताबरोबर लाहोरास पाठविले. नंतर सुतक संपतांच तो सिंधुनदाकडे जाण्यास निघाला. जूं एथील अधिकारी हा एक मजलपर्यंत याबरोबर आला, आणि, यास सरहद्दीपर्यंत पोंचविण्याकरितां अशा निमित्तानें, आपला भाऊ व कांहीं लोक ठेवून कांहीं मिष करून आपण परत गेला. तो गेला नाहीं इतक्यांत त्याचा भाऊ अकस्मात् दारावर येऊन पडला, आणि तो व त्याचा मुलगा सेपहर शेखो यांस कैद करून त्यांस धरल्याचें वर्तमान बादशाहाचा सर्व अम्मलदारांस कळविता झाला.

त्यास जूं एथील अधिकाऱ्यानें धरून विश्वासघात करून औरंगझेबाचा स्वाधीन केलें.

इ० स० १६५९ जून, ता० ६; हि० स० १०६९, रमझान चं० २४, रोजीं त्या समारंभास आरंभ झाला.

इकडे औरंगझेब आपणास राज्य प्राप्त झाल्याचा प्रथम वर्षदिवसाचा समारंभ करित होता. जेव्हां हें वर्तमान औरंगझेबास लागलें तेव्हां तें निःसंशय झाल्याची खातरी होईपर्यंत त्याणें तें छपावून ठेविलें. नंतर सर्व लोकांनीं उत्सव करावा अशी त्याणें आज्ञा केली, आणि राज्य-

भावीचा वर्षदिवसाचा समारंभ आणखी कांहीं दिवस चालवावा असा हुकूम केला. तो समारंभ संपला होता नव्हता, इतक्यांत दारा व त्याचा मुलगा हे दोघे राजधानींत येऊन पोंचले. त्या वेळीं औरंगझेबानें मुजरत हुकूम केल्यावरून दारास बेड्या घालून, शृंगारांशिवाय रोडक्या हत्तीवर बसवून, शहरांतील भरवस्तीचा रस्त्यांनीं मिरविलें. तें पाहून सर्व लोकांस दया येऊन बादशाहाविषयीं संताप आला. तेव्हां बंडावा होईल असा बर्नियरास विशेष संभव दिसून, तो हत्यारबंद होऊन जो प्रसंग येईल त्याप्रमाणें तयारी असावी ह्मणून तशी ठेवून रस्त्यामध्यें जात असे. परंतु त्या लोकांचा भूतदयेचा शेवट रडण्यांत व आरोळ्या घालण्यांतच झाला. याप्रमाणें सर्व मुख्य ठिकाणांतून दाराची धिंड काढून त्यास जुन्या दिल्लीमध्यें एका तुरुंगांत नेऊन टाकिलें. नंतर दुसऱ्या दिवशीं जेव्हां जूं एथील अधिकाऱ्यास दरबारांत जातांना लोकांनीं वळखिलें, तेव्हां त्यांस पूर्वदिवसाप्रमाणें ती गोष्ट सहन झाली नाहीं; लागलाच लोकांचा मेळा जमला, आणि प्रथम त्यांणीं त्यावर शिव्यांचा व शापांचा भडमार केला; नंतर त्यांची संख्या वाढली तसा त्यांस अधिक आवेश चढून ते चिखल, कवलें, व धोंडे टाकूं लागले; शेवटीं या गोंगाटाचा इतका कळस झाला, कीं पुष्कळ लोक प्राणास मुकले, आणि जर शिबंदीचे लोक त्या अधिकाऱ्यास सोडवायास न येते, तर ते लोक त्याचे तुकडे तुकडेहि करून टाकिते.

दारास दिल्लीस आणिलें. इ० स० १६५९ जुलै ता० २६; हि० स० १०६९, झिकाद चं० १५. लोकांस त्याची दया आली.

दुसऱ्या दिवशीं या बंडांतील मुख्याचा बादशाहानें शिरच्छेद करविला; आणि हा बखेडा झाल्यानंतर कांहीं

दिवसांनीं एक ढोंग करून कांहीं बादशाहाचे प्रधान व कांहीं विद्वान् मुफ्ती लोक मिळवून एक थोथांडी सभा केली, आणि तिजमध्यें दारा हा मुसलमानधर्मभ्रष्ट म्हणून त्यास मृत्यूची शिक्षा योग्य आहे असें ठरविलें. या अभिप्रायास अनुसरून बाहेरून नाखुशी दाखवून औरंगझेबानें हुकूम दिला, आणि तो ठराव अमलांत आणण्यास दाराचा एका शत्रूस निवडून काढून त्यास तें काम सोंपिलें. दारा हा आपला मुलगा व आपण मिळून मसूर शिजवित होता; कारण विषाचा भितीस्तव एवढ्या मात्र अन्नास ते शिवत असत. मग त्या वेळीं ते मारेकरी पाहतांच तो आपलें नशीब एकदम समजला, व तो एक लहानशी सुरी नुकतीच वापरित होता ती उचलून घेऊन मोठ्या शौर्यानें लढला. शेवटीं अतिशय लोक त्यावर पडले, तेव्हां तो बेजार होऊन मारला गेला. त्याचें प्रेत हत्तीवर घालून लोकांस दाखविलें, आणि त्याचें शिर कापून औरंगझेबाकडे घेऊन गेले. त्याणें तें एका फळीवर ठेवून आपल्या देखत धुववून पुसून साफ करावें अशी आज्ञा केली. जेव्हां हें शिर दाराचें आहे अशी त्याची खातरी झाली, तेव्हां तो रडूं लागला आणि पुष्कळ दुःखाचीं चिन्हें दाखवून त्याणें तें हुमायूनाचा कबरेंत पुरावें अशी आज्ञा केली. सेपहर शेखो यास औरंगझेबानें ग्वालेरचा किल्ल्यावर पाठवून दिलें.

शाहजादा सुल्तान व मीर जुमला यांची शाहजादा शुजा याशीं लढाई.

हें वर्तमान होत असतां शाहजादा सुल्तान व मीर जुमला हे शुजाबराबर लढाई करित होते. तो शाहजादा बंगाल्यास परत गेल्यावर, मोंगीर एथें ठाणें धरून राहिला होता, आणि तेथें पहाड, व गंगानदी, यांमध्यें त्याणें मजबूद खंदक

पाडिला होता. परंतु मीर जुमला याणें पहाडांतून कूच करून येऊन त्याचा डाव्या बाजूकडील फौजेवर पडून त्यास राजमहाल एथें मागें हटविलें. शुजा हा पुष्कळ वर्षें बंगाल्यांत कारभार करित होता, तेव्हां त्याणें राजमहाल एथें एक राजधानीचीच गादी स्थापिली होती. इतक्यांत पावसाळा सुरू झाला, तेव्हां जमिनीवरून सर्व प्रकारचा व्यापार करण्याची गति खुंटली, आणि मीर जुमला हा राजमहालापासून कांहीं अंतरावर छावणी देऊन राहिला. नंतर कांहीं वेळपर्यंत लढाई तहकूब झाली. त्यापूर्वीं उभयपक्षांनींहि मोठी मानण्याजोगी, अशी एक गोष्ट घडून आली ती अशी, कीं शाहजादा सुल्तान हा, मीर जुमला याचा हाताखालीं आपण केवळ टिक्याचे धनी आहों असें पाहून, पुष्कळ दिवस कंटाळला होता, शेवटीं त्याचा उताविळपणा बेहद झाला, आणि तो औरंगझेबाचा वडील पुत्र आणि कबूल केलेला वारिस असतांहि, शुजाबरावर पत्रव्यवहार करूं लागला; आणि शेवटीं फितूर होऊन त्याचा छावणींत जाऊन मिळाला. शुजानें त्याचा सन्मान करून स्वीकार केला, आणि आपल्या मुलीशीं त्याचें लग्न करून दिलें. पुढें त्याचा आशाभंग झाल्यामुळें असो, अथवा स्वाभाविकच पाऊलबुद्धी यामुळें असो, परंतु तो पूर्वींप्रमाणेंच या नव्या ठिकाणींहि बेदिल होऊन गेला, आणि पुढें पाऊस संपल्यानंतर लढाई सुरू झाली तींत शुजाचा पक्षानें चांगल्या रीतीनें लढून, मागून त्याजकडून फितूर होऊन तो मीर जुमलाचा छावणींत परत आला.

शाहजादा सुल्तान शुजाकडे जाऊन मिळाला. इ० स० १६५९ जून; हि० स० १०६९ रमझान.

तो परत आला; इ० स० १६६० जान्युआरि ता० ७; हि० स० १०७० जमादिउस्सानी, चं० ६.

एके वेळीं औरंगझेबाचा बंगल्यांत स्वतः

जाण्याचा इरादा होता; परंतु हें वर्तमान पोंचण्यापूर्वींच तो त्याणें सोडून दिला होता. वर सांगितल्याप्रमाणें आपल्या मुलाची वर्तणूक पाहून औरंगझेबास विशेष खेद झाला नाहीं; त्याणें त्यास बंदीखान्यांत टाकून पुष्कळ वर्षेंपर्यंत कैदेंत ठेविलें.

त्यास औरंगझेबानें कैदेंत ठेविलें

या पुढें दिवसेंदिवस शुजाचा नाश होत चालला. त्याणें एका मागून एक पुष्कळ लढाया मारल्या, त्यांत त्याचा मोड होऊन त्यास धाका एथें पळून जावें लागलें. पुढें मीर जुमला हा मोठ्या झपाट्यानें त्याचा पाठीस लागला, तेव्हां तो आपली फौज सोडून थोड्या लोकांनिशीं पळाला, आणि आराकानचा राजाचा आश्रयास जाऊन राहिला. त्याची पुढें काय हकीकत झाली, तिचा निश्चय सांगवत नाहीं. त्या राजानें यास आराकानमधून जाण्याचा प्रतिबंध करण्याकरितां कांहीं बेइतबाराचा गोष्टी केल्या, आणि शुजानें त्या राजाचें राज्य गडबडवण्याची तद्देशीय मुसलमानांबराबर मसलत केली, असें दिसून येतें; परंतु शुजा व त्याचा कुटुंबाचीं सर्व मनुष्यें हीं मारलीं गेलीं, आणि त्यांचा विषयीं जरी पुढें पुष्कळ बातम्या लोक सांगत, तथापि पुढें त्यांचें काय झालें हें समजलें नाहीं, एवढें खचित आहे.

शुजा आराकान प्रांतांत पळून गेला. इ०स० १६६१ एप्रिल् किंवा मे; हि० स० १०७०, शाबान अथवा रमझान.

त्याचा शेवट कसा झाला याचा निश्चय होत नाहीं.

शुजाचें काय झालें हें न समजल्यामुळें औरंगझेबास कांहीं वेळपर्यंत किंचित् अस्वस्थता वाटत होती; परंतु दुसऱ्या वर्षाचा अखेरीचा पूर्वीं हीं व दुसरीं सर्व अस्वस्थतेचीं कारणें नाहींशीं झालीं. सुलेमान शेखो यास आपल्या

हवालीं करण्याकरितां, त्याणें श्रीनगरचा राजास प्रथम भीति दाखविली, आणि नंतर त्यावर फौज पाठविली; परंतु त्या राजानें त्याचीं सर्व मागणीं मागें फिरविलीं; मग लोभामुळें, अथवा राजकारस्तानामुळें, अथवा आपल्या सत्वशीलपणामुळें, यांतून कोणचाहि कारणास्तव त्याणें असें केलें असेल तें असो. औरंगझेबाचा वर्तीनें हिंदुलोकांशीं मोठ्या प्रेमानें बोलणीं करणारा जयसिंग हा असे; त्यास त्याणें शेवटीं हें काम सांगितलें. त्या सरदाराचा शिकवणीनें त्या राजानें शेवटीं सुलेमानास पादशाही लोकांचा स्वाधीन केलें. तेव्हां ते त्यास दिल्लीस घेऊन आले. त्यास प्रथम हत्तीवर बसवून शहरांतून मिरविलें, आणि पुढें बादशाहाजवळ नेलें. तेथें त्याचा पायांतील बिड्या काढल्या, परंतु अद्यापि हात सोनेरी मुलाम्याचा बिड्यांनीं बांधलेले होते. त्यास पाहून पुष्कळ उमराव लोक रडूं लागले; औरंगझेबानेंहि आपणास कळवळा आलासा दाखविला; नंतर शाहजादेलोकांस बंदींत टाकिलें ह्मणजे त्यांस कांहीं औषधी चारून बुद्धिहीन व बलहीन करून टाकित असत, असें बहुधा लोकांस वाटे; त्याप्रमाणें माझें न करितां मला एकदम मारून टाकावें अशी त्याणें बादशाहाची विनवणी केली; तेव्हां औरंगझेब त्यास अति मृदु वचनें बोलिला, आणि तुझा जीवास भीति नसून तुझें पालन यथास्थित होईल अशी त्याची खातरी करिता झाला. हें आपलें वचन त्याणें पाळिलें नाहीं असें लोक मानित असत; कारण तो सुलेमान व त्याचा भाऊ सेपहर शेखो व मुरादाचा धाकटा मुलगा हे सर्व थोडक्याच दिवसांत ग्वालेरचा किल्ल्यांत मरण पावले. असें असून खुद

सुलेमानास श्रीनगरचा राजानें औरंगझेबाचा स्वाधीन केलें.

औरंगझेबाच्या मुलगा सुलेमान हाहि त्याच किल्ल्यांत अटक होता, तो पुष्कळ वर्षे तेथें असून त्यास पुढें कांहीं मोकळीकहि मिळाली होती.

मुरादास बंदिशाळेंतच मारून टाकिलें.

इकडे दुर्दैवी मुराद हा जा तुरुंगांत कैद होता, त्याचा बुरुजावरून दोरी सोडून तिचा सहाय्यानें पळून जाण्याचा यत्न करित होता; परंतु त्याजवळ एक हिंदु जातीची राख होती तिचा निरोप तो घेऊं लागला, तेव्हां ती शोक करूं लागली. तिचें रडें ऐकून पाहरेकऱ्यांचें लक्ष तिकडे गेलें, त्यामुळें त्याची मसलत लोकांस समजून आली. आपला भाऊ जीवंत आहेपर्यंत आपण पुरे निर्धास्त झालों नाहीं असें औरंगझेबास वाटे; परंतु त्याजवर अपराधाचें कुफराण काढावयास कांहीं वारें नव्हतें. यास्तव पूर्वी मुरादानें गुजराथचा सरसुभ्यावर असतां एका मनुष्यास मनस्वीपणानें मारून टाकिलें होतें; तें निमित्त काढून त्याणें माझा बापाचा खून केला अशी मुरादावर फिर्याद करण्याकरितां त्या मनुष्याचा मुलास याणें शिकविलें. नंतर इनसाफाचा संस्कार, व कायदेशीर ठराव झाल्यावर, त्या हतभाग्य मुरादास त्याचा बंदिशाळेंतच फांशीं दिलें. हा घोर खून सुलेमानास बंदींत टाकिल्यावर कांहीं महिन्यांनीं झाला. त्यावरून त्याचीहि अशीच खराब दशा झाली असेल अशी आपली खातरी होण्यास कारण होतें.

इ० स० १६६१, नोवेंबर; हि० स० १०७२, रबी-उसानी.

पूर्वी बिकानेरचा राजा औरंगझेबास दक्षिणेंतून सोडून गेला होता, व तो अद्यापिहि याशीं कमर बांधून होता. वरील हकीकत होण्यापूर्वी कांहीं दिवसांवर औरंगझेबानें त्याजवर फौज पाठवून त्यास जिंकिलें.

मीर जुमला याणें बंगाल्यांत लढाया करून जय मिळविल्यामुळें, त्या प्रांतांत स्वस्थता झाली.

मीर जुमला याची आसाम एथें स्वारी.

तेव्हां या बलाढ्य प्रधानास कांहीं तरी उद्योग काढून द्यावा असें औरंगझेबाचा मनांत होतें, असें दिसतें. या हेतूस्तव, ब्रह्मपुत्रनदाचा किनाऱ्यास दोहीं बाजूंस पर्वत व त्यांवर मोठीं मोठीं अरण्यें यांहीं वेष्टिलेला असा आसामनामक श्रीमान् देश घेण्याचें काम याणें त्यास सांगितलें. मग मीर जुमला हा धाका एथून ब्रह्मपुत्रनदाचा मार्गानें वर गेला, आणि कुचबहारनामक लहानसें संस्थान आहे तें घेऊन व आसामदेश लुटून तेथील घेरगांव नामक राजधानी घेता झाला. त्याणें आपल्या जयाची खबर मोठ्या उल्हासानें बादशाहास कळविली, आणि पुढें देश जिंकित जाऊन चीनदेशापर्यंत जाण्यास मार्ग साध्य करण्याचा माझा इरादा आहे अशी बढाई मारिली. यानंतर लवकरच पावसाळा सुरू झाला, तेव्हां पूर येऊन सर्व सपाट प्रांत जलमय झाला; घोडेस्वारांचानें कूच करण्याचें किंवा घांसदाणा मिळविण्याचेंहि होईनासें झालें; चोहींकडून एतद्देशीय लोक जमा झाले, आणि बाहेरून लश्करची सामग्री येई ती पाडवून घेऊन, व जे लोक चुकूनमाकून एकीकडे जात त्यांस मारून टाकून, छावणींतील लोकांस इजा देऊं लागले. पुढें पावसाळा गेला तों लश्करांत पटकीचा वाखा आला; त्यामुळें मोसम सुरू झाल्यावर मीर जुमला यास जरी कुमका येऊन पोंचल्या, तरी त्यास आपले बाबासाहेबी बेत सोडून द्यावे लागले; आणि आपला पराजय झाला असें नदिसून

इ० स० १६६२ मार्च ता० १०; हि० स० १०७२ शाबान चं० २६.

आपल्या अब्रूचा बचाव होई, या प्रकारची खंडणी व दुसरे कांहीं देण्याचे करार करून घेण्यास, जा हुशारीविषयीं त्याची प्रख्याति होती, ती सर्व हुशारीहि खर्चावी लागली. तो उद्देश तडीस नेल्यानंतर तो आपली फौज घेऊन माघारा निघाला; परंतु धाका एथें पोंचेपर्यंत श्रमांनीं व दुःखांनीं क्षीण होऊन तो मरण पावला. त्या वेळीं तो वयातीत होता तथापि अतिशय हलक्या शिपायाप्रमाणें सर्व मेहनत व दुःख सोशित असे. पादशाहानें लागलाच त्याचा मुलगा महम्मद अमीन यास त्याची उंच पदवी देऊन त्याचा तसाच मान ठेविला.

इ० स० १६६३, जान्युआरि ता० ६; हि० स० १६६३ जमादिअलअखेर चं० ६.

मीर जुमला मरण पावला इ० स० १६६३. मार्च ३१; हि०स० १०७३ रमझान चं० २.

याप्रमाणें आपला बलाढ्य ताबेदार गेल्यामुळें औरंगझेबाचा मनांतून द्वेष व भीति हीं निघून गेलीं, असें दिसलें; परंतु आपलें आयुष्य व राज्य यांचा नाकाशीं सूत धरलें आहे याविषयीं त्यास नुकतीच चांगली दहशत लागली होती. तो गादीवर बसला त्यापासून पांचव्या वर्षदिवसानंतर लवकरच त्यास कठीण आजार झाला, त्यावरून तो तत्काळ मरेल अशी प्रथम भीति पडली होती. पुढें तो बरा झाला तथापि त्याची शक्ति अगदीं कमी झाली, आणि त्याची वाचा बहुधा अगदीं बसून गेली. हा अनर्थ अकस्मात् झाल्यामुळें, त्याचा नुकत्या स्थापिलेल्या राज्याचा पाया डळमळला; शाहजहानास सोडविण्याकरितां राजाजसवंतसिंग हा भरकूच करून येत आहे, आणि मोहबत खान हा त्याच उद्देशानें काबूलाहून येत आहे,

औरंगझेबाचा जीवावरील दुखणें.

दरबारांत मसलती व गडबडाट.

अशा बातम्या फैलावल्या; शाहजहानाचा पक्षाचे लोक राजधानीमध्यें मसलती करूं लागले, आणि खुद औरंगझेबाचा पक्षाचा लोकांत दोन फळ्या पडल्या; एका फळीचे लोक त्याचा दुसरा मुलगा **मोअझिम** यास गादीवर बसविण्यास उत्सुक होते, व दुसऱ्या फळीचा मनांतून पादशाहाचा दुसरा मुलगा **अकबर** यास बसवावें असें होतें. परंतु खुद **औरंगझेबाचा** एकमार्गीपणानें व धारिष्टानें हीं सर्व अरिष्टें टळलीं. तो दुखणाईत पडल्यापासून पांचव्या दिवशीं, अद्यापि वांचण्याचा पंथास लागला होता नव्हता इतक्यांत, त्याणें आपणास चाकरांकरवीं उठवून बसलें करविलें, आणि आपल्या मुख्य उमराव लोकांचे मुजरे घेतले. नंतर दुसऱ्या दिवशीं त्यास भोंवळ उठल्यामुळें तो मेल्याची जिकडे तिकडे बातमी पसरली, तेव्हां त्याणें आपल्या अति मोठ्या दोन तीन मानकरी लोकांस आपल्या बिच्छान्याजवळ बलावून, त्याचा जिव्हेस पक्षघात झाला होता तो बरा झाला नव्हता तरी, त्यांचा देखत आपली बहीण **रोशनारा** इचा स्वाधीन मोठा शिक्का केलेला होता तो पाठविण्याकरितां तिला एक हुकूम लिहिला, आणि आपल्या खासगत हुकूमाशिवाय त्या शिक्क्याचा कोणी उपयोग करूं नये म्हणून तो त्याणें आपल्याजवळ ठेविला. या प्रसंगीं त्याची वर्तणूक पाहून लोक त्यास विशेष मान देऊन त्याची वाखाण करूं लागले; तेणेंकरून बखेडे बंद होण्याचा बराच बंदोबस्त होऊन, तो बरा होण्याचीहि तशीच आशा लागली.

काश्मीर एथें गेल्यानें जशी शक्ति लवकर येईल, तशी कोठें खालचा मैदान मुलुकांत येणार नाहीं या उमेदीनें, तो, फिरण्याजोगा हुशार झाला तेव्हां, तेथें निघून गेला. तो बरा झाला इ० स० १६६२, ता० ६ डिसेंबर.

जेव्हां औरंगझेब स्वस्थपणीं उत्तरेस कालक्रमण करित होता, तेव्हां दक्षिणेमध्यें मराठ्यांचा नाटकाचा नुकताच पहिला प्रवेश आरंभिला होता; तिकडे लवकरच याचें लक्ष गुंतून गेलें. तो प्रकारः—

दक्षिणेंतील बखेडे.

नर्मदेचा दक्षिणबाजूस विंध्याचलाशीं समांतर जी एक पर्वतांची ओळ आहे, ती उत्तरबाजूस, व समुद्रकिनाऱ्यावरील गोव्यापासून बेदरशहरावरून वरधानदीवर चांद ह्मणून शहर आहे तेथपर्यंत सूत्र टाकिलें तर जी ओळ होत्ये ती दक्षिणेस, या सीमांमध्यें जो देश समावतो त्यांत मराठे लोक राहतात. या देशाची पूर्वसीमा वरधानदी असून, पश्चिमेस समुद्र आहे.

महाराष्ट्रदेशाचें वर्णन.

या देशाची मुख्य चमत्कारिक खूण सह्याद्रिपर्वत आहे; त्यास बहुधा साधारण रीतीनें घाट असें ह्मणतात. ही ओळ या देशाचा पश्चिमबाजूनें समुद्रापासून पंधरा वीस कोशांचा अंतरानें लागत गेली आहे. ती तीनपासून पांच हजार फूटपर्यंत इतकीच कायती उंच आहे; तथापि तितक्यांतच तिचीं विशेष लक्षणें, व तिचा योगानें देश व कोंकण असे जे या प्रांताचे दोन विभाग पडले आहेत त्यांमध्यें जी तफावत आहे त्यामुळें, ती ओळ फारच प्रख्यात आहे. पश्चिमेस बहुधा समुद्राचा सपाटीपासून हा पर्वत एकदम उंच वाढलेला आहे, आणि त्या बाजूनें पाहिला तर त्यावर गति होण्यासहि अवघड अशी एक मर्यादाच झालेली दिसत्ये; परंतु त्याचा पूर्वेचा बाजूस दीड किंवा दोन हजार फूट उंच इतकी सपाट जमीन याचा आधारानें आहे. ती हळू हळू सखल होत होत महाराष्ट्रदेशाचा हद्दीपासून

पुष्कळ पलीकडे बंगालचा उपसागरापर्यंत लागत गेली आहे. सह्याद्रिपर्वत व समुद्र, यांचा मध्यें जी जमीनीची पट्टी आहे, तिला कोंकण असें ह्मणतात. ती बहुधा फार खडकळ आहे. या मुलुकांत किनाऱ्याजवळ लहान लहान चांगले पिकाऊ तळ आहेत, त्यांत भात उत्पन्न होतें. बाकीचा मुलुक खडक व अरण्यें यांहींकरून बहुतेक जागीं आंत जाण्यास मार्ग मिळावयाचा नाहीं, असा भरून गेला आहे; त्यांत मध्यें कडे तुटून पुष्कळ पाण्याचे धोधे चालले आहेत, त्यांचा पुढें नद्या होऊन समुद्राजवळ खाजणांमध्यें चिखलट खाड्या होऊन गेल्या आहेत. या सह्याद्रिपर्वताचा शिखरास निवळ खडक आहेत; परंतु त्याचा बाजूस उंच उंच वृक्ष दाट लागून गेले आहेत, आणि त्यांचा मधून सखल झाडें आहेत; हें अरण्य पूर्वेकडील ( मावळनामक ) जवळचा प्रांतांत पसरलें आहे; त्यांत पुष्कळ वांकणांचा खिंडी व खोल खोल दरी आहेत, त्यांत, त्या पर्वतामध्यें जीं जंगली जनावरें राहतात, त्यांस लपून राहण्यास चांगलीं ठिकाणें आहेत. नंतर या पर्वतापासून पंधरा वीस कोशांचा अंतरावर या खिंडी रुंद व सुपीक झाल्या आहेत, व पुढें पुढें त्यांचीं मैदानें होऊन तीं पूर्वेकडे लागून गेलीं आहेत; त्यांमध्यें सर्वत्र शेतकी होत्ये, परंतु वृक्ष नाहींत, आणि लहान लहान टेंकड्यादेखील बहुधा मध्यें कोठें नाहींत. जी नैऋत्येकडून पावसाची मोसम सुरू होत्ये तिचा सर्व तडाका घाटावर बसतो, आणि ती पुढें देशांत जाई तों तिचा जोर

१ एके वेळीं समुद्र घाटापर्यंत होता, आणि कोंकण देश हा एका देवानें चमत्कार करून समुद्रापासून हिरावून घेतला, अशी हिंदुलोकांची एक दंतकथा आहे.

मोडून जातो. या पर्वताचीं उंच शिखरें पुष्कळ महिनेपर्यंत ढगांनीं लपेटलेलीं असतात, आणि तेथें पाऊस व वारा मारित असतो. तें सर्व पाणी वरून लवकरच निरून जातें, परंतु तेणेंकरून वर्षभर कोंकणची हवा ओलसर व रोगी होऊन जात्ये.

सह्याद्रिपर्वतापासून पूर्वेकडेस जे लहान लहान डोंगर निघालेले आहेत, त्यांतून अतिशय मोठा **चांदवडचा** डोंगर आहे. त्याचा एका शिखरावर **चांदवड**नामक किल्ला बांधलेला आहे, त्यावरून तें त्याचें नाव पडलेलें आहे. **तापीनदीचें** जें रुखल जमीनीवरील तळवट व **देशांतील** उंच प्रदेशांतील **गोदावरीचें** तळवट, यांचा सीमेवर हा डोंगर आहे. **तापीचा** प्रदेशांत **खानदेश** व **वऱ्हाड** या सुपीक प्रांतांची व्याप्ति आहे. यांमध्यें व **गुजराथेमध्यें** फकत **बागलाण** हा जंगली प्रांत आहे. **मराठ्यांचा** मुख्य देशाची उंची समुद्रापासून विशेष आहे, त्याहून वरचा **तापी**-कांठचा प्रदेश पुष्कळ रीतीनें निराळा आहे.

सर्व **सह्याद्रि**पर्वत, व त्याचा जवळचे पर्वत, यांचा शिखरांस बहुत करून तुटलेल्या गुळगुळित दगडांचे तट आहेत, त्यांतील अति उंच शिखर, व तसेच एकेरी टेंकड्यांचे कांहीं भाग, हे जसे स्वाभाविक किल्लेच होऊन गेले आहेत. त्यांचा अगदीं शिखरास बहुधा सपाट जागा असत्ये, तेथें जाण्यास रस्ता करण्याची कायती मेहनत आहे. या ठाण्यांवरून पुष्कळ राजांनीं आपलें साधन करून घेतलें आहे. त्यांणीं त्या पहाडांतून वर जाण्यास पायऱ्या पाडिल्या आहेत, अथवा वांकणांवांकणांनीं रस्ते नेले आहेत, आणि पहिल्यानें प्रवेश होण्याचा ठिकाणीं एकामागून एक दरवाजांची

बंदिस्ती करून, वर येण्याचा वाटांवर मारा पोंचे असे बुरुज बांधले आहेत. याप्रमाणें त्या सह्याद्रीचा आसमंतांतील व त्यापासून निघालेल्या पर्वतांतील प्रदेश किल्ल्यांनीं भरून गेला आहे; त्यावर शत्रूचा मारा चालतो असा जर आपणास वारंवार अनुभव आला नसता, तर तो प्रदेश आपण अजिंक्य मानिला असता.

मराठयांची हकीकत.

यापूर्वी मराठे लोक इतिहासांत प्रसिद्धीस आले नव्हते; परंतु त्यांमध्यें हमेशा एकी असून जशी कांहीं लोकसत्ताक राज्याचीच त्यांचा देशांत प्रवृत्ति होती, असा त्यांचा स्वभाव मजबूद बनून गेला होता. कानडा व तैलंगण या दक्षिणेकडील शेजारचा देशांपेक्षां हे लोक उत्तरहिंदुस्थानांतील कनिष्ठ प्रतीचा लोकांसारखे विशेषेंकरून आहेत, तथापि हे उभयतांपासूनहि भिन्न आहेत; त्यांशीं क्षणभरहि यांस मिळवितां कामास नये.

यांचा बांधा लहान, रांकट, व धडधाकड आहे; परंतु सुंदर नाहीं. हे सर्व चपळ, मेहनती, धीट, व निग्रही आहेत. यांस राजपूतलोकांसारखा अभिमान व डामडौल नाहीं खरा; परंतु त्यांचा प्रमाणें आळस, व प्रपंचज्ञानशून्यता, हींहि नाहींत. राजपूत शिपाईगडी ह्मटला ह्मणजे, तो ज्या युद्धास प्रवृत्त झाला असेल, त्याचा परिणाम काय होईल याविषयीं बहुधा निरभिमानी असतो; आपल्या कुळास वट्टा लागला नाहीं ह्मणजे त्याचें कार्य झालें; परंतु मराठ्याची दृष्टि परिणामावरच असत्ये, आणि आपला हेतु तडीस गेल्यास, तो कोणत्या साधनांनीं गेला त्याविषयीं तो काळजी वाहत नाहीं. त्या हेतूस्तव तो आपल्या अकलेचीं

आटाआट करील, आपलें सर्व सुख सोडून देईल; व आपलें शरीरहि जोखमांत घालील; परंतु सत्व राखण्याकरितां आपला जीव देणें, अथवा लाभ जाऊं देणें, हें त्याचा गावींहि नसतें. याप्रमाणें या दोन्ही लोकांचे विचार भिन्न असल्यामुळें, त्यांची बाहेरील वर्तणूकहि भिन्न होत्ये. जरी एकादा साधारण राजपूत असला, तरी त्याचा चालचर्यंत कांहीं प्रौढता दिसत्ये, आणि अतिशय प्रख्यात मराठा असला, तरी त्याचा वळणांत कांहीं तरी हलकटपणा दिसतो.

राजपूत हा युद्ध करावयास योग्य प्रतिस्पर्धी होय; परंतु मराठ्यांचें शत्रुत्व मोठें भयंकर आहे, कारण हा जेथें धिटाई व साहस यांचें कारण असेल, तेथें तीं करण्यास चुकणार नाहीं, आणि त्यांचा भरीस, अथवा निराळें जेथें कारण असेल तेथें, युक्ति, चपलता, व निग्रह हींहि आणील; परंतु हें सर्व वर्णन मुख्यत्वेंकरून लढाऊ मराठे लोकांस लागू होतें, व वर सांगितलेल्यांखेरीज दुसरेहि कांहीं वाईट गुण त्यांस लाविले तर साजतील. शुद्ध खेडू लोक आहेत, ते मिताहारी, मितव्ययी, व उद्योगी आहेत, आणि जरी त्यांमध्यें जातिस्वभावाप्रमाणें कांहीं धूर्ततेचें अंग आहे, तथापि ते कज्जेदलाल अथवा कपटी असे नाहींत.

त्या वेळचा मराठ्यांचे मुख्य हे मोठ्या कुटुंबांतले असून, त्यांचा वंशजांनीं गांवचीं व परगण्यांतील मुख्य मुख्य हुद्यांचीं कामें पिढी दरपिढी चालविलेलीं होतीं; आणि त्यांस विजापुर व अहमदनगर एथील मुसलमान राजे मदतीस बलावित असत. ते आपल्या रयतेप्रमाणेंच सर्व शूद्र होते, परंतु त्यांतून कांहीं, आपण राजपूत वंशापासून झालों

असें ह्मणून, आपली मोठी बडेजाव करित असत.

मराठे ह्मणून कोणी लोक होते असें पूर्वींचा मुसलमान ग्रंथकारांस माहीत होतेंसें दिसत नाहीं. त्यांणीं जा कांहीं सरदारांचीं आडनावें लिहिलीं आहेत, त्यांवरून ते लोक त्या जातीचे असतील असें आपणास दिसतें. इ०स० १४८५ मधील हकीकतीचें वर्णन करितांना फिरिस्ता हा ग्रंथकार या शब्दाचा प्रथम उपयोग करितो; तेथपर्यंत या शब्दानें सर्व देशांतील लोकांची व्याप्ति व्हावी, अशा अर्थानें या शब्दाचा उपयोग झाला नव्हता. इसवी सनाचा सोळाव्या शतकाचा मध्यास विजापुरचा राजानें महसूलसंबंधीं कागदपत्र फारसींत लिहिण्याचें सोडून मराठींत लिहावे अशी वहिवाट सुरू केली; आणि तो परदेशी लोक काढून दक्षणी लोक चाकरीस ठेवूं लागला होता, यामुळें त्याणें त्यांत पुष्कळ मराठे लोक ठेविले; त्यांस प्रथम किल्ल्यांचे पाहरे करण्याचा अगदीं हलक्या कामावर ठेविलें; क्रमेंकरून हे घोडेस्वारांची चांगली चाकरी बजावितात असें समजलें, तेव्हां, त्यांस विजापुर व अहमदनगर या राज्यांत लश्करी पदवी मिळूं लागली; कित्येकांस गोंवळकोंडें एथील कुतुबशाही अमलांत चाकऱ्या मिळाल्या. इतकें झालें तथापि सतराव्या शतकाचा आरंभापर्यंत मुसलमान ग्रंथकार यांचें फारस वर्णन करित नाहींत. मलिकंबराचा वेळीं मराठे हे प्रख्यातीस आले, आणि तेव्हांपासून दक्षिणेंतील इतिहासांत ते बराच खेळ करूं लागले.

मलिकंबराचा जवळील अम्मलदारांमध्यें भोंसला या आडनावाचा मालोजी नामें सरदार होता; त्याचें

भोंसल्यांचा वंशाची उत्पत्ति.

कुटुंब प्रतिष्ठित होतें, परंतु विशेष प्रख्यात नव्हतें. तो आपल्या स्वतांचा थोड्या घोडेस्वारांनिशीं चाकरीस असे, आणि त्यास मुख्यत्वेंकरून जाधवराव याचा आश्रय असे.

सर्व मराठे लोकांतून जाधव यांचा वंशाची उत्पत्ति राजपूतांपासून झाली, असें ह्मणावयास विशेष कारण आहे. जाधव हें एक राजपूत जातीचें नाव आहे, आणि प्रथम मुसलमानलोकांनीं दक्षिणेंत स्वारी केली, त्या वेळीं दक्षिणेंतील सर्वांत मोठा जो देवगडचा राजा, त्याचें आडनाव जाधवच होतें. मालोजी हा देवगडाजवळीलच एका परगण्याचा देशमुख होता; यावरून त्याचा यजमान हा देवगडचाच कुळांतील असावा असें नाहीं संभवतसें नाहीं. याची मूळपीठिका कशीहि असो, परंतु याचा यजमान लूकजी जाधवराव हा मलिकंबराचा कारकीर्दींत दहा हजार लोकांचा सरदार होता. त्याचें महत्त्व एवढें होतें, कीं तो फितूर होऊन शाहजहानाकडे जातांच, ती लढाई त्याचा पूर्वींचा धन्याचा अंगावर आली.

हा फितूर होण्याचा पूर्वीं पुष्कळ दिवसांवर एका हिंदुलोकांचा सणाचा दिवशीं मालोजी भोंसला हा आपला मुलगा शाहजी यास घेऊन जाधव यांचा वाड्यांत गेला होता; त्या वेळीं शाहजीची उम्मर ५ वर्षांची होती; अशा प्रसंगीं जिकडे तिकडे लोकांस आनंद व्हावा हें साहजिकच आहे: त्या आनंदांत निमग्न असतां जाधवराव यांणीं तो लहान शाहजी व आपली तीन वर्षांची मुलगी मांडीवर घेतली, आणि हंसत हंसत म्हणाले, कीं “ हा खासा जोडा आहे, याकरितां यांचें लग्न लावून देणें योग्य आहे.” तें ऐकतांच

मालोजी झटकन उठला, आणि जाधवरावाची मुलगी आपल्या मुलास देण्याची सोयरीक ठरली याचे साक्षी तुह्मी असा, असें त्याणें जवळचा लोकांस सांगितलें; तें ऐकून जाधवरावास आश्चर्य वाटलें. याप्रमाणें अवचट आपणास पकडून आपलें हित करून घ्यावयास मालोजी सरसावला तेणेंकरून जाधवरावास साहजिकच संताप आला. त्यांत आपली कुळी श्रेष्ठ म्हणून गर्वानें विशेष राग आला असें नाहीं. त्या योगानें जाधवराव व त्याचा आश्रित मालोजी यांचें फाटलें; परंतु या सुमारास मालोजीचें दैव उजेडास येत चाललें होतें; त्याणें पुष्कळ द्रव्य मिळविलें, आपलें पतक वाढविलें, आणि तो चांगला खबरदी असे यामुळें वाढून शेवटीं त्यास अहमदनगरचा राज्यांत पांच हजार स्वारांची सरदारी, व एक मोठी जाहगीर मिळाली, तींत पुणें हें मुख्य ठिकाण होतें. त्याणें अद्यापि जाधवरावाचा मुलीवर आपला वारसा ठेविला होता व त्याचा सांप्रत चढता काळ आला होता, यामुळें तो अनुचित असें लोक मानित नसत. शेवटीं जाधवरावहि कबूल झाल्यावर त्याचा मुलीशीं यथाविधि शाहजीचें लग्न झालें. या संबंधापासून मराठ्यांचा राज्याचा पाया घालणारा शिवाजी उत्पन्न झाला.[२]

शाहजी भोंसल्याविषयीं.

अहमदनगरचा राज्याचा मोड होण्याचा वेळीं शाहजी हा मोठा कर्ता पुरुष होता, असें पूर्वींच त्याचें वर्णन आलें आहे; नंतर तो विजापुरकरांचा चाकरीस राहिला, आणि निजामशाही राज्याचे विभाग झाले तेव्हां याची जाहगीर विजापुरकरांचा वांटणीस गेली होती तीहि त्यांणीं याकडेस चालविली.

---

२ तो इ॰ स॰ १६२७ चा मे महिन्यांत जन्मला.

नंतर त्यास विजापुरकरांनीं दक्षिणेस मुलुक जिंकावयास पाठविलें; तिकडे त्यास म्हैसूरप्रांतांत, शीर व बंगळूर या शहरांसुद्धां, पूर्वींचा पेक्षां मोठी दुसरी जाहगीर मिळाली.

शिवाजी भोंसल्याविषयीं.

सर्व मराठे सरदार हे अगदीं अक्षरशत्रु असत, यामुळें त्यांचा कारभार ब्राह्मणलोक करीत; तसेच मुसलमानलोकांचा कारकीर्दींतहि या जातीचे लोक पुष्कळ कारभारांत पडलेले असत, यामुळें दादोजी कोंडदेव नामें एका ब्राह्मणास शाहजीनें पुण्याचा जाहगीरीचें काम सांगून आपला दुसरा मुलगा शिवाजी यास त्याचा हाताखालीं ठेविलें. त्याचा वडील मुलगा त्याजबरावर म्हैसूर एथें गेला होता. घोड्यावर फेरफटका करणें, शिकार करणें, व लश्करी कवाईत करणें, ही कायती मराठे लोकांचा मुलांस शिकविण्याची विद्या असे; तशांत पुणें हें पहाडी व सपाट मुलुकाचा सरहद्दीवर पडलें, यामुळें त्याचा बापाचा घोडेस्वारांपैकीं जे शिपाई लोक असत ते, अथवा जवळील घाटांतील पहाडी लुटारू लोक असत ते, याचे मुख्य सोबती असत. अशा सोबत्यांमुळें यास लहानपणापासून साहसाची प्रीति जडली: तशांत आपल्या देशांतील पवाडे वगैरे कवन ऐकण्याची यास हौस असे, त्यामुळें ती प्रीति अधिकच वाढली. दादोजीनें शिवाजीस जाहगीरीचा कारभारांत आपल्या मदतीस घेतलें होतें; परंतु तो सोळा वर्षांचा झाला, तेव्हां दादोजीचा कैदेंत राहीनासा झाला. त्याची रीति बोलून चालून मनमिळावू असे, त्यामुळें बहुधा लोक त्यावर प्रीति करीत; परंतु यापूर्वींच

त्याचा धोरणा.

कोंकणामध्यें मोठमोठे जमातीचे दरवडे पडले त्यांत हा सामील होता, असा पूर्वींच वहमा

यावयास लागला होता. या अभ्यासानें, व याचा शिकारीचा फेरफटक्यांनीं त्यास सर्व घाटांतील वाटा व खेंडीं पक्क्या ठाऊक झाल्या होत्या, आणि त्या घाटांतील जंगली लोक तर पूर्वींच त्याचा ओळखीचे होते. त्यांतून पुण्याचा उत्तरेकडील पर्वतांत भिल्ल व कोळी होते, व दक्षिणेकडील पर्वतांत रामोशी होते; परंतु अगदीं पुण्याचा नजीक पश्चिमेस मराठे लोक होते. ते जा प्रदेशांत राहत असत, त्यावरून त्यांस **मावळे** असें ह्मणत असत. या लोकांनीं त्या रानवट मुलुकांतील संकटें व अडचणी पुष्कळ दिवस सोसल्या होत्या. या लोकांतून शिवाजीनें आपले अगदीं प्रथमचे आश्रित निवडून काढले, आणि तो अतिशय चपळ व मागें पुढें पाहणारा असे, यामुळें पूर्वींपेक्षां कांहीं विशेष मोठ्या कार्यांत त्या लोकांची योजना करण्याचा रस्ता त्याचा नजरेस आला.

त्यांचे आश्रित.

त्या वेळीं विजापुरकरांचा पहाडी किल्ल्यांची फार अव्यवस्था असे; ते बहुधा लांबीचा पल्ल्यावर व रोगकारक ठिकाणीं असत, त्यामुळें त्यांत केव्हां केव्हां एकटा मुसलमान सरदार, व कांहीं थोडेसे हलक्या पगाराचे शिबंदीचे लोक असत. केव्हां केव्हां जवळचा देशमुख अथवा दुसरा महसूली अम्मलदार, याचा ताब्यांत ठेवलेले असत. पुण्याचा नैर्ऋत्येस दहा कोशांवर तोरणा नामें मजबूद किल्ला आहे, तो एका महसूली कामगाराचा ताब्यांत होता. तो याणें मसलतीनें घेतला, आणि त्याविषयीं चांगल्या रीतीनें बोलणें योजून व पैका खर्चून हा

त्याणें तोरणा किल्ला छापा घालून घेतला.

इ० स० १६४६.

किल्ला देशमुखापेक्षां माझा हातांत असेल तर चांगला, अशी त्याणें विजापुरचा दरबाराची खातरी केली; परंतु पुढें त्याणें एक जवळचा टेंकडीवर किल्ला बांधला तेव्हां विजापुरकरांचें तिकडे विशेष लक्ष लागलें, आणि त्यांणीं शाहजीस त्याचा मुलाचा वाईट कृत्यांविषयीं लिहिलें. शाहजीनें आपलें बोलणें जसें साजेंर करवलें तसें केलें, आणि विजापुरकरांचा मुलुकांत आणखी हल्ले न करण्याविषयीं दादोजी व शिवाजी यांस सक्त लिहून पाठविलें. ती आज्ञा मानण्याविषयीं आपल्या तरुण यजमानास उद्युक्त करण्याचा त्या ब्राह्मणानें जितका होता तितका यत्न केला; परंतु तें पत्र आल्यानंतर तो थोडक्याच दिवसांनीं मरण पावला, तेव्हां त्याची धास्ती नाहींशी झाल्यामुळें शिवाजी पूर्वीपेक्षां अधिक धट्टाईनें साहसास प्रवृत्त झाला. तो त्या जाहगीरीचा वसूल बापास देईनासा झाला, आणि चाकण व सुपें या दोन किल्ल्यांचे अम्मलदार हे खुद्द त्याचा बापाचा हुकमतींतील होते त्यांतून एकास याणें अनुकूल करून घेतलें, आणि दुसऱ्यावर छापा घातला; याप्रमाणें आपल्या स्वतांचा जाहगीरीचा धनी होऊन, त्याणें दुसरे मोठमोठे उद्योग आरंभिले.

त्याणें आपल्या बापाची जाहगीरी बळकाविली.

पुण्याजवळ कोंडाणेंनामक जो मजबूद पहाडी किल्ला आहे, व ज्यास हल्लीं सिंहगड असें ह्मणतात, तेथें त्या वेळीं एक मुसलमान सुभेदार होता, त्यास याणें लांच देऊन तो किल्ला घेतला. नंतर त्याहूनहि मोठ्या पुरंदरनामक मजबूद किल्ल्याचा धनीपणाकरितां याचे दोस्त दोघे ब्राह्मण भाऊ आपसांत भांडत होते, ही संधि पाहून,

त्याणें पुष्कळ किल्ले घेतले.

इ० स० १६४७.

याणें आपले मावळे लोक त्या किल्ल्यांत शिर- इ० स० १६४७.
कावून तो किल्ला विश्वासघातानें स्वतः घेतला.

हा सर्व मुलुक जो शिवाजीनें मिळविला, तो मारहाण केल्याशिवाय व शेजारचा मुलुकांस उपद्रव दिल्याशिवाय मिळविला; त्यामुळें विजापुरचा राजानें कांहीं प्रयत्न केला नाहीं. शिवाय त्या वेळीं दक्षिणेंतील मुलुक घेण्याचा कामामध्यें, व आपल्या राजधानींतील भव्य इमारती उठविण्याचा उद्योगामध्यें तो राजा गुंतलेला होता.[3]

पुढें शिवाजीस आपले मतलब साधण्याकरितां उघडिकेस यावें लागलें. एका वेळीं कोंकणामध्यें विजापुरचा सरकारचा खजीना जात होता, तो याणें लुटला; हा पहिल्यानें बंडावा केला. हा अपमान केल्याचा दरबारास विस्मय झाला होता; तो नाहींसा झाला नाहीं इतक्यांत, घाटामधील पांच मुख्य किल्ले शिवाजीचा हातांत सांपडले असें वर्तमान आलें. यानंतर बहुधा लागलाच त्याचा एका ब्राह्मण सुभेदारानें उत्तरकोंकणचा मुसलमान सुभेदारावर छापा घालून त्यास कैद केलें, आणि तो राहत असे तें कल्याण शहर घेऊन सर्व प्रांत हस्तगत केला, आणि त्याचे सर्व

विजापुरचा सरकारावर बंड केलें इ० स० १६४८.

(३) "याप्रमाणें शिवाजीनें चाकण व निरा यांमधील मुलुक मिळविला. तो आपल्या मुलुकांतील पहाडांमधील वाघाप्रमाणें चांगलें ठिकाण शोधून जेथून एकदम सावजावर उडी टाकितां येईल अशा रीतीनें लपून बसून निमूटपणीं टपत राहिलेला असे; यामुळें त्याची पहिल्यानें उत्पत्ति कशी झाली, आणि जेव्हां तो वाढला आणि त्याचानें छपून राहवेनासें झालें, तेव्हां त्याची सत्ता आश्चर्यकारक त्वरेनें कशी वाढली, या दोहींचें कारण वरील गोष्टीवरून समजतें."

किल्ला देशमुखापेक्षां माझा हातांत असेल तर चांगला, अशी त्याणें विजापुरचा दरबाराची खातरी केली; परंतु पुढें त्याणें एक जवळचा टेंकडीवर किल्ला बांधला तेव्हां विजापुरकरांचें तिकडे विशेष लक्ष लागलें, आणि त्यांणीं शाहजीस त्याचा मुलाचा वाईट कृत्यांविषयीं लिहिलें. शाहजीनें आपलें बोलणें जसें साजेरें करवलें तसें केलें, आणि विजापुरकरांचा मुलुकांत आणखी हल्ले न करण्याविषयीं दादोजी व शिवाजी यांस सक्त लिहून पाठविलें. ती आज्ञा मानण्याविषयीं आपल्या तरुण यजमानास उद्युक्त करण्याचा त्या ब्राह्मणानें जितका होता तितका यत्न केला; परंतु तें पत्र आल्यानंतर तो थोडक्याच दिवसांनीं मरण पावला, तेव्हां त्याची धास्ती नाहींशी झाल्यामुळें शिवाजी पूर्वीपेक्षां अधिक धट्टाईनें साहसास प्रवृत्त झाला. तो त्या जाहगीरीचा वसूल बापास देईनासा झाला, आणि चाकण व सुपें या दोन किल्ल्यांचे अम्मलदार हे खुद्द त्याचा बापाचा हुकमतींतील होते त्यांतून एकास याणें अनुकूल करून घेतलें, आणि दुसऱ्यावर छापा घातला; याप्रमाणें आपल्या स्वतांचा जाहगीरीचा धनी होऊन, त्याणें दुसरे मोठमोठे उद्योग आरंभिले.

*त्याणें आपल्या बापाची जाहगीरी बळकाविली.*

पुण्याजवळ कोंडाणेंनामक जो मजबूद पहाडी किल्ला आहे, व ज्यास हल्लीं सिंहगड असें ह्मणतात, तेथें त्या वेळीं एक मुसलमान सुभेदार होता, त्यास याणें लांच देऊन तो किल्ला घेतला. नंतर त्याहूनहि मोठ्या पुरंदरनामक मजबूद किल्ल्याचा धनीपणाकरितां याचे दोस्त दोघे ब्राह्मण भाऊ आपसांत भांडत होते, ती संधि पाहून,

*त्याणें पुष्कळ किल्ले घेतले.*

*इ० स० १६४७.*

याणें आपले मावळे लोक त्या किल्ल्यांत शिर- इ० स० १६४७.
कावून तो किल्ला विश्वासघातानें स्वतः घेतला.

हा सर्व मुलुक जो शिवाजीनें मिळविला, तो मारहाण केल्याशिवाय व शेजारचा मुलुकांस उपद्रव दिल्याशिवाय मिळविला; त्यामुळें विजापुरचा राजानें कांहीं प्रयत्न केला नाहीं. शिवाय त्या वेळीं दक्षिणेंतील मुलुक घेण्याचा कामामध्यें, व आपल्या राजधानींतील भव्य इमारतीं उठविण्याचा उद्योगामध्यें तो राजा गुंतलेला होता.[3]

पुढें शिवाजीस आपले मतलब साधण्याकरितां उघडिकेस यावें लागलें. एका वेळीं कोंकणामध्यें विजापुरचा सरकारचा खजीना जात होता, तो याणें लुटला; हा पहिल्यानें बंडावा केला. हा अपमान केल्याचा दरबारास विस्मय झाला होता; तो नाहींसा झाला नाहीं इतक्यांत, घाटामधील पांच मुख्य किल्ले शिवाजीचा हातांत सांपडले असें वर्तमान आलें. यानंतर बहुधा लागलाच त्याचा एका ब्राह्मण सुभेदारानें उत्तरकोंकणचा मुसलमान सुभेदारावर छापा घालून त्यास कैद केलें, आणि तो राहत असे तें कल्याण शहर घेऊन सर्व प्रांत हस्तगत केला, आणि त्याचे सर्व

विजापुरचा सरकारावर बंड केलें इ० स० १६४८.

(३) "याप्रमाणें शिवाजीनें चाकण व निरा यांमधील मुलुक मिळविला. तो आपल्या मुलुकांतील पहाडांमधील वाघाप्रमाणें चांगलें ठिकाण शोधून जेथून एकदम सावजावर उडी टाकितां येईल अशा रीतीनें लपून बसून निमूटपणीं टपत राहिलेला असे; यामुळें त्याची पहिल्यानें उत्पत्ति कशी झाली, आणि जेव्हां तो वाढला आणि त्याचानें छपून राहवेनासें झालें, तेव्हां त्याची सत्ता आश्चर्यकारक त्वरेनें कशी वाढली, या दोहींचें कारण वरील गोष्टीवरून समजतें."

किल्ले आपल्या ताब्यांत देण्याविषयीं त्याजकडून बलात्कारानें हुकूम देवविले. याप्रमाणें जय झाला पाहून शिवाजीच्या आनंद ब्रह्मांडांत माईनासा झाला.

त्याणें उत्तर-कोंकण घेतलें.

त्याणें त्या मुसलमान सुभेदाराचा मोठ्या आदरानें सत्कार केला, आणि त्याची मानप्रतिष्ठा करून त्यास पाठवून दिलें. तो देश घेतल्यानंतर, प्रथम त्याणें हिंदुलोकांचा नेमणूका सुरू केल्या, व जुनीं संस्थानें, व जुन्या चाली, यांचा जीर्णोध्धार केला. त्यास मूळपासून हिंदुधर्माचा विशेष अभिमान असे; तो प्रथम जसा धार्मिक बुद्धीनें होता, तसाच लौकिक बुद्धीनें बहुधा असावा; यामुळेंच पुढें त्याचें मुसलमानाशीं हाडवैर पडलें, व आपल्या भोळसर चालींवर त्याची विशेष श्रध्धा वाढली. ही त्याची श्रध्धा त्याचा राजनीतीसहि अनुसरून होती, यामुळें तो विशेष भक्तीचा डौल घालूं लागला, आणि आपणास भविष्यांविषयीं स्वप्नें पडतात, व देवांची आपणावर कृपा आहे, व आपणास दुसरे साक्षात्कार होतात असें तो ढोंग करूं लागला.

त्याची हिंदुधर्मावर श्रध्धा.

शेवटीं विजापुरचें दरबार शिवाजीचा मसलती पाहून जागें झालें; तथापि तो आपल्या बापाचा सल्ल्यानें असा वांकडा चालतो, असें त्यांस अद्यापि वाटत होतें; ह्मणून आपली अवकृपा झाली असें बाहेरून न दाखवितां घोरपड्यांचा कुळांतील एका सरदाराकडून दोस्तीखातर मेजवानीस बलाविल्याचें निमित्त करून शाहजीस पकडविलें; नंतर विजापुरचा सरकारानें अपला रोष शाहजीवर झाला,

विजापुरचा सरकारानें शाहजीस पकडून त्याचा मुलाचा वाऱ्या वर्तणुकेकरितां ओलीस ठेविलें.

असा दाखविला. त्या घोरपड्या सरदारानें आपल्या बापाचा विश्वासघात केला ह्मणून पुढें शिवाजीनें त्याचा भरपूर सूड उगविला. आपल्या मुलानें जे अपराध केले, त्यांमध्यें माझा कांहीं दोष नाहीं असें शाहजीनें खातरीपूर्वक सांगितलें, तथापि तें विजापुरचा दरबारास खरें वाटलें नाहीं. नंतर शिवाजीचा बंडावा मोडण्यास त्यास कांहीं योग्य मुदत दिली; ती पुरी झाल्यावर त्यास अंधारकोठडींत टाकिलें, आणि अमुक मुदतीचा आंत शिवाजी शरण न आल्यास या कोठडीचा दरवाजा चिणून टाकिला जाईल असा त्यास हुकूम झाला. या धास्तीनें शिवाजी अतिशय घाबरला, परंतु अशा विश्वासघातक शत्रूस शरण गेल्यानें आपलें संरक्षण व्हावयाचें नाहीं, अशी त्याची विचारान्तीं खातरी होऊन तो पूर्वीप्रमाणेंच आपलें धरून राहिला; आणि शाहजहानाचा मुलुकास मोठी तजवीज ठेवून याणें इजा दिली नव्हती, त्यामुळें याणें त्याजवळ बोलणें लाविलें. बादशाहानें त्याचा अर्ज कबूल करून त्यास आपल्या चाकरीस ठेविलें, आणि पांच हजारांचा सरदाराची त्यास पदवी दिली. नंतर बहुधा शाहजहानाचा भारदस्त मध्यस्थीनें शाहजीची अंधारकोठडी सुटली; तथापि तो ४ वर्षें विजापुरास नजरकैद होता. वरील मुदतींत शिवाजी आपल्या बापाचा धास्तीमुळें आवरला गेला, व तो मोगलांस आपल्या मदतीस बलावील या भीतीस्तव विजापुरचें सरकार अटकून राहिलें; यामुळें हीं चार वर्षें स्वस्थपणानें गेलीं.

इ०स०१६४९. इ०स०१६४९ पासून इ०स०१६५३पर्यंत.

वरील मुदत संपल्यानंतर कर्नाटकामध्यें बखेडे उत्पन्न

शाहजीची सुटका झाली.

झाले: शाहजीची सर्व जाहगीर लुटली गेली, व याचा वडील मुलगा मारला गेला, आणि सर्व सभोंवारचा प्रदेशांतील लोक हत्यारबंद होऊन उठले, तेव्हां विजापुरचा सर्व अम्मलदारांस ते लवकरच हांकून लावितात अशी भीति पडली; यामुळें सरकारचा हितास्तव शाहजीस सोडून देऊन त्यास कर्नाटकांत पाठविणें जरूर आलें.

शिवाजीनें पुनः हल्ले सुरू केले.

आपला बाप मोकळा होतांच आणि विजापुर सरकारचें लक्ष कर्नाटकाचा कारभारांत पडतांच शिवाजी अधिक चपळतेनें आपल्या बढतीचा उद्योग पुनः सुरू करूं लागला. पुण्याचा दक्षिणेकडील घाट धरून तेथपासून कृष्णेचा वरील प्रवाहापर्यंत जो डोंगरी मुलुक आहे, तो एका हिंदु राजाचा ताब्यांत होता; तो कांहीं केल्या शिवाजीचें ऐकून बंडांत सामील होईना. तेव्हां सांमत याणें त्यास मारेकरी घालून मारविलें, आणि त्यामुळें जी धांदल झाली ती संधि साधून त्याचा मुलुक बळकाविला. हें घोर कर्म केल्यानंतर याणें कांहीं डोंगरी किल्ले छापा घालून घेतले, आणि कांहीं बांधिले. याप्रमाणें इ० स० १६५५ त शाहजहानाचा कारकीर्दीत शाहजादा औरंगझेब दक्षिणेंत येईपर्यंत शिवाजी हा आपली सत्ता वाढवित गेला. जेव्हां औरंगझेब दक्षिणेंत आला, तेव्हां आपण मोगल सरकारचा चाकर या नात्यानें शिवाजी त्याशीं व्यवहार ठेवूं लागला. तेव्हां त्याचा मुलुक त्याकडे कायम ठेविल्याविषयीं बादशाहाकडून त्यास बहाली मिळाली. पुढें जेव्हां गोंवळकोंडें एथील राजाशीं औरंगझेबाची लढाई चालली, आणि तींत पुष्कळ दिवसपर्यंत बखेडा चालेल,

असें जेव्हां याचा अटकळींत आलेंसें यास वाटलें, तेव्हां त्या दोघां भांडणारांचें नुकसान करून त्या धांदलींत आपलें कार्य साधून घेण्याचा याणें निश्चय केला; आणि मोगलांचा मुलुकावर प्रथमची स्वारी केली. याणें जुनरशहरावर छापा घालून पुष्कळ लूट नेली, आणि त्याचप्रमाणें पुढें अहमदनगर एथेंहि करण्याचा यत्न केला; तो कांहींसा मात्र तडीस गेला. पुढें औरंगझेब त्वरेनें मुलुक घेत चालला, तेणेंकरून याची अगदीं निराशा झाली; आणि तो शाहजादा विजापुरकरांशीं लढत असतां, सर्व प्रकारचीं निमित्तें सांगून व कबुलाती करून, आपण अविचारानें केलेल्या अपराधाची क्षमा मागून घेण्याविषयीं शिवाजीनें यत्न केला. पुढें शाहजहान आजारी पडल्यामुळें औरंगझेब दिल्लीस गेला, तेव्हां शिवाजी हा त्याचा भजनीं लागलाच होता; आणि मोगल सरकारचा मुलुकांत आपला कांहीं हक्क आहे तो दिल्यास मी निष्ठेनें सरकारची चाकरी करीन, असें याणें बोलणें लाविलें. नंतर बादशाही फौजेंत आपल्या तर्फेचा घोडेस्वारांचें एक पतक पाठवावें असें याणें कबूल केल्यानंतर औरंगझेबानें यास लागलीच क्षमा केली, व याचा दुसऱ्या हक्कांचा पुढें तपास करूं असें म्हणून ती गोष्ट लांबणीवर घातली; परंतु शिवाजी औरंगझेबासारखाच मसलती होता, ह्मणून त्याणें आपले घोडेस्वार पाठविण्याचेंहि तसेंच तकूब ठेविलें, आणि रिकामी वचनें देणें, व तोंडानें बोलणें एवढीच कायती चाकरी केली.

तो मोगलांचे प्रांत लुटूं लागला.

त्यास औरंगझेबानें क्षमा केली, इ० स० १६५८.

इकडे विजापुरचा राजा मरून गेला, व त्याचा मुलगा

वयानें लहान होता; त्या संधींत याणें पुनः विजापुरावर हल्ले सुरू केले; तेव्हां याची सत्ता वाढत आहे सबब याविषयींची हयगय केली असतां नुकसान पोंचेल असें शेवटीं कारभारी लोकांस समजून आल्यावर त्यांणीं याजवर एक मोठी फौज रवाना केली. तींत अफ्झल् खान हा सेनापति होता. त्यामध्यें मुसलमान उमरावांचा बेताप्रमाणें गर्विष्टपणा असून, सांप्रतचा शत्रूस तर तो अगदींच तुच्छ मानित होता; परंतु त्याचा गर्वानें आपलें कार्य करून घेण्याची मसलत त्या शत्रूस चांगली माहीत होती, यामुळें अफ्झल् खानाचा कीर्तीनें आपण भिऊन गेल्याचें, व त्याजबराबर युद्ध करून त्यास हटविण्याचें आपलें सामर्थ्य नाहीं असें त्याणें सोंग आणिलें. नंतर त्या खानास शरण आल्याचें गरीबीचें बोलणें लाविलें, तेव्हां तें बोलणें पुरें करण्याकरितां त्या खानानें आपल्या अतिशय भरवशांतील एक ब्राम्हण मुखत्यार पाठविला. या पुरुषास शिवाजीनें आपल्याकडे मिळवून घेतलें, आणि त्याचा सहाय्यानें याणें स्वल्प रीतीनें अफ्झल् खानाचा मनांत असें भरून दिलें, कीं शिवाजी मोठा भयाभीत झाला आहे, आणि शरण आलें असतां आपला पुढें काय परिणाम होईल या भीतीस्तव मात्र तो शरण येत नाहीं. हीं बोलणीं चाललीं असतां अफ्झल् खान हा अडचणीचा व रानवट खेंडींतून प्रतापगडाजवळ आला. त्या वेळीं शिवाजी तेथें राहत होता. तेव्हां जर तुम्ही बराबर लोक आणिले तर मी भिऊन जाईन, याकरितां तुम्ही एकटे मला भेटावयास याल, तर मी तुमची प्रत्यक्ष भेट घेऊन तुमचा तोंडून माझा अपराधांची क्षमा झाल्याचें ऐकेन, असें त्या मराठ्यानें कबूल

अफ्झल् खानास विजापुराहून पाठविलें.

केलें, त्यानंतर अफ़्झल् खान आपली फौज सोडून थोड्या लोकांनिशीं पुढें गेला, आणि शिवाजीचें ऐकून तेहि मागें ठेवून एका खिदमदगारानिशीं पुढें गेला. त्याणें पातळ रेशमी झगा घातला होता, आणि त्याबराबर एक साधी सरळ तरवार होती. ती सहज डौलाकरितां होती, कांहीं तिचें काम लागेल म्हणून घेतली नव्हती. इतकें होत आहे तों शिवाजी किल्ल्यावरून हळूहळू खालीं येतांना दृष्टीस पडला. तो भीतभीत दचकत एका खिदमदगारानिशीं, बाहेरून दिसण्यांत अगदीं हत्याराखेरीज, पुढें आला; परंतु त्याचा कापसाचा झग्याआंतून त्याचा आगांत लोखंडी चिलखत होती, आणि जवळ एक छपावलेली कटार असून त्याचा हातांत कठीण तिख्याचीं 'वाघनखें' होतीं. ('वाघनखें' हे तीक्ष्ण आंकडे असून बोटांत घालतात, व मूठ मिटली असतां ते दृष्टीस पडत नाहींत.) तो छोटेखानी पुरुष चालीप्रमाणें आपल्या भेटीस येतांना पाहून अफ़्झल् खानानें त्यास तुच्छवत् केलें, परंतु यास आलिंगन देल्या वेळीं त्याणें आपल्या शत्रूचा पोटांत वाघनखें खुपसलीं. अफ़्झल् खानाचा तें कांहीं ध्यानीं मनीं नव्हतें; म्हणून तो एकाएकी चाकित झाला. त्यांतून तो सावध होई तों शिवाजीनें कटार भोंसकून त्याचा प्राण घेतला.

शिवाजीनें त्याचा प्राण घेतला.

त्या पूर्वीच शिवाजीनें चोहींकडून गुप्त रस्त्यांनीं अफ़्झलाचा फौजेवाटोळी रानांतून आपली फौज आणून ठेविली होती; ती, किल्ल्यावरून निशाणी होतांच, सर्व मुसलमानांवर तुटून पडली. ते मुसलमानलोक गर्वानें बेसावध राहिले

आणि त्याचा लश्कराची वाताहत केली.

होते; ह्मणून बहुधा त्यांचानें समोर टिकाव ध-
इ०स०१६५९ रवला नाहीं, आणि त्यांची कतल होऊन वा-
अक्टोबर. ताहत झाली. जेव्हां शिवाजीस पुरा जय
मिळाला तेव्हां कोणी पळालेल्या लोकांचा प्राण घेऊं नये
असा त्याणें हुकूम फिरविला. शेंकडों लोक रानें धुंडून भु-
केनें व्याकूळ झाल्यावर याचा हातांत सांपडले. त्यांचा
याणें दयेनें सांभाळ केला. त्यांतून पुष्कळ मराठेलोक हो-
ते, ते याचा चाकरीस राहिले. एक मराठा सरदार आपलें
सत्व सोडीना; त्यास शिवाजीनें नजराणे देऊन पाठवून दि-
लें. लपविलेलें द्रव्य कोठें आहे याविषयीं लोकांस कबूल
आणण्याकरितां शिवाजीनें आपल्या सर्व कारकीर्दीत कि-
त्येक लोक मारिले, व कित्येकांचा छळ केला; तथापि त्या-
णें कधींहि स्वतः चांगल्या मतलबाशिवाय क्रूर कर्म केलें
नाहीं. याप्रमाणें जय झाल्यामुळें शिवाजीची विशेष बढ-
ती झाली. नंतर त्याणें घाटाजवळील सर्व मुलुक लुटला,
आणि सर्व डोंगरी किल्ले घेतले. तो सर्व कोंकण प्रांत पुरा
सर करिता; परंतु इतक्यांत विजापुराहून पूर्वी-
विजापुराहून पेक्षां मोठी फौज आल्याचें वर्तमान लागल्यामु-
दुसरी फौज ळें, त्यास परत यावें लागलें. मग त्याणें आ-
आली. पलें कांहीं लश्कर किल्ल्यांमधून ठेविलें, आणि बाकीचें
शत्रूंची सामग्री येण्यास अटकाव करण्याचा कामास लावि-
लें; परंतु आपण स्वतः पन्हाळा नामें अड-
इ०स०१६६० मे. चणीचा ठिकाणचा किल्ल्यावर अडकून
राहिला. त्या किल्ल्यास विजापुरकरांनीं चार महिने वेढा
दिला होता; तेव्हां यास शरण जावें लागलें असतें; परंतु तो
तह करण्याची आशा शत्रूंस दाखवून त्यांस झुलवित असतां,

एके दिवशीं अंधारे रात्रीस त्याणें आपल्या नेहेऱ्यांचा धीटाईनें व कुशलतेनें तजवीज करून तेथून पाय काढला. त्या वेळीं विजापुरचा सरदार सिद्दी जोहर ह्मणून एक हबशी होता; त्याणें विश्वासघात केल्यामुळें शिवाजी निसटून गेला, असें विजापुरास ह्मणूं लागले. या अपवादामुळें त्यास संताप येऊन पूर्वीच विजापुरास कळीचें पीक माजलें होतें त्या भरींत ही भर पडली.

नंतर विजापुरचा राजानें स्वतः स्वारी केली, आणि शिवाजीचानें पुढें उभें न राहवे इतकें बराबर लश्कर आणिलें. या सर्व स्वारीमध्यें शिवाजी उडवत उडवत युध्द करित होता, व त्यांत कांहीं त्याचा बेतहि नीट नव्हता; त्यामुळें एक वर्ष होण्याचा पूर्वीं त्याणें घेतलेला सर्व मुलुक विजापुरचा राजानें परत घेतला. नंतर करनाटकामध्यें सिद्दी जोहरानें बंड केल्यामुळें व दुसऱ्या कारणांमुळें विजापुरचा राजास तिकडे जावें लागलें; तिकडे त्याचीं सगळीं दोन वर्षें गेलीं, तितक्यांत शिवाजीनें आपला गेलेला मुलुक परत घेऊन आणखीहि घेतला.

विजापुरचा राजानें स्वतः स्वारी केली. इ०स०१६६१, जान्युआरि.

विजापुरचा राजाने शिवाजीचा बहुतेक मुलुक परत घेतला.

इ० स० १६६२.

त्यानंतर शाहजीनें मध्यें पडून शिवाजीचा व विजापुरकरांचा तह केला; तेणेंकरून गोव्यापासून कल्याणपर्यंत सवा शें कोशांवर समुद्रकिनारचा देश, आणि घाटावर पुण्याचा उत्तरेपासून कृष्णाकांठीं मिरज शहराचा पलीकडे मिळून पाउण शें कोश लांब, याप्रमाणें मुलुक शिवाजीचा ताब्यांत होता. त्याची पूर्वपश्चिम

शिवाजीनें आपणास हितावह तह केला.

त्याचा राज्याचा विस्तार.

अति मोठी रुंदी पन्नास कोश होती. त्याचे लोक इ० स० १६६२. रांकट व त्यांस लुटारु लोकांचा रीतीनें राहण्याची सवय असे; त्यामुळें ७,००० घोडेस्वार व ५०,००० पायदळ इतकें लश्कर एवढ्या लहानशा मुलुकांत याचानें बाळगवलें होतें.

# प्रकरण दुसरें.

## इ० स० १६६२ पासून १६८१पर्यंत.

या सुमारास औरंगझेबास पूर्वीं सांगितलेला कठीण आजार झाला होता, व तेणेंकरून त्याचा जीवास बराच धोका पोंचला होता. त्या पूर्वींच त्याणें आपला मामा शाइस्ते खान यास दक्षिणेंतील सरसुभ्यावर नेमिलें होतें; व तो सरदार हल्लीं औरंगाबादेस राहत होता.

शिवाजीचें मोगलांशीं वाकडें पडलें. इ०स० १६६२ चा अखेरीस. हि०स० १०७३.

शिवाजीचें मोगलांशीं कशानें वांकडें पडलें याचें कारण समजत नाहीं, परंतु विजापुरकरांशीं तह केल्यानंतर त्याचा घोडेस्वारांनीं औरंगाबादेजवळ जवळ पर्यंत मोगलांचा मुलुक लुटला, आणि त्याणें स्वतः जुनराजवळील त्यांचे किल्ले घेतले.

शाइस्ते खान त्यावर स्वारी करून गेला, व पुणें एथें राहिला.

हे हल्ले बंद करण्याकरितां शाइस्ते खान औरंगाबादेहून निघाला, आणि शिवाजीचा लश्करास पळवून, चाकणचा किल्ला घेऊन शिवाजी सिंहगडावर राहिला होता त्यापासून सहा कोशांवर तो शेवटीं पुणें एथें ठाणें धरून राहिला. त्याचा मुकाम पुण्यामध्यें असतां, शिवाजी जा घरांत लहानपणीं राहत असे त्यांतच तो राहिला होता; यामुळें तेथील जाग्याची सर्व माहिती शिवाजीस होती, ह्मणून त्याणें त्या आगंतुक मुसलमानास शिक्षा करण्याची युक्ति काढली. ती अशी:—कोणी शत्रूचानें पुढें येववूं नये, व एकस्या दुकट्या

मराठे लोकांसहि गावांत शिरूं देऊं नये, अशी शाइस्ते खानानें खबरदारी ठेविली होती. त्यामुळें आणि त्याचें सर्व लश्कर त्याचा सभोंवार छावणी देऊन होतें यामुळें आपण एरव्हींप्रमाणें स्वस्थ देशामध्यें निर्धास्त आहों, असें त्यास वाटलें; परंतु तेथें काय काय वर्तमान होतहोतें तें शिवाजीस कळत होतें. त्यामुळें एके दिवशीं रात्रीस काळोख पडल्यावर रस्त्यावर कुमकेस ठिकठिकाणीं पायदळाचा लहान लहान टोळया ठेवून, तो स्वतः सिंहगडाहून निघाला आणि २५ मावळे लोकांनिशीं शहरांत गेला. तेथें बाहेरून शहरांत एक लग्न जात होतें, त्यांतील मुख्य कारभाऱ्याशीं याचा पूर्वींचा संकेत होता; ह्मणून हाहि त्या वऱ्हाड्यांचा माळिकेंत मिळून आंत शिरला. नंतर शाइस्ते खानाचा पाहरा वटावला असें पाहून, तो समोर शाईस्ते खान राहत होता त्या घरीं गेला, आणि आंतील कोणीहि मनुष्यास आपणावर दगा येत आहे असा संशय येण्यापूर्वीं मागल्या वाटेनें आंत शिरला. शाइस्ते खान अगदीं बेसावध होता; मग हा घाला आला असें पाहून, तो आपल्या निजावयाचा खोलींतून खिडकीचा वाटेनें आंगण्यांत उतरून गेला; एवढी मात्र जीव बचावण्याची फुरसूद त्यास सांपडली; तथापि तो खिडकीवाटेनें उतरून जात असतां त्यास तलवारीचा घाव लागून त्याचीं दोन बोटें तुटून गेलीं. त्याचा मुलगा व त्याचे बहुतेक लोक, यांची शिवाजीनें कतल करून टाकिली, आणि जशा त्वरेनें तो आला होता, तसाच माघारा सिंहगडास गेला. वाटेनें जातांना जा त्याणें जागजागीं चौक्या ठेविल्या होत्या, ते लोक त्यास मिळाले.

शिवाजीनें रात्रीस केलेला पराक्रम.

नंतर तो मशाली लावून सिंहगडावर चढला; तेणेंकरून तो जी फत्ते करून गेला, ती मोगललोकांचा लश्करांत दृष्टीस पडली. हा पराक्रम त्याचा देशबांधवांचा स्वभावास फार पसंत यामुळें अद्यापि मराठे लोक शिवाजीचा सर्व पराक्रमांपैकी याचें वर्णन मोठ्या प्रेमानें करितात. यापासून कोणाचा कधीं ध्यानीं मनींहि नसतील असे परिणाम झाले; कारण हा अपाय होण्यापूर्वी, शाइस्ते खानाचा कुमकेस राजा जसवंतसिंग आला होता; त्याणें विश्वासघात केल्यामुळें हें संकट आपणावर आलें असा त्यास शाइस्ते खानानें दोष दिला. त्यामुळें, त्या दोघां सरदारांमध्यें कलह लागून तें लश्कर निर्बळ झालें. शेवटीं औरंगझेबानें शाइस्ते खानास काढून बंगालचा सुभ्यावर पाठविलें; आणि जसवंतसिंगाचा मदतीनें कारभार करण्याकरितां आपला मुलगा शाहजादा मोअझिम यास पाठविलें. तो शाहजादा येऊन पोंचण्याचा पूर्वी जसवंतसिंग सिंहगड सर करण्याविषयीं एक वेळ प्रयत्न करून तो तडीस न जातां औरंगाबादेस निघून गेला. इकडे जो मोगलांनीं आपणावर हल्ला केला होता, त्याचा पुरा सूड उगविण्याचा तयारींत शिवाजी होता. तो पहाडांमध्यें स्वाऱ्या करित असे तेव्हां त्याचा मुख्य जोर पायदळावर असे; परंतु विजापुरकरांचा लश्करामध्यें मराठे लोक हे घोडेस्वारांची नोकरी बजाविण्याविषयीं प्रख्यात असत. हें पाहून शिवाजीनें तशा कामांत त्यांस लावण्याचा निश्चय केला. नंतर आपण जिकडे जाणार तिकडील हकीकत कशी काय आहे ही बातमी काढून, आणि पुष्कळ

शाहजादा मोअझिम यास शिवाजीवर पाठविला.

शिवाजीनें सुरत लुटली. इ०स० १६६४ जान्यु आरि ता०५; हि०स० १०७४,जमादि अल असेर चं० १५.

खोट्याच स्वाऱ्या करून आपल्या शत्रूस ठकवून तो चार हजार घोडेस्वारांनिशीं अकस्मात् निघाला, आणि श्रीमान् परंतु निराश्रित अशा बापुड्या सुरत शहरावर एकदम जाऊन पडला. त्या मुलुकांत त्याची धांव पोंचणार नाहीं, असें लोकांस वाटत होतें. मग त्याणें तें शहर स्वस्थपणीं सहा दिवस लुटिलें. त्यास इंग्लीश व डच या लोकांनीं मात्र आपल्या वखारींवर येऊं दिलें नाहीं, आणि तेथेंच कांहीं एतद्देशीय सावकारहि येऊन लपून राहिले होते; तथापि त्याणें पुष्कळ लूट नेली, आणि ती आपल्या रेडी नामें किल्ल्यांत निर्भय ठिकाणीं ठेविली. हा किल्ला कोंकणांत आहे, त्यास **रायगड** असें ह्मणतात.

शाहजी मरण पावला.

त्याची दक्षिणहिंदुस्थानांतील जाहगीर.

या स्वारीनंतर लवकरच शाहजी मरण पावल्याचें वर्तमान शिवाजीस लागलें. तो ह्मातारा होता, तरी शिकार करावयास गेला होता; तेथें घोड्यावरून पडून मरण पावला. त्याणें आपल्या जाहगीरीचा पक्का बंदोबस्त केला होता, व विजापुरचा राजाचा नावानें दक्षिणेकडेहि आणखी मुलुक जिंकून घेतला होता. त्याचा मरणकाळीं, मद्रासेजवळील मुलुक, व **तंजोर** ह्मणजे **तंजावर** हें संस्थान, इतका देश त्याकडे होता.

शिवाजीचा समुद्रांतील लढाया.

नंतर शिवाजीची विजापुरकरांबराबर लढाई पुनः सुरू झाली; तेव्हां तो कोंकणामध्येंच मुख्यत्वेंकरून लढाया करित असे. तेथें त्याणें रायगडावर आपली राजधानी केली होती. नंतर त्याणें एक आरमार तयार केलें; पुष्कळ मोगलांचीं तारवें घेतलीं;

आणि एका वेळीं ८७ तारवांत ४,००० लश्कर चढविलें, आणि कानडा प्रांतांत एका दूरचा मकाणावर उतरून बारशिलोरनामक विजापुरचा ताब्यांतील मातबर बंदर लुटिलें, आणि जवळचा देशांतहि लूट केली. तेथें असा शत्रु येण्याचें कोणाचा ध्यानीं मनींहि नव्हतें. इकडे हें वर्तमान होत असतां, त्याणें घाटावरील लोकांस स्वस्थ राहूं दिलें नाहीं. विजापुरकरांचा मुलुक उध्वस्त करण्याकरितां त्याणें लश्कर पाठविलें, आणि आपण स्वतः मोगलांचा मुलुकावर स्वारी करून त्यांचा पुष्कळ नाश केला. या इजेनें औरंगझेबास इतका क्रोध आला नाहीं, परंतु सुरत शहर हें मक्केस जाणाऱ्या यात्रेकरू लोकांचें गलबतांत बसण्याचें ठिकाण होतें, त्यामुळें तें कांहीं सें पवित्र असें मानित असत. तें लुटल्यामुळें व कांहीं यात्रेकरू तारवांत बसून मक्केस जात होते तीं तारवें पकडल्यामुळें, औरंगझेबास विशेष क्रोध आला. या अपराधांचा भरीस शिवाजीनें आणखी भर घातली. ती अशीः— शिवाजी हा आपला बाप मेल्यानंतर लवकरच आपणास राजा ह्मणवूं लागला, आणि ( स्वतंत्र अधिकाराचें एक पक्कें चिन्ह नाणें पाडणें हें होय, त्याप्रमाणें हा ) आपल्या नावाचें नाणेंहि पाडवूं लागला.

इ०स०१६६५, फेब्रुआरि.

शिवाजी राजा झाला.

औरंगझेबास कांहीं हिंदुलोकांसंबंधीं अडचण आली, ह्मणजे त्या कारभारांत तो राजा जयसिंग याची योजना करित असे; सांप्रत त्याचाच हाताखालीं एक मोठी फौज देऊन त्यास त्याणें दक्षिणेंत पाठविलें. परंतु बादशाहाचा संशयी स्वभावामुळें याहि प्रसंगीं त्याणें अधिकार तोडून देण्याची

राजा जयसिंगास औरंगझेबानें त्याजवर पाठविलें.

शिस्त ठेविली, आणि दिलीर खानास त्याचा बरोबरीचा अधिकार देऊन त्याजबरोबर पाठविलें. या नेमणूकांनीं जसवंतसिंग व शाहजादा मोअझिम यांची नेमणूक रद्द होऊन ते परत दिल्लीस गेले. शिवाजी फारसा अडथळा करणार नाहीं, असें पूर्वींच औरंगझेबास वाटलें होतें, त्यामुळें त्यास जेर केल्यावर विजापुरचें राज्य जिंकण्याचा उद्योगास लागावें अशी जयसिंगास त्याणें आज्ञा केली होती.

हे सरदार फेब्रुआरि महिन्यांत नर्मदा उतरले, आणि

इ०स० १६६६. वाटेंत कोणी त्यांस आडवा न येतां ते पुण्यावर चालून आले. नंतर जयसिंगानें सिंहगडास वेढा दिला, आणि दिलीर खान पुरंदरास वेढा देता झाला. दोनहि किल्ले टिकाव धरून राहिले तथापि आपल्याचानें युध्द करून तड पोंचववेल अशी शिवाजीस आशा राहिली नाहीं असें दिसतें, आणि कांहीं वेळ आपण गर्व सोडून विजापुरकरांशीं लढाई करण्यामध्यें मोगलांस मदत केली असतां आपला कदाचित् फायदा होईल, या हितावर त्याणें बहुधा दृष्टि दिली असावी, असेंहि वाटतें. तें कसेंहि असो; परंतु शिवाजीनें जयसिंगाबरोबर बोलणें लाविलें, आणि बादशाहाकडून तुला अभय आहे, व मी तुजवर कृपाहि करीन असें सांगितलें. इतकें आश्वासन मिळाल्यानंतर तो गुप्तपणीं स्वतांचा फौजेंतून निघून थोड्या लोकांनिशीं राजा जयसिंगाचा छावणींत गेला. तेथें त्याचा मोठा सन्मान

शिवाजी मोगलांस शरण आला.

झाला, आणि शिवाजीनेंहि मी अतःपर इमानानें चालेन असें अति नम्रतेनें कबूल केलें. नंतर एक करारनामा झाला, त्यांत शिवाजीनें आपल्या बत्तीस किल्ल्यांपैकीं वीस किल्ले त्यांचा खालचा मुलुखासुद्धां द्यावे;

आणि बाकी राहिलेले बारा किल्ले व त्यांचा खालचा मुलुख व बाकीचे त्याचे सर्व प्रांत इतकें सर्व दिल्लीचा बादशाहाकडून जाहगिरीदाखल शिवाजीनें ठेवावें, आणि त्याचा मुलगा संभाजी यास दिल्लीचा सरकारांत पांच हजार स्वारांची असामी द्यावी असा ठराव झाला. त्या वेळीं संभाजीची उमर पांच वर्षांची होती. वरील फायद्याशिवाय विजापुरकरांचा प्रत्येक परगण्याचा जमाबंदीवर शेंकडा कांहीं टक्के मनोतीदाखल शिवाजीस हक्क करून दिला होता. बादशाहाचा या देणगीमुळें मराठे लोकांचा हक्क अनियमित होऊन पुढील कारकीर्दींतून परमुलुकावर वारंवार हल्ले करण्यास त्यांस निमित्तें मिळूं लागलीं. या ठरावांपैकीं शेवटचा खेरीज करून बाकीचे सर्व, ( औरंगझेबानें शिवाजीस पत्र लिहिलें होतें ) त्यांत स्पष्टरीतीनें मंजूर केले होते; शेवटचा ठरावाविषयीं कांहींच लिहिलें नव्हतें. तो जयसिंगावरावर विजापुरकरांशीं लढाईस गेला. नंतर २,००० घोडेस्वार व ८,००० पायदळ इतक्या लोकांनिशीं शिवाजी मोगलांस जाऊन मिळाला, आणि मग तें सर्व लश्कर विजापुरकरांवर चाललें.

या लढाईंत मराठे लोकांनीं चांगली तलवार मारिली. तो दिल्लीस गेला. लढाईस गेल्यानंतर औरंगझेबाकडून त्यास दोन पत्रें आलीं, त्यांतून एकांत चांगली चाकरी बजाविल्याविषयीं शाबासकी लिहून आली, व दुसऱ्यांत तुमची मोठी वढती केली जाईल असें मोघम वचन देऊन व तुम्हास परत दक्षिणेंत जाण्यास परवानगी मिळेल असें आश्वासन देऊन त्यास दिल्लीस बलाविलें होतें. इतकी त्याची तजवीज राहिल्यामुळें व जयसिंग फार मन

मोकळें करून त्याशीं वागत असे त्यामुळें, शिवाजीचें मन वळलें आणि आपली जाहगीर आपल्या तीन मुख्य आश्रितांचा हवालीं करून पांच शें निवडक घोडेस्वार व हजार मावळे लोक इतक्यांनिशीं आपला मुलगा संभाजी यास बराबर घेऊन, तो दिल्लीस निघून गेला.

औरंगझेबानें गर्वानें त्याचा सत्कार केला नाहीं.

पूर्वीं औरंगझेबानें पुष्कळ हिंदु रजवाडे आपले दोस्त करून ठेविले होते, त्याप्रमाणें जर तो या प्रसंगीं शिवाजीशीं निष्कपट रीतीनें वागून त्याचा व आपल्या हिताचें ऐक्य करून घेता, तर हाहि जो भयंकर शत्रु होता, तो एकनिष्ठ चाकर होऊन गेला असता. असें करण्याची औरंगझेबास संधि प्राप्त झाली होती; परंतु जसे धर्माचा बाबदींत त्याचे विचार कोते होते, तसेच राज्यकारभारांतहि होते, आणि त्वरित लाभाचा आशेनें जरी तो सहज आपले विचार दाबून ठेवित असे, तरी आपले दुराग्रह सोडून दुसऱ्याची सर्वकाळ आपल्यावर प्रीति बसे असें मन मोकळें करून, व भरपूर, त्याचा मनोगताप्रमाणें, त्यास द्यावें, असें याचा मध्यें सामर्थ्य नव्हतें. तशांत तो शिवाजीचा त्रास करित असे, व त्यास तुच्छहि मानित असे; आणि अशा हलकट पुरुषानें आपल्या धर्माची व आपल्या अधिकाराची अमर्यादा केली असें वाटून, ती अप्रतिष्ठा अधिक अशी त्यास जाचे; आणि त्याचा विचार असा होता, कीं शिवाजी हा आपल्या दरबारांत मशकासारखा लहान आहे, असें त्याचा मनांत बिंबवून दिल्यानें तो फार सुलभ रीतीनें रकमेस येईल; याप्रमाणें अशा पुरुषाशीं आपण वागावें म्हणजे नीट होईल, अशी जी औरंगझेबाची समजूत झाली, ती चूक होती.

पुढें जेव्हां शिवाजी दिल्लीशहराजवळ आला, तेव्हां बादशाहाचा विचार वर सांगितल्याप्रमाणें झाल्यामुळें राजा जयसिंगाचा मुलगा रामसिंग त्यास सामोरा आला. त्याजबरोबर बादशाहाचा एक हलक्या प्रतीचा सरदार होता. नंतर जेव्हां तो दरबारांत गेला, तेव्हां त्याचा आदरसत्कारहि त्याचप्रमाणें झाला. शिवाजीनें अतिशय मर्यादेनें मुजरा करून आपले नजराणे दिले, आणि चालीप्रमाणें नम्रतेनें व पडून वागावें असा बहुधा त्याचा उद्देश होता; परंतु जेव्हां त्याची कांहीं विचारपूस न करितां अप्रतिष्ठितासारखें तिसऱ्या प्रतीचा सरदारांत त्यास बसविलें, तेव्हां त्यास लज्जा प्राप्त होऊन जो संताप झाला, तो माईना. तो हिरवा पिंवळा झाला, आणि उमरावलोकांचा हारींचा मागें सरला; इतक्यांत त्यास भोंवळ येऊन तो जमीनीवर पडला; नंतर जेव्हां तो सावध झाला तेव्हां तुझा बापाचें वचन मोडिलें ह्मणून रामसिंगास तो लावून बोलला, आणि सरकारानें आपली अब्रू तर पूर्वींच घेतली, त्या अर्थीं आपला प्राणहि घ्यावा असें बादशाहास बोलून परवानगी न घेतां, व अशा प्रसंगीं जो सन्मानार्थ पोषाग देतात त्याचाहि स्वीकार न करितां माघारा गेला. याप्रमाणें शिवाजी निक्षून वागेल अशी औरंगझेबाची अटकळ नव्हती; परंतु हें वर्तमान झाल्यानंतर शिवाजी काय करिल असतो त्याजवर नजर ठेवावी, असा त्याणें हुकूम केला; आणि शिवाजीशीं जयसिंगानें कशा कबुलाती केल्या आहेत त्याविषयीं त्याजकडून हकीकत येण्याची मी वाट पाहत आहें, असें बाहेरून सांगूं लागला.

यानंतर आपली सुटका कोणचा रीतीनें करून जावें,

इकडे शिवाजीचें सर्व लक्ष लागलें. तशांत पुढें त्याचा घराभों-वतीं बादशाहानें पाहरे ठेवविल्यामुळें सुटून जाणें हें विशेष मुस्कीलीचें काम होऊन गेलें. नंतर आपल्या बराबरचा लोकांस दिल्लीची हवा मानत नाहीं असें त्याणें सांगून त्यांस स्वदेशास पाठविण्याची परवानगी मागितली; आणि तशी दिल्यानें तो पूर्वीचापेक्षां सरकारचा कब्जांत विशेष सांपडेल असें दिसून आल्यामुळें, ती गोष्ट बादशाहानें खुशीनें कबूल केली. ते गेल्यानंतर दुखण्याचें निमित्त करून त्याणें आंथरूण धरिलें, आणि जा हिंदु वैद्यांस त्यास औषध देण्याची बादशाहाची परवानगी होती, त्यांस वश करून, त्यांचा द्वारानें आपल्या बाहेरील मित्रांशीं त्याणें व्यवहार सुरू केला. दुसरें, मुसलमान धर्मांतील फकीर व हिंदूंतील साधु यांस वांटण्याकरितां मिठाई, व दुसऱ्या पदार्थांचा भेटी पाठविण्याचा त्याणें पाठ घातला. त्या भेटी मोठमोठाल्या टोपल्या व बुरडिवी पेटारे यांत भरून पाठवित असे, तेणेंकरून अशा टोपल्या जाण्यायेण्याचा त्या पाहेकऱ्यांस पाठ पडून गेला. शेवटीं आपल्या बाहेरील दोस्तांशीं बरोबर बंदोबस्त झाल्यावर एके दिवशीं सायंकाळीं तो स्वतः एका पेटाऱ्यांत लपून बसला, आणि त्याचा मुलगा दुसऱ्यांत बसला; आणि पाहेकरी लोकांमधून निघून गेला; परंतु त्याविषयीं कोणाचा मनांत संशय आला नाहीं. त्याचा बिछान्यावर एक चाकर निजून राहिला होता. तो पळून गेल्याचा वहमा पुष्कळ वेळपर्यंत आला नाहीं. इतक्यांत इकडे तो एका आड जागीं गेला, आणि तेथें घोडा तयार करून ठेविलेला होता त्यावर स्वार होऊन, आपल्या मुलास

शिवाजी कैदेंतून पळून गेला.

मागें बसवून, हर तऱ्हा करून मथुरेस जाता झाला. तेथें निरनिराळे वेष धारण करून त्याचे निवडक सोबती तयार होते, मग शिवाजीनेंहि आपली हजामत करवून, आपले कल्ले काढवून, आणि तोंडावरून राख फांसून बैराग्याचा वेष धरिला. नंतर आपल्या मुलास एका दक्षिणी ब्राह्मणाचा हवालीं करून, जा रस्त्यांनीं गेलें असतां आपल्या शत्रूंस अंगदीं अंदेशा येणार नाहीं, अशा वाटांनीं तो सोंग घेऊन दक्षिणेंत आला. तो दिल्लीहून निघाल्यापासून रायगडास पोंचे तों त्यास ९ महिने लागले. इतका पुष्कळ वेळ त्याचा पाठलाग करणारांस त्याविषयीं सावध राहण्यास मिळाला असून, त्यांचेंहि लक्ष चुकवून हा निसटून गेला; तेव्हां यास मोठी शिताफीच करावी लागली असावी.

रायगडास पोंचला. इ०स० १६६६, डिसेंबर.

शिवाजी पळून गेल्यानंतर लवकरच शाहजहान मरण पावला. त्यास आग्र्याचा बालेकिल्ल्यांत नेहमीं अटक ठेविलें असे; तथापि त्याचा मोठा सन्मान राखून त्यास पुष्कळ परिवाराची नेमणूक करून दिली होती, आणि राजवाड्यामध्यें त्याची सत्ता पूर्ण होती. एके वेळीं औरंगझेब दाराचा मुलीशीं आपल्या एका मुलाचें लग्न करण्याकरितां, त्या मुलीला राजमहालांतून नेत होता; परंतु याणें त्यास अटकाव केला. तसेंच कांहीं मोलदार सरकारी जवाहीर होतें तें आपणाजवळ असावें अशी औरंगझेबाची इच्छा होती तेंहि शाहजहानानें दिलें नाहीं; इतकी त्याणें आपल्या अधिकाराची सीमा केली. या

शाहजहान मरण पावला. इ० स० १६६६. डिसेंबर; हि०, स० १०७६, रजब.

बाबदींत औरंगझेबाचा व त्याचा भवति न भवतीचा पुष्कळ पत्रव्यवहार झाला.

औरंगझेबाचा राज्याचा उत्कर्ष.

या सुमारास औरंगझेबाचा भरभराटीचा कळस झाला. त्याचा सर्व प्रांतांत जिकडे तिकडे अगदीं स्वस्थता होती; त्याचा काश्मीरचा सुभेदारानीं नुकताच लहान तिबेट देश जिंकिला होता, आणि त्यापेक्षां वास्तविक विशेष फायद्याचा असा बंगालचा उपसागराचा पूर्वेकडील किनाऱ्यावरील चितगांव हा मुलुक बंगालचा सरसुभेदारानें घेतला होता.

याशिवाय बहुतेक जवळचा राजांकडूनहि याचा बराच सन्मान झाला होता. मक्का एथील अधिकारी, व दुसरे आरबस्थानांतील रजवाडे, हबसी देशाचा राजा, व उझबेगांचा खान, या सर्वांनीं औरंगझेबाकडे वकालती पाठविल्या होत्या; त्या सर्वांत इराणचा बादशाहाकडून अतिशय मोठी वकालत आली, आणि त्याबदल याणेंहि अलौकिक डामडौलानें परत नजराणे पाठविले; परंतु याप्रमाणें परस्परांकडे वकालती पाठवून आगतस्वागत केल्यामुळें कायम दोस्ती झाली नाहीं आणि कांहीं मानपानाविषयीं दोनहि बादशाहांमध्यें तकरार पडल्यामुळें इराणचा बादशाह दुसरा शाह अब्बास यास इतका क्रोध आला कीं, त्याणें लागलीच कंदाहाराजवळ फौज जमा केली. औरंगझेबहि त्याजबराबर युद्धार्थ स्वतः जाण्याचा मोठ्या मसलतींत होता, इतक्यांत तो शाह मरण पावून त्याचे सर्व बेत राहिले; असें यास वर्तमान लागलें.

औरंगझेबाची फौज विजापुरकरांवर गेली होती, ती

फसली; एवढा काय तो याचा भरभराटीस कमीपणा आला. त्या लढाईंत प्रथम जयसिंगाचा इच्छेप्रमाणें सर्व यथास्थित चाललें होतें; परंतु जसा त्याणें विजापुरकरांचा राजधानीस वेढा दिला, तसा त्यांणीं पूर्वीप्रमाणें युद्ध करण्याचा आरंभ केला, आणि आजूबाजूचा सर्व मुलुक ओस पाडून त्याचा लश्करास जी बाहेरून सामग्री येत असे, तिजवर घोडेस्वारांनिशीं हल्ले करून ती मारून नेऊं लागले. गोवळकोंडें एथील राजाहि आपल्या शेजाऱ्यास गुप्तपणें सहाय्य करित असे; तेव्हां आपणास जय मिळण्याचें चिन्ह दिसत नाहीं असें पाहून, जयसिंग मुस्कीलीनें औरंगाबादेस हटून गेला. जातांना त्याचें कांहीं नुकसानहि झालें. हें काम फसल्यानंतर त्यास त्या जाग्यावरून पादशाहानें दूर केलें. मग तो दिल्लीस जात असतां मार्गांत मरण पावला. त्याचा जागीं औरंगझेबानें शाहजादा मोअझिम यास, जसवंतसिंग मदतीस देऊन, पाठविलें, आणि दिलीर खान, हा त्या दोघांसहि मनापासून आवडत नसे, म्हणून त्या दोघांसहि आडकाठीसारखा त्यास तेथें राहूं दिलें.

जयसिंगानें विजापुरावर हल्ला केला; तो फसला.

तो मरण पावला.

मोअझिम व जसवंतसिंग हे परत दक्षिणेंत आले.

जयसिंगास अपाय झाल्यानें शिवाजीची पंढरी पिकली. जेव्हां जयसिंगाची लढाई चालली होती, व तो परत जाऊं लागला, तेव्हां त्याणें घाटाजवळील देशामधून आपलें सर्व लश्कर नेलें होतें; पुष्कळ किल्ले अर्जी रिकामे टाकून दिले होते; आणि बाकीचांत तरी म्हणावयाजोगे किल्लेकरी होते

इ० स० १६६७, हि० स० १०७७.

शिवाजीची चढती.

असें नाहीं. त्यांतून पुष्कळ, शिवाजी दक्षिणेंत दाखल होण्यापूर्वींच, त्याचा सरदारांनीं घेतले होते; आणि तो स्वतः पोंचल्यावर मग मराठे लोकांनीं पुष्कळच मुलुक घेतला.

त्याणें औरंगझेबाबरा-बर तह केला.

मोगलांचा सरदारांमध्यें जो बदल झाला, तोहि शिवाजीचा विशेष पथ्यावर पडला. तो असा कीं जसवंतसिंगाचें शाहजादा मोअझिम याजवळ पुष्कळ चालत असे; आणि तो जा सरकारची चाकरी करित असे, त्यापेक्षां हिंदुलोकांवर त्याचें विशेष लक्ष असे; त्यांतूनहि द्रव्यलोभास तो वश नव्हता असा नाहीं, असें ह्मणत असत. या सर्व कारणांमुळें शिवाजीनें त्यास आपल्या तर्फेचा करून घेतला, आणि त्याचा व शाहजादा मोअझिमाचा सहाय्यानें औरंगझेबापासून तह करून घेतला. त्यांतील करार याचा अतिशय उमेदीपेक्षांहि जास्त फायदेवार होते. त्या तहामुळें औरंगझेबानें शिवाजीचा बहुतेक मुलुक त्यास परत देऊन वऱ्हाडप्रांतांत नवीन जाहगीर दिली, त्याचा राजा असा किताब कबूल केला, आणि तेणेंकरून त्याचे सर्व पूर्वींचे अपराध औरंगझेब विसरून गेलासें दिसून आलें.

त्याणें विजापुर व गोंवळकोंडें एथील राजांपासून खंडणी घेतली.

याप्रमाणें आपल्या अतिशय बलाढ्य वैऱ्यापासून सुटल्यानंतर, शिवाजीनें विजापुर व गोंवळकोंडें एथील राजांवर शस्त्र धरिलें. तीं राज्यें आंतून निर्बळ झालीं असून त्यांस बाहेरून मोगलांची भीति होती; त्यामुळें शिवाजीसारिख्या भयंकर शेजाऱ्याबराबर नवीन कज्जा सांगण्यास नाखुश होऊन वार्षिकी खंडणी

देण्याचें त्यांणीं कबूल केलें, आणि या बेअब्रूचा उपायानें प्राप्त झालेलें अरिष्ट टाळलें.

शिवाजीचा राज्याचा आंतील बंदोबस्त. इ०स० १६६८ व १६६९, हि०स० १०७८ व १०७९.

यानंतर पुष्कळ दिवसपर्यंत शिवाजीस स्वस्थपणा सांपडला. तितक्यांत त्याणें आपल्या राज्याचा व्यवस्थेचा नीट घाट घातला. याचे कायदे चोरांचा राजासारखे नव्हते; उलटी मोगलबादशाहांपेक्षांहि याची शिस्त फार कडक व बेतवार होती; हें पाहून आपणास आश्चर्य वाटतें. त्याचा लश्करांत पायदळ व घोडेस्वार असे होते: त्यांचीं एकसारखीं पतकें करून, त्यांत दहा, पन्नास, इत्यादि, पाच हजारपर्यंत लोकांवर सर, असे निरनिराळ्या मतीचे सरदार क्रमानें दर पताकास नेमलेले असत. जेव्हां कोठे विवक्षित फौजेची तयारी होई, तेव्हां तिजवर जो मुख्य सरदार नेमी त्याचा मात्र या पांच हजारी सरदारांवर हुकूम असे, बाकी कोणाचा नसे. हे सरदार लोक जाहगीरदार नसत; परंतु सरकारचे चाकर असून त्यांचा हाताखालीं जें लश्कर असे, त्याची हजीरी व पगार सरकारचे कारभारी घेत देत असत. स्वार व सरदार या सर्वांस मोठे पगार मिळत; परंतु सर्वप्रकारची लूट त्यांस सरकारांत आणून हजर करावी लागत असे. आपल्या कारभारांतील प्रत्येक खात्यांत शिवाजी अतिशय सूक्ष्म नजरेनें खर्चाची काटकसर करित असे.

त्याचा दिवाणी अम्मलहि याचप्रमाणें नियमित असे, आणि तो आपल्या कामदार लोकांवर व गांवगंनाचा अधिकाऱ्यांवरहि तो अम्मल फार कडक चालवित असे;

आणि तेणेंकरून रयत लोकांवरील जुलूम बंद करून, राज्यांमध्यें दगाहि होऊं देत नसे. त्याचे दिवाणी अम्मलदार सर्व ब्राम्हण असत, आणि त्यांतून जे अतिशय मोठ्या हुद्यांवर असत त्यांस तो पुष्कळ वेळा लश्करी कामांतहि घालित असे. याप्रमाणें शिवाजीनें जी राज्याचा आंतील व्यवस्था ठेविली होती; तिजवरून तो मोठा बुद्धिमान् होता हें जसें कळून येतें, तसें त्याचा कोणत्याहि लश्करी पराक्रमावरून कळून येत नाहीं.

शिवाजीस फासांत पाडण्याचा औरंगझेबाचा मसलती.

शिवाजीबराबर फार दिवसपर्यंत लढाई चालविली असतां जीं खर्च व नुकसानी पोंचणार, तीं न पोंचतां तो पुनः आपल्या कब्जांत सांपडावा या आशेनें औरंगझेबानें वर सांगितल्याप्रमाणें त्यास देणग्या दिल्या; आणि आपला वास्तविक उद्देश सिद्ध करण्याकरितां तो याप्रमाणेंच नेहमींचा थंडाईनें उद्योग करित होता. शिवाजीशीं नेहमीं वळण ठेवावें, आणि संधि सांपडेल तीं जाऊं न देतां त्यास कैद करावें अशी त्याणें शाहजादा मोअझिम व जसवंतसिंग यांस आज्ञा केली; आणि आपल्या सरकारावर फितूर झाल्याचें सोंग घेऊन मराठ्यांशीं गुप्त रीतीनें निराळा तह करण्याचा कल दाखवावा असाहि त्यांस हुकूम होता; परंतु शिवाजीनें औरंगझेबाचे दांत त्याचाच घशांत घातले. मोअझिम, व जसवंतसिंग यांस लांचा व नजराणे देऊन त्याणें वश केलें, आणि त्यांस हातांत धरून औरंगझेबास ठकविलें. तो पादशाह तितका शहाणा होता, त्यामुळें आपला बेत फसला असें त्यास काळेंकरून उमगलें; आणि जेव्हां त्या गोष्टीविषयीं

इ० स० १६७०, हि० स० १०८०.

संशय न राहण्याजोगी त्याची खातरी झाली तेव्हां त्याणें शिवाजीस उघडपणें पकडण्याची आज्ञा केली; तेणेंकरून सहजच मोगलांची व शिवाजीची पुनः लढाई सुरू झाली.

औरंगझेबानें तह मोडला.

लढाई सुरू झाल्यावर शिवाजीनें प्रथम पुण्याजवळील सिंहगड किल्ला घेतला; हा पहिला तडाका मारिला. ती मोठी नाक्याची जागा, हें जसें शिवाजीस माहीत होतें तसें मोगलांचाहि लक्षांत आलेलें होतें; याकरितां तो किल्ला त्यांणीं एका अनुभवशीर सरदाराचा हाताखालीं राजपूतांचें मजबूद लश्कर देऊन राखिला होता. असें असतांहि, एके रात्रीस शिवाजीचा मोठा जिवलग मित्र तानाजी मालुसरा हा १००० मावळे लोकांनिशीं, पाहूं जातां चढण्यास अशक्य असा पहाड चढून किल्ल्याचा तटावर गेला, आणि छापा घालता झाला. ते प्रथम गेले तेव्हां पाहरेकऱ्यांस समजलें नाहीं; परंतु पुढें राजपूतांनीं मावळेलोकांबराबर मोठ्या हटाग्रहानें युद्ध केलें. शेवटीं मराठ्यांनीं त्या किल्लेकऱ्यांस जिंकिलें, आणि किल्ला घेतला. त्या कामांत तानाजी मालुसरा मरण पावला, आणि पुष्कळ मावळेलोकहि जायां झाले. हें काम कठीण व मोठें अगत्याचें असा शिवाजीचा विशेष ग्रह होऊन, जेवढे लोक वरील लढाईतून वांचले होते त्यांतून प्रत्येकास त्याणें एक एक रुप्याचें कडें बक्षीस दिलें.

शिवाजीनें सिंहगडावर छापा घातला.

त्याणें कांहीं किल्ल्यांवर हल्ले केले, ते फसले; परंतु दुसरे पुष्कळ सर केले, आणि पुष्कळ देश हस्तगत करून घेतला. तसेंच त्याणें सुरत शहर पुनः लुटलें, खानदेशांत लूट केली, आणि

त्याणें मोगलांचा मुलुक लुटला.

चौथाईचा कर (जाविषयीं पुढें मराठ्यांचा इतिहासांत विशेष प्रख्याति झाली आहे तो,) वसूल केला. चौथाई ह्मणजे महसूलाचा चवथा हिसा हमेशा द्यावा लागत असे, आणि जा देशांतील लोक तो देण्याचें कबूल करीत, तेथें तो नियमानें दिल्यास लूट होत नसे. याशिवाय शिवाजीनें एक मोठें आरमार तयार केलें, आणि आपले जुने शत्रू अंजीरकर हबशी यांजवर तो पुनः हल्ले करूं लागला. हे लोक विजापुरकरांचा आरमाराचे मुख्य, ह्मणून त्यांस त्या सरकाराकडून लहानशा संस्थानाची नेमणूक असे. हा हल्ला शिवाजीनें केला हें शहाणपण केलें नाहीं, कारण तेणेंकरून ते हबशी मोगलांचा आश्रयास जाऊन राहिले, आणि शिवाजीस भीति ठेवण्यासारखे असे तेवढेच शत्रु राहिले होते, त्यांची सत्ता या योगानें जास्त वाढली.

इ०स०१६७०, डिसेंबर; हि०स०१०८१. चौथाईविषयीं.

मोअझिमावर बेभरवसा झाल्यामुळें, औरंगझेब फार दिवसपर्यंत त्यास कुमक पाठवीना; तेणेंकरून त्याजवळ फौज कमती पडल्यामुळें, शिवाजीस पुढें लवकर सरसावतां आलें. शेवटीं दक्षिणेंत आणखी कांहीं लश्कर जरूर पाहिजे अशी औरंगझेबाची खातरी झाली. तेव्हां त्याणें मोहबत खानास ४०,००० लोकांनिशीं पाठविलें, परंतु तो मोअझिमापासून स्वतंत्रच होता. या नव्या सरदारावरहि औरंगझेब अगदीं खुश होता असें नाहीं. मोहबत खान दिल्लीहून निघण्याचा पूर्वीं कांहीं गोष्टींवरून औरंगझेबास त्याचा राग आला, तेव्हां त्यास त्याबाबद गुप्त रीतीनें निषेध करण्याविषयीं औरंगझेबानें एका प्रधानास आज्ञा केली. हें नवीन लश्कर

इ०स० १६७१, हि०स०१०८१.

आल्यामुळें तितका कांहीं उपयोग झाला नाहीं; कारण मोअझिम औरंगाबादेस स्वस्थ राहिला, आणि मोहबत खानानें कांहीं ठिकाणांस वेढे दिल्यानंतर पुढें पावसाळा आला, तेव्हां त्यासहि लढाई तहकूब करणें आलें. जेव्हां त्याणें पुनः लढाई सुरू केली तेव्हां त्याणें एका ठिकाणीं वेढा दिला होता. तो उठविण्याकरितां शिवाजीनें फौज पाठविली. मोहबत खानानें तो वेढा काईम राखण्याकरितां अविचारानें मराठ्यांशीं लढावयास लोक पाठविले. त्या वेळीं वीस हजार लोकांचा मराठ्यांनीं अगदीं मोड केला.

इ०स० १६७२, हि०स० १०८२.

शिवाजीचा लोकांनीं रणभूमीवर उभें राहून युद्ध केलें असें हें पहिलें; आणि मोगलांशीं युद्ध करून वास्तविक रीतीनें मिळविलेला जय असा हाच पहिला. या लढाईमुळें मोगलांचा मनांत शिवाजीविषयीं बराच ग्रह उत्पन्न झाला. त्यांणीं लागलेंच आपलें लश्कर एकाठिकाणीं औरंगाबादेस जमविलें, आणि औरंगझेबानें मोअझिम व मोहबत खान या दोघांसहि लवकरच माघारें बलाविलें, आणि गुजराथचा सरसुभेदार खान जहान याची त्यांचा जागीं नेमणूक केली. इतक्यांत औरंगझेबाचें

त्याणें लढाईत मोगलांस हटविलें.

खान जहान यास दक्षिणेंतील सरसुभेदार केला.

दक्षिणेंतील लढाईची जारी बंद पडली.

१ ही लढाई दिलीर खानाचा लश्कराबरोबर झाली असें कोणी ह्मणतात; मोहबत खानाचा लोकांबरोबर झाली, असेंहि कोणी म्हणतात; असा इजविषयीं संशय आहे. मोगलांचा फौजेंत निरनिराळ्या सरदारांची हुकमत चालत असे, त्यामुळेंच मोगलांचा पराजय झाला, व वरील अंदेशाचें कारणहि तेंच आहे.

लक्ष दुसरीकडे लागलें, त्यामुळें ही लढाई पुष्कळ वर्षें तशी-च पडून राहिली.

ईशान्येकडील अफगाणांशीं लढाईत औरंगझेब गुंतला.

यापूर्वीं काबूलाचा ईशान्येकडील अफगाणांबरोबर कांहीं दिवस लढाई चालली होती; ती मोठी वाढल्यामुळें औरंगझेबाचें लक्ष तिकडे लागलें; या लोकांशीं दोस्ती राखून असणें हें हमेशा मुस्कीलीचें काम असे; परंतु काबूलास व दुसऱ्या पश्चिमेकडील देशांस जाण्याचे मार्ग यांचाच मुलुकांतून असत, यामुळें कांहीं तरी तजवीज काढून त्यांचीं तोंडें बंद करावीं लागत असत; आणि जा लोकांचा मुलुक रस्त्यावर असे त्यांजवर पर शत्रूचा हल्ला येण्यासहि सुलभ असे, त्यामुळें कांहीं भीति दाखवून, व कांहीं नेमणूका करून देऊन, ते लोक सरासरी बादशाही सरकारास नमून राहत, अशी तजवीज करित असत. त्यांतून जा जाती विशेष बलाढ्य असत त्यांचा वाटेस हे जात नसत; त्यामुळें ते आपआपल्या हद्दींत स्वस्थपणीं असत. तथापि त्या लोकांमध्यें पुष्कळ लहान लहान जमाव पडले, आणि मोठ्या जमावांतीलहि राज्यांचा आंतील बंदोबस्त नरम पडला, यामुळें पुष्कळ वेळा कोणी फुटकळ लोक लुटालूट करित असतील. ती अमर्यादा बादशाही सरकारास सहन करणें जरूर होतें; परंतु औरंगझेबास आपल्या सत्तेचा अपमान सहन होत नसे, आणि त्यास अफगाणांचा स्थितीविषयीं कांहींच माहिती नव्हती; तेव्हां या बेकैद आचरणास त्या लोकांस त्यांचा सरदारांची आंतून फूस असेल असा यास अंदेशा आला असावा, असें नाहीं संभवतसें नाहीं. आतां याची कोणचा कारणानें अफगाणलोकांशीं फूट

पडली असेल, ती असो; परंतु युसफझै अफगाणांसुद्धां सर्व लोकांशीं याचा बेबनाव झाला. याप्रमाणें इ०स०१६६७ त हकीकत होती; तेव्हां मख्यात मीर जुमला याचा पुत्र अमीन खान यास औरंगझेबानें काबूलाचा सुभ्यावर नेमिलें. त्याणें या लोकांशीं युद्ध करून अशी फत्ते मिळविली, कीं तेणेंकरून कांहीं वेळपर्यंत त्या बखेड्यांची वाढ खुंटली; तथापि ते कधींहि अगदीं बंद झाले नाहींत. पुढें इ०स० १६७० त अफगाणलोकांनीं पुनः वर्चस्व संपादन करून, एका मोठ्या लढाईत अमीन खानास पराजित केलें; आणि त्याचा फौजेचा साफ नाश करून टाकिला. त्याचा बायका व मुलें हींहि अफगाणांचा हातांत सांपडलीं, तेव्हां त्यांबद्दल पैका भरून त्यांना सोडविणें भाग आलें. याच सुमारास अफगाणलोकांनीं एक नवा राजा उठवून त्याचा नावानें नाणें पाडिलें.

शेवटीं पादशाहानें स्वतः लढाई चालविण्याचा निश्चय केला; आपण हसन अब्दाल एथें कूच करून गेला; आणि शाहजादा सुलतान, जास त्यावेळीं कैदेंतून मोकळा केला होता त्याजबरोबर फौज देऊन पुढें पाठविता झाला. जा कडव्या मुलुकामध्यें गेलें असतां, तेथें मोठें युद्ध करून जय मिळविणें अशक्य, आणि मोठे पराजय मात्र होण्याचा संभव, अशा देशांत जाऊन आपल्या अब्रूस कदाचित् खामी होईल, या भीतीनें तो पुढें गेला नसावा, असा संभव दिसतो.

इ०स०१६७३, जान्युआरीचा सुमारास; हि० स०१०८३, रमझान.

या लढाईत औरंगझेबाचीं दोन वर्षांहून जास्त गेलीं,

इ०स०१६७३, सुमारें जान्युआरीपासून, इ०स०१६७५ आक्टोबरपर्यंत; हि०स०१०८३ रमझानपासून, हि०स०१०८६, जमादि चं० २, अथवा त्या सुमारापर्यंत.

आणि तो दिल्लीस परत आल्यानंतर ती लढाई त्याचा सरदारांनीं चालविली. पुढें हिंदुस्थानांत अधिक बखेडे झाल्यामुळें, आणि जयाची निराशा झाल्यामुळें सरासरी बंदोबस्त करून त्यास स्वस्थ बसावें लागलें. ही लढाई त्या वेळीं इतकी मोठी ह्मणावयाजोगी होती खरी, परंतु तिजपासून हिंदुस्थानाचा इतिहासामध्यें चिरकाळ राहण्याजोगा असा कांहीं परिणाम झाला नाहीं; याजकरितां जरी तिजमध्यें नाना प्रकारचा व मनोरंजक हकीकती घडून आल्या, तरी त्या एथें सांगण्यांत येत नाहींत. पूर्वीं अकबराचा कारकीर्दीत जा घडून आलेल्या बिना सांगण्यांत आल्या आहेत, त्यांवरून त्या लक्षांत येतील.[2]

इ० स० १६७६, हि० स० १०८७. औरंगझेब दिल्लीस परत आला.

सतनरामी बैराग्यांचें बंड.

ही स्वारी फसल्यानंतर औरंगझेब परत आला नाहीं, इतक्यांत दिल्लीजवळ एक चमत्कारिक बंड झालें. तो प्रकारः— सतनरामीनामक एका जातीचे हिंदु बैरागी नार्नोळ शहराजवळ राहत असत. ते मुख्यत्वेंकरून व्यापार व शेतकी करित असत; जरी ते बहुधा गडबड्ये नसत, तरी ते हत्यारबंद असत; आणि प्रसंग पडला असतां स्वरक्षणार्थ ते आपल्या शस्त्रांचा उपयोग करीत. त्यांतून एका जणानें पोलीसचा

२ खतक म्हणून जातीचा खुश खाल या नावाचा खान या लढाईत एक मुख्य योद्धा होता; त्याणें आपल्या देशबांधवांस स्वदेशाविषयीं स्फुरण यावें म्हणून, त्या वेळीं पुष्कळ काव्यें केलीं; तीं अद्यापि आहेत; व त्यामुळें या लढाईची गोडी विशेष लागत्ये. त्यांची वाणी गंभीर व उत्तेजक आहे, व

शिपायाबरोबर कज्जा केला होता. त्याचा सोबत्यांनीं जमाव करून येऊन त्या शिपायास मारिलें; तेव्हां पोलीसचा लोकांचा सूड उगविण्याकरितां, त्याणें आपले कांहीं भाईबंद जमा केले. त्यांचा कज्जा होऊन त्यांत कांहीं लोक मरण पावले. नंतर तो तंटा माजला, तेव्हां हजारों सतनरामी जमा झाले; तशांत त्या शहरचा मुख्य अम्मलदारानें त्यांशीं विरोध केल्यामुळें, त्याणें जे नेमणूकी लश्करचे व गांवखात्याचा शिबंदीचे लोक जमाविले होते, त्यांचा त्या वैराग्यांनीं पराजय केला, आणि शेवटीं नार्नौळ शहर घेतलें. त्यांजवर औरंगझेबानें दिल्लींतून पाठवावी तितकी पुरी फौज पाठविली नाहीं; त्यामुळें जी पाठविली तिचा पराजय होऊन, तेणेंकरून त्यांची उलटी कीर्ति वाढली. त्याचप्रमाणें पुनः एकदां झाल्यामुळें, सर्व मुलुकांतील लोक आश्चर्य करूं लागले. तशांत त्यांचें कांहीं स्वरूप धर्मविषयक असे, त्यामुळें यांजवळ जादू आहे असें लोकांस वाटूं लागलें. त्यांस तलवारी कापितनाशा झाल्या; व गोळ्या लागतनाशा झाल्या; असें असून त्यांचा मंत्रवलेल्या शस्त्रांचा घाय वारज जात नसे, असें म्हणत. हे अजिक्य आहेत अशी लोकांची जी समजूत झाली होती; तेणेंकरून ते खरोखरच अजिक्य होऊन गेले. आसपासचे पुष्कळ जमीनदार त्यांस सहाय झाले; कोणीहि लश्करचे लोक त्यांसमोर उभे राहण्यास धजतना. नंतर जेव्हां ते दिल्लीस येऊं लागले, तेव्हां औरंगझेबानें स्वतः युद्धाचा तयारीकरितां आपले डेरे तयार करण्याचा हुकूम दिला, आणि आपल्या लोकांवर जादू न चालावी म्हणून

---

स्वदेशप्रीति आणि स्वतंत्रता यांचा रस त्यांत भरला आहे; या गोष्टी एशियाखंडस्थांचा नेहमींचा क्रमाचा विरुद्ध आहेत.

निशाणांस लावण्याकरितां कुराणांतील वेंचे आपल्या हातानें कागदाचा तुकड्यावरून उतरले. पुढें खचितच लढाई देऊन त्यांस हटविलें पाहिजे, अशी जरूरच येऊन ठेपली; आणि पुष्कळ मुसलमान व हिंदु सरदारांनींहि प्रयत्न केले, तेव्हां बादशाही फौज त्यांसमोर लढावयास उभी राहिली. त्या लढाईंत बंडवाल्यांचा पराजय होऊन, व पुष्कळ नाश होऊन, वाताहत झाली; परंतु त्या लोकांचा पूर्वीं जय झाला होता, त्यामुळें पुष्कळ हिंदु वसाहतींचे लोक लोभाविष्ट होऊन उठले होते, तेणेंकरून सर्व अजमीर व आग्रा या दोन्ही प्रांतांत इतका गोंधळ झाला, कीं त्याचा बंदोबस्त करण्याकरितां स्वतः जावें असें औरंगझेबास वाटलें.

औरंगझेबाचा दुराग्रह.

सिंधुनदाचा पलीकडील अफगाणांचा बंदोबस्त न झाल्यामुळें याची तबियत खफा झालीच होती. त्यांत या बखेड्यांची भर पडल्यामुळें त्यास संताप आला. नंतर तो पुढें दिल्लीस असतां त्याणें हिंदुलोकांपासून जजिया ह्मणजे शिरगणतीचा कर पुनः घेण्याचें सुरू केलें. धर्मसंबंधीं दुराग्रहाचीं व राजनीतीस अयोग्य अशीं औरंगझेबानें पुष्कळ कृत्यें केलीं होतीं; त्यांची या कृत्यानें शिकस्त झाली.

तो गादीवर बसल्याचा दुसऱ्या वर्षदिवशीं (इ० स० १६५९ त), त्याणें सौरमानाचें वर्ष, हें अग्निपूजकांनीं शोधून काढलें असा दोष लावून, बंद केलें; आणि सर्व ठिकाणीं मुसलमानी चांद्रमानाचा वर्षाचा उपयोग करावा असा हुकूम फिरविला. वर्षाचा ऋतूंप्रमाणें पंचांग नसल्यापासून जे गैरफायदे होतात, त्यांविषयीं त्याचा सरकारी नोकरांनीं त्याशीं फार वेळ तकरार केली, तथापि तो

आपलाच निश्चय घेऊन उठला.

त्याच वेळीं सर्व पिठें, व जुव्याचा जागा, या मोडण्याकरितां आणि मूर्तिपूजेचा सर्व डामडौलाचें ढोंग बंद करण्याकरितां, त्याणें एक मुल्ला नेमिला, आणि त्याजबरोबर घोडेस्वारांचें एक पतक दिलें. नंतर फार दिवस झाले नाहींत तों महम्मदी धर्मशास्त्रामध्यें जे कर स्पष्ट रीतीनें सांगितले नव्हते, ते याणें बंद केले; आणि हिंदुलोकांचा मोठ्या यात्रांत विकरीचा जिनसावरील जे सर्व कर पूर्वीं घेत असत, त्यांच्या मूळच्या मूर्तिपूजेशीं संबंध असल्यामुळें ते अशुद्ध झाले असें समजून तेहि त्याणें मना केले. याची माफी जितकी अम्मलांत आली तितकीनें लोकांवर कमजवाद बोजा पडला; कारण जे मुसलमानी कायद्यामध्यें वर्ज केलेले कर होते, ते पेढीवाले सराफ लोक, मोठे व्यापारी, व शहरांतील राहणारे दुसरे लोक यांजवर पडत असत; ते लोक हा नवा ठराव झाल्यापासून बहुधा अगदींच सुटे पडले; आणि जमीनीचा धारा पूर्वींप्रमाणेंच राहिला, व जकात व रहदारीवरील कर, जे सर्वांमध्यें पाहूं गेलें असतां अतिशय त्रासदायक, ते कमी न होतां उलटे वाढून गेले.

त्याची हिंदुलोकांशीं त्रासदायक वर्तणूक.

आतां वास्तविक पाहूं गेलें असतां या फेरफारांमुळें रयतेस कांहीं सुख न होतां, सरकारचें मात्र भारी नुकसान झालें. जेथें जुलुमानें बंद झालेला कर घेतला असतां बादशाहाचा नजरेस येईल अशीं थोडीं ठिकाणें होतीं, तीं खेरीज करून बाकीचा जागीं तहसीलदार व जाहगीरदार लोक हे सरकारचा हिशेबांत मात्र माफी दाखवीत; परंतु आपल्या ताब्यांतील लोकांवरील कांहीं ओझें कमी न करितां

पहिल्याप्रमाणेंच घेत असत. कांहीं वर्षांनंतर हिंदुलोकांचा सणांचा दिवशीं यात्रा भरूं नये, असा त्याणें हुकूम केला; आणि त्याच सुमारास गाणें, नाचणें, व थट्टेबाजी करणें, हीं मना करण्याची आज्ञा केली; आणि सरकारवाड्यांत जे गवय्ये व बजवय्ये असत, त्यांस काढून टाकिलें. तशीच त्याणें फलज्योतिषविद्या बंद केली; आणि ती जाणणारे जे सर्व लोक दरबारांत होते त्यांस काढून टाकिलें. पूर्वीं कवीच्या मान करून त्यांस वर्षासनें मिळत असत; औरंगझेबानें त्यांचा आश्रय बंद करून, पादशाही कवीची जागा व नेमणूकी पगार होता तो बंद केला. कोणी कविता करूं नये व ह्मणूं नये, अशी औरंगझेबानें मनाई केल्याचें स्पष्ट रीतीनें वर्णन केलेलें आहे; परंतु हा त्याचा निकराचा बैरागीपणा थोडेच दिवस चालला असेल; कारण त्याचा स्वतांचाच चिठ्यांमध्यें व पत्रांमध्यें कवितांचे वेंचे पुष्कळ आहेत, आणि त्यांत समयविशेषीं त्याचेंहि, शीघ्र कवन आहे. त्याणें इतिहास लिहिण्याचाहि मना केला. ती मनाई मात्र फार दिवस चालली. पूर्वीं एक बादशाही तवारीख लिहिणारा वर्षावर्षाची राज्याची हकीकत नियमानें लिहून ठेवित असे, ती याणें बंद केली; आणि आपल्या राज्यांतील हकीकतीविषयीं कोठें लेख राहूं देण्याचें अगदीं तजविजीनें बंद केलें. त्यामुळें याचा कारकीर्दीचा अकराव्या वर्षानंतर याचा राज्यांत कसकसें वर्तमान झालें त्याचें धोरण, कामकाजसंबंधीं पत्रांवरून, व शिवाय कोणी खासगी लोकांनीं चोरून हकीकती लिहून ठेविल्या आहेत त्यांवरून मात्र लागतें. पुढें थोड्या वर्षांनंतर त्याणें मुसलमानलोकांत निम्मे जकात माफ केली, आणि हिंदुलोकांवरील तशीच ठेविली.

दुसरेहि त्याणें कांहीं सूक्ष्म फेरफार केले; त्यांत बादशाहास सलाम करण्याची रीति बदलली, आणि लोक आपल्या पायां पडूं लागतील या भीतीनें आपल्या वाड्याचा खिडकींतून प्रसिद्धपणें लोकांचा दृष्टीस पडण्याचें बंद केलें. या फेरफारांतून हिंदूंवर प्रत्यक्ष सक्ती होण्याजोगे असे जरी थोडे होते, तरी तेणेंकरून लोकांमध्यें संशयी व वाईट बुद्धि उत्पन्न झाली; आणि पूर्वीचा पादशाहांची शिस्त दोनहि धर्मांचा लोकांमधील भेद नाहींसा करून टाकण्याची होती, ती मोडून या चालीनें स्पष्ट दोन पक्ष पडले.

सांप्रत जे याणें आणखी ठराव केले, ते याहूनहि उघड रीतीनें दुराग्रहाचे होते. जा लोकांचे हक्क सरकारावर असतील, ते इनसाफाचा कोर्टांनीं घेऊन त्याचा मुसलमानी कायद्याप्रमाणें तपास करावा, *असा त्याणें प्रथम वाजवी ठराव केला*; परंतु त्याच वेळीं सर्व सुभेदार व दुसरे अधिकारी लोक यांस एकसहा हुकूम पाठविला, कीं यापुढें हिंदुलोकांस चाकरीस ठेवूं नये, आणि आपल्या हाताखालचा जवळचा सर्व जागा मुसलमानांसच द्याव्या. या हुकुमाप्रमाणें वहिवाट करणें बहुधा अगदीं मुस्कीलीचें काम होऊन गेलें; आणि बादशाहानें केलेले बहुतेक हुकूम कागदावर मात्र राहिले; व त्यांपासून लोकांमध्यें भीति व नाखुशी हीं निर्माण झालीं; दुसरा कांहीं परिणाम झाला नाहीं.

त्याणें पाखंडी लोकांवर जजिया ऊर्फ शिरगणतीचा कर पुनः सुरू केला.

वरील हुकमांमध्यें जशी ढिलाई झाली, तशी जजिया ऊर्फ शिरगणतीचा कर घेण्याची ढील झाली नाहीं. जेव्हां प्रथम मुसलमानलोक स्वाऱ्या करूं लागले, तेव्हां जे लोक त्यांचा धर्मावर विश्वास ठेवित नसून त्यांचा ताब्याखालीं येत, त्यांवर हा शिरगणतीचा कर बसवित असत;

आणि त्यावरून किती धर्मबाह्य लोक आपल्या सत्तेखालीं आले, व अद्यापि आपले शत्रु किती आहेत, याची ते पारख करित असत. हा कर पुनः सुरू केल्यामुळें हिंदुलोकांत अतिशय नाखुशी उत्पन्न झाली. जे लोक दिल्ली एथें व त्या शहरचा आसमंतात् भागचा प्रदेशांत होते त्यांचे थव्यांचे थवे जमून ते आपल्या फिर्यादी व गाऱ्हाणीं घेऊन राजवाड्यासभोंवती जमले; परंतु त्यांचा तकरारींकडे बादशाहानें कांहींच लक्ष पोंचविलें नाहीं. दुसऱ्या शुक्रवारीं जेव्हां तो मशीदींत जाऊं लागला, तेव्हां अर्जदार लोकांचा समुदाय जमून तेणेंकरून सर्व रस्ते बंद पडून गेले, असें त्याणें पाहिलें. कांहीं वेळपर्यंत सामोपचारानें आपणास वाट मिळेल या आशेनें तो उभा राहिला; परंतु ते लोक आपलेंच धरून राहिल्यामुळें याणें आपल्या परिवारास सक्तीनें रस्ता खुला करण्याची आज्ञा केली; तेव्हां पुष्कळ लोक हत्तींचा व घोड्यांचा पायांखाली तुडवून मेले गेले. या कडक वर्तणूकेनें लोकांस दहशत पडली, आणि पुढें कांहीं ना हो न म्हणतां ते तो कर देऊं लागले.

इ० स० १६७७, हि० स० १०८८. सर्व हिंदुलोक हवालदिल झाले.

वरील पिसाट कृत्यांचे परिणाम लवकरच दृष्टीस पडूं लागले. औरंगझेबाचा करकीर्दीचा शुरुवातीस हिंदुलोक मुसलमानांप्रमाणेंच मन लावून सरकारची चाकरी करित असत, आणि आपल्या धर्मांतील लोकांचा विरुद्धहि कामें बजावित असत; परंतु ही नवीन शिस्त जसजशी त्यांचा अनुभवास येऊं लागली तसतशी त्यांची राजप्रीति कमी होत गेली. खुद्द बादशाहाचा राज्यांतील लोकांमध्यें असंतोष पसरला; राजपूतलोक बेदिल होऊन गेले, आणि

दक्षिणेंतील सर्व हिंदुलोक मनापासून मराठ्यांचा पक्षाचे झाले.

हा जजिया कर सुरू केल्यानंतर थोड्या महिन्यांनीं एक गोष्ट घडून आली, तेणेंकरून या धर्मसंबंधीं वैमनस्यांची आग पेटली. ती गोष्ट अशी कीं:— राजा जसवंतसिंग हा काबूलचा सुभ्यावर असतां मरण पावला. त्यामागें त्याची विधवा स्त्री व दोन लहान मुलें होतीं. ती स्त्री बादशाहाचा हुकुमाशिवाय, अथवा परवान्याशिवाय लागलीच हिंदुस्थानांत यावयास निघाली. तिला सिंधुनदावर अटकाव झाला, तेंव्हां तिचा बराबरील लोकांनीं अटक एथील पाहरेकरी लोकांशीं युद्ध करून सक्तीनें जाण्याचा प्रयत्न केला, आणि शेवटीं एका उतरणावर बंदोबस्त नव्हता तेथून निघून गेले. या जबरदस्तीमुळें जसवंतसिंगाचीं मुलें अटकावून धरण्याचें औरंगझेबास निमित्त मिळालें. त्याणें त्यांस दिल्ली शहरांत येण्याचें मना केलें, आणि त्यांचा छावणीसभोंवते आपले स्वार बसविले.

राजा जसवंतसिंगाचा विधवेवर व मुलांवर जुलूम.

असें असतां या प्रसंगीं राजपूतलोकांनीं आपल्या नेहमींचा शौर्याखेरीज मोठी हिकमत केली. त्यांच्या पुढारी दुर्गादास, याणें तिचा परिवारांतील कांहीं लोकांस त्यांचा बायकांमुलांसुद्धां त्यांचा मुलुकांत पाठविण्याची परवानगी घेतली. त्या लोकांबराबर राणी आणि तिचीं मुलें यांचे वेष बदलून त्यांस पाठविलीं; आणि त्या राजपुत्रांबदल त्याच वयाचे दोन मुलगे व राणीचा ठिकाणीं तिची एक दासी, यांची योजना केली. हें सर्व करण्यास जनानखाने गुप्त असल्यामुळें विशेष

तीं दिल्लीहून पळून गेलीं.

सुलभ झालें. इतकी खबरदारी झाली, तरी औरंगझेबास थोडक्या वेळांत वहमा आला. तेव्हां राणी व तिचीं मुलें यांस बालेकिल्ल्यांत आणावें असा त्याणें हुकूम पाठविला; परंतु ते राजपूतलोक आपल्या राजाची विधवा स्त्री व मुलें हीं त्याचा स्वाधीन करीतना, आणि त्यांचा रक्षणाकरितां आम्ही आपला प्राणत्याग करूं असें ते सांगूं लागले. हा त्यांचा हटाग्रह पाहून त्या वेळीं तीं पळूनच गेलीं असतील अशी, तेवढ्या वेळापुर्ती, याची भीति नाहींशी झाली; आणि पुढें त्या उरलेल्या राजपूतलोकांचा बंदोबस्त कसा करावा या विचारांत तो पडला. त्यांजवर औरंगझेबानें लश्कर पाठविलें तें त्यांणीं मोठ्या शौर्यानें हटविलें. शेवटीं ते बहुतेक लोक पडल्यानंतर ती वेषधारी राणी व तिचीं मुलें बादशाहाचा हातांत सांपडलीं, आणि दुर्गादास व दुसरे निभावलेले लोक त्या वेळापुर्ते चोहींकडे पळून गेले, आणि तेथून कांहीं पल्ल्यावर पुनः एकत्र जमून स्वदेशास जाते झाले. याप्रमाणें त्या लोकांनीं फार वेळ टिकाव धरल्यामुळें राणीस निसटून जाण्यास फुर्सद सांपडली. ती सुरक्षित जोदपुरास येऊन पोंचली. पुढें तिचा वडील पुत्र अजीतसिंग दीर्घायुषी होऊन मारवाडदेशांत राज्य करिता झाला, आणि पुढें औरंगझेब मरे तावत्काल त्यासहि भारी शत्रु झाला. अजीतसिंग हा जसवंतसिंगाचा खरा पुत्र, कीं नाहीं, याविषयीं पुष्कळ दिवसपर्यंत संशय राहिला होता; कारण औरंगझेबानें आपल्या साहजिक धूर्ततेनें वर सांगितल्याप्रमाणें धरून नेलेलीं बनावू मुलें तींच जसवंतसिंगाचीं खरीं मुलें म्हणून त्यांचा स्वीकार केला; त्यांचें सन्मानानें सांगोपन करण्याची आज्ञा केली, आणि

पुढें त्यांस हाताशीं धरून त्यांचा निमित्तानें **जोदपुरकरां** शीं लढाई मारिली.

याप्रमाणें आपल्या जमातीमधून एकाचा कुटुंबाची पादशाहानें अपेक्षा केली ती पाहून, व जजीया कर हाहि बसविल्यामुळें, त्या **राजपूतांनीं** स्वरक्षणार्थ एकत्र होण्याचें मनावर धरिलें. **अंबर** ह्मणजे **जयपुर** एथील राजा **रामसिंग** याचा बादशाहाचा कुटुंबाशीं पुष्कळ सोईरगती झाल्या होत्या, आणि पुष्कळ पिढ्यांपर्यंत त्यांणीं चांगली चाकरीहि बजाविली होती. तो राजा या अडचणीचा प्रसंगींहि बादशाहास मिळून राहिला; परंतु **मेवाडचा** ह्मणजे **उदेपुरचा** राणा **राजसिंग** हा जसवंतसिंगाचा मुलांचा पक्षांत मनापासून शिरला, आणि त्याच वेळीं जजिया कर मी देणार नाहीं असें बादशाहास निक्षून सांगता झाला. त्या वेळीं सर्व पश्चिमेकडील **राजपूतसंस्थानें** आपणास आड आलीं असें पाहून, **औरंगझेब** लश्कर जमा करून **अजमीरास** आला. तेथून त्याणें **मारवाड** प्रांत उध्वस्त करण्याकरितां पुढें टोळ्या पाठविल्या, आणि बाकी राहिलेल्या आपल्या मुख्य फौजेनें त्या राण्याचा मनांत इतका ग्रह उत्पन्न केला, कीं त्याणें लवकरच मी शरण येतों असें बोलणें घातलें. त्याशीं **औरंगझेबानें** चांगला सामोपचाराचा ठराव केला; जजियाबद्दल थोडा मुलुक घेण्याचें कबूल केलें, आणि मी जोदपुरकरांस मदत करणार नाहीं, एवढें वचन घेतलें. याशिवाय त्याजवळून दुसरा कांहीं करार करून घेतला नाहीं.

राजपूतलोकांचा कट.

त्यांजवर बादशाह चालून आला.

इ०स० १६७९ जान्युआरि; हि० स० १०८९ झिल्हाज.

मेवडचा राण्यास फार झीज न देतां त्याशीं बंदोबस्त केला.

हा बंदोबस्त पुरा करून दिल्लीहून निघाल्यापासून आठ महिन्यांचा आंत बादशाह पुनः दिल्लीस परत गेला.

उदेपुरचा राण्यानें तह मोडला. इ०स० १६७९ जुलै; हि० स० १०९० रज्जब

तो राजधानीस पोंचला नाहीं इतक्यांत उदेपुरचा राण्यानें ( बहुधा गुप्त रीतीनें जोदपुरचा राजास मदत देऊन ) तह मोडिला. तेव्हां तो थोडक्या महिन्यांत पुनः अजमीरास जाण्याकरितां निघाला. या प्रसंगीं त्याणें आपलें सर्व सामर्थ्य खर्चून आपणावर केलेला कट लवकर मोडण्याकरितां आपल्या सर्व शक्ति योजिल्या; त्याणें शाहजादा मोअज्झिम यास दक्षिणेंतून व शाहजादा अज्झीम यास बंगाल्यांतून, असे बलाविले, आणि पुढें गुजराथचा बाजूनें राजपूतसंस्थानांवर हल्ला करण्याकरितां तिकडील सरसुभेदारास आज्ञा केली; परंतु आपल्या स्वतांचा फौजेपैकीं शाहजादा अकबर याचा मदतीस तोहवर खान यास देऊन याणें जे लोक थेट उदेपुरास पाठविले त्यांणीं मोठा हल्ला केला. तेव्हां चोहोंकडून लश्कर चालून आल्यामुळें, तो राणा भिऊन आपली राजधानी सोडून आरावली पर्वतांत लपून राहिला. इकडे शाहजादा अकबरानें सपाट मुलुकाचा नाश करून टाकण्यास कांहीं लोक आपल्या मागें ठेवून, आपण त्या राण्याचा पाठलाग करित गेला. या सुमारास शाहजादा मोअज्झिम येऊन उज्जनीस पोंचला. त्यास त्याचप्रमाणें करण्याविषयीं औरंगझेबानें हुकूम केला. मागून शाहजादा अज्झीम आला, तेव्हां त्यास जोदपुर संस्थान व त्या नजीकचा उदेपुरचा मुलुक इतक्यावर हल्ला करण्याचा हुकूम झाला. जे लोक पहाडांमध्यें पळून गेले होते, त्यांचीदाणापाणी वगैरे सामग्री वाटेंत लुटून पाडण्यास

कांहीं लोक लावावे, आणि बाकीचे घेऊन मुलुक ओसाड करून टाकावा, गांव फडशा करून टाकावे, फळझाडें तोडून टाकावीं, आणि बायका मुलें पकडून न्यावीं; आणि याप्रमाणें लढाईचीं दुःखें अतिशय कठीण रीतींनीं शत्रूचा अनुभवास येतील असें करावें याप्रमाणें त्यांस हुकूम होते.

राजपूतांचा मुलुकाचा विध्वंस झाला.

हे असे निर्दय हुकूम औरंगझेबानें आपल्या पाषाणवत् कठीण राज्यरीतीनें दिले असावे, हें अनुमान औरंगझेबाचा स्वभावाशीं मिळून येतें; आतां त्याची चाल मागें पुढें पाहून हिशेबानें चालण्याची असे, तथापि त्याचा धर्माभिमानामुळें, व कोणी विरोध केला असतां त्यास त्रास उत्पन्न होत असे यामुळें, कांहीं राग व सूड उगविण्याची इच्छा हींहि यास वरील कर्मास उद्युक्त करण्यास कारणीभूत झालीं असावीं. आतां त्याचा उद्देश कोणताहि असो; परंतु तेणेंकरून राजपूतलोकांचें मन त्यावरून पुरें उठून गेलें. पुढें औरंगझेबामागून झालेल्या पादशाहांशीं पुष्कळ वेळा ते सख्यानें होते, आणि केव्हां केव्हां ते आपलीं पतकें पाठवून दिल्लीचा पादशाहांचें वर्चस्व कबूल करित असत; तथापि जशी यांची पूर्वीं मनःपुरःसर प्रीति असल्यामुळें दिल्लीचा राज्यास यांचा टेंका असे तो नाहींसा होऊन ते जी पुढें चाकरी करीत, ती जुलुमानें व भरवसा न ठेवितां करित असत.

राजपूतलोकांचें व मोगलांचें अगदीं बिटलें.

हें सर्व होत आहे, तों इकडे राजपूतलोकांनीं २५,००० घोडेस्वार जमवून लढण्याकरितां तयार ठेविले होते; ते मुख्यत्वेंकरून जोदपुरचे राठोर लोक होते; ते व त्यांचा मदतीस पहाडांमध्यें त्यांचें पायदळ असे तें मिळून, ते

आपल्या शत्रूंस पुष्कळ दुःख देत असत, व त्यांस कांहीं जोखमांतहि आणीत. ते मोगलांचा सामग्री आणणाऱ्या लोकांस तोडून पाडीत; त्यांचा फुटून सांपडलेल्या टोळ्यांवर हल्ले करीत; जेथें चांगलें ठिकाण सांपडे तेथें लढाया मारीत; आणि केव्हां केव्हां छापे घालून व रात्रीचे हल्ले करून पुष्कळ कार्य साधीत. तथापि दुर्गादास हा अद्यापि त्यांचा मसलतींत पुढारी होता, तो आपल्या देशास शत्रूंचा हातून सोडविण्याकरितां केवळ आपल्या बळावरच भरवसा ठेवून राहिला नाहीं. त्याणें शाहजादा मोअझिमाजवळ बोलणें सुरू करून, तुला स्वतांस गादी मिळविण्यास मी मदत करीन असें सांगून, बादशाहाचा हुकमतींतून त्यास फितविण्याचा त्याणें प्रयत्न केला. मोअझिम हा त्या वेळीं प्रौढ असून औरंगझेबाचा मागें गादीचा वारिस होता; असें असून, तोहि या लोभानें कांहीं वेळ मोहित झाला; परंतु शेवटीं त्याणें तें नाकबूल केल्यावर शाहजादा अकबर याणें तें मोठ्या उत्सुकतेनें कबूल केलें. अकबर हा या तिघां भावांत धाकटा होता; त्याची उमर त्या वेळीं केवळ तेवीस वर्षांची होती, आणि तो लहान होता, तेव्हां औरंगझेबानें त्यास आपल्यामागें वारीस निवडून ठेविला आहे असें सर्व मानित असत; तो एकदम दुर्गादासाचा मसलतींत शिरला. त्या वेळीं जीं फितूरें चाललीं होतीं त्यांविषयीं मोअझिमानें बादशाहास सावध केलें; तथापि औरंगझेबाची अकबरावर प्रीति असे, आणि त्याची उमर लहान यामुळें त्यापासून भीति नाहीं असें यास वाटत असे. तशांत

शाहजादा अकबर हा आपल्या फौजेनिशीं राजपूतांस मिळाला.

मोअझिमाविषयीं तर त्याचा मनांत अतिशय द्वेष असे; यामुळें जें वर्तमान मोअझिमानें कळविलें, तें हेवा किंवा दुसऱ्या कांहीं वाईट बुद्धीनें कळविलें, असा याणें निश्चय केला; आणि अकबराचा जवळ येऊन दुर्गादासानें डेरे दिले, आणि त्याणें बादशाहाचा किताब घेऊन तो तें काम करूं लागला, हें त्याचा कानीं येईपर्यंत अकबराचा बेइमानीपणाविषयीं याणें कांहीं तजवीज केली नाहीं. त्या वेळीं तोहवर खान हा अकबराचा मुख्य प्रधान झाला, आणि मजाहिद खान नामें दुसऱ्या एका मानकऱ्यानेंहि एक हुद्दा पतकरिला. तेव्हां बाकीचा फौजेमध्यें कोणी पुढारी नाहींसा होऊन, ते लोक जांचा पूर्वीं हुकमतीनें वागत होते त्यांसच नमून राहिले.

तो बादशाह झाला, अशी द्वाही फिरविली.

त्या वेळीं औरंगझेबानें आपले सर्व लोक निरनिराळ्या टोळ्या करून पाठवून दिले होते, आणि त्याजवळ अजमीरास पुरे एक हजार लोकहि नव्हते. असें असतां अकबर आपणावर भरघोसानें येत आहे असें जेव्हां त्याणें ऐकिलें, तेव्हां जितके लोक जमववतील तितके जमवून त्यांनिशीं यावें, असें त्याणें मोअझिमास बोलावणें पाठविलें; परंतु त्या वेळीं अकबराची ७०,००० फौज जमली होती, त्यापुढें मोअझिमाची कांहींच नाहीं अशी होती. त्या वेळीं औरंगझेबाची स्थिति निराश दिसत होती. तशांत त्या प्रसंगीं त्याचा मनांत मोअझिमाविषयीं पूर्वींचे संशय उत्पन्न झाले, त्यामुळें त्याचा फौजेवर आपल्या तोफा लागू करण्याचा त्याणें हुकूम केला; तेणेंकरून,

अकबर औरंगझेबावर चालून गेला.

बादशाहाची भयप्रद स्थिति.

याची स्थिति अधिकच अवघड होऊन गेली. हा गडबडून जाण्याचा प्रसंग असतांहि त्या वेळीं औरंगझेबाचें धोरण नाहींसें झालें नाहीं; आणि अकबराचा फौजेंतील बहुतेक लोक अवचट प्रसंग गुजरल्यामुळें बंडाळ्यांत पडले आहेत, वास्तविक बेदिल झाल्यामुळें त्यांणीं तसें केलें नाहीं, असें अनुमान करून, मजाहिद खानाचा भाऊ एक हुशार सरदार होता त्यास थोड्या घोडेस्वारांनिशीं शत्रूंचा जवळ जाववेल तितकें जाऊन आपल्या भावाशीं बोलणें लावण्याचा यत्न करण्याकरितां त्याणें पाठविलें. मजाहिद हा मुळींच अकबरास मनापासून मिळाला नव्हता; त्यास ही प्रथमची संधि मिळतांच तो आपल्या भावास येऊन मिळाला.; त्याचें पाहून दुसऱ्याहि सरदारांनीं तसें केलें. नंतर सर्वांची इच्छा तशीच आहे, असें इतक्या स्पष्ट रीतीनें दिसून येऊं लागलें कीं, दुसऱ्या दिवशीं जेव्हां आघाडीचा लोकांनिशीं तोहवर खानास पुढें पाठविलें, तेव्हां तो, समोर आलेल्या लोकांबरोबर लढाई करण्यास असें दाखवून, पुढें सरसावला, आणि एकदम बादशाहाचा बाजूस जाऊन मिळाला. तो विश्वासघात करण्याचा उद्देशानें बादशाहाकडे गेला असा त्याजवर वहमा आला, तो खरा किंवा निमित्ताकरितां आणिला अथवा खचितच त्याचा मनांत असा बेत होता, हें स्पष्ट समजत नाहीं; परंतु त्याचा मनांत तसें होतें हें अगदीं असंभाव्य आहे. तें कसेंहि असो, परंतु मारेकरी घालून बादशाहास मारण्याचा त्याचा बेत आहे अशी कंडी उठली; आणि त्याजवळ त्याचीं हत्यारें मागूं लागले; तीं तो हवालीं करीना तेव्हां त्याजवर बलात्कार करून बादशाहाचा डेऱ्यानजीक

त्याचें धारिष्ट.

अकबराची फौज त्यास सोडून गेला.

त्यास कापून टाकिलें.

इकडे तोहवर खान व दुसऱ्या सर्व मतींचे पुष्कळ लोक फितूर होऊन गेल्यामुळें अकबराचा लश्करांतील राजपूत भयाभित होऊन गेले, आणि सर्व मुसलमान फौजेशीं टकर मारण्यास आपणच कायते एकटे राहिलों असें पाहून, शेवटीं ते आपलें रक्षण करण्याचा उपायास लागले. त्या वेळीं तीन हजार घोडेस्वारांनिशीं दुर्गादास हा मात्र, शाहजादा अकबर मार्गे जावयास लागला असतां, त्याचा पाठीवर संरक्षणार्थ राहिला होता; परंतु त्याजवळ एकहि मुसलमान शिपाई राहिला नव्हता. तेव्हां राजपूतलोकांबरोबर त्यांचा प्रमाणें कष्ट भोगावे लागतील एवढेंच काय तें त्यांपासून मिळावयाजोगें होतें; म्हणून पहाडांतून गुजराथेंत कूच करून, पाठलागास लश्कर आलें होतें त्याचा हातून निसटून, तो कोंकणांत येऊन सुरक्षित पोंचला. त्या वेळींहि पांच हजार राजपूतांनिशीं दुर्गादास त्याबरोबर होता.

अकबर मराठ्यांकडे पळून गेला.

इ० स० १६८१, जून ता० १.

हें वर्तमान झाल्यानंतर जोदपुर व उदेपुर या संस्थानांशीं पूर्ववत् लढाई चालू झाली. ती अगदीं कमी न पडतां पुढें चालली. मोगललोक देशाचा विध्वंस करूं लागले, त्याचा सूड उगविण्याकरितां राजपूतलोक माळव्यांत लूट करूं लागले. शेवटीं त्यांचा छलकांप्रमाणें त्यांची दुराग्रही वृत्ति होऊन ते राजपूतलोक मशीदी लुटूं लागले, कुराणें जाळूं लागले, व मुल्लालोकांची अप्रतिष्ठा करूं लागले. या रीतीनें युद्ध चालल्यामुळें उदेपुरचा राण्याचें मुख्यत्वेंकरून नुकसान झालें,

राजपूतलोकांबरोबर पुढें लढाई लांबत चालली.

कारण त्याचा सुपीक मुलुक मोगलांचा अति नजीक पडला, व त्यांचें लश्करहि त्यांत ठाणें धरून राहिलें होतें; जोदपुरचा देश दूर पडला असून नापीक होता, यामुळें त्यावर अशी छाप बसण्याजोगा तो नव्हता. या लढाईमुळें औरंगझेबास दुसरीं मोठीं कामें एकीकडे ठेवावीं लागलीं; त्यामुळें तो ती संपविण्यास खुश होता, तेव्हां त्याणें युक्ति करून राण्याकडून बोलणें घालविलें, आणि तें आपण लागलेंच राण्यास सुलभ पडे अशा रीतीनें कबूल केलें. जजियाचें काहींच बोलणें निघालें नाहीं, त्या कराबदल जो थोडा मुलुक पूर्वी राण्यानें दिला होता, तो हल्लीं शाहजादा अकबरास मदत केल्याबदल दंडादाखल बादशाहास सांप्रत पुनः दिला. बाकी सर्व ठरावाचीं कलमें त्या राण्याचा हिताचींच होतीं. त्यांत अजीतसिंग हा मोठा झाला ह्मणजे त्याचा मुलुक त्याचा हवालीं करीन असें औरंगझेबानें एका कलमांत वचन दिलें, तेणेंकरून उदेपुरचा राण्याचा सत्वाचें रक्षण झालें. हा तह झाल्यामुळें औरंगझेबास फजीती झाल्याशिवाय दक्षिणेंत फौज घेऊन जाण्यास सांपडलें; कांकीं तिकडे तर फौजेशिवाय चालत नाहींसें झालें होतें, तथापि या तहानें पूर्वीप्रमाणेंच वास्तविक स्वस्थता झाली नाहीं. पश्चिमेकडील राजपूतलोक अद्यापि उठलेलेच होते; उदेपुरचा राण्याबराबरील लढाईहि पुढें लवकरच सुरू झाली; आणि जयपुर व पश्चिमेकडील लहान लहान संस्थानें खेरीज करून बाकी सर्व राजपूतसंस्थानें औरंगझेबाचा कारकीर्दीचा अखेरीपर्यंत उघड रीतीनें मोगलांशीं दाली बांधून होतीं; त्यांचा राजधान्या मोगलांचा हातीं होत्या, आणि त्या राजपूतलोकांचे आपसांत तंटे असत, तेणेंकरून जरी त्यांस निरंतर

राहण्याजोगा फायदा झाला नाहीं, तरी त्यांचा देशांतील शत्रूचा फौजेस ते पुष्कळ इजा देत असत, आणि शेजार-पाजारचे मांतहि लुटून ओसाड पाडून टाकित असत.

---

# प्रकरण तिसरें.

इ० स० १६८१ पासून १६९८ पर्यंत.

दक्षिणेंतील वर्तमान पुढें चालू.

वरील लढायांत दुसऱ्या देशांमध्यें औरंगझेब गुंतला असतां, दक्षिणेंत पुष्कळ मोठमोठे फेरफार झाले होते, आणि जरी वरील लढाई लांबली, तरी जेवढे दक्षिणेंतील बंदोबस्त करण्याचे उपाय याचा स्वाधीन होते त्यांची योजना करण्यास यास कांहीं अडचण पडली नाहीं. जेव्हां प्रथम ( इ० स० १६७२ मध्यें ) अफगाणलोकांशीं लढाई करण्याकरितां याचें लश्कर गेलें, तेव्हां याचा दक्षिणेंतील सरदार खान जहान याजवळ मराठ्यांवर चालून जाण्याजोगें बळ राहिलें नव्हतें; आणि त्या वेळीं मराठ्यांचा मुख्य शिवाजी हा जर खान जहानाचा मुलुकावर हल्ला करिता, तर त्याचेंहि बहुधा याचानें रक्षण झालें नसतें; परंतु याप्रमाणें वर्तमान असतां विजापुरचा राजा मरण पावला, आणि त्याचा राज्यांत कलह माजला; तेणेंकरून मोगलांवर हल्ला करण्यापेक्षां विजापुरकरांचा मुलुकावर हल्ला केला असतां बराच लाग साधेल असें शिवाजीस दिसून आलें.

शिवाजीनें विजापुरकरांचा कांहीं मुलुक घेतला.

त्या वेळीं विजापुरचा राज्यापैकीं दर्याकिनाऱ्याचा मुलुक, जवळील घाटासुद्धां, घ्यावा अशी त्यास अतिशय इच्छा प्राप्त झाली; आणि त्याणें इ० स० १६७३ व १६७४ या वर्षांत पुष्कळ लढाया मारून, व वेढे देऊन

( इंग्रेज, हबशी व पोर्टुगीस या लोकांचे टापू खेरीज करून ) सर्व दक्षिणकोंकण व कृष्णानदीचा उगमाकडील भागाचा पूर्वेकडील घाटावरचा कांहीं प्रदेश, इतका मुलुक घेतला. यापूर्वींच शिवाजी पुष्कळ दिवस राजसत्ता धारण करित होता; तथापि पूर्वीपेक्षां मोठ्या समारंभानें तो अधिकार घेतला असतां, आपणास जीं कृत्यें पुढें करावयाचीं आहेत त्यांस योग्य होईल, असें त्याणें मनांत आणिलें.

त्यास विशेष समारंभानें रायगडावर राज्याभिषेक झाला.

या कारणास्तव त्याणें मोगलांचा सर्व डामडौलानें पुनः आपणास राज्याभिषेक करविला, त्यांचा चालीप्रमाणें सोन्याची तुळा केली, व जवळचा सर्व लोकांस मोठमोठीं बक्षिसें वांटलीं. त्यापूर्वीं त्याचा मुख्य सरदारांचे किताब फारसी होते, ते या वेळीं फिरवून संस्कृत केले, आणि यानंतर त्याणें मुसलमानी बादशाहाचा सर्व डौल घातला; परंतु आपल्या धर्मसंबंधीं कर्मावर तो आणखी दुप्पट लक्ष देऊं लागला, आणि जातीसंबंधीं अन्नव्यवहार व दुसऱ्या गोष्टींमध्यें चौकसनिशीचा घाट आणूं लागला.

शिवाजीनें मोगलांचा मुलुकावर हल्ला केला.

वरील मुलुक घेण्यामध्यें शिवाजी पुष्कळ दिवस गुंतला होता, त्यामुळें वरील राज्याभिषेक झाल्यानंतर लवकरच त्याचा मुलुकावर हल्ला करावा अशी मोगलांस उमेद आली; परंतु

---

( १ ) शिवाजीस राज्याभिषेक झाला तेव्हां आक्सेनडेननामक एक मुंबईहून त्याकडे गेलेला इंग्रेजवकील त्यासमयीं तेथें होता; तो हा समारंभ मोठा डामडौलाचा झाला असें वर्णन करितो; असा पूर्वींचा मराठे लोकांत व्हावा अशी आपण अटकळ केली नसती. हा समारंभ इ०स० १६७४ माहे जुन ता० ६ रोजीं झाला.

या धट्टाईचा त्यांस पश्चात्ताप करावा लागला. कारण शिवाजीनें स्वतः न जातां बादशाही मुलुकांत कांहीं आपल्या टोळ्या पाठविल्या. त्या लोकांनीं दोन किल्ले घेतले, खानदेश आणि वऱ्हाड या प्रांतांचा अगदीं मध्यापर्यंत मुलुक लुटला; आणि या वेळीं प्रथम नर्मदानदी उतरून भडोचेपर्यंतहि गुजराथेंत त्यांणीं चाल केली. हें वर्तमान इ० स० १६७५ त झालें. नंतर शिवाजीस वाटलें कीं या हल्ल्याचा योगानें पुनः मोगललोक माझा वाटेस जाणार नाहींत; आणि असें झाल्यानें त्याचा मनांत पुष्कळ दिवस एक बेत घोळत होता तो पार पाडण्यास त्यास फुरसूद मिळाली. तो बेत हा, कीं आपल्या बापाची जाहगीर परत घ्यावी, आणि दक्षिणहिंदुस्थानांतील आणखी मुलुक घेऊन आपलें राज्य वाढवावें.

मराठेलोक प्रथम नर्मदानदी उतरले.

सदरहू जाहगीर तेथपर्यंत त्याचा धाकटा भाऊ वेंकाजी याजकडेस होती. आपण विजापुरकरांचा चाकर असें तो नावास ह्मणवित असे; यामुळें आपण त्या जाहगिरीचा वारीस या नात्यानें तिजवर हक्क सांगण्यास, अथवा शत्रूचा नात्यानें ती घेण्यास शिवाजीस आतां मोकळीक झाली होती; तशांत पूर्वीं रघुनाथ नारायण म्हणून एक ब्राम्हण शाहजीचा वतीनें तेथील कारभार पाहत असे, आणि वेंकाजीचाहि पुढें तो प्रधान होता; मागून त्याचा व वेंकाजीचा नुकताच कज्जा होऊन, तो थोडक्याच दिवसांवर येऊन शिवाजीस मिळाला होता, यामुळें त्या जाहगीरीवर शिवाजीचें मुद्दाम लक्ष गेलें. त्या ब्राम्हणाची माहितगारी व त्याचे तिकडील संबंध हीं दोन्ही शिवाजीचा कामास पडण्याजोगीं होतीं;

शिवाजीनें दक्षिणहिंदुस्थानांत स्वारी केली.

परंतु इतक्या लांबचा पल्ल्यावर स्वारी करून गेलें असतां जर मागें कोणी दोस्त नसला तर नुकसान पोंचेल, असें त्यास वाटल्यामुळें, त्या वेळीं गोंवळकोंड्याचा राजाचा विजापुरकरांशीं द्वेष होता आणि मोगललोकांचीहि त्यास भीति होती, त्यामुळें, उभयतांचा शत्रूंपासून आपलें संरक्षण करण्याकरितां आपली दोघांची दोस्ती असावी, असें त्याणें त्या दरबाराशीं बोलणें लाविलें. त्याचा बोलण्यास उत्तेजन मिळाल्यामुळें तो तीस हजार घोडेस्वार, आणि चाळीस हजार पायदळ इतक्या लश्करानिशीं गोंवळकोंड्यास कूच करून गेला; आणि तेथें आपल्या तहनाम्याचा बराबर बंदोबस्त करण्याकरितां कांहीं दिवस मुक्काम करून राहिला. तेथें असा ठराव झाला, कीं आपल्या बापाचा जाहगीरीशिवाय जो मुलुक शिवाजी जिंकील, त्याचा वांटा त्याणें गोंवळकोंड्याचा राजास द्यावा, आणि गोंवळकोंड्याचा राजानें त्यास अमुक द्रव्य देऊन कांहीं तोफखाना पुरवावा, व बाकी राहिलेल्या फौजेनिशीं विजापुरकर व मोगल यांचा फौजांस आवर घालावा. याप्रमाणें आपल्या पिछाडीचा बंदोबस्त करून, शिवाजी कर्नूळ एथें कृष्णा उतरला, आणि कडप्याचा वाटेनें मद्रासेजवळून (इ० स० १६७७ चा मे महिन्याचा पहिल्या आठवड्यांत) जाऊन आपल्या राज्यापासून तीन शें कोशांवर जिंजी नामें किल्ल्यासमोर ठेपला. तो विजापुरकरांचा मोठा मजबूद व पहाडी किल्ला होता; परंतु तेथील सरदाराशीं याचा पूर्वींचा बंदोबस्त असल्यामुळें तो त्याणें याचा स्वाधीन केला. त्याचें तोफा वगैरे

इ० स० १६७६ चा अखेरीचा सुमारास.

इ० स० १६७७, मार्च.

त्याणें जिंजी किल्ला घेतला.

वेलूर किल्ला घेतला.

भाराचें लश्कर मागें राहिलें होतें त्या लोकांनीं पुढें वेलूर नामें किल्ल्यास वेढा देऊन तो सर केला. इकडे शिवाजी आपल्या भावास भेटून बापाचा जाहगीरींतील वांटा आपणास द्यावा म्हणून सामोपचारानें त्यास सांगून पाहत होता; परंतु त्याचें सांगणें फुकट गेलें. यामुळें त्याणें आर्णी, व दुसरे पुष्कळ किल्ले घेतले, आणि महिसूरप्रांतांतील शाहजीची सर्व जाहगीरी जबरदस्तीनें बळकाविली. या कामांत तो गुंतला असतां मोगल व विजापुरकर यांणीं मिळून गोंवळकोंड्यावर स्वारी केली असें त्यास वर्तमान समजलें; तेव्हां आपला अनौरस सावत्र भाऊ संताजी, जो त्यास प्रथम जातांच मिळाला होता, त्याचा हवालीं आपण घेतलेला मुलुक करून तो उत्तरेस निघून आला. इकडे शिवाजी पल्ल्याबाहेर गेला असें पाहून मागें वेंकाजीनें आपला मुलुक परत घेण्याचा यत्न केला. पुढें वेंकाजीनें जाहगीरीची वहिवाट करून शिवाजीस निमें वसूल द्यावा, आणि याणें स्वतः जो मुलुक विजापुरकरांकडून घेतला तो आपल्याकडे ठेवावा, असा बंदोबस्त होऊन तंटा मिटला. त्या सुमारास गोंवळकोंडें एथील राजाचा मोगलांशीं तह झाला. तेव्हां शिवाजी हा, वाटेनें बल्लारी व अध्वाणी हे प्रांत जिंकून, रायगडाहून प्रथम निघाल्यापासून अठरा महिन्यांनीं तेथें परत पोंचला.

आपल्या बापाची महिसूर प्रांतांतील सर्व जाहगीर घेतली.

इ० स० १६७८ चा मध्याचा सुमारास.

मोगललोकांचा दक्षिणेंतील कारभारांत बदल झाल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें त्यांची गोंवळकोंड्यावर

स्वारी झाली होती. तो प्रकार.— पूर्वी खान जहान हा दक्षिणेंत सुभेदार होता; त्यास काढून त्याचा जाग्यावर बादशाहानें दिलीर खान नेमिला. हा औरंगझेबाचा सरदारांपैकीं उत्कृष्ट सरदार होता असें ह्मटलें असतां चालेल. याचें लश्कर अद्यापि थोडें होतें; परंतु तो पठाण होता, व त्याचे पुष्कळ शिपायीहि पठाण होते, ह्मणून त्याणें आपल्या झपाट्यानें व चपलतेनें सर्व उणीव पुरी पाडिली. त्या वेळचा विजापुरचा राजा वयानें लहान होता, आणि त्याचा प्रधानांत व पालनकर्त्यांत नाना प्रकारचा घालमेली झाल्या होत्या; त्यांतून एकाशीं दिलीर खानानें सख्य पाडिलें, आणि वर सांगितल्याप्रमाणें गोंवळकोंड्यावर हल्ला केला. त्या वेळीं जो विजापुरचा कारभारी याचा मदतीस होता, तो पुढें लवकरच मरण पावला; तेव्हां दिलीर याणें मसाउद नामें एका हबशास मदत करून त्यास त्याचा मागून कारभार देवविला. तेव्हांपासून विजापुरचा दरबारांत याचा पगडा पुरा चालू झाला. इतका लाभ झाला तरी संतोष न पावून औरंगझेबानें शाहजादा मोअझिम यास आणखी मागणीं करण्याकरितां सरसुभेदार करून पाठविलें, आणि तीं मागणीं दिलीर खानानें आपल्या फोजेचा बळानें, लागल्यास जबरदस्ती करून, साध्य करावीं असा हुकूम केला. हा बेत तडीस नेण्याकरितां दिलीरानें पुनः विजापुरकरांशीं लढाई सुरू केली, आणि त्यांचा राजधानीस वेढा दिला; तेव्हां तेथील कारभाऱ्यानें निराश होऊन शिवाजीची मदत मागितली. त्या वेळीं वेढा देणाऱ्या फौजेवर

दिलीर खानाचा हाताखालीं एका फौजेनें गोंवळकोंड्यावर स्वारी केली.

त्याणें विजापुरास वेढा दिला. इ० स० १६७९.

हल्ला करण्याची आपली शक्ति नाहीं असें पाहून शिवाजीनें मोगलांचा मुलुकांत स्वारी केली, आणि आपल्या नेहमींचा चालीपेक्षां अतिशय सक्ती करून त्यांचा मुलुकाचा विध्वंस केला. तो या एका स्वारींतून परत येत असतां, अथवा किंबहुना पळूनहि जात असतां, मोगलांनीं त्याचें बहुधा वाटोळें केलें होतें, परंतु तो पुनः लागलाच पूर्वींपेक्षांहि पुष्कळ फौजेनिशीं दुसरीकडे उपटला, आणि मोगलांचे पुष्कळ किल्ले घेता झाला. तथापि दिलीर खान याणें निग्रह करून वेढ्याचें काम तसेंच चालविलें, तेव्हां तेथील कारभाऱ्याची शिकस्त होऊन, त्याणें शिवाजीस विनंती सांगून पाठविली कीं आपण लवकर माझा मदतीस यावें, नाहीं तर वेळ निघून जाईल.

शिवाजीचा पुत्र संभाजी मोगलांकडे पळून गेला.

त्या कारणास्तव शिवाजी निघाला होता, इतक्यांत आपला मुलगा संभाजी हा पळून मोगलांस जाऊन मिळाला असें त्यास वर्तमान लागलें; तेव्हां तो चकित झाला. संभाजीमध्यें शौर्याखेरीज त्याचा बापाचे कांहीं गुण नव्हते. त्यांतहि तो अगदीं विषयासक्त झाला होता. त्याणें एका ब्राह्मणाचा स्त्रीवर जुलूम केल्यामुळें शिवाजीनें त्यास एका किल्ल्यावर अटक ठेविलें होतें. त्या बंदिखान्यांतून निसटून तो दिलीर खानाकडे पळून गेला; दिलीर खान याणें त्याचा मोठ्या आदरानें सत्कार केला आणि मनांत आणिलें, कीं मराठे लोकांमध्यें आपल्या बापाचा विरुद्ध लढावयास हा आपल्या उपयोगीं पडेल. या योगानें शिवाजी कांहीं वेळपर्यंत घाबरून गेला, परंतु तो प्रसंग त्यावर थोडे दिवसच गुजरला. कारण दिलीर खानाची मसलत औरंगझेबास

नापसंत होऊन त्याणें संभाजीस कैद करून आपल्या छावणींत पाठविण्याचा हुकूम केला. दिलीरखानानें त्यास अभयवचन दिलें होतें, ह्मणून असें झाल्यावर संभाजी आपल्या बापाकडे परत गेला, त्या गोष्टीकडे त्याणें कानाडोळा केला.

संभाजी आपल्या बापाकडे परत आला.

इकडे मोगलांचा आवांक्याबाहेर विजापुर एथें युद्ध लांबलें. शिवाजी प्रथम चकित झाला होता, तो सांवरून पुनः लढाई करूं लागला; तेव्हां आपली सामग्री शिवाजीनें मारून नेली असें पाहून नाइलाज होऊन दिलीरानें विजापुरचा वेढा उठविला. या लढाईत शिवाजीनें विजापुरकरांस मदत केली, तिजबद्दल तुंगभद्रा व कृष्णा यांमधील मुलुक, आणि शाहजीचा जाहगिरीवरील विजापुरकरांचे सर्व हक्क, इतकें शिवाजीस मिळालें. या शेवटचा देणगीमुळें आपल्या भावावर अधिक सत्ता चालविण्याचा हक्क शिवाजीस मिळाला; तशीच त्याचा बढतीमुळें त्यास सत्ताहि मिळाली होती. हा फेरफार झाल्यामुळें वेंकाजी खिन्न होऊन सर्व संसार सोडण्याचा विचारास लागला होता; इतक्यांत शिवाजी आजारी पडून ता० ५ एप्रिल इ० स० १६८०, या रोजीं त्रेपन्नाव्या वर्षी मरण पावला, त्यामुळें त्याचे सर्व बेत जागचा जागींच राहिले.

विजापुरचा वेढा उठला.

शिवाजी मरण पावला.

शिवाजी हा मोठ्या सरदाराचा मुलगा असून, त्याणें प्रथम धाडशी व कपटी अशा चोरांचा सरदारांचा वेष धरून संसार आरंभिला; परंतु पुढें पक्क दशेस येऊन तो मोठा कुशल सरदार व शहाणा राज्यकर्त्ता

त्याचा स्वभाव.

होऊन गेला. तो जी आपली कीर्ति ठेऊन गेला, तिची बरोबरी अथवा तिचा जवळ जवळ चालहि त्याचा देशबांधवांतून अद्यापि कोणी एकानेंहि केली नाहीं. जवळचा देशांची स्थिति गडबडलेली होती, त्यामुळें जा संधि मिळाल्या, त्या योगेंकरून यापेक्षां कमी बुद्धिमान् सरदारहि कदाचित् आपलें हित करून घेता; परंतु धर्माविषयीं श्रद्धा जागृत करून तिचा द्वारानें मराठेलोकांत स्वदेशाभिमान उत्पन्न करणें, आणि त्या योगानें औरंगझेबानें मुसलमानी धर्माविषयीं दुराग्रह धरून हिंदूंचे छल करणें इत्यादि जा कांहीं चुक्या केल्या, त्यांची संधि साधून आपला फायदा करून घेणें, हें काम करण्यास शिवाजीसारखाच बुद्धिमान् पाहिजे होता. पुढें त्याचें राज्य दुर्बल पुरुषांचा हातांत गेल्यावर शाबीद राहिलें, आणि जरी आंत पुष्कळ बखेडे झाले, तरी बहुतेक हिंदुस्थानावर मराठ्यांची सत्ता चालू होईपर्यंत त्यांचा एकोपा राहिला, तोहि वरील वृत्ति उत्पन्न झाल्यामुळेंच राहिला. याणें लुटारू लोकांसारिखी लढाई चालविली होती तेणेंकरून लोकांस सहजच अति दुःख होत असे; तथापि याणें त्या दुःखाचा परिहार करण्याकरितां सदय कायदे करून ठेविले होते, ते तो सक्तीनें अम्मलांत आणित असे, अशी त्याचे शत्रूहि साक्ष देतात. पुढें पुढें त्याची देवभक्ति वाढून भोळा भाव व शरीरदंड यांकडे तिचा कल पसरला होता, परंतु तेणेंकरून त्याची बुद्धि मंद व स्वभाव कडवट असा कधींहि झाल्याचें दिसून येत नाहीं.

जेव्हां संभाजी मोगलांचा छावणींतून परत आला,

तेव्हां त्यास शिवाजीनें पुनः पन्हाळ्यावर कैदेंत ठेविलें; तेथेंच तो शिवाजीचा मरणसमयीं होता, त्यामुळें, व आपला मुलगा पुढें कसा चालेल याविषयीं विस्मय करून शिवाजीचा तोंडून कांहीं शब्द निघाले होते तेणेंकरून निमित्त सांपडून आपला दुसरा मुलगा राजाराम यास आपल्यामागें गादीवर बसविण्याचें शिवाजीनें योजिलें होतें, असें जवळचा लोकांनीं पिकविलें. राजाराम हा त्या वेळीं दहा वर्षांचा होता. त्याचा आईचा मसलतीमुळें ही गोष्ट लोक खरी मानूं लागले; आणि संभाजीचा क्रोधाविष्ट स्वभावाची भीति पडून, पुष्कळ दिवसपर्यंत राजा लहान असला तर आपलें साधेल ह्मणून, जे ब्राह्मण प्रधान होते त्यांस आनंद झाला होता; ह्मणून त्यांणींहि ती गोष्ट खरी मानिलीशी केली; संभाजीस सक्त कैदेंत ठेवावा असा हुकूम केला, आणि तो उद्देश तडीस जाई तों त्यांणीं शिवाजी मेल्याची बातमी छपवून ठेविली.

संभाजीस गादीवर न बसविण्याविषयीं जो यत्न झाला, तो व्यर्थ गेला.

संभाजी पन्हाळ्यावर नजरकैदेंत होता. त्याणें मसलत करून ती गुह्य गोष्ट उमगून काढिली आणि आपण गादीवर बसलों असें त्या किल्लेकऱ्यांस वर्तमान सांगितलें, तेव्हां त्यांणीं लागलीच त्याची सत्ता कबूल केली. तो जा किल्ल्यांत होता तेथून प्रथम बाहेर निघण्यास धजला नाहीं; परंतु त्याचा राज्यावर हक्क आहे असा लोकांचा साधारण अभिप्राय होता; आणि जे ब्राह्मण प्रधान होते ते आपसांत भांडूं लागले होते; आणि त्यांणीं संभाजीस वेढा देण्याकरितां जी फौज पाठविली होती, ती फितून त्यास सामील झाली

लोकांनीं संभाजीस राजा कबूल केला.

होती. याप्रमाणें वर्तमान होऊन शेवटीं (इ० स० १६८० चा जून महिन्यांत ) तो निःसंशय राजाप्रमाणें रायगडांत प्रवेश करिता झाला.

संभाजीचें क्रौर्य.

हा वेळपर्यंत तो विचारानें वर्तत होता, तेणेंकरून त्याविषयीं लोकांचा मनांत जो वाईट ग्रह झाला होता, तो बराच दूर झाला; तथापि तो गादीवर आल्यानंतर त्याणें जीं क्रूर कर्मे आरंभिलीं, तींहींकरून ती चांगली समजूत नाहींशी होऊन गेली. त्याणें एकदम न मारितां सावकाशीनें हालहाल करून आपल्या सावत्र आईस मारिलें; तिचा मुलगा राजाराम यास कैदेंत टाकिलें, जे ब्राह्मण प्रधान त्याचा विरुद्ध अतिशय उद्योग करित होते, त्यांस बिड्या ठोकिल्या, आणि जा दुसऱ्या शत्रूंस त्यांसारखा जातीचा पवित्रतेचा आश्रय नव्हता त्यांचा शिरच्छेद केला. याप्रमाणेंच परराज्यकारभारामध्येंहि राजनीति सोडून याचा क्रोध पुढें सरसावून येऊं लागला. जंजीरकर हबशी लोकांशीं शिवाजीचें हमेशा वैमनस्य असे, आणि त्यांस पाडाव करण्याकरितां त्याणें प्रसंगवशात् दीर्घ प्रयत्नहि केले होते. संभाजीनें प्रथम त्या लोकांवर तलवार धरिली, आणि ते याचा राजधानीजवळच राहत असत, त्यामुळें खुद्द आपण त्या लढाईत पडून,

जंजिऱ्यास वेढा देण्याविषयीं त्याचा हिंका.

जसा कांहीं जगामध्यें आपणास दुसरा कोणी शत्रूच नाहीं असेंच जाणूं काय मानून, पुष्कळ दिवसपर्यंत त्यांस जिकण्याकडेस याचें सर्व लक्ष लागलें होतें. हें काम चाललें असतां ( जून इ० स० १६८१, पुढें सांगितल्याप्रमाणें ) शाहजादा अकबर त्याचा छावणींत आला; त्याचा त्याणें मोठा सत्कार

केला, आणि त्यास बादशाह असा कबूल केला; परंतु आपला मतलब सोडून न देतां त्यास हाताशीं धरून औरंगझेबावर उलटून त्यापासून आपलें कार्य करून घेण्याची याणें आपली इच्छा दाखविली नाहीं. शाहजादा अकबर येऊन त्यास मिळाला.

त्या वेळींहि संभाजीचा विरुद्ध पक्षाचे कांहीं लोक गुप्त होते; त्यांणीं अकबर आला असें पाहून, त्या संधीस राजारामाचा हक्क त्याकडून कबूल करवावा असें मनांत आणिलें; परंतु त्यांचें फितूर लवकरच उघडिकेस येऊन त्यांतून पुष्कळ पुढारी संभाजीनें हत्तीचा पायांखालीं तुडवून मारिले. त्यांमध्यें एक मुख्य ब्राम्हण प्रधान होता; तो शिवाजीचा पुष्कळ कामास आला होता, तेणेंकरून, व तो पवित्र जातीचा, ह्मणून त्यास देहान्तशासन होऊं नये असें दिसत होतें. त्याचा विरुद्ध फितूरें. त्याणें लोकांस मारून टाकिलें.

असे लोकांचे घात केल्यामुळें संभाजीचा राज्यास लोक नाखुश झाले. ती नाखुशी जास्त होण्यास दुसरींहि कारणें झालीं. तीं अशीं, कीं तो आपल्या बापाचा प्रधानांची अवगणना करूं लागला, व कांहीं त्यांचा छलहि करूं लागला, आणि आपला सर्व कारभार कलूशानामक एका हिंदुस्थानी ब्राह्मणाचा हातांत अगदीं कुलअखत्यारीनें सोंपिता झाला. तो मोठा पाताळयंत्री आणि बाहेरून ढबदार गुणांचा असे, व संभाजीचा दुर्गुणांस उत्तेजन देत असे, तेणेंकरून त्याची त्यावर प्रीति जडली होती. तो कलूशानामें ब्राह्मणाचा स्वाधीन झाला.

या प्रधानाचा मदतीनें त्याणें जंजीरकरांवर मोठ्या

उत्सुकतेनें लढाई चालविली ( इ० स० १६८२. )

त्याची जंजिऱ्यावरील मसलत फसली.

तें बेट जवळचा देशाशीं जोडण्याकरितां त्याणें बांध बांधण्याचा प्रयत्न केला, आणि नंतर जहाजांतून लोक नेऊन हल्ला करण्याचा यत्न केला; परंतु ते सर्व श्रम व्यर्थ गेले. शेवटीं नाइलाज होऊन जेव्हां त्यास तो वेढा उठविणें आला, तेव्हां त्या हबशी लोकांनीं आंतून बाहेर येऊन हल्ला केला, आणि याचे गांव लुटले; तेणेंकरून यास विशेष दुःख झालें. त्यानंतर त्यांणीं समुद्रामध्यें याचा आरमाराचा अगदीं मोड करून याचा आणखी समजुतींत येण्याजोगें नुकसान केलें. याप्रमाणें अप्रतिष्ठा झाल्यामुळें त्यास संताप आला; आणि या अपेष्टेचे कारणीभूत किनाऱ्यावर वसाहाती करून राहिलेले युरोपीयन लोक आहेत, असा त्याणें त्यांजवर वहमा आणिला. पूर्वीं पोर्टुगीस ( फिरंगी ) लोकांबराबर शिवाजीची लढाई चालली होती; त्यांजबराबर आतां संभाजीनें स्वतः लढाई सुरू केली. वरील हकीकत घडून येई तों तो इंग्रेजलोकांशीं दोस्तीनें वागत असे; परंतु हल्लीं त्यांशींहि बहुधा त्याणें काम निकरास नेलें. या हलक्या लढाया चालल्या असतां मधून मोगललोकांचे हल्ले येत असत, त्यांतून पुढें औरंगझेब येण्याचीं चिन्हें होऊं लागलीं. संभाजी हबशी लोकांशीं लढाईचा कामांत गुंतला होता; तेव्हां त्याचे

मराठ्यांची दक्षिणेंत पडती दशा आली.

दक्षिणेंतील सरदार अगदीं रिकामे बसले नव्हते; परंतु पूर्वींची कैद फार ढिली पडली होती; आणि संभाजीनें जे वाईट छंद धरिले, त्यामुळें जसे दुसरे बखेडे वाढले त्याप्रमाणें ढिलाईहि अधिकच पडत चालली; संभाजी आपला सर्व वेळ आळसांत

व ऐषारामांत दवडूं लागला; व आपल्या बापाचा वेळ-चा पुष्कळ मिळविलेला पैका उधळून टाकिता झाला. तशांत कलूशानें जमीनीचें देणें वाढविल्यामुळें लोकांत बेदिली मात्र जास्त झाली; परंतु राज्याची पैदास्त खर्चास पुरी पडेनाशी झाली. लश्करचा लोकांचे पुष्कळ दिवसांचे पगार चढले, त्यामुळें ते जी स्वाऱ्यांतून लूट मिळवीत, ती आपणच बळकावून बसूं लागले; तेणेंकरून, तारतम्यानें पाहूं गेलें असतां, शिवाजीचा वेळीं त्याचा लश्करचे लोक जे कैदसर असत, ती सर्व शिस्त जाऊन, ते सर्व लुटारू व नाश करणाऱ्या दरवडेखोरांप्रमाणें होऊन गेले, आणि तेव्हांपासून ते तसेच होऊन राहिले आहेत.

या सुमारास उदेपुरचा राण्याशीं तह करून, आणि जोदपुरचा मुलुकाचा विध्वंस करण्याकरितां मागें कांहीं लोक ठेवून, दक्षिण जिंकण्याकरितां आपली सर्व सेना घेऊन औरंगझेब दक्षिणेंत आला. औरंगझेब दक्षिणेंत आला. इ०स०१६८३.

संभाजीस जिंकण्याकरितां, जर औरंगझेब विजापुर व गोंवळकोंडें एथील राजांशीं मिळता, तर बरें झालें असतें; परंतु ते राजे मराठ्यांपेक्षां आपला जास्त द्वेष करित असतील, आणि ते मनःपूर्वक आपल्याशीं न मिळाल्यामुळें त्यांचीं राज्यें आहेत तंववर संभाजीस आश्रयास राहण्यास कधींहि ठिकाण नाहींसें होणार नाहीं, असें त्यास कदाचित् वाटलें असेल. त्याचे उद्देश. विजापुर व गोंवळकोंडें हीं राज्यें घ्यावीं हा औरंगझेबाचा मुख्य उद्देश होता, एवढें तरी निदान संभवतें; आणि हीं राज्यें हातीं आल्यावर संभाजी सहजच पाडाव होईल, असा त्याणें

विचार केला असावा, असें दिसतें. त्या राजांचा परस्परांशीं व मराठ्यांशीं झालेल्या लढाया पाहून त्यास आनंद होई; त्यांचे आपसांतील बखेडे तो पेटवी; आणि जा गोष्टीनें दक्षिणेंत गोंधळ होईल, तिजपासून आपलें निश्चयेंकरून हित होईल असें मानण्याजोगा तो अज्ञानांध झाला होता.

तो प्रथम बऱ्हाणपुरावर चालून आला, आणि तेथें फार वेळ मुक्काम करून राहिला. तसाच औरंगाबादेसहि

इ०स०१६८३. त्याणें बराच मुक्काम केला. त्या वेळीं तो कांहीं राजकीय व महसूली बंदोबस्तांत गुंतला होता; आणि अशा प्रसंगीं त्याचा सरदारांनीं सारासार विचारानें जजीया कराविषयीं सक्ती करण्याचें जें टाकिलें होतें, तें जसें कांहीं वेडास भरून त्याणें पुनः सक्तीनें वसूल करणें चालू केलें.

बऱ्हाणपुराहून निघण्यापूर्वीं त्याणें शाहजादा अझीम याजबराबर पुष्कळ फौज देऊन चांदवडचे डोंगर व सह्याद्रि हे दोन्ही जेथें मिळतात त्या हद्दीजवळील पहाडी किल्ले घेण्यास त्यास

त्याची प्रथमची लढाई.

पाठविलें; आणि कोंकण लुटून संभाजीचा राज्याचा दक्षिण सीमेपर्यंत व विजापुरकरांचा सरहद्दीपर्यंत जाण्याकरितां त्याहूनहि मोठी फौज देऊन त्याणें शाहजादा मोअझिमास पाठविलें. या फौजा कोणचा उद्देशानें या कामास पाठविल्या, आणि या फौजांनीं कोणचा धोरणावर आपलीं कामें चालविलीं हीं दोन्ही समजणें मुस्कील आहे. सालेरनामक मजबूद किल्ला शाहजादा अझीमाचा हवालीं पूर्वींचा मसलतीप्रमाणें झाला, आणि या लहानशा फितूरावरून, चांदवडाकडे एकीकडचा प्रकाणावर औरंगझेबानें जी

फौज पाठविली, ती पाठविण्यास त्यास लोभ उत्पन्न झाला असावा, परंतु जेथें रस्ते नाहींत, वैरण नाहीं, आणि घोडेस्वारांस लढण्यास जागा नाहीं, अशा कोंकणांतील डोंगरांत व जंगलांत मोठी घोडेस्वारांची फौज याणें पाठविली, त्यामध्यें याचा अविचार दृष्टीस पडून येतो. तो अविचार कसा झाला असेल, हें सांगणें मुस्कील आहे. मोअझिम हा सर्व कोंकणांतून लश्कर घेऊन गेला, त्यास कोणीहि आड आला नाहीं; तथापि तो गोंव्याजवळ जाईपर्यंत त्याचे बहुतेक घोडे व इतर बारबरदारींचीं ( बैल वगैरे ) जनावरें, हीं नाहींशीं झालीं, आणि अन्नाचा दुष्काळ पडल्यामुळें त्याचा लोकांसहि इजा होऊं लागली. तशांत संभाजीनें घाट बंद केले, आणि जीं मोगलांचीं तारवें भरून जळमार्गानें सामग्री येई तीं याचीं तारवें लुटीत, त्यामुळें मोअझिमाचा फौजेस फारच तंगी पडली. शेवटीं जेव्हां मोअझिम हा, आपली पदाती झालेली राहिलीसाहिली फौज घेऊन घाटावरील देशांत निघून गेला, तेव्हां त्यास आपण मोठा नशीबवान् असें वाटलें. तथापि कोंकणांतील रोगकारक हवेनें, व संवय नाहीं असें अन्न खाल्ल्यानें पुढें देशांत गेल्यावरहि वाईट परिणाम उत्पन्न झाले; आणि तो पावसाळीं कृष्णाकांठीं मिरजेजवळ वाळवें गावीं छावणी देऊन राहिला होता. तेथें एक पटकीचा आजार उत्पन्न होऊन, त्याचा पुष्कळ लोकांचा नाश झाला.

शाहजादा मोअझिमाचा फौजेचा कोंकणांत नाश झाला.

पुढें जेव्हां मोसम सुरू झाली, तेव्हां विजापुरकरांचा मुलुकावर नैर्ऋत्येकडून हल्ला करण्याची औरंगझेबानें त्यास

आज्ञा केली, आणि अझीमाची चांदवडाकडील किल्ल्यावरची स्वारी फसल्यानंतर, त्यास मोठी फौज देऊन विजापुरावर पाठविलें, आणि त्याचा सहाय्यार्थ पूर्वी सांगितल्याप्रमाणें मोअझिमास पाठविलें. इकडे औरंगझेब स्वतः, औरंगाबाद एथें खान जहान याचा हाताखालीं कांहीं शिलकी फौज ठेवून, अहमदनगरावर आला. अशा फौजा गेल्यामुळें, आपल्या देशावर जो मोगलांनीं हल्ला केला होता त्याचा सूड उगविण्याची संभाजीस संधि मिळाली. मग औरंगझेबाचा फौजांचा उजव्या बाजूचा पाठीमागें त्याणें कोंकणचा उत्तरेस हळूहळू कांहीं घोडेस्वारांचें लश्कर जमा केलें; त्या फौजेनें तेथून औरंगझेबाचा पिछाडीनें जलद कूच करून बऱ्हाणपुरनामक मोठें शहर लुटून जाळून टाकिलें, आणि जा देशांतून ती फौज गेली, त्या सर्वांची होळी करून ती पुनः कोंकणांत निघून गेली. हे लोक इतक्या त्वरेनें व गुप्त रीतीनें कूच करित असत, कीं त्यांस मध्यें पाडाव करण्याकरितां एक ठिकाण योजून तेथें खान जहान गेला, तों ते लोक जिकडून निघून गेले तो रस्ता यापासून अगदींच लांब राहिला.

त्याणें विजापुरकरांवर स्वारी केली.

इ०स० १६८५.

पादशाहाचा पिछाडीचा मुलुक संभाजीनें लुटला.

इकडे शाहजादा अझीम हा सोलापुर घेऊन विजापुरावर चालला होता; परंतु तिकडून जी फौज आड आली तिचा पुढें याचानें टिकाव धरवेना; ह्मणून त्यास भिमेचा पलीकडे परत जावें लागलें. तिकडे मोअझिमास स्वतः कांहीं पराक्रम करण्याची शक्ति नाहींशी होऊन, त्यास कुमकेची वाट पाहत राहवें लागलें. मग ती कुमक घेऊन

तो, आपल्या सुंदर फौजेचा नाश होऊन शेष राहिलेल्या लोकांनिशीं, अहमदनगरास आला. याप्रमाणें फसगती झाल्यानंतर औरंगझेब स्वतः सोलापुरावर चालून गेला, आणि शाहजादा अझीमाचा फौजेस कुमक देऊन पुढें पाठविता झाला; तो पल्ला औरंगझेबापासून अगदीं थोडा होता, तरी विजापुरचा लोकांनीं त्या शाहजाद्याचा लश्करास अन्नसामग्रीचा तोटा पाडिला. त्या वेळीं सांप्रतचा निजामाचा पूर्वज ग्यासुद्दीन याणें मोठ्या चतुराईनें पुष्कळ धान्यासुद्धां लोक त्याचा छावणींत सुरक्षित नेले; नाहीं तर त्याचा लश्कराचा नाश झाला असता. त्या वेळीं अझीमाचा जाण्यापासून विशेष दहशत बसली नाहीं; मग पुढें कांहीं दिवसांनीं औरंगझेब त्या शहरास वेढा देण्याकरितां स्वतः निघून गेला.

विजापुरव-रची स्वारी फसली.

इ० स० १६८६.

या पंथास लढाई आली असतां, मोगललोक दक्षिणेंत गेले आहेत असें पाहून त्यांचा पिछाडीचा मुलुकावर मराठेलोकांनीं धीटाईनें दुसरा हल्ला केला, भडोच शहर लुटलें, आणि जवळील गुजराथेचा भागामध्यें धुमाळी उडवून ते परत गेले. ही स्वारी संभाजीनें स्वतांचा बेतानें केली, किंवा दक्षिणेंतील दुसऱ्या राजांचा सल्ल्यानें केली, हें स्पष्टपणें समजत नाहीं. या सुमारास त्याणें गोवळकोंड्याचा राजाशीं परस्परांचा बचावाकरितां तह केला होता; ती गोष्ट औरंगझेबास कळल्यावर, त्याणें संभाजीकडेस लक्ष न गुंतवितां, तें निमित्त धरून गोंवळकोंड्याशीं कलह चालविला, आणि त्या राज्यावर स्वारी करण्याकरितां फौज पाठविली. मोठ्या

संभाजीनें भडोच लुटलें.

औरंगझेबानें गोंवळकोंड्यावर स्वारी केली.

फौजा व बलाढ्य सरदार यांविषयीं याचा मनांत हमेशा अभरवसाच असे, त्यामुळें त्याणें जें प्रथम लश्कर पाठविलें तें पुरेनासें झालें; तेव्हां त्यास थोडक्या दिवसांत पहिल्या फौजेला मदत करण्याकरितां दुसरी मोठी फौज देऊन सर्व फौजेचा मुख्य अधिकार आपला मुलगा शाहजादा मोअझिम यास देऊन त्यास पाठवावें लागलें. त्या वेळीं विजापुरचा राज्यांत गोंधळ असे; परंतु गोंवळकोंड्याचा राज्याची अगदीं निराळी स्थिति होती. तेथील राजा अबुलहसन हा जरी आळशी व विषयी होता, तरी त्यावर लोकांची प्रीति असे, आणि मदनपंत नामें एक ब्राह्मण त्याचा प्रधान होता, तो महसूलाचा व इतर राज्यकारभाराचा बंदोबस्त मोठ्या हुशारीनें ठेवित असे, आणि राजाहि शहाणपण करून त्याजवर पूर्ण भरवसा ठेवित असे. परंतु या प्रधानाकडेस सर्व काम सोंपल्यामुळें मुसलमानलोकांस त्रास आला, आणि त्यांतहि इब्राहीम खान नामें सेनापति होता, त्यास विशेषच आला. कारण जर दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेचा बंदोबस्त झाला असता, तर सर्व अधिकार त्याचा हातांत आला असता. जेव्हां मोअझिम विजापुराजवळ आला, तेव्हां इब्राहीम हा आपल्या बहुतेक लश्करासुद्धां फितूर होऊन त्याकडे गेला; त्याच वेळीं शहरांत गुल होऊन मदनपंत प्राणास मुकला; राजा गोंवळकोंड्याचा पहाडी किल्ल्यावर पळून गेला, आणि मग मोगललोकांनीं हैदराबाद शहर बळकावून एकसारखें तीन दिवस लुटलें. याप्रमाणें बेकैद झाली, ती बंद करण्याकरितां मोअझिमानें आपली बशर्त केली, आणि त्या बेकैदेमुळें बादशाहासहि अतिशय नाखुशी झाली. ती

लोकांची दया येऊन, किंवा राजकारणास्तव, असें नाहीं; परंतु जें सरकारास द्रव्य मिळावयाचें तें त्या योगानें हातीं लागलें नाहीं; आणि जसें याणें स्वतः शाहजहानाचा कारकीर्दीत अशाच प्रसंगीं आपलीं राजकारस्तानें साधण्याकरितां पुष्कळ द्रव्य छपावून ठेविलें होतें, तसेंच या वेळीं मोअझिमानें केलें असावें, असा त्यास मोठा वहमा आला. याप्रमाणें त्याणें गोंवळकोंड्याचा राजाचे पुरे पाय मोडून, त्यापासून पुष्कळ द्रव्य घेऊन, त्याशीं तह केला, आणि आपलें सर्व लश्कर विजापुरावर नेलें.

तेथील राजाशीं तह केला.

या सुमारास विजापुरचें लश्कर नाहींसें झालें होतें असें दिसतें; कारण जरी शहराचा तटाचा घेरा तीन कोश होता, तरी त्यास औरंगझेबानें पुरा वेढा दिला होता, आणि शिवायहि तट फोडून हल्ला करण्याचा कामावर कांहीं लोक नेमले होते. त्या वेढ्याचें काम फार सक्तीनें चालविलें होतें; तेणेंकरून तटास द्वार पडेपर्यंत शहरांत लोकांस अन्नसामग्रीची चणचण पडूं लागली. तेथील किल्लेकरी लोक थोडे होते, परंतु ते पठाण होते; त्यामुळें औरंगझेब शहाणपण करून त्यांशीं चांगल्या रीतीनें वागला. मग त्यांचा हिताचा त्यांशीं बंदोबस्त करून, तट फोडून पाडलेल्या वाटेनें, उचलून न्यावयाचें सिंहासन जें बराबर असे त्यावर बसून, औरंगझेब शहरांत शिरला, आणि तेथील तरुण राजास कैद करिता झाला. नंतर विजापुर ही राजधानी नाहींशी झाल्यामुळें लवकरच ओसाड पडून गेली.

औरंगझेब स्वतः विजापुरावर चालून गेला;

आणि ती राजधानी घेऊन त्या राज्याची समाप्ति करिता झाला. इ० स० १६८६ता० १५ अकटोबर.

ती अद्यापि तशीच आहे.

जेव्हां विजापुर मोडलें, तेव्हां औरंगझेबानें गोंवळकोंड्याचा राजाशीं केलेला तह मोडण्याचा निश्चय केला. हा त्याचा उद्देश विश्वासघाताचा होता; व तो सिद्ध करण्याकरितां जे उपाय त्याणें योजिले, तेहि नीच होते. त्याणें यात्रेचें निमित्त सांगून आपली फौज जवळ आणिली, आणि त्या दुर्दैवी राजाकडून जवाहीर व नाना प्रकारचा देहेनग्या घेतल्या. तो राजा, कितीहि नुकसान

औरंगझेबानें गोंवळकोंड्याचा राजाशीं केलेला तह मोडला;

---

(२)" या शहराचा तटाचा भिंती फार उंच असून तोडीचा दगडांचा आहेत, व त्या आज दिवसपर्यंत सर्व शाबीद आहेत. त्या तटावर घुमट, व मोठमोठ्या सरकारी इमारतींचीं शिखरें शोभताहेत, तेणेंकरून अद्यापि बाहेरून पाहणारास हें मोठें नांदतें शहर आहे, असें वाटतें; परंतु आंत पाहूं जातां सर्व सामसूम, निश्चेष्ट व धुळीस मिळालेलें आहे. तट दुचार आहे, व त्याचा बाटोळा खोल खंदक आहे, आणि बालेकिल्ल्यांत भव्य मोडकळीस आलेल्या इमारती आहेत; हीं सर्व पाहिलीं असतां त्या दरबाराची शोभा पूर्वीं मोठी होती असें समजतें. तेथें जी मोठी मशीद आहे, ती मोठी धनत्तर जागा आहे, आणि पूर्वीं सांगितलेली इब्राहीम आदिलूशाहाची कबर आहे, तिची उत्कृष्ट, व नोकदार कारीगरी विख्यात आहे; परंतु महम्मद आदिलूशाहाची जी कबर आहे, ती तेथें पाहण्याची मुख्य जागा आहे. तिचा घुमट जिकडून पाहवा, तिकडून दिसतो. या इमारतींत मुळींच नकासगिरी नाहीं; तथापि तिचा अति मोठा आकार, व अतिशय साधेपणा, हीं पाहिलीं असतां तिचें महत्व खेदकारक वृत्ति उत्पन्न करितें, व तिचा आसमंतात् जें सर्व भयानक होऊन गेलेलें आहे त्यापासून जो मनावर संस्कार होतो, तो त्या वृत्तीशीं मिळतो." याप्रमाणें ग्रांटडफ साहेबानें वर्णन केलें आहे. एवढ्या लहान राजानें एवढी राजधानी कशी राखली असेल हें, या मोडलेल्या इमारती पाहून, अनुमान करणें मुश्कील होतें.

झालें तरी सोसून, औरंगझेबाची मैत्री जोडावी, किंवा निदान त्याची दया तरी आपणावर व्हावी, म्हणून उत्सुक होता; परंतु नजराणे देणें वगैरे हीं वरील सर्व कृत्यें चाललीं असतां औरंगझेब गोंवळकोंड्याचा प्रधानाशीं मसलत करित होता, आणि तेथील लश्करचा लोकांस बिघडून टाकित होता. जेव्हां त्याची मसलत पार पडण्याची वेळ आली, तेव्हां, गोंवळकोंड्याचा राजा पाखंडी लोकांस आश्रय देतो असा याणें त्याविषयीं जाहीरनामा लाविला, आणि नंतर लवकरच त्याचा किल्ल्यास वेढा दिला. तेव्हांपासून अबुलहसनानें आपला विषयीपणा सोडून दिला असें दिसून आलें, आणि जरी त्याचा लश्करचे लोक फितूर झाले, तरी त्याणें सात महिनेपर्यंत मोठ्या शूरत्वानें लढून गोंवळकोंड्याचें रक्षण केलें. शेवटीं फितूरानें तो किल्ला बादशाहाचा हस्तगत झाला. त्या वेळीं त्याणें हे सर्व प्राप्त झालेले अनर्थ मोठ्या संभावितपणानें व ईश्वरावर भरवसा ठेवून सहन केले, तेणेंकरून त्याची त्या वेळची रयत व त्यांचे वंशज आजदिवसपर्यंत त्याचें नाव मोठ्या कीर्तीनें गातात.

आणि गोंवळकोंडे घेऊन त्या राज्याची समाप्ति केली.

इ० स० १६८७, सेप्टेंबर.

औरंगझेबास सार्वकाळ संशय असेच; परंतु वरील वेढ्याचें काम चाललें असतां, अबुल्हसन व शाहजादा मोअझिम यांचा कांहीं बेसावधपणानें पत्रव्यवहार झाला, त्यामुळें यास विशेष अंदेशा आला. त्या शाहजाद्यानें आपला बाप औरंगझेब यापाशीं रदबदली करावी म्हणून तो वरील व्यवहार झाला होता; परंतु तेणेंकरून आपले पूर्वींचे अंदेशे खरे होऊन आले असें औरंगझेबास दिसून आलें, आणि त्याणें

त्याणें शाहजादा मोअझिमास कैदेंत टाकिलें.

मोअझिमास विलंब न लावितां कैद केलें. त्याप्रमाणें तो बहुधा तशाच कैदेमध्यें सात वर्षें होता. मोअझिमानें कधींहि आपल्याकडून अशा भीतीस कारण उत्पन्न केलें नव्हतें. सर्व लोक त्याचा सावधगिरीविषयीं व अल्पसंतोषीपणाविषयीं तारीफ करितात. यापेक्षां अधिक नम्र, अथवा दिसण्यांत राज्यप्राप्तीविषयीं अगदीं आशा राखणारा नव्हे असा, कोणी गुलामहि मिळणार नाहीं, असें बर्नियर वर्णन करितो; तथापि तो ग्रंथकार आणखी सुचवितो, कीं जशी औरंगझेबाची स्वतांची लहानपणची वर्तणूक होती, त्यासारिखीच ही होती, आणि कदाचित् तोच विचार बादशाहाचा मनांत आला असेल.

हीं राज्यें घेतल्याचे परिणाम.

आतां औरंगझेबाचे मनोरथ त्याचा इच्छेप्रमाणें पूर्ण झाले होते; परंतु त्याणें जें हें दुष्कर्मांचें बीं पेरलें होतें, त्याचीं कडू फळें पुढें त्यास व त्याचा वंशजांस प्राप्त व्हावयाचीं होतीं. वरील राज्यें दक्षिणेंत असल्यामुळें त्या देशांत कांहीं व्यवस्था असे; तीं नाहींशीं झाल्यावर त्यांचा आश्रयानें राहणारा जो लोकांचा समाज, तो सर्व कोसळून गेला; आणि त्यापासून जे तुकडे तुकडे होऊन पसरले, ते पुढें तंटे होण्यास मूळ राहिले.

दक्षिणेंतील मुलुकाची अव्यवस्थित स्थिति.

तेथील पठाण व परदेशी लोक यांस मोगलांकडे चाकरी मिळाली असेल, तर असो; परंतु त्यांशिवाय बाकीचा दोन्ही लश्करांतील लोकांस, संभाजीस जाऊन मिळावें अथवा स्वतांसाठीं लूट करावी, यांतून एक मार्ग धरावा लागला. दूरदूरचे जमीनदार लोक, जी स्वतंत्र होण्याची सोय सांपडे ती फुकट जाऊं देत नसत, आणि जा सर्व लढायांत व

ऱ्यांत ते सामील होत, त्यांत ते हमेशा मराठे लोकांचें इष्ट करण्यास तयार असत; मराठे लोक म्हणजे अंदाधुंदीचे पोशिंदे असें ते मानित असत. जे मोगलांचा अगदीं टप्प्यांत असत, त्यांचेंहि दिल त्यांवरून उठलें असे, आणि त्या कारणास्तव व धर्मसंबंधी जो नवीन द्वेषभाव उत्पन्न झाला होता त्यामुळें ते मोगलांचा शत्रूंस सहाय्य करण्यास तयार असत. यास्तव गोंवळकोंड्याचें राज्य नाहींसें झाल्यानंतर, जरी थोडासा भरभराटीचा प्रकाश पडला, तरी त्या दिवसापासून त्रास व अनर्थ यांची माळिका औरंगझेबाचा पाठीस लागली, व तिणें याची मरेपर्यंत पाठ पुरविली.

सांप्रत औरंगझेबास जी चांगली संधि सांपडली होती, ती त्याणें सुस्त बसून फुकट जाऊं दिली नाहीं. त्याणें विजापुरकरांचा, व गोंवळकोंडेकरांचा सर्व मुलुक घेतला: त्यांत त्यांणीं अगदीं अलीकडे घेतलेला, जो दक्षिणेकडील मुलुक तोहि घेतला. त्याणें वेंकाजीस तंजोरांत कोंडून टाकिलें; शिवाजीनें मरण्यापूर्वीं जे प्रांत घेतले होते, त्यांतील मराठे लोकांस त्यांचा त्यांचा किल्ल्यांत पळविलें; आणि शाहजीची म्हैसूरप्रांतांतील जाहगीर बळकाविली; परंतु या सर्व देशांत त्याचा लश्करी अम्मल मात्र बसला. त्या प्रांतांचे देशमुख व दुसरे जमीनदार यांस त्याणें मक्ते दिले, आणि त्यांवर लश्करी सरदार करून ठेविले. ते वसूल करण्याचा खर्चाबदल शेंकडा २५ टक्के घेत, आणि बाकीचांतून आपल्या लश्करचा पगार चुकवून, राहील तें बादशाहास पाठवीत. पुष्कळ ठिकाणीं असें न करितां तिकडील

औरंगझेबानें गोंवळकोंडें व विजापुर या राज्यांचा तंजोरापर्यंत मुलुक सर केला. इ० स० १६८८.

राहिलेल्या ऐवजांतून दुसऱ्या सरदारांचा वेतनांचा कांहीं वर्षे-पर्यंत नेमणूका करून दिलेल्या असत; त्यांचीं वेतनें देण्याकडे बाकी राहिलेला ऐवज जाई.

संभाजीची सुस्ती.

हीं सर्व मोठमोठीं वर्तमानें होत असतां, संभाजी स्वतः सुस्त पडून राहिला होता. तो कलुशानें जादू केल्यामुळें तसा झाला होता, असें मराठे इतिहासकार म्हणतात; परंतु फार दिवस दारू पीत असल्यानें, व विषयासक्त असल्यानें त्याचा शक्ति सहजच गलित होऊन व शून्यवत् पडून गेल्यामुळें, तो तसा झाला असावा हें स्वाभाविकच दिसतें.

शाहजादा अकबर इराणांत गेला.

संभाजीचीं वहिवाट पाहून शाहजादा अकबर त्रासला, आणि अशा दोस्तापासून आपणास कांहीं आशा नाहीं असें पाहून त्याचें दरबार सोडून इराणांत गेला. तेथें तो इ०स० १७०६ पर्यंत होता. याप्रमाणें मराठे लोकांचा राजा नाकर्ता झाला, तथापि त्यांचे सरदार लोक एकएकटे मोगलांजवळ लढत असत, असें असतांहि मराठ्यांचा सर्व सपाट देश हळूहळू मोगलांनीं घेतला. त्यांचा किल्ल्यांवर एकसारख्या शिस्तीनें हल्ला करण्याचा तयारींत औरंगझेब आहे, इतक्यांत त्याचा एका सरदारानें चपलता करून त्याचा मुख्य शत्रु अकस्मात् धरून त्याचा हातांत आणून दिला. तो प्रकारः—संभाजी हा कोंकणामध्यें संगमेश्वराजवळ त्याचा एका आवडत्या आरामस्थानामध्यें थोड्या लोकांनिशीं चैन करित होता. इतक्यांत, हा बेसावध आहे असें वर्तमान, कोल्हापुर एथील मोगल सरदार तकरब खान यास लागलें. कोल्हापुर हें संगमेश्वराहून फकत पंचवीस तीस

कोश आहे, परंतु मध्यें सह्याद्रिपर्वत आहे: तशांत तकरब खान हा केवळ एक परगण्याचा सुभेदार होता यामुळें तो शेजारीं असल्यापासून संभाजीस अथवा त्याचा जवळचा लोकांस फारशी धास्ती वाटत नव्हती. तकरब खान हा चपळ व साहसी योद्धा होता; तो थोड्या स्वारांनिशीं निघाला, आणि त्याणें अशी चांगली तजवीज ठेविली, कीं त्याचा कूचाविषयीं लोकांस संशय येई तों तो संगमेश्वरास दाखल झाला. अद्यापिहि संभाजी पळून जाऊं शकला असता; कारण शत्रूंनीं त्याचा घरास गराडा घालण्यापूर्वीं, मोगललोक येऊन दाखल झाले, अशी बातमी सांगत त्याचे कांहीं लोक आंत धांवत आले होते; परंतु त्या वेळीं संभाजी दारू पिऊन लुल्ल पडला होता, आणि अशी अप्रतिष्ठा करण्याकरितां बातमी सांगितली, ह्मणून मी तुला शिक्षा करीन, असें त्या बातमी देणारास संभाजीनें भेवडाविलें. नंतर लवकरच तकरब खान आला; तेव्हां बहुतेक परिवारांतील लोक पळून गेले. कलुशा हा आपल्या धन्याचा बचावाचा प्रयत्न करित असतां घायाळ झाला; शेवटीं दोघांसहि कैद करून मिरवित मिरवित बादशाहाचा हुजूरांत पाठविलें.[३]

त्यांस मोगलांचा छावणींतून उंटांवर बसवून नेलें; तेव्हां नौबती व दुसऱ्या गोंगाट करणाऱ्या वाद्यांचा त्याचा सभोंवता गजर चालला होता, आणि आपल्या भयंकर शत्रूस पाहण्याकरितां त्याचा सभोंवता अपार लोकांचा थवा जमला होता. नंतर औरंगझेबाचा हुजूरांत नेल्यावर त्याणें त्यांस बंदीखान्यांत घालण्याचा हुकूम केला.

३ कलुशानें आपल्या धन्याचा विश्वासघात केला, असें लोक म्हणतात; परंतु ती चुकी आहे.

औरंगझेबाचा मनांत, बहुधा कांहीं वेळपर्यंत तरी, संभाजीचा द्वारानें त्याचे किल्ले मिळविण्याकरितां, त्याचा प्राण न घेण्याचा विचार होता; परंतु संभाजीस आपली अप्रतिष्ठा झाली असें पुढें वाटायास लागून मरण येईल तर बरें, असा तो मृत्यूविषयीं उत्सुक झाला, आणि जेव्हां औरंगझेबानें त्यास मुसलमान होण्याविषयीं सांगितलें, तेव्हां तो त्याची अप्रतिष्ठा करून, आणि त्याचा पैगंबराची निर्भर्त्सना करून बोलला; तेव्हां तत्क्षणींच त्याचा शिरच्छेद करण्याची बादशाहानें आज्ञा केली. हा शिक्षेचा हुकूम बहुधा धर्मविरोधाचा गुन्ह्यावरून दिला असावा. कारण तो अमलांत आणत्ये वेळीं मुद्दाम क्रूरता केली, तसा औरंगझेबाचा नेहेमींचा पाठ नसे. प्रथम तापलेल्या लोखंडाचा शस्त्रानें त्याचे डोळे फोडून टाकिले; त्याची जीभ कापून टाकिली; आणि शेवटीं त्याचा प्रियकर कलुशासुद्धां त्याचा शिरच्छेद केला.

संभाजीस मारून टाकिलें, इ० स० १६८९, आगस्ट.

मराठे लोक संभाजीस हलकट असा मानित असत, तथापि त्याची जी मोगलांनीं दुर्दशा केली तिजविषयीं त्यांस दया येऊन, त्याचा त्यांणीं सूड उगविला; आणि त्या सर्व लोकांस अतिशय संताप होऊन, त्यांचा धर्मसंबंधी द्वेषाचीहि शिकस्त झाली.

मराठे लोकांचा द्वेष कठीण होता खरा; परंतु मोगलांबराबर टकर देण्याचें याजवळ विशेष ऐश्वर्य नव्हतें. त्याचें कारण असें कीं यांस चुरडून टाकण्याजोगी औरंगझेबाची फौज होती, तसाच त्या बादशाहाचा स्वतांचा लौकिक, त्याचा सभोंवती डामडौल व महत्व, व दिल्लीचा मोठा मोगल बादशाह हें नावहि,

मराठे लोकांचें दौर्बल्य.

या सर्व गोष्टींचा योगानें खुद औरंगझेबाशीं लढाई करण्यास जी यांस भीति उत्पन्न होत असे, तशी त्याचा सरदारांव- रावरील लढायांत होत नसे. पुढें औरंगझेबानें स्वतः पु- ण्यास राहून त्यांची राजधानी रायगड, यास वेढा देण्यास लश्कर पाठविलें; तेव्हां त्यांचा दु- बळेपणा उघड झाला. जेव्हां संभाजी मारला गेला, तेव्हां सर्व मुख्य मराठे सरदार रायगडास जमून, संभाजीचा लहान मुलगा (जास पुढें शाहू ह्मणूं लागले,) यास राजा ठरवून, त्याचा चुलता राजाराम यास कारभारी नेमिते झाले. नंतर किल्ल्याचा रक्ष- णार्थ लोक ठेवून, व आंत सर्व सामग्री सांठवून, निघेल ती चाकरी बजाविण्यास तयार राहवें म्हणून राजारामासुद्धां ते तेथून निघून गेले. रायगडावरील लोकांनीं पुष्कळ महिनेपर्यंत टिकाव धरिला; परंतु शेवटीं एका मावळी सरदारास कांहीं नाखुशीचें कारण झाल्यामुळें, आणि सर्व लोक निराश झा- ल्यासारिखे झाले होते तसा तोहि होऊन, स्वराज्याचा घातास प्रवृत्त झाला, आणि त्याणें मोगलांस एक चोरवाट दाखविली. नंतर मोगललोक तो किल्ला घेऊन शाहूस घेऊन गेले. याप्रमाणें आपला बालराजा शत्रूंचा हातांत सांपडला असें पाहून, राजाराम हा शिवाजीचा वंशांतील शेष राहिलेला पुरुष ह्मणून त्याणें आपला जीव जोखमांत न घालितां क- र्नाटकीं लांबीचा पल्ल्यावरील जिंजीनामक किल्ल्यांत जाऊन राहवें, असा सर्वांनीं निश्चय केला; आणि इकडे दक्षिणें- तील किल्ले चांगले लढत असा त्यांवरील बंदोबस्त करून,

औरंगझेबानें रायगडास वेढा देण्यास फौज पाठवि- ली.

राजारामाची कारभारीप- णाची कार- कीर्द.

मोगलांनीं रायगड घेत- ला इ० स० १६९०.

सर्व लश्करचे लोक, चांगली संधि साधेल तेव्हां, फायदा करून घेण्याची तयारी ठेवून आपल्या गांवीं जाते झाले. त्याप्रमाणें राजाराम थोड्या लोकांनिशीं वेष पालटून शत्रूंचा मुलुक वटावून जिंजीस निघून गेला, आणि तेथें पोंचल्यावर आपल्या नावानें द्वाही फिरवून, आपला पुतण्या बंदीस पडला या कारणानें, राजा असा किताब धारण करिता झाला. दैववशात् त्याचा ब्राह्मण प्रधानांत प्रऱ्हाद निराजी नामें एक बुद्धिमान् पुरुष होता; त्याणें आपल्या सामर्थ्यानें दुसऱ्या प्रधानांवर व सरदारांवर आपली छाप बसविली, आणि विचार करून पाहिला, कीं या वेळीं जे लोक आपआपण यत्न करित आहेत त्यांस एक कार्योद्देश लावून द्यावा एवढें बस आहे; याहून जास्त जरी होण्याजोगें असलें, तरी सद्यः करून उपयोगीं नाहीं.

राजाराम जिंजी एथें पळून गेला.

त्याणें राजा असा किताब घेतला.

मराठे लोकांनीं आपल्या संरक्षणाचे योजिलेले उपाय.

शिवाजीसारखा व्यापक बुद्धीचा पुरुष नसता, तर मराठे लोकांचा एक कट झाला नसता. सांप्रत सर्वांस एकच होष लागला होता, त्यामुळें या लोकांचा स्वभावाप्रमाणें, व त्यांचा लढाई करण्याचा रीतीप्रमाणें, एकेकट्यानें निरनिराळें, आपणास होतील तसे प्रयत्न करून, आपलें कार्य चालवावें हें सहजच होऊन आलें. कोणी मारावयास आला असतां पडून राहवें, शत्रूस हल्ला करण्यास कांहीं सांपडूं देऊं नये, आणि जेव्हां आपणास त्यावर हल्ला करावयाची वेळ येईल, तेव्हां भरपूर बळानें हल्ला करावा, ही युद्धाची रीति त्यांस उत्कृष्ट योग्य होती. या शिस्तीप्रमाणें

जे मराठ्यांचे जाहगीरदार सरदार होते, ते वरील हकीकत होतांच लागलेच मोगलांस शरण गेले; आणि आम्ही मोठ्या आस्थेनें, व प्रीतीनें आपला पक्ष धरिला आहे असें सर्वांहून प्रसिद्धपणीं म्हणवूं लागले. परंतु बहुधा ते सर्व सरदार बंडवाले लोकांशीं व्यवहार ठेवीत; आपल्या पदरचा लोकांस त्यांकडे जाऊन मिळूं देत; आणि स्वतांचा सग्यांचा हाताखालीं कांहीं लोक देऊन लुटीचा स्वाऱ्यांत सामील होण्याकरितांहि पाठवीत; याप्रमाणें हे हेरपणा करून व पोकळ दोस्ती दाखवून जितकें नुकसान करीत, तितकें ते उघड शत्रुत्व करिते तरी त्यांचानें झालें नसतें. सरकारचा कडक अम्मल नाहींसा झाला व नियमानें पगार मिळण्यास खजीना नाहींसा झाला, म्हणजे मराठ्यांचे शिपाईहि आपल्या हिताकरितां एक एक स्वतःच बेत करूं लागत. शिवाजीचा प्रथमचा दरवड्यापासून मराठी राज्याची मोठी बढती होऊन पुष्कळ संपत्ति मिळाली, तरीहि लूट मिळविण्याचा लोभ, हा मराठे लोकांस नेहेमीं एक बलाढ्य रोगच होता. शत्रूस जिंकलें, कीं त्यास लुटावें, ही त्यांची जयाची निशाणी असे. हे लोक सर्वांचा कार्यार्थ लवकर जूट करून मिळत, तथापि तेव्हांहि प्रत्येक मनुष्य आपली निराळी लूट मिळविण्याचा आस्थेनें वागत असे. जेव्हां लोकांची बुद्धि या प्रमाणें प्रखर झाली, तेव्हां तिला मार्गास लावून देण्यास त्यांचा सरकारास विशेष सायास न पडून तिजपासून जी शत्रूंस भीति असे, तितकी शिकविलेल्या फौजेचा पराक्रमाचीहि नसे.

दक्षिणेंतून मराठ्यांचा अम्मल उडवून टाकिला, असें

जिंजी घेण्या- करितां औरंगझेबानें झुल्फिकार खानास पाठविलें.

औरंगझेबास दिसून आल्यावर, जिंजी किल्ला घेऊन मराठ्यांचा राज्याचा शेवट करावा म्हणून असद खान याचा मुलगा झुल्फिकार खान यास त्याणें पाठविलें. झुल्फिकार खानानें रायगड घेऊन नुकतीच कीर्ति मिळविली होती. तो जिंजी एथें पोंचल्यावर पाहूं लागला तों, जरी त्याजवळ लश्कर पुष्कळ होतें, तरी तो किल्ला सर करण्याजोगें अथवा त्यास वेढा देण्यापुरतें इतकेंहि नव्हतें. म्हणून त्याणें कुमक मिळण्याकरितां औरंगझेबास लिहून पाठविलें, आणि दरम्यान आपल्या फौजेपैकीं कांहीं लोक, तंजोर व दुसऱ्या दक्षिणेकडील देशांत खंडण्या जमा करण्यास लाविले. त्याणें मागितलेली कुमक पाठविण्याचें औरंगझेबास सामर्थ्य नव्हतें. त्याणें आपला मुलगा कामबक्ष याजबराबर लश्कर देऊन, विजापुरानजीक वांकिनखेडा म्हणून एक किल्ला आहे, तो घ्यावयास पाठविला होता; तो किल्ला एका लुटारू लोकांचा टोळींतील नायकाचा ताब्यांत होता; तथापि त्याचा बंदोबस्त मजबूद होता, यामुळें तो घेण्याचें कामबक्षाचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. याशिवाय मराठे लोकांनीं पुनः दक्षिणेंत वर डोकीं केली, तेणेंकरून याहूनहि आणखी लश्कराची गरज लागली. तो प्रकार असाः—जेव्हां राजारामाची जिंजी एथें संस्था झाली, तेव्हां लागलेच त्याणें आपले दोघे अति चपळ सरदार संताजीघोरपडे व धनाजीजाधव यांस आपल्या देशांत साधेल तर आपलें पारडें फिरवावें म्हणून पाठविलें. ते दक्षिणेंत येऊन पोंचण्यापूर्वीं विजापुरसरकारचा चाकरींतून निघालेले कांहीं लोक आपल्याच फायद्याकरितां लुटालूट करूं लागले होते; आणि

हे दोघे प्रख्यात सरदार येतांच मराठे स्वार प्रत्येक खेड्या-पाड्यांतून येऊन यांचा पतकास मिळत चालले. मराठे लोकांचा जो दक्षिणेंत थोडासा देश राहिला होता, त्याचा मुल्की बंदोबस्ताकरितां रामचंद्रपंत नावाचा सातारा एथें कारभारी ठेविलेला होता. त्याणें आपल्या हद्दींत कांहीं लश्कर जमा केलें, आणि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें मराठे लोकांचा लुटारू स्वभाव असेच, त्यास अनुकूल करून घेऊन त्याणें सांप्रत एकदम एक नवी व उत्कृष्ट रीतीनें तयार झालेली अशी फौज जमा केली. मराठ्यांचा अमलाबाहेरील सर्व मुलुकांत, चौथाई व मराठे सरकारचे दुसरे हक्क घेण्याचा अधिकार, त्याणें लश्करांतील प्रत्येक वजनदार सरदारास दिला, आणि जा मुलुकांतले लोक ही खंडणी देणार नाहींत, तो लुटून फस्त करावा, अशी त्यांस मोकळीक दिली. या खंडण्यांतून लश्करचा पगार देत असत, व जे लोक प्रत्यक्ष लूट मिळवीत त्यांस ती बक्षिस मिळत असे; आणि प्रत्येक सरदारास स्वतांसाठीं घांसदाणा म्हणून एक नवी खंडणी घेण्याची याणें परवानगी दिली असे. याप्रमाणें निमंत्रण झाल्यामुळें प्रांतांतील सर्व शिलेदार लोक त्या कामास प्रवृत्त झाले. मराठ्यांचा जातींतील बहुतेक मुख्य सरदार निरनिराळ्या लहानमोठ्या स्वतंत्र टोळ्या घेऊन मोगलांचा रयतेस लुटून आपलें पोटें भरण्याकरितां निघाले. त्यांत कांहीं प्रथमच आलेले होते; त्या टोळ्या केव्हां केव्हां एकेरी जात असत, व केव्हां केव्हां एक मत करून एका ठिकाणीं मिळण्याचा व परत जाण्याचा जागा ठरावून एकत्र जात असत. संताजी व धनाजी यांचा फौजांवर त्यांचा अम्मल असे, परंतु त्याहि अशाच

इ० स० १६९२.

रीतीनें वागत असत. याप्रमाणें मराठे लोक एकदम चारी दिशांनीं पसरले, आणि सर्व दक्षिण जाळित व लुटित चालले; तेणेंकरून लोकांत भिती उत्पन्न होऊन कल्होळ झाला.

मोगल व मराठे यांचा लश्करांची तुलना.

मोगलांचा व मराठ्यांचा लढाईचा शिस्तींची वास्तविक परीक्षा या वेळीं झाली, आणि कोणतीपासून विशेष फायदा आहे, हें लवकरच दिसून आलें. अकबराचा कारकीर्दींत पुष्कळ दिवसपर्यंत स्वस्थता होती, आणि राज्याची पद्धति सौम्य व रीतिभाती सौजन्याचा असत; तेणेंकरून व तशीच अकबरानें मुसलमानांशीं हिंदुलोकांची पुष्कळ मिसळ केल्यामुळें या उत्तरेकडून आलेल्या योत्ध्यांचा (ह्मणजे मुसलमानांचा ) स्वभाव नरम पडत चालला. जहान्गीराचा कारकीर्दींतील अनास्था, व शाहजहानाचा कारकीर्दींतील सर्व देशाची स्वस्थता, हीं दोन्ही कारणें लश्कराची कैद, व लोकांचा लढाऊपणा, यांस प्रतिकूळ होतीं; त्यामुळें सांप्रतचा कारकीर्दीमध्यें हे दोनीहि गुण समजुतींत येण्याजोगे पुष्कळ कमी झाले होते. आळसाविषयीं व हतवीर्यपणाविषयीं जी दिल्लीचा उमराव लोकांची पुढें प्रख्याति होऊन गेली आहे, त्या दोन्ही दुर्गुणांमध्यें त्यांणीं बरीच निपुणता संपादन केली होती; आणि जांस सामर्थ्य राहिलें होतें, तेहि चपळतेची नोकरी करण्याचा उपयोगीं नव्हते. जाडुरणीचा डगल्यावर तलवार चालणार नाहीं असे डगले घालून ते सर्व रणांत जात, आणि त्या डगल्यांवर तारेची किंवा पत्र्याची चिलखत असे; त्यांचे स्वारीचे घोडे मोठे व देखणे असत, त्यांवर जिनें औजड व त्यांवर कपड्याचे किंवा मखमालीचे मोठे गाशे असत, आणि त्या गाशांचा चोहों

बाजूंस निरनिराळ्या तऱ्हेचा रेशिमी साटिन कापडाचे पटके झुलत असत, व पुष्कळांचा खोगिरांचा दोहों बाजूंस वनगाईचा केसांचीं मोरचेलें लटकत असत. घोड्याचा मानेवर, व सर्व जिनांवर, सोन्यारुप्याचा सांखळ्या, व घांटा, व दुसरे शृंगार, यांचें ओझें असे. प्रत्येक शिपाई सामर्थ्यानुरूप आपल्या सरदाराप्रमाणें डौल घालित असे; तेणेंकरून ही मोगलांची स्वारी म्हटली, ह्मणजे वरातेचा कामाला चालण्यास उत्कृष्ट उपयोगी असे; हे लोक, समयास एका ठिकाणीं रणभूमीवर उभे राहून लढाई करण्याचा अगदीं निरुपयोगी असत असें नाहीं, परंतु त्यांमध्यें दीर्घ प्रयत्न करण्याचें सामर्थ्य नसे, आणि कष्ट घेऊन, व हाल भोगून टिकाव धरण्यास ते त्याहूनहि असमर्थ असत.

याप्रमाणें ते लोक प्रत्येकीं ऐषारामीं होऊन गेले असून, त्यांची कैद तर अगदीं ढिली पडून गेली होती. औरंगझेब आपल्या दक्षतेविषयीं अभिमान राखित असे; तथापि त्याचा अभिमानाचें नाक चिरडून त्याचा लश्करी खात्यांत अतिशय खोडसाळ वहिवाटी शिरकल्या होत्या. पुष्कळ सरदार आपल्या नेमणूकींपैकीं निम्मे लोक मात्र ठेवित असत, आणि दुसरे कित्येक आपले चाकर व गुलाम लोक आपल्या पतकांत दाखल करित असत. या प्रकारचा हलकट सोबत्यांचा कित्ता पाहून दुसरे शिपाई लोक बिघडले, आणि शिपाईपणाचा मान न राहिल्यामुळें लश्करी बाणा नाहींसा झाला. याप्रमाणें त्या सरदारांची अपल्या दोषांविषयीं खातरी असे, त्यामुळें त्यांस दुसऱ्यांचा अपराधांकडे ढिली नजर देऊन कानाडोळा करावा लागत असे; त्यामुळें त्यांचा लोकांची पुरी माती झाली. पाहरा करणें किंवा चौकीवर हुशारीनें राहणें हेंहि त्यांचा

ह्यातून होईनासें झालें, आणि ते इतके सुस्त होऊन गेले, कीं जरूरीचा प्रसंग पडला असतां त्यांचानें उभें राहणें घडलें नसतें. तशांत त्यांचे औजड चारजामे ठाकठिक घालण्यास, व भारी चिलखती चढविण्यास जो वेळ लागे, तेणेंकरून असें काम यांचानें व्हावयाचेंच नाहीं, हें निर्विवाद होतें.

पादशाहाचा छावणीची तयारी जशी स्वस्थतेचा वेळीं असावयाची, तशी असे; आणि प्रत्येक उमराव त्याप्रमाणें आपली बडेजाव करूं पाहत असे. अगदीं शेवटचा प्रतीचे शिपाईहि आपल्या डेऱ्यांतून शरीरसुखाची तजवीज पाहत असत, त्यामुळें जेव्हां बादशाहाचें लश्कर कूच करूं लागे, तेव्हां हत्ती, उंटें, गाडे, बैल यांचा लांबचलांब तांडाच लागे, आणि त्यांत सर्व प्रतींचा बायका, व्यापारी, दुकानदार, चाकर, बावरची, व दुसरे सर्व प्रकारचे ऐषराम उत्पन्न करणारे ( गवय्ये आदि करून ) लोक, याप्रमाणें छावणीबराबर इतर बाजारबुणग्याचा जमाव त्यांत मिसळून गेला असे, आणि त्यांची संख्या शिपायांपेक्षां दसपट असे. हें औजड सैन्य जा देशांतून जाई तो देश खाऊन टाकी, आणि त्यांतहि शिपाई लोकांचा उत्धटपणापासून व बेकैदेपासून रयतेचें विशेष नुकसान होई.

मराठे लोकांचा बांधा लहान, व हे चपल असून मेहनतीचा कामाची व जाड्या भरड्या अन्नाची यांस संवयी असे, असें पूर्वींच वर्णन करण्यांत आलें आहे. बाजरीचा रोट व त्याबराबर, मिळाल्यास, एक कांदा, हें त्यांचें नेहमींचें खाणें असे; एक लहान शिपायपगडी, तंग मांडचोळणा, व कमरेस भिडविलेला कांचा, एवढा त्यांचा पोषाक

असे; त्यांचें बाकीचें शरीर उघडें असे अथवा एक ह-
लका रुवाचा डगला अंगांत घातलेला असे; एक तलवार व
बंदूक, हीं त्यांचीं हत्यारें असत; परंतु तेरा किंवा चौदा फु-
टी बांबूचा काठीचा भाला हा ते विशेषेंकरून बाळगीत.
भाला हें मराठे लोकांचें साधारण शस्त्र असे. ते विलक्षण
कौशल्यानें त्याचा उपयोग करित असत. त्यांचे घोडे
स्वदेशांतील असून अंगानें लहान परंतु मजबूद, व चपळ,
व कंटक असत, आणि स्वारानें किंचित् मांडी दाबली, कीं
भरधांव चालत असतां एकदम पुढें उडी टाकणें, किंवा थां-
बणें, किंवा बाजूवर उलटणें, हें त्यांस शिकविलेलें असे.
त्यांचा खोगीर कपड्याचा केलेला असून त्यावर गादीची
घडी करून गाशा टाकलेला असे. जेव्हां ते तळ देऊन रा-
हत तेव्हां सरदारलोकांशिवाय थोड्यांसच तंबू असत,
आणि जेव्हां ते लुटावयाचा स्वाऱ्या करावयास जात; तेव्हां
प्रत्येक मनुष्य जमीनीवर निजे; आणि जवळ आपला भाला
टोंचून ठेवून घोड्याची लगाम आपल्या हातास बांधून ठेवी,
आणि शत्रु जवळ आल्याची जरा धामधूम झाली, कीं घो-
ड्यावर उडी मारण्यास तयार असे. या प्रकारचें त्यांचें
लश्कर असे. ते लोक कधींहि मोगलांचा भारी हल्ला ह-
टविण्यास पुढें उभे राहत नसत, परंतु तसा प्रसंग आल्यास
एकदम चोहींकडे पसरून एकेकटे जवळचा पहाडांतून अ-
थवा दुसऱ्या अडचणीचा जाग्यांमध्यें घोडे टाकून जात.
जर शत्रूचे लोक आपली फळी सोडून त्यांचा पाठीस लाग-
ले, तर ते एकट्यादुकट्या घोडेस्वारास कापून टाकीत,
अथवा एकाद्या दरीचा मागें, किंवा जेथें लहान टोळीचानें

आपणावर निर्धास्त चालून येववणार नाहीं अशा दुसऱ्या अडचणीचा ठिकाणीं ते जमत, आणि जेव्हां त्यांचा पाठलाग करणाऱ्या शत्रूंचे घोडे थकून, व तेहि नाउमेद होऊन परत जात, तेव्हां मराठे लोक क्षणांत त्यांचा पाठीस लागत, आणि जर संधि सांपडली, अथवा कांहीं गोंधळ झाला, तर ते लागलेच त्यांजवर तुटून पडत; परंतु बहुधा मोगलांचा लश्कराचा बाजूनें व पिछाडीस ते सुटे सुटे पडून राहिलेले असत, आणि केव्हां केव्हां एकेकटे स्वार आपल्या बंदुका शत्रूंचा कटांत सोडण्याकरितां अथवा आपल्या लांब भाल्यांनीं एकाद्या मागसावलेल्या शिपायाचा प्राण घेण्याकरितांहि तडकून पुढें येत. कांहीं सामग्री घेऊन शत्रूंची टोळी जात असल्यास, तीं लुटण्याविषयीं त्यांचें फार कौशल्य असे, व त्यामध्यें त्यांस आनंदहि फार होई. ते जात त्या त्या देशांतील लोक त्यांजवर कृपा करीत, त्यामुळें त्यांस बातमी पुरी मिळे, आणि मोगललोक बातमीविषयीं अगदीं अंधारांत असत, यामुळें ते, कूच करून जात असतां, त्यांजवर मराठे एकदम येऊन पडत आणि त्यांचा बराबरचीं धान्याचीं व सामानाचीं उंटें व बैल त्यांचा देखत एकदम पार करून टाकीत. नंतर ते लोक आपल्या खजीन्याचा लोकांचें संरक्षण करण्याकरितां त्यांचा सभोंवती बळकट व्यूह रचीत; परंतु एवढ्या लाभाचा लोभ पुढें असल्यामुळें ते मराठे अनिवार्य होऊन जात; तेव्हां त्या मोगलांचा टोळीस बहुधा ठाणें धरून राहवें लागे. मग मराठे त्यांचा वाटा बंद करीत, व पाणीहि बंद करीत; तेव्हां एक दोन दिवसांनंतर मोगलांस शरण यावें लागे. नंतर त्यांचा शिपाई लोकांपासून त्यांचे घोडे व मोलवान चीजवस्त नागवून घेऊन कांहीं

निष्क्रय द्रव्य घेण्याकरितां सरदारलोकांस अडकवून ठेवीत.

औरंगझेबाचा पलटणचा भरतीचे लोक व त्याचा खजीना हीं तो उत्तरहिंदुस्थानांतून आणित असे, ह्मणून संताजी व धनाजी हे त्याचा फौजेचा व उत्तरहिंदुस्थानाचा मध्यें आड आले: त्यांणीं पुष्कळ वेळा खजीने वगैरे मारले, पुष्कळ टोळ्यांचे पराजय केले, आणि इतकें वर्चस्व संपादन केलें, कीं जे मोगल त्यांस पूर्वी तुच्छवत् मानित असत, ते त्यांस भिऊन त्यांची धास्ती बाळगूं लागले. इ० स० १६९३.

याप्रमाणें नाउमेदीची वेळ आली तेव्हां लढाईचा शेवट न होईल तर न होऊ, परंतु आपल्या लश्कराची गेलेली अब्रू परत मिळविण्यास कांहीं तरी बंदोबस्त योजावा असें औरंगझेबास जरूर वाटलें. तेव्हां त्याणें जिंजीवर झपाट्यानें लढाई चालविण्याचा निश्चय केला. पूर्वी त्याणें कामबक्ष यास वांकिनखेड्याहून परत बलावून नेलें होतें; हल्लीं वरील किल्ल्याचा वेढ्याचें काम चालविण्यास त्याच शाहजाद्यास नेमून त्यास दुसरी फौज देऊन पाठविलें; परंतु औरंगझेबानें आपल्या नेहमींचा वहिवाटीप्रमाणें त्याजबरोबर चाकरी बजावण्याकरितां झुल्फिकार खानाचा बाप असद खान याची नेमणूक केली, आणि असद खानाकडेसच लढाईची सर्व वास्तविक हुकमत सोंपिली. याप्रमाणें बंदोबस्त केल्यानें त्या दोघांजणांसहि त्रास उत्पन्न झाला. आपणास वास्तविक अधिकार थोडा दिला ह्मणून कामबक्ष नाखुश झाला, आणि झुल्फिकार खान

बादशाहानें जिंजी घेण्याचें काम शाहजादा कामबक्ष यास सांगितलें.

इ० स० १६९४.

झुल्फिकार खान त्रासून गेला.

याजकडील सेनापतीचें काम काढून त्याचें महत्त्व कमी केलें, आणि जय झाला असतां यास त्याबदल शाबासकी मिळूं नये अशीहि तजवीज केली, हें पुष्कळांस वाईट वाटलें.

आणि त्याणें वेढ्याचा कामांत हरकत आणिली.

वरील कृत्यांनीं झुल्फिकारास संताप येऊन त्याची साफ बुद्धि फिरली; आणि मराठी ब्राह्मण हे तर अशा तंट्यांपासून आपला फायदा करून घेण्यास हमेशा टपलेलेच असत, त्यांणीं झुल्फिकाराजवळ जें बोलणें लाविलें तें त्याणें ऐकिलें, आणि आपलें काम ढिलाईनें चालवून शत्रूंस बातमी देऊं लागला; तेणेंकरून त्यांस तीन वर्षेंपर्यंत टिकाव धरून वेढ्याचें काम लांबणीवर जाई असें करण्यास सामर्थ्य आलें.

संताजी घोरपडा वेढा उठविण्याकरितां निघून गेला. इ० स० १६९७.

त्यानंतर संताजी घोरपडा याणें आपल्या राजास सोडविण्याचा मोठ्या धिटाईनें यत्न केला. त्याणें आपली कांहीं फौज औरंगझेबाबरोबर युद्ध करण्याकरितां ठेविली, आणि धनाजी जाधव यास बोलावून आपल्या उत्कृष्ट २०,००० घोडेस्वारांनिशीं जिजी एथें जाण्यास निघाला. तो मधील मुलुकांतून त्वरेनें गेला, आणि वेढा देणाऱ्या फौजेवर इतक्या सपाट्यानें आला, कीं मागच्या पुढच्यांचें परस्परांस सहाय्य मिळण्याजोगें त्यांचें तें औजड सैन्य तयार होई तों याचा आघाडीचा लोकांनीं मोगलांचा लश्कराचा एका भागावर छापा घालून त्यांचे डेरे लुटले, आणि त्या भागाचा सरदारास कैद केलें. नंतर त्यास हटविण्याकरितां मोगलांचें पुष्कळ लश्कर घाईघाईनें आलें, त्याचा याणें लागलाच पराजय केला, आणि पुढें

त्यांचा बाहेरील चौक्यांचा लोकांस आंत हाकून देऊन घांसदाणा आणणारे मारून टाकिले, आणि मोगलांचा छावणीमध्यें बाहेरून सामग्री व बातमी येण्याचें बंद पाडिलें. नंतर त्याणें औरंगझेब मेल्याची कंडी उठविली; आणि अशा आपत्तीचा समयीं तिजवर लोकांचा सहजच विश्वास बसला. त्या बातमीची संधि पाहून तुला गादी मिळविण्याकरितां आम्ही मदत करूं असें धनाजीनें कामबक्षाशीं बोलणें लाविलें. कामबक्षास असद खान व झुल्फिकार खान यांविषयीं संशय होता, असें दिसतें, म्हणून त्याणें वरील बोलण्यास कान दिला. या प्रमाणें शत्रूशीं व्यवहार चालल्यानें असद व झुल्फिकार खान यांसहि भीति पडली. पुढें एके रात्रीस कामबक्षानें खुद आपल्या हाताखालचा फौजेस तयार होण्याचा हुकूम केला, तेव्हां त्या दोघां सरदारांस असें वाटलें कीं, हा मराठे लोकांकडे निघून जाण्याचा प्रत्यक्ष यत्न आहे: हा त्यांचा तर्क वाजवी असो, किंवा गैरवाजवी असो; परंतु त्यांणीं लागलाच कामबक्षास अटक केला; त्या योगानें त्या मोगलांचा सैन्यामध्यें भीति आणि तंटे इतके वाढून निकरास गेले, कीं त्यांस आपल्या तोफा उडवून मोरचे सोडून देऊन एका ठिकाणीं जमून राहणें भाग आलें. मग तेथें ते खंदक पाडून राहिले असतां, उलटा त्यांस मराठे लोकांनीं वेढा दिला; शेवटीं उभय पक्षांचा तह झाला: त्यांत असें ठरलें, कीं मोगलांचा लश्करानें तेथून सुमारें १० कोशांवर बंदिवाश नामें गांवीं निघून जावें, आणि बादशाहाचा दुसरा हुकूम येईपर्यंत तेथें राहवें.

कामबक्षास झुल्फिकारानें कैद केलें.

मोगललोक परत गेले.

जेव्हां कामबक्ष व असद खान हे प्रथम दक्षिणेंत निघून गेले, तेव्हां औरंगझेब दक्षिणेंत जाऊन कृष्णाकांठीं गलगला एथें छावणी देऊन राहिला होता. दुसऱ्या वर्षी तो पंढरपुराजवळ भीमाकाठीं ब्रह्मपुरीस गेला, आणि तेथें काईम छावणी देऊन पुष्कळ वर्षेंपर्यंत राहिला. वरील वर्तमान होत असतां, औरंगझेब विजापुराकडे गेला, आणि तुम्ही केलेली वहिवाट मला अगदीं नापसंद आहे असे हुकूम त्याच वेळीं आपल्या सरदारांस पाठविता झाला. त्याणें कामबक्षास दरबारांत पाठवून देण्याची आज्ञा केली, आणि तो आला तेव्हां त्याचा ममतेनें स्वीकार केला. त्याच वेळीं असद खानास बादशाहानें परत बलाविलें, आणि दक्षिणेंतील फौजेचें संपूर्ण आधिपत्य झुल्फिकाराकडे ठेविलें. अशी विलग वर्तणूक औरंगझेबानें कशासाठीं केली, हें समजत नाहीं; कारण झुल्फिकार हा त्याचा उत्कृष्ट सरदार होता खरा, परंतु तो सांप्रत फार चांगलें मन लावून आपली कामगिरी बजावील अशी पादशाहानें अपेक्षा राखणें अशक्य होतें. नंतर पुढें लढाई सुरू झाली, तेव्हां ती उडवत उडवत चालली. झुल्फिकारानें तंजोरप्रांतांत खंडण्या जमा केल्या; तेव्हां संताजीनें हैसूरप्रांतांत चितलदुर्गानजीक एका मोठ्या पदवीचा व नामांकित सरदाराचा हाताखालील टोळीचा नाश केला. दुसऱ्या लढाया निरनिराळ्या ठिकाणीं झाल्या, त्यांत कधीं मोगल व कधीं मराठे असे जय पावत असत; परंतु, त्यांपासून साधारण परिणाम मोगलांस अनुकूल झाला असावा,

औरंगझेब भीमेवर छावणी देऊन राहिला.

त्याणें कामबक्षास बंदींतून मुक्त केलें.

झुल्फिकार अधिक बेदिल झाला.

असें दिसतें; कांकीं त्यांस शेवटीं जिंजी-
चा किल्ल्याचा वेढा सुरू करण्याची ताकद आली. इ०स० १६९७.

हें लढाईचें काम चालत असतां झुल्फिकारानें आपली कामगीरी मोठ्या तत्परतेनें व बुद्धिमत्तेनें बजाविली; परंतु वेढ्याचें काम पुनः सुरू केल्यावर त्याणें मराठे लोकांशीं पुनः बोलणें लाविलें, आणि ती जागा मोगलांचा हातांत लवकर पडूं नये असा विचार उघड मनांत आणिला असें दिसलें. त्याणें वेढ्याचें काम सुरू केलें, परंतु लांबणीवर घातलें.

परंतु औरंगझेबासारख्या बारीक नजरेचा पादशाहाचा हाताखालीं असे ढोंग चालविणें कठीण होतें. त्यामुळें दुसऱ्या वर्षीं झुल्फिकाराचा अनुभवास आलें, कीं आपणास जिंजी घेतली पाहिजे, अथवा बादशाह बेअब्रू करून परत बोलावील तिकडे गेलें पाहिजे. याप्रमाणें झाल्यावर त्याणें राजारामास पळून जाण्याविषयीं उपदेश केला, आणि हें शेवटचें स्नेहाचें कृत्य करून, मागून आपलें वेढ्याचें काम तडाक्यानें व मन लावून चालवून तो किल्ला हस्तगत करून घेतला. बादशाहास क्रोध आला. मोगलांनीं जिंजीकिल्ला घेतला. इ० स० १६९८.

# प्रकरण चौथें.

इ० स० १६९८ पासून औरंगझेब मरण

पावला तेथपर्यंत वर्तमान.

मराठे-लोकांमध्यें कलह माजले.

वर सांगितल्याप्रमाणें झुल्फिकार खान हा एकाएकी बलाढ्य होऊन, त्यास जिंजीचा वेढा पुनः चालू करण्याचें सामर्थ्य आलें, त्याचें कारण बहुधा मराठे लोकांमध्यें तंटे होऊं लागले होते, हें असेल. ते तंटे सांप्रत उघड रीतीनें होऊं लागले. तो प्रकारः— धनाजी जाधव हा संताजीजवळ भांडला होता, आणि संताजीचा कीर्तीचा द्वेष राजाचा मनांत उत्पन्न होऊन तो धनाजीचें सहाय्य करूं लागला. तशांत संताजी लश्करांत कैद ठेवण्याविषयीं यत्न करित असे, त्यामुळें त्याचा छावणींतील लोकहि त्यावर नाखुश असत; यामुळें त्यांचा छावणींत धनाजीचा पक्षाची एक फळी झाली, आणि संताजीस पळून जावें लागलें; व शेवटीं त्यास पकडून जागचा जाग्यावर शत्रूंनीं मारून टाकिलें. हा घात होण्यापूर्वी राजाराम सातारा एथें येऊन राहिला होता; तो सांप्रत आपल्या सर्व राज्याचा कारभार स्वतः पाहूं लागला; व पूर्वीं मराठे लोकांचें कधींहि जमलें नव्हतें एवढें मोठें सैन्य घेऊन लढाईस

संताजी घोरपड्याचा खून झाला.

निघाला, आणि गोदावरीचा उत्तरेस जाऊन, जा ठिकाणीं लोकांनीं त्याचा हुकूम मान्य केला, तेथें चौथाई व दुसरे हक्क वसूल करून, बाकीचा, वऱ्हाड प्रांतांतील जालना शहरापर्यंत, देश लुटून फस्त करिता झाला. इतक्यांत मोगलांची शिस्त बदलल्यामुळें त्याची पुढें गति कुंठित झाली. पूर्वी औरंगझेब बहुधा ब्रह्मपुरी एथें राहून, तेथून केव्हां केव्हां आपला मुलगा अझीम याजबरोबर थोडे लोक देऊन पहाडी किल्ले घेण्याकरितां, अथवा लुटारू लोकांचे हल्ले परतविण्याकरितां पाठवित असे; परंतु साधारण मुलुकाचें जें संरक्षण करावयाचें, तें करण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं टोळ्या ठेवून त्यांवर भरवसा ठेवून राहत असे. सांप्रत त्याणें असा विचार केला, कीं आपण आपल्या लश्कराचा एक भाग घेऊन मराठे लोकांचा किल्ल्यांवर जावें; आणि दुसरा भाग, जो झुल्फिकार खानाचा हाताखालीं असून त्यावर आपला एक नातू नामधारी अधिपति आहे, त्या भागाचा लश्करानें मराठे लोकांचा फौजा जिकडे जातील तिकडे त्यांचा पाठलाग करावा, आणि आपली सगळी फौज कामास लागू होई असें करावें. हा बेत जर पूर्वींच झाला असता, तर त्यापासून कदाचित् जय प्राप्त झाला असता; परंतु या वेळीं बखेड्यांची तार फार चढली होती, तिची खुंटी केवळ लश्करांचा बेतबातानें सैल होईल, असें नव्हतें. झुल्फिकार खान याणें आरंभीं राजारामास हांकून लाविलें, असें पूर्वींच वर्णन आलें आहे; त्यापुढील वर्षांत त्याणें वारंवार मराठे लोकांचे पराजय केले, आणि कांहीं अंशीं मुसलमानलोकांस पुनः हिम्मत आणिली; तथापि शेवटीं पाहतो तों

औरंगझेबाची नवी शिस्त.

आरंभापेक्षां आपली स्थिति फार खराब झाली आहे, असें त्याचा अनुभवास आलें. जसा पाण्यावर आघात केला असतां तें प्रतिबंध करित नाहीं, व त्या आघातापासून त्यावर ठसाहि कांहीं राहत नाहीं, त्याप्रमाणें मराठे लोकांचा पराजय झाला ह्मणजे होत असेः त्या वेळापुर्ती त्यांची फौज चोहींकडे निघून जात असे, आणि ती बहुधा त्या दिवशीं किंवा दुसऱ्या दिवशीं जमे; असें असून मोगललोकांचा पराजय झाला असतां, त्यांचें नुकसान व अप्रतिष्ठा होई, आणि जरी त्यांचा थोडाबहुत जय झाला, तरीहि त्यांचा शक्तीचा क्षय उणा होत नसे, व पैक्याचीं तंगीहि कमी पडत नसे. या दोन्ही कारणांनीं त्यांचा अडचणी प्रत्यहीं वाढत चालल्या, आणि त्यांचें सामर्थ्य नाहींसें होत चाललें.

मोगललोक थकून गेले.

बादशाहानें स्वतः चालविलेले वेढे.

इकडे औरंगझेबानें जें युद्ध स्वतः चालविलें होतें, त्यापासून विशेष फायदा होईल असें दिसून आलें. तो आपली छावणी सोडून निघाला, आणि कांहीं किल्ले घेऊन साताऱ्यासमोर जाऊन ठेपला. त्याचा सरदारांनीं छावणीमध्यें चांगलीं सुखकारक घरें बांधिलीं होतीं, आणि तें एक शहरच वसविलें होतें; यास्तव तो तेथून निघाल्यामुळें त्यांस फार दुःख झालें. औरंगझेब शत्रूस कुशलतेनें फसवून एकाएकीं साताऱ्यावर जाऊन पडला; तथापिहि तेथील लोकांनीं जीवावर उदार होऊन आपलें रक्षण केलें; त्यामुळें पुष्कळ महिनेपर्यंत वेढा दिल्याशिवाय तो किल्ला औरंगझेबाचा हस्तगत झाला नाहीं.

त्याणें सातारा घेतला; इ० स० १७००, एप्रिल.

सातारा मोगलांचा हातीं येण्यापूर्वीं राजाराम मरण पावला होता. त्याचा मागून त्याचा मुलगा **शिवाजी** गादीवर बसून, त्याची आई **ताराबाई** ही कारभार करूं लागली. ही गोष्ट झाल्यामुळें लढाईचा कामांत कांहीं फेरफार झाला नाहीं. **औरंगझेब** आपल्या योजनेप्रमाणें चाललाच होता, आणि त्याणें पुढें चार पांच वर्षांत मराठे लोकांचे बहुतेक मुख्य किल्ले घेतले होते. पुष्कळ किल्ल्यांस फार दिवसपर्यंत वेढे द्यावे लागले, आणि माणसांचाहि संहार झाला. वेढ्यांचा कामामध्यें उभय पक्षींचा लोकांनीं युक्तिप्रयुक्ति चालविल्या होत्या; परंतु त्या बहुधा अगदीं एकसारख्याच होत्या; यामुळें त्यांचें वर्णन करण्याचें कारण नाहीं. त्यांपासून झालेल्या परिणामांचें वर्णन वर आलेंच आहे.

राजाराम मरण पावला.

औरंगझेब किल्ले घेत चालला.

या सर्व भारी मेहनतीचा कामांचा विचार करित असतां, त्याचा उतारवयामध्यें जा संकटांचें व दुःखांचें त्यावर आच्छादन पडलें होतें त्यांतून त्याणें मोठ्या धैर्यानें आपलें डोकें कसें वर काढलें, याविषयीं त्याची स्तुति न करणें हें अशक्य आहे. ही पुष्कळ वर्षें चाललेली लढाई आरंभण्याकरितां जेव्हां तो प्रथम **नर्मदा** उतरला, तेव्हां त्याची उमर ६५ जवळ होती, आणि जेव्हां तो ब्रह्मपुरीचा छावणींतून निघाला, तेव्हां त्यास ८१ वें वर्ष होतें. अशा उमरीस कूच करणें, व वेढे देणें हें अगदीं योग्य नव्हतें; असें असून याचा छावणीचा सरंजामांत जरी ऐषआरामाचा थाट असे, तरी यास जा आपत्ति भोगाव्या लागल्या त्यांहीं करून, जरी याहून

औरंगझेबाची बुद्धि व मनोनिग्रह.

त्यास जा सोसाव्या लागल्या त्या अडचणी, व संकटें.

तरुण पुरुष असता, तरी थकून गेला असता. एका समयीं तो ब्रह्मपुरी एथें असतां, अंधाऱ्या रात्रीस उष्णकटिबंधामध्यें मात्र जे पावसाचे टोंभ दृष्टीस पडतात, त्यांतील एकाचा तडाका सुटून, अकस्मात् भिमेस पूर येऊन याचा छावणीवर कोसळला; छावणीचा पुष्कळ भाग धुपून गेला; आणि बाकीचांत पाणी तुंबलें; त्या वेळीं लोकांस भीति सुटल्यामुळें, व तेथें गोंधळ झाल्यामुळें उलटा अधिक अपाय झाला; या वेळीं १२,००० मनुष्यें मरण पावलीं, आणि घोडे, उंटें, व गुरें, किती मेलीं त्यांची गणतीच नाहीं, असें ह्मणतात. पादशाह एका उंचवट्यावर राहिला होता, त्यावर जेव्हां पाणी चढलें, तेव्हां त्याचाहि जीवास धोका होता. नंतर त्याणें ईश्वराची प्रार्थना केल्यामुळें पुढें पाण्याची गति खुंटली, असें त्याचे दरबारी लोक ह्मणत. याचप्रमाणें सातारचा किल्ला घेतल्यानंतर जेव्हां याणें परळीचा किल्ला घेतला, तेव्हां त्याचा वेढ्याचें काम चालत असतां अकस्मात् पूर येऊन तसाच अपाय झाला; आणि त्या कंटक ( मावळ ) देशामध्यें याणें पुष्कळ पावसाळे काढले, तेव्हां तेथील वादळांनीं यास पुष्कळ दुःख दिलें असावें. तसाच जेव्हां तो फौज घेऊन जात असे, तेव्हां, उतार नाहीं असे ओढे, पूर आलेलीं खोरीं, चिखलट तळ, आणि अरुंद वाटा, यामुळें त्यास याहून अधिक अडचणी प्राप्त होत. केव्हां केव्हां जेथें कांहीं सामग्री मिळावयाची नाहीं, तेथें त्यास मुक्काम करावा लागे, आणि तेणेंकरून त्याचा बैलबांड्याचा इतका नाश होई, कीं केव्हां केव्हां त्याची फौज अगदीं लंगडी पडत असे. दुसऱ्या ( उन्हाळीचा ) दिवसांमध्यें तंबूंत व कूच करतांना अतिशय गरमी इजा करी, आणि

तशांत पाण्याचा तोटा पडला, ह्मणजे मग तर ती अनिवार होत असे. त्याचा छावणींत वारंवार अन्नाचा तोटा व दुखणीं येत, त्यांतहि भरीस मोठे दुष्काळ व पटकीचा सांथी येत असत; आणि या धाडीचा पल्ल्याबाहेरचा मुलुकांत शत्रूंनीं संहार केल्याचा जा हकीकती येत, तींहींकरून आणखी खराबी होई; परंतु इतकेंहि सर्व आशाभंग होत असतां, औरंगझेबानें आपलें धैर्य सोडिलें नाहीं; तो आपल्या प्रत्येक खात्याचा अगदीं किरकोळीपर्यंत कारभार एकटा चालवी; तो लढायांचे प्रथम बेत घालून देई, आणि त्या चालत असतां अमुक अमुक रीतीनें वर्तावें असें लिहून पाठवित असे; त्याजकडे किल्ल्यांचे नकाशे पाठवीत, त्यांवरून तो कोणचा ठिकाणीं हल्ला करावयाचा तें नेमून देई; अफगाणांचा मुलुकांतील रस्ते खुले कसे ठेवावे, मुलतान व आग्रा एथील बखेडे कसे मोडावे, यांविषयीं, तसेंच कंदाहारशहर कसें परत घ्यावें याविषयींहि, त्याचा पत्रांत बेत लिहून ठेविलेले आहेत; इतकेंहि असून औरंगझेबाचा स्वदस्तूरचा कांहीं तरी हुकुमाशिवाय दक्षिणेंत एकादी टोळी कूच करून गेली, अथवा कांहीं सामानसरंजाम घेऊन लोक आले, असें बहुधा झालेंच नाहीं.

त्याचा अव्याहत उद्योग.

परगण्यांतील अति हलक्या महसूली अम्मलदारांची नेमणूक करणें, अथवा एकाद्या कचेरींत कारकुनाची निवड करणें, हें काम स्वतः करण्यास हलकें असें तो मानित नसे; आणि हे अम्मलदार लोक कशी वर्तणूक करितात याचा हेर ठेवून, व

त्याचें लक्ष कच्चा कामावर असे.

जे दुसरे सर्व लोक तिकडून येतील त्यांजवळ खांचीखोंचीचा चवकशा करून तपास ठेवित असे; आणि अशा प्रकारचें वर्तमान समजल्यावरून त्यांस हमेशा त्या प्रकरणीं उपदेशपर पत्रें लिहून सावध ठेवित असे. इतक्या कच्चा कामावर लक्ष दिल्यानें वास्तविक रीतीनें कामाचा निकाल होत नाहीं, आणि असें लक्ष ठेवणें हें प्रगल्भ बुद्धीचें चिन्ह आहे असेंहि त्यावरून होत नाहीं; परंतु औरंगझेबाचें असें लक्ष असून, राज्यसंबंधीं जीं सर्व मोठीं कामें त्यांविषयींहि याची एकसारखी दक्षता असे; त्यावरून जें याचा बुद्धीचें चापल्य प्रकट होतें, तें कोणत्याहि काळांत आश्चर्य करावयास योग्य आहे.

जवळचा सर्व लोकांविषयीं त्याचा बेभरवसा.

हे जे सर्व कष्ट त्यास सोसावे लागले, ते त्याणें पूर्वीं आपल्या बापाचे जे सर्व अपराध केले, त्यांचें प्रायश्चित्त होत. जी शाहजहानाची दशा झाली, तिचे विचार क्षणभरहि याचा मनांतून नाहींसे झाले, असें दिसत नाहीं; आणि तशी आपली गति होऊं नये, म्हणून याणें सर्व अधिकार, व जागा, व देहेनग्या देणें वगैरे आपल्या हातांत ठेविलें होतें; तसेंच आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाशीं त्यांचें नेहमींचें संघटण पडूं नये, म्हणून तो आपल्या सरदारांचा एका जाग्यावरून दुसऱ्या जाग्यावर बदल्या करित असे.

त्याणें आपल्या मुलांचा केलेला बंदोबस्त;

त्याची आपल्या मुलांवर सार्वकाळ नजर असे, आणि तो नेहमीं त्यांचा बंदोबस्त राखित असे: त्यांचा सभोंवते हेर असत; लश्करचा कामांत त्यांस तो बराबर साथी देत असे; त्यांचा परिवारांत हलक्या जाग्यावर विश्वासू लोक ठेवित असे; आणि त्यांचा सर्व

कन्यांविषयीं उघड दरखोरी राखित असे. इतकेंहि करून तो त्यांस सलगीचीं व ओढा दाखवून पत्रें लिही, आणि हमेशा नजराणे पाठवून व उजूतवाजू ठेवून त्यांचीं आपणावर मनें वळिवण्याचा, आणि त्यांस आपल्या स्थितीविषयीं त्रास उत्पन्न न होऊं देण्याचा प्रयत्न करी. कांहीं साहजिक स्वभावामुळें, व कांहीं वरचाच सारख्या हेतूंनीं, तो आपल्या सरदारलोकांबराबर विचारयुक्त रीतीनें वागत असे, आणि तो त्या सर्वांचा भजनीं लागल्यासारखा दिसत असे: त्यांचे कोणी सगे मेले असतां, तो त्यांचें सान्त्वन करी; त्यांचा दुखण्यांविषयीं चौकशी ठेवी; सरदारांस मोठी प्रतिष्ठा वाटावी, अशा रीतीनें त्यांस मान प्रतिष्ठा देई; तसेंच जा देहेनग्या द्यावयाचा त्या मोठ्या गौरवानें देऊन अधिक प्रिय करी; आणि कधींहि दोष देणें झाला, तर कांहीं तरी मनांत खुशी उत्पन्न होई अशा रीतीनें शब्दांची योजना करून त्याचें तीक्ष्णत्व नरम पाडी. स्वतांस शत्रु उत्पन्न करण्याचा नाखुशीमुळें, व तसेंच वास्तविक घळमळीत स्वभावामुळेंहि, त्याचा अधिकाराशीं व धर्मसंबंधी दुराग्रहाशीं जा अपराधांचा संबंध नसे, त्यांवर तो अतिशय दयार्द्र दृष्टि करित असे. इतकेंहि याणें केलें तथापि यास लोकप्रीति संपादणें साधलेंसें दिसत नाहीं, आणि स्वतांचा मुलांविषयीं तर, मनापासून प्रीतीपेक्षां भीतीवर त्याचा विशेष भरवसा होता. याणें मोअझिमास सात वर्षें कैदेंत ठेविल्यानंतर मुक्त केलें; परंतु त्याविषयीं यास सार्वकाळ अनावड व भीति असे. याणें त्यास काबूल एथील दूरचा सुभ्यावर पाठविलें, आणि कांहीं वेळपर्यंत तरी मला परत येऊं द्यावें अशी त्याणें इच्छा प्रकट केली असतांहि,

व दरबारी लोकांचा बंदोबस्त.

हा नेहमीं त्याचा आड येत असे, आणि जेणेंकरून तो आपल्या सुभ्यांतील अति दूरचा प्रांतांत गुंतला जाऊन त्याचा सर्व शक्ति त्यांत योजिल्या जातील, अशा स्वारींत त्यास गुंतविण्याचा प्रयत्न हा करित असे. याचा सरदारांनीं कामबक्षास पकडून अटक केलें, ती गोष्ट याणें प्रथम पसंद केली, तथापि पुढें तो निर्दोषी आहे अशी याची खातरी झाली. तसेंच एके समयीं याचा आवडता मुलगा अझीम याशीं जी याणें वर्तणूक केली, तिजवरूनहि आपल्या मुलांशीं जा पद्धतीनें हा वागत असे, ती, व कपट आणि ढोंग हीं करण्याची जी याची स्वभावजन्य प्रीति असे ती, हीं एकदम दृष्टीस पडतात. तो प्रकार असाः—अझीम हा स्वतंत्र होण्याविषयींचा घाट घालित आहे, असा यास वहमा येऊन, याणें त्यास दरबारांत बोलाविलें; त्या शाहजाद्यानें कांहीं निमित्तें सांगितलीं आणि भ्याल्यासारखें दाखविलें; ह्मणून मी तुला थोड्या लोकांनिशीं शिकारीस जाण्याचा वेळीं भेटेन असें याणें त्यास सांगितलें; तेव्हां अझीम निघाला; इकडे औरंगझेबानें त्या भेटण्याचा ठिकाणासभोंवता निवडक स्वारांचा वेढा दिला. मग जसजसा तो शाहजादा याचा पगड्यांत अधिक अधिक येत चालला, तसतशीं या ह्मातार्‍या बादशाहानें एकामागून एक खुसपटें काढून त्याजकडून हळूहळू आपल्या परिवाराची संख्या कमी करविली; ती इतकी कीं जेव्हां अझीम हा, बाप होता त्या ठिकाणीं, पोंचला, तेव्हां त्याजवळ सगळे तीन लोक राहिले. तेथें घोडे धरायास कोणी पुढें सरसावेना, ह्मणून त्यास आपल्या सोबत्यांपैकीं दोघे जण त्या कामास ठेवावे लागले; आणि मग तो बाकी राहिलेल्या एका असामीनिशीं बादशाहाकडे

प्रविष्ट होईपर्यंत त्या दोघांचीं हत्यारें तेथील लोकांनीं छिनावून घेतलीं. असें होतांच आपण बुडालों असें त्यास वाटलें, आणि आतां पुष्कळ वर्षेपर्यंत किंवा जन्मभर, कैद भोगण्याचें दैवीं आलें आहे, असें त्यास निःसंशय वाटलें. परंतु जेव्हां बापाकडे त्यास प्रविष्ट केलें, तेव्हां बापानें त्यास मोठ्या प्रीतीनें आलिंगन दिलें: त्या वेळीं औरंगझेब शिकारीस जाण्याचा तयारींत होता; तेव्हां त्याणें आपली भरलेली बंदूक अझीमास हातांत धरावयास दिली, आणि नंतर एकीकडचा डेऱ्यांत नेऊन त्यास आपल्या कुटुंबांतील एक चमत्कारिक तलवार दाखविली, आणि ती त्यास पाहतां यावी ह्मणून नागवीच त्याचा हातांत दिली. नंतर उष्णतेचा निमित्तानें, परंतु वास्तविक पाहतां आपल्या अंगांत लपवून घातलेली चिलखत नाहीं हें दाखविण्याकरितां, त्याणें आपल्या आंगरख्याचे कसे सोडून झगा एकीकडे केला. याप्रमाणें आपला भरवसा आहे असें दाखवून, त्याणें अझीमास भरपूर नजराणे दिले, आणि आतां तुह्मी परत जावें, नाहीं तर तुह्मास एथें अटकाव झाला ह्मणून तुमचे लोक घाबरतील, असें त्यास सांगितलें. हें सांगणें बेतावरच पडलें; कारण अझीम परत येई तों त्याची छावणी मोडण्याचा बेतांत येऊन, त्याची काय गति झाली ह्मणून त्याचा बायका रडून शोक करित होत्या, असें त्याचा दृष्टीस पडलें. याप्रमाणें इजा न देतां आपणांस परत जाऊं दिलें, ह्मणून त्याचा मनांत कृतज्ञता उत्पन्न झाली, असें दिसून येत नाहीं; परंतु यानंतर जेव्हां जेव्हां त्याचा बापाकडून त्यास पत्र येई, तेव्हां तेव्हां तो निस्तेज होई, आणि त्यांतील मजकूर पाहून मनाची खातरी होईपर्यंत त्यास स्वस्थता वाटत नसे, असा लेख आहे.

असें होतें तथापि पुढें दिवसेंदिवस राज्यांत अधिक बखेडे होऊन औरंगझेबास चोहींकडून घेरूं लागले, ते हटविण्यास, त्याचीं सर्व कपटें व त्याचा सर्व उद्योग, हीं पुरीं पडलीं नाहींत; राजपूतलोक अद्यापि उघड लढायास तयारच होते, आणि त्यांचें पाहून आग्र्याजवळील जाटलोकहि पुष्कळ दिवसांपासून तसेंच करूं लागले होते. त्या जाटांवर व पुढें कांहीं दिवसांनीं मुलतान एथील बंडखोरांवर[1] एका शाहजाद्याबरोबर फौज देऊन पाठविणें जरूर आलें. झुल्फिकाराची फौज थकत चालली, आणि त्याणें पूर्वीं केलेल्या यत्नांचा अपुरेपणा अधिकाधिक स्पष्ट होत चालला. जसजशा मोगलांचा फौजा नाहींशा होत चालल्या, तसतसे मराठे लोक जास्तसे दिसत चालले; त्यांणीं सर्व दक्षिणेचें वाटोळें करून ते माळवाभर पसरले, आणि गुजराथेंतहि जबरदस्त लुटीची स्वारी करिते झाले. ते जिकडे जात, तिकडे लुटलेले गांव, नाश केलेलीं शेतभातें, आणि जळालेलीं खेडींपाडीं मागें ठेवून येत.

राज्यांत बखेडे माजले.

मराठे लोकांची चढती.

औरंगझेबाची प्रचंड सेना अद्यापि किल्ले घेत चाललीच होती; परंतु तिचा जो शेवटचा जय झाला, तो किंबहुना पराजयासारखाच अकीर्तिकारक होता. तो असा कीं:— वाकीनखेड म्हणून एक फकत तटबंदी गांवढें होतें; तें एका पुंडपाळेगाराचें होतें; असें असून तें घेण्यास स्वतः बादशाहास जावें लागून, पुष्कळ महिनेपर्यंत वेढा द्यावा लागला. हे जे किल्ले वगैरे याणें घेतले, त्यांबदल या सुमारास याचें

---

[1] हे बहुधा गुरु गोविंद याचा हाताखालचे सीकलोक असावे.

नुकसानहि होत चाललें. मराठे लोकांस आपले किल्ले परत घेण्याची शक्ति आली, आणि इतके कष्ट करून औरंगझेबानें जे किल्ले मिळविले, ते एकामागून एक त्यांचा कबूजांत जात चालले. जसजशी त्या मोठ्या फौजेचा चाकरीची जरूर वाढत चालली, तसतशी तिची शक्ति कमी होत चालली. लश्करचे लोक भित्रे होत चालले; असे कधींहि पूर्वी नव्हते; बैल थकून गेले, आणि देश निर्धूत झाल्यामुळें दुसरेहि मिळतनासे झाले; त्याच कारणामुळें धान्यादिकांचा तोटा पडला, आणि खजीना रिता पडल्यामुळें, तीं दुरून आणण्याचींहि साधनें नाहींशीं झालीं.

मराठे लोक किल्ले परत घेऊं लागले.

बादशाही फौज थकून गेली.

त्या वेळीं उत्तरहिंदुस्थानांतून पुष्कळ पैका येत असे, तथापि याचा खजीन्याचा पुष्कळ दिवसांपासून गोंधळ झाला होता, आणि जसजशी खजिन्याची स्थिति दुःखकारक होत चालली, तसतसें त्याचें तिकडे दुर्लक्ष होत गेलें. शिपाई लोक आपला चढलेला पगार मागूं लागले, म्हणजे यास संताप होई, आणि हा कपाळाला आंठ्या घालून त्यांस उत्तर देई, कीं मला लश्कराची गरज नाहीं, याजकरितां जर तुमची खुशी चाकरी करण्याची नसेल, तर तुम्ही ती सोडून जावें;[२] आणि पैक्याची तंगी कांहीं कमी व्हावी म्हणून कांहीं घोडेस्वारांचीं पथकेंहि त्याणें कमी केलीं; परंतु त्याचा फौजेसारख्या फौजेस

खजीन्यामध्यें धांदल झाली.

---

२ पुष्कळ दिवसपर्यंत याचा लश्करास फार नियमानें पगार पोंचत असे. इ० स० १६९५ त गेमेली करेरी हा असें वर्णन करितो, कीं लश्करचा लोकांस नियमानें दर दोन दोन महिन्यांनीं पगार मिळत असे, आणि त्यांत गडबड झाल्यास ते अगदीं सोशित नसत.

नियमित पगार आवश्यक होता, आणि जेव्हां तो पुष्कळ दिवस बंद झाला, तेव्हां ते उघड रीतीनें बंड करूं लागले; मग कांहीं तोडजोडींनीं थोडा वेळपर्यंत त्यांची याणें थावटाथावट[3] केली.

बादशाहाचा फौजेवर मराठ्यांनीं फार लगट केला.

पुढें जसजसे मराठे त्याचा फौजेजवळ भिडत चालले, तसतशा त्याचा अडचणी वाढत चालल्या. ते केव्हां केव्हां अगदीं त्याचा छावणीचा हद्दीपर्यंत मुलुक लुटीत, त्याचें धान्य वगैरे सामग्री येत असे ती पकडीत, गुरें वळवीत, दाणावैरण आणणाऱ्या लोकांस साफ कापून टाकीत, पाहरेकरी लोकांस चिडावीत, आणि मजबूद टोळीशिवाय लश्करचा हद्दींमधून कोणाचानें आपलें डोकें बाहेर काढणें अशक्य, असें करून टाकीत. जर एकादी साधारण टोळी त्यांजवर पाठविली, तर ते तिला हटवीत, किंवा मारून टाकीत; जर मोठा एलगार झाला, तर ते नाहींसे होत, ते कोठें पल्ल्यावर जाऊन एकादें शहर लुटीत, तेथें पुन: उपटत; आणि भलत्याच वाटेनें लांबीचा पल्ला करून त्यांचा पाठलाग करणार असे जे मोगललोक त्यांस थकवीत. ते सांप्रत औरंगझेबास तुच्छवत् मानूं लागले; जे त्याचा चाकरींत होते, तेहि शत्रूचा लोकांत

---

३ एका वेळीं झुल्फिकार खानास याणें असें लिहिलें होतें, कीं "या चांडाळ पायदळाचा लोकांचा" गोंगाटानें माझे कान किटून गेले; कावळ्यांचा घरट्यांत कोणी शत्रु आला असतां, जसे ते काव काव करूं लागतात, त्याप्रमाणें हे ओरडत आहेत. दुसऱ्या पत्रांत, हल्लीं पैश्याचा तोटा पडला आहे असें त्यास सुचवून, जर कोणी द्रव्य लपवून ठेविलें असेल तर त्याचा शोध करावा; आणि जर कोणाचा हतांत सांपडलें असलें, तर तें पाडाव करावें असें भारी आग्रहानें याणें त्यास लिहिलें आहे.

जाऊन मिसळून त्यांजबराबर मेजवान्या खाऊं लागले; आणि अशा प्रसंगीं मुसलमानलोकांस वेडावून त्यांसारिखे डामडौलाचे हावभाव आणि भक्तिपुरःसर नमाज पढणें हीं करून आपला उत्कृष्ट पोशिंदा जो औरंगझेब, त्यास पुष्कळ आयुष्य असो, असें वेषधारी गांभीर्य आणून प्रार्थना करूं लागले. या वेळीं पादशाहाची इतकी निकृष्ट दशा झाली होती, कीं त्याणें कामबक्षाचा सांगीवरून मराठे लोकांजवळ तहाचें बोलणें लावण्याचा हुकूम दिला. त्या वेळीं जर मराठ्यांचीं अचाट मागणी व औद्धत्य, हीं आड येऊन, तें बोलणें बिघडलें नसतें, तर शाहू राजास सोडून देऊन आपल्या अब्रूचा बचाव होई अशा रीतीनें दक्षिणेंतील जमाबंदीवर मराठे लोकांस कांहीं टक्के शेंकडा वार्षिकी हक्क तो बसवून देता, असें संभवतें.

औरंगझेब अहमदनगरास परत गेला.

शेवटीं औरंगझेब निघून परत अहमदनगरास गेला. हें त्याचें शेवटचें युद्धसंबंधीं कृत्य. त्या वेळीं त्याचे (बारबरदारीचे) बैल वगैरे थकून गेले होते, आणि लश्करचे लोक हतवीर्य झाले होते; त्यामुळें हें लटंबर परत कसें गेलें असेल याचा वाचणारांचानें सहजच विचार करवेल. सर्व लोक अस्ताव्यस्त व नाउमेद होऊन घाईघाईनें चालले, त्यांत शत्रूंचे बर्कंदाज लोक एकसारखे बार घालित असत, त्यांचा आवाजानें यांचे कान किटले; भालेवाले लोकांचा आरोळ्यांची व हल्ल्यांची त्यांस दहशत बसली, आणि सर्वांस क्षणोक्षणीं असें वाटूं लागलें, कीं आतां आपणा सर्वांवर मराठे लोक हल्ला करून आपली पुरी वाताहत करून फडशा करितील. याप्रमाणें फौजेचा एका भागाची वास्तविकच

गति झाली, आणि जा शत्रूंस एके वेळीं बादशाह अगदीं तुच्छवत् मानित होता त्यांचा हातांत न सांपडतां तो निसटून गेला. या बादशाहाची धर्मभक्तीविषयीं मख्याति असे, ह्मणून हीं याची शत्रूंपासून सुटका ईश्वरकृपेनें झाली, असें देवभोळे मुसलमान इतिहासकार मानितात.

याप्रमाणें जा अहमदनगरांतून पूर्वीं वीस वर्षांवर तो देश जिंकण्याकरितां इतक्या मोठ्या फौजेनिशीं व डामडौलानिशीं कूच करून गेला होता, त्याच ठिकाणीं त्यांचें महत्व छिन्नभिन्न होऊन तो परत आला, आणि तेथेंच त्याचें ऐहिक चरित्र लवकरच समाप्त व्हावें, असा ईश्वरी संकेत होता.

बादशाहाची शक्ति क्षीण होत चालली.

या सुमारास औरंगझेबाची प्रकृति हळूहळू क्षीण होत चालली होती. एके वेळीं यास आजार झाला, तेणेंकरून हा मरेल अशी भीति पडली; परंतु त्यांतून तो मोठ्या कष्टानें वांचला. त्यानंतर तो पूर्ववत् दरबारांत येत असे, आणि कामाकडेसहि लक्ष देई; तथापि काळजी व रोग यांचा भार विशेष जमून त्याखालीं हा शेवटीं दबत चालला. जेव्हां तो अहमदनगरास पोंचला, तेव्हां तो ह्मणाला, कीं मी आतां आपल्या अखेरीचा मजलेस आलों. त्याणें जीं पत्रें शेवटीं लिहिलीं आहेत, त्यांवरून त्याचा शरीरास क्लेश किती होत होते, त्याची इहलोकीं कशी निराशा झाली होती, आणि परलोकाची त्यास कशी भीति पडली होती, हें एकदांच आपल्या दृष्टीस पडतें. शाहजहानाचें चरित्र याचा ध्यानींमनीं वागत होतेंसें दिसतें, आणि त्या पादशाहाची जी दशा झाली, त्या प्रकरणीं

शाहजहानासारखी आपली गति होईल अशी त्यास भीति पडली.

जें कृत्य याणें केलें, त्याबद्दल यास पश्चात्ताप झाला होता, असें जरी कोठें याणें दर्शविलें नाहीं, तरी कदाचित् आपलीहि तशीच दशा होईल अशी यास किती भीति होती, हें त्याचा सर्व कर्तीवरूनच स्पष्ट होतें.

अशा शेवटच्या कठीण प्रसंगीं साधारण विचाराप्रमाणें जो कांहीं बंदोबस्त असावा तो करण्याविषयीं मोअझिमानें सुचविल्यावरून, मी अद्यापि जीवंत असतांच याचा मनांत राज्य बळकावण्याचें आहे असा याणें त्याचा अर्थ केला. पुढें गुजराथचा हवेनें माझी प्रकृति बिघडून जात्ये म्हणून मला अहमदनगरास येण्यास परवानगी द्यावी, असें अझीमाचें पत्र आलें, तें जेव्हां यास वाचून दाखिवलें तेव्हां हा मध्येंच बोलिला कीं "शाहजहान आजारी असतां जें निमित्त मी योजिलें होते, तें हेंच;" आणखी म्हणाला कीं "महत्वाकांक्षीपणाचा धुरापेक्षां दुसरी कोणचीहि हवा इतकी रोगकारक नाहीं." पुढें अझीमानें माळवा एथील आपल्या नवीन सुभ्यावर जात असतां, त्याचा अतिशय आग्रहामुळें त्यास याणें आपणास भेटावयास येण्याची प्रथम परवानगी दिली, परंतु पुनः त्यास सक्तीनें वाटेस लाविलें, आणि दरबारामध्यें राहण्यास त्यास कांहीं निमित्त मिळूं नये असें केलें. त्यापूर्वीं नुकतेंच त्याणें कामबक्षास विजापुरास पाठविलें होतें, परंतु हा जो पाठविला तो अझीमास संतुष्ट करण्याकरितां पाठविला असावा, स्वतांचा भीतीमुळें नसावा असें दिसतें.

त्याचा मुलांविषयीं त्यास वहमे आले.

हे बंदोबस्त होऊन फार वेळ गेला नाहीं, इतक्यांत आपला अंतकाळ जवळ येत आहे असें त्यास समजलें. त्या भयंकर प्रसंगीं त्याणें शाहजादा अझीम यास स्वतः पत्र लिहिलें, किंवा

मृत्यु जवळ आला असें पाहून त्यास भीति उत्पन्न झाली.

सांगून दुसऱ्याचा हातून लिहवविलें आहे;त्यांत ऐहिक उपदेश व निर्वाणचीं भाषणें असून मधून मधून कांहीं तुटक तुटक वाक्यें आहेत; त्यांत जे पश्चात्तापाचे उद्गार आणि परलोकाची भीति यांहींकरून त्याचें अंतःकरण गलबललें होतें, तीं बाहेर पडलीं आहेत. त्या पत्राचा शेवटीं त्याणें निराश होऊन सर्वत्याग केला असें दिसतें. तो असें लिहितो कीं,—"काय होणें असेल तें होऊ,मी माझें जहाज समुद्रांत लोटलें आहे" . . . "ईश्वर तुझें कल्याण करो! ईश्वर तुझें कल्याण करो ! ईश्वर तुझें कल्याण करो!" शेवटीं शेवटीं त्याची मर्जी धाकटा मुलगा कामबक्ष यावर बसली होती, त्यासहि त्याणें पत्र लिहिलें. तो उमरीनें लहान होता, यामुळें अझीमाचा पत्रापेक्षां त्याचा पत्रांत उपदेश व शिक्षा हीं विशेष सांगितलेलीं आहेत. या पत्रावरून याची स्थिति आमरणान्त पूर्वींप्रमाणेंच होती असें दिसतें. तो असें ह्मणतो कीं "आपले उमराव कितीहि लबाड असले, तरी त्यांशीं निष्ठुरतेनें वर्तणूक करूं नये. नम्रतेनें व कपटानें आपले हेतु तडीस नेणें हें आवश्यक आहे. इत्यादि." या पत्रामध्येंहि वेळोवेळीं याचा स्वतांचा स्थितीविषयीं उद्गार निघतात. तो असें ह्मणतो, कीं "जिकडे मी पाहतों, तिकडे मला ईश्वराशिवाय कांहींच दिसत नाहीं." . . . "मी पुष्कळ अपराध केले आहेत, त्यांबदल मला शासन काय होईल तें समजत नाहीं." . . . "मृत्यूचे क्लेश मला फार वेगानें गांजिताहेत." . . . "मी आतां निघालों आहें. जें मी बरें किंवा वाईट केलें, तें तुझाकरितां केलें." तो मेल्यानंतर त्याचा उशीखालीं एका प्रकारचें मृत्युपत्र सांपडलें, तें याच सुमारास झालें असावें. त्यांत त्याणें अशी शिफारस केली होती, कीं मोअझिमास

सर्वांनीं बादशाह कबूल करावा, आणि त्याणें व अझीमानें राज्याचे हिसे पाडून घ्यावे. त्यांत एकानें उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रांत घेऊन आपली राजधानी दिल्ली एथें करावी, आणि दुसऱ्यानें आग्र्याचा दक्षिणेकडील व नैर्ऋत्येकडील विजापुर व गोंवळकोंडें हीं राज्यें खेरीज करून दक्षिणेंतील मुलुकासुद्धां देश घेऊन आग्रा एथें राज्य करावें; आणि विजापुर व गोंवळकोंडें या दोन राज्यांचा मुलुक कामबक्षास द्यावा.[४]

*तो मरण पावला.*

याप्रमाणें राज्य करून, आपल्या वयाचा ८९ व्या वर्षीं आणि आपल्या कारकीर्दीचा पन्नासाव्या वर्षीं इ० स० १७०७, फेब्रुआरि तारीख २१ रोजीं औरंगझेब मरण पावला.

*त्याचा स्वभाव.*

औरंगझेबाचें शूरत्व, शहाणपण, आणि हुशारी, हीं पाहून, त्याचा कारकीर्दींत त्यास जय कसा मिळाला नाहीं, याविषयीं एक एतद्देशीय इतिहासकार आचंब्यांत पडला आहे; परंतु या बादशाहामध्यें जें वास्तविक व्यंग होतें, तें त्याचा अंतःकरणांतच होतें. जर यामध्यें कांहीं उदार व मोकळ्या मनाची बुद्धि असती, तर हा थोर पादशाह झाला असता; आणि याचा धर्मसंबंधी

---

( ४ ) याणें दुसरें एक मृत्युपत्र केलें होतें; तें इतका घाबरला नसतांना केलेलें असें दिसून येतें. त्यांत राज्याचा रीतीविषयीं कांहीं साधारणवचनें असून आपलें उत्तरकार्य कसें करावें हें लिहिलें आहे; तें असें कीं याणें स्वतः टोप्या करून विकल्या होत्या, त्या उत्पन्नांतून ४½ रुपये शिलक राहिले होते, तेवढ्यानें उत्तरकार्याचा खर्च करावा, व कुराणाचा प्रती करून जे ८०५ रुपये मिळविले होते, ते गरीबगुरीबांस धर्म करावे.

कोत्या बुद्धीनें याचा रयतेचें मन यावरून उठलें नसतें; तसेंच याचा सार्वकाळ अंदेशेखोर व बेभरवशाचा स्वभावामुळें याचा सरदारांचे पाय मोडून त्यांचा उत्साह थंडा पडला नसतां. धर्मसंबंधीं जे याचे अगदीं अल्प समज होते, त्यांविषयींचें आतां शेवटचें बोलणें बोलतों; या हलक्या विचारांनीं याचा राज्याचा पुष्कळ नाश झाला; त्याविषयीं विचार करून पाहतां, जो वाईट परिणाम झाला, तो होण्यास प्रत्यक्ष जुलूम थोडाच झाला होता; हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. याचा क्रूरतेचा किंवा जुलूमाचा कृत्यांनीं हिंदुलोक संतापले असें नाहीं; परंतु एकसारखी त्यांजवर शिस्त बसवून त्यांस नाउमेदी उत्पन्न केल्यामुळें, ते चिढून गेले; औरंगझेबानें त्यांस सरकारी कामांतून काढून टाकिलें; त्यांजवर मुद्दाम कर बसवून त्यांची अप्रतिष्ठा केली; त्यांचा यात्रा व सणांचे समारंभ बंद केले; त्यांचा देवस्थानांचे केव्हां केव्हां विटे करून, केव्हां केव्हां नाशहि केला; आणि

(५) खाफी खान नामें मुसलमान इतिहासकार असें वर्णन करितो कीं "तैमूरलंगाचा वंशांतील अथवा सर्व दिल्लीचा पादशाहांमध्येंहि सिकंदर, लोदी या बादशाहानंतर ईश्वरभक्ति, वैराग्य, आणि न्याय, यांहीं करून प्रख्यात असा दुसरा कोणी नव्हता; तसेंच, शौर्य, सहनशीलता, व बुद्धीची स्थिरता हींहि याचा सारखीं कोणाचीं नव्हतीं; परंतु ईश्वराचा कायद्यास मान देऊन तो कोणास शिक्षा करित नसे, आणि शिक्षा केल्याशिवाय कोणचाहि देशाचा बंदोबस्त राहूं शकत नाहीं; यामुळें, आणि याचे उमराव परस्परांची स्पर्धा करीत, त्यापासून जे तंटे उत्पन्न होत त्यामुळें; जो प्रत्येक बेत तो करी, व मसलत बांधी, तिजपासून कांहीं चांगला परिणाम होत नसे; आणि जें काम तो हातांत घेई तें दिसगतीवर जाऊन कधींहि शेवटास पोंचत नसे. तो ९० वर्षें वांचला होता, तथापि त्याचा पंचेन्द्रियांतून कोणचींहि बिघडलीं नव्हतीं. फकत त्यास कांहीं ऐकायास कमी येत असे; परंतु तें दुसऱ्यांचा नजरेस येण्याजोगें नसे,

दरबारसंबंधीं आगतस्वागताचा व्यवहारानें किंवा इतर वहिवाटींनीं त्यांचा देवभोळेपणास उत्तेजन पोंचतें असें, दिसण्यापुरतें, निमित्त सांपडलें, कीं ते व्यवहार व वहिवाटी बंद करण्यास त्याणें कमी केलें नाहीं: असें असून धर्माचा सबबेनें याणें कोणा हिंदूचा प्राण घेतला, अथवा त्यास कैदेंत टाकिलें, अथवा त्याची जिंदगी हिरावून घेतली, असें झालें नाहीं; अथवा कोणींहि आपल्या पूर्वजांप्रमाणें प्रसिद्धपणें कोणताहि धर्म आचरित आल्यावरून, त्यास कोणी विचारिलें असेंहि झाल्याचें दिसत नाहीं; तथापि धर्माचा बाबदींमध्यें परस्परें संशय व वैरभाव असल्यामुळें जसा परिणाम होत असतो, तसा औरंगझेबाचा पक्षपाती व दुराग्रही स्वभावामुळें झाला, आणि लोकांत जी हटाग्रहाची विरोधवृत्ति उत्पन्न झाली, तशी अतिशय जुलूमाचा कृत्यांपासूनहि थोड्याच वेळा होत असत्ये.

औरंगझेबाचीं पांच सात शें पत्रें बाळगून ठेविलेलीं आहेत, त्यांवरून त्याचा स्वभावाविषयीं आपणास थोडें थोडें ज्ञान होतें. शिवाय त्याचा कृत्यांनीं त्याचा स्वभावांतलि मुख्य मुख्य गोष्टी नजरेस पडतात. त्याचा धर्मसंबंधीं इतका दुराग्रह होता, परंतु तो देवभोळा नव्हता. त्यास मनापासून हिंदूंचा त्रास असे, आणि शिया लोकांवरहि त्यांहून विशेष भक्ति नसे; परंतु त्याणें मशीदी अथवा इतर धर्मादाय यांत आपला पैका खरचला नाहीं. तो मुल्लेलोकांचा कब्ज़ाखालीं होता असें दिसत नाहीं, आणि फकीर व दरवेशी यांचा ओढून ताणून आणलेल्या पवित्रतेस तो वारंवार तुच्छ करित असे.

त्याचा राज्यामध्यें जिकडे तिकडे सतत बेभरवशाची

शिस्त असेः प्रत्येक मनुष्याचा चालीविषयीं तो गुप्तपणें शोध ठेवित असे, आणि एकमेकांचा परस्परांवर दाब बसावा असे साठीं तो निवडून काढित असे. इतकेंहि असून औरंगझेबासारिखा कोणचाच राजास लोकांनीं अधिक ठकविला नाहीं, आणि कोणाचीहि इतकी वाईट चाकरी केली नाहीं.

जेव्हां जेव्हां त्याचे अति जुने, आणि फार लग्याचे मित्र मरण पावले हें वर्तमान त्यास लागे, तेव्हां तो जी वर्तणूक करी, तिजवरून त्याचें अंतःकरण निर्दय असे, हें उघड होतें. हा पुष्कळ वर्षेपर्यंत वांचला होता, तितक्या मुदतींत असे प्रसंग वारंवार आले; त्या वेळीं त्याणें कांहीं धर्मसंबंधी गोष्टी, अथवा तत्वविचार पुढें आणून, मागून मयताची जिंदगी ताब्यांत घ्यावी, कोणी कांहीं अफरातफर न करील असा बंदोबस्त करावा, त्याचा ठेवी उकरून काढाव्या, आणि त्याचें लोकांकडील कर्ज तजविजीनें वसूल करावें, असे तो सक्त हुकूम देत असे.

त्याचा पत्रांविषयीं.

त्याचा पत्रांत बहुधा कांहीं काव्यांतील वेंचे, अथवा कुराणांतील वाक्यें नाहींतर्शीं नाहींतच. त्याचीं पत्रें केव्हां केव्हां सलगीचीं असून, केव्हां केव्हां त्यांत थट्टाहि आहे, त्यांतूनहि जीं पत्रें त्याचा मुलांस गेलेलीं आहेत, त्यांत विशेषेंकरून आहे. ऐशीं वर्षांचा झाल्यावर त्याणें एक पत्र लिहिलें आहे, त्याचा शेवटीं दोन किंवा तीन शब्दांचे असे कांहीं हसण्याजोगे श्लोक ( बेत ) आहेत; त्यांतून प्रत्येकांत त्याचा दरबारांतील मुख्य उमरावांतून कोणेकाचा तरी प्रस्तुतचा धंद्याविषयीं विनोदकारक वर्णन केलें आहे.

गेमेली क्यारेरी याणें औरंगझेबास अठ्याहत्तराव्या वर्षी पाहिलें; तो असें वर्णन करितो, कीं हा ठेंगणा व सुडसुडित असे, आणि वयातीत झाल्यामुळें यास पोंक आलें होतें; याचें नाक लांब, व दाढी वाटोळी असून तिची शुभ्रता त्याचा पिंवळट कातडीवर विशेष स्पष्ट रीतीनें दिसत असे. तो साध्या पांढऱ्या मलमलीचा पोशाक घाली, आणि त्याचा पागोट्यांत एक मोठा पाचेचा खडा असे. तो आपल्या उमरावलोकांमध्यें काठीवर टेंकून उभा राही; अर्जी घेई; उपनेत्रांशिवाय वाची; त्यांवर स्वहस्तें शेरे लिही; आणि "त्या वेळीं त्याचा चेहेरा हस्तमुख असे, त्यावरून त्यास तें काम आवडत असे, असें दिसे."

हिंदुस्थानांतील सर्व बादशाहांमध्यें, औरंगझेबाची मुसलमानलोक विशेष तारीफ करितात. अकबराचा स्वभावाचें तेज जांचा दृष्टीस पडलें नाहीं, असे अगदींच अंध असे थोडेच आहेत; परंतु अगदीं विचार करून त्यांत औरंगझेब श्रेष्ठ होता असें न मानणारे, असे त्यांहूनहि थोडेच आहेत.

या कारकीर्दींत कांहीं गोष्टी घडून आल्या, त्या जरी विलग आहेत, तरी सर्व राज्याचा हकीकतीमधून त्या अगदीं काढून टाकाव्या हें नीट नाहीं. त्या येणेंप्रमाणें:- जाटलोकांनीं बंड केलें असें वर्णन वर आलेंच आहे; ते शूद्र जातीचे हिंदु असून आग्र्याजवळील एका प्रदेशांत राहतात; त्या प्रांतांतील मुख्य शहर भरतपुर नामें आहे. सपाट मुलुकांत, आणि आग्रा व मथुरा यांचा जवळ असूनहि, त्यांणीं दिल्ली सरकारास या कारकीर्दींतहि पुष्कळ गोंधळांत घातलें, आणि पुढील

किरकोळ वर्तमानें.

कारकीर्दींत ते इतके महत्त्व पावले, कीं एके वेळीं ते आग्राहि बळकावून बसले होते. हिंदुस्थानांतील सपाट देशांतील लोकांनीं ब्रिटिश सरकाराशीं जी बरीच टक्कर दिली, ती यांणींच दिली, यांनंतर कोणी दिली नाहीं.

इ० स० १६९३ त औरंगझेबाचा कारकीर्दीचा अडतीसाव्या वर्षीं एक तारू सुरतेहून यात्रेकरू लोक घेऊन मक्केस जात होतें, त्यावर ८० तोफा व ४०० बंदुका होत्या असें खाफी खान वर्णन करितो. त्यावर एका लहान इंग्लीश जहाजानें हल्ला केला. मोगलांचा तारवावरील एक तोफ फुटली, आणि इंग्रेजांनीं त्यांचा तारवावर चढून जाऊन "जरी ख्रिस्ती लोकांस तलवारीनें लढण्याचें सामर्थ्य नव्हतें, तरी, अव्यवस्थेमुळें, तें तारू त्यांचा हातीं लागलें," असें वर्णन आहे.

हें झाल्यानंतर औरंगझेबानें आपल्या बंदरांतील इंग्लिश वखारदारांस पकडण्याविषयीं हुकूम केला, आणि मुंबई घेण्याविषयीं हबशी यांस आज्ञा केली.

त्याचा सूड उगविण्याकरितां इंग्लिशांनीं बादशाहाचा अम्मलदारास पकडलें; परंतु हबशी लोकांचा त्यांशीं सलोखा होता, तो तोडण्याविषयींची हबशांनीं इच्छा दाखविली नाहीं, असें खाफी खान लिहितो. शेवटीं गुजराथचा सरसुभेदारानें खाफी खानास मुंबई एथें बोलणें करण्याकरितां पाठविलें. आपला स्वीकार मोठ्या डौलानें व चांगल्या व्यवस्थेनें झाला, व त्या वेळीं लश्कराचा शोभेचाहि

---

६ या संख्येंत बहुधा अतिशयोक्ति नसावी; परंतु त्या तोफा लहान असाव्या. त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा ६०० टन म्हणजे सुमारें २१०० खंडींचा कांहीं जहाजांवर ७० तोफा असत.

इंग्लिशांनीं बराच भबका दाखविला, असें तो वर्णन करितो. उंच पोषाक घातलेल्या वयस्क गृहस्थांशीं याचें बोलणें झालें; अशा मोठ्या प्रसंगीं, जरी केव्हां केव्हां ते मर्यादेबाहेर मोठ्यानीं हंसत, तरी त्यांचा दक्षतेविषयीं व बुद्धीविषयीं यास चांगला ग्रह झाला, असें दिसतें. इंग्लिश लोक म्हणूं लागले, कीं पादशाहाचें जहाज चांचे लोकांनीं घेतलें, त्याचे कांहीं आम्ही जबाबदार नाहीं. दुसरी त्यांवर अशी फिर्याद होती, कीं ते आपल्या बादशाहाचा नावानें पैका पाडतात. त्याविषयीं त्यांणीं असें सांगितलें, कीं जेथें मोगलांचा पैका चालत नाहीं तेथेंहि आम्हास माल खरीद करावयाचा असतो, म्हणून आम्हास असें करावें लागतें.

या वेळीं कांहींच ठराव झाल्याचें लिहिलेलें नाहीं; परंतु इंग्लिशांनीं कांहीं पैका देऊन त्यांची समजूत काढिली, असें, दुसऱ्या ठिकाणीं कांहीं लेख आहेत त्यांवरून, समजतें.

हा कारभार लहानसा असून त्यांत हा स्वतः होता त्याचें याणें वर्णन केलें आहे, आणि हिंदुस्थानाचा दोहीं बाजूंस औरंगझेबाशीं जी लढाई इंग्लिशांनीं केली, व पुढें जिजपासून इस्ट इंडिया कंपनीचा इतिहासांत मोठा परिणाम झाला, तिजविषयीं हा कांहीं सांगत नाहीं, हें चमत्कारिक आहे. ते अनाडी लढाऊ लोक पुढें केवढ्या महत्वास चढतील हें भविष्य त्यास समजलें नव्हतें.

# भाग नववा.

## औरंगझेबानंतर झालेल्या बादशाहांचीं वर्तमानें.

## प्रकरण पहिलें.

### महम्मदशाह गादीवर येईपर्यंत झालेल्या बादशाहांची हकीकत.

### बहादुरशाह.

शाहजादा अझीम व त्याचा वडील भाऊ मोअझिम यांचा तंटा.

जेव्हां अझीमानें बाप मेल्याचें वर्तमान ऐकिलें, तेव्हां तो लागलाच छावणींत परत आला, आणि मयत बादशाहाचा मृत्युपत्राविरुद्ध आपणास सर्व हिंदुस्थानाचा बादशाह म्हणविता झाला.

त्या वेळीं शाहजादा मोअझिम हा काबूल एथें होता, त्याणें तेथें मुकुट धारण करून बहादुरशाह असा किताब घेतला. यास गादी घेण्यास अझीमापेक्षां सबळ सबब होतीं. नंतर ते दोघे भाऊ आपआपले पक्ष लढून सिद्ध करण्याकरितां तयार झाले. त्या वेळीं राज्यांतील सर्व मुलुक हैराण

झाला होता; तथापि त्यांणीं मोठमोठ्या फौजा जमविल्या, आणि आग्र्यापासून थोड्या पल्ल्यावर दक्षिणचा अंगास त्यांचा प्रसंग झाला. त्यानंतर पुढें मोठी निकराची लढाई झाली, तींत अझीम व त्याचे दोन मोठे प्रौढ मुलगे, हे मारले गेले, आणि त्याचा तिसऱ्या अगदीं लहान अंगावरचा मुलास शत्रूंनीं कैद केलें. अझीमाचा दराऱ्यामुळें त्याचा मुख्य सरदारांतून पुष्कळ त्रासले होते. त्यांत असदखान व त्याचा मुलगा झुल्फिकार खान हे त्याचा तळ सोडून लढाई पाहत राहिले होते. लढाईचा शेवट समजल्यावर ते बहादुरशाह यास शरण गेले; त्याणें कृपेनें त्यांचा स्वीकार करून राज्यांतील मोठे मोठे अधिकार त्यांस दिले. त्याणें अझीमशाहाचा दुसऱ्याआश्रितांवरहि तशीच मेहर नजर केली; परंतु मोनीम खान म्हणून जो त्याचा काबूलांतील मुख्य सरदार होता, त्यावर त्याचा विशेषेंकरून भरवसा होता; त्यास त्याणें वजीर नेमिलें. मोनीम हा चांगल्या बुद्धीचा, व तसाच हुशार कारभारी होता; आणि बादशाहाचा स्वभावांत अतिशय ढिलेपणा एवढाच दोष होता, यामुळें मोनीम कारभारावर आल्यानें बहुतेक प्रजेस संतोष झाला. कारण औरंगझेबाचा धर्मसंबंधीं विरक्तपणा व हटाग्रही लढाया यांपासून जें त्यांचें नुकसान होई त्यांतून सुटका होईल अशी लोकांस आशा होती.

मोअझीम, ऊर्फ बहादुरशाह याचा जय झाला. इ० स० १७०७, जून; हि० स०१११९, रबीअलअवल.

शाहजादा कामबक्ष हा गर्विष्ठ व भ्रान्त पुरुष होता, तथापि त्याणें अझीमाचा अधिकार कबूल केल्यावरून अझीमानें त्याचा जाहगीरीस मंजूरी दिली होती; परंतु तो बहादुरशाहाचा

शाहजादा कामबक्ष याणें दक्षिणेंत बंड केलें.

अधिकार कबूल करीना, तेव्हां प्रथम त्या बादशाहानें त्याचें मन आपणाकडे समजुतीनें वळवून घेण्याविषयीं यत्न केला; परंतु तो व्यर्थ गेल्यावर त्याणें त्याजवर दक्षिणेंत स्वारी केली, आणि हैदराबादेजवळ एका लढाईंत त्याचा पराजय केला; तींत कामबक्ष घायाळ होऊन त्याच दिवशीं मरण पावला.

त्याचा पराजय होऊन तो मरण पावला. इ० स० १७०८, फेब्रुआरि; हि० स० ११११ झिकाद.

बादशाह दक्षिणेंत आल्यामुळें मराठे लोकांशीं कोणाचा रीतीनें वागावें याचा विचार करणें जरूर पडलें. जेव्हां औरंगझेब मरण पावला तेव्हां जी मोगलांची स्थिति होती त्या वेळापेक्षां सांप्रत मराठ्यांशीं चांगला बंदोबस्त स्वल्परीतीनें होण्याजोगी होती. त्या वेळीं मराठ्यांचा जो वास्तविक राजा शाहू, तो मोगलांचा हातीं कैदेंत होता, आणि त्याचा चुलता राजाराम याची विधवा ताराबाई ही आपल्या लहान मुलाचा नावानें राज्यकारभार चालवित असे. परंतु मोगलांनीं रायगड घेतल्यावर कोणी तरी मुख्य कर्ता पाहिजे अशी जरूर लागल्यामुळें मराठे लोकांनीं राजारामास गादीवर बसविलें होतें, तथापि त्याचा पुतण्या शाहू याचा वंशपरंपरेचा हक्क ते विसरले नव्हते, आणि त्यामुळें पूर्वींसारखें कारण नसतां ( राजाराम मेल्यावर हल्लीं ) पुनः त्यास राज्यपदापासून दूर ठेविलें हें पाहून त्यास बरें वाटलें नाहीं. या दोन्ही पक्षांचा भांडणांपासून आपला फायदा करून घेण्याचा हेतूनें शाहजादा अझीम याणें बहादुरशाहावर चढाई

बहादूरानें दक्षिणेंत केलेलीं कृत्यें.

मराठे लोकांची स्थिति.

राजा शाहू व ताराबाई यांचा कळया.

करण्याचा वेळीं शाहूस कैदेंतून मुक्त केलें. त्या वेळीं तो प्रौढ वयाचा झाला होता, आणि अझीमानें त्यास वचन दिलें होतें कीं जर तुझा हक्क तुझानें स्थापवला, तर मी तुझाबराबर तुझा फायदा होईल अशा रीतीनें तह करीन. ही मसलत झुल्फिकाराचा सूचनेवरून अझीमानें मान्य केली; ती पुरी लागू पडली. कारण मराठे सरदारांनीं निरनिराळे पक्ष स्वीकारले; त्यामुळें असें झालें, कीं त्या वेळीं याचे शत्रु मोगल हे जरी पुढें आपलें संरक्षण करण्यास असमर्थ होते तरी त्यांजवर मराठे लोकांनीं कहर न करितां, ते आपसांतच लढाया करूं लागले; त्यामुळें मोगललोकांची अगदीं नातवानीची दशा आली असतां, यांणीं त्यांस कांहीं इजा दिली नाहीं. नंतर जेव्हां बहादुरानें मराठ्यांकडे लक्ष लाविलें, त्या वेळीं त्यांचा आपसांतील तंट्यांत शाहू जिंतेल असें धोरण दिसत होतें. त्या वेळीं झुल्फिकारावर बादशाहाची फार मर्जी असे. त्याची अशी इच्छा होती, कीं पूर्वीं औरंगझेबानें जें मराठ्यांस देण्याचें कबूल केलें होतें, तितकें देऊन त्यांशीं तह करावा; परंतु वजीर मोनीम खान हा त्या तहाचा ठरावांस जरी कबूल होता, तरी तो ठराव ताराबाईशीं करावा अशी त्याची मर्जी होती, त्यामुळें तें सर्व बोलणें पडून राहिलें.

दाऊद खान पन्नी यास झुल्फिकार खान याचा वतीनें दक्षिणेंत ठेविलें.

जेव्हां बहादुरशाह दिल्लीस परत गेला, त्या वेळीं त्याणें दक्षिणचा सरसुभ्याचें काम झुल्फिकार खान यास दिलें; परंतु त्या सरदारास दरबारांतून पाठविण्यास सवड नव्हती, यामुळें औरंगझेबाचा लढायांमध्यें पूर्वींच मख्यात झालेला असा दाऊद खान पन्नी नामें एक पठाण

सरदार होता, त्यास त्याणें झुल्फिकाराचा दुय्यम ठरवून तिकडील कारभार त्याचा हवालीं करून ठेविला.

त्याणें मराठ्यांशीं तह केला.

दाऊदानें आपल्या मुख्याचा अभिप्रायाप्रमाणें वर्तून शाहूशीं स्वतः ठराव केला, आणि मी कामावर आहें पर्यंत चौथाई देईन, असें कबूल केलें; परंतु ती चौथाई माझे लोक वसूल करितील, त्यांत मराठ्यांनीं हात घालूं नये असा करार केला.

या बंदोबस्तामुळें, या कारकीर्दीचा अखेरीपर्यंत दक्षिणेंतील मुलुक स्वस्थ होता; तेणेंकरून बहादुरास दुसऱ्या कारभारांकडे लक्ष पोंचविण्यास फुरसूद झाली: तिकडेहि त्यास बंदोबस्त करण्याची किंबहुना यासारखीच जरूर

राजपूत लोकांशीं बंदोबस्त.

होती. तो कामबक्षावर जात असतां त्याणें राजपूतलोकांबरोबर जे आपले तंटे होते, ते मिटविण्याचा यत्न केला: त्याणें उदेपुरचा राण्याशीं तह केला; त्यांत त्याचा सर्व घेतलेला मुलुक परत दिला; धर्मसंबंधी गोष्टी जा रीतीनें अकबराचा वेळीं होत्या, त्या रीतीनें पुनः चालू केल्या; आणि राण्यास दक्षिणेंत मोगलांचा तैनातीस जें एक पतक ठेवावें लागत असे, तें त्यास माफ दिलें: सारांश स्वतंत्र एवढें एक नावमात्र खेरीज करून बाकी सर्व प्रकारें त्याची स्वतंत्रता याणें कबूल केली. बहुधा याच ठरावाप्रमाणें त्याणें मारवाडचा राजा अजीतसिंग याशीं तह केला होता, परंतु त्याचें जें पतक याचा तैनातीस असे, तें मात्र राखलें होतें. जयपुरचा राजा जयसिंग हा कधीं आपणास स्वतंत्र म्हणवूं लागला नव्हता, परंतु वरील लढाईत अझीमाचा पक्षास मिळाला

होता; ह्मणून त्याजवर याणें फार सक्तीचे ठराव बसविले. त्याचा राजधानींत याणें आपलें लश्कर पाहऱ्याकरितां ठेविलें; आणि जरी त्यास पादशाही लश्करांतील जयपुरचा पतकाचें आधिपत्य घेऊं दिलें होतें, तरी त्याचा स्वतांचा राज्यांतील त्याचा सर्व अधिकार याणें घेतला होता, असें दिसतें. पुढें बादशाहाचें लश्कर दिल्लीकडे जात असतां, जेव्हां नर्मदेस जाऊन पोंचलें, तेव्हां अजीतसिंगासहि राग येण्यास कांहीं कारण झालें; मग ते दोन्ही राजे आपल्या लश्करांसुद्धां निघून गेले, आणि मोगलांशीं लढाई करण्याकरितां त्यांणीं कट केला. कामबक्ष मरण पावल्यावर दक्षिणेंतील तंटा संपला; तेव्हां बहादुरशाहाचें लक्ष वरील कट मोडण्याकडे लागलें; परंतु हा राजपूतांचा मुलुकांत जाऊन पोंचण्यापूर्वीं, सीकलोकांनीं सरहिंदशहर घेतलें, हें वगैरे दुसरे पंजाबांतील कारभाराचा स्थितीचें असें वर्तमान आलें, कीं यास आपले केलेले वरील बेत सिद्धीस नेण्यास संधि सांपडली नाहीं.

त्यांशीं याणें तह केला.

अशी स्थिति झाल्यामुळें राजपूतलोकांशीं तह करण्याविषयीं हा उत्सुक झाला; परंतु हा विश्वासघात करील, या भीतीनें तो बंदोबस्त होण्यास मोठी अडचण पडली, म्हणून याणें आपला मुलगा शाहजादा अझीमुश्शान यास त्यांजबराबर भेटावयाचा ठिकाणीं येण्याकरितां त्यांजकडे पाठऊन दिलें. मग पादशाह कूच करून जा रस्त्यानें जात होता तेथेंच एका

इ० स० १७०९, हि० स० ११२१.

ठिकाणीं त्या उभयतांची भेट झाली, त्या वेळीं ते राजे आपल्या फौजा घेऊन आले होते. पादशाहानें त्यांचीं सर्व मागणीं कबूल केलीं; मग तेहि उदेपुरचा राण्याचाच पायरीप्रमाणें होऊन राहिले, असें संभवतें.

सीकलोकांची उत्पत्ति.

वर सांगितल्याप्रमाणें या वेळीं बादशाहास सीकलोकांवर चालून जावें लागलें; त्यांचा मूळीं एक निराळा धर्मसंबंधी पंथ होता; ते त्या वेळीं नुकतेच नावास येत होते, आणि सांप्रत हिंदुस्थानांतील राज्यांमध्यें त्यांचें वजन पुष्कळ पडून गेलें आहे.

त्यांचा पंथ गरीब होता.

त्यांचा धर्माचा स्थापक नानक; हा पंधराव्या शतकाचा अखेरीचा सुमारास होता; तो कबीराचा शिष्य म्हणून एका प्रकारचा एकेश्वरमती हिंदु होता; परंतु धर्माचा कामांत अगदीं निराग्रह असावा, हें याचें स्वतांचें विलक्षण मत असे. ईश्वराची भक्ति करावी हें अवश्य आहे, परंतु ती कोणत्याहि प्रकारें केली असतां चिंता नाहीं, आणि ईश्वराचा दृष्टीनें हिंदूंची व मुसलमानांची सेवा एकसारखीच आहे; याप्रमाणें त्याचा अभिप्राय असे. हा धर्म आचरण करणारांनीं सर्व मनुष्यजातीशीं मैत्रीनें वागावें, असा त्या धर्माचा कटाक्ष होता, परंतु अशीं सर्वात्मक स्नेहभावाचीं मतें मुसलमानांतील दुराग्रही लोकांस विशेषेंकरून त्रासकारक

मुसलमानलोक त्यांचा छल करूं लागले.

झालीं; यामुळें या पंथाची हळू हळू वृद्धि १०० वर्षांहून जास्त झाल्यानंतर मुसलमानी सरकार त्यांचा द्वेष करूं लागलें, आणि अकबर मरण पावल्यापासून एक वर्षाचा आंत इ० स०

१६०६ त त्यांचा गुरूचा त्यांणीं प्राण घेतला. यापूर्वीं सीक हे कांहीं उपद्रव न देतां स्वस्थपणें राहिलेले होते; परंतु हें जुल्माचें कृत्य झाल्यानंतर, त्यांचें स्वरूप बदलून त्यांस लढाईचा त्वेष भरला. त्यांचा प्रयत गुरूचा मुलगा हरगोविंद याचा हाताखालीं एकत्र होऊन त्यांणीं शस्त्र धरिलें. हरगोविंदास सूड घेण्याची बुद्धि झाली असून आपणावर जुलूम करणारे जे मुसलमान त्यांविषयीं संताप उत्पन्न झाला होता; त्याचप्रमाणें तो त्या सीकांचीं मनें वळविता झाला. मग ते उघडपणें मोगल सरकारचे द्वेष्टे झाल्यामुळें, ते अजूनपावेतों लाहोराजवळ राहत असत तेथून त्यांस हांकून लाविलें; तेव्हां त्यांस उत्तरेकडील पहाडांत आश्रयाकरितां जाऊन राहणें पडलें. त्यांमध्यें आपसांत कलह उत्पन्न होत, तथापि त्यांणीं मुसलमानांशीं तसाच द्वेष चालविला, आणि तेणेंकरून त्यांचा लढाऊपणाहि दृढतर झाला. पुढें इ० स० १६७५ त हरगोविंदाचा नातू, व नानकापासून दहावा पुरुष गुरु गोविंद हा गादीवर बसला. या नानकाचा मनांत सीकलोकांस एकत्र करून त्यांचें धर्मसंबंधीं व देशरक्षणसंबंधीं एक लोकसत्ताक राज्य करावें, अशी त्याचा मनांत कल्पना आली; आणि ती त्याणें ग्रूनानी कायदे करणाराचा शिस्तवार पद्धतीप्रमाणें तडीस नेली.

त्यांणीं बंड केलें.

गुरु गोविंदाविषयीं.

याणें सीकलोकांचें धर्मसंबंधीं व देशरक्षणसंबंधीं एक लोकसत्ताक राज्य केलें.

आपल्या मंडळीचा जमाव जास्त व्हावा ह्मणून तींतील लोकांमधील जातिभेद नाहींसा केला, आणि जे आपल्या पंथांत येतील ते मुसलमान

त्यांचीं मतें व रीतिभाति.

असोत, अथवा हिंदु असोत, ब्राह्मण असोत किंवा चांडाळ असोत, तथापि त्या सर्वांस अगदीं बराबरीचा नात्यानें तो घेऊं लागला, आणि आपल्या पंथाचें वेगळेपण राहवें, व आपले पंथी इतर लोकांपासून ओळखतां यावे ह्मणून त्याणें एक विलक्षण पोषाक व रीतिभाती सुरू केल्या; प्रत्येक पुरुष जन्मला, ह्मणजे तेव्हांपासून अथवा त्यास उपदेश होऊन तो या धर्मांत आल्यापासून, त्याणें शिपाईगिरीची शपथ घेतली असे; आणि त्याणें सर्वकाळ कांहीं तरी रूपानें आपल्याबराबर तिखें बाळगावें, निळे कपडे घालावे, शेंडी व दाढी वाढवावी, आणि शरीरावरील दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणचे केंस कातरूं नये अथवा काढूं नये, असे त्यांचे नियम असत.

हिंदूंचा देवांस मान द्यावा, व ब्राह्मणांची प्रतिष्ठा ठेवावी, हे नियम राखले होते; आणि गोवधाची अगदीं साफ मनाई केली होती; परंतु बाकी खाण्यापिण्याविषयीं दुसरे अडथळे काढून टाकिले; देवपूजेचे साधारण प्रकार सोडून दिले; रामराम करण्याची नवीन तऱ्हा चालू केली, व जन्मापासून जा संसारांतील मुख्य गोष्टी घडून येतात त्या करावयाचा वेळीं जे संस्कार होतात, ते जुने टाकून नवीन सुरू केले; याप्रमाणें झाल्यामुळें लोकांचा स्थितींत इतका साफ बदल झाला, कीं सांप्रत जरी सीकलोकांचा पुष्कळ विलक्षण चाली सुटल्या आहेत, तरी हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि मूळचा जातींचा लोकांप्रमाणें यांचें स्वरूप निराळें होऊन राहिलें आहे. सीकलोक हे उंच, व शरीरानें कृश आहेत, आणि इतके उत्तरेकडील असून त्याप्रमाणें पाहिलें असतां काळे आहेत; ते घोड्यावर बसण्यामध्यें चपल

व बर्केदाजींत हुशार आहेत; ते अद्यापि सर्व शिपाईच आहेत, परंतु पूर्वींप्रमाणें आतां वेडगळ नाहींत; त्यांस शिक्षेची जिल्हई मिळालेली नाहीं, तथापि ते मनाचे मोकळे, मंडळींत राहण्यास लायक, व सर्व प्रकारची आणि पाहिजे तितकी ख्यालीखुशाली त्यांस प्रिय आहे.

प्रथम ते अगदीं दबून गेले.

गुरु गोविंदाचा कारकीर्दींत त्यांचा स्वभाव अगदीं भिन्न होता. त्या वेळीं धर्माविषयीं श्रद्धा व शत्रूंविषयीं द्वेष या विकारांनीं त्यांचीं मनें अगदीं भरून गेलीं होतीं, आणि आपल्या पक्षाची चांगली अखेरी करण्याकरितां पडेल तें करायास व सोसायास ते तयार असत; परंतु याप्रमाणें मोगलांशीं लढून त्यांचा सूड उगविण्याची मसलत पार पाडण्याजोगा त्यांचा जमाव नव्हता; त्यामुळें पुष्कळ दिवस लढल्यानंतर मोगलांनीं गुरु गोविंदाचीं सर्व ठाणीं घेतलीं, त्याची आई व मुलें यांची कतल केली, आणि त्याचा परिवारांतून कोणास मारिलें, कोणाचे हातपाय तोडले, व बाकीचांची वाताहत करून सोडली. याप्रमाणें अनर्थ झाल्यामुळें, गुरु गोविंदाची अक्कल गेली, अथवा निदान त्याचें तेज तरी नाहींसें झालें, असें दिसतें; कारण पुढें त्याची भीति इतकी कमी झाली, कीं तो मोगलांचा राज्यांत आला तरी त्यास कोणी हरकत केली नाहीं; नंतर तो दक्षिणेंत नांदेड एथें असतां एका शत्रूनें त्याचा खून केला. एकाद्या धर्माचा वृक्षास पाळें फुटल्यावरहि केव्हां केव्हां तो उपटून टाकितां येतो, परंतु तसें करावयास पुष्कळ दिवसपर्यंत एकसारखा त्या धर्मवाद्यांचा छल केला पाहिजे. असें असून मोगलांचा

राज्यांतील दुसऱ्या बखेड्यांमुळें तसा छल त्यांस सांमत करतां आला नाहीं.

त्यांचें धर्मपिसें

बंधूचा हाताखालीं त्यांणीं जय मिळविला, लूट केली, व क्रूर कर्मे आचरलीं.

त्यांणीं कांहीं जुलूम केल्यामुळें, उलट त्या सीकांचें धर्मपिसें जास्त वाढलें, आणि त्यांचा मनांत मुसलमानांचा सूड उगविण्याची दुष्ट बुद्धि उत्पन्न होऊन, ती लवकरच चौताळली. पुढें बंधु नामें कोणी गुरु झाला; तो मूळापासून वैरागी होता, आणि त्याचा स्वभाव अति क्रूर असून मसलतीविषयीं तो धीट व साहसी असे. त्याचा हाताखालीं सीकलोक आपल्या दडालेल्या ठिकाणांतून पुनः बाहेर आले; आणि पंजाबचा पूर्वेकडील भाग लुटते झाले. त्या वेळीं ते जिकडे जिकडे गेले, तिकडे तिकडे कधीं कोणी ऐकिलीं नाहींत अशीं क्रूर कर्मे त्यांणीं केलीं; मशीदी मोडून टाकिल्या, ही तर ओघासच गोष्ट आली होती; तसेच मुल्लेलोकांचीहि त्यांणीं कतल केली; परंतु त्या सीकांचा क्रोधास धर्माविषयीं कांहीं विचार, अथवा वय किंवा स्त्रीपुरुषादि जाति पाहून कांहीं दया, या दोहींचें आवरण नव्हतें; म्हणून त्यांणीं मनस्वी क्रौर्य करून शहरांचा शहरांची कतल करून टाकिली, आणि मेलेल्यांचीं मेतेंहि उकरून हिंस्र पक्षी व पशु यांस खावयास टाकून दिलीं. हीं घोर कर्मे मुख्यत्वेंकरून सरहिंद एथें झालीं. सीकांनीं तेथील अधिकाऱ्यास रणभूमीवर लढाई करून पराजित केलें, आणि तें शहर घेतलें; मग तेथें वर सांगितल्याप्रमाणें झालें. आतां त्यांणीं असा प्रकार सरहिंदेस मात्र केला असें नाहीं, तर सतलज व यमुना यांचा पूर्वेकडील देशांत, सारणपुरापर्यंत

त्यांणीं चाल केली होती, तेथपर्यंत वाटेवाट ते अशींच क्रूर कर्में करित आले. शेवटीं प्रांतांतील अम्मलदारांनीं त्यांची गति बंद केल्यावर, लुधियाना व पहाड, यांचा मध्यें सतलजनदीचा वरील फांट्याचा किनाऱ्यावरील प्रदेशांत ते निघून गेले. त्या वेळीं त्या देशांत त्यांचें मुख्य ठाणें होतें असें दिसतें, आणि जेव्हां त्यांस सपाट मुलुकांतून पळून जावें लागे तेव्हां त्यांस तेथून जवळ व सोपा मार्ग होता, त्यामुळें त्यांचा स्थितीस ती जागा योग्य होती.

या वेळीं ते तेथें फार दिवस लपून राहिले नाहींत. नंतर जेव्हां त्यांणीं पुनः हल्ला केला, तेव्हां एकीकडे लाहोरचा जवळजवळपर्यंत, व दुसरीकडे खुद दिल्लीपर्यंत मुलुक त्यांणीं फस्त केला.

पुढें त्यांचे मोठमोठे हल्ले येऊं लागल्यामुळें बहादुरशाहास त्यांजवर स्वतः चालून जाणें जरूर आलें. त्याणें त्यांस लवकरच त्यांचा हद्दींतून हांकून देऊन पहाडाचा आश्रय करण्यास लाविलें; परंतु त्यांस पुरे जेर करण्यास पुष्कळ प्रयत्न पाहिजे होता. शेवटीं त्यांचा नायक बंधु यास एका किल्ल्याचा आश्रय धरून राहणें भाग आलें; तेव्हां त्यांस अन्नाचा तोटा पाडला तरच ती जागा हातीं येत्ये, याशिवाय दुसरी आशा नाहीं असें झालें; म्हणून पुष्कळ दिवसपर्यंत बादशाहानें वेढा सक्तीनें चालविला, तेव्हां सीकलोकांस अतिशय क्षुधेची पीडा सोसावी लागली, आणि त्यांतून पुष्कळ लोक मरूनहि गेले, तथापि त्यांणीं त्या जाग्याचें रक्षण करण्याचें सोडिलें नाहीं. जेव्हां पुढें टकर मारण्याची आशा राहिली नाहीं, तेव्हां आंतील लोक जीवावर

बहादुरानें त्यांजवर स्वारी केली आणि त्यांस पहाडांत पळविलें.

उदार होऊन बाहेर निघाले; या साहसामध्यें पुष्कळ लोक मरून गेले, आणि पुढें मुसलमानलोकांस कोणी आड न येतां त्यांणीं तो किल्ला घेतला. त्यामध्यें एक पुरुष होता; तो त्यांचा मुख्यसा दिसे, आणि त्याणेंहि आपण पुढें दिसावें म्हणून होते तितके उपाय योजिले होते. त्यास त्यांणीं कैद करून मोठ्या जयजयकारानें नेलें. जेव्हां तो त्यांचा छावणींत पोंचला, तेव्हां पाहतात तों, तो कोणी हिंदु असून सीक झालेला आहे, व तो गुरूचें संरक्षण करण्याकरितां आपल्या जीवावर उदार होऊन राहिला आहे, आणि बंधु हा त्या हल्ल्याचा गर्दींत पळून गेला आहे असें त्यांचा दृष्टीस पडलें. त्या बंदीवानाची गुरुभक्ति पाहून बादशाह थक्क झाला, व त्याणें त्याचा जीव घेतला नाहीं, परंतु बुद्धि कृपण करून त्यास लोखंडी पिंजऱ्यांत अडकवून दिल्लीस पाठविलें.

बंधु पळून गेला.

नंतर आपल्या मागें सीकलोकांची देखरेख करण्याकरितां, आणि त्यांचे हल्ले बंद करण्याकरितां एक टोळी ठेवून, बादशाह लाहोरास परत आला. याप्रमाणें हा हेतु पुरा तडीस गेला नाहीं, आणि सीकलोकांची सत्ता पुनः वाढत चालली; इतक्यांत बहादुरशाह लाहोर एथें मरण पावला, त्या वेळीं त्याचा वयास चान्द्रमानानें ७१ वें वर्ष लागलें होतें, आणि त्याचा कारकीर्दीचें पांचवें वर्ष चाललें होतें.

बहादुरशाह मरण पावला. इ० स० १७१२ फेब्रुआरि; हि० स० ११२४, मोहरम.

बहादुरशाह मरण पावल्यावर त्याचा मुलांमध्यें चालीप्रमाणें कलह लागला. त्याचा वडील मुलगा जो पुढें जहांदरशाह या नावानें गादीवर बसला, तो मंदबुद्धी होता, त्यामुळें त्याचा

त्याचा मुलांचें भांडण.

दुसरा मुलगा अझीमुश्शान याचा पगडा विशेष झाला होता; तशांत बहुतेक उमरावलोक व फौज या सर्वांचा त्यास आश्रय होता, त्यामुळें दुसऱ्या प्रतिस्पर्ध्यांवर त्याचें अनिवार वर्चस्व होतें असें दिसत होतें. परंतु त्याचे दुसरे तीन भाऊ एकत्र मिळाले होते, आणि ते झुल्फिकार खानाचा शिकवण्यांनीं व खोट्या वचनांनीं एकत्र राहिले होते; झुल्फिकार खानास मसलती व कपट यांची पूर्वीसारखीच प्रीति असे. असें होतें तथापि तो त्या तिघां भावांचा एक विचार थोडे दिवस, अझीमुश्शान मरेपर्यंत, चालला; नंतर बाकी राहिल्या भावांपैकीं दोघांजणाचें लवकरच उघड फाटलें, आणि त्यांचा लढाईंत जाचा जय झाला होता, त्याजवर दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या भावानें स्वारी केली; परंतु त्याचा पराजय होऊन तो मारला गेला, तेव्हां जहांदरशाह हा गादीचा निर्विवाद मालक झाला.

झुल्फिकार खानाचा मसलती.

त्याणें जहांदरशाहाचा जय करून दिला. इ० स० १७१२ मे किंवा जुन. हि० स० ११२४, जमादिअल्‌ अव्वल्.

---

## जहांदरशाह.

जहांदरशाह सिंहासनावर बसतांच, त्याणें झुल्फिकार खान यास वजीर नेमिलें. या कपटी व बुद्धिमान् सरदारानें वरील सर्व तंट्यांत जहांदराचा पक्षास पाठबळ दिलें होतें. त्याचें कारण असें होतें, कीं या शाहजाद्याचा स्वभाव हलकट व आळशी होता, ह्मणून मोठ्या अधिकारप्राप्तीची इच्छा करणाऱ्या प्रधानास हातांत खेळवायास

जहांदरशाह गादीवर बसला.

त्याचा नाकर्तेपणा.

हें बाहुलें योग्य, असा त्याणें विचार केला होता.

झुलूफिकार खान याचा दरारा.

त्याप्रमाणें पहिल्यापासून त्याणें सर्व राज्यांतील अम्मल बळकाविला, आणि बादशाहाशीं अतिशय गर्वानें वर्तून, त्यास अगदीं तुच्छ मानूं लागला. आपल्या दुर्व्यसनांनीं व दुसऱ्या मूर्खपणांनीं बादशाहानें आपली अब्रू कमी करून घेतली होती; परंतु त्याशिवाय आपल्या प्रीतींतील राखेचा सग्यांविषयीं तो पक्षपात करित असे, यामुळें सगळे उमरावलोक खफा झाले होते. असें त्याचें आचरण नसतें, तर झुलूफिकारास अशी वर्तणूक करण्याचा धीर झाला नसता. वर सांगितलेली राख ही एक कलावंतीण होती, आणि तिचें कुटुंबहि त्याच बेअब्रूदार वर्गांतील होतें. असें असतांहि, उमरावलोकांस सोडून तिचा सग्यांस बादशाहानें मोठ्या हुद्यांवर चढविलें, आणि त्यांणीं पुष्कळ प्रसंगीं मानकरी लोकांचा उपमर्द केला, तथापि बादशाहानें त्यांस कांहीं शिक्षा केली नाहीं. या प्रकारचा कृत्यांमुळें उमरावलोक त्रासून बादशाहाचा पक्षास मिळतनासे झाले; तथापि झुलूफिकार खानाचा गर्व व जुलूम, हे लवकरच सर्व प्रतींचा लोकांचा नजरेस पडूं लागले, त्यामुळें त्याशींहि त्यांचीं मनें संतुष्ट झालीं नाहींत.

सर्व लोकांत बेदिली उत्पन्न झाली.

याप्रमाणें त्यांमध्यें नाखुशी उत्पन्न झाली, तिजमुळें पुढें उघड रीतीनेंहि त्यांणीं कंबर बांधिली असती असें नाहीं संभवतसें नाहीं; परंतु इतक्यांत बाहेरून एक संकट प्राप्त झाल्यामुळें तिकडे सर्वांचें लक्ष लागून गेलें. तो प्रकारः—

जेव्हां जहांदर प्रथम गादीवर आला, तेव्हां जेवढे

शाहजादे त्याचा हातांत सांपडले, त्यांस त्याणें ठार मारून टाकिलें, हा प्रथमचांतला एक पराक्रम केला. जे याचा हातांत सांपडले नाहींत, त्यांमध्यें अझीमुश्शानाचा मुलगा फरुख्शीर हा होता. तो बहादुरशाहाचा मरण समयीं बंगाल्यांत होता. बहादुर मरण पावल्यावर, आणि अझीमुश्शानाचा नाश झाल्यावर त्याणें बहारचा सुभेदार सय्यद हुसेन अली याचा दयेचा व विश्वासुपणाचा आश्रय केला. हुसेन अली हा त्याचा बापाचा जुनाट आश्रित होता. त्याणें मोठ्या उत्सुकतेनें त्याचा पक्ष धरिला, आणि अलाहबादेचा सुभेदार आपला भाऊ सय्यद अब्दुल्ला याजकडूनहि आग्रहानें तो पक्ष धरविला.

शाहजादा फरुख्शीर याणें बंगाल्यांत बंड केलें.

त्यास बहार व अलाहबाद एथील सुभेदार अब्दुल्ला व हुसेन अली योणीं मदत केली.

या उमरावलोकांचा सहाय्यानें फरुख्शीरानें प्रयागास फौज जमविली; त्यास वाटेनें अटकाव करण्याकरितां जी फौज आली होती ती हटवून लाविली, आणि आग्र्याजवळ कूच करून गेला, इतक्यांत जहांदरशाह व झुल्फिकार खान हे ७०,००० लोकांनिशीं त्यास आडवे आले. पुढें युद्ध मोठ्या निकाराचें झालें, त्यांत फरुख्शीराचा पक्षाचें नाक हुसेन अली हा रणभूमीवर प्रेताप्रमाणें होऊन पडला; परंतु शेवटीं बंडवाले लोकांचा जय झाला. बादशाह स्वतः सोंग घेऊन दिल्लीस पळाला, आणि झुल्फिकार खान हाहि बाकी राहिलेल्या लष्करानिशीं परत दिल्लीस गेला. जहांदरशाह दिल्लीस पोंचल्यावर झुल्फिकार खानाचा बाप असद खान याचा घरीं गेला.

फरुख्शीरानें बादशाही फौजेचा पराजय केला. इ० स० १७१३, जान्युआरि ता० १; हि० स० ११२४, झिलहाज, चं० १५.

या कसलेल्या विश्वासघातक्यानें त्यास लागलेंच कैदेंत टाकलें आणि झुल्फिकार आल्यावर, त्याची महत्वाकांक्षा पुरी करण्याचें साधन जो जहांदर त्याचा त्याग करण्याविषयीं जरी त्याची प्रथम नाखुशी होती, तरी नव्या बादशाहाचा क्रोधाग्नीस जहांदररूप प्रतिस्पर्ध्याची बळ देऊन शमविण्याचा यत्न करण्याविषयीं तो झुल्फिकाराचें मन वळविता झाला.

झुल्फिकारानें विश्वासघात करून जहांदरास शत्रूचा स्वाधीन केलें; परंतु फरुखशिरानें जहांदराबरोबर त्यासहि मारून टाकिलें. इ०स० १७५३, फेब्रुआरि ता० ४; हि०स० ११२५, मोहरम चं० १७.

त्याप्रमाणें जेव्हां फरुखशीर राजधानीजवळ आला, तेव्हां ते दोघे बापबेटे त्यास सामोरे गेले; आणि आपल्या पूर्वीचा दुर्दैवी धन्यास त्याचा हवालीं करिते झाले. असद खानास फरुखशीरानें जीवदान दिलें, परंतु झुल्फिकार खान बादशाहाचा डेऱ्यांतून बाहेर निघाला नाहीं तों त्यास गळफांस घालून मारविलें. याप्रमाणें त्याचा आपलपोटी व विश्वासघातकी वर्तणूकेचें त्यास प्रायश्चित्त मिळालें. त्याच वेळीं जहांदरासहि मारून टाकिलें, आणि या घोर कर्मानंतर दुसऱ्याहि पुष्कळ लोकांस फांशीं दिलें.

---

## फरुखशीर.

फरुखशीर गादीवर आल्यावर, त्याचा आश्रयदात्यांची सहजच बढती झाली. त्या दोघां भावांपैकीं वडील अब्दुल्ला खान यास त्याणें वजीर केला, आणि हुसेन यास सेनापतिनामक दरबारांतील दुसरी पदवी

दिल्ली. हे दोघे भाऊ, पैगंबराचा वंशजांतील एक मोठें व कीर्तिमान घराणें बारा म्हणून शहरांत राहिलेलें होतें, त्यामधील होते. आणि या त्यांचा उत्पत्तीमुळें हिंदुस्थानामध्यें सय्यद या नावानें त्यांची चांगली प्रसिद्धि आहे.

सय्यद अब्दुल्ला व हूसेन अली यांचा मोठा अधिकार.

फरुखशीराचा हलकट स्वभावावरून, तशीच तो त्यांची मदत मागत असतां त्याची वर्तणूक नम्रतेची होती त्यावरून, व तशीच यांणीं त्याची चाकरीहि चांगली बजाविली होती त्यावरून, बादशाहास पोकळ डामडौल ठेविला आणि त्यांचा प्रीतींतील लोकांचें मनोगत पुरविण्याजोगें त्यास सामर्थ्य राही इतकी दौलत व मानप्रतिष्ठा देण्याचें त्याचा हातीं ठेविलें, ह्मणजे राज्यांतील वास्तविक अधिकार आपणास चालवावयास सांपडेल, अशी त्या सय्यदांस आशा होती; परंतु फरुखशीर व त्याचा प्रीतींतील लोक हे इतक्या स्वल्प रीतीनें संतुष्ट राहिले नाहींत. बंगाल्यांत धाका ह्मणून एक शहर आहे, तेथें एक काजी होता; त्यावर त्याचा मुख्य इतबार असे. त्यास याणें मीर जुमला हा मोठा किताब दिला. या मनुष्याची बुद्धि विशाल नव्हती, तथापि आपल्या कोत्या समजाविषयीं तो हटाग्रह धरून बसत असे; त्यामुळें फरुखशीराचा बुद्धीवर आपला पगडा बसविण्यास तो योग्य होता; कारण बादशाहास स्वतः मोठा बेत समजण्याची शक्ति नसून, मदतीशिवाय लहानहि पार पाडण्याजोगी निश्चयात्मक बुद्धि नव्हती.

बादशाह त्यांचा द्वेष करूं लागला.

पादशाहास स्वतः अधिकार चालविण्यास अगदीं

अवसान नव्हतें, यामुळें तो अधिकार चालविणारांविषयीं याचा मनांत द्वेष आणून देण्यास कांहीं कठीण पडलें नाहीं; तशांत त्या सय्यदांची वर्तणूक दराऱ्याची असे, त्यामुळें त्यांस मोडून काढण्यास वास्तविक विचारास येण्याजोगें कारण त्यास सांपडलें.

त्याचा मसलती.

मग त्या दोघां भावांचा लश्करांची फूट पाडून त्यांस दुर्बल करावें, अशी पादशाहाचा गुप्त दरबारांत प्रथमची मसलत झाली. त्या कारणास्तव पादशाहानें मारवाडचा राजा अजीतसिंग याजवर हुसेन अल्ली यास पाठविलें, आणि इकडे त्या

त्याणें मारवाडचा राजा अजीतसिंग याजवर हुसेन अलीस पाठविलें.

राजपूत राजास आंतून सांगून पाठविलें कीं माझा सरदाराबरावर खूब हट्टयुद्ध केल्यानें जितकी मला खुशी होईल, तशी दुसरी कशानें होणार नाहीं. परंतु आपण पुष्कळ दिवस बाहेर राहिल्यानें विघ्नें प्राप्त होतील, असें हुसेन अल्लीस चांगलें माहित होतें; ह्मणून त्याणें लढाई लांबविण्याजोगें शत्रूजवळ मागणेंच केलें नाहीं, आणि

त्याजबरोबर त्याणें अब्रू बचावून तह केला.

जेव्हां अजीतसिंगाचें स्वतांचें हित झालें, तेव्हां त्यास पादशाहाचा हिताकरितां घीस सोसण्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं. याप्रमाणें त्या दोघांचा तह झाला, त्यांतील ठराव दिसण्यांत फरुखशीराचा अब्रूस लायक होते; त्यांत अजीतसिंगानें आपला मुलगा दिल्लीस पाठवावा, व आपली मुलगी बादशाहास द्यावी असा करार केला होता.

हुसेन अल्ली दरबारांत परत आल्यावर, त्या दोघांचा एकमेकांविषयीं विशेष बेभरवसा झाला. फरुखशीरामध्यें जसें शहाणपण आणि निश्चय हे गुण नव्हते, तसाच त्यामध्यें विश्वास व सत्व हींहि नव्हतीं; त्यामुळें त्याजवळ राहणारांस अगदीं निर्धास्त असें वाटण्याचा अति थोडा संभव असे, असा तो मनुष्य होता.

त्यांचा एकमेकांविषयीं विशेष बेभरवसा झाला.

त्या वेळीं सय्यदांस असें वाटलें कीं, याचें लक्ष आपले प्राण घेण्यावर आहे. ( तसें त्यांस वाटण्यास बरेंच कारण होतें, असेंहि संभवतें. ) मग त्यांणीं आपल्या महालासभोंवतें आपलें लश्कर जमा केलें, आणि दरबारांत येत नाहीं ह्मणून सांगितलें. नंतर आपण भ्यालों असें बादशाह दाखवूं लागला, आणि त्या उभय पक्षांचा लढायांचा तयाऱ्यांमुळें राजधानींत अतिशय गोंधळ होऊन, लोकांस इजा झाली. त्या वेळीं त्या दोन्ही पक्षांचा लोकांची एक लढाई व्हावी, किंवा त्यांतून जाचा आग्रह कमी असेल त्याणें दुसऱ्या पक्षास शरण जावें, हे, तो तंटा मिटण्याचे, दोन रस्ते राहिले होते. तेव्हां पादशाहास लोकांनीं आग्रह केल्यामुळें त्याणें ( जेथें त्याचा खासमहाल होता, त्या ) बाले किल्ल्याचे दरवाजे उघडवून त्यांत सय्यदांचे पाहरेकरी येऊं दिले, आणि इकडे सय्यद समजूतीचे ठराव करण्याकरितां त्याचा हुजूरांत हजर झाले. नंतर तेथें असा ठराव झाला कीं, मीर जुमला यास बहारचा सुभेदार करून दरबारांतून काढून टाकावें; अब्दुल्ला खान याणें पूर्वीं चालत आल्याप्रमाणें वजीरपणाचें काम करावें; आणि हुसेन याणें दक्षिणेंतील सुभ्याचें काम घेऊन

पादशाह सय्यदांस शरण गेला.

त्या दूरचा प्रांतांत लागलेंच निघून जावें.

याप्रमाणें एकोपा झाल्यावर बादशाहाचें अजीतसिंगाचा मुलीशीं लग्न अपूर्व समारंभानें झालें. अजीतसिंगास बाळपणीं औरंगझेबाचा जुलूमांतून काढण्याकरितां दिल्लीहून मोठ्या मुस्कीलीनें नेलें होतें, तेथेंच त्याचें एवढें महत्व कबूल झालें, असें त्याणें आपल्या स्वतांचा राज्यांत राहून पाहिलें, तेणेंकरून त्यास संतोष झाला.

हुसेन अल्ली दक्षिणेंत निघून गेला. इ०स० १७१५ डिसेंबर; हि०स० ११२७, झिहाज.

हा समारंभ झाल्यानंतर हुसेन अल्ली दक्षिणेंत निघून गेला. त्यास पक्कें माहित होतें, कीं मी फार दिवस बाहेर राहिलों म्हणजे बादशाह पुनः मीर जुमला यास परत बोलावील. याजकरितां निघून जात्ये वेळीं त्याणें बादशाहास सांगितलें, कीं माझा भावाचा अधिकाराची घालमेल करण्याचा यत्न चालला आहे असें जर माझा कानीं आलें, तर तें वर्तमान समजल्यापासून तीन आठवड्यांचा आंत मी आपल्या फौजेनिशीं दिल्लीस येईन.

हुसेन अल्ली यास हरकत करण्याविषयीं फरुखूशीरानें दाऊद खान पन्नी याजबराबर मसलत केली.

याप्रमाणें हुसेन अल्ली यास दक्षिणेंत पाठविलें; तिकडे जा लढाया आपोआप होतील त्यांत त्याणें गुंतून राहवें एवढ्यावरच फरुखूशीर भरवसा ठेवून राहिला नाहीं. तिकडे दाऊद खान पन्नी म्हणून एक सरदार होता; त्याचा अविचारी धाडसाविषयीं सर्व हिंदुस्थानभर कीर्ति होती, आणि दक्षिणेंतील काहण्यांमध्यें व म्हणींमध्यें अद्यापि त्याचें नाव लोक गातात. त्यास बादशाहानें आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां हाताशीं

धरिलें. जेव्हां फरुखशीर गादीवर आला, तेव्हां दाऊद खान याची गुजराथेंतील सरसुभ्यावर नेमणूक झाली होती; त्या प्रांतास सांप्रत खानदेश आणखी भिडविला. दाऊद हा झुल्फिकाराचा जुना सोबती शिपाई होता; यामुळें जा हुसेनानें झुल्फिकाराचा नाश केला, त्याशीं तो मोठ्या उत्सुकतेनें शत्रुत्व करील अशी बादशाहास खातरी होती; ह्मणून बादशाहानें त्यास गुप्त रीतीनें असा हुकूम पाठविला, कीं तुम्ही एकदम खानदेशांत जावें; जेवढें लश्कर जमववेल तेवढें बरोबर घ्यावें; मराठे लोक व दक्षिणेंतील दुसरे सरदार लोक यांजवळ चालेल तितकें वजन चालवावें; आणि हुसेन अल्लीस कुमक करण्याचें मिष दाखवून प्रथम साधेल त्या संधीस त्याचा नाश करून टाकावा. दाऊदानें आपल्या प्रख्यात स्वभावाप्रमाणें हे हुकूम बजाविले. तो एकदम हुसेन अल्लीस मोजीनासा झाला, आणि उघड शत्रूप्रमाणें त्याशीं लढावयास जाऊन आपणा दोघांतून बळकट कोण याचा रणभूमीवर निर्णय करण्याचा लवकरच समय आणिता झाला. या वेळीं जो त्याणें हल्ला केला, त्याचा तडाक्यानें प्रथम हुसेन अल्लीची फौज अगदीं गोंधळून गेली, आणि त्याचे लोक चोहींकडे पळूं लागले. इकडे दाऊद खान हा आपल्या जातीचे निवडक तीन शें फरशीबरदार लोक घेऊन समोर आपल्या शत्रूवर धांवून गेला. या घातीचा प्रसंगीं दाऊद खानाचा मस्तकांत गोळी लागली, तेणेंकरून तो पडला; तेव्हां लागलीच त्या दिवसाची बाणी फिरली. त्याची बायको, ही एक हिंदु राजाची कन्या होती; ती त्याजबराबर खानदेशांत आली होती; तिणें तो मेल्याचें वर्तमान ऐकतांच कटार खोंचून आपला प्राण दिला.

दाऊद खान याचा पराजय व मृत्यु. इ० स० १७१६; हि० स० ११२९.

याप्रमाणें जय झाल्यावर, जो आपणास अडथळा आला त्यांत बादशाहाचें अंग आहे असा त्याविषयीं त्यास दोष न लावितां, हुसेन अल्लीनें मराठे लोकांशीं युद्ध पुढें चालविलें.

इकडे मुसलमानलोकांमध्यें पुष्कळ दिवसपर्यंत आंतल्या आंत भांडणें लागल्यामुळें सीकलोकांस आपले गेलेलें बळ मिळविण्यास संधि सांपडली. त्यांचा गुरु, बंधु, जेथें लपून राहिला होता, तेथून निघाला, आणि बादशाही फौजेस पराजित करून पूर्वीपेक्षां अधिक त्वेषानें सपाट देशाचा विध्वंस करिता झाला. शेवटीं अब्दु समीद नामें हुशार सरदाराचा हाताखालीं फौज देऊन, बादशाहानें त्याजवर पाठविली. त्या सरदारान सीकलोकांस पुनः पुनः पराजित केलें, आणि शेवटीं बंधूस त्याचा कांहीं लोकांनिशीं व कांहीं त्याचा पंथांतील मुख्य सरदारांनिशीं, कैद केलें. त्यांतील बहुतेक लोकांचा त्याणें जागचा जागींच शीरच्छेद केला; परंतु ७४० लोकांस निवडून त्यांस बंधूसुद्धां दिल्लीस पाठविलें. तेथें ते ढोंगानें केंस राखून आपला घामटपणा दाखवित असत ह्मणून त्यांची निर्भर्त्सना करण्याकरितां मेंढरांचा काळ्या पोस्तीनी ऊर्फ डगले, ज्यांची लोंकर बाहेरचा अंगास केलेली होती, त्या त्यांचा अंगांत घालून उंटांवर बसवून त्यांस रस्त्यांतून मिरविलें, आणि त्यांस लोक शिव्यागाळी चांगल्या देतील अशा ठिकाणीं आणून दाखविलें. ही शिक्षा त्यांस योग्य होती असें कबूल केलें पाहिजे; परंतु त्यांस जें पुढें शासन झालें, तें त्यांचाहि अपराधाचा मानाबाहेरच झालें. तें असें, कीं त्यांस लागोपाठ

सीकलोक पुनः विध्वंस करूं लागले.

सीकलोकांस पराजित करून त्यांचें बहुतेक वाटोळें केलें.

सात दिवस फांशीं दिलें व त्यांणींहि, आपला धर्म सोडून जीवाचा बचाव करण्याचीं जितकीं बोलणीं शत्रूंनीं त्यांजवळ लाविलीं त्या सर्वांचा तिरस्कार करून, मोठ्या धैर्यानें आपले प्राण दिले.

बंधूस त्यांचा मागें ठेवून विशेष हाल केले. त्याला सोनेरी कपड्याचा झगा व लाल पागोटें घालून लोखंडाचा पिंजऱ्यांत घालून चवाठ्यावर ठेविलें होतें; त्याचा शिरच्छेद करण्यास नागवी तरवार घेऊन एक मारणारा त्याचा मागें उभा ठाकला होता, त्याचा सभोंवतीं त्याचा अनुयायांचीं शिरें भाल्यावर टोंचलीं होतीं आणि त्याचा सर्व वस्तूंचा निःपात झाला असें दाखविण्याकरितां एक मेलेलें माजरूंहि भाल्यास टोंचून ठेविलें होतें. नंतर त्याचा हातीं कटार देऊन त्याचा आंगावरचा मुलास भोंसकण्यास शत्रूंनीं आज्ञा केली. तें त्याणें नाकबूल केल्यावर त्याचा डोळ्यांदेखत त्या मुलाची कतल करून त्याचें काळीज काढून त्याचा तोंडावर मारिलें. शेवटीं तापलेल्या चिमट्यांनीं त्यास विदारून त्याचा प्राण घेतला. तो मरेपर्यंत त्याचें धैर्य खचलें नाहीं, आणि अशा रीतीनें मेल्यानें मी ईश्वराजवळ जाऊन, त्या काळची अनीति व जुलूम यांचा अंतक होईन, असा तो आनंद मानित असे. पुढें जसा जनावरचा मागें पारधी लागतो त्याप्रमाणें त्या वेळीं जे दुसरे सीकलोक जिकडे तिकडे मोकळे पसरलेले होते त्यांचा पाठीस पादशाह लागला; त्यामुळें पुष्कळ वर्षें लोटत पर्यंत, त्यांचें बळ पुनः वाढलें नाहीं; नंतर ते पुनः जमाव करून लुटालूट करूं लागले.

बंधूस फार क्रूरतेनें मारिलें.

पाहूं गेलें असतां जेव्हां सीकलोकांचा अतिशय

मराठेलोकांची बढती.

चांगला काळ होता, तेव्हांहि त्यांची संख्या पुष्कळ नव्हती; त्यांची एका प्रदेशाचा बाहेर कधींहि भीति नव्हती; व तो प्रदेशहि फार विस्तीर्ण होता असें नाहीं. परंतु मोगलांस जा शत्रूशीं दक्षिणेंत झुजावयाचें होतें तो यांहून निराळयाच प्रतीचा होता. इ० स० १७१३ मध्यें दाऊद खान पन्नी नाहींसा झाल्यावर त्याणें मराठ्यांबराबर केलेले जे ठराव होते, ते पाण्यांत गेले. त्याचा मागून दक्षिणेंत चीनकिलिच खान

चीनकिलिच खान ऊर्फ असोफजा याविषयीं.

( जो पुढें निजाम ऊल्मुल्क व असोफजा या नावांनीं इतका प्रसिद्धीस आला तो ) दक्षिणेंतील कारभार पाहूं लागला. हा सरदार फार हुशार असून दाऊदाहून अधिक काविबाज होता. त्या वेळेस मराठे लोकांमध्यें आपसांत अतिशय कलह माजला होता, ह्मणून याणें दुर्बल पक्षास मदत करून, त्यांचे आपसांतील कज्जे पेटविले, व त्यांचे पुष्कळ सरदार मोगलांचा पक्ष स्वीकारण्यास उद्युक्त केले.

या बंदोबस्तानें मराठ्यांचा जोराची वाढ बंद झाली, परंतु देशांत पुनः स्वस्थता होण्याविषयीं यापासून विशेष कार्य झालें नाहीं. पुढें हुसेन अल्ली यास ती जागा देण्याकरितां बादशाहानें चीनकिलिच खान यास काढिलें; यामुळें त्याचा बंदोबस्तापासून जो कांहीं थोडासा चांगला परिणाम झाला होता त्याचा नाश झाला; पूर्वींप्रमाणें मराठे लोकांचा टोळ्या मोगलांचा देश लुटूं लागल्या; त्यांतील कांहीं लोकांनीं त्यांचा हद्दींतील गांव बळकावून तेथें किल्ले केले; आणि तेथून ते आसमंततांचा देश लुटूं लागले.

जा वेळीं हुसेन अल्ली दक्षिणेंत आला, त्या वेळीं

या लुटारू लोकांमध्यें दाभाडे या आडनावाचा एका सरदाराचा सर्वांत अतिशय उपद्रव होता. त्याचा ताब्यांत खानदेशामध्यें एका हारीनें तटबंदी गांव होते. त्यांतून त्याणें लमाणलोक व दुसरे फिरस्ते लोक यांवर हल्ले करून उत्तरहिंदुस्थानांतून व दक्षिणेंतून सुरतेस जाण्याचा मोठा रस्ता बंद करून टाकिला होता.

दाऊद खान याचा पराजय झाल्यावर लवकरच, हें मोठें विघ्न दूर करण्याकरितां मोगलांनीं एक फार मजबूद फौज पाठविली; त्या वेळीं त्यांचे शत्रु चालीप्रमाणें मराठी मसलतींनीं आड आले. जसजसे मोगल पुढें येत, तसतसे मराठे लोक गांव ओस टाकीत आणि ते निघून गेले ह्मणजे पुनः वसाहत करीत; इकडे दाभाडा हा आपली मसलत साधण्याजोग्या चांगल्या स्थळास पोंचेपर्यंत पळण्याचें ढोंग करून, तेथें शत्रूंस आपणास पकडूं देता झाला. त्या वेळीं त्याचे लोक लहान लहान टोळ्यांनीं फुटून त्या ठिकाणासभोंवतील डोंगरांतून व दुसऱ्या तुटलेल्या जाग्यांतून पसरून गेले. इकडे मोगललोकांस जय मिळाल्यामुळें ते चढून त्या पळणारांचा पाठलाग करण्याकरितां फुटून त्यांचा मागें लागले. त्यांचा पुनः एका ठिकाणीं जमाव न होई असें त्यांस मराठे लोकांनीं त्या खिंडींतून गुंतवूं दिलें, आणि नंतर त्यांजवर एकदम परतून त्या लश्करचा मुख्य सरदार व टोळींतील बहुतेक लोक, यांची कतल केली, आणि घोडे, हत्यारें, व कपडेहि नागवून घेतल्याशिवाय त्यांणीं एकासहि निसटून जाऊं दिलें नाहीं. याप्रमाणें या लढाईचा आरंभ अशुभ झाला; त्याप्रमाणेंच पुढेंहि तिची गति होत चालली. एक तर मराठ्यांचे शत्रु कच्चे असून त्यांस आंतून

हुसेनानें शाहूराजाबराबर तह करून चौथाई देण्याचें कबूल केलें. इ० स० १७१७.

फरुखशीराची फूस असे, तेणेंकरून त्यांस अधिक उत्तेजन येई. शेवटीं आतां आपणास दिल्लीस जाण्यास विलंब करितां कामास नये असें पाहून हुसेनानें शाहूराजाबराबर तह केला. त्यांत शिवाजीचा हुकुमांत जो मुलुक होता तो सर्व, व त्यानंतर जो मराठ्यांनीं मुलुक घेतलेला तो, या सर्वांवर शाहूचा हक्क आहे असें कबूल केलें, व वरील देशांतील सर्व किल्ले मराठे लोकांस द्यावे व सर्व दक्षिणभर त्यांस चौथाई घेऊं द्यावी, आणि बाकी राहिलेल्या महसूलापैकींहि एक दशांश सरदेशमुखी या नावानें त्यांस द्यावा असें हुसेन अल्ली याणें कबूल केलें. ( पूर्वीं औरंगझेबाबरोबर जेव्हां शेवटील बोलणें चाललें होतें, त्या वेळीं वरील देशाचा कांहीं भाग, व हा दशांश ह्मणजे सरदेशमुखी एवढें मात्र काय तें मराठे मागत होते. ) वरील ठरावांत दुसरें असें ठरलें कीं शाहूनें १०,००,००० दहा लक्ष रुपयांची खंडणी द्यावी, १५,००० घोडेस्वारांचें पतक दिल्लीस ठेवावें, सर्व देशाचा बंदोबस्त राखावा, आणि कोणीकडूनहि दंगा होऊन नुकसान झालें असतां, त्याचा जबाब द्यावा.

या वेळीं मराठ्यांची आपसांत लढाई चालली होती, तींत शाहूचें पारडें वर होतें; तथापि त्याचा असा ह्मणविलेला जो मुलुक होता, त्यांतील पुष्कळ त्याचा ताब्यांत नव्हता, आणि जरी स्वतांचा आश्रितांचा लुटीचा त्याचानें कदाचित् बंदोबस्त करवता, तरी शत्रूचे लोक जा लुटी करीत त्यांचा बंदोबस्त करण्यास तो अगदीं असमर्थ होता. वरील बंदोबस्तामुळें हुसेन अल्लीस आपलें लश्कर दक्षिणेंतून

नेतां आलें, आणि शिवाय दिल्लीस कूच करित्ये वेळीं त्यास मराठ्यांकडून दहा हजार लोकांची मदत मिळाली, तेणेंकरून त्याचा हेतु सिद्धीस गेला. हा बेअब्रूचा तह फरुखशीर कायम करीना. त्याचा आणि सय्यदांचा पूर्वींपासून तंटा होताच, तो, या नाकबूलपणामुळें, लवकर निकरास आला; परंतु अखेरीस अशी गोष्ट खचित होईल असें पुष्कळ दिवसांपासून दिसून आलेलें होतें.

वरील तह कायम करण्यास फरुखशीर नाकबूल झाला.

त्या दोघां सय्यदांपैकीं वडील भाऊ अब्दुल्ला खान हा बुद्धिमान् होता, परंतु आळशी व ऐषरामी होता. त्यामुळें त्याचें वजीरीचें काम त्याचा दुय्यम रतनचंद नामें एक हिंदु होता त्याजकडे असे. रतनचंदाची शिस्त सक्त होती, व त्याचा स्वभाव स्वेच्छाचारी असे; यामुळें त्याचा कारभार लोकांस फार आवडेनासा झाला. या गोष्टींनीं उत्तेजन येऊन, व अब्दुल्ला खान याचीहि दक्षता नाहींशी पाहून, फरुखशीर आपली स्वतंत्रता परत मिळविण्याविषयीं मसलती करूं लागला. नंतर त्याचा मनांत वजीरास पकडावयाचा आहे अशा बातम्या उठल्या. त्या वेळीं लश्करचा कांहीं लोकांस बादशाहाचा चाकरींतून एकदम रुकसत मिळाली, त्यांचा कृतीवरून, व मीर जुमला हा त्वरेनें व गुप्तपणें बहारप्रांतांतून दिल्लीस अकस्मात् आला त्यामुळें, वरील बातम्यांस अधिक आधार झाला. मीर जुमला याणें बादशाहास असें कळविलें, कीं माझा प्रांतांतील फौजेंत फसाद झाल्यामुळें कांहीं अपाय होईल या भीतीनें मला पळावें

दिल्लीचा दरबाराची स्थिति.

सय्यद अब्दुल्ला खान याविषयीं.

फरुखशीराचा मसलती.

लागलें. बादशाहानें त्याचा फार पाणउतारा केला, तेव्हां आतां आपण सरकारी चाकरीचे सर्व विचार सोडून दिले असें दाखवून तो वजीराचा आश्रय करावयास गेला. परंतु या सोंगानें वजीराचा मनांतील किंतू गेला नाहीं. त्याणें आपल्या पक्षाचे लोक जमवून अगदीं अखेरीची तयारी केली. जा वरील मसलतीचा बादशाहावर आरोप आला, ती जर कदाचित् त्याचा मनांत होती असें असेल, तर ती पार पाडण्यास त्यामध्यें शौर्य नव्हतें. त्याणें वजीराचा तयारीस भिऊन त्याचा क्रोध शांत करण्याची घाई केली, राज्याचा बंदोबस्त हल्लींप्रमाणेंच राखावा अशी माझी मनापासून इच्छा आहे असें दर्शविलें, आणि मीर जुमला यास त्याची जन्मभूमि मुलतान् एथें लावून दिलें.

परंतु ही समजूत फक्त वरवरची होती. यामध्यें बादशाहाचें कपट आहे अशी त्या वजीराची सप्रमाण खातरी झाली होती, आणि बादशाहानेंहि वरील वर्तमान झाल्यावर लागल्याच पुनः मसलती सुरू केल्या. हा जसे पाऊलबुद्धीपणानें बेत करावयास जाई, तसे नामर्दीनें ते सोडूनहि देई. जे मुख्य मुख्य मानकरी लोक वजीरास नाखूश झाले होते, त्यांचा कट करावा असा याणें सांप्रत बेत केला. त्यांमध्यें जयपुरचा राजा जयसिंग हा होता; त्यास पुष्कळ वर्षांपूर्वी जाटलोकांशीं लढावें लागलें असून, त्याणें पुष्कळ दिवसपर्यंत लढाई करून त्यांची पांचांवर धारण बसवून दिली होती. इतक्यांत त्या लोकांनीं दिल्ली एथें आपला एक वकील पाठविला होता, त्याशींच वजीरानें बोलणें सुरू करून तह केला. या तहानें जयसिंगाचा नावास

त्याणें आपल्या मदतीस मोठ्या मानकरी लोकांचा कट केला.

फार बट्टा लागला. तसाच चीनकिलिच खान यास द-क्षिणचा सरसुभ्यावरून काढून मुरादाबाद एथील हलक्या कामावर पाठविलें होतें, तोहि आपल्या दुःखाचा सूड उगविण्यास तयार होता. त्यास बादशाहानें दिल्लीस बलाविलें; तेव्हां त्याचा सोबतीस बहारचा सुभेदार सरबुलंद खान हा मिळाला. बादशाहाचा सासरा राजा अजीतसिंग यासहि त्याणें बलाविलें; परंतु अशा ढिल्या हाताचा नावाड्याचा स्वाधीन जें हें तारूं, त्यांत बसण्याविषयीं त्याणें आपली इच्छा दर्शविली नाहीं, आणि पुढें लवकरच जा पक्षाचा हात चालता होता त्यास जाऊन तो मिळाला. परंतु दुसरे साथी लोक हे बादशाहाचा कामास चांगले झटत होते. त्यांणीं असा ठराव केला, कीं एका मोठ्या दिवशीं सणाचा समारंभ होत असतो, तेव्हां अब्दुल्लाचा पाहरेकरी लोकांपेक्षां बादशाहाचा पक्षाचे लोक विशेष जमतील, याकरितां त्या वेळीं मारेकरी घालून त्या वजीरास मारून टाकावें. त्या वेळीं हलक्या कुळांतील व खराब चालीचा एका काश्मीरी मनुष्यावर फरुखूशीराची मेहरबानी बसली होती, व त्यास त्याणें रुक्कुद्दवला असा किताब दिला होता. या मनुष्याची शिकवणी त्याचा साहजिक भित्रेपणास मिळून, ठरविलेलें बंड पार पाडण्यास त्याणें दिवसगत लाविली; आणि पुढें या नव्या प्यान्यास मुख्य वजीरातीची जागा देण्याचें कबूल करून, जा प्रांताचा चीनकिलिच खान सुभेदार होता, तोच प्रांत त्यास खानगी जाहगीरीबदल दिला.

फरुखूशीराचा पाऊलबुद्धीपणा.

याप्रमाणें बादशाहानें या मनुष्यास आपणाहून पसंद

त्याचे साथी त्यास त्रासले.

केलें हें पाहून त्याचा साथ्यांची उमेद खचून ते त्रासून गेले, आणि फरुखशीराची बुद्धि निश्चित नाहीं यामुळें जें काम हा हातांत घेईल, तें तडीस जावयाचें नाहीं, अशी त्यांची खातरी झाली. यास्तव जयसिंगाखेरीज बाकीचा सर्वांनीं पुनः वजीराशीं ताबडतोब दोस्ती केली. वजीरास पूर्वींचा चिन्हांनीं भीति उत्पन्न झाल्यामुळें, त्याणें पूर्वींच आपला भाऊ हुसेन अल्ली यास दक्षिणेंतून मदतीस बलाविलें होतें. हुसेन हा दरबारांतून नेमलेल्या लोकांस आपल्या फौजेंतील हुकुमतींचा जाग्यांपासून दूर ठेवित असे; त्यामुळें त्याची फौज त्याचा अध्यां वचनांत असे. ती घेऊन तो सांप्रत राजधानीवर भर कूच करून येत होता. तो येऊन दिल्लीस दाखल होण्यापूर्वीं, जी मध्यें फुरसूद सांपडली होती त्या वेळांत कांहीं तरी तडाका मारावा असा बादशाहास उत्तेजित करण्याकरितां जयसिंग प्रयत्न करित होता; परंतु कांहीं कामांत निराशा झाली असतां जें शेवटचें धैर्य उत्पन्न होतें, तसेंहि त्या दुर्बल बादशाहाचा मनांत याचानें उत्पन्न करवलें नाहीं. हुसेन अल्ली आल्यावर, राजा जयसिंगास त्याचा स्वदेशास घालवून द्यावें असें त्याणें प्रथम मागणें केलें. तसें झाल्यावर तो सहजच शत्रूंचा हातीं सांपडला; नंतर त्याणें अति नीच गरिबीचा आश्रय केला. हुसेन अल्ली शहराबाहेर तंबू देऊन राहिला, परंतु वजीर अब्दुल्ला याचे पाहरेकरी राजवाड्यांत येऊन, त्यांतील राहणाराचा निर्णय काय करणें हें त्या दोघां सय्यदांकडे राहिलें.

हुसेन अल्ली १०,००० मराठे लोकांनिशीं परत आला. इ० स० १७१८, डिसेंबर. हि० स० ११३१ मोहरम.

असा प्रकार असतां कितीएक मानकरी लोक इमानानें

बादशाहाचा पक्षास राहिले होते, ते आपल्या तैनातींतील लोक घेऊन त्याचा मदतीस आले. त्या वेळीं मराठे लोकांची कतल करण्याकरितांहि शहरांतील लोकांत उठावा झाला; त्यामुळें जो गोंधळ झाला त्यांत हुसेन अली हा शहरांत चालून आला, आणि कांहीं लोक आडवे आले त्यांस मारून शहर आपल्या ताब्यांत घेता झाला. नंतर फरुखूशीरास आणखी जीवंत राहूं दिल्यानें आपणास अपाय आहे असें त्या सय्यदांस दिसून आलें, म्हणून त्यांणीं त्या बादशाहरूप दुर्दैवी बाहुल्यास जनानखान्यांतील लपण्याचा जाग्यांतून ओढून आणून गुप्तपणें मारून टाकिलें.

फरुखूशीरास पदच्युत करून मारून टाकिलें. इ० स० १७१९, फेब्रुआरि; हि० स० ११३१, रबीउस्सानी.

औरंगझेबाचा धर्मसंबंधीं शिस्तीचीं कांहीं फळें या बादशाहाचा कारकीर्दींत दृष्टीस आलीं. तीं अशीं, कीं इनायतुल्लानामक त्या बादशाहाचा चिटनवीस होता. त्यास महसूलाचा कामावर मुख्य नेमल्यावर त्याणें आपल्या मागल्या धन्यासारखी सक्ती करून हिंदुलोकांपासून शिरगणतीचा कर पुनः घेण्याचा यत्न केला; परंतु लोकांचा गोंगाट झाल्यामुळें, त्यास तो लवकरच बंद करावा लागला, आणि दुसऱ्या कारकीर्दींत तो कर बादशाहाचा हुकुमानें शिस्तवार बंद झाला.

दुसरें या कारकीर्दींत शिया व सुनी या पंथांचा लोकांमध्यें जबरदस्त तंटा झाला; व त्याहूनहि मोठा अहमदाबादेस हिंदु व मुसलमान यांचा झाला, त्यांत पुष्कळ लोक मेले गेले; त्या वेळीं तेथील सुभेदार दाऊद खान पन्नी नामें मुसलमान होता, असें असून त्याणें हिंदूंचा पक्ष धरिला होता.

सय्यदांनीं बसविलेले नामधारी पादशाह. रफीउदरजात इ०स०१७१९ फेब्रुआरि; हि०स० ११३१, रबीउसानी.

**फ**रुखूशीरास पदच्युत केल्यानंतर त्या सय्यदांनीं एका लहान शाहजाद्यास **रफीउदरजात** असा किताब देऊन गादीवर बसविलें; तो तीन महिने आणि कांहीं थोडे दिवसांत क्षय होऊन मरण पावला.

रफीउद्दौला इ०स० १७१९, मे; हि०स० ११३१, रजब.

नंतर त्यांणीं त्याच प्रकारचा दुसऱ्या शाहजाद्यास **रफीउद्दौला** असा किताब देऊन गादीवर बसविलें. तोहि त्याहून थोड्या मुदतींत तसाच समाप्तीस गेला.

हे शाहजादे जन्मापासून जनानखान्यामध्यें एकान्तवासांत वाढलेले होते, व त्यांस कांहीं राजपद मिळण्याची आशा नसून त्यांचा मूळचा पोरकट विचारांत बायकी विचारांची आणखी भर पडली होती. ते मरण पावल्यानें त्या सय्यदांची गैरसोय झाली असावी, म्हणून त्यांणीं त्यांचा मागून एक चांगला कट्टा जवान निवडून काढिला. त्याचें नाव **रोशनअख्तर**; त्याची तरी दुसऱ्यांपेक्षां पूर्वींची स्थिति चांगली नव्हती, परंतु त्याची आई मोठी हुशार होती, तेव्हां तिणें कदाचित् याचा स्वभाव चांगल्या रीतीचा वळवून ठेविला असावा, व पुढें तो गादीवर आल्यावर त्याचा वर्तणूकेचीहि लगाम तिचा हातांमध्यें होती; या शाहजाद्यास **महम्मदशाह** हा किताब देऊन त्या सय्यदांनीं गादीवर बसविलें.[1]

(१) महम्मदशाह गादीवर आला तेव्हां त्याचा पूर्वींचा दोघां बादशाहांचीं नावें राजावलींतून काढून टाकावीं, आणि याची कारकीर्द फरुखूशीर मेल्यापासून मोजावी असा ठराव झाला.

# प्रकरण दुसरें.

## महम्मदशाह गादीवर बसल्यापासून नादिरशाह हिंदुस्थानांत येऊन परत जाईपर्यंत झालेलें वर्तमान.

जरी फरुखशीर स्वभावानें खराब होता, व एशियाखंडांत राजास मारून टाकण्याची लोकांस संवय आहे, तरी यास मारून टाकिल्यामुळें सर्व लोकांत हाहाकार झाला, आणि त्याचा मागून बसविलेले बादशाह हे असत्या आयुष्यांत मेले, त्यामुळें लोकांस त्यांचा मरणाविषयीं संशय येऊं लागले. त्या सय्यदांनीं आपल्या अधिकारास झांकण घालण्याकरितां हे नामधारी राजे उभे केले होते; त्या बाहुल्यांचा वारंवार बदल झाल्यामुळें त्यांस खेळविणाऱ्या सूत्राकडे लोकांचें लक्ष लागलें.

इ० स० १७१९ सेपटेंबर; हि० स० ११३१, झिकाद.

सय्यदांविषयीं लोकांत संताप उत्पन्न झाला.

याप्रमाणें या सय्यदांचा अधिकाराचें वजन लोकांमध्यें कमी झालें; आणि त्यांचा स्वतांचा आपसांत बेबनाव झाल्यामुळें, व त्यांचा पक्षांतील मुख्य सरदारांमधून कांहीं लोक बेदिल होऊन गेल्यामुळें त्यांचा सत्तेस आणखीहि धक्का पोंचला;

त्यांचा पक्षांतील लोकांत भांडणें चाललीं.

व पुढें लवकरच राज्याची आंतील व्यवस्था ढिली पडूं लागून यांचा अम्मल किती निर्जीव होऊन गेला तें दिसून येऊं लागलें.

बंडावे झाले.

प्रथम प्रयाग एथें एक हिंदु सुभेदार होता, त्याणें बंड केलें; त्याजवर स्वतः हुसेन अली स्वारी करून गेला, तथापि आपणास प्रयाग प्रांताबदल अयोध्या प्रांत द्यावा अशी कबूलात करून घेऊन, मग त्याणें आपला प्रांत सोडिला. बुंदी या संस्थानांतून दिल्लीचा बादशाहांस खंडणी मिळत असे; तेथें कांहीं बखेडे उत्पन्न झाल्यामुळें बंदोबस्तास मजबूद फौज पाठवावी लागली. इकडे पंजाबचा दक्षिणेकडील प्रदेशांत कोसूर एथील एका अफगाण सरदारानें बंड करून पादशाही फौजेस पराजित केलें; त्यास प्रयत्न करून जिंकावा लागला. शिवाय काश्मीर देशांत मुसलमान व हिंदुलोक यांचा जबरदस्त तंटा झाला; त्याचा बंदोबस्त करण्याविषयीं सरकारानें जे प्रयत्न केले, ते व्यर्थ गेले. त्या कज्ज्यांत दोन्ही पक्षांकडील कित्येक हजार लोक मेले गेले, व मालमत्तेचेंहि पुष्कळ नुकसान झालें, तेव्हां पुढें तो तंटा मिटला.

असोफजा याचीं कृत्यें.

त्या वेळीं बादशाहास चीनकिलीच खान याचा कृत्यांपासून अतिशय भीति होती. ( या सरदारास पुढें असोफजा असा किताब मिळून त्याचे वंशज दक्षिणेंतील निजाम या किताबानें युरोपीयन लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत. तो प्रकार पुढें येईल; परंतु त्यापूर्वींच एव्हांपासून त्याचें असोफजा या नावानें वर्णन करितों. ) असोफजा हा एका संभावित तुर्की वंशांतील होता. त्याचा बाप ग्यासुद्दीन याजवर औरंगझेबाची प्यारी असे.

त्याच बादशाहाचा कारकीर्दींत याणेंहि आपलें नाव बाहेर काढलें होतें. जहांदरशाह बादशाहाचा कारकीर्दींत त्याची राख व तिचे सगे, यांणीं उमरावांचा पाणउतारा करून टाकिला होता; त्या वेळीं याणें आपला मान मोठ्या हुशारीनें राखिला[1], आणि पुढें, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, दक्षिणेंतील सरसुभ्याचा कामावर असतां हा मोठें महत्व पावला. आपणास मुख्य वजीराची जागा मिळावयाची नाहीं असें पाहून, त्याणें फरुखशीराचा पक्ष सोडला होता; तथापि जेव्हां त्याचा नव्या दोस्तांचा (ह्मणजे सय्यदांचा) जय झाला, तेव्हां यास त्यांणीं पूर्वींचा सरसुभ्यावरहि न पाठवितां, माळवा, या एका प्रांताचा मात्र त्यास सुभेदार केला.

त्या प्रांतांत गडबड चालली होती त्यामुळें यास लश्कर जमा करण्यास निमित्त मिळालें. पुढें त्यापासून सय्यदांस इतकी भीति उत्पन्न झाली, कीं त्यास दुसऱ्या चार सुभ्यांतून कोणतेंहि काम देऊं करून तेथून काढून टाकण्याविषयीं त्यांणीं सरासरी प्रयत्न केला; तेव्हां आतां सोंग धरून राहण्याचा वेळ निघून गेला सबब आपलें वास्तविक स्वरूप प्रकट केलें पाहिजे असें असोफजास समजलें. त्या वेळीं आपल्याचानें राजधानीमध्यें नेहमीं चाले असा अम्मल बसविणें मुश्कील

---

(१) एके दिवशीं एका अरुंद वाटेनें जात असतां एका स्त्रीस वाट देण्याकरितां तिचा परिवारानें यास धट्टाईनें अटकाव केला. त्या स्त्रीचें बादशाहाचा राखेशीं व तिचा अंगत्वें बादशाहाशीं अनिवार वजन असे. वरील हरकत झाली, तेव्हां त्या स्त्रीचा लोकांस जबरदस्तीनें हटवावें, असा याणें आपल्या परिवारास हुकूम केला, आणि तिचा लोकांस हाकून लाविलें; तेव्हां तिला हत्तीवरून उतरून आपला बचाव करण्याकरितां पादशाहाचा महालांत पायीं पळून जावें लागलें.

आहे असें पाहून, त्याणें आपल्या सत्तेचा अधिक मजबूद पाया घालण्याचा निश्चय केला, आणि प्रथम दक्षिणेंतील मुलुक जिंकण्यामध्यें मन घातलें; कारण तिकडे मुसलमानांमध्यें व मराठ्यांमध्यें त्याचे पूर्वींचे पुष्कळ लागेबांधे होते. याप्रमाणें बंड केल्यावर तो लागलाच नर्मदेपर्यंत कूच करून गेला. नंतर त्याणें, मसलतीनें व लांच देऊन, अशीरगड किल्ला मिळविला, आणि त्या प्रांतांतील पुष्कळ सरदार आपल्या पक्षास मिळवून घेतले. त्याचा पाठलागास बारा एथील सय्यद दिलावर खान हा फौज घेऊन हिंदुस्थानांतून आला, आणि त्या आगंतुक सय्यदांचा पुतण्या आलमली खान हा दुसरी फौज घेऊन औरंगाबादेस त्याची वाट पाहत होता. दिलावर हा स्वभावानें उतावळा होता; तें संधान पाहून, त्याचा साथी त्याचा मदतीस येण्याचा पूर्वीं, त्यास याणें आपल्याबराबर लढण्यास उद्युक्त केलें, आणि बऱ्हाणपुराजवळ एका लढाईत त्याचा अगदीं पराजय करून टाकिला; त्या वेळीं दिलावर खान मारला गेला; नंतर याणें आलमली खानावर चाल केली, आणि त्याचे कित्येक सरदार वश करून घेतले. ते फितूर होऊन गेल्यानें आलमलीची फौज कमकूवत झाली होती, तथापि अद्यापि पुष्कळ मजबूद होती. नंतर वऱ्हाड प्रांतांत बालपुर एथें त्यांची लढाई झाली, तींत दोहीं पक्षांकडे पुष्कळ मराठे लोक होते. त्या युद्धांत आलमली पराजित होऊन मृत्यु पावला.

इ० स० १७२०, एप्रिल; हि० स० ११३२, जमादिउसानी.

त्याणें आपली सत्ता दक्षिणेंत स्थापली.

त्याणें सय्यदांच्या फौजा पराजित केल्या.

इ०स० १७२० जून.

इ० स० १७२० जुलै.

या गोष्टींनीं सय्यद घाबरून गेले; परंतु बादशाहास व पुष्कळ उमरावलोकांस आंतून या गोष्टीची खुशी होती; असें असतां, या बिनांचा योगानें कांहीं विचारशील लोकांचा मनांत पुढें राज्याचा नाश होण्याचीं दुश्चिन्हें येऊं लागलीं. याप्रमाणें त्या वेळीं लोकांचीं मनें खट्टू झालीं होतीं; तशांतहि त्या सुमारास एक मोठा झपाट्याचा धरणीकंप झाला, तो राजधानीचाच नाश करून टाकतो अशी भीति पडली; तेणेंकरून तर त्या भोळसर लोकांत अतिशय उदासीनता उत्पन्न झाली. मोठे अपाय होण्याचा पूर्वीं मनुष्याचा निश्चय सुटण्याची जशीं चिन्हें दिसूं लागतात, तशीं या पडत्या काळांत दोघां भावांचीं प्रकट होऊं लागलीं.

दिल्ली एथें धास्ती पडली.

महम्मदशाह हा आपल्या आईचा शिकवणीवरून तजविजीनें सय्यदांस अगदीं वांकडा आला नव्हता; तो सांप्रत आपली सुटका कोणचा रीतीनें होईल याविषयीं अति गुप्त रीतीनें विचार करूं लागला. या भयप्रद कामामध्यें महम्मद अमीन खान नामें एक उमराव याचा मसलतीस होता. जेव्हां फरुखशीर आपला स्वतांचा पक्ष बुडविण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां जे उमरावलोक त्यास सोडून गेले त्यांतला हा एक होता. तो तेव्हांपासून सय्यदांचा पक्षास मिळून होता परंतु त्यांची सत्ता व गर्विष्ठपणा हीं पाहून याचा मनांत त्यांविषयीं भरपूर द्वेष व त्रास आला होता. तो महम्मदशाहाबराबर तुर्की भाषेंत बोलत असे. ती भाषा हिंदुस्थानांतील सय्यदांस माहित

महम्मदशाहाची शहाणपणाची वर्तणूक.

त्याचा सय्यदांविरुद्ध मसलती.

महम्मद अमीन खान याविषयीं.

न्हती; यामुळें जरी त्या दोघां भावांचे संबंधी व त्यांचा अन्नाचे लोक यांची बादशाहासभोंवती गरदी असे, तरी त्या भाषेचा द्वारानें बादशाहाचे विचार कसे आहेत हें याणें उमगून काढिलें होतें. याप्रमाणें त्यांचा कांहीं खाणाखुणा होऊन त्यांवरून आणखी कांहीं अंतस्थ बोलणीं झालीं, आणि हळूहळू बादशाहाचा तर्फेची एक फळी जमली, तींत **सादत खान** हा दुय्यम होता. सादत खान हा पूर्वीं खुरासान एथील व्यापारी असे; तो वाढून त्यास लष्करी हुद्दा मिळाला होता, आणि जे अयोध्येचे सांप्रतचे राजे यांचा तो मूळ पुरुष होता. हे जमाव जरी इतके गुप्त होते, तरी त्यांपासून त्या सय्यदांचा मनांत धुंदरट भीति पडल्याशिवाय राहिली नाहीं; आणि सांप्रत असोफजाबराबरील जो तंटा पुढें येऊन ठाकला होता; त्यामध्यें बादशाहाविषयींची कशी व्यवस्था करावी, याविषयीं त्यांस पुष्कळ घोंटाळा पडला. शेवटीं त्यांणीं असा ठराव केला, कीं **हुसेन अल्लीनें** दक्षिणेंत जावें, आणि जातांना बरावर पादशाह व कांहीं वहमेदार उमरावलोक यांस न्यावें, आणि इकडे **अब्दुल्लानें दिल्ली** एथें राहून आपल्या कुटुंबाचा हिताचा बंदोबस्त करावा.

सादत खानाविषयीं.

हुसेन अल्ली बादशाहास बरावर घेऊन असोफजावर निघून गेला.

याप्रमाणें पुष्कळ कांकूं करून ते दोघे भाऊ आग्र्याहून निघाले, आणि आपल्या नेमलेल्या ठिकाणीं कूच करून जाते झाले. ते दोघे भाऊ वेगळे पडले, तेव्हां आपली मसलत पार पाडण्यास ही संधि चांगली आली आहे, असा त्या बंडवाले लोकांनीं निश्चय केला, आणि हुसेन अल्ली यास मारेकरी घालून मारण्याचा ठराव करून **मीर हैदर**

नामें एका क्रूर कालूमूकास(२) तें काम करण्यास निवडून काढिलें. ( मीर हैदर हा आपल्या मुलुकांत बऱ्याच पदवीचा गृहस्थ होता, तथापि तो अतिशय धाडसाचें काम करण्यास तयार होता. ) हुसेन अल्ली हा पालकींतून बसून जात असतां तो त्याची वाट पाहत बसला होता, आणि पालकी आली तेव्हां आपल्याकडे हुसेनाचें लक्ष लागावें, म्हणून हातांत एक अर्जी धरून उभा राहिला. त्यास जवळ येऊं देण्याकरितां हुसेन अल्लीनें आपल्या परिवारास खूण केली. मग याणें आपली अर्जी दिली, ती वाचायाचा बेतांत तो आहे इतक्यांत मीर हैदर याणें आपली कटार त्याचा शरीरांत भोंसकली. तो घाय वर्मीं लागला, आणि हुसेन अल्ली माणास मुकून गडबडून पालकीचा दुसऱ्या बाजूनें मेत होऊन, बाहेर पडला. त्याचा जवळचा लोकांनीं क्रोधाविष्ट होऊन मीर हैदर याचे क्षणांत तुकडे तुकडे केले. या बलाढ्य वजीराचा मरणानें सर्व छावणीभर गवगवा झाला. त्याचा पक्षाचे लोक जांमध्यें त्यासारखेच सय्यद पुष्कळ होते, त्यांचें व या बंडवाल्यांचा पक्षाचा लोकांचें दारुण युद्ध झालें; त्यांत बंडवाल्यांचा पक्षास केवळ बादशाहाचा संरक्षणाचा उद्देशानें पुष्कळ लोक येऊन मिळाले. त्या वेळीं आपले स्वतांचे मित्र बराबर घेऊन लश्कराचा दृष्टीस पडण्याविषयीं बऱ्याच संकटानें महम्मद उद्युक्त झाला, आणि तो पुढें आल्यामुळें मुख्यत्वेंकरून त्या दिवसाचें वारें फिरलें;

हुसेन अल्ली मारला गेला.

इ०स० १७२० आक्टोबर; हि०स० ११३२ झिहाज, चं० ७.

बादशाहानें राज्य धारण केलें.

---

(२) एक मुसलमानांची पहाडी जात आहे. भा० क०

व सय्यदांचा पक्षाचा लोकांस बंडवाल्यांनीं रणभूमीवरून हांकून लाविलें. मग सय्यदांचा पक्षांतून पुष्कळ लोक, व कोणत्याच पक्षास न मिळालेले असे जे होते ते सर्व लोक, बादशाहास शरण आले.

अब्दुल्ला खान याची कठीण अवस्था.

अब्दुल्ला खान दिल्लींत दाखल होण्यापूर्वीं हें वर्तमान त्यास पोंचलें. तें मुळीं दुःखकारक असून त्यापासून परिणामहि भयंकर झाले. कारण त्यास कांहीं हक्क नसतां व लोकांस पसंद पडण्याजोगें कांहीं निमित्तहि नसतां बादशाहाशीं दाली बांधण्याचा प्रसंग त्यास त्या वेळीं आला, आणि त्याचा आसमंतात् भागचा प्रदेशांत लागलेच बखेडे उत्पन्न झाले, तेणेंकरून त्यास त्याची स्थिति कळून आली. अशा संकटाचा प्रसंगीं त्याचें धैर्यहि वाढलें.

त्याणें नवा बादशाह गादीवर बसाविला.

मग दिल्ली एथें जे शाहाजादे बंदींत ठेविलेले होते, त्यांतून त्याणें एकास बादशाह करून त्याचा नावानें द्वाही फिरविली, आणि त्याचा नावानें लोकांस हुद्दे व किताबती देऊन लश्करचे लोक व सरदार हे चाकरीस ठेवून आपल्या पक्षास मजबूदी आणण्याविषयीं तो सक्त मेहनत करूं लागला.

त्याणें फौज जमा केली.

त्याचा पक्षास फारसे अब्रूदार लोक मिळाले नाहींत, तथापि पुष्कळ पगार देऊन त्याणें एक मोठी फौज जमा केली, परंतु ती चांगली शिकविलेली नव्हती. ती घेऊन, आपला भाऊ मेल्यापासून सुमारें पंधरवड्यानंतर तो निघाला. तो जात असतां वाटेनें चूडामण नामें जाटलोकांचा राजा त्यास मिळाला, व तसेच

त्याचा भावाचा लश्करांतील पुष्कळ लोक प्रथम बादशाहास शरण जाऊन मागाहून यास येऊन मिळाले. इकडे **महम्मदशाहाचा** कुमकेस राजा **जयसिंगानें** जलदीनें ४,००० घोडेस्वार पाठविले, व कांहीं **रोहिले** अफगाणांचे सरदारहि येऊन यास मिळाले. त्या दोन्ही फौजांचा प्रसंग **आग्रा** व **दिल्ली** यांमध्यें झाला; त्यांत **अब्दुल्ला** पराजित होऊन कैदेंत सांपडला. त्यास बादशाहानें जीवदान दिलें, तें बहुधा त्याचा पवित्र कुळीचा सन्मानार्थ दिलें असेल, असें संभवतें. नंतर **महम्मदशाह** लागलाच **दिल्लीस** गेला, आणि मोठ्या समारंभानें शहरांत प्रवेश करिता झाला. त्याणें आपणास स्वतंत्रता प्राप्त झाली म्हणून पुष्कळ लोकांस चाकऱ्या देऊन व बक्षिसें देऊन मोठा समारंभ केला. **महम्मद अमीन** यास बादशाहानें वजीर केलें, परंतु तो आपल्या कामावर आला नाहीं, इतक्यांत त्यास आजार होऊन तो पांच चार घटकांत वारला.

इ० स० १७२०, नोवेंबर; हि० स० ११३३, मोहरम.

त्याचा पराजय झाला.

इ० स० १७२० नोवेंबर, किंवा डिसेंबर; हि० स० ११३३, सफर.

नवा वजीर, महम्मद अमीन, अकस्मात् वारला. इ० स० १७२१, जान्युआरि; हि० स० ११३३, रबी अल् अव्वल.

अकस्मात् मुख्य वजीर मरण पावला असतां तो विषप्रयोगानें मेला असें बहुधा लोक म्हणूं लागतात, तसें ते सांप्रत करिते; परंतु लोकांस चमत्कारांविषयींची साहजिकच प्रीति असल्ये, त्या प्रीतीस विशेष पसंद पडण्याजोगी अशी या गोष्टीची त्यांणीं उपपत्ति लाविली. ती अशीः— कांहीं वर्षांपासून **दिल्ली** एथें एक धुतारा येऊन राहिला

होता; त्याणें इराणदेशामध्यें प्राचीन काळीं जा भाषा बोलत असत त्यांचा आधारानें एक नवी भाषा रचून तींत एक नवीन धर्मपुस्तक बनाविलें, आणि एक नवीन पंथ स्थापिला; त्यांतील गुरूस **बेकूक** म्हणत, आणि शिष्यांस **फराबूद** असें म्हणत असत. **महम्मदशाह** गादीवर आला, तेव्हां याचें इतकें मान वाढलें होतें, कीं त्याचा नवा वजीर **महम्मद अमीन** याणें त्यास पकडण्याकरितां एक शिपायांची टोळी पाठविली. त्यास कैद करण्यापूर्वी वजीरास एकाएकी झपाट्याचा आजार झाला तेव्हां त्याचा कुटुंबांतील मनुष्यांनीं, भिऊन, त्या बावाचा राग न व्हावा म्हणून त्यास नजराणे देऊन त्याची पुष्कळ विनवणी केली. हा चमत्कार मी केला, असें त्या **बेकूकानें** मोठ्या धीटाईनें कबूल केलें; परंतु माझा बाण एकदां सुटल्यावर मग अनिवार्य आहे, असें सांगितलें; इतकेंहि झालें असतां पुढें त्याचा वाटेस कोणी गेला नाहीं, आणि तो पुष्कळ वर्षेंपर्यंत राहिला होता. **महम्मद अमीन** मेल्यावर बादशाहानें वजीरीचा कामावर तूर्तदाखल एक बदली नेमला; कारण शेवटीं **असोफजा** यास तो हुद्दा द्यावयाचा त्याचा बेत होता.

बादशाहीचा त्वरेनें मोड होतचालला.

इकडे **दिल्लीचा** बादशाहीचा पडता काळ आला असें प्रत्यहीं निरनिराळ्या गोष्टींवरून दिसून येत चाललें. पूर्वीं राजा **अजीतसिंगास** मिळून राहवें म्हणून, **सय्यद** लोकांनीं त्यास **गुजराथचा** सुभा दिला होता; पुढें जेव्हां त्यांचा व बादशाहाचा तंटा लागला, तेव्हां त्यांत **अजीतसिंगानें** आपणाशीं दोस्ती ठेवावी, अथवा उगीच राहवें, म्हणून **महम्मदशाहानें** त्यास **अजमीर** प्रांत देण्याचें गुप्तपणीं कबूल केलें होतें;

आणि दोन्ही सुभ्यांचें काम त्याजकडे जन्मभर सोंपल्याबद्दल पादशाही मोहोरेनिशीं त्यास सनद मिळाली होती. असे ठराव असतांहि सांप्रत अजीतसिंगास गुजराथेंतून काढिलें; त्याचा मुतालिक एक राजपूत होता, त्याणें आपली जागा न सोडण्याकरितां लढून प्रयत्न केला, तथापि त्या प्रांतांतील मुसलमानलोकांनीं त्यास हांकून दिलें, तेव्हां त्यास आपल्या धन्याजवळ जोदपुर एथें पळून जावें लागलें. हें वर्तमान समजतांच अजीतसिंगानें अजमीरांत राजपूतांचें मोठें लश्कर जमविलें, नारनोळशहर घेऊन लुटलें, आणि दिल्लीपासून २५ कोशांवर रेवाडीपर्यंत आपलीं ठाणीं बसविलीं. त्याची गति कुंठित करण्याकरितां जा सरदारांस बादशाह त्यावर पाठवी त्यांचे आपसांत कलह लागत; त्यामुळें, व तें काम पतकरण्याविषयीं त्यांची आनाकानी असे त्यामुळें, त्याची ती कुंठित होण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. शेवटीं जेव्हां राजधानीचें रक्षण करण्याकरितां बादशाहाचा सेनापति निघून गेला, तेव्हां पूर्वी अजीतसिंगानें जे ठराव केले होते, ते त्याणें मोठ्या आनंदानें कबूल केले; आणि मजकडे अजमीरचें राज्य कायम ठेविलें असतां मी गुजराथ सोडून देतों असें अजीतसिंगानें सांगितलें.

इ०स० १७२१, हि० स० ११३३.

यानंतर लवकरच असोफजा दिल्ली एथें आला, आणि वजीराचा कारभार आपल्या ताब्यांत घेता झाला. त्याची वजीरातीवर नेमणूक झाल्याचें वर्तमान त्यास पूर्वी कांहीं वेळ समजलें होतें, तथापि राजधानीमध्यें जो अधिकार मिळावयाचा तो घेण्यापेक्षां

असोफजा यायिषयीं. इ०स० १७२२, जान्युआरि; हि० स० ११३४, रबीउसानी.

आपली दक्षिणेंतील स्वतंत्रता संपादावी हें त्यास विशेष अगत्याचें कृत्य वाटलें. त्या वेळीं मराठे लोक आपल्या राज्यास नियमित आकार त्वरेनें देत चालले होते, त्यांबराबर याचा पुष्कळ घालमेली होत होत्या; मग तिकडील कारभार आपल्या बेतांप्रमाणें केल्यानंतर तो दिल्लीस निघून गेला. तेथें पाहतो तों दरबारांत अतिशय दुर्बलता व अव्यवस्था

बादशाहाचा आळस.

त्याचा दृष्टीस पडली. बादशाह ऐषारामांत रत होऊन गेला होता; त्याचा भीतींतील मसलतदार तेहि तसेच व्यसनी तरुण लोक होते, आणि त्याचा राखेचा त्यावर इतका पगडा असे, कीं तो तिला आपली खासगी मोहर ठेवूं देत असे, व तिचा

त्याचा भीतींतील लोक.

इच्छेप्रमाणें तिला तिचा उपयोग करूं देत असे. **असोफजा** हा **औरंगझेबाचा** कडक दरबारांत शिकलेला होता; त्यास ही स्थिति पाहून फार त्रास उत्पन्न झाला. जरी **असोफजास** मसलती करणें आवडत असे, तरी तो झपाट्यानें राज्यकारभार करण्यास शक्तिमान् असून खुशीहि होता; परंतु बलात्कारानें राज्य बळकाविण्याजोगा त्यामध्यें धीटपणा अथवा सामर्थ्य हीं नव्हतीं, यामुळें बादशाहाचा भरवसा आपल्यावर पटे असें त्याचानें करवलें नाहीं. इकडे बादशाह त्याचा गंभीर

त्याची असोफजाविषयीं अनावड.

रीति पाहून आशंकत असे, आणि सरकारी कामाकडे लक्ष लावावें ह्मणून **असोफजा** वारंवार यत्न करून त्यास सांगे तेणेंकरून तो त्रासे. **असोफजाचा** जुना पोषाक व डामडौलाचे हावभाव यांची आपल्या व्यसनी सोबत्यांनीं केलेली बतावणी पाहून जसा त्यास आनंद होत असे, तसा दुसऱ्या कशानेंहि होत नसे.

याप्रमाणें कांहीं महिनेपर्यंत उभय पक्षीं नाखुश झाल्यानंतर पादशाह व त्याचे दोस्त यांणीं आपल्या मतें त्या खाष्ट प्रधानाचा हातून आपली सुटका होण्याची तजवीज शोधून काढिली. ती अशीः— त्या वेळीं गुजराथचा सुभेदार हैदर कूली ह्मणून होता; तो बादशाहाचा अधिकार पुनः स्थापन करण्याचा घालमेलींतील अग्रगण्यांपैकीं एक मुख्य होता; परंतु त्याचा स्वभाव गर्विष्ठ असून साळढाळ नव्हता, यामुळें दरबारांतील चांडाळचौकडीस तो आवडत नसे. ह्मणून त्यांणीं असा विचार केला, कीं असोफजाची व त्याची लटापट लावून दिली, ह्मणजे ते दोघेहि अधिक दरबाराचा तंत्रानें चालूं लागतील. असा विचार करून त्यांणीं हैदर कूलीस आपला सुभा असोफजाचा हवालीं करण्याविषयीं आज्ञा केली; तेव्हां त्यांचा आवांक्याप्रमाणें, हैदर हा आपल्या ठाण्यास निघून गेला, आणि तेथें आपलें ठिकाण बाहुबळानें राखण्याची तयारी करून राहिला. परंतु हा चांगला घाटलेला बेत अकस्मात् फसला, कारण त्यांचा लबाड शत्रु असोफजा याणें आपली बुद्धि खर्चून लावालावी करून व लांचा देऊन आपल्या प्रतिस्पर्ध्याची फौज बहुधा सगळीची सगळीच फितूर केली. याप्रमाणें आपल्या पूर्वींचा अति मोठ्या सुभ्याचा बळकटीस आणखी एक मातबर प्रान्त मिळवून तो लवकरच दिल्लीस परत गेला.

असोफजास गुजराथेचा बयादखोर सुभेदारावर पाठविलें.

असोफजानें ते बंड मोडून तो प्रांत आपल्या ताब्यांत ठेविला.

असोफजा परत आल्यावर आग्रा एथील सुभेदाराचा मुतालिकास जाटलोकांनीं मारिलें, तेव्हां त्या लोकांचा जुना शत्रु राजा जयसिंग यास त्या दुष्टकर्माचा सूड घेण्याकरितां

भरतपुर एथील जाटांवर स्वारी.

आग्रा एथील सुभेदार नेमिलें. त्या स्वारींत त्या जाटांचा चूडामण नामें वयस्क राजा मरण पावला, तेंव्हां त्याचा गादीवर बसणारा जो त्याचा मुलगा त्याचा विरुद्ध पक्षास त्याचा पुतण्या होता, त्यास कौशल्यानें आश्रय देऊन याणें जाटलोकांमध्यें फूट पाडिली, आणि शेवटीं, त्याचा पुतण्यानें दिल्लीचा बादशाहास खंडणी देण्याचें कबूल केल्यावरून, त्यास गादीवर बसविलें.

असोफजा त्रासला. तो राजीनामा पाठवून दक्षिणेंत निघून गेला. इ० स० १७२३, अकटोबर; हि० स० ११३६. मोहरम.

असोफजा परत आल्यावरहि बादशाहास व त्यास जो परस्परांचा कंटाळा आला होता, तो कमी झाला नाहीं. शेवटीं असोफजा हा कांहीं निमित्त करून राजधानींतून निघाला, आणि निर्भय ठिकाणीं जाऊन आपल्या कामाचा राजीनामा पाठवून दक्षिणेंत जाता झाला. त्या वेळीं महम्मदशाह यास स्वस्थपणा वाटला असावा असें संभवतें. वास्तविक पाहूं गेलें असतां असें करून असोफजानें आपली स्वतंत्रता प्रसिद्ध केली, आणि बादशाहानें याच दृष्टीनें ती गोष्ट पाहिली; आणि इकडे असोफजाचा राजीनामा मोठ्या कृपेनें स्वीकारून रयतेस जा अति उंच पदव्या मिळावयाचा त्या जरी त्यास दिल्या, तथापि त्याचें शत्रुत्व करावयाचें तें त्याणें सोडिलें नाहीं. हैदराबाद एथील सुभेदार मुबारिझ खान यास त्याणें हुकूम पाठविला कीं, तूं सर्व दक्षिणेचें राज्य असोफजापासून हिरावून घेऊन स्वतः कर. मुबारिझ याणें आपल्यावर सोंपिलेलें काम मोठ्या उत्सुकतेनें उचलिलें. त्यास निमित्तास पादशाहाचें

हैदराबादएथील सुभेदार मुबारिझ खान यास असोफजास हाकून लावण्याकरितां उद्युक्त केलें.

नाव सांपडलें असून, त्यांचेंहि वजन होतें त्यामुळें, व कितीएक लोकांचें त्याचा प्रतिस्पर्ध्याशीं वांकडें होतें यामुळें, त्याणें मोठी फौज जमा केली. असोफजाचा कल बळापेक्षां मसलतीवर हमेशा विशेष असे; त्याणें पुष्कळ महिनेपर्यंत बोलणीं लांबविलीं, आणि तितक्या मुदतींत मुबारिझाचा पक्षाचा लोकांत फितूर करण्याचा यत्न केला. या प्रकारचा शत्रुत्वांत त्याचें विशेष साधलें नाहीं, म्हणून त्याणें शेवटीं समोरासमोर लढाई देऊन लवकरच पूर्ण जय मिळविला; त्या लढाईत मुबारिझ मरण पावला. बादशाहानें आंतून मुबारिझास चिथविला होता, तथापि आपलें बाहेरून आंग दाखविलें नव्हतें; तेव्हां त्याचा सारखेंच असोफजानें ढोंग करून मुबारिझाचें शिर दरबारांत पाठविलें, आणि तें बंड नाशाप्रत पावल्याविषयीं बादशाहाचें अभिनंदन केलें. नंतर तो हैदराबादेस ठाणें धरून राहिला, तेथून तो नियमित वेळीं सन्मानार्थ पादशाहास नजराणे पाठवित असे, तथापि दुसऱ्या गोष्टींमध्यें तो यापुढें स्वतंत्र राजाप्रमाणें वर्तू लागला.

मुबारिझ पराजित होऊन मरण पावला.

इ० स० १७२४, अक्टोबर; हि० स० ११३७, मोहरम.

असोफजास त्याचा पूर्वीचा धन्याकडून हल्ला येण्याची भीति राहिली नव्हती; तथापि त्याचे शेजारी मराठे लोक यांपासून तो तसाच निर्भय होऊन राहिला नव्हता. सांप्रत त्यांची सत्ता एकवटून बुद्धिमान् पुरुषांचा हातांत आली होती, तेणेंकरून तो जितकें बळ तिचा आड आणी तितक्यासहि ती भारी होऊन गेली होती; तेव्हां त्याणें कांहीं वेळपर्यंत आपल्या कापट्य विद्येची सफाई चालवून त्या मराठ्यांचा जोर

असोफजाची मराठे लोकांशीं वर्तणूक.

आपल्यापासून एकीकडे जाऊन, दिल्ली एथील आपल्या शत्रूंवर पडावा अशी तजविज चालविली.

मराठ्यांची सत्ता दृढ झाली.

मराठी राज्याचा स्थितींतील वर सांगितलेला फेरफार पुष्कळ दिवसपर्यंत होत आला होता; यास्तव आरंभापासून त्याचें वर्णन करणें अवश्य आहे. जरी मोगललोकांनीं शाहू राजास गादीवर बसविलें होतें, तरी (इ०स० १७१३ पासून इ०स० १७१६ पर्यंत) असोफजाचा दक्षिणेंतील पहिल्या कारकीर्दींत त्याणें, आपल्या राजकारस्तानास्तव, शाहूचा प्रतिस्पर्धी संभाजी, जो त्या वेळीं कमकुवत होता, त्यास मदत केली होती. पुढें लवकरच कांहीं गोष्टी घडून आल्यामुळें शाहूचा पक्षाचें पारडें बसलें, आणि त्या वेळीं त्याचा मुख्य प्रधान बाळाजी विश्वनाथ हा हुशार होता ह्मणूनच त्यास पुनः वर्चस्व मिळालें, नाहीं तर कधीं मिळालें नसतें.

बाळाजी विश्वनाथ पेशवा.

बाळाजी विश्वनाथ हा (पेशवे नामें ब्राह्मणी वंशाचा मूळ पुरुष) कोंकणामध्यें एका गांवचा वतनदार कुळकर्णी होता. तो पुढें जाधव या आडनावाचा सरदाराचा चाकरीस राहिला; तिकडून पुढें तो राजाचा तैनातींत आला, त्याणें पुष्कळ कामगिऱ्या बजावून आपणास प्रख्यातींत आणिलें; त्यांत आंग्र्यानामक कोंकणांतील एक बलाढ्य सरदार व प्रसिद्ध चांचा यास संभाजीचा पक्षांतून फितवून शाहूचा पक्षांत आणिलें, ही अति मोठी कामगिरी केली होती.

त्या वेळीं मराठ्यांचा दरबारांत प्रतिनिधीची पायरी पहिली, व पेशव्याचा हुद्दा दुसऱ्या पायरीचा असे. तो शेवटीं याचा योग्यतेमुळें यास प्राप्त झाला. इ०स० १७१७ त

बाळाजी विश्वनाथ याचाच द्वारें हुसेन अल्ली खान याजपासून कांहीं मुलुक व चौथाई व सरदेशमुखी हे हक्क मराठ्यांस मिळाले, आणि हुसेन अल्लीबराबर जी मराठ्यांची फौज दिल्लीस गेली, तिजवर जे दोन मुख्य सरदार होते त्यांतील हा एक होता. त्या वेळीं राजा शाहू हा मोगल दरबाराशीं व्यवहारांत (आपल्या पूर्वजांनीं घेतलेले किताब व मिळविलेली स्वतंत्रता हीं दुसऱ्या गोष्टींमध्यें न सोडितां,) आपणास दिल्ली सरकारचा मांडलिक ह्मणवित असे; आणि उघडपणें याच दरजानें त्याचें पतक हुसेनाबराबर दिल्लीस गेलें होतें. पुढें जरी हुसेन अल्ली मेला, तरी तेणेंकरून मराठे लोकांचा जो दिल्लीचा दरबाराशीं संबंध होता तो कांहीं खसूस बदलला नाहीं. असाच विचार मनांत आणून फरुखशिर मरण पावल्यावर बाळाजी विश्वनाथ हा दिल्लीस राहिला होता, आणि त्याणें शेवटीं (इ०स० १७२० त) पूर्वींचा तह महम्मदशाहाकडून कायम करून घेतला. याप्रमाणें शाहूचा अधिकार मोगलांनीं कबूल केला, व तसेच त्यास दुसरे लाभ प्राप्त झाले, तेणेंकरून त्याचा प्रतिस्पर्ध्यांवर त्याचा पगडा बसला. याप्रमाणें बाळाजी विश्वनाथानें मरण्यापूर्वीं आंतील व बाहेरील अशा कोणत्याहि शत्रूंचें शाहूवर न चाले असा बंदोबस्त करून, मग तो स्वस्थ झाला, आणि पुढें इ०स० १७२० चा अकटोबर महिन्यांत निवर्तला.

बाळाजी विश्वनाथ याणें शाहूचें वर्चस्व स्थापन केलें. तो मरण पावला.

पूर्वीं मराठे लोक जी चौथाई व सरदेशमुखी घेत असत

बाळाजी विश्वनाथ याणें केलेलें महसुलाचा बंदोबस्ताचें अवडंबर.

ती केवळ चोरी होती, ती वरील तहांत जें बादशाहानें देणें दिलें तेणेंकरून कायदेसर झाली; त्यामुळें पूर्वीची जी जमाबंदी वसूल करण्याची शिस्त होती, तींत कांहींशी व्यवस्था करण्यास बाळाजी विश्वनाथ शक्तिमान् झाला. आतां दुसऱ्या जमीनदारांचा जमीनीवर चौथाई व सरदेशमुखी या हक्कांऐवजीं त्याणें मुलुकच तोडून घेतला नाहीं, व तसेंच जा देशांत त्यास दोन्ही हक्क होते, तेथें ते एकत्र केले नाहींत, व जेथें जमीनीचा साराहि मराठे लोकांचाच होता, तेथें त्यांत हे हक्क मिळवून दिले नाहींत; हें सर्व पाहूं गेलें असतां प्रथम विलक्षण दिसतें; परंतु आपल्या सरकारचे हक्क सरळ करून ठेवण्याचा त्याचा उद्देशच नव्हता. उभय पक्षांचा शक्तींचा तारतम्यावरून त्यास माहित होतें, कीं मराठे व मोगल यांमध्यें तंटा पडला असतां त्यांत आपल्या राजाचा फायदा होईल; यास्तव लहानशा मुलुकामध्यें स्पष्ट रीतीनें ठरावलेल्या हक्कांपेक्षां मोठ्या देशांत हात घालण्यास व तो हळू हळू ग्रासित जाण्यास निमित्त मिळण्याविषयीं तो विशेष उत्सुक होता. म्हणून तोडरमल्ल व मलिकंबर यांणीं जो कायम ठराविलेला महसूल त्यापैकीं चौथाईविषयीं तो आपला हक्क सांगूं लागला; परंतु त्या ठराविलेल्या महसूलापैकीं मुलुक गरीब होऊन गेल्यामुळें थोडाच वसूल होत असे. त्याणें हा ठराव भरपूर अमलांत आणिला नाहीं, तथापि तेणेंकरून त्याचा हक्क मोघम राहिला; याप्रमाणें मोगलांजवळील व्यवहारांत मात्र याणें गोंधळाची शिस्त घालून आपलें हित करून घेतलें असें नाहीं, तर निरनिराळ्या लोकांस चौथाया व सरदेशमुख्या देऊन, व

असें अवडंबर करण्याचा त्याचा उद्देश.

दुसऱ्याहि आंत आणखी खिस्ती पडत अशा नव्या बाबी शोधून काढून, त्याणें प्रत्येक परगण्याचा जमाबंदीची मराठे सरदारांत अशीच वांटणी करून दिली. त्या योगानें एकंदर वसूल वाढविण्याचें सर्वांस अगत्य पडलें; परंतु सरकारचें तंत्र सोडून राहण्याजोगा कोणीहि आटोपसर जिनगी बाळगून राहिला नाहीं. असे महसूलांचे असंख्य हिस्से झाल्यानें मराठे लोकांचा कारभारांत गडबडगुंडा झाला; तेणेंकरून बाळाजी विश्वनाथाचा, पूर्वींचा सारखाच, मनामध्यें होता तसा एक दुसरा परिणाम झाला. तो असा, कीं तसें झाल्यानें मराठे सरदार आपल्या ब्राम्हण मुतालिकांचा हातांत सांपडले गेले, त्यामुळें पेशव्याचा जातीचें प्राबल्य वाढून त्यास बळकटी आली. ही हिस्सेदारीची शिस्त साधारण होती, परंतु अगदीं सर्वत्रच होती असें नाहीं. मराठ्यांचा जुन्या मुलुकांत कित्येक सरदारांचा पूर्वींचा जमीनी होत्या, आणि तशाच लहानमोठ्या नेमणूका मेहरबानीखातर पुढेंहि करून देत असत. प्रत्येक सरदारास मुख्य राहण्याचा ठिकाणाकरितां एक दोन गांव लागत असत, आणि जे गांव जा सरदारांचा जन्मभूमीचे असत, अथवा जेथील ते वतनदार असत, तेथील सरकारी हक्क संपादन करण्याची सर्वांस इच्छा असे.

बाळाजी विश्वनाथ मरण पावल्यावर त्याचा मुलगा बाजीराव हा त्याचा मागून गादीवर बसला. *बाजीराव पेशवा याविषयीं.* त्याचा एवढा सर्व पेशव्यांमध्यें कोणी कर्त्ता झाला नाहीं, व शिवाजीखेरीज मराठे लोकांमध्येंहि झाला नाहीं. बाजीरावाचा बापाकडे जो अधिकार होता, त्या सर्वांचा यास एकदम उपभोग प्राप्त झाला नाहीं. राजाचा

त्याची साहसी कृति.

प्रतिनिधी हा त्याचा मोठा प्रतिस्पर्धी होता, व त्या दोन्ही कारभाऱ्यांचे अभिप्राय अगदीं एकमेकांविरुद्ध असून, त्यांचा कार्यभागहि विरुद्ध होता. मराठे लोकांची सत्ता आणखी प्रसृत झाली असतां वाईट परिणाम होईल अशी त्या प्रतिनिधीस मनापासून भीति होती, म्हणून शाहू राजाचें सांप्रतचें राज्य बंदोबस्तानें मजबूद करावें, आंतल्या आंत तंटे आहेत ते मोडावे, आणि उत्तरहिंदुस्थानांतील देश जिंकण्यापूर्वी दक्षिणेकडील मुलुकांत आपली सत्ता दृढतर बसवावी, असा तो सक्त भांडत असे. बाजीरावाचा विचार याहून शहाणपणाचा व धैर्याचा होता. त्याणें असें पाहिलें, कीं आपलें जें लुटारू घोडेस्वारांचें लश्कर आहे हें शत्रूंचा मुलुकांत फार उपयोगीं पडतें, परंतु तें घरीं ठेविलें असतां अगदीं बेकैद होईल; यास्तव एक लश्कर तयार करून सैन्याचा कोणी अधिकारी ठरविल्याशिवाय राज्याचा आंतील बंदोबस्त बराबर व्हावयाचा नाहीं. या हेतूनें उत्तरेकडील प्रान्तांत एकदम स्वारी करावी असा त्याणें उपदेश केला, आणि मोगलांचें राज्य हें मध्यावर तर अगदींच खराब झालें असून एरव्हींहि आंतून दुर्बल झालें आहे असें त्याणें दाखविलें. तो म्हणाला कीं " हें पोखरलेलें खोड अपण तोडूं या, म्हणजे त्याचा खांद्या आपोआप पडतील. " त्याणें हा विचार मोठ्या वक्तृत्वानें व औत्सुक्यानें राजास समजाविला, तेणेंकरून त्याचे सर्व संशय दूर झाले, आणि आपला झेंडा नर्मदेचा पलीकडे नेऊन लावण्यास मला परवानगी द्यावी असा जेव्हां बाजीरावानें आग्रह केला, तेव्हां शाहू राजास मोठें स्फुरण चढून तो म्हणाला कीं " तुम्ही तो हिमालयावर लावा. "

या वादांचा परिणाम असा झाला, कीं राजाचा दरबा-
रांत बाजीरावाचें वजन वाढलें, आणि प्रत्यहीं त्याचा मदतीची अधिकाधिक जरूर पडत चा-लली; तेणेंकरून सहजच त्याचें मानहि चढलें.

शाहूचा स्वभाव.

शाहूस बुद्धि कमी होती असें नाहीं; परंतु तो मुसलमानी जनानखान्यांत लहानपणापासून वाढलेला होता, त्यामुळें त्यामध्यें शरीराची बळकटी व बुद्धीचें चांचल्य हीं कमी झा-लीं होतीं. असें असून बाजीरावाचा जन्म छा-वणींत, व तेव्हांपासून तो राजकीय कामांत व वकालतीचा धंद्यांत चांगला तयार झाला होता, यामुळें त्याची चाल मराठे घोडेस्वारांप्रमाणें असून त्यामध्यें विशाल बुद्धि व पुष्कळ ज्ञान, अशीं होतीं. इतर ब्राम्हणांसारिखा तो थंडा नव्हता; त्याचा स्वभाव हौशी होता, व तो मोकळ्या मनाचा होता; मेहेनतीचें अथवा संकटाचें काम आलें असतां, तो कधींहि डगमगत नसे; आ-णि तो, कूच करून घोड्यावरून जात असतां, हातचा हातीं, कणसें चोळून दाणे काढून खाऊन गुजराण चालवित असे.

बाजीरावाचा स्वभाव.

उत्तरेकडील प्रांतांविषयीं त्याची मसलत होती तिला मोगललोकच स्वतः सहाय झाले. तो प्रकारः— असो-फजा याची मुबारिझ याजबराबर पूर्वीं सांगितलेली लढाई होण्यापूर्वीं थोडा वेळ, पादशाहानें माळवा व गुजराथ या दोहों सुभ्यांचीं कामें असोफजाकडून काढिलीं होतीं त्यांतून माळव्याचें काम राजा गिरिधर याजकडे सांगितलें होतें. जेव्हां दक्षिणेमधील लढाईकडेस लश्कर गुंतलें होतें, तेव्हां तो प्रांत हातीं राखण्यास त्यास अडचण पडली नाहीं;

परंतु जेव्हां बाजीराव स्वारी करून आला, तेव्हां राजा गिरिधरास आपल्या देशाचें रक्षण करणें कठीण पडलें. तिकडे गुजराथेंत असोफजाचा चुलता हमीद खान कारभार करित होता; तो स्वतः फार लढला, आणि शिवाय त्याणें लागलेंच मराठे लोकांस आपल्या मदतीस बलाविलें, आणि त्याबदल त्यांस आपल्या हातांतील मुलुकांत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क दिले. पुढें सरबुलंद खान, जास बादशाहानें तेथील सुभ्यावर नेमिलें होतें, त्याणें शेवटीं हमीदास हाकून लाविलें; तथापि पुष्कळ दिवस भांडण झाल्यावर त्यास वरील हक्कांबाबद केलेला करार कायम करावा लागला.

त्याणें गुजराथेचा सुभेदारापासून चौथाई मिळविली. इ० स० १७२५, हि० स० ११३८.

ते दोन्ही सुभे गेले असतांहि, या वेळीं असोफजाची सत्ता दक्षिणेंत चांगली बसली होती; तेव्हां आपले भयंकर शेजारी मराठे यांस जेरीस आणण्याचा यत्न करावा असें त्यास वाटलें. ह्मणून त्या वेळीं त्यांचीं आंतल्याआंत भांडणें लागलीं होतीं, ती संधि याणें पुनः साधिली. त्याणें प्रथम प्रतिनिधीकडे बोलणें लाविलें, आणि त्याचा द्वारानें तहाचा ठराव अगदीं जवळजवळ घाटित आणिला होता. त्यामध्यें असें ठरविलें होतें, कीं असोफजाचा नव्या राजधानीचा सभोंवतील देशावरील चौथाई व सरदेशमुखी, हीं मराठेलोकांशीं सोडून त्यांबदल कांहीं मुलुक तोडून द्यावा, आणि त्याणें मराठ्यांस वर्षाची अमुक रसद भरावी. परंतु आपल्या सरकारचे हक्क मोघम राखावे अशी बाजीराव याची शिस्त होती, ती तो सांमत विसरला नाहीं; आणि आपल्या

असोफजानें मराठे लोकांत कळ पेटविली.

जुन्या प्रतिस्पर्ध्यानें मध्यें हात घातल्यामुळें त्यास निःसंशय संताप येऊन तो ठराव अमलांत आणण्यास तो अगदीं प्रतिकूळ झाला. त्यामुळें वरील बोलण्यांनीं असोफजानें मराठे लोकांचा द्वेष मात्र वाढविला. त्याशिवाय दुसरा कांहीं त्यास लाभ झाला नाहीं.

पुढें त्याणें तसाच आणखी एक प्रयत्न केला, तो विशेष मोठा होता. त्याचा प्रकारः—शाहूचें दैव खुलल्यामुळें मराठ्यांचा गादीचा दुसरा वारीस संभाजी हा झांकून गेला होता, तथापि त्याणें आपल्या राज्याची गादी कोल्हापुर एथें स्थापिली होती, आणि तो आपल्या वंशाचें दक्षिणेकडील राज्य हातांत राखून सगळ्या राज्याविषयीं वारसा सांगतच होता. असोफजानें, त्याचा पक्ष विधिपूर्वक उचलिला असें न दाखवितां, मराठ्यांस आपल्या देशासंबंधी जी खंडणी द्यावयाची ती कोणास द्यावी, अशा संशयांत पडल्यासारखें ढोंग केलें; आणि उभय पक्षींचा लोकांस आपल्या हक्कांची शाबिदी दाखविण्याविषयीं सांगितलें. या त्याचा मागण्यानें शाहूस फार क्रोध आला. तो राग काढण्यास बाजीराव हें त्यास तयारच साधन मिळालें. पुढें पावसाळा संपतांच पेशव्यानें असोफजाचा मुलुकावर स्वारी केली, आणि प्रथम ब्ऱ्हाणपुरावर हल्ला केला; परंतु जेव्हां असोफजास संभाजी उघडपणीं मिळून ते दोघे त्या शहराचा मदतीस आले, तेव्हां बाजीरावानें आपली चाल फिरवून त्वरेनें गुजराथेवर घाला घातला, आणि त्या मुलुकांत जाळून मारून देश उध्वस्त करून, तो तसाच जलदीनें दक्षिणेंत परत आला. त्या वेळीं गुजराथेंतील चौथाई मोगलांनीं

त्याणें असोफजाव र हल्ला करून त्यापासून करार करून घेतले. इ० स० १७२७. हि० स० ११४०.

कायम केली नव्हती. दक्षिणेंत आल्यावर त्याणें असोफजाचा लश्करासभोंवतील देश ओस पाडिला, आणि मराठे लोकांचा नेहेमींचा उपायांनीं त्यास सामग्रीचा इतका तोटा पडला, कीं त्याला संभाजीचा संबंध सोडून आणखीहि कांहीं मराठे सरकारास देण्याचें कबूल करावें लागलें. याप्रमाणें बंदोबस्त करून

इ० स० १७२९, हि० स० ११४१। ४२.

माळवा प्रांत लुटण्याकरितां, व गुजराथेंतील चौथाई, जी पूर्वींचा सुभेदारानें दिली होती, ती सांप्रतचा सुभेदार सरबुलंद खान यापासून सक्तीनें कायम करून घेण्याकरितां बाजीराव नर्मदा उतरला.

शाहू व संभाजी यांची समजूत झाली.

बाजीराव उत्तरेस गेला असतां, पाठीमागें प्रतिनिधीनें संभाजीवर छापा घालून त्यास पराजित केलें, आणि शेवटीं कोल्हापुरासभोंवतील प्रदेश, जाची पश्चिमेकडील मर्यादा समुद्र, तो खेरीजकरून बाकी सर्व मराठी देशावर शाहूचा हक्क आहे, असें त्याकडून कबूल करवून तहनामा लिहून घेतला. वर सांगितलेला कोल्हापुराचा आसमंतात् भागचा प्रदेश हा मात्र त्याणें आपल्याकडेस ठेवावा,

इ० स० १७३०, हि० स० ११४२.

आणि राजा हा किताब घेऊन शाहूप्रमाणें वैभव भोगावें असा ठराव झाला. ही फत्ते केल्यामुळें प्रतिनिधीचें मान वाढलें; तथापि पेशव्याबराबर त्याचानें टिकाव धरवला नाहीं, तेव्हां मराठ्यांचा राज्यांत गोंधळ करण्यास असोफजास दुसरें कांहीं साधन शोधावें लागलें.

तो या शोधांत असतां त्यास दाभाडानामक जो मराठ्यांचा वंशपरंपरेचा सेनापति तो सांपडला, त्यास त्याणें

हातार्शी धरिलें. मराठे लोकांची सत्ता गुजराथेंत बसविण्यास दाभाडा हा मुख्य साधनीभूत होता; म्हणून आपल्या मेहेनतीचें फळ दुसऱ्यानें ( म्हणजे पेशव्यानें ) नेलें असें पाहून, त्यास संताप आला. दुसरें त्या वेळीं पेशव्याचा पगडा विशेष झाला असून, तो सर्व राज्यकारभार करित असे, आणि राजा मुळींच त्यांत हात घालित नसे, तेणेंकरून त्याचा द्वेष अधिकच वाढला. या वृत्तींनीं क्षुब्ध होऊन, आणि असोफजानें मजबूद कुमक करण्याचें वचन दिल्यावरून, दाभाड्यानें ३५,००० लोकांचें सैन्य जमविलें,आणि पेशव्याचा गुलामगीरींतून राजास सोडविण्याचा हेतु बाहेरून दाखवून तो दक्षिणेंत यावयास निघाला.

असोफजाच्या आणखी मसलती चालल्या. गुजराथेंतील दाभाडानामक एका मोठ्या मराठी सरदाराविषयीं.

तो पेशव्यास पदच्युत करण्याकरितां निघाला.

त्या वेळीं बाजीरावाजवळ त्याचा इतकी फौज नव्हती; परंतु जी होती, ती जुनी कसलेली होती; तेव्हां आपल्या विरुद्ध जो कट झाला आहे तो मोडण्याची तजवीज त्वरेनें केली असतां फायदा होईल, असें त्याणें पाहिलें. म्हणून असोफजा आपला अभिप्राय दाभाड्यास कळवी इतकी त्यास फुरसूद न देतां, तो नर्मदा उतरला, आणि गुजराथेंत शिरून दाभाड्यास बडोद्याजवळ गांठता झाला. त्याचे लोक कसलेले, आणि दाभाड्याचे तसे अनुभविक नव्हते यामुळें त्या लढाईत पेशव्याचा जय झाला; परंतु पुढें बाजीराव विचारानें व अल्पसंतोषीपणानें वर्तला. वरील लढाईत दाभाडा मरण पावला, तेव्हां याणें त्याचा मुलास

बाजीरावानें त्याचा पूर्वींचा डाव खेळून त्याचा पराजय करून त्यास मारून टाकलें.

इ०स०१७३१, एप्रिल; हि० स०११४३, शवाल.

राजाचा नावानें त्याचें काम दिलें, आणि गुजराथेंतील मराठे लोकांचे सर्व हक्क त्याचा स्वाधीन ठेविले; परंतु उत्पन्नाचा निमे हिसा त्याणें पेशव्यांचा मार्फत सरकारास द्यावा, असा ठराव केला. तो मुलगा अगदीं लहान होता, म्हणून त्याचा आईस त्याची पालनकर्ती नेमली; आणि त्याचा बापाचा जुना आश्रित **पिलाजी गाइकवाड** याणें त्याचा वतीनें गुजराथेचा कारभार करावा असें ठरविलें. सांप्रत जा गायकवाडाचा वंशाचें राज्य गुजराथेंत चालत आहे, त्याचा हा मूळ पुरुष होय.

बाजीरावानें गुजराथेचा बंदोबस्त अल्पसंतोषीपणानें केला.

मराठ्यांमध्यें जीं दुसरीं मोठीं कुळें झालीं त्यांचीहि उत्पत्ति या सुमारास थोडा वेळ पूर्वीं झाली. ती अशीः— जेव्हां बाजीराव माळव्यांत लुटीचा स्वाऱ्या करूं लागला, तेव्हां **उदाजी पंवार, मल्हारराव होळकर**, व **राणोजी शिंदा**, या तिघांस त्याणें फोजेंत सरदाऱ्या दिल्या. उदाजीचा पेशव्यांशीं संबंध होण्यापूर्वींच तो सरदार होता. त्याणें पुढें लवकरच गुजराथ व माळवा यांचा सरहद्दीवर धारचा प्रांत संपादन केला; परंतु त्याचे दुसरे साथी किंवा त्यांचे वंशज यांचा इतकी त्यास कधींहि सत्ता प्राप्त झाली नाहीं. होळकर हा पुण्याचा दक्षिणेस निरेवर एका गांवीं धनगर होता; आणि शिंदा हा मूळचा साताऱ्याजवळील संभावित कुळांतील होता, परंतु त्याची इतकी गरीबी आली होती, कीं तो बाजीरावाजवळ हुजुऱ्या होऊन राहिला होता. हे व या वेळचे दुसरे सरदार, हे, पूर्वींचांप्रमाणें, आपल्या तैनातीचे लोक घेऊन पुंडपाळेगारांसारखे लढत नसत; परंतु ते

पंवार, होळकर व शिंदे, यांचा वंशांची उत्पत्ति.

पेशव्याचा पदरचे सरदार असून पेशव्याचा लश्कराचा टोळ्या त्यांचा हाताखालीं लढत, व ते पेशव्याचा हुकुमतीचे असत.

त्या वेळीं असोफजाचा मसलतींबद्दल त्याचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य बाजीरावास होतें; परंतु आपला आपसांमध्यें नीट बनाव असला असतां उभय पक्षांचा फायदा आहे असें दोघांसहि समजूं लागलें. बाजीरावानें पाहिलें, कीं आपण इतक्या लांबीचा पल्ल्यावर स्वाऱ्या करितों, तेव्हां जर असोफजासारिखा शक्तिमान् व कपटद्वेपी मागें शेजारास असला, तर आपल्या मूळठिकाणचा महत्वास धक्का पोंचेल; आणि असोफजा यास भीतीचीं दुसरीं कारणें असून त्यास असेंहि वाटे, कीं आपण पादशाहाचा अम्मल मानित नाहीं, म्हणून सूड उगविण्याकरितां तो दक्षिणेंतील सरसुभ्याचें काम पेशव्यास देईल, आणि तो अधिकार पेशव्याचा हातांत आला असतां, तो उगाच बसणार नाहीं. यास्तव बाजीराव उत्तरहिंदुस्थानांतून परत आल्यावर लवकरच त्या दोघां आगंतुकांनीं गुप्त रीतीनें तह केला; त्यांत असा ठराव केला, कीं बाजीरावानें माळव्यांत स्वारी करून जावें, पादशाहाचा बाकी राहिलेला मुलुक जिंकून घ्यावा, आणि त्यास असोफजानें मदद करावी.

बाजीराव व असोफजा यांचा आपसांत बंदोबस्त झाला.

या वेळीं नर्मदेपलीकडील मुलूकावर नजर करण्यास बाजीरावास दुसरीं सबळ कारणें होतीं. तीं अशीं:— तो गुजराथेंतून गेल्यानंतर दिल्लीचा दरबारानें चौथाई देण्याचा करार मंजूर करण्याचें लागलेंच नाकबूल केलें; सरबुलंद खानास तेथील सुभ्यावरून काढून टाकिलें; आणि

मेवाडचा राजा अभिसिंग गुजराथचा सरसुभेदार झाला.

तें काम जोदपुरचा राजा अभिसिंग यास सांगितलें. अशा स्वतंत्र राजास असें काम कोणत्याहि वेळीं सांगणें वाजवी नव्हतें; तशांत अभिसिंग हा आपला बाप अजीतसिंग यास मारून आपण अधिकार पावला होता, व तो फार खराब चालीचा होता, यामुळें तो विशेष विश्वासानें काम करील असें, धोरण दिसत नव्हतें. परंतु त्यास जें सामर्थ्य होतें, तें मोगल सरकारास नव्हतें, त्यामुळें तो आपल्या बळानें सरबुलंद खान यास हाकून लाऊन, मराठे लोकांबराबर लढून त्या प्रांतांचें रक्षण करण्याजोगा दिसत होता.

इ० स० १७३०.

या दोहोंतून प्रथमचें (सरबुलंदास हाकून लावण्याचें) काम त्याणें एका लढाईत पार पाडिलें. दुसरें तसें साधण्याजोगें सोपें नव्हतें. कारण जरी त्याणें पिलाजी गाइकवाडास बडोद्यांतून हाकून लाविलें तरी अद्यापि त्यास त्याची विशेष धास्ती होती. तेव्हां दुसरा कांहीं इलाज नाहीं असें पाहून त्या अविचारी अभिसिंगानें मारेकरी घालून त्याचा प्राण घेतला. या घोर कर्मानें मराठ्यांचें बळ कमी न होतां, उलटा त्यांचा संताप मात्र अधिक झाला. पिलाजीचा भाऊ व मुलगा हे पूर्वापेक्षां पुष्कळ सैन्य घेऊन आले, आणि स्वतः गुजराथप्रांत उध्वस्त करून, व सभोंवारचा पहाडांतील भील व कोळी, या लोकांस उठवून, सर्व प्रांतांत बंडावा व धुमाळी उडवून देते झाले. तो राजपूत राजा या बखेड्यांत अगदीं गुंतून गेला असतां, त्या गायकवाडांनीं त्याचा वतनी मुलुकावर हल्ला केला, आणि थेट जोदपुराचा जवळजवळ चाल केली.

त्याणें पिलाजी गाइकवाड यास मारेकरी घालून मारिलें.

इ० स० १७३२.

त्याचा मराठ्यांनीं सूड उगविला.

हा हल्ला आल्यावरून, व मराठे लोकांचा माळव्यांतील लश्कराचें भयप्रद रूप पाहून, अभिसिंगास आपल्या स्वतांचा मुलुकास जावें लागलें, आणि त्याणें जो मुतालिक आपल्या मागें गुजराथेंत ठेविला होता त्याचानें मराठे लोकांपुढें टिकाव धरवला नाहीं.

माळव्यामध्येंहि मराठ्यांचा तसाच भरभराट झाला होता. त्या प्रांताचा सुभेदार गिरिधरसिंग हा इ० स० १७२९ त बाजीरावाचा सरदारांशीं लढाई झाली तींत पडला. त्याचा पुतण्या दयाराम गादीवर बसला, आणि हा वेळपर्यंत त्याणें भली टक्कर दिली होती; परंतु पेशव्याचा भाऊ चिमणाजी याणें त्याचा पराजय केला, व त्या लढाईत तो मारला गेला.

अभिसिंग मेवाडास परत गेला.

इ० स० १७३२.

जेव्हां (इ० स० १७३२ त) बाजीराव माळव्यांत शिरला, तेव्हां तेथील कारभार महम्मद खान बंगश नामें एका अफगाण सरदाराचा हातांत होता. त्या सरदाराकडे अलाहबादेचाहि सुभा होता. त्याचा दोन प्रांतांचा मध्यें बुंदेलखंडांतील एका राजाचा मुलुक होता, त्याजबरोबर तो लढाई करित होता. तो राजा अगदीं पेंचला, तेव्हां त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविलें. बाजीरावानें त्याचें आमंत्रण लागलेंच कबूल केलें, आणि अकस्मात् महम्मद खानावर पडून थोडक्याच वेळांत त्यास एका किल्ल्याचा आश्रय धरणें प्राप्त केलें. त्यास मदत करण्यास दिल्लीचें सरकार असमर्थ होतें. तेव्हां जर त्याचा कुटुंबाचे लोक प्रयत्न न करिते, तर त्यास अगदीं करार न करितां बाजीरावास

बाजीरावाची माळव्यांत फत्ते झाली.

शरण जावें लागलें असतें. त्याचा बायकोनें आपल्या रोहिलखंडांतील स्वदेशीय लोकांस आपला तोंडावरचा पदर पाठवून दिला (आणि सुचिवलें कीं ही माझी लाज राखण्याची वेळ आहे.) अफगाणलोकांचें सत्व जागृत करण्यास याहून विशेष उत्तेजक दुसरें कांहीं नाहीं. या बलावण्यानें जे लोक जमा झाले, त्यांचा पुढारी याचा मुलगा होऊन गेला, आणि आपल्या बापास संकटांतून मुक्त करून अलाहबादेस पोंचविता झाला.

त्याणें रोहिलखंडांत मुलुक मिळविला.

याप्रमाणें त्याचा शरीराची सुटका झाली, परंतु तेणेंकरून त्याचा प्रांताचें कांहीं हित झालें नाहीं. बाजीरावानें आपणास मदत केली, त्याबदल बुंदेलखंडचा राजानें त्यास यमुनेवरील झांशी हा परगणा दिला, आणि आपल्या मरणानंतर मागें मराठ्यांस बुंदेलखंडांत हक्क देऊन ठेविले; त्यांमुळें कालेंकरून तो सर्व देश मराठ्यांनीं घशाखालीं उतरला. महम्मद खानाचा पराजय झाल्यामुळें बादशाहानें त्यास माळव्याचा सुभ्यावरून काढलें, आणि अंबरचा राजा जयसिंग यास तो प्रांत दिला.

माळव्याचा सरसुभेदार दुसरा राजा जयसिंग.

या राजास विद्येची प्रीति असे, त्यामुळें राजपूतलोकांमध्यें जे अति विख्यात लोक होऊन गेले त्यांमध्यें याची गणना होत्ये; परंतु यामध्यें निश्चय नव्हता. मराठे लोकांशीं त्याचा वंशपरंपरेचा संबंध होता, तथापि त्याणें मोगललोकांचा विश्वासघात केला नाहीं. परंतु शेवटीं त्यांस लढून हटविणें हें दुस्तर पाहून, त्याणें आपल्या पूर्वींचा लगतीनें लवकरच आपसांत बंदोबस्त केला. त्यापासून दुसऱ्या वर्षीं असा

परिणाम झाला, कीं त्याणें बादशाहाचा आंतून सल्ला घेऊन तो प्रांत पेशव्यांचा हवालीं केला, आणि त्यांणीं बादशाहाचा वतीनें तेथें कारभार करावा, असें ठरविलें. बाजीरावास देणग्या दिल्या असतां, तो निरंतर स्वस्थ राहील, अशी जर त्या मोगलांचा मनांत कल्पना आली असली, तर त्यावरून असें समजलें पाहिजे, कीं बाजीरावाविषयीं व त्याचे जातभाई मराठे लोक यांविषयीं त्यांस विशेष माहिती नव्हती. कारण वरील देणग्या मिळाल्यानंतर बाजीरावानें कांहीं वेळ आपलें लक्ष दक्षिणेचा आंतील व्यवस्थेकडे लाविलें; तथापि माळवा व गुजराथ या प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी लेखीं करून द्यावी हें बोलणें त्याणें पुढें चालविलेंच होतें, आणि आपल्या मागें जे सरदार ठेविले होते, त्यांस आग्र्यापर्यंत हल्ले करण्याविषयीं त्याणें आज्ञा केली होती. इकडे मोगललोकहि तयारी दाखवीत; मोठे हावभाव करीत; आणि ओजड व विसंगत अशा फौजा पाठवीत, त्यांचा कर्तीनीं उलटे ते शत्रूंचा उपहासास्पद होत असत.

इ०स० १७३४. त्याणें तो प्रांत मराठ्यांचा हवालीं केला.

कांहीं वेळानंतर बाजीरावानें पुनः स्वतः बोलणें सुरू केलें, आणि तें चालत असतां जसजसें त्याचा शत्रूंचें दौर्बल्य अधिक उघडें पडत चाललें तसतशीं त्याचीं मागणीं वाढत चाललीं; आणि शेवटीं आपणास माळवा प्रांत व चंबळानदीचा दक्षिणेकडील सर्व प्रांत व मथुरा, प्रयाग, व काशी हीं पवित्र शहरें; एवढी जाहगीर द्यावी असा तो आग्रह धरून बसला. त्यास उघड रीतीनें प्रतिबंध करण्याचे बादशाहाचे सर्व प्रयत्न फुकट गेले, तथापि वरील बोलणें कबूल

बाजीराव याणें आपलीं मागणीं वाढविलीं. इ०स० १७३६.

करण्याजोगी त्याची केवळ नातवानी आली नव्हती. त्याणें मराठे लोकांस लहानसहान भक्ष्य देऊन त्यांची क्षुधा तृप्त करण्याचा यत्न चालविला, आणि त्यांणींहि आपला मोठा उद्देश मागें न टाकितां त्या देणग्या कबूल केल्या. वरील देणग्यांत राजपूतलोकांपासून कर घेण्याचा हक्क व असोफजाचा मुलुकावरील खंडणी वाढविण्याचा हक्क हे दोन पेशव्यांस दिले. हे देण्याचें कारण त्या दोन्ही राज्यांशीं मराठे लोकांचें वैमनस्य पाडावें, हा निःसंशय हेतु असेल; आणि तोहि केवळ तडीस गेला नाहींसा नाहीं. कारण इकडे असोफजास असें वाटूं लागलें, कीं आपली सांप्रतची शिस्त हद्दीचा बाहेर गेली. याजमुळें जसें पूर्वीं बादशाहाचा शत्रुत्वापासून भय असे, तशीच सांप्रत त्याचा दौर्बल्यापासून भीति उत्पन्न होऊं लागली. त्याच वेळीं दिल्लीचा दरबारानेंहि त्याशीं मोठ्या तत्परतेनें बोलणें लाविलें, आणि पूर्वीं जो त्यास बंडखोर असें समजत तशी दृष्टि न ठेवून, जें विघ्न आपणावर येऊन बेतलें आहे, त्यापासून आपणास सोडविण्यास शक्तिमान् असा हा आपला स्वाभाविक मित्र होय, अशी त्याजवर तें दरबार दृष्टि करूं लागलें.

बादशाहानें मराठे लोकांस आणखी देणग्या दिल्या.

असोफजा भयाभीत झाला.

वरील गोष्टीपासून असा परिणाम झाला, कीं त्यानंतर बादशाहानें असोफजास आश्रय देण्याचा निश्चय केला; परंतु तो या विचारांत गुंतला असतां इकडे बाजीराव राजधानीवर चाल करित होता. तो आग्र्यापासून वीस कोशांवर आला, तेव्हां त्याचें कांहीं लश्कर घेऊन मल्हारराव होळकर

त्याची व बादशाहाची एकी झाली.

यमुनेपलीकडील प्रांतांत लूट करित होता. त्या वेळचे सुभेदार लोक हे बहुधा आपआपले प्रांत धरून बसत असत; परंतु सादत खान नामें अयोध्या प्रांताचा सरसुभेदार होता, तो ती वृत्ति सोडून जवळील प्रांताचें संरक्षण करण्याकरितां आपल्या प्रांतांतून निघाला, आणि मल्हारराव होळकर वरील लुटीचा कामांत पडला असतां, त्यास हटवून बाजीरावाचा मुख्य फौजेकडेस घालविता झाला. ही लहानशी माघार आली, तिचा मुसलमानांनीं फुगवून मोठा जय मानिला, आणि त्याबराबर सर्व मराठ्यांचें लश्कर दक्षिणेंत परत गेलें अशा गप्पा उठविल्या. तेणेंकरून ती काळिमा पुसून टाकण्यास, आणि "आपण अद्यापि हिंदुस्थानांत आहों" असें बादशाहास दाखविण्यास बाजीरावास आवेश मात्र आला. त्यांशीं युद्ध करण्याकरितां वजीर कमरुद्दीन खानाबराबर बादशाहानें एक लश्कर पाठविलें होतें तें स्वस्थपणीं मथुरेजवळ पडून राहिलें असतां, बाजीराव अकस्मात् यमुना सोडून निघाला, आणि मोगलांचा लश्कराचा उजव्या बाजूपासून सुमारें ८७ कोश जाऊन, तेथून अकटोविकट मोठ्या मजला करून एकदम दिल्लीचा दरवाजाजवळ उभा राहिला.

बाजीराव दिल्लीसमोर आला. इ० स० १७३७, हि० स० ११४९.

बाजीराव आल्यामुळें जो कल्होळ झाला, त्याची सहज कल्पना करवेल, परंतु त्याचा उद्देश बादशाहास भिवविण्याचा होता, चिडविण्याचा नव्हता; म्हणून त्याणें जास्ती हात टाकिला नाहीं, आणि शहराचा वेशीबाहेरील वसाहतींचा नाश आपल्या लश्कराचा हातून न व्हावा असें

करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा अनुयायी लोकांनीं जो धुमाकूळ केला, तो याचानें पुरा बंद करवला नाहीं; म्हणून तें निमित्त करून तो शहरापासून कांहीं अंतरावर जाऊन राहिला. मराठ्यांनीं ही माघार घेतल्यामुळें त्यांजवर हल्ला करण्यास मोगल उद्युक्त झाले; परंतु त्यांचें भारी नुकसान करून मराठ्यांनीं त्यांस परत शहरांत हांकून लाविलें. या सुमारास वजीर कमरुद्दीन खान यास सादत खान येऊन मिळाला होता, आणि ते पादशाहाचा कुमकेस राजधानीकडे चालले होते. तेव्हां आपण आतां परत दक्षिणेंत जावें हें शहाणपण आहे असा बाजीरावानें विचार केला, कारण असें केल्यानें, मराठे लोकांचा लढाईविषयीं नियमांप्रमाणें, त्यांत कांहीं बेअब्रू होत नाहीं अशी त्याणें मनांत कल्पना आणिली. त्या वेळीं कांहीं खालचा उतरणावर यमुना उतरून तिचा व गंगेचा मधील (अंतरवेदी) प्रांतांत लूट करावी असें त्याचा मनांत होतें; परंतु पावसाळा जवळ आला, आणि असोफजा चढून आला, त्यामुळें, व दक्षिणेंत दुसऱ्या कांहीं कारणामुळें यास जाण्याचें जरूर असल्यावरून, त्याणें एकदम तिकडे जाण्याचा निश्चय केला. बाजीराव परत निघून गेल्यावर असोफजा दिल्ली एथें आला; त्यास सर्व राज्यांतील फौज जमविण्याविषयीं बादशाहानें भरपूर अधिकार दिला, आणि त्याचा वडील मुलगा ग्यासुद्दीन यास माळवा व गुजराथ या प्रांतांचीं कामें दिलीं; परंतु त्या वेळीं दिल्लीचा राज्याची शक्ति इतकी खरजांत आली होती, कीं असोफजास बादशाहानें जितकीं साधनें दिलीं,

तो परत गेला.

इ० स० १७३७, हि०स० ११५०.

असोफजा दिल्ली एथें आला.

तितक्यांचाहि उपयोग करून त्यास आपल्या खुद्द पतकास चौतीस हजारांहून अधिक फौज जमा करतां आली नाहीं.

जरी त्याजवळ विशेष फौज नव्हती, तथापि त्यास एक उत्तम तोफखान्याचा सरंजाम बादशाहानें दिला होता, आणि अयोध्येचा सुभेदार सादत खान याचा पुतण्या सफ्दरजंग याचा हाताखालीं कांहीं शिलकी फौज त्याचा मदतीकरितां दिलेली होती. या फौजेनिशीं तो शिरोंज एथें निघून गेला, तों इकडे बाजीराव एका फौजेनिशीं नर्मदानदी उतरला. तींत ८०,००० लोक होते, असें त्याणें वर्णन केलें आहे, व ती फौज असोफजाचा फौजेहून बहुधा मोठी असावी असें संभवतें.[3] इतकी उभय पक्षांचा फौजांत तफावत होती, म्हणून मोगलांचा सरदारानें आपला पाय मागें काढावयाचा नव्हता; कारण समोर रणभूमीवर उभें राहून मराठे लोकांनीं कधींहि भ्यावयाजोगी अशी लढाई मारली नव्हती. तसेंच युद्धप्रसंगाचा आरंभीं वर्चस्वाचा आव घालणें हें दुसरा कोणीहि शत्रु असता तरी आवश्यकच होतें: त्यांतहि मराठे लोकांजवळ त्याविषयींची अधिकच अवश्यकता होती. तसें न करितां असोफजा याणें बहुधा आपल्या तोफखान्यावर भरवसा ठेवून, व आपल्या स्वभावाप्रमाणें आणि वयोवृद्धपणामुळें सावधगिरी राखून भोपाळचा किल्ल्यानजीक

तो बाजीरावावर चालून गेला.

(३) 'लाख फौज' ह्मणजे १,००,००० फौज असा अर्थ व्हावा; परंतु मराठे लोकांचा बोलण्याचा रूढीप्रमाणें दहा किंवा पंधरा हजार लढाऊ लोक असा बहुधा या शब्दांचा अर्थ होतो.

इ० स० १७३८, जान्युआरि; त्यावर बाजीरावानें भोपाळानजीक हल्ला केला;

चांगल्या जाग्यावर ठाणें धरून तेथें शत्रूंचा हल्ल्याची वाटपाहत राहण्याचा निश्चय केला. परंतु अशा शत्रूशीं वरील जाग्याचा मजबूदीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण मराठे लोकांनीं त्यासभोंवतील देश उध्वस्त केला, त्यास दाणा वैरणीचा तोटा पाडला, त्याचा छावणीचा बाहेर जी टोळी जाई तिजवर ते हल्ले करूं लागले, आणि त्याचा व त्याचा शिलकी फौजेमधील रस्ता बंद पाडिते झाले.

बाजीरावाचा अशा कृत्यांनीं जे परिणाम झाले तींहींकरून असोफजा इतका तिडून गेला, कीं त्यास महिनादीडमहिन्यानें उत्तरेस परत हटून जावें लागलें. त्याचा बैलबांडा पुष्कळ नाहींसा झाला होता, आणि त्याणें भोपाळ एथें आपलें बारबरदारीचें सामान जरी ठेविलें होतें, तथापि त्याजबराबर भारी तोफखाना न्यावयाचा राहिला होता. या कारणामुळें त्याची गति मंद झाली, त्यांतहि मराठे लोकांकडून त्यास आणखी हरकत झाली. त्याचा तोपखान्यामुळें ते सर्व फौजेवर हल्ला करण्यास धजत नसत, तथापि ते बाण मारून त्यास उपद्रव देत; आणि आपल्या घोडेस्वारांनिशीं त्याचा पिछाडीचा मागें टपून राहत. याप्रमाणें दररोज दीड दोन कोश अशीं कांहीं

आणि बादशाहाचा तर्फेनें पुष्कळ देहेनग्या करवून घेतल्या. इ० स० १७३८, फेब्रुआरि; हि० स० ११५०, रमझान.

दिवस कूचें करून त्यास आपल्या नशीबानें आणलेली हार कबूल करून पेशव्याबराबर तह करावा लागला. या ठरावांत त्याणें माळव्यासुद्धां नर्मदेपासून चंबळेपर्यंत सर्व देश पेशव्यास द्यावा, आणि या देण्यास बादशाहाची मंजूरी मिळविण्याकरितां

व पन्नास लाख रुपये मिळविण्याकरितां चालेल तितका प्रयत्न करावा, असें त्याणें ( म्हणजे असोफजानें ) कबूल केलें.

नंतर असोफजास बाजीरावानें परत दिल्लीस जाऊं दिलें, आणि त्याणें जिंकिलेला मुलुक हस्तगत करून घेतला; परंतु असोफजानें कबूल केलेली मंजूरी बादशाहाकडून येण्यापूर्वीं केव्हां केव्हां सृष्टीवर जे मोठे भयंकर उत्पात होत असतात, व जे झाले असतां, कांहीं वेळपर्यंत, दुसऱ्या सर्व गोष्टींविषयीं लोकांस बेसावध करून टाकतात; तसा एक उत्पात होऊन वरील बराबर्द तितकीच बंद राहिली. त्या उत्पाताचा प्रकारः—

नादिरशाहाची स्वारी.

पूर्वीं दिल्लीचा राज्याची जशी दुर्बल स्थिति होऊन तैमूरलंग व बाबर हे लोभाविष्ट होऊन हिंदुस्थानांत आले होते, तसेंच तें राज्य सांप्रत मोडकळीस आलें होतें, आणि इराणदेशांत कांहीं बिना घडून आल्यामुळें त्या देशांतून वरील हल्ल्यांप्रमाणें एक हल्ला आला; त्याची हकीकतः—

इराणदेशांतील पूर्वींचें वर्तमान.

एशियाखंडांतील राजांचा वंशाची कारकीर्द बहुधा दोन शें वर्षेंपर्यंत चालत्ये; तितकी मुदत सफवी वंशाचा बादशाहांनीं राज्य केलें. नंतर त्यामध्यें बिघाड होऊन त्या वंशाचा क्षय होत चालला होता; शेवटीं त्या राजांस कंदाहारचा अफगाणलोकांनीं पदच्युत केलें.

पूर्वीं[४] काबूलाचा ईशान्येकडील अफगाणलोकांविषयीं

---

(४) भाग १ पृष्ठ ४७७ पाह.

पश्चिमेकडील अफगाण-लोकांविषयीं.

वर्णन करण्यांत आलें आहे. सांमत सफवी वंशाचा घालमेलींत जे अफगाणलोक पुढारी होते, ते पश्चिमेकडील प्रदेशांतले असून पुष्कळ गोष्टींनीं ईशान्येकडील लोकांपासून भिन्न आहेत.

त्यांचा देश उंचं सपाट जमीनीवर आहे. त्याचा पूर्वेस सुलेमानचे पर्वत आहेत, व त्यांपलीकडे सिंधुनदाचें तळवट आहे. उत्तरेस तशीच पहाडांची ओळ आहे, तिला प्राचीन काळीं काकेशस असें ह्मणत असत. वक्षूनदी व क्यास्पियन समुद्र यांमधील जो सपाट प्रदेश आहे तो या पर्वतांहून नीच आहे. या देशामधील हिरातेचा पश्चिमेकडील प्रदेश इराणी लोकांकडेस आहे, आणि पूर्वेकडील अफगाणलोकांकडे आहे.

या प्रांतांत पिकाऊ मैदानें आहेत, व त्यांतून अतिशय विस्तृत जीं आहेत त्यांवर काबूल, गझनी, कंदाहार, आणि हिरात हीं शहरें आहेत; परंतु बहुतेक भाग शेतकीस निरुपयोगी असून, तंबूंत राहणाऱ्या मेंढराख्यांनीं भरलेल्या अशा उंच ओळींचा आहे. त्या लोकांची राज्यरीति व स्वभाव ईशान्येकडील अफगाणांचा प्रमाणेंच असून, हे, दंगेखोरी व कज्जेदलालपणा, यांत मात्र त्यांहून बरेच कमी आहेत. या मेंढराख्यांचा प्रांतांतील अफगाणलोकांत मिसळ नाहीं; तथापि शहरांसुद्धां, सपाटीवरील लोकांचा मोठा भरणा ताजिक लोकांचा आहे. हे फारसी बोलतात, व इराण आणि मावरुल्नहर या देशांत अशा जागीं राहणारे

---

(५) काबूल शहर हें समुद्राचा सपाटीपासून ६,००० फूट उंच आहे.

जे लोक आहेत, ते व हे लोक एकच आहेत.

पूर्वीं सपाट मुलुक मात्र हिंदुस्थान व इराण एथील राजांनीं जिंकिला होता; परंतु अफगाणलोक स्वतंत्र राहिले होते. तथापि जे लोक वरील दोन मोठ्या राज्यांचा नजीक होते, त्यांवर त्यांचा कांहीं शह निःसंशय होता. पश्चिमेकडील जातींत खिलूजी व अब्दाली हे सर्वांत मोठे होते; त्यांत खिलूजी कंदाहारासंभोवतालचा प्रांतांत राहत असत, आणि अब्दाली लोकांची मूळची जागा घोरचा पर्वतांत होती, परंतु मुख्यत्वेंकरून जा काळचा इतिहास चालला आहे, त्या वेळीं ते हिरातासभोंवतील देशांत राहत होते. हे हमेशा वादीमतिवादी असत व त्यांचा परस्परांशीं वारंवार लढाया होत.

खिलूजी ऊर्फ घिलजी लोकांविषयीं.

अब्दाली ऊर्फ दुराणी लोकांविषयीं.

सफवी वंशाचा शाहहुसेननामक शेवटचा बादशाहाचा कारकीर्दींत खिलूजी लोकांनीं इराणदेशांतील राजास फार त्रास दिला; तेणेंकरून त्यांजवर मोठी स्वारी करण्यास तो बादशाह उद्युक्त झाला, आणि गुर्गीन खान नामें जार्जिया प्रांताचा मांडलिक राजा, जो ख्रिस्ती धर्म सोडून मुसलमान झाला होता, त्यास वीस हजारांवर फौज देऊन कंदाहारावर पाठविता झाला. त्या लश्करासमोर त्याचा शत्रूस उभें राहण्यास सामर्थ्य नव्हतें. परंतु इराणी लोकांचें दास्यत्व त्या खिलूजी

खिलूजी लोकांचें बंड.

६ सत्राव्या शतकाचा आरंभाचा सुमारें, उझ्बेगांपासून आपलें रक्षण करावें ह्मणून, अब्दाली लोकांनीं इराणचा बादशाहास कर देणें कबूल केलें होतें.

७ यांस सांप्रत दुराणी ह्मणतात.

लोकांस इतकें जाचित असे, कीं त्यांणीं अल्प काळांतच तें सोडून टाकण्याबद्दल होईल तें जोखम सोसण्याचा निश्चय केला. त्यांचा वंशपरंपरेचा मुख्य सरदार मीर वैस नामें होता. तो शहाणा व साहसी होता, आणि त्यास इराणचा राज्याची दुबळी स्थिति चांगली माहीत होती. त्याणें, त्यांचा पुढारी होऊन, सावधगिरीनें व त्याच प्रमाणें धीटपणानें लढाई चालविली; कंदाहारावर छापा घालून तें घेतलें; आसमंतात् भागांतील इराणी लोकांस हाकून लाविलें; आणि आपल्या लोकांचा मूळदेश व हे नवीन मिळविलेले प्रांत मिळून एक स्वतंत्र राज्य केलें. हा पराक्रम त्याणें इ०स० १७०८ त केला; तेव्हांपासून इराणी लोकांनीं कंदाहार परत घेण्यास लागोपाठ प्रयत्न केले, त्यांतून एका समयीं त्यांस अब्दाली लोकहि सहाय होते. इ० स० १७१६ त ते अब्दाली लोक खिलूजी लोकांस मिळून इराणी लोकांचा सन्मुख झाले, आणि हिरात घेऊन खुरासानप्रांताचा इराणदेशाकडील भाग सर्व लुटून टाकिते झाले. हें झालें, तथापि त्या दोन्ही जातींचा लोकांचे परस्परांशीं कलह चाललेच होते; त्यांचा फुटीमुळें इराणी लोकांचा फायदा होऊन इ० स० १७२० पर्यंत ते दोघांवरहि शस्त्र चालवित होते. मग इराणदेशांत लढाई चालवून ज्या सरकारानें आपणास व आपल्या रयतेस छळिलें त्याचें बीज एकदम नाहींसें करावें असा खिलूजी लोकांचा सरदारानें मोठा धीटाईचा निश्चय केला.

इराणदेश खिलूजी लोकांनीं घेतला.

पूर्वीं सांगितलेला खिलूजी लोकांचा मीर वैस नामें सरदार इ० स०१७१५ त मरण पावला. त्यामागून प्रथम त्याचा भाऊ गादीवर बसला, परंतु फार दिवस गेले नाहींत इतक्यांत त्याचा मुलगा

महमूद याणें राज्य बळकाविलें, आणि त्याणेंच इराणदेशावर स्वारी करण्याचा बेत घातला. यापूर्वींच अब्दाली लोकांनीं एका मोठ्या लढाईंत इराणी लोकांचा पराजय केला होता. सांप्रत त्या अब्दाली लोकांनीं मेशूहद शहरावर येण्याचा आव घातला, आणि त्या वेळीं वक्षुनदीकडून ऊझबेग हल्ले करूं लागल्यामुळें त्या अब्दाली लोकांची गति अधिक झाली.

इराणदेशाचा वायव्येकडील भागावर काकेशसपर्वतामधून लेसगीसलोकांनीं येऊन स्वारी केली होती; परंतु इराणचा सरकारचा वाईट वर्तणूकेमुळें जितकें तें राज्य दुर्बळ झालें, तितकें परराज्याचा हल्ल्यांनीं झालें नाहीं.

वर सांगितलेल्या बेतानें महमूद २५,००० लोकांनिशीं कंदाहाराहून निघाला. तो प्रथम किर्मान एथें जाऊन तेथून येझूद एथें गेला, आणि तेथून थेट इस्फहानावर चाल करिता झाला. त्या राजधानीचा नजीक गुल्नाबाद एथें एक फार मोठी फौज त्यास आड आली; तिची सामानसरंजामाची तयारी उत्कृष्ट असून तिचा बराबर २४ तोफा होत्या; परंतु पूर्वीपेक्षां इराणी लोकांची हिम्मत कमी झाली

---

८ यापूर्वीं कांहीं वेळपर्यंत अब्दाली लोकांचरावर लढण्याकरितां याची इराणचा पादशाहाशीं तूर्तातूर्त दोस्ती झाली होती, व किर्मानप्रान्त याचा ताब्यांत आला होता.

९ ते इराणी शिपाई टवटवीत व देखणे दिसत होते, आणि त्यांचा निजावयाचा तंबूंपासून तों त्यांचा बसावयाचा लठ्ठ घोड्यांचा सोनेरी व मिनेदार सामानापर्यंत सर्व उमदें व छांदार होतें. असें असून त्यांचे शत्रु अफगाण यांस आछादनास एक तंबूहि नव्हता; त्यांचे घोडे श्रमांनीं रोडलेले होते; त्यांचे शिपाई चिंध्या पांघरलेले होते, व त्यांची कातडी सूर्यकिरणांनीं

होती, आणि त्यांत बारांचा बारा मसलती झाल्या होता, त्यामुळें अफगाणलोकांस पुरा जय मिळून त्यांणीं लवकरच त्या शहरावर शस्त्र धरिलें. या वेळीं इस्फहानशहराचा शोभेची व तेथील वस्तीची शिकस्त झाली होती.[१०] आतां पुष्कळ वस्ती होती, ही गोष्ट हितकारक होती, परंतु सांप्रतचा प्रसंगीं तिजपासून अपाय झाला. तो असा, कीं तटांवर आपला हात चालत नाहीं असें पाहून, त्या अफगाणलोकांनीं शहरांत दाणावैरण जाण्याची बंद पाडली. त्या वेळीं अफगाणांचा लश्करांत २०,००० हजार लोक राहिले होते; एवढ्या लहान फौजेनिशीं एवढ्या मोठ्या शहरास वेढा देणें हा अविचारी बेत दिसत होता; परंतु महमूदाजवळ लोकांची जी उणीव होती ती, त्याणें आपल्या दक्षतेनें व चांचल्यानें इतकी चांगल्या रीतीनें पुरी पाडिली, कीं थोडक्याच दिवसांत दुष्काळापासून जे सर्व हाल होतात ते तेथील लोकांचा अनुभवास येऊं लागले. हा अनर्थ जेवढा मोठा झाला आणि या प्रसंगीं वेढलेल्या शहरांतील लोकांनीं जीं दुःखें भोगिलीं, अशीं अशा प्रसंगीं कधींहि कोणी कोठें भोगिलीं नसतील, असें बहुतेक ग्रंथकार वर्णन करितात.[११] हें शेळ्यावाघांचें युद्ध सहा

---

रांपून गेली होती; आणि त्यांचा सर्व छावणीमध्यें तलवारी व भाले यांशिवाय कांहीं लकाकत नव्हतें, असें मोठ्या रोसानें म्हणत असत.

१० या शहराची वस्ती ६,००,००० होती असें कार्डिन या ग्रंथकारास अनुसरून हानवे हा सांगतो; परंतु फिरिस्त्या लोकांनीं हें शहर व हिंदुस्थानांतील शहरें यांची जी तुलना केली आहे, तिजवरून एवढी वस्ती होती ही गोष्ट अविश्वसनीय आहे; तथापि तिचा एक तृतियांश ह्मणजे २,००,००० लोक होते हें म्हणणें तेवढें अप्रयोजक दिसत नाहीं.

११ कवि महम्मद अली हझीन हा त्या वेढ्याचा वेळीं इस्फहानांत

महिनेपर्यंत चाललें होतें; यावरून त्या वेळीं इराणी लोकांचें धैर्य अगदीं नाहींसें झालें होतें हें सिद्ध होतें, व तशीच त्या लोकांमध्यें सोसक शक्ति किती होती हेंहि समजतें. शेवटीं आंतील लोकांचे सर्व हल्ले खिल्जी लोकांनीं हटविल्यावर, आणि शहरांत दाणावैरण वगैरे जिनसांचीं लमाणें बाहेरून पोंचविण्याविषयीं प्रांतांतील लश्करचा लोकांचे प्रयत्न फुकट गेल्यावर, शहरांतील लोकांस शत्रूंस शरण जाण्याची अवश्यकता उघड दिसून आली. मग पादशाह आपल्या सर्व मुख्य दरबारी लोकांनिशीं मोठा दुःखित होत्साता शहरांतून बाहेर निघाला आणि महमूदास शरण जाऊन स्वहस्तानें त्या विजयी पुरुषाचा शिरावर मुकुट ठेविता झाला. ( अकटोबर १७२२ ).

त्यांची जुलूमी कारकीर्द.

महमूदानें प्रथम अनपेक्षित दयेनें आपली सत्ता चालविली. परंतु कझ्वीन एथील किल्ल्यावरील जें त्याचें लश्कर होतें, त्यावर त्या शहरांतील लोकांनीं छापा घालून त्यास मारून टाकिलें, तेव्हां यास आपल्या स्वतांचा जीवाची भीति पडून त्याणें पुष्कळ इराणी सरदारांचे प्राण घेतले, आणि, शहरांतून न गेल्यास तशीच तुमची अवस्था होईल, अशी तेथील सर्व हत्यारबंद लोकांस भीति घालून, त्यांस शहरांतून हांकून लाविलें. खिल्जी लोकांनीं जीं या वेळीं क्रूर कर्मे केलीं त्यांविषयीं ग्रंथकारांनीं अतिशयोक्ति केली आहे;[१२] तथापि हें पूर्वीं

---

होता, तो हें बोलणें तोडून पाडतो; आणि अन्न नाहीं म्हणून कोणी मेला अशी गोष्ट झाली असेल याचा संशयच आहे.

( १२ ) या विनेविषयीं जा निरनिराळ्या लोकांनीं हकीकती लिहिल्या आहेत त्यांवरूनच एक अतिशयोक्तीचें उदाहरण सांपडतें. ह्मनवे,

मेंढराख्ये लोक असून त्यांस अकस्मात् त्यांचा पूर्वीचा छलकांवर बेहद्द सत्ता प्राप्त झाली होती; आणि त्यांची संख्या थोडी होती त्यामुळें आपल्या हाताखालचा लोकांवर भीतीचा दाब ठेवणें यांतच काय तो आपल्या बचावाचा मार्ग आहे, अशा समजूतीवरून त्यांचे कान दयेकडेसहि वाहत नसत. अशा प्रकारचा धनगरांचा उद्धटपणा व क्रूरता हीं किती असतील त्यांची आपणास सहजच कल्पना करितां येईल.

---

हा अगदीं अतिशयोक्तिवक्ता नाहीं, परंतु त्याणें केव्हां केव्हां लोकांतल्या गप्पांवरून, व केव्हां याहून ही वाईट ठिकाणांत मिळविलेल्या वर्तमानांवरून आपला ग्रंथ लिहिला आहे. तो असें लिहितो, कीं महमूदानें सर्व उमरावांचा निःपात केला, आणि शिकारीप्रमाणें त्यांचीं मुलें बाहेर काढून एका मागून एक मारून टाकिलीं; आणि पुढें माजी पादशाहाचा २००० पाहरेकऱ्यांचे प्राण घेऊन कतलीस आरंभ केला, आणि तींत माजी सरकारांतून जांस ( कितिहि अल्प ) पगार मिळाला असेल, अशा सर्व दिवाणी व लश्करी लोकांस मारून टाकावें, असा हुकूम केला. असें असून नादिरनामाकाराची हकीकत सरकारीसारखी धरल्यास चिंता नाहीं, व महमूदाचा दुष्ट कृत्यांवर झांकण घालण्याची त्याची इच्छा नव्हती हेंहि खचित आहे; तो ग्रंथकार लिहितो, कीं " इराणी लोकांची कतल करावी "असें त्याणें ( महमूदानें ) मनांत आणिलें, आणि कझ्वीन एथून जा "दिवशीं अफगाण आले त्या दिवशीं एक शें चौदा लोक मारून टाकिले, त्यांत " वाईटांबराबर चांगले, व थोरांबराबर लहान मेले गेले." तोच ग्रंथकार आणखी लिहितो कीं, पुढें लवकरच सर्व शाहजादे मारावे अशी त्यास दुष्ट बुद्धि सुचून त्याणें ३९ चे प्राण घेतले, आतां हजारों मारून टाकले या गोष्टीशीं हे वरील लेख मिळत नाहींत. शिवाय त्या वेळीं पूर्वीचा पादशाह शाहहुसेन यास जीवंत राहूं दिलें होतें, आणि त्याशीं महमूद क्रूरतेनें वर्तला नाहीं; कारण आपल्यास राहण्यास लहान वाडा, व सगळे पांच चाकर व पांच दासी दिल्या, म्हणून त्याणें गाऱ्हाणें गाइलें आहे.

महमूदानें दोन वर्षें राज्य केलें नाहीं, इतक्यांत वरील उलटापालट व काळजी यांणीं त्याला ग्रासून टाकलें, व त्याणें भोळेपणानें जीं धर्मसंबंधीं विरक्ती व प्रायश्चित्तें आपल्या अंगीं लावून घेतलीं होतीं, त्यांणीं त्याची बुद्धि ठायचूक झाली. मग तो वेडा होऊन बरळूं लागला, आणि नंतर आपसुखें मेला, किंवा त्यास कोणी मारलें; तेव्हां त्याचा मागून त्याचा पुतण्या **अशरेफ्** तक्ताधिपति झाला. ( एप्रिल् १७२४. )

तुर्क, व रूस या लोकांबराबर त्यांचा लढाया.

हा नवीन बादशाह बुद्धिमान् व सामर्थ्यवान् होता. तो इराणदेश पुरा सर करी, तों त्याचें राज्य विगलित करण्याकरितां रूस व तुर्क या दोन्ही लोकांनीं कट करून त्यावर एकदम हल्ला केला. त्यांत पश्चिमेकडील प्रांत तुर्कलोकांनीं घ्यावे, आणि उत्तरेकडील अरक्षीनदीपर्यंत रूसलोकांनीं घ्यावे, असा ठराव झाला होता. त्या वेळीं अशरेफानें प्रथम तुर्कलोकांकडे आपलें लक्ष वळविलें, आणि एकामागून एक अशा लढाया मारून त्यांस पराजित करून त्यांकडून आपला या राज्यावर हक्क आहे असें कबूल करविलें; परंतु त्यांणीं जे देश जिंकिले होते त्यांतून त्यांस याचानें हाकून लाववलें नाहीं. रूसलोकांचा पुढारी खुद्द **पीटर** बादशाह होता, परंतु त्या लोकांस बिकट देशांतून येऊन हल्ला करावयाचा होता यामुळें त्यांपासून भीति कमी होती; तथापि त्यांणीं क्यास्पियन् समुद्राचा दक्षिणेस रेस्त शहरापर्यंत चाल केली होती, इतक्यांत त्यांचा पादशाह मरण पावला, त्यामुळें त्यांचा गतीस अडथळा होऊन त्यांणीं पुढें तें रान सोडलें.

इकडे हें वर्तमान होत असतां अशरेफ् याचा अति-मोठा भयंकर शत्रु घराजवळच वाढत होता. तो प्रकार:— इराणचा माजी पादशाह हुसेन याचा मुलगा तहमस्प हा इस्फहानाहून पळून जाऊन क्यास्पियन् समुद्राचा किनाऱ्यावर कजर नामें लोकांचा आश्रयानें राहिला होता. त्या वेळीं त्याजवळ राजकीय वैभवापैकीं नुस्त्या नावाशिवाय कांहीं राहिलें नव्हतें. पुढें त्यास नादिर कूलि ह्मणून येऊन मिळाला, तीच त्याची सद्दी फिरून दैव उदयास आल्याची प्रथमची निशाणी. नादिर हा इराणदेशांतील अति मोठा योद्धा होय; यासारिखा त्या देशांत कधींहि उत्पन्न झाला नाहीं. या सरदारानें पूर्वीं लुटारूपणा करण्याकरितां लश्कर जमविलें होतें. तोच सांप्रत आपल्या देशास परलोकांचा सत्तेपासून सोडविण्याकरितां उभा राहिला. त्याणें आपल्या शूरत्वानें व जयानें इराणी लोकांस विशेष शूरत्व आणिलें; त्यांमध्यें धर्मसंबंधी श्रद्धा उत्पन्न केली, आणि त्यांचा स्वलोकाभिमान जागृत केला; शेवटीं ते जानीच दशेप्रत येऊन मिळाले होते तींतून त्याणें त्यांस हळू हळू काढून पूर्वीं ऊर्जित काळांत त्यांची जेवढी कीर्ति होती तेवढ्या युद्धकीर्तीचा शिखरास त्यांस पोंचविलें.

नादिरशाहाची उत्पत्ति.

त्याणें मेशीदशहर घेतलें आणि अब्दाली लोकांपासून व सिस्तानांमधील सरदार महम्मद खान (जाणें कांहीं भाग घेतला होता,) या दोघांपासूनहि त्याणें खुरासानप्रांत परत घेतला. हे त्याणें प्रथम पराक्रम केले. नंतर खिल्जी लोकांचा सरदार

त्याणें खिल्जी लोकांस घालवून अब्दाली लोकांपासून खुरासान घेतलें.

अशरेफ हा त्यावर हल्ला करण्याकरितां उत्तरचा सरहद्दीवर आला होता, त्याशीं प्रसंग करून लागोपाठ लढाया मारून त्या लोकांस याणें पराजित केलें, आणि राज्याचा दक्षिण-हद्दीवर त्यांस हांकून लाविलें. शेवटीं त्यांचें लश्कर इतकें जर्जर झालें, कीं ते लोक दाही दिशांस पळून गेले, आणि घेतलेला मुलुक सोडून देते झाले; त्यांणीं एकंदर सात वर्षेंपर्यंत अम्मल चालविला होता. त्यांतून बहुतेक लोक लढाईंत मारले गेले, अथवा घरीं परत जातांना ओसाड रानांतून मेले गेले. अशरेफास एका बलूची सरदारानें किरमान व कंदाहार या शहरांमध्यें ठार मारिलें.

जान्युआरि इ० स० १७२९, यानंतर.

त्यानंतर तुर्की लोकांनीं अशरेफाबराबर तह केल्यामुळें इराणदेशाचा कांहीं भाग त्यांस साध्य झाला होता, ह्मणून त्या लोकांवर नादिरानें स्वारी केली, आणि तब्रीझ शहर काबीज केलें; इतक्यांत अब्दाली लोक उठल्याचें वर्तमान लागल्यावरून त्यास खुरासानांत परत यावें लागलें. जेव्हां त्याणें या लोकांवर पूर्वीची स्वारी करून जय मिळविला, तेव्हां त्याणें मागाहून सामोपचाराचा बंदोबस्त केला होता. त्या योगानें व शिवाय जसें नादिराचें खिल्जी लोकांशीं वैमनस्य होतें तसेंच अब्दाली लोकांचेंहि होतें; या दोहीं कारणांमुळें यास अब्दाली लोकांची एक मोठी फळी वश झाली; तिचा सरदारास याणें हिरात एथील काम सांगितलें. त्यांचा विरुद्ध पक्षाची सांप्रत चलती होती. त्यांतील लोकांनीं खुरासानप्रांत लुटून, नादिराचा भाऊ इब्राहीम

अब्दाली लोकांनीं पुनः हल्ला केला.

हा मेशहद एथील अधिकारी होता, त्यास लढाईंत पराजित करून त्या शहरास वेढा दिला. त्यांणीं खिलजी लोकांशींहि संबंध केला होता, परंतु हे दोन्ही नवे दोस्त एकत्र झाले नाहींत तंव त्यांचें जुनें वैर बाहेर पडलें, आणि, त्यांचा नभूतोनभविष्यति असा बेबनाव होऊन, ते वेगळे पडले. पूर्वींचा लढाईपेक्षांहि ही फार त्रासदायक झाली; फकत हिरात शहराचा वेढ्यास दहा महिने लागले; तथापि या लढाईचा अखेरीस अब्दाली लोक पुरे रकमेस आले. ही फत्ते झाल्यावर त्या लोकांचीं मनें आपल्याकडे वळविण्याविषयीं त्याणें पुनः उपाय केले, आणि पुढें थोडक्याच मुदतींत त्याणें सुनी धर्म स्वीकारिला, त्यामुळें त्या लोकांची त्यावर जशी भक्ति बसली तशी त्याचा दुसऱ्या कोणत्याहि लोकांची बसली नव्हती.

नादिरानें हिरात घेतलें.

आणि अब्दाली लोकांची प्रीति संपादन केली.

या कामांस जो भारी वेळ लागला, तेवढ्यांत इराणचा कारभारांत एक मोठी घालमेल झाली; तो प्रकारः— पूर्वीं राज्य करणें,— ह्मणजे लश्करें कामास लावणें— ह्मणजे लढाया करणें एवढाच उद्योग असे; तेव्हां बादशाह हा केवळ त्या लश्करचा सेनाधिपतीचा हातांत बाहुलें असे. परंतु जेव्हां पुढें त्याची राजधानींत पुनः स्थापना झाली, आणि त्याची सत्ता राज्यांत सर्वत्र कबूल झाली, तेव्हां बादशाहाचें महत्व वाढलें; आणि जेव्हां नादिर बाहेर लढायांत गुंतलेला होता, तेव्हां त्याणें स्वतः राज्यसंबंधी सर्व हक्क चालविण्याचें आरंभिलें.

याप्रमाणें आपला अधिकार देण्यास नादिर अगदीं

नाखुश होता, म्हणून खुरासानप्रांतांतील कामाचा बंदोबस्त झाला तेव्हां तो इस्फहान एथें आला, आणि शाहतहमस्पानें इराणदेशाचा अहिताचा तुर्की लोकांशीं कांहीं तह केला होता तेणेंकरून लोकांस त्याचा वीट आला होता ती संधि साधून, याणें तहमस्पास पदच्युत केलें, आणि त्याचा अगदीं लहान मुलास नामधारी राज्यपदावर बसविलें. नादिरशाहाची जाहीर कारकीर्द एथून आरंभली; परंतु पुढें त्याणें तुर्की लोकांशीं लढाया करून पुष्कळ जय मिळविले; त्यांणीं व रूसलोकांनीं घेतलेला सर्व देश परत घेतला; आणि त्या दोहीं राज्यांशीं तह केले. हीं कृत्यें केल्यानंतर त्याणें इराणचा बादशाह अशी पदवी यथाविधि घेतली. हा किताब त्यास मिळण्यापूर्वीं तो आपल्या फौजेनिशीं मोघानचा मैदानावर गेला, आणि तेथें राज्यांतील दिवाणी व लश्करी अम्मलदार, परगण्यांचे सुभेदार, फौजदारी अम्मलदार व राज्यांतील सर्व नामांकित लोक मिळून एकंदर १,००,००० लोक इतके बलाविता झाला. या मंडळीनें एकमतानें राज्याधिकार तुम्ही घ्यावा अशी त्यास विनंती केली, ती, प्रथम वरवर नाखुशी दाखवून, याणें कबूल केली; परंतु असा करार करून घेतला कीं शिया धर्म बंद करून सुनी धर्म इराणांत सर्वत्र स्थापावा[१३] (१७३६).

त्याणें शाहतहमस्पास पदच्युत केलें.

त्यास लोकांनीं बादशाह निवडून काढिला.

सफवी वंशाचे बादशाह हे शिया पंथाचे प्रतिपादक

---

१३ सुनी मताचा छल करूं नये असा प्रथम करार करून घेऊन मागाहून शिया धर्म नादिरानें काढून टाकिला असें ह्यानवे याणें लिहिलें आहे.

त्याणें शिया धर्म बंद केला.

असत, यावरूनच काय तो त्यांचा राज्यावर हक्क होता. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें धर्म पालटला असतां लोकांची त्या पादशाहांवरून प्रीति मूळीं नाहींशी होईल अशी नादिरशाहास आशा होती; परंतु जरी याणें पालट केला, तरी इराणी लोक हे पूर्वीप्रमाणेंच त्या धर्मावर मनापासून भक्ति ठेवित असत, यामुळें त्याचा नवीन बंदोबस्तानें त्यामध्यें व त्याचा रयतेमध्यें बेबनाव होऊन, उभयतांसहि सारखेच भयावह असे त्यापासून परिणाम झाले. हा परिणाम होईल असें त्या वेळीं नादिरास अगदीं कळलें नव्हतें; तथापि एकामागून एक इतक्या लढाया मारून जा गादीचा पाया घातलेला आहे, ती गादी कायम राखण्यास तसेंच पराक्रम केले पाहिजेत असें त्यास वाटलें. म्हणून जा खिलजी लोकांनीं पूर्वीं इराणचा लोकांस जिंकिलें होतें, त्यांस जिंकून, त्यांचा सूड घेऊन व कंदाहार शहर पुनः इराणचा राज्यांत मिळवून आपल्या देशबांधवांचा गर्व तृप्त करावा, असा त्याणें निश्चय केला.

त्याणें खिलजी लोकांवर स्वारी केली.

या स्वारीची त्याणें मोठी तयारी केली, आणि तो मोठ्या लश्करानिशीं निघाला त्यांत ८०,००० लोक होते, असें कांहीं ग्रंथकार म्हणतात.[१४] या प्रसंगीं त्यास अब्दाली लोकांचें मनःपुरःसर सहाय्य होतें, आणि खिलजी लोक हे नाउमेद होऊन,

---

१४ माल्कमसाहेबाचा इतिहासांत वर लिहिल्याप्रमाणें आहे, व या ८०,००० चा फौजेमागून लागलीच दुसरी ३०,०००ची फौज होती. परंतु या मोठ्या संख्या असंभाव्य दिसतात, कारण अशा मोठ्या फौजा हिंदुस्थानांत पुष्कळ असत, परंतु सिंधूचा पश्चिमेस विशेष पाहण्यांत येत नाहींत.

त्यांचा आपसांतहि बेबनाव झाला होता. परंतु त्यांचा रणधीरपणा अगदींच नाहींसा झाला नव्हता, ह्मणून तलवार मारल्याशिवाय ते जेरीस आले नाहींत. नादिरानें स्वारी करून कंदाहार शहरास वेढा दिला; तें काम सक्तीनें बारा महिने चालल्यावर तो कंदाहारावर हल्ला करण्यास धजला, तेव्हांहि त्यास त्यांणीं पुष्कळ वेळा हटविलें; शेवटीं (इ० स० १७३८ चा मार्चमध्यें) तें शहर त्याचा हस्तगत झालें. त्या वेळ्याचें काम चालत असतां, आसमंतात् भागचा प्रदेशाचा त्याणें बंदोबस्त केला; त्याच वेळीं त्याच्या मुलगा रेझ कूली मिर्झा, जो उझबेगलोकांवर स्वारी करून गेला होता, त्याणें बल्क प्रांत घेऊन, बुखारा प्रांताचा राजा स्वतः लढाईस आला होता त्याजबराबर वक्षूनदीवर युद्ध करून जय मिळविला.

व कंदाहार घेतलें.

नादिर हा खिलूजी लोकांशीं साळढाळ रीतीनें व राज्यकारणीपणानें वर्तला. पूर्वीं त्यांणीं इराणदेशावर स्वारी केली होती ह्मणून त्याणें सूड उगविण्याकरितां कांहीं उपाय योजिले नाहींत; त्याणें त्या लोकांस आपल्या दुसऱ्या रयतेप्रमाणें वागविलें, आणि त्यांतून पुष्कळांस लश्करांत चाकरीस ठेविलें; परंतु त्याणें त्या लोकांतून कांहींकांस त्यांचा कंदाहारचा आजूबाजूचा जाग्यांतून काढून, त्या जमीनी अब्दाली लोकांस दिल्या, आणि त्यांतूनहि जे लोक खुरासानप्रांताचा पश्चिमेस निशापुरानजीक वसाहत करून राहिले होते, त्यांस मुख्यत्वेंकरून दिल्या.

त्याची साळढाळ शिस्त.

खिलूजी लोकांचा मुलुक मिळाल्यामुळें नादिरशाह

दिल्लीचा सरकाराशीं त्याचे वांधे.

मोगलांचा सरहद्दीवर येऊन ठेपला. त्या वेळीं मोगलांचें राज्य अति दुर्बळ झालें होतें; तें त्याचा लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. तशांत हिंदुस्थानासारिख्या पैक्याचा खाणींतून इराणदेशाचें रितें पोतें भरण्याची ही संधि होती; तशीच जे लढाऊ लोक सांप्रत त्याचा सत्तेखालीं आले होते, त्यांस कांहीं तरी काम लाऊन देऊन, हिंदुस्थानांत स्वारी करणें हें काम त्या सर्वांसच इष्ट, यास्तव त्यामध्यें त्या सर्वांचा परस्परविरुद्धशक्ति एकत्र करून टाकण्याचीहि ही वेळ होती. यामुळें त्यास त्या कामास हात घालण्यास हीं दोन्ही कारणें बहुधा सारखींच प्रवर्तक होतीं.

पूर्वीं जेव्हां नादिरशाह कंदाहारास वेढा देत होता तेव्हां कांहीं अफगाणलोक गझनीचा जवळील मुलुकांत पळून आले होते; त्यांस पकडावें किंवा देशपार करावें अशी त्याणें दिल्लीचा दरबारास विनंती केली. हें मागणें कबूल करण्याचें दिल्लीचा दरबारास बहुधा सामर्थ्य नव्हतें; आणि हें मागणें करण्याजोगा नादिरशाहाचा अधिकारहि कबूल करण्यास त्यांणीं कांहीं कानमान केला, असें दिसतें: या कारणांस्तव त्यांणीं उत्तर दिल्याशिवायच पुष्कळ दिवस घालविले. आपल्या लिहिण्याची अशी हयगय केली म्हणून नादिरशाहानें फार कठीण शब्दांनीं निषेध केला, आणि मग अगदीं विलंब न लावितां गझनी व काबूल यांवर चाल केली. नंतर त्याणें दुसरा एक जासूद दिल्लीस पाठविला, त्यास पहाडांमध्यें अफगाणलोकांनीं तोडून टाकिलें. तेव्हां

आतां आपणास हिंदुस्थानावर स्वारी करण्यास हें अगदीं योग्य कारण आहे, असें नादिरशाहास वाटलें. मग त्याणें स्वारी केल्यावर काबूल प्रांत हा विशेष आयासावांचून त्याचा हातीं लागला, तथापि त्या मुलुकाचा बंदोबस्त करण्याकरितां, त्या लगत्यास तो कांहीं महिने राहिला; आणि हिंवाळा जवळ येईपर्यंत हिंदुस्थानावर कूच करण्यास त्याणें आरंभ केला नाहीं. त्या वेळीं दिल्लीचा दरबारास मराठ्यांची भीति होती, आणि शिवाय आंतल्याआंतहि फळ्या पडल्या होत्या, त्यामुळें तें अगदीं गुंग होऊन नादिरशाहाचा कर्तीकडे त्या दरबारानें फारसें लक्ष दिलें नाहीं. जेथपर्यंत तो इराणचा राज्याचा जुन्या मुलुकांत भांडत होता, तेथपर्यंत मोगल सरकार अगदीं बेफिकीरीनें पाहत राहिलें होतें, आणि जेव्हां खुद्द मोगलांचाच राज्यावर त्याणें स्वारी करून काबूल घेतलें, तेव्हां त्या शहराचा व पेशावराचा मधील पहाडी लोक हे त्याची पुढील गति कुंठित करतील अशी त्यांस आशा होती; परंतु पूर्वी त्या लोकांत आपलें वजन ठेवण्याकरितां त्या लोकांस नेहेमीं पैसा पोंचवित असत, तो कांहीं वर्षें बंद झाला होता; त्यामुळें जरी त्यांस शक्ति असली, तरी मोगलांचा वतीनें भांडण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यामुळें नादिरशाह पहाडांतून उतरला; आणि एक मोगल सरदार लहानशा फौजेनिशीं होता त्यास पराजित करून सिंधुनदावर नावांचा

इ० स० १७३८, मे, हि० स० ११५१, सफ्फर.

इ०स०१७३८, आकटोबर; हि०स०११५१, शाबान. दिल्लीचा दरबाराची ढिलाई.

नादिरशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली. इ०स०१७३८, नोवेंबर; हि०स०११५१, रमझान.

पूल बांधून पंजाबावर चाल करूं लागला. हें वर्तमान मोगलांस समजतांच पूर्वीं जितकी त्यांची ढिलाई होती, तितकी सांप्रत त्यांस भीति पडली.

लाहोरचा सुभेदारानें त्यास आड येण्याचें जरासें अंग दाखविलें, परंतु नादिरशाह दिल्लीपासून ५० कोशांचा आंत यमुनेनजीक आला तेथें त्यास मोगलांचें लश्कर नजीक आलेलें दृष्टीस पडलें, तेथपर्यंत त्यास कोठेंहि वास्तविक हर्कत झाली नाहीं.

त्याणें महम्मदशाहाचा पराजय केला.

शेवटीं महम्मदशाहानें आपलें लश्कर मिळविण्याचा प्रयत्न केला; त्यास असोफजा हा मिळून, तो कर्नाळ एथें जाऊन तेथें तटबंदीनिशीं छावणींत राहिला. अयोध्येचा सरसुभेदार सादत खान हा नादिरशाह येण्याचा सुमारासच त्या छावणीनजीक आला. त्यास मध्येंच तोडून पाडण्याविषयीं इराणी लोकांनीं प्रयत्न केल्यामुळें युद्धास थोडा आरंभ झाला: तें चालतां चालतां शेवटीं दोन्ही लश्करांचें मोठेंच युद्ध झालें. कसेंहि झालें असतें तथापि नादिरशाहाचा टणक व अनुभविक शिपायांपुढें मोगलांचा फौजेचानें टिकाव धरवला नसता; तशांत असोफजानें वास्तविक अथवा ढोंगी नासमजपणामुळें लढाईंत न शिरल्यामुळें सांप्रतचा प्रसंगीं मोगलांची फौज गोंधळून व अस्ताव्यस्तपणानें रणभूमीवर आली.[१५] त्यामुळें,

१५ फ्रेज़र हा इंग्रेज ग्रंथकार सांगतो कीं बाजारबुणग्यासुद्धां नादिरशाहाची फौज १६०,००० होती, व त्याचे सर्व अनुयायी लोक हत्यारबंद होते. असें असून नादिराचा छावणींत एक अखबारनवीस होता, तो सांगतो कीं नादिराचा पेशावरास मुक्काम होता तेव्हां त्याचा फौजेंत ६४,५०० लढाऊ लोक व ४००० बाजारबुणग्याचे लोक इतके होते.

मोगलांचा लश्कराचा पराजय झाला, हा परिणाम झाला; त्यांचा सेनापति खानेदौरान मारला गेला, व सादत खान कैदेंत सांपडला. त्या वेळीं आपण शरण आलों असें बोलणें लावण्यास असोफजास पाठवून, मागाहून थोड्या लोकांनिशीं महम्मदशाहास नादिरशाहाचा छावणींत स्वतः जावें लागलें; त्याशिवाय दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं. नादिरशाहानें त्याचा मोठा सत्कार केला, आणि त्याच दिवशीं त्यास त्याचा छावणींत परत जाऊं दिलें. असें केलें तथापि आपलें गाडें साधेल तसें लोटण्यास त्याणें कसर केली नाहीं. पुढें लवकरच त्याणें महम्मदशाहास आपल्या लश्करांत जोरानें आणिलें, आणि मग ते दोघे पादशाह दिल्लीकडे निघून आले. दरमियान जीं बोलणीं चाललीं होतीं, त्यांत सादत खान व असोफजा यांचा स्पर्धेमुळें विशेष गोंधळ झाला, त्या बोलण्यांप्रकरणीं निरनिराळ्या हकीकती सांगितलेल्या आहेत. आतां या मसलतींपासून कांहीं झालें नसतें; कारण सर्व सत्ता नादिराकडे आली होती; तिचा उपयोग कसा करावा हें त्यास सुचवायास मंत्र्यांची जरूर नव्हती.

इ० स० १७३९, फेब्रुआरि ता० १३; हि० स० ११५१, झिकाद् चंद्र १५.

नादिरशाहाचें लश्कर मार्च महिन्याचा अवेलीसच पोंचलें, तेव्हां दोन्ही पादशाह खासमहालांत जाऊन उतरले. नादिरानें आपल्या लश्करापैकीं कांहीं लोक देऊन सर्व शहरभर चौक्या बसविल्या; सर्वांनीं सक्त कैदेनें वागावें असा हुकूम केला; आणि लोकांस धोका न पोंचावा म्हणून ठिकठिकाणीं त्याणें पाहरे बसविले.

तो दिल्लीस गेला. इ० स० १७३९, मार्च; हि० स० ११५१, झिहाज.

शहरचा लोकांनीं उठावा केला.

त्याणें इतकी सावधगिरी ठेविली, तथापि दिल्लीचा लोकांचीं मनें वळलीं नाहींत. त्यांस या परस्थ लोकांचें क्रौर्य पाहून भीति वाटे, आणि आगंतुकी पाहून त्रास येई. नादिरशाह दिल्लीस येऊन राहिल्यावर दुसऱ्या दिवशीं तो मेला अशी कंडी पिकली. तेव्हां हिंदुस्थानी लोकांचा द्वेष अनिवार सुटला; जे इराणी लोक त्यांस सांपडण्याजोगे होते त्यांवर ते पडले, आणि नादिराचे लोक सर्व शहरभर ठिकठिकाणीं पसरलेले होते यामुळें दिल्लीचा लोकांचा क्रोधाग्नींत त्यांतून पुष्कळांचा आहुति पडल्या. दिल्लीचा उमरावांनीं इराणी लोकांस वांचविण्याचा यत्न केला नाहीं; इतकेंच नाहीं, परंतु जा मानकरी लोकांचा हवेल्यांचा संरक्षणार्थ नादिरशाहानें आपले लोक दिले होते त्यांणीं त्या लोकांसहि मारेकऱ्यांचा स्वाधीन केलें.[१६] नादिरशाहानें आपलें सर्व लक्ष प्रथम तो दंगा बंद करण्याकडेस लाविलें; तथापि तो सारी रात्र चालला, आणि कमी न होतां उलटा जास्त होत गेला. हें पाहून तो संतापला, आणि आपण स्वतः हजर असल्यानें जिकडेतिकडे स्वस्थता होईल अशा आशेनें सूर्योदयीं घोड्यावर स्वार झाला. रस्त्यांत जातांना प्रथमतः त्याचा देशबांधवांचीं प्रेतें त्याचा दृष्टीस पडलीं, आणि पुढें लवकरच दगड, तीर, व अग्न्यस्त्रें यांचा घरांवरून त्यावर वर्षाव झाला. शेवटीं एकानें त्यावर गोळी टाकली, ती त्याजवळचा एका उमरावास लागून तो मारला गेला; तेव्हां त्यास क्रोध येऊन सर्व हिंदुस्थानी लोकांची कतल करावी, असा त्याणें

---

१६ हन्नीन म्हणतो कीं ७०० लोक मारले गेले, व स्काटचा लेखाप्रमाणें १००० मारले गेले.

हुकूम केला. ती सूर्योदयापासून अपराण्ह होईपर्यंत चालली होती; आणि लूट, विषयवासना, व सूड उगविण्याची इच्छा यांहीं करून जे घोर अनर्थ करण्यास मनुष्य प्रवर्ततो, ते सर्व त्या कतलींत झाले. शहरांत पुष्कळ ठिकाणीं आग लाविली, तेव्हां सर्व संहार होत चालला; रक्ताचे पूर गेले; व लोकांचे अंडत्रास झाले; असा एकच कल्होळ झाला.

इराणी लोकांनीं दिल्लीचा लोकांची कतल केली.

शेवटीं तो रक्तस्राव पाहून नादिरशाह तृप्त झाला, आणि महम्मदशाह अथवा त्याचा मुख्य वजीर याचा रदबदलीवरून कबूल करून ती कतल बंद करण्याविषयीं हुकूम देता झाला. तो हुकूम त्याचा लोकांनीं लागलाच मान्य केला; एवढी त्याची कैद उत्तम होती, अशी तिची तारीफ केली पाहिजे.[17]

---

१७ या गोष्टीविषयीं जे साधारण वृत्तान्त आहेत, त्यांत तफावती आहेत. एक हकीकत अशी सांगतात कीं ही कतल चालत असतां नादिरशाह मोठ्या बाजारांतील रुक्नुद्दौल्याचा मशीदींत बसला होता, तेथें शेवटीं महम्मदशाह व त्याचे उमराव धीर करून गेले; ते खालीं मान करून उभे राहिले होते. मग नादिरानें त्यांस बोलण्याची आज्ञा केल्यावर, महम्मदशाहास अश्रु आले, व तो ह्मणाला कीं आतां माझा रयतेस जीवदान दे. ही गोष्ट असंभाव्य दिसत नाहीं, परंतु हिला डौ साहेबाचा इतिहासाचा मात्र आधार आहे, जर दुसरा त्याहून चांगला असता तर बरें होतें. हुसीन म्हणून एक पुरुष त्या वेळीं तेथें होता, त्याणें लिहिलेली हकीकत "सैरमुताखरीन" हा ग्रंथ लिहिणारानें उतरून घेतली आहे, ती, व सरबुलंद खानाजवळ एक हिंदुस्थानी चिटनीस होता त्याणें लिहिलेली हकीकत आहे ती, हे दोन या कतलीचे चांगले वृत्तान्त आहेत. त्या चिटनिसाचा हकीकतींत पुढील चिना तफसीलवार दाखल केल्या आहेत, ती कतल अर्धा दिवस चालली होती, व

नादिराचा जुलूम.

हा संहार होऊन दिल्लीचा लोकांचीं दुःखें संपलीं, असें झालें नाहीं. हिंदुस्थान लुटून द्रव्य मिळवावें एवढाच नादिराचा हिंदुस्थानांत स्वारी करण्याचा उद्देश होता; म्हणून महम्मदशाहास पराजित करून फत्ते मिळविल्या क्षणापासून दिल्लींतून द्रव्य कसें वसूल करावें याचा घाट तो घाटित होता; या कामांत त्याचा प्रथमचा मसलतदार सादत खान हा होता; तो दिल्लीस पोंचल्यावर लवकरच मरण पावला; तेव्हां सरबुलंद खान व तहमस्प खान नामें एक इराणी, या दोघांवर तें जुलुमानें द्रव्य वसूल करण्याचें काम नादिरानें सोंपलें. त्यांची स्वतांचीच शिस्त मुळीं सक्त होती, त्यांत नादिराचा व्रात्यपणामुळें व उतावळीमुळें ती विशेष कडक झाली.

त्याचा लोभ व व्रात्यपणा.

त्यांणीं प्रथम बादशाही खजीना, व पूर्वीं सांगितलेल्या प्रख्यात मयूरासनासुद्धां जवाहीर, हीं हस्तगत करून घेतलीं. नंतर कांहीं मोठ्या उमरावांची सर्व चीजवस्त बळकावून, बाकीचांपासून त्यांची थोडी मालमत्ता ठेवण्याबद्दल बाकी सर्व ठळक जिंदगी

---

अतोल्य लोक मारले गेले असें हनीन म्हणतो. १,२०,०००पासून १,५०,००० मरण पावले असें फ्रेझर साहेब सांगतो; परंतु 'नादिरन.म.'-कार ३०,००० धारातीर्थांत भेटले असें सांगतो; ही शेवटची हकीकत खऱ्याजवळजवळ अथवा खऱ्या संख्येहून कमीहि असावी. ८,००० लोक मेले असें मिस्टर स्काट सांगतो, परंतु कोणत्या आधारावरून हें कांहीं नाहीं. आतां त्या कत्तलीचा कामास २०,००० लश्कर लागलें होतें, व त्यास कोणी आडहि आला नव्हता, असें असून इतक्या वेळांत इतके थोडे लोक मात्र मेले असतील हें अविश्वसनीय आहे.

निष्क्रयादाखल घेतली. नंतर ते हलक्या प्रतीचा अम्मलदारांवर व साधारण लोकांवर तुटून पडले. लोकांस शहरांतून बाहेर न जाऊं देण्याकरितां त्यांणीं पाहरे ठेविले, आणि आपलें द्रव्य किती तें कबूल करण्यास प्रत्येक मनुष्यावर जुलूम करून त्यापासून कबूलातीप्रमाणें तें घेऊं लागले. हें द्रव्य वसूल करण्यास सर्व प्रकारचे जुलूम त्यांणीं केले. मोठमोठ्या लोकांसहि कबूल करण्याबदल त्यांणीं मार दिले: पुष्कळ लोक अशा जुलूमानें मेले; व ती अप्रतिष्ठा व तो छल हीं न व्हावीं म्हणून पुष्कळांनीं आत्महत्या केली. एक ग्रंथकार वर्णन करितो, कीं "निद्रा व विश्रांति हीं शहरांतून "पळून गेलीं. प्रत्येक खोलींत व घरांत दुःखाचे उसासे "ऐकूं येऊं लागले. पूर्वीं मोठी कतल झाली होती, परंतु "सांप्रत निरनिराळ्या लोकांचे खून होऊं लागले."

त्याणें प्रांतांचा सुभेदारांपासूनहि खंडण्या घेतल्या. शेवटीं जा सर्व मार्गांनीं द्रव्य प्राप्त व्हावयाचें ते आटले, अशी नादिराची खातरी झाल्यावर त्याणें आपल्या राज्यांत परत जाण्याची तयारी केली. त्या वेळीं त्याणें महम्मदशाहाबरोबर तह केला; त्यांत सिंधुनदाचा पश्चिमेकडील सर्व मुलुक त्यास मिळाला. त्याणें मोगल वंशांतील एका शाहजादीशीं आपल्या मुलाचें लग्न लाविलें. शेवटीं त्याणें महम्मदशाहास सिंहासनावर बसविलें; त्याचा मुकुटाचे सर्व अलंकार आपल्या हातानें लेवविले; सर्व उमरावांस त्याची आज्ञा प्रकाऱ्यांनीं मानण्याविषयीं आज्ञा केली, आणि न मानिल्यास

त्याणें परत जाण्याची तयारी केली.

महम्मदशाहानें त्यास सिंधुनदाचा पश्चिमेकडील सर्व मुलुक दिला.

महम्मदशाहास पुनः सिंहासनावर बसविलें.

तुम्हावर माझा क्रोध होऊन मी तुमचा सूड घेईन अशी त्यांस भीति घातली.

नादिरशाहानें नेलेल्या संपत्तीची गणती.

याप्रमाणें ५८ दिवस मुक्काम करून शेवटीं तो दिल्लीहून गेला; त्या वेळीं त्याणें, थोड्यांत थोडे आठ नऊ कोटि रुपये, शिवाय कोट्यावधि रुपयांचें सोनें व रुपें, आणि नाना प्रकारचें मोलवान् सामान व उंच कपडे, इतकें नेलें. याखेरीज त्याणें जें जवाहीर नेलें त्याचा किम्मतीस तर पारच नाहीं. तसेंच त्याणें पुष्कळ हत्ती, घोडे व उंटें नेलीं, आणि शेंकडों उत्कृष्ट हुशार मजूर व कारीगर तो आपल्या देशास घेऊन गेला.[१८]

---

१८ स्काट याचा ग्रंथांत जा रकमा लिहिल्या आहेत त्यांचें एकंदर ८,००,००,००० व ९,००,००,००० रुपये यांचा मध्यें होईल. नादिरनाम्यांत २५ कोटि असें लिहिलें आहे; फ्रेझर हा इतिहासकर्त्ता ३० कोटि म्हणतो; व हानवे ३० कोटि रुपये म्हणजे ३,७५,००,००० पौंड इतकी गणती करितो. आतां या जा सर्व रकमा सांगितल्या त्या फकत पैक्याचा मात्र आहेत. शाहजहानाचा कारकीर्दीपासून बादशाही खजीना पुष्कळ रिता पडला असेलः टावरनीयरानें पूर्वी सांगितलेल्या मयुरासनाची ६,००,००,००० रुपये किम्मत केली होती; असें असून नादिरनाम्यांत त्याची किम्मत फकत २,००,००,००० रुपये केली आहे, व स्काट याणें सारी १,००,००,००० धरिली आहे. ही स्वारी होण्याचा कारणांविषयीं त्या वेळीं जा पुष्कळ गोष्टी बोलत असत, त्यांचा डौरुत हिंदुस्थानाचा वृत्तान्त यांत संग्रह केला आहे. या गोष्टींप्रमाणें म्हटलें असतां, नादिरशाहास असोफजा व सादत खान यांणीं बोलाविलें, व कर्नाळची लढाईत जी माघार आली, ती त्यांचा मसलतीमुळें आली. याप्रमाणें त्यांणीं आपल्या धन्याचा विश्वासघात

# प्रकरण तिसरें.

## महम्मदशाहाचा मरणापर्यंत झालेलीं वर्तमानें.

नादिरशाह निघून गेल्यानंतर दिल्लीचे लोक जसे कांहींसे बेशुद्ध होऊन राहिले. पूर्वीचा झालेल्या कृत्यापासून उत्पन्न झालेली त्यांची भीति उडाली नव्हती, व त्यांचा सर्वस्वापहार झाला तो सोसून ते सावध झाले नव्हते; पुष्कळांचीं घरें मोडून गेलीं होतीं; शहराचा पुष्कळ भाग सगळा ओसाड पडला होता, आणि पुरल्याशिवाय रस्त्यांत पडलेल्या प्रेतांची दुर्गंधि सर्व

दिल्लीची दुःखकारक स्थिति.

---

केला म्हणून नादिरशाह त्यांचा दाढ्यांवर थुंकला, व त्यांस आपल्या दरबारांतून हाकून लावण्याचा हुकूम करिता झाला: हें त्यांस विश्वासघात केल्याचें इनाम मिळालें. याप्रमाणें त्या मानकऱ्यांची अप्रतिष्ठा झाल्यामुळें त्यांणीं मरून जाण्याचा निश्चय केला; परंतु ते दोघे परस्परांविषयीं स्पर्धा करित असत, म्हणून त्यांस परस्परांचा मनाचा विश्वास येत नसे; यास्तव आपल्या ठरावाप्रमाणें वर्तणूक झाल्याची चौकशी करण्यास त्यांणीं एकमेकांकडे हेर पाठविले. त्या दोघांतून असोफजा हा अधिक कपटी होता. त्याणें कांहीं साधें प्यावयाचें औषध घेऊन, मग लवकरच मृतवत् पडल्याचें सोंग केलें; तेव्हां सादत खान त्या कपटानें ठकला जाऊन खरेंखुरें विष खाऊन लागलाच मरण पावला. गडबडीचा वेळीं या व दुसऱ्या अशाच कादंबऱ्या लोकांस खऱ्या वाटतात, परंतु त्या वेळ चा हकीकतीची सफाई झाली म्हणजे त्या नाहींशा होतात.

शहरभर पसरली होती. नादिरशाह गेल्यानंतर पुष्कळ दिवस लोटल्यावर दिल्लीचें दरबार जसें कांहीं स्वभावस्थें-तून जागृत झालें. जसा राजधानींत सर्व वस्तूंचा नाश व

व तशीच सर्व राज्याची अवस्था.

विध्वंस झाला होता; तसेंच सर्व राज्यांतहि लश्कराचें वाटोळें झालें; खजीना रिता पडला, आणि महसूल बहुधा अगदीं नाहींसा झाला; अद्यापि दक्षिणेंत मराठ्यांची भीति होतीच, आणि जे प्रांत त्यांचा पुंडाईनें ओसाड पडले नव्हते, ते सांप्रत नादिराचा फौजेचा हातून नाश पावले.

हे अपाय ईश्वरेच्छेनें घडून आले; त्याशिवाय दिल्लीचा दरबारानें आंतल्याआंत कळ लावून दिली,

आंतल्या आंत कज्जे.

तिची वरचांत भर पडली. त्या वेळीं दोन फळ्या पडल्या होत्या, त्यांतून जा फळीचा पगडा त्या वेळीं चालू होता, तींत कांहीं थोडीं तुर्की जातीचीं कुटुंबें मात्र होतीं, ह्मणून त्यांस तुराणी उमराव लोक असें ह्मणत असतः त्यांतून मुख्य, वजीर कमरुद्दीन खान व असोफजा, हे होते. ते एका पक्षाचेच असून त्यांचा शरीरसंबंधहि होता. त्यांस कामावरून काढण्याविषयीं जा सर्वांची इच्छा होती, व जांस त्यांचा वर्चस्वाचा द्वेष वाटत असे, ते त्यांचा विरुद्ध होते; आणि या विरुद्ध मंडळींत बादशाहाहि होता, असें वाटत होतें.

असें फुटलेलें राज्य विशेष आयासाशिवाय मराठ्यांचा तोंडांत पडलें असतें; परंतु कांहीं गोष्टी घडून आल्यामुळें

मराठ्यांचें वर्तमान.

त्या अगंतुकांचा पीडेंतून त्यास कांहीं वेळ पावेतों विश्रांति सांपडली. तो प्रकारः— मोगललोकांनीं नादिरशाहाचा सत्तेचें मान

कमी धरिलें असावें; व बाजीरावास तर तिजविषयीं बहुधा कांहींच माहिती नव्हती असें संभवतें. त्यामुळें ज्या मद्देशांतून जाऊन येतांना आपणास कोणी आड येणार नाहीं अशी यास अपेक्षा होती, तेथें या भयंकर शत्रूचें दर्शन झाल्यानें तो चकित झाला असें दिसतें; नंतर आपल्या बढतीचे सर्व बेत तहकूब ठेवून हिंदुस्थानाचा संरक्षणार्थ सर्वांचा कट करावा असा प्रथम त्यास विचार सुचला. त्याणें असें लिहिलें आहे कीं " आमचे घरगुती कज्जे आतां यःकश्चित् आहेत. सांप्रत हिंदुस्थानांत एकच शत्रु आहे, ह्मणून दक्षिणेंतील हिंदु व मुसलमान या सर्वांनीं एकत्र झालें पाहिजे. " जेव्हां तो नादिरशाहाचा भीतींतून मोकळा झाला, तेव्हां तो आपले जुने बेत घालूं लागला. पूर्वी असोफजानें जो ठराव केला तो बादशाहानें शिस्तवार मंजूर केला नव्हता; ह्मणून मोगलांशीं कज्जा करण्यास त्यास सबब होती. आतां त्याणें आपला हक्क दिल्ली एथें अमलांत आणावा हा उघड रस्ता होता; परंतु त्या वेळीं वऱ्हाडचे भोंसले व गुजराथेंतील गायकवाड, हे दोघे सातारकर राजांस पेशव्यांचा कैदेंतून सोडविण्याचा निमित्तानें मसलती करित होते; त्यांचा कृतींवर नजर ठेवण्यास आपण जवळ असावें, ह्मणून त्याणें दक्षिणेंत लढाईचा प्रसंग मांडला. त्याणें भोंसल्यास करनाटकामध्यें दूरचा स्वारीस पाठवून त्याची वाट लाविली. नंतर त्याणें असोफजाचा दुसरा मुलगा नासिरजंग, जो आपल्या बापाचा कारभार पाहत होता व बऱ्हाणपुर एथें दहा हजार लोकांनिशीं छावणी देऊन राहिला होता, त्यावर हल्ला केला. त्या स्वारींत बाजीरावानें प्रथम त्यास वेढिलें,

बाजीरावानें लढाईस आरंभ केला.

असोफजाचा मुलुकावर हल्ला केला.

इ० स० १७४०, हि० स० ११५३.

आणि असोफजाचा बराबरील मागील लढाईत जसा आपणास जय मिळाला, तसाच सांप्रतहि मिळेल अशी त्यास अपेक्षा होती असें संभवतें; परंतु त्या वेळचा मोगलांमध्यें जसें सहज धैर्य नसे, तसें त्या तरुण सुभेदारानें प्रकट केलें. शिवाय त्यास कुमक मिळाल्यावर त्याणें मराठे लोकांवर हल्ला केला, आणि त्यांचा फौजेचा मोडकरून पुण्यावर येण्याकरितां तो अहमदनगरास आला; तेव्हां बाजीरावानें शहाणपणकरून त्याशीं बंदोबस्त केला. सांप्रत बाजीरावानें आपल्या कृतींनींच आपणास गोंधळांत पाडिलें; आणि त्या नाना प्रकारचा गोंधळांनीं त्यास काय करावें तें सुचेनासें झालें होतें, असें दिसतें.[1] नंतर तो हिंदुस्थानांत परत जावयास निघाला, (तो कशाकरितां तें समजत नाहीं; ) इतक्यांत त्यास नर्मदेचा कांठीं मृत्यु प्राप्त होऊन त्याचे सर्व बेत बंद राहिले.

असोफजाचा मुलगा नासिरजंग याणें त्यास हटवून लाविलें.

बाजीरावाचा कारभारांत गोंधळ झाला.

बाजीराव मरण पावला. इ०स०१७४०, एप्रिल तारीख २८; हि० स० ११५३, सफ्फर.

बाजीराव यास तीन मुलगे होते; पहिला बाळाजीराव, हा त्याचा मागून पेशवाईचा गादीवर बसला; दुसरा रघुनाथराव ऊर्फ राघोबा, याचा एके वेळीं इंग्लिशांशीं पुष्कळ संबंध असून, शेवटचा पेशवा बाजीराव हा याचा मुलगा होता; आणि तिसरा

त्याचे मुलगे.

---

१ त्याणें आपल्या गुरूस याप्रमाणें लिहिलें आहे. "मी अडचणी, कर्ज, व निराशा, यांत गुंतून गेलों आहें, आणि विष पिण्यास तयार असणारा मनुष्य जसा असतो तसा आहें. राजाजवळ माझे शत्रु आहेत, आणि या वेळींच मी सातान्यास गेलों, तर ते माझा उरावर पाय ठेवितील; जर मला मरण येईल तर मी ईश्वराचा आभारी होईन."

**समशेर बहादुर** ह्मणून एका **मुसलमानी** राखेपासून झालेला **मुसलमानी** धर्मात वागणारा अनौरस पुत्र होता. त्यास त्याणें बुंदेलखंडांतील आपला सर्व मुलुक, व आपले सर्व हक्क दिले.

बाजीरावाच्या मरणापूर्वीच्या कोंकणांतील लढाया.

**बाजीरावाचा** कारकीर्दीचा अखेरीस तो **कोंकणांतील** लढायांमध्यें गुंतला होता. त्या लढाया मुख्यत्वेंकरून त्याचा भाऊ **चिमणाजी** याणें चालविल्या होत्या. त्यांत त्याचे शत्रु किल्ल्यांतून व बेटांतून राहत असत, तेथें त्यांस एके बाजूनें समुद्राचा व दुसरे बाजूनें डोंगर व रानें यांचा आश्रय असे; यामुळें **चिमणाजीस** विलक्षण श्रम करावे लागले, आणि तेहि करून पुरी कार्यसिद्धि झाली नाहीं.

आंगऱ्याबाबर.

त्याचे ते शत्रु तीन होते; एक **कुलाबचे आंगऱ्ये**; दुसरे **जंजीरकर हबशी**, व तिसरे **पोर्टुगीस** ह्मणजे **फिरंगी** लोक. **आंगऱ्या** याणें शाहूराजाचें आधिपत्य कबूल केल्यावर, तो नावास मात्र **मराठ्यांचा** तंत्रानें होता. परंतु तो आपलें बळ आपल्याच सत्तेनें खचित असे. त्याजवर बहुधा **पेशव्यांचा** अम्मल नसे. तो चांचेपणा करून समुद्रांत चोऱ्या करी; त्या चोऱ्यांस तो "समुद्रावरील चौथाई घेणें" असें ह्मणत असे; व तेणेंकरून जवळचा राज्यांस त्याची दहशत असे. त्याजवर पुष्कळ आरमारांनिशीं इंग्लिशांनीं वारंवार हल्ले केले होते; त्यांत एके प्रसंगीं त्यांस ( इ० स० १७१९त ) **पोर्टुगीस** लोक सहाय होते; तथापि त्यांचे सर्व यत्न व्यर्थ गेले. डच लोकांनींहि पुढें (इ० स० १७२४ त,) त्यावर मजबूद फौज पाठविली; परंतु

तीहि फुकट गेली. पुढें (इ० स० १७३४ चा सुमारें) पेशव्यानें आंग्र्याचा वंशांतील दोघां भावांचा तंटा चालला होता त्यांत मध्यस्थी केली; तिजमध्यें एका भावाचे घाटामध्यें दोन किल्ले होते ते त्यापासून यास मिळाले. तथापि तें भांडण चाललेंच होतें, आणि पुढें पुढें जरी पेशव्याचा मदतीस एक इंग्रेजांचें आरमार होतें, तरी बाजीराव मरेपर्यंत तो तंटा संपविण्याची त्याची प्राप्ति झाली नाहीं.

जंजीरकर हबशी यांजबराबर लढाई.

जंजीरकर हबशी यांजबराबरील लढाईचा याहूनहि वाईट परिणाम झाला. त्या मुसलमानांचेंहि आंग्र्यासारखेंच बलाढ्य आरमार होतें; शिवाय ते मराठ्यांचा प्रांतांत लूट करित असत, आणि त्यांणीं कांहीं मराठ्यांचे किल्लेहि बळकाविले होते. पेशव्याचा लढायांमुळें त्यांणीं वरील हल्ले करण्याचें मवकूफ केलें, एवढा काय तो शिकस्त परिणाम झाला.

पोर्तुगीस लोकांशीं लढाई.

पेशव्याची आंग्र्याबराबर लढाई चालत असतां, तींतून फिरंगी लोकांबरावरील लढाई उद्भवली (इ० स० १७३७). तीमध्यें साष्टी, वसई व त्यांनजीकचा फिरंगी लोकांचा दुसरा कोंकणांतील मुलुक इतका सर्व पेशव्यांनीं घेतला (इ० स० १७३९). त्यांतून वसईचा वेढ्याचा कामांत मराठ्यांचे ५००० लोक घायाळ झाले, व मारले गेले, असें ते स्वतःच कबूल करितात. त्यावरून वरील मुलुक घेतांना त्यांस किती प्रयास पडले असतील त्याचें अनुमान करितां येईल.

बाळाजीरावाविषयीं.

बाजीराव मरण पावला, त्या वेळीं त्याचा राज्यांत जा संकटांचा वाव्हटळी सुटल्या होत्या तींहींकरून त्याचा मागून गादीवर बसणारा, त्याचा

मुलगा, हा, गुदमरून जावा असें कदाचित् आपल्या मनांत येईल; परंतु बाळाजीराव हा जरी दुसऱ्या गोष्टींनीं आपल्या बापापेक्षां कसाहि कमी होता, तरी व्यवहारचातुर्यामध्यें निदानपक्ष त्याचा बराबरीचा तरी होता; आणि त्या वेळीं कांहीं हितावह गोष्टी घडून आल्या त्यांचा त्याणें मोठ्या कौशल्यानें उपयोग केला; तेणेंकरून जा संकटांनीं त्यास वेढिलें होतें, त्यांतून त्याची सुटका झाली.

बाजीरावाचे गृहशत्रु.

बाजीराव हा नासिरजंगापासून पराभव पावला, व शिवाय जा दुसऱ्या अडचणी त्यास प्राप्त झाल्या, त्यांचें कारण त्यास पैक्याची तंगी पडली होती, हें एक, व दुसरें, त्यास त्याचाच घरामध्यें कांहीं शत्रूहि उत्पन्न झाले होते; त्यांमध्यें प्रतिनिधि, रघोजी भोंसला, व दमाजी गायकवाड, हे मुख्य होते.

प्रतिनिधि.

त्यांतून पहिला प्रतिनिधि, हा याचा वंशाचा जुनाच प्रतिस्पर्धी होता, आणि जरी तो मोडला होता, तरी त्यापासून अद्यापिहि भीति होती.

रघोजी भोंसला.

भोंसले हे पुढें वऱ्हाड प्रांताचे राजे झाले. त्यांचा वंशाचा मूळपुरुष परसोजी हा साताऱ्याजवळून आलेला घोडेस्वार होता. त्याचें आडनाव शिवाजीसारखेंच होतें, परंतु तो त्याच कुळांतला असें म्हणण्यास कांहीं प्रमाण नाहीं. असें असतां तो नावास चढला, आणि जेव्हां राजा शाहू दिल्लीहून परत आला, तेव्हां जे लोक प्रथम त्यास जाऊन मिळाले, त्यांत हा होता. म्हणून त्यास त्या राजानें आणखी रूपास चढवून, वऱ्हाड प्रांत व त्याचा पूर्वेकडील जंगली प्रदेश यांतील मराठ्यांचे हक्क वसूल करण्याचा अधिकार दिला. तो

मरण पावला तेव्हां त्याचा मुलास त्याचा अधिकार मिळावा; परंतु त्याचा पुतण्या रघोजी हा शाहू राजाचा प्यारा असून त्याची मेहुणी यास दिलेली होती. त्यासच राजानें परसोजीचें काम दिलें. नर्मदेचा उत्तरेकडील जो मुलुक पेशव्यास तोडून दिला होता त्यांत तो रघोजी खंडण्या घेत असे, तेणेंकरून त्याचा पेशव्यास राग आला होता; तसाच रघोजीस दत्तक घेऊन भोंसल्यांचें नाव काईम राखावें, असें स्वतः रघोजीच शाहू राजाकडून आग्रहानें कबूल करवील अशा भीतीमुळेंहि पेशवा रघोजीचा द्वेष करित असे.

दमाजी गायकवाड.

गुजराथचा संस्थानी दाभाडा हा पेशव्याचा दुसरा प्रतिस्पर्धी होता. त्याचा पालनकर्ता गायकवाड हा होता. तो दाभाडा अगदीं मूर्ख व बाहेरख्याली असल्यामुळें कामाचा अगदीं निरुपयोगी होता, ह्मणून गायकवाड हा त्याचा सांमत कुलअखत्यारीच झाला होता.

याशिवाय बाजीरावास त्याचा लश्करी स्वाऱ्यांपासून अतिशय कर्ज झालें, आणि त्या वेळीं देश गरीब झालेला असल्यामुळें आणि लढाईची रीतिहि फिरल्यामुळें, लढायांपासून त्यांचा खर्च निघेनासा झाला; हें बाजीरावास शेवटचें संकट प्राप्त झालें होतें. त्याचा मुख्य धनको बारामतीकर हा होता. तो कांहीं पदवीनेंहि मोठा असून, त्याची संपत्ति अपार होती. त्याचा मागण्याप्रमाणें पेशव्यांकडून त्यास द्रव्य न प्राप्त झाल्यामुळें त्याचे व बाजीरावाचे तंटे झाले; आणि तुझा हक्कांस मी पाठपुरावा करीन, आणि बाजीरावाचा मागें पेशवाईचा बंदोबस्तांत मी तुझें नुकसानहि भरून देईन असें वचन देऊन त्यास रघोजीनें

आपल्या कुमकेस घेतलें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें रघोजी करनाटकांत स्वारीस गेला होता, आणि तो त्रिचिनापल्लीस वेढा देत होता, तेव्हां त्यास पेशवा मरण पावला हें वर्तमान समजलें. नंतर तो तत्क्षणींच बाळाजीचा आड येण्याकरितां त्वरेनें सातान्यास आला, तथापि त्यास आपली बहुतेक फौज मागें ठेवावी लागली; शिवाय त्याचा अभिप्राय जसा पेशव्याचा अभिप्रायापासून वेगळा होता, तसाच प्रतिनिधीचाशींहि मिळता नव्हता, ह्मणून प्रतिनिधीचा व याचा एक विचार नव्हता. तसाच दमाजी गायकवाड हा त्या वेळीं लढावयास सिध्ध नव्हता; आणि नासिरजंगानें बाजीरावाचा मरणानंतर लवकरच आपल्या बापावर बंड केलें होतें, म्हणून मराठ्यांचा या भाडणांपासून आपलें हित करून घेण्यास त्यास अवकाश नव्हता. असें असतां, इकडे बाळाजी पूर्वींच राजधानीजवळ होता; त्याचा चुलता चिमणाजी आपा हा त्याचा बापाची कांहीं फौज घेऊन त्यास मिळाला होता, आणि दुसरे लोकहि पाहिजे त्या कामास लावावयास जवळच होते; तसेच राजाचा सभोंवते याचाच अन्नाचे लोक होते, आणि त्यांतहि बाळाजी हा सर्व ब्राह्मणकळींतील प्रमुख होता ही सर्वांहून मोठी गोष्ट होती, कारण सर्व कारभार, त्याचा शत्रूंचा सुध्धांहि, त्याच जातीचा लोकांचा हातीं होता, यामुळें प्रत्येक भांडणांत याचें अतिशय हित होत असे. या सर्व कारणांस्तव सर्व विरुध्ध लोकांचा

बाळाजीस पेशवाईचें काम न मिळावें याविषयीं त्यांचा मसलती.

मरण पावला तेव्हां त्याचा मुलास त्याचा अधिकार मिळावा; परंतु त्याचा पुतण्या **र**घोजी हा शाहू राजाचा प्यारा असून त्याची मेहुणी यास दिलेली होती. त्यासच राजानें **पर**सोजीचें काम दिलें. **न**र्मदेचा उत्तरेकडील जो मुलुक **पे**शव्यास तोडून दिला होता त्यांत तो **र**घोजी खंडण्या घेत असे, तेणेंकरून त्याचा **पे**शव्यास राग आला होता; तसाच **र**घोजीस दत्तक घेऊन **भों**सल्यांचें नाव काईम राखावें, असें स्वतः **र**घोजीच शाहू राजाकडून आग्रहानें कबूल करवील अशा भीतीमुळेंहि **पे**शवा **र**घोजीचा द्वेष करित

दमाजी गायकवाड.

असे. **गु**जराथचा संस्थानी **दा**भाडा हा **पे**शव्याचा दुसरा प्रतिस्पर्धी होता. त्याचा पालनकर्त्ता **गा**यकवाड हा होता. तो **दा**भाडा अगदीं मूर्ख व बाहेरख्याली असल्यामुळें कामाचा अगदीं निरुपयोगी होता, ह्मणून **गा**यकवाड हा त्याचा सांप्रत कुलअखत्यारीच झाला होता.

याशिवाय **बा**जीरावास त्याचा लश्करी स्वाऱ्यांपासून अतिशय कर्ज झालें, आणि त्या वेळीं देश गरीब झालेला असल्यामुळें आणि लढाईची रीतिहि फिरल्यामुळें, लढायांपासून त्यांचा खर्च निघेनासा झाला; हें **बा**जीरावास शेवटचें संकट प्राप्त झालें होतें. त्याचा मुख्य धनको **बा**रामतीकर हा होता. तो कांहीं पदवीनेंहि मोठा असून, त्याची संपत्ति अपार होती. त्याचा मागण्याप्रमाणें **पे**शव्यांकडून त्यास द्रव्य न प्राप्त झाल्यामुळें त्याचे व **बा**जीरावाचे तंटे झाले; आणि तुझा हक्कांस मी पाठपुरावा करीन, आणि **बा**जीरावाचा मागें **पे**शवाईचा बंदोबस्तांत मी तुझें नुकसानहि भरून देईन असें वचन देऊन त्यास **र**घोजीनें

आपल्या कुमकेस घेतलें.

बाळाजीस पेशवाईचें काम न मिळावें याविषयीं त्यांचा मसलती.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें रघोजी करनाटकांत स्वारीस गेला होता, आणि तो त्रिचिनापल्लीस वेढा देत होता, तेव्हां त्यास पेशवा मरण पावला हें वर्तमान समजलें. नंतर तो तत्क्षणींच बाळाजीचा आड येण्याकरितां त्वरेनें सातान्यास आला, तथापि त्यास आपली बहुतेक फौज मागें ठेवावी लागली; शिवाय त्याचा अभिप्राय जसा पेशव्याचा अभिप्रायापासून वेगळा होता, तसाच प्रतिनिधीचाशींहि मिळता नव्हता, ह्मणून प्रतिनिधीचा व याचा एक विचार नव्हता. तसाच दमाजी गायकवाड हा त्या वेळीं लढावयास सिद्ध नव्हता; आणि नासिरजंगानें बाजीरावाचा मरणानंतर लवकरच आपल्या बापावर बंड केलें होतें, म्हणून मराठ्यांचा या भाडणांपासून आपलें हित करून घेण्यास त्यास अवकाश नव्हता. असें असतां, इकडे बाळाजी पूर्वींच राजधानीजवळ होता; त्याचा चुलता चिमणाजी आपा हा त्याचा बापाची कांहीं फौज घेऊन त्यास मिळाला होता, आणि दुसरे लोकहि पाहिजे त्या कामास लावावयास जवळच होते; तसेच राजाचा सभोंवते याचाच अन्नाचे लोक होते, आणि त्यांतहि बाळाजी हा सर्व ब्राह्मणफळींतील प्रमुख होता ही सर्वांहून मोठी गोष्ट होती, कारण सर्व कारभार, त्याचा शत्रूंचा सुद्धांहि, त्याच जातीचा लोकांचा हातीं होता, यामुळें प्रत्येक भांडणांत याचें अतिशय हित होत असे. या सर्व कारणांस्तव सर्व विरुद्ध लोकांचा

इ० स० १७४० आगस्ट.

नाकावर पाय ठेवून बाळाजीराव हा पेशवाईंचा कामावर नेमला गेला; मग रघोजी त्रिचिनापल्ली एथें परत जाऊन आपल्या फौजेंत मिळाला, आणि अशी बाणी फिरल्यामुळें त्याजबराबर बारामतीकर हाहि आनंदानें निघून गेला. असा बाळाजीचा उत्कर्ष झाला, तथापि आपलें कर्ज वारण्याचा कामांत त्याणें उद्योग करावयाचा कमी केला नाहीं, आणि त्याचा स्वभावामुळें तो या कामास बापापेक्षां अधिक योग्य होता.

बाळाजीची कार्यसिद्धि झाली.

राज्याची आंतील व्यवस्था करण्यामध्यें एका वर्षाहून कांहीं जास्त मुदत गुजरल्यानंतर, हिंदुस्थानांतील पेशव्यांचा हक्कांवर रघोजी भोंसला याणें कांहीं हात टाकिला होता, तिकडे बाळाजीनें आपलें लक्ष लाविलें. या कारणास्तव नर्मदेचा उत्तरेकडील मुलुकांत मराठ्यांचे जे सर्व हक्क व खंडण्या त्यांची, गुजराथ प्रांत खेरीज करून, होईल ती जमाबंदी याणें राजाकडून आपल्याकडे स्पष्ट रीतीनें लावून घेतली. हें राजाचें देणें पक्कें करण्याकरितां, रघोजी भोंसल्याची हालचाल जेथून सोप्या रीतीनें बंद करितां येईल अशा ठिकाणीं जाण्याकरितां बाळाजीराव निघून गेला. तो नर्मदानदी उतरून गरा व मंडल हीं दोन ठिकाणें घेऊन प्रयागावर चाल करणार, इतक्यांत गुजराथेंतून दमाजी गाईकवाडानें माळव्यावर हल्ला केला, तेणेंकरून यास परत यावें लागलें. रघोजी भोंसला याचा वर्तीनें कांहीं मरदूमी करावी एवढाच बहुधा दमाजीचा उद्देश होता; तो बाळाजीराव येतांच माघारा गेला. पूर्वी असोफजापासून बाजीरावानें माळवाप्रांताची

बाळाजी माळव्यामध्यें कूच करून गेला.

जाहगीरी जुलमानें करून घेतली होती; त्या देहेनगीस बादशाहाची मंजूरी मिळावयाची ती इराणांतून नादिरशाहाची स्वारी आल्यामुळें तहकूब राहिली होती; सांप्रत माळवाप्रांतांत असतां मंजूरीविषयीं दिल्लीचा दरबारास आग्रह करण्याची बाळाजीनें संधि साधली. जे रघोजीचे हल्ले बंद करण्याची याची इच्छा होती, त्या हल्ल्यांनींच त्याचे दिल्ली एथील वरील कार्योद्देश सोप्या रीतीनें तडीस गेले.

रघोजी भोंसला याणें बंगाल्यावर स्वारी केली.

रघोजी भोंसला याणें करनाटकांतून परत आल्यावर आपल्या भास्कर पंडित नामें प्रधानाबरोबर बंगाल्यांत फौज पाठविली होती; तिणें तो प्रांत उध्वस्त केला. तेथील सरसुभेदार अलिवर्दि खान हा होता. त्याचें लश्कर जेव्हां जमलेलें असे तेव्हां रघोजीचे लोक दक्षिणेकडील व पश्चिमेकडील डोंगरांत लपून राहत, आणि जेव्हां त्याचें लश्कर चोहोंकडे पसरे, तेव्हां ते खुद्द त्यासहि भेवडावूं लागत. तथापि अलिवर्दि खानानें भास्करपंतास चांगलें तोंड दिलें; परंतु जेव्हां स्वतः रघोजी चालून आला, तेव्हां त्यास भीति पडली; आणि हा प्रांत गमवायाचा नसेल, तर मला या क्षणीं मदत पाठवावी ह्मणून त्याणें बादशाहास विनंती केली.

बादशाहानें बाळाजीरावास माळवाप्रांत शिस्तवार देऊन रघोजी भोंसल्यास मारण्याकरितां त्याचें सहाय्य संपादिलें.

बादशाहास आपण स्वतः दुर्बल आहों हें समजलेंच होतें, म्हणून सादत खानाचा मागून त्याचा मुलगा सफ्दरजंग अयोध्येचा सरसुभेदार झाला होता त्यास तें काम पतकरण्यास बादशाहानें हुकूम केला, आणि त्याहून चांगल्या रीतीनें रघोजीचा बंदोबस्त करण्याकरितां बाळाजीरावास माळवाप्रांताचा जाहगीरीची

मंजूरी देऊन त्यास मदतीस बोलाविलें. या आमंत्रणापेक्षां अधिक प्रियकर अशी बाळाजीरावास कोणतीहि गोष्ट झाली नसती. तो लागलाच प्रयाग व बहार यांचा वाटेनें बंगालची राजधानी मुर्शिदाबाद एथें पोंचला, तों रघोजी नैर्ऋत्येकडून चाल करून येत होता, त्यापासून त्या राजधानीचें संरक्षण करण्यास बाळाजी वेळेवर ठेपला. बंगालप्रांताचा वसूलबाकीपैकीं दिल्लीचा दरबारानें त्यास जी नेमणूक तोडून दिली होती, तिचा ऐवज मुर्शिदाबाद एथें अलिवर्दि खान याणें त्यास दिला. याप्रमाणें बादशाहाचा पक्ष स्वीकारल्याबद्दल त्यास चांगलें द्रव्य मिळालें; म्हणून त्या पक्षाविषयीं विशेष आर्त होऊन तो रघोजीवर चालून गेला.

बाळाजीनें रघोजीचा पराजय करून त्यास हांकून लाविलें. इ० स० १७४३, हि० स० ११५६.

रघोजी त्याचा पुढें हटत जात होता; परंतु बाळाजीनें त्यास गांठून त्याचा पराजय करून त्याचें सर्व बारबरदारीचें सामान हिरावून घेतलें, आणि त्यास त्या प्रांतांतून मुळींच हांकून लाविलें. ही फत्ते केल्यानंतर बाळाजी परत माळव्यांत आला, आणि तेथून कांहीं वेळानंतर सातान्यास परत येण्याकरितां निघाला.

---

२ कप्तान ग्रांट डफ्फ सांगतो, कीं इ०स० १७४३त पेशव्यानें रघोजीस काढून लाविलें, तेथपर्यंत ही जाहगीरी बहाल झाली नव्हती; आणि कदाचित् तेथपर्यंत तो प्रान्त कायदेशीर पेशव्याचा ताब्यांतहि दिला नसेल; परंतु डफ्फ साहेबाचाच इतिहासांत या देहेनगीचा सनदेचा सारांश दिलेला आहे; त्यांत महम्मदशाहाचा कारकीर्दीचा चोविसाव्या वर्षी जमादिउलूअवलू या महिन्यांत ती लिहिली, असें लिहिलें आहे: तो वेळ इ०स० १७४२ माहे मेचा सुमारें होतो. बाळाजीनें पादशाहाचा तैनातीस १२,००० स्वार ठेवावे, त्यांपैकी ४,००० चा रोजमुरा बाळाजीनें द्यावा, व ८,००० चा पादशाहाकडून पोंचावा असें होतें.

त्या वेळीं पेशव्यास सातारा एथें स्वतः असण्याची जितकी जरूर होती तितकी कधींच नव्हती. कारण रघोजी बंगाल्याहून परत आल्यावर बाळाजीराव नाहीं अशा संधींत आपलें हित करून घेण्याचा निश्चय करून साताऱ्यावर भर कूच करून चालला होता; दमाजी गायकवाड हाहि गुजराथेंतून येत होता; आणि प्रतिनिधि हा जरी स्वतः आजारानें शक्तिक्षीण झाला होता, तरी त्याचा मुतालिक रघोजीस मदत करण्याचा भर तयारींत होता. हा जो बाळाजीवर कट झाला त्याचा सामर्थ्याविषयीं त्याचा मनांत मोठा आभाव उत्पन्न झाला असावा; कारण इतके पराक्रम करून भांडून नर्मदेचा पलीकडील प्रदेशांत जे हक्क त्याणें आपणा स्वतांसाठींच मिळविले होते, ते देऊन त्याणें तो कट मोडिला; एवढी त्या कटाची त्यास योग्यता वाटली होती. त्याणें सर्व बंगाल व बहार या प्रांतांत खंडणी वसूल करण्याचा हक्क रघोजीस दिला, आणि प्रयाग व अयोध्या यांतीलहि दिला असावा. या बंदोबस्तामुळें त्या कटांतील दुसऱ्या लोकांस आश्रय नाहींसा झाला; परंतु पेशव्यास आपले उद्देश तडीस नेण्याकरितां त्यांशीं थातुलमातुल करणें हें योग्य दिसलें. याप्रमाणें जा वादळापासून एवढा बखेडा होणार अशी भीति दिसत होती, तें गडबड न होतां शांत झालें. बाळाजीनें रघोजीस जी देणगी दिली, ती वास्तविक राज्यरीतीचा विचारावरून दिली, असें दिसतें. कारण तेव्हांपासून त्याची दृष्टि पूर्वेकडील प्रांतावर लागली, आणि गादीवर बसण्याविषयीं जी

पेशव्यावर नवीन कट.

त्याणें पुष्कळ देहेनगी देऊन रघोजीस फितूर केला. इ०स०१७४४ हि० स० ११५७.

त्याची मसलत होती, ती त्याणें एकीकडे ठेविली असें दिसतें.

रघोजीनें पुनःबंगाल्यावर स्वारी केली.

पुढें पाहतां रघोजीस बंगाल्यामध्येंच खरोखर पुरेसें झालें. नंतर त्याणें त्या प्रांतांत भास्करपंडितास पुनः पाठविलें. त्याणें लढाईत जय मिळविला; परंतु अलिवर्दि खान याणें त्यास फसवून भेटीस आणिलें, आणि विश्वासघात करून मारून टाकिलें, व त्याच वेळीं त्याचा फौजेवर हल्ला करून तिची वाताहत केली. याप्रमाणें कांहीं काळपर्यंत बंगालप्रांत मराठ्यांचा हातून सुटला. वरील लढायांत, मुस्तफा खान नामें प्रख्यात सरदाराचा हाताखालीं एक अफगाणांची टोळी होती, तिजवर, अलिवर्दि खानाचा मुख्यत्वेंकरून भरवसा असे. असें असून सांप्रत त्या लोकांबरावर त्याणें तंटा केला. त्या वेळीं एक मोठें बंड झालें. ती संधि रघोजीनें साधली: पुढें शेवटीं तें बंड मोडलें गेलें, व भांडणाऱ्या पक्षांचा लोकांस दुसरे पुष्कळ प्रसंग प्राप्त झाले; तथापि शेवटीं रघोजीचा जय झाला, आणि इ० स० १७५१ त अलिवर्दि खान मरण्यापूर्वीं थोड्याच दिवसांवर त्यास, ओंवढ्या ऊर्फ उढीसा देशाचा दक्षिणभाग ह्मणजे, कटकप्रांत हा मिळाला, व बंगालची चौथाई ऊर्फ खंडणी बदल १२,००,००० रुपये तेथील सुभेदारानें त्यास द्यावे असा ठराव झाला.

त्याचा सरदारास बंगालचा सरसुभेदारानें ठार मारिलें. इ० स० १७४५, हि० स० ११५८.

शेवटीं त्याला बंगालची चौथाई व कटक प्रांताची जाहगीर, हीं मिळालीं.

या सर्व वेळांमध्यें दक्षिणेंत मोगलांचा तर्फेनें मराठे लोकांस अगदीं बखेडे झाले नाहींत. पुढें इ० स० १७४१ त असोफजाचा दुसरा मुलगा नासिरजंग याणें बंड केल्यामुळें असोफजास दिल्लीहून दक्षिणेंत यावें लागलें. तें बंड संपलें, इतक्यांत अर्काटचा मांडलिक संस्थानांत बखेडे उत्पन्न होऊन त्यांत हा गुंतला गेला, व त्या कामांतच पडलेला असतां तो मरण पावला; त्या वेळीं त्याचें वय ७७ वर्षांचें होतें.

असोफजाचें वर्तमान.

नासिरजंगाचें बेड. असोफजा दक्षिणेंत परत आला. तो मरण पावला. इ० स० १७४८, जून; हि० स० ११६१, जमादि उसानी.

तो मेल्यामुळें त्याचा मुलांत तंटे लागले; परंतु त्यांचा हिंदुस्थानाचा इतर भागांतील गोष्टींशीं संबंध नसून, त्यांत मुख्यत्वेंकरून फ्रेंच व इंग्लिश या लोकांनीं खेळ केले; यास्तव त्यांचा हकीकती सांगण्याचा जेव्हां वेळ येईल, तेव्हां त्या गोष्टींची उत्तम रीतीनें समजूत होईल.

असोफजा मेला त्यापुढील वर्ष संपण्याचा अगोदरच शाहूराजा मरण पावला. जा प्रसंगाचा तयारीविषयीं पेशव्याचा सार्वकाळ उद्योग होता, व जापासून त्याचा व त्याचा वंशजांचा दैवाची परीक्षा व्हावयाची होती, तो प्रसंग शाहू राजाचा मरणानें निर्माण झाला.

शाहू राजा मरण पावला, इ० स० १७४९ सुमारें माहे डिसेंबर.

शाहूस संतती नव्हती, तेव्हां त्याणें दत्तक घ्यावा हें हिंदुचालीप्रमाणें अवश्य होतें, व तो घेणें तो आपल्या दायादांतूनच घ्यावा, हाहि बंद त्या चालीनेंच केलेला होता. कोल्हापुरचा राजा हा शाहूचा अगदीं जवळचा नातलग होता; त्यामुळें त्याचा हक्क

गादीविषयीं मसलती व तंटे.

एकीकडे ठेवणें ह्मणजे न पाहणें हें, मूळींच फार कठीण असून, शाहूची स्त्री सावित्रीबाई इशीं त्याचें नातें जवळ होतें; त्या नात्याचा त्यास आश्रय होता, आणि सावित्रीबाई ही पेशव्याची प्रतिस्पर्धी व शत्रु होती.

जसा मराठ्यांचा राज्याचा सर्व कारभार बाळाजीचा स्वाधीन होता, तशीच खुद्द राजाची वर्तणूक त्याचा बायकोचा लगामेंत होती; कारण अलीकडे तो ( वृद्ध झाल्यावर ) बुद्धिहीन होऊन गेल्यामुळें, स्वतः सारासार विचार करण्याची त्यास शक्ति नव्हती, ह्मणून कोल्हापुरचा राजास दत्तक घेण्याविषयीं आग्रह करून ती शाहूस कबूल करील अशी नेहमीं भीति होती; इकडे बाळाजीजवळ तसा वारीस कोणी नव्हता, आणि तूर्तच स्वतांचा नावानें राज्य बळकाविणें हें करणें कठीण होतें, यामुळें तिचा पूर्वी आपण दुसरा बंदोबस्त करणें हेंहि अशक्य झालें होतें. अशा अडचणीचा वेळीं त्याणें एक युक्ति योजिली ती ब्राह्मणजातीचा धूर्तपणास चांगली साजन्ये.

बाळाजीचें चातुर्य व धीटपणा.

ती अशीः— राजारामाची विधवा ताराबाई ही, आपला मुलगा दुसरा शिवाजी, याचा हक्काविषयीं शाहूचा विरुद्ध भांडत होती. ती सांप्रत वृद्ध झाली होती, परंतु अद्यापि जीवंत होती, आणि जरी तिचा पेशव्यावरील द्वेष कमी झाला नव्हता, तरी आपला पगडा पुनः चालूं लागेल या आशेनें लोभाविष्ट होऊन ती त्याचा मसलतींत शिरली. हा बेत सिद्धीस नेण्याकरितां शाहूस गुप्त रीतीनें कांहीं द्वारानें अशी बातमी पाठविली, कीं दुसरा शिवाजी मरण पावल्यानंतर त्यास झालेला एक पुत्र ताराबाईनें लपवून ठेविलेला

अद्यापि जीवंत आहे. हा कल्पनेनें काढिलेला नवा शोध शाहूनें पेशव्यास कळविला; तेव्हां याविषयीं ताराबाईला विचारावें, असा निश्चय ठरला. तिणें ती गोष्ट लागलीच कबूल केली, हें सहजच लक्षांत येईल; परंतु या सर्व गोष्टींस विरुद्ध पक्षाचे लोक हंसूं लागले, आणि त्या गोष्टीनें जी राजाचा मनांत भूल उत्पन्न झाली तिला अनुसरून त्याणें वर्तूं नये, ह्मणून साविन्नीबाईनें आपली दक्षता दुप्पट वाढविली. दत्तविधान झाल्यास तें कांहीं तरी प्रसिद्ध रीतीनें होईल, असें समजून ती निर्धास्त होती; परंतु बाळाजीनें तिला मोठ्या लुच्चाईचा तडाका मारून फसविलें: ही लुच्चाई तिचा मनांतहि आली नसेल; ती अशी, कीं ताराबाईचा नातू गादीवर बसवून त्याचा द्वारें शिवाजीचा वंशांत राज्याची किताबत व अब्रू हीं पेशव्यांनीं राखावीं, आणि राजानें आपला सर्व राज्याचा अधिकार पेशव्यांस द्यावा असा करारनामा राजानें सही करून दिला. हा मोठा अगत्याचा कागद बाळाजी व राजा यांचा एका गुप्त भेटीचा वेळीं झाला, असें ह्मणतात; परंतु त्यावरील राजाची सही ( खरी असल्यास ) समजूतीनें मिळाली, किंवा ठकवून घेतली; हा कागद बाहेर केव्हां काढिला, व त्या वेळीं याचा खरेपणा कितपत कबूल झाला होता; या सर्व गोष्टींविषयीं अद्यापि गोंधळ आहे, आणि पुढें जा गोष्टी घडून आल्या, त्यांमध्यें बाळाजी, व ताराबाई यांची जी वर्तणूक होती, तिजवरून तो गोंधळ अधिकच होतो; त्या गोष्टींविषयीं पुढें वर्णन येईल.

शाहूनें बाळाजीचा वतीनें राज्याचा राजीनामा दिला असें ह्मणूं लागले.

---

३ ग्रांट डफ याचा इतिहासांत जा झालेल्या गोष्टी सांगितल्या

बाळाजी राज्य करूं लागला; शाहू मरण पावला, तेव्हां पेशव्यानें सातारा एथें दुसरें एक लश्कर बलाविलें, आणि आपल्या विरुद्ध फळींतील मुख्यास पकडलें. नंतर त्याणें ताराबाईचा नातू यास रामराजा असा किताब देऊन त्याचा नावानें द्वाही फिरविली, आणि ताराबाईचें वजन आपल्या उपयोगीं पडावें, या बुद्धीनें तें वाढण्याचे उपाय केले. अशी तयारी करून मोठमोठ्या

इ०स० १७५० सरदारांचा कबूलातीनें ही नवी व्यवस्था मुकरर व्हावी ह्मणून त्याणें त्यांस दरबारांत बोलाविलें. दमाजी गायकवाड आला नाहीं; परंतु रघोजी भोंसला, याणें दोस्ताप्रमाणें येऊन कांहीं वरवर चौकशी केली, आणि रामराजास गादीवर बसविला, हें कबूल केलें. पूर्वीं दिलेल्या देणग्या त्याजकडे कायम करून प्रतिनिधीचा सर्व मुलुक जप्त झाला होता त्यांतून कांहीं आणखी त्यास मिळाला. नवीन सरकाराशीं ओढा राहवा या हिशेबानें दुसऱ्या निरनिराळ्या सरदारांचें पेशव्यानें हित केलें; आणि इतर सरदारांस दिलेला लहान तुकडा खेरीज करून माळव्याचा वसूलाची नेमणूक शिंदे व होळकर यांस सर्व मिळाली.[४]

पेशव्याचा अधिकाराची पक्की संस्थापना होईपर्यंत

---

आहेत, त्यांहून दुसऱ्या मजजवळ नाहींत; परंतु रामराजाचा मूळ पिठिकेचा खरेपणाविषयीं, व शाहूनें आपलें राज्य पेशव्यास दिलें तें वास्तविक खुशीनें किंवा काय, या दोन्ही गोष्टींविषयीं माझे सिद्धांत त्या ग्रंथकाराचांपासून कांहींसे निराळे झाले आहेत.

(४) ७५,००,००० रुपयांची नेमणूक होळकरास, ६५,००,००० रुपयांची नेमणूक शिंद्यास, व १०,००,००० पंवार व दुसरे सरदार लोक यांस; मिळून १,५०,००,००. रुपये सर्व महसूल होता.

आणखीहि लोकांनीं बंडें केलीं; त्यांत त्याचा चुलत भाऊ सदाशिवभाऊ याचा व त्याचा थोडा वेळपर्यंत तंटा झाला होता, तेणेंकरून त्याचा सत्तेस मोठा अपाय आला होता. शेवटीं बाळाजीरावाचा राज्याची पुरी स्थापना होऊन त्यास परराज्यांचा कारभारांत हात घालण्यास फावलें. त्यानंतर त्याणें असोफजाचा मुलगा ग्यासुद्दीन खान याचा पक्ष स्वीकारिला, आणि असोफजाचा गादीकरितां पूर्वींचे दोघे भांडणारे आपसांत लढाई करून मरण पावल्यावर, त्याचा तिसरा मुलगा सलाबतजंग त्याचा गादीवर बसला होता, त्याजबराबर हा लढावयास गेला. त्यापूर्वींच त्याणें आपली गादी पुणें एथें नेली होती; आणि सांप्रत रामराजास सातारा एथें भरपूर मोकळा, परंतु ताराबाईचा तंत्रानें, ठेवून हा निजामाचा मुलुकांत जाऊन सलाबतजंगाचा फौजे नजीक ठेपला होता; इतक्यांत त्यास कांहीं वर्तमान लागलें, तेणेंकरून हातांतील काम सोडून लांबलांब मजला करून त्यास स्वदेशास परत यावें लागलें. तो प्रकार असाः— ताराबाईचा लोभ व व्रात्यपणा, हीं, ती झातारी झाली तरी, नरम आलीं नव्हतीं; बाळाजीराव वरील लढाईस निघून गेला नाहीं इतक्यांत, तुह्मी आपली फौज घेऊन साताऱ्यावर यावें असें दमाजी गायकवाडास तिणें बोलावणें पाठविलें, आणि त्याच वेळीं रामराजास आपला अधिकार बजाविण्याविषयीं तिणें सुचें केलें; परंतु आपल्या उद्देशास राजा प्रतिकूळ आहे असें पाहून तिणें, दमाजी जवळ आला त्या संधींत, राजास पकडून अंधारकोठडींत टाकिलें.

असोफजाचा मुलगा सलाबतजंग यावर तो चालून गेला.

ताराबाई व दमाजी गायकवाड यांचा बंडामुळें त्यास परत यावें लागलें.

तो बंदींत असतांहि त्याचें नाव सांगणें हें तिचा स्वाधीन होतें; परंतु तसें न करितां, हा धुतारा आहे असें तिणें सर्वत्र प्रसिद्ध करून, ती स्वतांचा जोरानें राज्यकारभार चालवूं लागली; त्याशिवाय पाहूं जातां तिला कांहीं अधिकार नव्हता.

पेशवा त्वरेनेंच परत आला होता तथापि त्या पूर्वींच त्याचा सरदारांनीं गायकवाडाबरोबर पुष्कळ वेळा लढाया मारिल्या होत्या; त्यांत कितीएक वेळ यांचा जय होई, कित्येक वेळा गायकवाडाचा होई; परंतु जेव्हां बाळाजीराव येऊन पोंचला, तेव्हां याचेंच पारडें वर होतें; असें असूनहि त्या कपटी ब्राह्मणाचा तलवारीशिवाय दुसऱ्याच हत्यारांवर भरवसा होता. त्याणें दमाजीची व आपली भेट व्हावी असा योग आणिला, आणि त्या भेटीचा वेळीं विश्वासघातानें त्यास कैद केला; नंतर याप्रमाणें मुख्य सरदार नाहींसा झाल्यावर त्याचा फौजेवर हल्ला केला, आणि शेवटीं त्याचा लश्कराचा पुरा मोड करून वाताहत करून टाकिली. ताराबाईचें लश्करी बळ नाहींसें झालें, आणि तिचा राज्याविषयींचा हक्क तरी राजाचा हक्कावरून नव्हता; असें असतां, तिचें वजन बरेंच होतें, याचें कारण कांहीं सांगतां येत नाहीं, व तेणेंकरून पेशव्यास तिला चुरडतां आलें नाहीं. त्या वेळीं सलाबतजंग मराठ्यांवर चढ करून आल्यामुळें तिला मदत मिळाली; पूर्वीं सलाबतजंगाचा राज्यावर मराठ्यांनीं हल्ला केला होता, ह्मणून त्याणें सांप्रत त्यांचा राज्यावर केला. त्या वेळीं त्याजबराबर ५०० युरोपीयन; व ५,०००

बाळाजीनें दमाजीस विश्वासघातानें मारिलें.

सलाबतजंग चढाई करून पुण्यावर आला.

शिपाई इतकें फ्रेंचलोकांचें लश्कर, त्या लोकांचा हिंदुस्थानांतील अति विख्यात सरदार मोशूर बूसी, हा घेऊन मदतीस आला होता. यामुळें, औरंगझेबानंतर जे सर्व मराठ्यांवर स्वाऱ्या करून आले, त्यांपेक्षां याची तयारी भयंकर होती. मराठ्यांचा जा लढाई संबंधीं युक्ति होत्या, त्या जरी या प्रसंगीं बाळाजीनें उपयोगांत आणिल्या, तरी या नवीन शत्रूवर त्या युक्ति चालत नाहींत, असें लवकरच त्याचा अनुभवास आलें. बूसीनें त्याचे हल्ले हटविले, ( आडव्या तिडव्या वाटांनीं येऊन ) त्याचा छावण्यांवर हल्ले केले,आणि थोडक्या मुदतींत आपल्या स्वतांचा वर्चस्वाची छाप बसविली, त्या योगानें तें लश्कर पुण्यापासून दहा कोशांचा आंत येऊन ठेपलें. या वेळीं आपल्या नवीन राजधानीविषयीं बाळाजीस विशेष धास्ती वाटली होती, असें संभवत नाहीं; परंतु ताराबाई व कोल्हापुराचा राजा यांशीं सलाबतजंगाचा पत्रव्यवहार आहे हें पाहून तो भयाभीत होऊन तहाचें बोलणें लाविता झाला. तें बोलणें चालू होतें, इतक्यांत कांहीं अनपेक्षित कारणें घडून येऊन तो आपल्या शत्रूंपासून सुटला. तो प्रकारः— बूसी हा लढण्याचा कामांत सर्व लोकांहून कितीहि वरचढ असो, तथापि जा राजाचा जवळ तो चाकरीस होता, त्याचा इतर कारभाराचा तंत्रानें त्यास चालावें लागत असे; शिवाय सलाबतजंग व त्याचे प्रधान यांचा अव्यवस्थेनें त्याचा महसूलाचा गोंधळ झाला; त्याचा लश्कराचा

त्यांचें वर्चस्व.

मोशूर बूसी याविषयीं.

इ० स० १७५१, नोवेंबर.

सलाबतजंगाचा फौजेनें बंड केल्यामुळें बाळाजीचा बचाव झाला.

पगार चढला आणि लोकांत इतकी नाखुशी उत्पन्न झाली, कीं त्याची फौज बहुधा अगदीं हुकूम मानीनाशी झाली, त्या वेळीं रघोजी भोंसला यास नुकतीच, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, कटकप्रांताची जाहगीरी व बंगालची खंडणी, हीं मिळालीं होतीं. त्याणें निजामाकडील वऱ्हाडप्रांतावर हल्ला करून गावीलगड व नारनाळा हे किल्ले घेऊन आणखी लढाईची भीति पाडली.

इ० स० १७५२.

लढाई मवकूफ झाली.

याकरितां सलाबतजंग लढाई मवकूफ करून आपल्या देशास परत जाण्याविषयीं खुश झाला. पुढें लवकरच दुसऱ्या हरकती पेदा झाल्या, त्यांत मराठे लोकहि पुनः घालमेल करित होते.

दिल्लीकडील हकीकत पुढें चालू.

हिंदुस्थानाचे विभाग होऊन पुष्कळ राज्यें झालीं होतीं; त्यांचा निरनिराळ्या इतिहासाचा माग लावण्याची अवश्यकता असल्यामुळें एथें काळाचा अनुक्रम राखणें अवघड पडतें, आणि यामुळें दिल्लीची हकीकत जा वेळापर्यंत सांगण्यांत आली होती, त्यापुढें पुष्कळ वर्षे मराठ्यांची लिहिण्यांत आली आहे. आतां या मुदतींत दिल्लीकडील हकीकत बराच वेळपर्यंत सांगण्यासारखी नव्हती. इ० स० १७४१ त दक्षिणेंत येण्याकरितां असोफजा दिल्लीहून निघाल्यावर त्याच दरबारांतील जाग्यावर त्याचा मुलगा ग्यासुद्दीन झाला. त्याचा आणि वजीर कमूरुद्दीन खान याचा राज्यप्रकरणीं संबंध असून त्या प्रधानाचा मुलीशीं त्याचें लग्न झालेलें असल्यामुळें पहिल्या राजकीय संबंधास मजबूदी आली होती. त्यांचा एक मिलाफ झाल्यामुळें पुष्कळ मसलती व कट यांचा आड येण्यास ते समर्थ झाले.

त्या मसलतींत व कटांमध्यें उभय पक्षीं विश्वासघात व खून हे दोष जितके घडून आले, तितके पूर्वींचा इतिहासांत अति निकृष्ट काळांतहि घडले नाहींत.

वरील मुदतींत गंगेचा पूर्वेकडील, अयोध्येपासून पहाडापर्यंत, देश हा एका रोहिले जातीचा अफगाणांचा टोळीनें येऊन घेतला. एवढीच काय ती ध्यानांत ठेवावयासारखी गोष्ट झाली. या रोहिले लोकांनीं पुढील काळांत बरेंच नाव गाजविलें आहे. त्यांचा मुख्य अली महम्मद हा होता. तो हिंदु असून पुढें धर्मांतर करून मुसलमान झाला होता, आणि त्यास एका अफगाण सरदारानें दत्तक घेतला होता. त्या खेरीज ते सर्व लोक बहुधा यूसफझै व दुसऱ्या ईशान्येकडील अफगाणांचा जाती, यांमधील होते; त्यांचें राज्य होऊन पुष्कळ दिवस झाले नव्हते, तथापि त्यांचें इतक्यांतच बरेंच मान चढलें होतें; ह्मणून त्यांचा तूर्त बंदोबस्त करण्यासहि खुद्द बादशाहास स्वारी करून जावें लागलें.

रोहिले लोकांचा उदय.

त्यांवर बादशाह स्वारी करून गेला; इ० स० १७४५, हि० स० ११५६.

वर सांगितल्याहूनहि एक फार मोठा भयंकर असा कट स्वदेशांतच उत्पन्न होत होता, आणि पुढें हिंदुस्थानाचा अति भयानक शत्रु जो नादिरशाह तो मरण पावल्यामुळें तिकडून हिंदुस्थानांत नव्या स्वाऱ्या येण्याची तयारी झाली.

इराणदेशाकडून नवेहल्ले.

एशियाखंडामध्यें राज्य मिळविण्यास पापें करावीं लागतात; तीं सर्व प्रकारचीं केल्याशिवाय नादिरशाहास राज्य मिळालें होतें असें नाहीं;

त्या देशांतील घालमेली.

नादिरशाहा-
च्या जुलूम.

आणि कितीएक निरुपद्रवी शहरांचा लोकांशीं केवळ अविचारी क्रूरतेनें त्याणें वर्तणूक केली होती असेंहि आहे; तथापि एशियाखंडांतील साधारण राजे जसे क्रूर असतात, व त्यांतून मुख्यत्वेंकरून इराणचे असतात, त्यांहून, दिल्ली घेईपर्यंत, हा बहुधा कमी निष्ठुर होता. परंतु दिल्ली एथें लूट व कतल यांचा समारंभांची त्यास सवय झाली, आणि अव्याहत जयश्रीचा त्यास मद चढला, तेणेंकरून त्याचा स्वभावांत फेरफार होण्यास आरंभ झाला, असें दिसतें. त्यापूर्वी तो सक्त धनीपणा करित असे परंतु अन्यायी नसे; तें स्वरूप हळूहळू पालटून तो निर्दय व लहरी असा जुलुमी राजा झाला. त्याचा या गुणांचा प्रकाश एकदम पडला नाहीं; कारण तो हिंदुस्थानांतून परत आल्यावर, बुखारा व ख्वारिझम हीं राज्यें घेण्यांत व लेझगी नामें पहाडी लोकांस जेर करण्यांत व तुर्की लोकांशीं तीन युध्धप्रसंग करण्यांत त्याचीं प्रथमचीं वर्षे निघून गेलीं; त्यांतून बुखारा व ख्वारिझम हीं राज्यें जिंकून पुनः हिंदुस्थानाप्रमाणेंच सोडून दिलीं. शेवटीं जेव्हां वरील तुर्की लोकांबरोबरील लढाई संपून तह झाला, तेव्हां नादिराचा मनाचा स्वभाविक वेग बाहेर पडण्यास रस्ता नाहींसा झाला, ह्मणून तें मन आपल्याच पाठीस लागलें, आणि दुष्ट संशय व अनावर क्रोधादि उद्गार यांचें

शिया लोकां-
पासून भीति.

बिऱ्हाडच तें होऊन गेलें. त्यांत मुख्यत्वेंकरून त्याचा स्वदेशीय लोकांचा धर्मसंबंधीं दुराग्रहामुळें त्यास अस्वस्थता प्राप्त झाली होती, कारण त्या लोकांस सुनी मताचा धर्म अधिक आवडावा, आणि त्या धर्माचें कांहींसें तद्देशीयरूप व्हावें, ह्मणून

त्याणें त्या धर्मसंबंधी खातें इमाम जाफर ह्मणून एक अल्लीचा वंशज व इराणांतील लोकप्रिय साधु होता त्याचा आश्रयास लाविलें. तथापि लोकांची अद्याऽपि शिया मताकडे भक्ति आहे, आणि गादीवर आल्यावर आपण त्या मताचा उपदेशकांचा जा जमीनी व नेमणूका जप्त केल्या होत्या, त्या लोकांनीं त्यांचा संप्रदायांचीं मनें आपल्याविरुद्ध वळविलीं आहेत, हें त्यास समजलें होतें. ह्मणून तो प्रत्येक इराणी ह्मणजे आपला शत्रु अशी दृष्टि ठेवित असे. त्यांतहि त्याचा वडील मुलगा रेझकूली याविषयीं त्याचा मनांत विशेष द्वेष होता; कारण फसाद करणाऱ्या लोकांची कार्यसिद्धि होण्यास हा त्यांस अतिशय उपयोगीं पडेल, असें त्यास वाटत असे. एके वेळीं नादिरशाह लढाईस गेला असतां, रानांत गुप्त ठिकाणांतून, एकानें यावर गोळी टाकिली. तो मारेकरी शत्रूंतील नसेल, असें वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें; तथापि त्यास शाहजादा रेझ याणें पाठविला असेल अशी जी याचा मनांत कल्पना आली ती जाईना. असे विचार मनांत घोळून आपला मुलगा रेझकूली याचे डोळे काढून टाकण्यास तो शेवटीं उद्युक्त झाला. त्या कर्माचा पश्चात्तापानें त्याचें अंतःकरण मृदु व्हावें तें एकीकडे राहून त्याचा राग चेकळला. नंतर जे लोक त्यास दया करण्याविषयीं प्रार्थना करित असत त्यांस तो ह्मणावूं लागला, कीं जेव्हां माझा पुत्रच संकटांत होता तेव्हांहि तुमचा रदबदलीचें कांहीं चाललें नाहीं. याप्रमाणें जसा कोणी मनुष्यजातीचाच उघड शत्रु असतो, तशी याची वर्तणूक झाली. असे हा लोकांचे हाल करी,

त्याणें आपल्या मुलाचे डोळे काढून टाकिले.

तर्णेकरून शेवटीं तो मरण पावला. तो असा होता कीं "त्याविषयीं त्याचे लोक गर्व वाहतात; त्याचें नाव घेतलें तर कांपतात; व त्यास शाप देतात;" असें त्याविषयीं वर्णन आहे.

अफगाणलोक परत गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नादिरशाहास सोडविण्यास आपण उपयोगीं पडूं या आशेनें अहमद खान अब्दाली नामें सरदाराचा हाताखालील अफगाणांनीं दुराणी लोकांवर हल्ला केला; त्यांस उझबेग लोकहि येऊन मिळाले होते, परंतु अफगाणलोकांची संख्या थोडी होती, ही गोष्ट मनांत आणिली असतां, त्यांस स्वदेशास परत जातां आलें हेंच त्यांचें मोठें नशीब समजलें पाहिजे. नादिरशाहाचा काळ त्यांचा देशाचा सरहद्दीजवळच झाला.

अहमदखान अब्दाली याविषयीं.

जेव्हां प्रथम अब्दालीलोकांनीं खुरासानप्रांत जिंकला तेव्हां झमान खान नामें त्या लोकांचा जापिढीजाद्या सरदारानें त्यांचा पुढारीपणा केला, त्याचा वर सांगितलेला अहमद खान हा मुलगा होता. तो सदुझै कुटुंबांतील होता. त्या वंशास त्या सर्व जातीचे लोक, जसा कोणास कांहीं धर्मसंबंधीं मान देतात, तसा देत असत. त्याची उमर फक्त तेवीस वर्षांची होती, तथापि त्यावर नादिरशाहाची नजर होती, तेणेंकरून तो मख्यातीस आला होता.

---

५ कोणी पुरुष सदुझै कुटुंबांतील असला, ह्मणजे त्याचा शरीरास कोणीच हात लावूंनये, व केवढ्याहि पायरीचा सरदार असला, तरी कोणी तरी सदुझैचा आज्ञेशिवाय कोणी अब्दाली लोकास ठार मारण्याची त्याची जुरत नव्हती. अहमदशाह हा नादिरशाहाचा चोबदार होता, अशी साधारण

या कारणास्तव त्याचा स्वतांचा जातीचा लोकांची नायकी त्याकडेस पूर्वींच होती, ती कायम करण्याविषयीं त्याणें त्वरा केली; जवळील निरनिराळ्या जातींचा लोकांमध्यें व आसपासचा देशांमध्यें आपलें वजन बसविलें; आणि तें वर्ष पुरें होण्यापूर्वींच हा यथाविधि कंदाहारचा राजा असें आपणास ह्मणवूं लागला. कांहीं देवभोळेपणाचा उद्देशानें त्याणें आपल्या जातीचा लोकांचें अब्दाली हें नाव फिरवून दुराणी हें ठेविलें: त्याच नावानें ते लोक तेंव्हांपासून प्रसिद्ध आहेत. त्याणें आपल्या दरबाराची रचना नादिरशाहाचा किर्त्याप्रमाणें केली, आणि त्या

अहमदशाहास कंदाहार एथें राज्याभिषेक झाला. इ० स० १७४७ अक्टोबर.

त्याणें अब्दाली हें नाव फिरवून दुराणी ठेविलें.

---

कथा आहे; आतां हिंदुस्थानांत साधारण काठ्या घेऊन पुढें चालणाऱ्या लोकांस चोबदार ह्मणतात, त्यावरून हें नाव पडलें असेल; परंतु सिंधुनदाचा पश्चिमेकडील देशांत राज्यांतील थोड्या आति मोठ्या अम्मलदारांस मात्र ही पदवी असत्ये, (व त्यांचा हातांत सोन्याचा व रुप्याचा काठ्या असतात.) अहमदाचा पूर्वींचा इतिहास चांगला माहीत आहे. जेव्हां नादिरशाहानें कंदाहार घेतलें, तेव्हां तो खिल्जी लोकांजवळ कैदेंत होता. मग नादिरशाहानें त्याचा कृपेनें स्वीकार केला. त्याचा चांगला इतमाम राही अशी त्यास नेमणूक करून दिली, व त्यास माझिंदरान एथें राहवयास पाठविलें. असें करण्याचें कारण बहुधा असें असावें कीं त्या देशाची स्वस्थता होईपर्यंत त्यास त्याचा जातीचा लोकांपासून निराळा ठेवावा असा त्याचा हेतु होता; कारण त्या वेळीं दुराणी लोकांचा छावणीबराबर एक ग्रंथकार होता, तो त्याविषयीं असें लिहितो, कीं "नादिरशाहाचा त्यावर डोळा असे, परंतु सर्व प्रतीचे सरदार, खानगी व्यवहारांत, त्यास मोठा मान देत असत."

६ कांहीं विलक्षण गोंधळ करून हिंदुस्थानचे लोक दुराणी लोकांना खिल्जी ह्मणतात; तसेच उत्तरेकडील लोक यांस खुरासानी ह्मणतात; परंतु दुराणी हें त्यांचें नेहमींचे नाव असून तेंच शुद्ध आहे.

बादशाहाप्रमाणेंच सर्व ढोंगें आणिलीं; परंतु तीं याचा स्थितीप्रमाणें याणें नेमस्तपणानें चालविलीं होतीं. आपल्या देशांतील सपाट प्रांतांमध्यें व शहरांमध्यें व तसेंच बल्क, सिंध, काश्मीर, व दुसऱ्या जिंकिलेल्या प्रांतांमध्यें त्याचा एकसत्ताक अम्मल असे. तो अफगाणलोकांस आपआपली आंतील व्यवस्था पाहूं देत असे, आणि त्यांजकडून जीं लश्करचीं पतकें अथवा खंडण्या यावयाचा त्या घेण्यापुर्तीं व त्यांमध्यें स्वस्थता राखण्यापुर्तीं मात्र सत्ता आपल्या हातांत ठेवित असे. बलुचिस्तान, सिस्तान व कांहीं दुसरीं ठिकाणें हीं त्या त्या देशचा सरदारांचा ताब्यांत होतीं; परंतु तीं त्याचीं मांडलिक असून लश्करी चाकरी बजावित असत. इराणदेशामध्यें तंटे लागल्यामुळें तिकडून त्यास कांहीं बखेडा झाला नाहीं, त्यामुळें त्यास बहुतेक खुरासान घेतां आलें; परंतु त्या मार्गानें पुढें गेलें असतां जा अडचणी प्राप्त होणार त्या त्याचा दृष्टीस पडल्या, म्हणून नादिरशाहाचा मुलगा शाहरोख हा मेशहद एथें होता, त्यास आश्रय देण्याचें एवढें मात्र त्याणें करून बाकीचा तिकडील नाद सोडिला. जो त्याचा स्वतांचा मुलुक होता,

त्याणें आपल्या देकेंद्र रयतेस अकलेनें आपल्या तंत्रानें चालविलें.

तो मेशहद शहराचा पूर्वेस मात्र होता. मुलुक जिंकण्याची व पैका मिळवून आपल्या लश्करास उद्योग लावून देण्याची अशी जागा हिंदुस्थान आहे असें त्याचा नजरेस आलें होतें, ह्मणून त्याणें प्रथम या देशांत येऊन पराक्रमाचीं कृत्यें केलीं, आणि मागून वर सांगितलेल्या देशांतून पुष्कळांचे याणें बंदोबस्त केले.

त्याचे हिंदुस्थानाविषयीं विचार.

त्यास राज्याभिषेक झाला होता नव्हता इतक्यांत, तो पूर्वेकडेस जाण्याकरितां निघाला, आणि सिंधुनदापर्यंत सर्व मुलुक आपल्या सत्तेखालीं लवकरच आणिता झाला. त्या वेळीं पंजाबाची स्थिति पाहून हा पुढें जाण्यास लुब्ध झाला. तेथील सरसुभेदार बंड करून होता, ह्मणून त्यास दिल्लीहून कुमक मिळालेली नव्हती, त्यामुळें तो विशेष आड आला नाहीं. नंतर अहमदानें लाहोर व दुसरीं रस्त्यावरील शहरें घेऊन सतलजनदीपर्यंत चाल केली. तो त्या नदीवर जाऊन पोंचला, आणि पाहतो तों त्यास तोंड देण्याकरितां बादशाहाचा मागें गादीचा वारिस असा जो शाहजादा अहमद तो आणि वजीर कमरुद्दीन खान यांचा हाताखालीं दिल्लीहून एक फौज आली आहे, आणि तिणें सर्व नदीवरील उतरणें अडविलीं आहेत. याजवळ १२,००० हून अधिक लोक नव्हते;[७] तथापि त्या फौजेचा तडाक्यानें उपयोग केला असतां आपली निभावणूक आहे, नाहीं तर नाहीं, असें त्याचा नजरेस आलें; ह्मणून जेथें उतार नव्हता तेथें ती उतरून मोगलांचा फौजेस पिछाडीस ठेवून त्याणें

त्याणें पंजाब घेतला.

---

७ इतक्या लोकांनिशीं तो कंदाहाराहून निघाला; आणि तो सिंधुनद उतरण्यापूर्वी जरी ती फौज वाढली असेल असें संभवतें, तरी त्यास पंजाबांत पाहण्याकरितां लोक ठेवावे लागल्यामुळें सहजच ती कमी झाली असेल; त्याजवळ "६७,००० राहून जास्त घोडेस्वार नव्हते;" असें सैरमुताखरीन या ग्रंथांत वर्णन आहे. तेव्हां ही फौज तर नादिरशाहाचीहून मोठी होत्ये; परंतु हफीझ रेहमत याचा ग्रंथाचें मिस्तर इलियटानें भाषांतर केलें आहे, त्यांत १५,००० लोक होते असें सांगितलें आहे; ही संख्या बराबर असावी असा विशेष संभव दिसतो.

सरहिंद शहर घेतलें; तेथें मोगलांचें बारबरदारीचें सामान व मोदीखाना ठेविलेला होता. त्या वेळीं त्यास जय मिळाला, व त्यांत कांहीं तोफा मिळाल्या, त्यापूर्वीं त्याजवळ मुळींच नव्हत्या, म्हणून त्या जयापासून हा एक फायदा झाला. तो त्याचा धीटपणा पाहून त्याचे शत्रु भ्याले, आणि ते जेव्हां त्याजवळ आले, तेव्हां मुक्काम करुन आपल्या छावणीभोंवता खंदक खणून राहिले. अशा प्रसंगीं अहमदशाहाजवळचा लहानशा घोडेस्वारांचा टोळीचानें थोडाच पराक्रम करवला असता. पुढें एके दिवशीं मोगलांचा वजीर कमरुद्दीन खान हा आपल्या तंबूंत नमाज पढत असतां, त्यास तोफेचा गोळा लागून तो मरण पावला, तथापि त्याची फौज दुराणी लोकांस हटवित चालली होती; याप्रमाणें होतां होतां शेवटीं दहाव्या दिवशीं त्या सर्व लोकांनीं मिळून अहमदाचा खंदकावर निकरानें हल्ला केला, त्यांत त्याची एक टोळी मोगलांचा छावणीचा मध्यभागापर्यंत घुसली, तथापि शेवटीं मोगलांचा फौजेनें त्यांस अगदीं हटवून पराजित केलें. नंतर येत्या रात्रीस त्यास घराकडे पळून जावें लागलें.

बादशाहाचा गादीचा वारिस शाहजादा अहमद याणें त्याचा पराजय केला. इ०स० १७४८, मार्च; हि०स० ११६१, रबीउल् अव्वल् चं० २६.

पुढें त्या मोगल शाहजाद्यानें लागलाच पंजाबांत एक सरसुभेदार नेमून पाठविला; परंतु पुढें त्याचा बाप आजारी पडल्यामुळें त्यास लागलेंच दिल्लीस परत जावें लागलें. तो सिंधुनदापर्यंत पोंचण्याचा अगोदरच अहमदशाह परत आला; आणि याणें नेमिलेला नवीन सरसुभेदार नेहमीं खंडणी देण्याचें कबूल करीपर्यंत पंजाबांतून हालला नाहीं.

वरील सरहिंदची लढाई झाल्यापासून एक महिन्याचा आंत महम्मदशाह मरण पावला. त्याचा मागून त्याचा मुलगा गादीवर बसला. त्याचें नाव त्याचा शेजारी दुराणी बादशाह याचा प्रमाणेंच ( ह्मणजे अहमदशाह असें ) होतें.

महम्मदशाह मरण पावला. इ० स० १७४८, एप्रिल्. हि० स० ११६१; रबी उसानी चं० २६.

# प्रकरण चौथें.

## मोगलांचा राज्याची समाप्ति होईपर्यंत झालेलें वर्तमान.

### अहमदशाह बादशाह.

नवीन बादशाहानें केलेली राज्याचा आंतील व्यवस्था, इ० स० १७४८, हि० स० ११६१.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अफगाणांचा बादशाह पंजाबांत परत आला, त्यामुळें, आणि त्याची सत्ता व चपलता हीं प्रसिद्ध होतीं त्यामुळें अहमदशाहास नेहमीं काळजी बाळगावी लागे, आणि याकरितांच पर शत्रूपासून आपणास इजा न होई असे दोस्त मिळण्याकरितां यास आपली कांहीं स्वतंत्रता टाकून द्यावी लागली. अशा हेतूनें याणें वजीरातीचें काम असोफजास देऊं केलें; परंतु तें त्याणें कबूल केलें नाहीं, व पुढें तो लवकरच मरण पावला. त्याचा मागून दक्षिणेंत नासिरजंग हा त्याचा गादीवर बसला. त्यास जमवेल तितकी फौज घेऊन अहमदशाहानें आपल्या मदतीस बलाविलें. पुढें थोड्याच दिवसांत यास असें वर्तमान लागलें, कीं दुराणी लोकांचा बादशाह आपल्या राज्याचा पश्चिमप्रांतांत गुंतला आहे. या बातमीमुळें याणें नासिरजंगाजवळ जी मदत मागितली होती, तिचा वांचून यास निर्वाह करतां आला.

नंतर याणें आपल्या इच्छेस जसा उत्तम वाटला त्याप्रमाणें आपल्या राज्याचा आंतील बंदोबस्त केला. याणें सादत खानाचा मुलगा सफ्दरजंग यास वजीर केलें. सफ्दरजंगाकडे अयोध्येचा सरसुभ्याचें काम काईमच होतें, ह्मणून त्या प्रांताचा उत्तरभागांत रोहिले लोकांपासून पुनः भीति उत्पन्न झाली होती ती मोडण्याकरितां त्यांस जेर करण्याचा बादशाही सरकारानें प्रथम यत्न मांडिला.

वजीर सफ्दरजंगानें रोहिले लोकांस जिंकण्याचा यत्न केला, तो प्रकार.

सफ्दरजंगाची सदी बरी दिसत होती; त्या वेळीं रोहिले लोकांचा सरदार अली महम्मद हा मरून गेला होता, आणि कय्यम खान बंगश नामें फरकाबाद एथील एक अफगाण जाहगीरदार त्याचा वतीनें आपल्या देशबांधवांबराबर लढण्यास त्यास मिळाला होता. कय्यम खानाचा प्रथम जय झाला, परंतु तो शेवटीं लढाईत मरण पावला; तेव्हां आपला मुख्य उद्देश तडीस गेला नाहीं ह्मणून, आपला दोस्त जो कय्यम खान त्याचाच विधवेपासून तिचा बहुतेक मुलुक त्याणें छिनावून घेतला. या त्याचा कृपण वर्तणूकेमुळें त्याचें कांहीं हित झालें नाहीं, कारण कय्यम खानाचा मुलुकांतील लोक त्याचा मुतालिकावर उठले, आणि रोहिले लोकांस मदतीस बोलावित झाले; तेव्हां त्यांजवर खुद्द वजीरासच स्वारी करून जाणें आलें. त्या वेळीं त्याजबराबर लश्कर पुष्कळ होतें; परंतु तें इतकें बेकैद होतें, कीं त्यांतील लोकांनीं आपल्याच मुलुकांतील बारा ह्मणून जें सय्यदांचें राहण्याचें प्रसिद्ध

इ० स० १७४८, डिसेंबर, हि० स० ११६१, झिहाज.

त्यांजवर खुद्द वजीर स्वारी करून गेला व त्यांपासून पराजय पावला. इ० स० १७५०, हि० स० ११६३.

ठिकाण आहे तें लुटलें; त्या वेळीं त्या शहरचे पुष्कळ लोक यांस आड आले, त्यांची यांणीं कतल केली. पुढें वजीराची व त्या लोकांची लढाई झाली, तींत याचा फौजेचा पराजय झाला; ( ती फौज कोणत्या प्रकारची होती हें वर सांगितलें आहे यावरून ) ही गोष्ट आश्चर्य करावयाजोगी नाहीं. त्या लढाईंत वजीरासहि वार लागले. नंतर पुढें ते रोहिले लोक उलटे याचा देशांत चालून आले; त्यांस लखनौ व बेल्ग्राम एथें जरी मार बसला, तरी त्यांणीं अलाहबादेपर्यंत चाल केली, आणि वजीर व पादशाह, या दोघांचीहि ते एकसारखीच अवगणना करूं लागले.

त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविलें.

नंतर सफ्दरजंग पाहतो तों आपल्या अडचणी वाढूं लागल्या, व त्या दूर करण्याची शक्ति कमी झाली; तेव्हां त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविण्याचा ( हा बेअब्रूचा ) रस्ता धरिला. त्यापूर्वीं नुकतेच मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांस पेशव्यानें माळव्यांत परत पाठविलें होतें; त्यांस याणें विनंती केली, आणि पुष्कळ खंडणी देण्याचें वचन देऊन आपापल्या बहुतेक फौजांसुद्धां आपल्या मदतीस येण्यास उद्युक्त केलें. त्याच उपायानें जाटांचा राजा सुरजमल्ल याचीहि त्याणें पुनः मदत मिळविली; तो राजा पूर्वींचाहि स्वारीमध्यें याचा सहाकारी होता. या लोकांचा मदतीनें त्याणें रोहिल्यांस समोरासमोर रणभूमीवर पराजित केलें, आणि त्यांचा मुलुक लुटून, त्यांचा ईशान्येकडील सीमेवर हिमालयाचा जा सखल शाखा आहेत त्यांत त्यांस हांकून लाविलें. नंतर मराठे लोकांची भूक पुरी करण्याकरितां, जिंकलेल्या देशांतून ( ह्मणजे रोहिलखंडांतून त्यांणीं आपली

खंडणी वसूल करून घ्यावी असा याणें त्यांस अधिकार दिला. नंतर त्यांचा लुटींनीं तो देश जा दरिद्रावस्थेस येऊन मिळाला तींतून तो पुष्कळ वर्षेपर्यंत सुधारला नाहीं.

त्यांणीं रोहिले लोकांस जेरीस आणिलें.

त्या लुटारू मराठ्यांचा चपळतेनें रोहिले लोकांस अन्न मिळण्याची इतकी पंचाईत पडली, कीं ते सफ़दरजंगास शरण आले, आणि त्यांचा सरदारांचा निर्वाहार्थ थोडेसे गांव त्यांस मिळाल्यावर स्वस्थ राहिले.

पादशाही लश्कराचा मेवाडांत पराजय झाला.

हें काम चांगल्या रीतीनें तडीस गेल्यामुळें मोगलसरकारचा जो थोडासा फायदा झाला, त्याहून जोदपुरचा संस्थानाविषयीं आंतल्याआंत दोघे वारीस भांडत असतां अजमीर एथील मोगलांचा सुभेदारानें त्या तंट्यांत हात घातल्यामुळें त्याचा पराजय झाल्यापासून जें नुकसान झालें, तें विशेष झालें.

अहमदशाह दुराणी याची दुसरी स्वारी.

याप्रमाणें मोगलसरकारची दुबळी स्थिति प्रत्यहीं अधिकाधिक दृष्टीस पडत चालली होती. इतक्यांत अहमदशाह दुराणी याणें पुनः पंजाबावर स्वारी केली, अशी दरबारांत बातमी आली; मागाहून त्याणें तो सगळा प्रान्त जिंकून घेतला असें लवकरच वर्तमान लागलें; आणि त्यामागून तो प्रान्त आपणास लेखीं तोडून द्यावा असें मागण्याकरितां एक वकील आला. त्या वेळीं नादिरशाह येऊन गेल्याची

त्यास पंजाबप्रांत तोडून दिला.

चांगली आठवण राहिली होती, त्यामुळें तें मागणें बादशाहानें त्वरेनें कबूल केलें. पुढें जेव्हां वजीर आपल्या मराठे दोस्तांनिशीं

ठिकाण आहे तें लुटलें; त्या वेळीं त्या शहरचे पुष्कळ लोक यांस आड आले, त्यांची यांणीं कतल केली. पुढें वजीराची व त्या लोकांची लढाई झाली, तींत याचा फौजेचा पराजय झाला; (ती फौज कोणत्या प्रकारची होती हें वर सांगितलें आहे यावरून) ही गोष्ट आश्चर्य करावयाजोगी नाहीं. त्या लढाईत वजीरासहि वार लागले. नंतर पुढें ते रोहिले लोक उलटे याचा देशांत चालून आले; त्यांस लखनौ व बेल्ग्राम एथें जरी मार बसला, तरी त्यांणीं अलाहबादेपर्यंत चाल केली, आणि वजीर व पादशाह, या दोघांचीहि ते एकसारखीच अवगणना करूं लागले.

त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविलें.

नंतर सफ्दरजंग पाहतो तों आपल्या अडचणी वाढूं लागल्या, व त्या दूर करण्याची शक्ति कमी झाली; तेव्हां त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविण्याचा (हा बेअब्रूचा) रस्ता धरिला. त्यापूर्वीं नुकतेच मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांस पेशव्यानें माळव्यांत परत पाठविलें होतें; त्यांस याणें विनंती केली, आणि पुष्कळ खंडणी देण्याचें वचन देऊन आपापल्या बहुतेक फौजांसुद्धां आपल्या मदतीस येण्यास उद्युक्त केलें. त्याच उपायानें जाटांचा राजा सुरजमल्ल याचीहि त्याणें पुनः मदत मिळविली; तो राजा पूर्वींचाहि स्वारीमध्यें याचा सहाकारी होता. या लोकांचा मदतीनें त्याणें रोहिल्यांस समोरासमोर रणभूमीवर पराजित केलें, आणि त्यांचा मुलुक लुटून, त्यांचा ईशान्येकडील सीमेवर हिमालयाचा जा सखल शाखा आहेत त्यांत त्यांस हांकून लाविलें. नंतर मराठे लोकांची भूक पुरी करण्याकरितां, जिंकलेल्या देशांतून (ह्मणजे रोहिलखंडांतून त्यांणीं आपली

खंडणी वसूल करून घ्यावी असा याणें त्यांस अधिकार दिला. नंतर त्यांचा लुटींनीं तो देश जा दरिद्रावस्थेस येऊन मिळाला तींतून तो पुष्कळ वर्षेंपर्यंत सुधारला नाहीं.

त्यांणीं रोहिले लोकांस जेरीस आणिलें.

त्या लुटारू मराठ्यांचा चपळतेनें रोहिले लोकांस अन्न मिळण्याची इतकी पंचाईत पडली, कीं ते सफ़्दरजंगास शरण आले, आणि त्यांचा सरदारांचा निर्वाहार्थ थोडेसे गांव त्यांस मिळाल्यावर स्वस्थ राहिले.

पादशाही लश्कराचा मेवाडांत पराजय झाला.

हें काम चांगल्या रीतीनें तडीस गेल्यामुळें मोगलसरकारचा जो थोडासा फायदा झाला, त्याहून जोदपुरचा संस्थानाविषयीं आंतल्याआंत दोघे वारीस भांडत असतां अजमीर एथील मोगलांचा सुभेदारानें त्या तंट्यांत हात घातल्यामुळें त्याचा पराजय झाल्यापासून जें नुकसान झालें, तें विशेष झालें.

अहमदशाह दुराणी याची दुसरी स्वारी.

याप्रमाणें मोगलसरकारची दुबळी स्थिति प्रत्यहीं अधिकाधिक दृष्टीस पडत चालली होती. इतक्यांत अहमदशाह दुराणी याणें पुनः पंजाबावर स्वारी केली, अशी दरबारांत बातमी आली; मागाहून त्याणें तो सगळा प्रान्त जिंकून घेतला असें लवकरच वर्तमान लागलें; आणि त्यामागून तो प्रान्त आपणास लेखीं तोडून द्यावा असें मागण्याकरितां एक वकील आला. त्या वेळीं नादिरशाह येऊन गेल्याची चांगली आठवण राहिली होती, त्यामुळें तें मागणें बादशाहानें त्वरेनें कबूल केलें. पुढें जेव्हां वजीर आपल्या मराठे दोस्तांनिशीं

त्यास पंजाबप्रांत तोडून दिला.

दिल्लीस आला, तेव्हां पाहतो तों वरील बंदोबस्त पुरा झाला होता. जर तो पूर्वीं तेथें असता, तर तोहि त्या बंदोबस्तास कबूल झाला असता, आणि जर तो मोडल्यानें आपणास कांहीं मिळेल असें त्यास वाटलें असतें, तर तो त्याणें मानिला नसता, याविषयीं अंदेशा घेण्यास कांहीं कारण नाहीं; परंतु सांप्रत दरबाराशीं त्याचा बेबनाव होण्यास दुसरींहि कारणें होतीं, ह्मणून हा प्रान्त तोडून दिला ही हलकी गोष्ट केली असें ह्मणून त्या निमित्तानें तो गाऱ्हाणीं सांगूं लागला. सफूदरजंग रोहिलखंडांत गेला होता, तेव्हां मागें जवीद ह्मणून एक खवास दरबारांत असे, त्याणें त्याचा पगडा खालीं पाडिला. पादशाह व त्याची आई या दोघांचीहि जवीदावर कृपा असे. आपण समक्ष आल्यानेंहि आपला अधिकार पूर्वस्थितीवर आला नाहीं असें पाहून, सफूदरजंगानें दिल्लीमध्यें जी नेहमींची चाल होती, ती धरिली.

वजीर सफूदरजंग नाखुश झाला.

ती अशी, कीं त्याणें जवीदास मेजवानीस बलाविलें, आणि खाणें होत असतां मारेकरी घालून त्याचा प्राण घेतला. या उपमर्दानें बादशाहास सहजच संताप आला. पुढें त्याचा सूड उगविण्यास ग्यासुद्दीन हा एक योग्य साधन लवकरच मिळाला. ग्यासुद्दीन हा असोफजाचा वडील मुलगा होता; तो

त्याणें जवीद मारेकरी घालून मारिला.

आपल्या दोघां धाकट्या भावांचें युद्ध चालत असतां पहिल्या बाणीस दिल्ली एथें राहिला होता. पुढें आपणास जाण्यास द्वार झालें असें पाहून तो पेशव्यांबराबर संबंध करून शिंदे व होळकर यांस बराबर घेऊन दक्षिणेंत जावयास निघाला.

धाकट्या ग्यासुद्दीनाविषयीं.

तो औरंगाबाद एथें दाखल झाल्यावर लवकरच मरण पावला. त्याचा पुत्र केवळ अल्पवयस्क होता, त्यास त्याणें दिल्ली एथें ठेविलें होतें. त्यास वजीराचा कृपेनें ग्यासुद्दीन हा किताब व सेनापति ही उंच पदवी प्राप्त झाली होती. सांप्रत बादशाहानें आपल्या वजीराचा विरुद्ध जी खटपट चालविली होती, तींतील कारणी तोच एक होता, व तोच सांप्रत आपल्या उपकारकर्त्यास अपकार करित होता. जे कांहीं मोगल उमराव केवळ आळसांत बुडून गेले नव्हते, त्यांतला हा एक नमूना होता. तो चळवळ्या व महत्वाकांक्षी होता; त्यास ढोंग करून आपल्या मनोवृत्ति खोट्या दाखवितां येत असत; तसेंच कोणे समयीं त्यास त्यांचा आवर करितां येत नसे, ह्मणून विश्वासघात व खून हीं आपले उद्देश साधण्याचीं स्वाभाविक साधनें आहेत असें तो समजे, आणि जें काय करावयाचें त्याचा परिणामाविषयीं तो बेफिकिर असून, तें करतांना (नीतीचा) मूलतत्वांचा अगदीं विचार करित नसे.

तो वजीराचा आड येऊं लागला.

या त्याचा कर्तीनीं आपसांत लढाई लागली; ती रीतीप्रमाणें रणभूमीवर प्रसंग होऊन शेवटास जावी, तशी गेली नाहीं; परंतु सहा महिनेपर्यंत नेहमीं दिल्ली शहरचा रस्त्यांत लटापट चालत असे. त्या उभय पक्षांचा फळ्या निरनिराळ्या होत्या, त्या योगानें त्यांचा द्वेष असून त्यांत धर्मसंबंधी वैरभावाची भर पडत असे. वजीर सफ़्दरजंग, हा शिया मताचा होता, त्यामुळें त्याचा मताचा व सुनी मताचा धर्माविषयींचीं जीं निशाणींचीं वाक्यें, तीं लढाईमध्यें उभय पक्षांचे लोक ह्मणूं लागले. शेवटीं आपली स्थिति दुर्बळ झाली असें वजीर

सफ्दरजंगास समजलें, आणि मल्हारराव होळकरास ग्यासुद्दीनानें मदतीस बलाविलें होतें, तो मराठे लोकांस घेऊन जवळ आला; असें पाहून तो तह करण्यास कबूल झाला. त्यांत त्याजकडे अयोध्या व प्रयाग हे प्रांत राहवे असें ठरलें. याप्रमाणें ग्यासुद्दीन मोकळा झाल्यावर आपले दोस्त मराठे लोक यांस कांहीं काम लावून देण्यास, व तितक्यांतच वजीराचा एका पक्षपात्याचा सूड घेण्यास उत्सुक होऊन, जाटांचा राजा सुरजमल्ल याजवर तो चालून गेला. दिग व भरतपुर हे त्याचे दोन किल्ले घेण्यास याचा लश्करास बरेच दिवस लागले. इतक्या सुमारास ग्यासुद्दीनाचा उद्धट व दराऱ्याचा स्वभावास बादशाह फार त्रासला; इतका त्यास सफ्दरजंगाचाहि कधीं कंटाळा आला नव्हता. नंतर तो जमववेल तितकी फौज घेऊन ग्यासुद्दीन अडचणींत गुंतला असें पाहून, आपलें हित करून घेण्याकरितां शिकारीचा निमित्तानें स्वारीस गेला. हें विलग कृत्य अगदीं कमअकलेनें केलें: तें असें, कीं त्यांत सफ्दरजंगाची कुमक घेण्यास कांहींच युक्ति योजिलेली नव्हती; त्यामुळें तो सर्व बेत आपल्या शत्रूचा गळ्यांत पडे असें करायास, ग्यासुद्दीनाचा सर्व कुशाग्रतेची व चंचलतेची गरज लागली नाहीं. तो जा वेढ्याचा कामांत गुंतलेला होता तें तहकूब न करितां, त्याणें आपल्या मराठ्या दोस्तांस अहमदशाहावर पाठविलें. पुढें लढाई होऊन अहमदशाह पादशाह कैदेंत सांपडला आहे असें वर्तमान जेव्हां त्यास लागलें, तेव्हां तो स्वतः

त्याणें मराठे लोकांस दमतीस बोलावून वजीरास हाकून लाविलें.

बादशाह ग्यासुद्दीनाविरुद्ध मसलती करूं लागला.

तो पराजित व पदच्युत झाला.

छावणींत गेला, आणि कैदी बादशाहास पदच्युत करून, त्याचे व त्याचा आईचे डोळे काढून टाकिता झाला. नंतर त्याणें, बादशाहाचा कुळांतील एका शाहजाद्यास गादीवर बसविण्याचें मुकरर करून, त्यास दुसरा अलमगीर असा किताब देऊन, त्याचा नावानें द्वाही फिरविली.

इ०स० १७५४, जुलै; हि० स० ११६७, शाबान.

## दुसरा अलमगीर पादशाह.

या घालमेलीनंतर लवकरच सफ्दरजंग मरण पावला; तेव्हां ग्यासुद्दीन हाच स्वतः वजीराचा कारभार करूं लागला. सफ्दरजंगाचा मुलगा शुजाउद्दौला याकडेस त्याचा बापाचा मुलुक राहिलेला होता; तो त्याजपासून यास बळजोरीनें घेतां येईना, म्हणून तो याणें त्याजकडेसच राहूं दिला. या नव्या वजीराचा चळवळ्ये लोभामुळें फार दिवस स्वस्थता राहील अशी अपेक्षा नव्हती; परंतु त्याचा राज्याचा आंतील बंदोबस्त जसा पूर्वी मनास वाटेल तसा होता, तसाच अद्यापिहि होता. शेवटीं पुष्कळ शिपाई लोकांनीं त्याचा कर्तीस त्रासून बंड केलें, आणि पुढें लोकांस त्याचा इतका त्रास येऊं लागला, कीं बंडवाले लोकांनीं त्यास पकडून अनवाणी व बोडका असा रस्त्यांतून ओढीत नेला. त्या वेळीं त्यास मरणाची दहशत होती, तथापि जांणीं त्यास पकडलें, त्यांस शिव्या देऊन तुमचा उद्धटपणाबदल तुह्मास आपली

इ०स० १७५४, सेपटेंबर; हि० स० ११६७. झिहाज, ग्यासुद्दीन वजीर झाला.

त्याची वात्य राजरीती.

एका बंडापासून त्याचा जीवास जोखम उत्पन्न झालें.

डोकीं द्यावीं लागतील असें तो म्हणत असे. शेवटीं सरदार लोकांनीं मध्यें पडून त्यास सोडविलें, तेव्हां त्याणें त्या सर्व टोळीची कतल करून टाकण्याचा लागलाच हुकूम केला, आणि त्या पलटणीची कांहीं खूणखाणहि राहूं नये म्हणून तिचे डेरे, राहुट्या, व घोडीं, हींहि लुटविलीं.

त्यास बादशाहाविषयीं वहमा आला.

जेव्हां वरील बखेडा शिखरास पोंचला होता, तेव्हां ग्यासुद्दीनाचा जीव बचावण्याचा निमित्तानें जर तुह्मी आपला बंदीवान् ग्यासुद्दीन माझा स्वाधीन कराल तर मी तुमचा चढलेल्या पगारांतून पुष्कळ रकम देईन, असें याणें त्या शिपाई लोकांस सांगितलें होतें; परंतु या बोलण्यामुळें वजीराचा मनांतील वहमा मात्र जागृत झाला, आणि आपल्या नामधारी राजाचा हातून कांहीं पुढें मसलती होतील तर त्यांविषयीं आणखी बंदोबस्त ठेविण्याची त्याणें तजवीज केली.

इ० स० १७५६, हि० स० ११७०-७१. त्याणें अहमदशाह दुराणी याचा पंजाबचा सुभेदार विश्वासघातानें पकडला.

जेव्हां वर सांगितलेलें विघ्न ग्यासुद्दीनाचा आड आलें होतें, तेव्हां तो लाहोराकडे जात होता; तो वरील हकीकत झाल्यावर पुढें चालला. तिकडे पंजाबामध्यें पूर्वीं मीरमनु नामें मोगलांचा सुभेदार होता. पुढें तो प्रांत अहमदशाह दुराणी यास मिळाल्यावर, तो मीरमनु मरण पावला. त्याचा मुलास त्या दुराणी बादशाहानें त्याचा हुद्यावर नेमिलें; परंतु तो लहान होता, यामुळें त्याची आई त्याचें पालन करित असे. अशी स्थिति पाहून तो तरुण वजीर अनिवार लोभपाशांत पडला; मीरमनूचा विधवेबरोबर अतिशय स्नेहभावानें

पत्रव्यवहार ठेवूं लागला; आणि त्याची व तिचा मुलीची पूर्वी मागणी ठरली होती, ह्मणून ती आपणास द्यावी असें दाखवून लग्न करावयाचा बेतानें लाहोरावर गेला. जेव्हां सर्व लोकांचे वहमे निद्रित झालेसे झाले, तेव्हां त्याणें शहरावर छापा घालून सुभेदाराचा आईस बिछान्यावरच कैद केलें. तिला छावणींत नेत असतां आपल्या जांवयानें विश्वासघात केला याविषयीं तिणें त्यास शिव्या दिल्या, आणि अहमदशाह, हा तुमचा सूड घेऊन, सर्व हिंदुस्थानाचा नाश करील व त्यांतील लोकांची कतल होईल, असे परिणाम खचित होतील असें तिणें भविष्य सांगितलें. तें तिचें भविष्य फारच लवकर तडीस गेलें. कारण वर सांगितल्याप्रमाणें आपला अपमान झाला असें ऐकतांच अहमदशाह त्याबद्दल सूड घेण्याकरितां धांवत आला, आणि कंदाहाराहून त्वरेनें कूच करून पंजाबांतून बिनहरकत येऊन लवकरच दिल्लीपासून दहा कोशांचा आंत प्रगट होता झाला. ग्यासुद्दीनानें युक्तीनें मीरमनूचा विधवेची समजी पाडिली, आणि तिला मध्यस्थीस घालून आपण एकदम दुराणी बादशाहाचा छावणींत निघून गेला; तेव्हां त्याचा स्वतांचा शरीरास मात्र धक्का न लागे इतकी माफी मिळाली, तथापि आपणास पैशाचें नुकसान झालें आहे तें भरून द्यावें असा अहमदशाहानें आग्रह धरिला, आणि तें मागणें वसूल करण्याकरितां तो दिल्लीस आला. तो दिल्ली एथें पोंचल्यावर, जसे नादिरशाहाचा स्वारीपासून तेथें अनर्थ झाले होते, तसेच बहुतकरून झाले. कारण जरी हा त्या बादशाहाप्रमाणें स्वतः क्रूर नव्हता, तरी याचा

अहमदशाहाची तिसरी स्वारी.

त्याणें दिल्ली घेतली.

लश्करावर याची हुकुमत कमी चालत होती; त्यामुळें त्या शहरामध्यें जुलूम, लूट, व खून, यांचें पीक पुनः माजलें.

लोकांची कतल केली, व जुलमानें द्रव्य घेतलें.

वर सांगितल्याप्रमाणें लोकांची अपेष्टा फकत दिल्ली एथेंच झाली असें नाहीं. अहमदशाहानें शुजाउद्दौला यापासून खंडणी घेण्याकरितां आपल्या लश्करांतील एक टोळी बराबर देऊन ग्यासुद्दीनास पाठविलें, आणि त्याच उद्देशानें आपण स्वतः जाटांवर चालून गेला. तिकडे त्याणें बल्लवगड ह्मणून एक किल्ला घेतलाः तेथील रखवालदार लोक निकरानें लढले; त्यांस त्याणें किल्ला घेतल्यावर मारून टाकिलें. हें असो; परंतु त्याणें मथुरा एथें जी कतल केली, तेणेंकरून त्याचा नावास व त्याचा देशचा लोकांचा नावास डाग लागला आहे. मथुरा हें हिंदुलोकांमध्यें एक अति पवित्र शहर आहे; तेथें हिंदुलोकांचा एका धर्मदिवशीं त्यांचा उत्साहाचा भर असतां त्यांवर थोड्या लोकांनिशीं त्याणें छापा घातला, आणि तेथील निरुपद्रवी लोकांस बेकदर मारून टाकिलें. हे मारणारे लोक, नादिरशाहाचा ह्यताखालीं शिकलेले व रानट होते, आणि त्यांस हिंदुलोकांचा त्रास व मूर्तिपूजेचा द्वेष हीं सारखींच होतीं. तेव्हां अशा लोकांनीं वरील जुलूम करत्ये वेळीं किती थोडा विधिनिषेध मनांत आणला असेल हें वाचणारांचा सहजच लक्षांत येईल. इकडे अहमद हा स्वतः आग्र्यावर जात होता; व त्या शहरास व जाटलोकांचा एका किल्ल्यास त्याणें वेढा दिला. परंतु इतक्या सुमारास उन्हाळ्याचा अगदीं भर होऊन गेला होता, आणि दुराणी लोकांस उष्णता सहन

करण्याची शक्ति नाहीं त्यामुळें त्यांमध्यें आजार उत्पन्न झाला होता; यास्तव त्याणें जितकें द्रव्य वसूल केलें होतें तितक्यावरच तृप्त होऊन त्यास आपल्या राज्याकडचा रस्ता धरणें आलें. त्याणें जाण्याचा पूर्वीं दिल्लीचा घराण्यांतील एका राजकन्येशीं लग्न केलें, आणि आपला मुलगा, जो पुढें तैमूरशाह या नावानें गादीवर बसला, त्याशीं दुसऱ्या एकीचें लाविलें. मग दिल्लीचा बादशाहानें त्यास अशी विनंती केली, कीं मला माझा वजीराचा ताब्यांत ठेवून आपण जाऊं नये; त्यावरून त्याणें नजीबउद्दौला नामें एक हुशार व चांगल्या अब्रूचा रोहिला सरदार यास दिल्ली एथें सेनापति नेमिला, कारण तो दिल्लीहून लांब अंतरावरहि असतां आपल्या वजनानें ग्यासुद्दीनाचें पारडें तोलील अशी यास आशा होती.

तो आपल्या राज्यांत परत गेला. इ०स० १७५७ सुमारें जून; हि०स० ११७१ शवाल.

त्याणें ग्यासुद्दीनापासून दुसऱ्या अलमगीरास उपद्रव न व्हावा ह्मणून केलेला बंदोबस्त.

नजीबउद्दौला यास सेनापति नेमिला.

इतकें अहमदशाहानें केलें, तथापि तो हिंदुस्थान सोडून गेला नाहीं इतक्यांत ग्यासुद्दीन पुनः त्यास जुमानीनासा झाला. जेव्हां तो अफगाण बादशाह निघून गेला, तेव्हां ग्यासुद्दीन फरकाबाद एथें होता; त्याणें तेथील सरदार अहमद खान बंगश यास लागलेंच सेनापतीचें काम देऊन नजीबउद्दौला याची नेमणूक रद्द केली; परंतु राज्याची दुसरी उलटापालट स्वबलानें करण्यापुर्ती त्याची शक्ति नव्हती, ह्मणून त्याणें मराठे लोकांस मदतीस बलाविलें; त्या वेळीं

ग्यासुद्दीनानें मराठे लोकांस मदतीस बलाविलें.

मराठ्यांची तर अतिशयच सद्दी चालली होती.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें इ० स० १७५२ चा अवेलीस बाळाजीरावानें सलाबतजंगाबरोबर तह केला होता, तथापि तेणेंकरून सलाबताचा भाऊ व प्रतिस्पर्धी वडील ग्यासुद्दीन याजबरोबर नवीन मसलती करावयास त्यास कांहीं हरकत आली नाहीं. जेव्हां तो शाहजादा दिल्लीहून दक्षिणेंत आला, तेव्हां बाळाजी आपल्या सर्व फौजेनिशीं औरंगाबादेस जाऊन त्यास मिळाला. नंतर त्या दोघांची मिळून इतकी फौज जमली, कीं सलाबतजंगाचा बचाव करण्यास बूसीचीहि मदत पुरी न पडती; परंतु ग्यासुद्दीन हाच अकस्मात् मरण पावल्यामुळें तें अरिष्ट टळलें. यानंतर बाळाजी दक्षिणेंतील व फ्रेंच व इंग्लिश या लोकांबराबरील, कारभारांत गुंतला; परंतु त्याविषयींचें वर्णन त्या त्या लोकांचा इतिहासाबराबर करणें हें उत्तम आहे. पुढें जशी त्याचा राज्याची आंतील व्यवस्था कायम झाली, तसा त्याणें धीर करून दमाजी गायकवाडास कैदेंतून सोडिलें, आणि गुजराथप्रांताचा बंदोबस्त करण्यास त्याचें सहाय्य घेतलें. त्याणें त्याबरोबर सक्त ठराव केले; त्यांत कांहीं खंडण्या देणें ठरविल्या व कांहीं हक्क आपल्याकडेस राखिले, तेणेंकरून शेवटीं पुष्कळ कज्जे लागले; परंतु प्रथम सर्व सुरळीत चाललें होतें. पुढें (इ० स० १७५५ त) दमाजी हा, पेशव्याचा भाऊ राघोबादादा याजबरोबर, निघून गेला, आणि त्या दोघांनीं मिळून सर्व गुजराथप्रांत पुरा जेरीस आणिला. त्यानंतर राघोबानें राजपूतसंस्थानांतून खंडण्या घेतल्या, आणि नंतर तो माळव्यांतून परत दक्षिणेंत आला. पुढें इ० स०

मराठे लोकांचें पूर्वीचें वर्तमान.

१७५६ चा अखेरीस पेशव्यानें त्यास पुनः माळव्यांत पाठविलें; तेथें त्यास वर सांगितल्याप्रमाणें धाकट्या ग्यासुद्दीनानें आपणास मदत करण्याविषयीं सांप्रत विनंती केली; व या मदतनीसाचा सहाय्यानें तो वजीर दिल्लीवर गेला, आणि शहर व्यापून तटबंदी राजवाड्यास वेढा देता झाला. त्या वाड्यानें एक महिन्याहून जास्त टिकाव धरिला, तथापि नजीबउद्दौल्याचानें पुढें आपल्या शत्रुंबरावर टिकाव धरवणार नाहीं हें उघड दिसत होतें, आणि बादशाहानें, आपला मुलगा जो पुढें शाहआलम् या नावानें गादीवर बसला, त्यास निर्भय ठिकाणीं पाठविण्याची पूर्वींच सावधगिरी ठेविली होती. पुढें आपला बचाव कसा होईल एवढीच नजीबउद्दौला यास बिडती पडली होती; परंतु तें काम मल्हारराव होळकरास लांच दिल्यामुळें शेवटास गेलें. नंतर बादशाहानें आपल्या तटाचे दरवाजे उघडून ग्यासुद्दीनाच्या, वजीराचा नात्यानें, स्वीकार केला. नंतर नजीबउद्दौला आपल्या स्वदेशास निघून गेला; तो देश दिल्लीचा उत्तरेस साहरणपुराचा सुमारास होता, आणि त्याचा व रोहिलखंडाचा दरम्यान गंगानदी होती.

पेशव्याचा धाकटा भाऊ राघोबा हा धाकट्या ग्यासुद्दीनाचा मद्तीस निघून गेला.

दिल्लीचा गादीचा वारस निसटून गेला, व नजीब उद्दौला हाहि गेला.

त्याणें दिल्ली घेतली.

दिल्ली घेतल्यावर राघोबा त्या शहरानजीक छावणी देऊन राहिला होता; तो दुसरा एक मोठा व थोड्या मेहनतीनें साध्य होण्याजोगा देश मिळण्याचा लाग पाहून तिकडे गेला. तो प्रकारः— जेव्हां गुदस्त सालीं

इ० स० १७५८, हि० स० ११७१, त्याणें पंजाबप्रांत घेतला.

( इ० स० १७५७ त ) अहमदशाह दुराणी हिंदुस्थानांतून निघून गेला, तेव्हां त्याणें आपला मुलगा तैमूर याचा हवालीं पंजाबप्रांत करून त्यावर सरदार जहान खान याची दरखोरी ठेविली होती. त्या प्रांतांत त्यांचा मुख्य शत्रु अदिनाबेग हा होता; हा मनुष्य मोठा कज्जेदलाल व कपटी असे; तो पूर्वीं मीरमनूचा मुतालिक होता, व जे नाना प्रकारचे बखेडे व राज्याचा घालमेली पंजाबांत झाल्या त्या मुख्यत्वेंकरून त्याचाच मसलतींनीं होत असत. जेव्हां अहमदशाह पंजाबांत येऊन राहिला होता, तेव्हां तो त्या प्रांतांतून पळून गेला होता: तो सांप्रत आपले तंटेबाजीचे हेतु सिद्धीस नेण्याकरितां परत आला होता; पूर्वींचे बखेडे चालत असतां सीकलोकांनीं पुनः अवसान धरिलें होतें, त्यांजवळ याणें प्रथम आपलें वजन खर्च केलें; परंतु आपला हेतु तडीस नेण्याजोगें त्यांचा मध्यें सामर्थ्य नाहीं असें पाहून त्याणें राघोबादादास विनंती केली, आणि एवढा श्रीमान् देश किती अल्प आयासानें तुम्ही आपल्या देशबांधवांस मिळवून द्याल, हें त्यास दाखविलें. त्याप्रमाणें राघोबा निघाला, आणि

इ० स० १७५८, मे; हि० स० ११७१, शाबान.

इ० स० १७५८ चा मे महिन्यांत लाहोर घेऊन सर्व पंजाब वेष्टिता झाला. त्याजबराबर लढाई करण्याचा यत्न न करितां दुराणी लोक सिंधुनद उतरून पलीकडे गेले. राघोबादादानें तेथील काम अदिनाबेग यास सांगितलें, आणि तो पुढें लवकरच मरण पावल्यावर तेथील एका मराठ्यास त्याचा कामावर नेमिलें. ही अदलाबदल होण्यापूर्वीं राघोबादादा दक्षिणेंत निघून गेला होता; त्याचा मागें पंजाबांत तूर्तातूर्त

स्वस्थता असून उत्तरहिंदुस्थानाचा इतर भागांत मराठे लोकांची बढती होती. इकडे नजीबउद्दौला जेथें पळून गेला होता, तेथें त्याचा पाठलाग करण्याकरितां दिल्लीहून दत्तोजी शिंद्याचा हाताखालीं लश्कर रवाना झालें होतें. त्यास तोंड देण्याची नजीबास शक्ति नाहींशी होऊन, तो आपला देश मराठ्यांचा हातीं लुटावयास देऊन निघून गेला, व सकरताल ह्मणून गंगानदीवर, लढाई देऊन टिकाव धरण्याजोगें, उतरण आहे तेथें ठाणें धरून राहिला; त्या ठिकाणीं सर्व पावसाळाभर त्याणें मोठ्या मुस्कीलीनें टिकाव धरिला: तितक्या मुदतींत एक सर्वसाधारण व अगदीं येऊन ठेपलेलें असें संकट प्राप्त झाल्यामुळें सर्व मुसलमान राजांचा कट करण्याची अवश्यकता प्राप्त झाली होती; तो कट पक्का करण्यास त्यास फुरसूद मिळाली.

इ० स० १७५९, जून तागाईत सेपटेंबर; हि०स० ११७२.

त्या वेळीं मराठे लोकांनीं पूर्वींच पंजाबप्रांत घेतला होता; शिवाय अयोध्याप्रांत घेण्याविषयीं ग्यासुद्दीनाबराबर मसलत केली होती, आणि सर्व हिंदुस्थान घेण्याचा आपला बेत आहे, असें सांप्रत ते उघड रीतीनें बोलूं लागले.

सर्व हिंदुस्थान काबीज करण्याचे मराठे लोकांचे बेत.

असें वर्तमान पाहून मुसलमानलोकांस जी भीति उत्पन्न झाली, तेणेंकरून शुजाउद्दौला हा आपलीं जुनीं वैरें विसरून नजीबउद्दौला व आपले जुने शत्रु रोहिले यांशीं मिळून कट करण्यास उद्युक्त झाला. त्या रोहिल्यांमध्यें हाफिझ रेहमतखान हा सर्वांत मोठा होता. हा कट झाल्याची

मुसलमान रजवाड्यांनीं कट केला.

मराठ्यांनीं रोहिलखंडावर स्वारी केली.

बातमी दत्तोजी शिंद्यास लागतांच त्याणें गोविंदराव बुंदेल्यास[1] रोहिलखंडावर स्वारी करावयास पाठविलें. तो त्याचा हुकूम गोविंदरावानें इतक्या सक्तीनें अमलांत आणिला, कीं सुमारें एक महिन्याचा आंत तेरा शें गावांचा निःपात होऊन रोहिले लोकांस स्वरक्षणार्थ पहाडांत पळून जावें लागलें. त्यांस त्या विपत्तींतून शुजाउद्दौला याणें सोडविलें; तें असें, कीं मराठे लोकांचा हल्ला आल्यावर लागलेंच त्याणें लखनौहून कूच केलें, आणि मराठे लोकांवर छापा घालून त्यांचें पुष्कळ नुकसान करून त्यांस गंगानदीपार हांकून लाविलें. याप्रमाणें त्याचा टोळीचें नुकसान झाल्यामुळें दत्तोजी शिंद्याचा लश्कराचा जोर मोडला, हें त्यास तह करण्यास एक कारण झालें; परंतु अहमदशाह काबूलांतून येत आहे अशी बातमी आल्यावरून त्यास तह करण्याविषयीं विशेष मोठें कारण झालें, म्हणून शुजाउद्दौला व त्याचे दुसरे मददगार यांशीं त्याणें बोलणें लाविलें; नंतर तह झाला, परंतु तो फार दिवस टिकला नाहीं.

इ०स० १७५९, नोवेंबर; हि०स० ११७३, जमादिउल अवल.

अहमदशाहाची चौथी स्वारी.

जेव्हां ( इ०स० १७५८ त ) अहमदशाह दुराणी याचा मुलास मराठे लोकांनीं पंजाबांतून काढून लाविलें, तेव्हां तो बादशाह आपल्या राज्याचा वायव्येकडील प्रांतांत गुंतला होता; व पुढेंहि तो (पंजाब ) प्रांत परत घेण्यास स्वारी करण्याचा बेतांत

---

( १) हा महाराष्ट्र ब्राम्हण होता; त्याची असामी बुंदेलखंडांत होती, म्हणून त्यास बुंदेले म्हणत असत. सागर व काल्पी एथील माजी संस्थान्याचा हा मूळपुरुष होय.

आहे, इतक्यांत बलूची लोकांचा सरदार नसीर खान याणें आपली स्वतंत्रता पुरी स्थापण्याचा यत्न केला; तेणें-करून त्यास अडथळा आला. मग त्या देशाची व्यवस्था आपल्या खातरीजोगी करण्यास त्यास जो उद्योग करावा लागला, त्यांत त्याचा पुष्कळ वेळ गेला. त्यानंतर तो शिकारपुरचा रस्त्यानें सिंधुनदावर आला, आणि त्या नदाचा मार्गानें पेशावरापर्यंत जाऊन, सपटंबरांत तो नद उतरून पंजाबांत गेला. मराठे लोक त्याचा आड आले नाहींत, आणि तो हिमालयाखालचा उत्तरेकडील टेंकड्यांजवळून जवळून चालून गेला; तेणेंकरून त्यास पूर आलेल्या नद्या वटावतां आल्या. याप्रमाणें तो शाहरणपुराचा समोर यमुना उतरला.

इ०स० १७५९, सेपटेंबर; हि०स० ११७३, मोहरम.

या रीतीनें अहमदशाह हिंदुस्थानावर येत असतां, त्या बादशाहाशीं व नजीबउद्दौल्याशीं अलमगीराचा संबंध आहे असें ग्यासुद्दीनास वाटून अलमगीर हा कांहीं मसलती करील व आपला सूड घेईल अशी त्यास भीति पडली; म्हणून त्याणें मारेकरी घालून त्यास एकदम मारण्याचा हुकूम केला, आणि दिल्लीचा राजवंशांतील दुसऱ्या एका पुरुषास गादीवर बसविलें. या नव्या शाहजाद्याचा किताब कधींहि कबूल झालेला नाहीं. अलमगीराचा मागें त्याचा गादीचा जाहीर वारीस शाहआलम् हा बंगाल्यांत बसावयास ठिकाण मिळविण्याचा बेतानें गेला होता; म्हणून ते जमलेले मुसलमान राजे कोणी सांगावयाजोग्या अशा प्रमुखाशिवायच आपला कारभार चालवित होते.

ग्यासुद्दीनानें दुसऱ्या अलमगीराचा खून केला. इ०स० १७५९, नोवेंबर, हि०स० ११७३, रबीउसानी चंद्र.

अहमदशाहानें मराठ्यांचा उत्तर हिंदुस्थानांतील लश्करास पिटून लाविलें.

या वेळीं मराठ्यांचा मदतीस त्यांचे दोस्त जाट नव्हते; तथापि त्यांचे स्वतांचे तीस हजार घोडेस्वार लढायास रणभूमीवर तयार होते, परंतु त्या लश्कराचा दोन टोळ्या केलेल्या असून त्या एकमेकांपासून कांहीं अंतरावर होत्या, आणि त्यांचा लुटींमुळें लोक संतापत आणि त्या द्वेषानें शत्रूचा जाण्यायेण्याची कांहीं खबर त्यांस देत नसत. पुढें एके दिवशीं अहमदशाह हा अकस्मात् दत्तोजी शिंद्याचा टोळीवर आला, आणि इतक्या तडाक्यानें तिजवर छापा घालता झाला, कीं त्या टोळीचा मुख्य सरदार व दोन तृतीयांश लोक यांस त्याणें जाग्यावरच कापून टाकिलें. इकडे मल्हारराव होळकराचा हाताखालचीदुसरी टोळी अद्यापि दूर होती; तिणें चंबळानदीचा दक्षिणेकडील देशाकडे पलायनास आरंभ केला. त्या वेळीं मोदीखान्याकडील लोकांचा एक जमाव येत आहे तो लुटावयास मिळेल अशा लोभांत त्या टोळींतील लोकांस पाडून अहमदशाहानें त्यांस वाट सोडून एकीकडे आणिलें, आणि मग त्याचा एका दुराणी टोळीनें मुद्दाम एक लांब कूच करून तीस गांठून बहुतकरून तिचें वाटोळें केलें. हे पराजय होण्याचा पूर्वीं पुष्कळ दिवस राघोबादादा दक्षिणेंत दाखल झाला होता. त्याणें जे मुलुक मिळविले त्यांचें वैंभव पाहिल्यानंतरहि, त्यांपासून जे द्रव्यसंबंधीं परिणाम झाले ते मराठ्यांचा दरबारास रुचले नाहींत; कारण चालीप्रमाणें लुटीचें पीक घेऊन यावयाचें तें १,००,००,००० रुपयांजवळजवळ कर्ज घेऊन हा घरीं आला होता. आतां त्या वेळीं पेशव्याचा चुलत भाऊ सदाशिवरावभाऊ, ज्याची

हिंदुस्थानांत " भाऊ साहेब " या नावानें प्रसिद्धि आहे, तो जी नुकतीच लढाई करून आला होता, तिशीं या दरिद्री लढाईची तुलना केली म्हणजे ही अधिक बेफायद्याची दिसे. तो भाऊ दक्षिणेमध्यें स्वराज्यसंबंधीं कारभार व सेनापतीपणा करित असेः त्याणें नुकतेंच अहमदनगर घेतलें होतें, आणि सलाबतजंगाबराबर बंदोबस्त करण्याचा घाट अगदीं बेतावर आणिला होता, तो बंदोबस्त पुढें उदगीर एथें पुरा झाला, त्यापासून मराठे लोकांस पुष्कळ मुलुक व द्रव्य हीं प्राप्त होऊन दक्षिणेंतील मोगलसरकारावर एवढा बोजा बसला, कीं त्यापासून पुढें तें कधींहि सावध झालें नाहीं. या विरुद्धस्थितीमुळें राघोबाचा मनांत वांकडें आलें, आणि जेव्हां भाऊनें त्याचा उधळेपणाविषयीं त्यास निषेध केला, तेव्हां राघोबानें उत्तर केलें, कीं उत्तरहिंदुस्थानांतील पुढील स्वारी आपणच पतकरावी, म्हणजे तिकडे स्वारी करण्यांत व दक्षिणेंत करण्यांत काय तफावत आहे ती आपणास समजेल. भाऊनें त्याचा शब्दच धरिला. नंतर एकमेकांनीं आपल्या कामांची अदलाबदली करावी, असा लागलाच त्यांचा ठराव झाला.

मराठ्यांचा सत्तेचा कळस झाला.

या वेळीं मराठे लोकांचा सत्तेचा कळस झाला होता. त्यांची राज्याची उत्तरमर्यादा सिंधुनद व हिमालयपर्वत यांपर्यंत ठेपली होती, आणि दक्षिणेस बहुधा कन्याकुमारिका केपाजवळजवळ गेली होतीः या सरहद्दींमध्यें, जो मुलुक यांचा स्वतांचा नव्हता, त्यांतून यांस खंडणी मिळत असे. ही सर्व मोठी सत्ता एकहाती होती; पेशव्यांनीं ताराबाईजवळ बंदोबस्त केला होता, त्यावरून साताराचा राजा हा आपल्या नामधारी

प्रधानाचा ताब्यांत येऊन सर्व प्रकारचीं सर्व ढोंगें पेशव्यांमध्यें येऊन राहिलीं होतीं.

मराठे लोकांचा लश्कराचा वगैरे नेमणूका त्यांचा सत्तेबरोबर वाढल्या. सांप्रत त्यांची फौज केवळ लुटारू लोकांचीच नव्हती; तींत चांगले पगारदार व चांगल्या सामानसुमानासहित असे स्वार प्रत्यक्ष सरकारचा चाकरींत होते; आणि १०,००० कवायदी पायदळ होतें. जरी हें पायदळ, ही, युरोपीयन लोकांचा ताब्यांतील पायदळाची अगदीं अपुरी नकल होती, तथापि हें पायदळ हिंदुस्थानांतील पूर्वीचा कोणत्याहि पायदळापेक्षां विशेष चांगलें होतें.

त्यांची फौज.

पूर्वीं मोगललोकांचा तोफखान्याचा मराठे धाक बाळगीत, व हेवा करीत. हल्लीं त्यास माजी पाडणारा असा तोफखाना त्यांजवळ होता. त्यांणीं, आपले प्रतिस्पर्धी जे मोगल त्यांचा विलक्षण डामडौलहि घेण्यास प्रयत्न केला. उमदे पोषाक, मोठे डेरे, आणि घोड्यांचे वगैरे उंचा शृंगार हे त्यांमध्यें साधारण होऊन गेले होते; आणि त्यांचीं दरबारें व परिवार हीं मोगलांचा नमून्याबरहुकूम झालीं होतीं.

पेशवा व त्याचे प्रधान हे कोंकणस्थ ब्राह्मण: ही जात चांगली देखणी आहे, आणि त्यांचा रीतीभातींचें गौरव व गांभीर्य यांहींकरून त्यांस विशोभित न दिसतां मोठेपणा धरितां येतो; यामुळें पेशव्यांमध्यें व त्यांचा प्रधानमंडळीमध्यें वरील मोठेपणाचा डामडौल विलगसा दिसला नाहीं; परंतु तोच डौल मराठ्यांस अगदीं विशोभित दिसत असे; कारण मराठे चपळ खरे; परंतु लहान, व त्यांचीं शरीरें

रांकट, व रीतिभाती हलकट, यामुळें त्यांणीं डामडौलाचा वर्तणूकेचा आव घातला असतां ते हंसावयाजोगे दिसत.

त्या वेळीं मराठे लोकांमध्यें सामर्थ्य व डौल हीं जितकीं होतीं, तितकीं सदाशिवरावभाऊस अधिक वजन देण्याकरितां बाहेर काढलीं होतीं; त्यांतहि शिंदे व होळकर यांस अपाय झाल्याची बातमी लागल्यामुळें मराठे लोकांस प्रयत्न करण्यास एक नवीन प्रेरक कारण झालें; तेव्हां आपण एक मोठी व निकालाची टक्कर मारून बाकी राहिलेंसाहिलें हिंदुस्थान काबीज करावें असें त्यांचा मनांत होतें, असें दिसून आलें.

उत्तरहिंदुस्थानांतील लढाईची मोठी तयारी.

याप्रमाणें तो भाऊ उंच पदवी पावला. तो स्वभावानें गर्विष्ठ व दरारेदार, व आपल्या कुटुंबाचा नवीन महत्वाविषयीं गर्व वाहणारा असा असे; त्याची नुकतीच फत्ते झाली होती; यामुळें मी मोठा राजकारणी व शिपाई आहें असा त्यास स्वतांचा सामर्थ्याचा वाजवीपेक्षां फाजील भरवसा येऊन तो फुगून गेला होता. त्याबराबर पेशव्याचा तरुण पुत्र व गादीचा जाहीर वारीस विश्वासराव हा होता, व सर्व मोठमोठे ब्राह्मण व मराठे सरदार एकाचीहि वगळ न करितां होते. जसजसा तो पुढें जात चालला, तसतशा पुष्कळ राजपूतलोकांचा टोळ्या त्यास मिळण्याकरितां आल्या, आणि सुरजमल्लानें तीस हजार जाटलोक त्याचा कुमकेस पाठविले होते असें ह्मणतात. हा अनुभविक वृध्द जाटांचा सरदार पुष्कळ वर्षें मराठे लोकांबराबर वागत असे; त्याणें भाऊस असा उपदेश केला, कीं आपण आपलें

सदाशिवरावभाऊचा उद्धटपणा.

पायदळ व तोफा व बारबरदारीचें सर्व वजनदार सामान, हें जाटांचा मुलुकांत ठेवावें, कारण तेथें त्यांस मजबूद किल्ल्यांचा आश्रय आहे आणि आपल्या घोडेस्वारांनिशीं पुढें जाऊन मराठी रीतीनें शत्रूस त्रास द्यावा, आणि लढाई लांबवावी ह्मणजे दुराणी लोक हे आधींच पुष्कळ महिने हिंदुस्थानांत राहिले आहेत, त्यांस हवेचा कारणानें आपल्या जन्मभूमिकेचा पहाडांत माघारें निघून जावें लागेल. या त्याचा शहाणपणाचा बोलण्यास मराठे सरदारांनीं अनुमोदनें दिलीं; परंतु त्यांचा मुख्य भाऊ हा अशा रीतीनें मिळविलेल्या जयास तुच्छ मानित होता, आणि आपल्या कवायदी पायदळाचें व तोफांचें तो अतिशय स्तोम माजवित असे, ह्मणून त्याणें तें बोलणें एकदम नाकबूल केलें. याशिवाय दुसऱ्याहि वेळीं त्याणें सुरजमल्लाचा अपमान केला होता. सुरजमल्ल हा एक हलका जमीनदार आहे, आणि राजकारभाराविषयीं मोठ्या दृष्टीनें तारतम्य पाहण्याची त्यास शक्ति नाहीं, असें समजून तो त्याशीं वागत असे. शिवाय आपल्या ब्राह्मणी गर्वानें व द्वराऱ्याचा रीतीनें अम्मल चालवून, आणि पूर्वींचा सरदारांप्रमाणें हाताखालचा सरदारलोकांशीं वगैरे मन मोकळें करून स्नेहभावानें न वर्तून त्याणें आपल्या मराठे सरदारांसहि राग आणिला होता. याप्रमाणें तो दिल्लीवर चालून गेला; तेथून ग्यासुद्दीन हा जाटांचा मुलुकांत पळून जाऊन राहिला होता, आणि दिल्लीचा रखवालीस दुराणी व त्यांचे प्रतिपक्षी यांचें थोडेंसें लश्कर होतें. त्या शहराचा तट फार मोठा, त्यामुळें त्याचा एका बेमरामती बुरुजावरून मराठ्यांचा एका टोळीस वर चढतां आलें; नंतर बालेकिल्ला थोडा वेळ

लढला, परंतु शेवटीं मराठ्यांचा तोफखा- न्याचा सहाय्यानें तो पाडाव झाला. त्या भाऊनें आपल्या जयाचा उपयोग अवि- चारानें व कृपणतेनें केला; तो असा कीं तेथील राजवाडे, कबरी, व दर्गे, यांतील आराशाचें सामान, जें इराणी व अफगाणी लोकांचा हातून राहिलें होतें, तें लुटण्याचा लो- भानें इमारती छिन्न विछिन्न केल्या. त्याणें कचेरीचा महा- लाचें रुप्याचें छत फाडून त्याचे सत्रा लाख रुपये पाडिले,[२] आणि बादशाहाचें सिंहासन जरी पूर्वींचा इतकें मोलवान् नव्हतें तरी तें व दुसरीं सर्व राजकीय भूषणें हीं बळका- विलीं. विश्वासरावास हिंदुस्थानाचा बादशाह ठरवून त्याचा नावानें द्वाही फिरवावी असेंहि तो ह्मणूं लागला होता; परंतु दुराणी लोक सिंधुनदापार हाकून लावाल तेथपर्यंत ही गोष्ट तहकूब ठेवावी, असें त्यास सांगून तो बेत लोकांनीं तसाच ठेवविला. सुरजमल्ल हा आपल्या शेजाऱ्यांबराबर इतकी निकरास गोष्ट नेण्यास इच्छित नव्हता; तो या सर्व कृत्यांनीं भयाभीत होऊन त्रासला, आणि मागून लवकरच शुजाउद्दौला याशीं गुप्त बोलणें लावून व मराठ्यांची दोस्ती उघड रीतीनें न सोडितां, तो आपल्या देशास निघून गेला. ही फसाद हलकी सबब लक्ष देण्याजोगी नाहीं असें भा- ऊनें बाहेरून दाखविलें.

त्याणें दिल्ली घे- तली.

त्या वेळीं अहमदशाह हा अयोध्येचा सरहद्दीवर

---

(२) १७,००,००० रुपये असें काशीरायाचा हकीकतींत आ- हे; व राजवाड्यांतील सर्व सोन्यारुप्यासुध्धां, १७,००,००० रुपये असें ग्रांट डफ म्हणतो.

अहमदशाहाचें शुजाउद्दौल्याबराबर बोलणें झालें.

अनूपशहर एथें पावसाळ्ची छावणी देऊन राहिला होता. तो तेथें एक मोठें बोलणें बोलण्याकरितां गेलेला होता. नजीबउद्दौला व रोहिले हे आपणास मनःपुरःसर मदद करितील अशी याची खातरी होती; परंतु शुजाउद्दोला याचा कुमकेची तितकी खातरी नव्हती. शुजाचानें मुसलमानलोकांचा विरुद्ध उघड बाहेर पडवेना; तथापि कोणचाच पक्षास मिळूं नये यांत त्याचें हित होतें, आणि त्यांतूनहि त्याचा बाप सफ्दरजंग, याचा व अहमदशाहाचा उघड दावा होता, म्हणून अहमदशाहाकडेस मिळण्याविषयीं यास पिढीजादी अभीति होती. त्यास वळविण्याकरितां अहमदशाह अनूपशहरास गेला होता; त्या योगानें व नजीबउद्दौला हा त्यास मुद्दाम भेटावयास गेला होता, त्याचा शिकवणीनें, शुजा मुसलमानांचा पक्षास येऊन मिळाला, तथापिहि तो मराठ्यांशीं व्यवहार ठेवित असे; कारण कीं जरूर दिसल्यास नेहेमीं आपणास योग्य रीतीनें तोड करतां यावी अशी त्याची इच्छा होती; व शिवाय मराठे लोक व अहमदशाह यांचीं परस्परांशीं बोलणीं होण्यास तूर्त याचा हा व्यवहार उपयोगीं पडत होता.[३]

शुजा मुसलमानांचा कटांत येऊन मिळाला.

इ० स० १७६० जुलै, हि० स० ११७३, झिलूहज.

हा बंदोबस्त संपल्यावरहि पावसाचा झपाट्यामुळें अद्यापि अहमदशाहाचानें बाहेर जाववलें नाहीं; परंतु तो ऋतु चांगला पुरा होण्यापूर्वींच तो आपली छावणी मोडून दिल्लीकडेस गेला. तो जलद जाण्याचें कारण असें झालें कीं

अहमदशाह सदाशिवरावभाऊवर चालून गेला.

(३) हीं बोलणीं करण्यास काशीराय हा एक वकील होता, त्याणें या सर्व गोष्टींची हकीकत लिहिली आहे.

दिल्लीचा वर साठ कोशांवर यमुनाकांठीं कुंजपुर म्हणून एक ठिकाण आहे, तेथें रखवालीस एका मख्यात सरदाराचा हाताखालीं दुराणी लोकांचें लश्कर होतें; त्यावर भाऊ हा निवडक फौज घेऊन निघाला आहे असें अहमदास वर्तमान लागलें. मग वर सांगितल्याप्रमाणें तो त्वरेनें निघून गेला; तो दिल्लीजवळ यमुनेशीं जाऊन पोंचला आणि पाहतो तों ती अद्यापि फुगून झपाट्यानें चालली आहे; म्हणून तो उतरणाचा शोधार्थ कुंजपुरापर्यंत किनाऱ्याकिनाऱ्यानें गेला; परंतु तेथें पोंचे तों तें शहर मराठ्यांनीं घेऊन सर्व रखवालदारांस मारून टाकिलें, असें ऐकून तो खंती झाला. हा केवळ डोळ्यांसमोर केलेला अपमान पाहून त्यास राग आला, आणि तो कांहीं चालत व कांहीं पोंहत अशी ती नदी उतरला. या धीटाईचा कृत्यामध्यें त्याचे पुष्कळ लोक नाहींसे झाले; तथापि तेणेंकरून मराठ्यांचा मनांत त्याविषयीं इतका ग्रह झाला, कीं ते लवकरच पाणिपत एथें माघारे निघून गेले, आणि तेथें आपल्या छावणीसभोंवता रुंद व खोल खंदक खणून व मोरचे देऊन आपल्या पुष्कळ तोफांचा आश्रयास जाऊन राहिले. त्या वेळीं भाऊचा फौजेंत ५५,००० नेमणूकी पगारदार घोडेस्वार, थोडक्यांत थोडके म्हटले तरी १५,००० लुटारू मराठे घोडेस्वार, व १५,००० पायदळ इतकें होतें; त्या पायदळापैकीं ९,००० कवायदी शिपाई, इब्राहिम खान गारदी म्हणून फ्रेंच लोकांची चाकरी सोडून पळून आलेला एक मुसलमान सरदार याचा हाताखालीं

तो धीटपणें यमुना उतरला.
इ० स० १७६०, ता० २५ आकटोबर.

मराठे पाणिपत एथें जाऊन खंदक खणून छावणी देऊन राहिले.

त्यांची संख्या.

होते. याशिवाय त्याजवळ २०० तोफा, पुष्कळ जंबुरे, व बाणांचा खूब भरणा होता. ( बाण हें मराठे लोकांचें मोठें आवडतें हत्यार आहे. ) हे लोक, व त्यांचा पुष्कळ परिवार मिळून त्याचा छावणींत तीन लक्ष लोक झाले होते.[४]

अहमदशाहाची फौज.

अहमदशाहाजवळ सुमारें ४०,००० अफगाण व दुराणी लोक, १३,००० हिंदुस्थानी घोडेस्वार, आणि अजमासें ३८,००० हिंदुस्थानी पायदळ इतकें होतें. त्यापैकीं हिंदुस्थानी पायदळ फौजेंतील जेवढे रोहिलेअफगाण होते ते चांगले मजबूद होते; परंतु बाकी बहुतेक नेहेमींचा प्रमाणें हिंदुस्थानी भिकार पायदळ होतें.[५] शिवाय त्याजवळ निरनिराळ्या मानाचा तीस तोफा होत्या; त्या बहुधा त्याचा हिंदुस्थानी दोस्त राजांचा होत्या. त्यांशिवाय त्याजवळ

---

( ४ ) पगारदार घोडेस्वारांचें व पायदळाचें मिळून मराठे लोकांचें वर सांगितल्याप्रमाणें ७०,००० लश्कर होतें, असें काशीरायाप्रमाणेंच ग्रांट डुफ्फ हाहि ह्मणतो; व शिवाय लुटारू घोडेस्वार व बाजारबुणगें मिळून २,००,००० ( दोन लाख ) लोक होते, असा त्याचा अजमास आहे. काशीराय ह्मणतो कीं सर्व लोक ५,००,००० होते.

( ५ ) दुराणी लोकांचाच हकीकतींवरून असें समजतें कीं त्यांचें ७०,००० लोक सिंधुनद पार उतरून आले होते, परंतु नादिरशाहाचा फौजेची व पुढें अर्वाचीन काळीं शाहझमान याचा फौजेची वरील फौजेशीं तुलना केली असतां, आणि एशियाखंडांतील हजेरीपत्रकें बरोबर नसतात ही गोष्ट ध्यानांत ठेविली असतां, वरील संख्या फार वाढवलेली आहे, तशांतहि पंजाब व दुसऱ्या ठिकाणीं रखवालदार लोक ठेविल्यामुळें, लढाईंत लोक मेल्यामुळें, व उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत हवेमुळें लोक मरून गेल्यामुळें अहमदशाहाची फौज कमती झाली असेल, यास्तव ४०,००० अफगाणलोक होते असें धरलें तर बस आहे. हिंदुस्थानी फौजेची संख्या काशीरायाचा हकीकतीवरून घेतली आहे. शुजाउद्दौल्याजवळ २,००० घोडेस्वार व

पुष्कळ जंबुरेहि होते.

अहमदशाहाचें लश्कर थोडें होतें, यामुळें शत्रूंचा छावणीवर हल्ला करणें हें त्याकडून होणें अशक्य होतें, म्हणून त्यासहि तळ देऊन आपल्या लश्करासभोंवती खंदकाची वगैरे मजबूदी करून राहणें भाग आलें. याप्रमाणें दोन्ही लश्करांची लढाई होणें तहकूब झालें, तेणेंकरून भाऊचा लाग बेफायद्याचा होता असें नाहीं. त्याणें यमुनेचा खालचा भागीं मिळववतील तितके स्वार मिळविण्याविषयीं गोविंदराव बुंदेले यास हुकूम केला होता; ह्मणून तो सरदार सांप्रत दहा किंवा बारा हजार स्वारांनिशीं दुराणी लोकांचा छावणीचा पिछाडीस आला होता. तो त्यांचा छावणीपासून आपणास कांहीं धक्का नलागे अशा अंतरावर राहून शत्रूस दाणापाण्याचा वगैरे तोटा पाडावा ह्मणून सर्व देशभर आपले लोक पसरित असे. भाऊ हाहि आपल्या घोडस्वारांचा त्याच रीतीनें उपयोग करित असे असें संभवतें; कारण थोडक्याच दिवसांत मुसलमानांचा छावणींत दाणापाण्याचा तोटा पडून त्यांस अतिशय इजा होऊं लागली.

लढाईचें काम लांबावलें.

दुराणी लोकांस मराठ्यांप्रमाणें तुटक लढाई करण्याची संवई नसे; तथापि ते आपल्या टोळ्या धीटाईनें व त्वरेनें इकडून तिकडे नेऊन त्या गुणाची उणीव पुरी करीत. पुढें या प्रसंगांत अत्तै खान नामें, अफगाण बादशाहाचा मुख्य वजीराचा

मराठे लोकांस दाणावैरणीचा तोटा पडला.

---

तितकेंच पायदळ होतें; दुराणी लोकांजवळ स्वतांचा ४० तोफा होत्या, असें काशीराय लिहितो. परंतु ही गोष्ट त्यांचा स्वतांचा हकीकतींचा अगदीं विरुध असून तसा संभवहि होत नाहीं.

पुतण्या, याचा हाताखालचा एका घोडेस्वारांचा टोळीनें एके दिवशीं तीस कोशांहून अधिक पल्ल्याचें कूच करून सूर्योदयाचा सुमारास गोविंदरावाचा छावणीवर छापा घातला, आणि त्याचा टोळीचा समूळ नाश केला. त्या लढाईंत गोविंदराव हाहि स्वतः मारला गेला. नंतर जेव्हां सर्व मैदान मुलुक दुराणी लोकांचा कब्जांत आला, तेव्हां भाऊ तटबंदीचा छावणींत राहिला असल्यामुळें, व त्याचें लश्करहि पुष्कळ असल्यामुळें लवकरच त्याचा स्थितीपासून होणारी अडचण त्याचा अनुभवास येऊं लागली.

मराठे लोक हे घांसदाणा मिळविण्याचा कामांत फार हुशार आहेत. त्यांचा छावण्यांतून प्रत्यहीं सूर्योदयीं लहान लहान घोडे, व तट्टू यांवर बसून लांबचा लांब रांगा निघालेल्या दिसतात, आणि ते लोक चोहींकडे जाऊन गुरांस वैरण, घरांचीं ओढून आणलेलीं जळवणाकरितां लांकडें, आणि जेथें गांवढेकरी लोकांनीं पेंवांतून दाणा लपविलेला असेल, त्यांतून उकरून काढलेला दाणा, या सर्वांचीं ओझांचीं ओझीं घेऊन रात्र पडावयाचा पूर्वीं परत येतात. टोळ्यांचा टोळ्या कांहीं दिवसपर्यंत दूर जातात, आणि त्या दिवसांचा मानाप्रमाणें वर सांगितलेल्या जिन्नसांचा पुष्कळ भरणा घेऊन येतात. याशिवाय दूर देशांतून हजारों बैलांचें एक एक लमाण, अशीं लमाणें वणजारी लोक आणितात; ( वणजारी लोक हे छावण्यांमध्यें एका जातीचे दाणे विकणारे आहेत; त्यांमध्यें व्यापारीपणापेक्षां लढाऊपणा पुष्कळ आहे. ) या सर्व मदती सांप्रत मराठ्यांस नाहींशा झाल्या, आणि पाणिपतचें शहर त्यांचा लश्कराचा हद्दींत होतें, तें सर्व खाऊन त्याचा फडशा झाल्यावर, दुष्काळाचें जें अति तीक्ष्ण दुःख तें त्यांचा

अनुभवास येऊं लागलें.

या दशेस वर्तमान येत असतां, इकडे तो शेवटचा प्रसंग यावा ह्मणून एकाहि पक्षाचे लोक निमूट बसले नव्हते. त्यांचा फौजांमध्यें टोळ्याटोळ्यांचा हमेशा लहान लहान लढाया होत असतः मराठ्यांनीं दुराणी छावणीवर तीन जबरदस्त हल्ले केले; त्यांचा छावणींत हमेशा वणजारी लोक येण्याविषयीं यत्न करितच असत, आणि त्यांतून एक लमाण दिल्लीहून पैक्यासुद्धां भरून येत होतें तें जरी अफगाणांचा हातांत सांपडलें, तरी सुरजमल्ल व राजपूत रजवाडे हे गुप्तपणें दुसरीं त्यांचा छावणींत पाठवित असत; आणि भाऊ हा आपलीं संकटें मोठेपणानें व निश्चयानें सहन करित असे, त्यामुळें त्यांचें महत्व,व त्यांची दररोजची वाढ, हीं त्याचा शत्रूंस समजत नसत. त्या योगानें अहमदशाहाचे एतद्देशीय दोस्त उतावळे झाले, आणि एकदां निकराची लढाई करून आमचा मेहनतीचा शेवट करावा अशी विनंती करून त्यांणीं अहमदशाहास थकविलें: परंतु तो त्यांस हमेशा उत्तर देत असे, कीं "हा लढाईचा विषय आहे, तो तुह्मांस अवगत नाहीं. दुसऱ्या कामांमध्यें तुमचा मर्जीप्रमाणें तुम्ही करा,परंतु ही गोष्ट मजकडे ठेवा." त्याणें आपल्या खंदकाचा पुढचा भागावर एक लहान लाल तंबू मारविला होता, त्यांत तो प्रत्यहीं सकाळीं नमाजाचा वेळीं सूर्योदयीं जात असे, आणि तेथें बहुधा दर रोज सायंकाळीं जेवावयास परत येत असे. तो सारा दिवसभर घोड्यावर बसून आपल्या लश्करचीं ठाणीं पाहत व शत्रूचा छावणीचा अजमास घेत फिरत असे, आणि कधींहि पंचवीस तीस कोश घोड्यावर बसून फिरल्याशिवाय त्याचा दिवस जात नसे. रात्रीस तो शत्रूंचा

छावणीजवळ जितक्या नजीकचा पल्ल्यावर ठेववेल तितकी नजीक ५,००० घोडेस्वारांची चौकी ठेवित असे; व शिवाय दुसऱ्या टोळ्या सर्व छावणीचा वाटोळ्या घिरट्या घालित असत. "तो हिंदुस्थानी सरदारांस ह्मणत असे, कीं 'तुम्ही निजा; तुह्मांवर कांहीं जोखम न पडे अशी मी तजवीज ठेवीन;' आणि वास्तविक सांगायास गेलें तर, त्याचे हुकूम ते चित्रगुप्ताचा लेखांप्रमाणें मानित असत, आणि ते अमलांत आणण्यास कोणीहि क्षणभर अवकाश किंवा कांकूं करित नसत." याप्रमाणें काशीरायानें वर्णन केलें आहे.

इकडे भाऊची मत्यहीं अधिकाधिक धांदल होत चालली, आणि सांप्रत चाललेली हकीकत लिहिणारा काशीराय, याचा मार्फत मुसलमानांची व आपली मध्यस्थी करून तह करण्याविषयीं तो वारंवार विनंती करूं लागला. जेव्हां त्याचें तें बोलणें अहमदशाहास कळलें, तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, मी फकत मददगार आहें, याकरितां या बाबदींत माझा स्वतांचा कांहीं अधिकार नाहीं; लढाईसंबंधीं सर्व अखत्यार मजकडे आहे, परंतु तहांचीं वगैरे बोलणीं करणें हें सर्व मीं हिंदुस्थानी सरदारांकडे ठेविलें आहे. त्या सरदारांपैकीं बहुतेक समजूत करण्यास खुश होते, आणि तसें झालें असतें तर शुजाउद्दौला यास ती गोष्ट फारच पसंद झाली असती; परंतु नजीबउद्दौला एकसारखा त्यांचा ह्मणण्याचा आड येई, आणि शेवटीं त्याणें सर्वांचा मनांत असें भरवून दिलें, कीं मराठ्यांची सत्ता कायम आहे तों जर अहमदशाह हिंदुस्थानांतून गेला, तर सर्वांचा नाश होईल.

त्या वेळीं मराठ्यांचा छावणीसभोंवतें कडें असून त्यामध्यें कितीएक जनावरें मेलीं आहेत व कित्येक मरत

पडलीं आहेत; त्यांपासून दुर्गंधी सुटली आहे; त्यांचा सभोंवते उपासानें सुकवशीस लागलेले असे बाजारबुणग्याचे लोक आहेत, आणि जीं दुःखें त्यांणीं पूर्वीं सोसलीं त्यांचीं पुढें अति भयंकर अखेरी व्हावयाची आहे, अशी त्यांस भीति पडली आहे; अशा प्रसंगीं त्या मराठ्यांचा लश्कराची कशी स्थिति असेल ही कल्पना करणें कठीण नाहीं. त्यांणीं जे शेवटचे प्रयत्न केले त्यांत एके वेळीं त्यांणीं एक टोळी, बराबर अपार बाजारबुणगें देऊन, दाणावैरण आणण्याकरितां पाठविली होती; परंतु तो बिचारा निराश्रित जमाव शत्रूंनीं उमगून काढून अतिशय लोकांची कतल केली. तेव्हां सरदार व शिपाई लोक यांणीं जमून भाऊचा डेऱ्यास घेरा घातला, आणि म्हणूं लागले कीं आमची अगदीं शेवटची सामग्री संपली, यास्तव अशा हालांत मरण्यापेक्षां होईल तें जड जोखम सोसावें हें बेहतर आहे.

त्या निर्वाणीचा वेळीं **भाऊनें** स्वहस्तें **काशीरायास** लहानशी चिठी लिहिली, कीं "पेला अगदीं कांठोकांठ भरला आहे; त्यांत एक बिंदुहि आतां राहूं शकणार नाहीं. जर कांहीं होण्याजोगें असेल तर कर, नाहीं तर मला एकदम स्पष्ट जबाब दे. या पुढें लिहिण्यास किंवा बोलण्यास कांहीं वेळ राहणार नाहीं."

पाणिपतची लढाई.

वरील चिठी सकाळचे तीन वाजतां (म्हणजे सुमारें पहांटेचा प्रहर रात्रीस) **काशीराय** हा **शुजाउद्दौला** यास समजावित होता, तेव्हां **मराठे** सजून तयार होत आहेत असें त्याचे हेर सांगावयास आले. **शुजा** लागलाच त्या **शाहाचा** तंबूंत गेला, आणि विलंब न लावितां त्यास जागें करवि

म्हणून सांगता झाला. मग अहमदशाह कपडे घालून तयार होऊन त्वकरच बाहेर आला, आणि त्याचा दरवाजाशीं एक जीन घातलेला घोडा हमेशा उभा असे त्यावर बसून शत्रूकडे जाण्यास निघाला, आणि आपण पुढें गेला तसा आपल्या लोकांस तयार होऊन बाहेर पडण्यास हुकूम देता झाला.

इ०स० १७६१, जान्युआरि ता० ६, हि०स० ११७४, जमादि उसानी.

अहमदशाहानें प्रथम काशीरायास बलावूं पाठविलें, आणि त्याणें सांगितलेली बातमी त्यास कोठून लागली हें त्यास विचारिलें. नंतर तो पुढें जात असतां काशीरायानें तें सर्व त्यास सांगितलें. याप्रमाणें ते छावणीपासून सुमारें अर्ध कोश गेले, तों लुटीनें भर्गीत झालेले असे कांहीं दुराणी स्वार त्यांस भेटले. त्यांणीं असें वर्तमान सांगितलें, कीं मराठे आपली छावणी सोडून पळून गेले. हें ऐकतांच अहमदशाह काशीरायाकडे वळला आणि त्यास म्हणाला, कां ? याविषयीं तुम्ही काय सांगतां ? परंतु हें तो बोलतच आहे इतक्यांत मराठ्यांनीं आपल्या सर्व तोफांचा रांगेचा रांगेचीं सरबत करून आपण आलों असें जाणविलें. "तेव्हां तो शाह घोड्यावर बसून एक इराणी हुक्का ओढित होता तो आपल्या चाकराचा हातीं देऊन मोठ्या स्वस्थतेनें नबाबास ( शुजाउद्दौला यास ) म्हणाला, कीं 'तुझा चाकर सांगतो ती बातमी अगदीं खरी आहे, असें मला दिसतें.' नंतर त्याणें आपल्या फौजेचा आघाडीचा लोकांस त्वरा करण्याचा हुकूम केला. पुढें जेव्हां त्यांची दृष्टादृष्ट झाली, तेव्हां मराठ्यांचा तोफखाना तोंडावर असून त्यांचीं निशाणं हळूहळू व नियमित पावलांनीं येतांना दिसूं लागलीं.

अहमदशाहानें आपली फौज त्यांसमोर उभी केली, आणि सांमत त्याचा लाल तंबू त्याचा फौजेचा पिछाडीस राहिला होता, तेथेंच तो स्वतः ठाणें धरून राहिला.

मुसलमानलोकांनीं आपल्या तोफांचा फारसा उपयोग केला नाहीं, आणि जसजशा मराठ्यांचा तोफा जवळ येऊं लागल्या, तसतसे त्यांचे गोळे त्यांचा शत्रूंचा डोक्यांवरून जाऊं लागले. नंतर इब्राहीम खान गार्दी याणें वास्तविक लढाईस आरंभ केला. तो प्रथम त्या भाऊचा समोर घोड्यावर बसून गेला, आणि नम्रतेनें त्यास सलाम करून म्हणाला कीं "माझा लोकांस नियमानें पगार द्यावा, असा मी आग्रह धरल्यामुळें तुम्ही मजवर वारंवार रागावत असा; परंतु तो पगार त्यांणीं व्यर्थ खाल्ला नाहीं असें आत्रांच आपल्या दृष्टीस पडेल." नंतर त्याणें आपल्या हातांत निशाण घेतलें, आणि गोळीबार बंद करून बागनिटांचा मारा शुरू करावा असा त्याणें आपल्या पलटणांस हुकूम केला. मग ते लोक हल्ला करून रोहिल्यांवर पडले. रोहिले लोक हे शूर, परंतु कवायती नव्हते; यामुळें त्यांचा शूरत्वानें उलटा त्यांचा अधिक तोटा झाला, आणि त्यांतील अतिशय लोक मारले जाऊन शेवटीं त्यांची फळी फुटली. त्यांचा पराजय झाल्यामुळें अहमदशाहाचा मुख्य वजीर दुराणी लश्कराचा मध्यभागावर सर होता त्याची उजवी बाजू उघडी पडली; आणि त्यावर मराठ्यांचा लश्करांतील निवडक लोकांनिशीं भाऊ व विश्वासराव यांणीं हल्ला केला. या हल्ल्यामध्यें त्या वजीराचा पुतण्या अत्ताई खान हा त्याचा बाजूस मरण पावला, आणि त्याचा दुराणी लोकांस मागें हटावें लागलें; परंतु तो वजीर स्वतः घोड्यावरून

उतरला आणि जे थोडे लोक त्याचा जवळ होते त्यांनिशीं आपल्या कामावर मरण्याचा त्याणें निश्चय केला. त्या मुख्य वजीराचा फौजेचा अति जवळ शुजाउद्दौला होता; परंतु इकडे काय चाललें होतें हें धुळीमुळें त्याचा दृष्टीस पडलें नाहीं, तथापि त्या कोंपऱ्यामध्यें माणसांचे व घोड्यांचे आवाज अकस्मात् नाहींसे झाले असें पाहून, असें होण्याचें कारण काय याचा तपास करण्याकरितां, त्याणें काशीरायास पाठविलें. तो येऊन पाहतो तों तो मुख्य वजीर भर चिलखत घालून पदाति आहे, आणि क्रोध व निराशा यांचा आवेश येऊन तो आपल्या लोकांस आपलीं ठाणीं सोडून गेल्याविषयीं फजीत करून त्यांस पुनः पलटणींत आणण्याविषयीं यत्न करित आहे. त्याणें सांगितलें कीं "शुजाउद्दौला याजवळ दौड करून जा, आणि त्याला सांग कीं जर विलंब न लावितां तूं माझा मदतीस न येशील, तर मी मरून जाईन." परंतु शुजा हा जरी आपलें ठाणें धरून राहिला होता, तरी त्या लढाईत हात घालण्याविषयीं तो धजला नाहीं.

इकडे हें सर्व वर्तमान अहमदशाहाचा नजरेस पडलें नव्हतें असें नाहीं. त्याणें जा शिलकी फौजेस पुढें सरसावण्याचा हुकूम केला होता, ती त्या वजीराचा नाश न होऊं देण्यास घातीचा वेळीं पोंचली. नंतर लढाई जागचा जाग्यावर उभें राहून चालली, तथापि अद्यापि मराठ्यांचाच पक्ष जबर होता. शेवटीं अहमदशाहानें, पळालेल्या लोकांस जमा करून आणि जे कोणी परत येण्यास नाकबूल करतील त्यांस तोडून टाकण्याचा हुकूम देऊन, आपल्या स्वतांचाच पतकास पुढें सरसावण्यास आज्ञा केली; आणि त्याच वेळीं आपल्या डाव्या बाजूकडील फौजेचा भागानें तिरकस येऊन

शत्रूंचा फौजेचा बाजूवर पडावें असा हुकूम केला. या युक्तीनें निकाल झाला, कारण जरी फौजेचा मध्यभागास लढाईची अति भीड झाली होती, आणि तेथें भाऊ व विश्वासराव हे घोड्यावर बसून दोहीं बाजूंनीं, भाले, तलवारी, फरशा, व कटारींनींहि लढत होते, तरी असें होतांच "जशी कांहीं जादूनेंच ह्मणावी तशी मराठ्यांची सर्व फौज एकदम पाठमोरी वळून भरधांव पळून गेली, आणि मागें रणभूमीवर मेतांचे ढिगांचे ढीग पडलेले राहिले." अहमदशाहाचा लोकांनीं अतिशय क्रोधानें त्यांचा पाठलाग केला, आणि ते कोणासहि जीवदान देत नसत; यामुळें त्या वेळेस किती कतल झाली असेल याचा सुमारहि करवत नाहीं. याप्रमाणें चोहींकडे आठ दहा कोशपर्यंत त्यांणीं पाठलाग केला. जे लोक शत्रूंचा हातून निसटून गेले त्यांतून पुष्कळांस शेतकरी लोकांनीं तोडून टाकिलें, आणि जे पुष्कळ लोक दुराणी लोकांचा हातीं जीवंत सांपडले, त्यांची त्यांणीं एऱ्हींच कतल केली. या दुष्ट कर्मामध्यें तो अहमदशाहाहि नव्हता असें नाहीं: कारण हे अनर्थ बंद करण्यास त्याणें कांहीं उपाय योजिला नाहीं, आणि उलट नजीबाचा शिकवणीवरून जनकोजी शिंद्यासाठीं सक्त तपास केला; त्यास एका दुराणी सरदारानें लपवून ठेविलें होतें; परंतु त्याचा पत्ता लागूं नये ह्मणून पुढें तो मारला गेला. शिवाय तो शूर इब्राहिम खान गार्दी कैदेंत सांपडला होता त्यास शुजाउद्दौला याजकडून याणें जुलमानें हवालीं करून घेतलें, आणि त्याची निंदा करण्याकरितां त्यास आपल्या हुजूरांत आणवून, नंतर कैदेंत टाकण्याकरितां त्यास मुख्य वजीराचा हवालीं केलें; नंतर तो एका

मराठ्यांचा फौजेचा नाश झाला.

आठवड्याचा अंत आपल्या जखमांनींच मरण पावला.[६]

विश्वासरावाचें प्रेत सांपडलें, आणि दुसरें एक धड सांपडलें तें भाऊचें असें ह्मणत; परंतु या दुसऱ्याचें काय झालें त्याविषयीं खातरी झाली नव्हती, यामुळें पुष्कळ वर्षांनंतर एका धुताऱ्यानें त्याचा वेष धरिला, व त्यास कांहीं वेळपर्यंत लोक मानित होते. या लढाईत दोन लाखांजवळजवळ लोक मारले गेले, असें म्हणतात. जे सरदार दिल्ली एथील लश्कराबरोबर राहिले होते ते, व मल्हारराव होळकर, हे खेरीज करून बाकी सर्व मोठमोठे मराठे सरदार मारले गेले, किंवा जखमी झाले. मल्हारराव हा फार लवकर पळून गेला असा त्यावर आरोप आला आहे. महादजी शिंदा, जाणें पुढें एका मोठ्या राज्याचा पाया घातला, तो जन्माचा लंगडा झाला, व जा नानाफडनवीसानें बराच वेळ पेशव्यांचा अमलाचा बचाव केला, तो पळून मोठ्या शरतीनें वांचला.

मराठे निराश झाले.

इतका साफ पराजय व इतका गवगवा होण्याजोगा अनर्थ कधींहि झाला नव्हता. दुःख व निराशा यांची छाया सर्व मराठे लोकांवर पडली; बहुतेकांचे सोयरेधायरे मेल्यामुळें त्यांस शोक प्राप्त झाला, आणि या फौजेचा नाश झाल्यामुळें आपल्या सर्व देशाचा मोठेपणास अंतकाळचाच धक्का पोंचला असें सर्वांस वाटलें. त्या वेळीं पेशव्यानें जी कदर खाल्ली तींतून तो

---

६ अहमदशाह त्याशीं फार निर्दयतेनें वागला आणि त्याचा जखमांमध्यें त्याणें विष घातलें होतें असें म्हणत, असें काशीराय सांगतो; परंतु ( असा सूड घेण्याचा जरी उद्देश असला तरी ) तो वेळ अशा आडव्या तिडव्या रीतीनें सूड उगाविण्याचा नव्हता.

कधीं नीट झालाच नाहीं. तो हळूहळू आपल्या सरहद्दीपासून पुण्यास परत आला, आणि त्या शहराजवळ एका स्वतः बांधलेल्या देवालयांत मरण पावला. त्याचा लश्करांतील राहिलेसाहिले लोक उत्तरहिंदुस्थानांतील आपले बहुतेक देश सोडून नर्मदा उतरून आले. बाळाजी मरण पावल्यावर लवकरच कज्जे उत्पन्न झाले, आणि पुढें पेशवेसरकारचा गेलेला जोर पुनः कधींहि आला नाहीं. पुढें मराठे लोकांचे बहुतेक देश काळेंकरून परत मिळाले; परंतु ते स्वतंत्र सरदारांनीं युरोपीयन सरदार व कवायदी शिपाई यांचा सहाय्यानें घेतले. सर्वांचा भीतीचें कारण बंद होतांच मुसलमान राजांचा कट फुटला. अहमदशाहास जो जय मिळाला त्यापासून फायदा करून घेण्याचा यत्न केल्याशिवाय तो परत स्वदेशास गेला, आणि पुढें हिंदुस्थानाचा कारभारांत त्याणें कधींहि हात घातला नाहीं.

पेशवा मरण पावला.

मुसलमानांचा कट फुटला.

वरील कारभारांतील मुख्य मुख्य हे सर्व पुढें नाहींसे झाले; त्यामुळें एथें मोगलराज्याचा इतिहासाची आपोआपच समाप्ति होत्ये. पुढें त्या राज्याचे विभाग होऊन निरनिराळीं संस्थानें झालीं; राजधानी ओस पडली; बादशाहाचा नावाचा जो वारीस त्यास देशत्याग करून दुसरे देतील तें खाऊन राहवें लागलें; इकडे दुसऱ्या एका नवीन जातीचा गाजींनीं अवतारास आरंभ केला आहे, ते तें राज्य पूर्वींपेक्षां चांगल्या रीतीनें पुनः एकवट करतील अशी आशा आहे.

मोगलराज्याची समाप्ति.

# पुरवणी.

## दिल्लीचें राज्य मोडल्यानंतर जीं राज्यें झालीं त्यांविषयीं.

### दक्षिणेंतील ब्राह्मणी राजे.

| | इ० स० | हि० स० | | इ० स० | हि० स० |
|---|---|---|---|---|---|
| हसनगंगू (ऊर्फ अल्लाउद्दीन) | १३४७ | ७४८ | अल्लाउद्दीन | १४३५ | ८३८ |
| | | | हुमायुन | १४५७ | ८६२ |
| पहिला महम्मद | १३५८ | ७५९ | निझाम | १४६१ | ८६५ |
| मुजाहिद | १३७५ | ७७६ | दुसरा महम्मद | १४६३ | ८६७ |
| दाऊद | १३७८ | ७८० | दुसरा महमूद | १४८२ | ८८७ |
| पहिला महमूद | १३७८ | ७८० | **नामधारी राजे.** | | |
| ग्यासुद्दीन | १३९७ | ७९९ | दुसरा अहमद | १५१८ | ९२४ |
| शमूसुद्दीन | १३९७ | ७९९ | दुसरा अल्लाउद्दीन | १५२० | ९२७ |
| फिरूझ | १३९७ | ८०० | वली | १५२२ | |
| पहिला अहमद | १४२२ | ८२५ | कलीम | १५२६ | |

हसनगंगूनामक एका दिल्लीचा अफगाणानें या राज्याची स्थापना केली.

दक्षिणेंतील पाहिला राजा हसनगंगू हा दिल्ली एथील राहणारा अगदीं हलक्या प्रतीचा अफगाण होता. त्याणें गंगू नामें एका जोशाचें लहानसें शेत मक्त्यानें केलें होतें. त्या जोशावर बादशाहाची कृपा होती. एका दिवशीं हसनास शेतामध्यें अकस्मात् ठेवणें सांपडलें; त्याविषयींची त्याणें प्रमाणिकपणानें आपल्या जमीनीचा मालकास खबर दिली. तो जोशी याचा खरेपणानें इतका चकित झाला, कीं त्याणें याची बढती करण्याकरितां आपलें सर्व वजन दरबारांत खर्चिलें. पुढें वाढतां वाढतां हसन हा दक्षिणेमध्यें मोठी पदवी पावला. जेव्हां तेथील सरदारांनीं

बंड केलें, तेव्हां हा त्यांचा बरोबरीचा होता; तरी याचा योग्यतेमुळें हा त्यांचा नाईक झाला. जाणें आपणावर उपकार केले त्याविषयींची कृतज्ञता दाखविण्याकरितां त्याणें पूर्वींच गंगू हें नाव घेतलें होतें; सांप्रत त्याणें तशाच उद्देशानें त्या नावास बाहामणी ( ऊर्फ ब्राह्मणी ) हें नाव जोडिलें. हीच संज्ञा पुढें त्याचा वंशास पडून गेली. त्याणें आपली राजधानी कलबुर्गा एथें केली.

वरंगूळचा राजानें बंड करून विजयनगर एथें जा एका नवीन गादीची स्थापना केली, ती ( हसनगंगू वगैरे ) बंडवाल्या लोकांस प्रथम हितावह झाली. कारण त्या योगानें महम्मद तघलख् बादशाहास अधिक अडचणी प्राप्त झाल्या. शिवाय हसनगंगूस शेवटचा लढाईंत कांहीं मदत करण्याकरितां वरंगूळचा राजानें एक घोडेस्वारांची टोळी पाठविली होती; तथापि जेव्हां तें राज्य पक्कें स्थापलें, तेव्हां मुसलमानांचा दक्षिणेकडील राज्याचा पुष्कळ भाग नाहींसा झाला, त्यामुळें सरहद्दींचे तंटे पडून त्या नवीन राज्याशीं मुसलमानांची नेहमींच लढाई चालली.

हिंदूंबराबर लढाया.

हसनगंगू मेल्यानंतर या सर्व लढाया ( व त्यांत मुख्यत्वेंकरून विजयनगरचा राजाबराबरील लढाई, ) ब्राह्मणी वंशाचा अखेरीपर्यंत बहुधा अगदीं खंड न पडतां चालल्या होत्या. त्यांपासून बहुत काळपर्यंत हिंदूंचा व मुसलमानांचा हद्दींमध्यें विशेष फेरफार झाला नाहीं. एके समयीं उडीसा ऊर्फ आंवढ्या व तैलंगण, या देशचा राजांनीं बेदर शहराचा दरवाजापर्यंत चाल केली होती; तें शहर त्या वेळीं गादीचें ठिकाण होतें: असें असतां एकंदराखालीं या तंट्यांत मुसलमानांचा फायदा झाला; त्यांणीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील बहुतेक मुलुक वेष्टिला, आणि इ० स० १४२१ त अहमदशाह नामें ब्राह्मणी राजानें वरंगूळ शहर आपल्या ताब्यांत कायम घेऊन तैलंगणचा राजास आपली जुनी राजधानी सोडणें

इ० स० १४६१, हि० स० ८६५.

जरूर पाडिलें.

दुसऱ्या महम्मदापर्यंत ब्राह्मणी वंशाचा राजांचा, हातून राज्याचें वास्तविक काम चाललें; पुढें जे राजे झाले, ते नामधारी होते. शेवटीं दुसऱ्या महम्मदाचा कारकीर्दीत आंवढ्याचा राजाचा सगा अंबरराय याणें त्यास विनंती केली, कीं माझा त्या राज्यावरील हक्क खरा करण्यास तुह्मी मला मदत द्यावी; जर माझा जय झाला, तर मी तुह्मास नेहमीं खंडणी देईन, आणि कृष्णा व गोदावरी यांचा मुखांजवळील राजमंद्री व कुंडपिली हे प्रांत तोडून देईन. महम्मदानें तें बोलणें कबूल केलें, आणि त्या ढोंग्यास मदत करण्याकरितां एक लश्कर पाठविलें. पुढें अंबररायास आंवढ्यादेश मिळाला आणि त्याणें वर सांगितलेले दोन प्रांत मुसलमानांचा हवालीं केले, व तेथें त्यांचा लश्करांचीं ठाणीं बसलीं.

इ० स० १४७१, हि० स० ८७६.

पुढें अंबररायानें ते दोन प्रांत परत घेण्याचा यत्न केला, तेव्हां महम्मदानें त्यावर स्वतः स्वारी करून त्यास रकमेस आणून व राजमंद्री आणि कुंडपिली या प्रांतांचा बंदोबस्त करून आपली फौज समुद्रकिनाऱ्यानें दक्षिणेस नेली; मच्छलीपट्टण आपल्या राज्यांत भिडविलें; आणि मद्रासेजवळ काञ्ची ऊर्फ कुंजविराम एथील विख्यात देवालयापर्यंत याणें आपले हल्ले चालवून, तें लुटलें.

इ०स०१४७७, हि०स०८८२.

राजमंद्री व मच्छलीपट्टण हे प्रांत घेतले.

या राजाचा प्रधानानें पश्चिमेकडील घाट, व मुंबईपासून गोंव्यापर्यंत समुद्र, यांचा मधील देश, जास कोंकण असें ह्मणतात, तो संपादन केला. याप्रमाणें पूर्वेकडील किनाऱ्याप्रमाणेंच पश्चिमेकडील किनाऱ्यावर त्या राजाचा जय झाला. हा देश घेण्यास ब्राह्मणी राजांस ४० वर्षांवर लागलीं होतीं, आणि त्या खडकाळ व रानवट मुलुकांत त्यांचें फार नुकसान

कोंकणप्रांत अधेवट काबीज केला. इ० स० १४६९ पासून इ०स० १४७१ पर्यंत; हि० स० ८७४ पासून हि०स०८७६ पर्यंत.

झालें होतें; परंतु शेवटीं इतकें करून त्यांचानें तो देश पुरा जिकवला नाहीं.

खानदेश व माळवा या देशांतील राजांशीं पुष्कळ वेळा ब्राह्मणी राजांचा लढाया चालल्या होत्या; त्या बहुत करून वऱ्हाडप्रांताचा सरहद्दीवर होत असतः त्यांत एके वेळीं (इ० स० १४६१।६२ त) माळव्याचा राजा बेदरपर्यंत चाल करून आला होता. त्या वेळीं त्या शहरांत राजधानी होती; जर त्या प्रसंगीं गुजराथचा राजा ब्राह्मणी राजाचा मदतीस न येता, तर माळव्याचा राजानें ती राजधानी घेतली असती.

---

## विजापुर एथील आदिलशाही वंशाविषयीं.

याचा मूळपुरुष यूसफ आदिलशाह नामें एक तुर्की गुलाम होता.

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| यूसफ (मूळ पुरुष) | १४८९ | ८९५ | इब्राहीम | १५२५ | ९४१ |
| इस्मायल | १५१० | ९१५ | अली | १५५७ | ९६५ |
| मल्लु | १५३४ | ९४१ | दुसरा इब्राहीम | १५७९ | ९८७ |

यूसफ आदिलशाह हा, आपण मोठ्या कुळांत जन्मलों, असें ह्मणत असे, व त्यास जुळण्याजोगा असा इतिहासाचाहि आधार होता. हिंदुस्थानांतील इतिहासकार असें ह्मणतात कीं आयेमान लोकांचा सुलतान आमुराथ पादशाह याचा हा मुलगा, व दुसरा महम्मद सुलतान ज्याणें कुन्स्तन्तुनिया जिंकून घेतली त्याचा भाऊ होता. जेव्हां महम्मद गादीवर आला, तेव्हां हा अर्भक होता, आणि

आपल्या आईचा युक्तीनें दुसऱ्या भावांप्रमाणें मारला न जातां वांचून तिचाच उपायांनीं इराणांत नेला गेला होता.

तो सोळा वर्षांचा झाला, तेव्हां त्याचा औलादीविषयीं कांहीं अंदेशा आल्यावरून त्यास इराणांतून पळून जावें लागलें, तेव्हां त्यास कोणी ठकवून ब्राह्मणी राजांचा दरबारांत आणिलें, आणि तेथें गुलामाप्रमाणें विकून टाकिलें. नंतर तो ममूलुक जातीचा आगंतुकांप्रमाणें वाढला, तो शेवटीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें मुकूट घेता झाला. त्या वेळीं कासिम बरीद याणें ब्राह्मणी राज्य बळकाविलें होतें; त्याशीं लढाया करण्यांत, व आसमंतात् भागचे जे दुसरे सरदार, यासारखीच, आपली स्वतंत्रता स्थापण्यास यत्न करित होते त्यांचा मुलुक घेण्यामध्यें हा तेव्हांपासून गुंतला होता. शिवाय विजयनगरचा राजाशीं लढायांमध्येंहि हा पडला होता; त्यांत एकंदराखालीं याचा जय झाला. याणें अहमदनगर व वऱ्हाड एथील राजांबराबर एक तऱ्हेचा फारखतीसारखा तह केला, त्यांत प्रत्येकाचा त्याचा त्याचा मुलुकावरील हक्क कबूल झाला होता. हा या तहामुळें याणें जे देश जिंकून घेतले होते, त्यांस बळकटी आली.

त्याचा राज्याचा विस्तार.

याचा राज्याची पूर्वेकडील सरहद्द भीमा व कृष्णा, या नद्या, दक्षिणेकडे तुंगभद्रा नदी, पश्चिमेस गोंव्याजवळून मुंबईचा जवळपर्यंत समुद्र, व उत्तरेस कदाचित् निरानदी; याप्रमाणें जर सरहद्दी मानिल्या तर याचा राज्याचा विस्तार किती होता हें लक्षांत येईल.

शिया मताचा धर्म सुरू करण्याचा त्याणें प्रयत्न केला.

जेव्हां हा इराणामध्यें होता तेव्हां शेख सफीचा प्रत्यक्ष शिष्यांपासून याचा मनांत शिया मत बिंबलें होतें; सांप्रत त्याविषयीं आस्था दाखवून याणें पुढें आपणास नव्या संकटांत पाडिलें. शिया धर्म हा या राज्यांतील स्थापित धर्म, असा ठराव याणें प्रसिद्ध केला; आणि जिजसारिखें हिंदुस्थानामध्यें दुसरें उदाहरण मिळणार नाहीं

अशी ही वर्तणूक करून याणें आपल्या रयतेंत पुष्कळ गवगवा उत्पन्न केला. त्यामुळें दुसऱ्या मुसलमान राजांनीं याचा विरुद्ध कट केला. मग त्या जमातीचा विरुद्ध स्वतः उभें राहण्याविषयीं याणें मोठा निश्चय दाखविला, व त्यांतील साथी लोकांची फूट पाडण्याविषयीं कुशलता दर्शविली; परंतु शेवटीं जेव्हां याणें हे धर्मांतील फेरफार सोडून दिले, तेव्हांच यास आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांशीं दोस्ती करतां आली.

जेव्हां हा मरण पावला, त्या वेळीं याचा मुलगा इस्मायल हा लहान होता ह्मणून जो प्रधान कारभार चालवित होता त्याणें राज्य बळकावण्याची मसलत केली, आणि त्या उद्देशानें सुनी अथवा एतद्देशीय लोकांचा फळीचा मुख्य होऊन, परदेशी लोकांचें मान कमी करून त्यांस चाकरीवरून दूर केलें; परंतु शेवटीं त्याची मसलत फसली; आणि पुढें इस्मायलाची कारकीर्द चालू झाल्यावर, हा वजीर जसा आग्रही सुनी होता, तसाच तो आग्रही शिया झाला. त्याणें आपल्या फौजेंत सर्व परदेशी लोक ठेविले. जर कोणी परदेशस्थ अथवा पठाण[1], अथवा राजपूत याचा मुलगा असला, तरच मात्र त्यास तो ठेवी; हिंदुस्थानांतील इतर लोकांस ठेवित नसे. तो परदेशी लोकांचा रीतीभातींचा डौल घाली, आणि दक्षणी भाषा[2] न बोलतां इराणी व तुर्की बोलत असे.

धर्मसंबंधीं फळ्या.

या वंशाचा तिसऱ्या राजानें सगळें सहा महिने रा-

१ हिंदुलोक हे अफगाणांस पुष्कळ वेळा पठाण असें ह्मणतात; परंतु जी त्या लोकांची औलाद हिंदुस्थानांत झाली आहे तिला विशेषेंकरून पठाण ह्मणतात.

२ दक्षणी भाषा ही हिंदुस्थानीची एक शाखा आहे; तिजविषयीं जें वरील वर्णन आहे त्यावरून, सोळाव्या शतकाचा आरंभीं ती भाषा दक्षिणेंतील मुसलमान बोलत असत असें दिसतें.

ज्य केलें. नंतर इब्राहीम ह्मणून जो चौथा राजा झाला, तो आग्रही सुनी होता; त्याणें सर्व परदेशी लश्कर दूर केलें. त्याचा मागून त्याचा मुलगा अल्ली हा शिया मताविषयीं मोठा आग्रही होता; त्याणें पुनः त्या सर्व लोकांस चाकरीस ठेविलें. पुढें अल्लीचा मुलगा दुसरा इब्राहीम लहान असतां, या दोन्ही फळ्यांचा तंटा चालला होता; त्यांत शेवटीं सुनी लोक जिकले.

सुनी व शिया या मतांचा लोकांचा जा या घालमेली झाल्या, त्यांहून मराठे लोकांचा उदय झाला, हा या कारकीर्दीत मोठा फेरफार झाला. या हिंदूंचें देवगड एथील स्वतांचें राज्य नाहींसें झाल्यामुळें, ते अहमदनगर व विजापुरचा पुरे अमलांत आले होते, व तेथील राजे त्यांस रयतेप्रमाणें वागवून त्यांचा बेभरवसा न करितां त्यांस चाकरीस लावित असत. आदिलशाही वंशाचा पहिला राजा यूसफ, याणें एका मराठ्या सरदारास १२,००० पायदळाची हुकुमत दिली, असें वर्णन आहे. पुढील कारकीर्दीत ते तद्देशीय मुसलमानलोकांबराबर ओढत असत, व जेव्हां त्या फळीचा हात चाले, तेव्हां यांतून पुष्कळांस चाकऱ्या मिळत. ते बर्गी या नावानें प्रसिद्ध असत; ते बहुतकरून घोडेस्वार असत; त्यांचा त्वरित व लुटारू स्वाऱ्यांनीं लढाईची एक नवीन पद्धत शुरू झाली; आणि पुढें जेव्हां विजापुरकरांवर शत्रूंचा हल्ला येई तेव्हां ते आपला बचाव करण्याकरितां त्या पद्धतीचा आश्रय करीत.

मराठ्यांचा उदय.

विजापुरचा चौथा राजा इब्राहीम याणें एक नवीन लक्षांत ठेवण्यासारिखा फेरफार शुरू केला. तो असा कीं सरकारी हिशेब फारसींत न ठेवितां मराठींत ठेवावे असा त्याणें हुकूम केला. आतां मराठी ही सर्व गांवचा कुळकरण्यांची भाषा होती, आणि वसूलाकडील व हिशेबाकडील अम्मलदार लोक हेहि बहुधा हिंदूच होते, हा विचार मनांत आणला असतां, जी वर सांगितलेली सुधारणूक

इब्राहिमानें केली, ती पूर्वींच झाली नव्हती व सांप्रतहि झाली असतां त्याप्रमाणें दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं झाली नाहीं, ही गोष्ट आश्चर्याची आहे.

त्या वेळचा मुसलमान राजांमध्यें हमेशा लढाया होत, व क्षणांत घालमेल होणारे निरनिराळे कट उत्पन्न होत.

दुसऱ्या मुसलमान राजांबराबर लढाया.

त्या दोहींमध्यें विजयनगरचे राजे पुष्कळ वेळा हात घालीत, व तसेच खानदेश व गुजराथ एथील राजेहि घालित असतः त्यांत गुजराथचा राजांचें बरेंच मान पडे. या सर्व लढायांमध्यें विजापुरकरांशीं अहमदनगरकरांचें हमेशा वांकडें असे; कारण सोलापुर व भीमेचा डाव्या कांठचे कांहीं प्रांत इतक्या प्रदेशावर त्या दोघांचे परस्परांविरुद्ध हक्क होते, तेणेंकरून त्यांचें वांकडें आलें होतें.

शेवटीं आदिलूशाही, बरीदशाही, निजामशाही, व कुतुबशाही, या चार मोठ्या मुसलमान राजांनीं विजयनगर एथें राम राजा राज्य करित होता त्याविरुद्ध कट केला; त्याचा परिणाम मूळग्रंथांत पृष्ठ ३९९ एथें सांगितला आहे.

विजयनगरचा राजावर कट.

आदिलूशाही राजांनीं जा लढाया केल्या त्यांत जा पोर्टुगीस लोकांबराबर केल्या त्यांविषयीं एतद्देशीय इतिहासकारांनीं बाहेरून दाखविण्यांत अनास्थेनें वर्णन केलें आहे. असें लिहिलें आहे, कीं यूसफाचा कारकीर्दींत गोवें शहर गेलें, तें त्या राजानें स्वतः परत घेतलें, आणि तें पुनः त्याचा मुलगा इस्मायलू याचा कारकीर्दींत गेले;[३] असें असतां पुढें इ० स० १५७० त विजापुर, व अहमदनगर एथील राजांनीं गोवें व चौल या दोन ठिकाणीं पोर्तुगीस लोकांवर एकदम हल्ला केला, व दोघांनींहि छकड खाल्ली; यावरून त्यांचा

पोर्टुगीस लोकांबराबर लढाया.

३ हें पोर्टुगीस लोकांचा सरदार अलूबुकर्क याणें इ० स० १५१० त पुनः घेतलें.

शत्रूंचा भयंकर स्वरूपाविषयीं त्यांस ज्ञान झालें नसेल असें नाहीं, हें स्पष्ट आहे.

हा कट व तशीच तालीकोट एथील लढाई हीं दोन्ही अकबर गादीवर आल्यानंतर झालीं. पुढें जेव्हां त्या बादशाहानें दक्षिणेंतील कारभारांत प्रथम हात घालून आपला शक बसविला, तेव्हां शेवटीं सांगितलेला दुसरा इब्राहीम बादशाह पूर्वीं पुष्कळ वर्षें अज्ञान असून वयांत आला होता, व अहमदनगरचा राज्याचा आंतील तंट्यांत हात घालूं लागला होता. इ० स० १५९५ हि० स० १००४

## अहमदनगर एथील निजामशाही वंशाविषयीं.

(याचा मूळपुरुष अहमद नामें हिंदु असून मुसलमान झालेला होता.)

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| अहमदशाह (मूळपुरुष).... | १४९० | ८९६ | इस्मायल्.... | १५८८ | ९९७ |
| बुऱ्हाण..... | १५०८ | ९१४ | दुसरा बुऱ्हाण.. | १५९० | ९९९ |
| हुसेन...... | १५५३ | ९६१ | इब्राहीम .... | १५९४ | १००३ |
| मुर्तिझा...... | १५६५ | ९७२ | दुसरा अहमद .. | १५९४ | १००४ |
| मिरान हुसेन.. | १५८८ | ९९६ | बहादुर...... | १५९५ | १००४ |

निजामशाही वंशाचा मूळपुरुष अहमद. याचा बाप विजापुर एथील ब्राह्मण होता. तो एके समयीं कैदेंत सांपडून ब्राह्मणी राजाकडे गुलामाप्रमाणें विकला गेला. पुढें तो मुसलमान होऊन राज्यामधील पहिला हुद्दा पावला. नंतर जेव्हां ब्राह्मणी राज्य मोडलें, तेव्हां त्याचा मुलगा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें आपणास राजा ह्मणवूं लागला. या आपल्या मूळपीठिकेविषयीं त्याचे वंशज लज्जा न बाळगितां, ते उलटे वऱ्हाडदेशांत पात्री ह्मणून गांव आहे तेथील जे वंशपरंपरेचे ब्राह्मण कुळकरणी ते यांचे पूर्वज होते, ह्मणून तो गांव घेण्याकरितां ते वऱ्हाडचा राजांबराबर

वारंवार युद्ध करित असत. तशाच बुद्धीनें दुसरा राजा बुऱ्हाण याणें कावडसेन नामें ब्राह्मणास आपला पेशवा ह्मणजे मुख्य प्रधान नेमिला, आणि त्यावर विश्वास ठेवल्यापासून तो पुष्कळ लाभाते पावला. या वंशाचे राजे विजापुरकरांप्रमाणें मराठ्यांस चाकरीस ठेवित असत; परंतु तितके पुष्कळ ठेवित नसत. जे त्यांचा चाकरींत होते, ते बहुतकरून पायदळांत होते, व त्यांस ते मुख्यत्वेंकरून पहाडी किल्ल्यांचा रखवालीकडे लावित असत.

धर्मसंबंधीं फळ्या इ०स० १५३७ हि०स० ९४४.

निजामशाही राजांचा दुसऱ्या धर्मावर जुलूम नसे; तथापि त्यांचा स्वतांचा धर्मातील जे निरनिराळे पंथ त्यांचा कज्जांतून हे सुटले नव्हते. या वंशाचा दुसरा राजा हा शियामत प्रसिद्धपणें कबूल करित असे, आणि जरी त्याचा स्वतांचा राज्यांत दंगे झाले, व सुनी मताचा दुसऱ्या राजांनीं त्याजवर कट केला, तरी त्याचा विजापुरकर शेजाऱ्यापेक्षां त्याचा बेत चांगला सिद्धीस गेला, व त्याणें आपल्या स्वतांचा पंथाची मजबूद स्थापना केली.

इ०स० १५८८, हि०स० ९९६.

पुढें पांचवा राजा मिरान हुसेन शाह हा मारला गेल्यावर, जा परदेशी लोकांनीं त्याचा खून केला होता, त्यांची कतल होऊन फेरफार झाला, आणि सुनी धर्म चालू झाला.

इ०स० १५८८. हि०स० ९९७,

पुढें सहावा राजा इस्मायल्‌ याचा कारकीर्दींत, मेहदवी ऊर्फ घेड मेहदी ह्मणून जा एका पंथाची दुसऱ्या मुसलमानांस फार चीड आहे, त्यांत त्याचा वजीर गेल्यावरून सुनी लोकांतच आंतल्याआंत कळ पेटली. पुढें एतद्देशीय दक्षणी मुसलमान व हबशीलोक यांचा जा निरनिराळ्या फळ्या पडून जांणीं शेवटीं राज्याचा नाश केला, त्या फळ्या वर सांगितलेल्या फुटीमुळें पडल्या असाव्या; परंतु जा तंट्यांनीं राज्य बुडालें त्यांत धर्माची बाब विशेष नव्हती.

इतर राजांचा लढायांत व जुटींमध्यें अहमदनगरचा

राजांनीं जो हात घातला, त्याविषयीं पूर्वीं वर्णन आलेंच आहे. त्याशिवाय या राजांनीं स्वतः खानदेश व वऱ्हाड एथील राजांशीं लढाया केल्या; त्यांतून वऱ्हाडचें राज्य इ० स० १५७२ त मोडून, तो मुलुक आपल्या राज्यांत मिळविला. ही फत्ते होण्यापूर्वीं गुजराथचा राजा बहादुरशाह याणें निजामशाही राजास त्याचाच राजधानींत कोंडून त्याकडून सक्तीनें आपलें वर्चस्व कबूल करवून त्याकडून आपला सन्मान फार गरीबीनें करविला आणि त्याची पुष्कळ अप्रतिष्ठा केली.[४]

दक्षिणेंतील दुसऱ्या राजांशीं लढाया.

त्यापुढें जो राजा झाला, त्याची त्याहूनहि विशेष अप्रतिष्ठा झाली. ती अशी, कीं विजयनगरचा जो रामराजा त्याणेंहि विजापुरकरांशीं कट करून त्यास अहमदनगरांत वेढिलें, आणि उघड कमीपणाचा नात्यानें त्यास मुलाकतीस येणें जरूर पाडिलें.

इ० स० १५३०, हि० स० ९३७.

या प्रसंगीं व दुसऱ्या कांहीं वेळीं रामराजानें जो गर्व दाखविला तेणेंकरून त्यावर सर्व (मुसलमान) राजांचा कट झाला: त्याचा परिणाम पूर्वींच सांगण्यांत आला आहे.

इ० स० १५६५, हि० स० ९७२.

एका समयीं विजापुरकरांबराबर लढाईमध्यें अहमदनगरकरांचा ६०० तोफा गेल्या. तो प्रसंग जरी अनिष्ट होता, तरी त्यावरून या राजांचा जोर किती मोठा होता, हें समजतें. या तोफांमधून पुष्कळ केवळ तोटे असतील; परंतु सांप्रत जी विजापुरास प्रख्यात तोफ आहे ती त्यांतील होती. सर्व पृथ्वीवर जा अति मोठ्या पितळेचा तोफा त्यांतील ही एक आहे[५].

फिरकोळ बिना.

४ या प्रसंगीं बहादुरशाहानें आपल्या स्वतांचा ह्मणजे गुजराथी भाषेंत संभाषण करून आपलें वर्चस्व दाखविलें, आणि निजामशाही राजानें त्याचें फारसीमध्यें उत्तर दिलें. ती दुसरी भाषा उभयतांसहि साधारणच होती, असें समजलें पाहिजे.

५ या तोफेचा तोंडाचा व्यास चार फूट व आठ इंच आहे; व तिचें

एशियाखंडांत द्वंद्वयुद्धाचा प्रघात फारसा नाहीं ती चाल या वंशाचा राजांचा कारकीर्दींत फार चालत होती असें फिरिस्ता वर्णन करितो. अति क्षुल्लक कज्जांपासूनहि हीं द्वंद्वयुद्धें उत्पन्न होत असत; द्वंद्वयुद्ध करण्यास नाकारणें हें बेअब्रूचें काम असें समजत; आणि लढाई समोरासमोर निष्कपट असली, ह्मणजे मग जरी कोणी योद्धे मरून गेले तरी त्यांत दोष मानित नसत. या प्रकारचा एक प्रसंग फिरिस्ता याणें स्वतः पाहिला; त्यांत एकेका पक्षास तीन तीन होते, आणि त्या योद्ध्यांतून पांच असामी दाढी पिकलेले पुरुष व ज्यांचें दरबारांत पुष्कळ वजन असे होते; त्यांतून तीन ठिकाणावरच मेले, आणि बाकी राहिलेले त्या वेळीं झालेल्या जखमांपासून मेले. हीं युद्धें हमेशा बरचांनीं खेळत असत.

या राज्याचा विस्तार.

जेव्हां अहमदनगरचा अतिशय भरभराट होता, तेव्हां सांप्रत ज्यास औरंगाबादचा सुभा ह्मणतात तो, व वऱ्हाडचा राज्याचा पश्चिमेकडील सर्व प्रदेश, एवढा त्याचा महत्तम विस्तार होता. शिवाय कोंकणांत समुद्रकिनाऱ्यावर, गुजराथ व विजापुर एथील राजांचा मुलुकांचा मध्यें, यांचाहि एक तुकडा होता.

---

## गोंवळकोंडें एथील कुतुबशाही वंशाविषयीं.

( याचा मूळपुरुष कुतुब कूली नामें तुर्कमान जातीचा एक शिपाई होता. )

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| सुलतान कुतुब कूली. ( मूळपुरुष ). | १५१२ | ९१८ | सुभान कूली .... | १५५० | ९५७ |
| | | | इब्राहीम ...... | १५५० | ९५७ |
| जमशीद ...... | १५४३ | ९४० | महम्मद कूली .... | १५८० | ९८८ |

---

छिद्र दोन फूट व चार इंच आहे. ( ग्रांट डफ ). ती फकत १५ फूट लांब आहे.) ( कर्नेल सैक्स ) तिचें वजन ४० टन आहे. ( फिरिस्ता. )

या वंशाचा स्थापक सुल्तान कूली कुतुबशाह, हा इराणदेशांतील हमदान एथील तुर्कमान जातीचा पुरुष होता. तो आपल्या जातीचा मुख्यापासून आपली पिढी आहे असें ह्मणत असे, व तो हिंदुस्थानामध्यें लश्करी चाकरीचा शोधार्थ स्वतंत्रतेनें आला हें खचित आहे. तो ब्राह्मणी राज्याचा खास पाहऱ्याचा लोकांत शिरला, आणि पुष्कळ प्रसंगीं आपलें नाव वाजवून, जेव्हां तें राज्य मोडलें तेव्हां तैलंगणचा सुभेदार होता. त्याणें राजा हा किताब केव्हां घेतला याचा निश्चय नाहीं, परंतु इ० स० १५१२ ह्मणजे हि० स० ९१८, या सालापासून वास्तविक पाहतां तो राजाच होता. तो गादीवर आल्यापासून आपला धर्म शिया मताचा हें उघड रीतीनें दाखवित असे, व तो त्याणें आपल्या राज्यांत सुरू केला, त्यास कोणी आड आला नाहीं.

कुतुबानें आपला धर्म शिया मताचा असें प्रकट केलें.

तो फार दिवस राज्य करून मरण पावला; त्या वेळीं गोदावरीपासून कृष्णेचा पलीकडेपर्यंत, व सुमारें ७८ पूर्वरेखांशांजवळजवळ समुद्रापासून हैदराबादेचा पश्चिमेपर्यंत, रेघ ओढावी एवढा मुलुक त्याकडे होता. यांतील वायव्येकडील प्रांत हे ब्राह्मणी राज्याचे तुकडे होते, व नैर्ऋत्येकडील देश विजयनगरचा राजांपासून मिळविलेले होते; परंतु वरंगूळचा राजांचा राहिलेल्या मुलुकांतून व तैलंगणांतील दुसऱ्या सरदारांपासून सुल्तान कूली याणें आपला बहुतेक प्रांत मिळविला होता. वरील सर्व रजवाड्यांस ओढिशाचा राजा मदतीस आला असतांहि त्या सर्वांस कुंडापिली एथें जिंकून फत्ते मिळविली, आणि पुढें जरी विजयनगरचा राजानें आपल्या धर्माचा पक्षास मदत करण्याचा यत्न केला तरी वरंगूळचा राज्याची पुनः कधींहि संस्थापना झाली नाहीं, व वर सांगितलेल्या हद्दींमध्यें मुसलमानांचा सत्तेसहि कधीं बखेडा झाला नाहीं.

त्याचा राज्याचा विस्तार.

हिंदूंपासून घेतलेले देश.

दुसऱ्या मुसलमान राजांबरोबर लढाया.

सुलतान कुलीचे मुसलमान शेजारी त्यावर हल्ले करीत त्यांत मुख्यत्वेंकरून इस्मायल आदिलशाह करी; त्या योगानें हिंदूंबराबर लढाया मारण्यांत त्यास कधीं कधीं हरकत येत असे; तथापि दक्षिणेंतील लढायांमध्यें इतर राजांपेक्षां याचा फार थोडा हात असे.

याचा मुलगा जमशीद, याणें यास नव्वदाव्या वर्षीं ठार मारिलें, व आपण गादीवर बसला; त्याणें सात वर्षें राज्य केलें. तिसरा राजा अज्ञान होता. त्याणें सगळें थोडके महिनेपर्यंत राज्य केलें; परंतु या वंशांतील चौथा राजा इब्राहीम याणें तीस वर्षें राज्य केलें, व या वंशाचा कारकीर्दींत जा कांहीं थोड्या मोठ्या गोष्टी झाल्या, त्यांतून बहुतेक याचाच वेळांत घडून आल्या.

चौथा राजा इब्राहीम. त्याचा लढाया.

त्याचा जगदेव ह्मणून एक हिंदु प्रधान होता, व त्याचें बहुतेक पायदळ व सर्व किल्ल्यांवरील वगैरे रखवालदार लोक हे त्याच धर्मांतील तैलंग होते. पुढें जगदेव हा आपल्या धन्याबराबर कज्जा करून वऱ्हाडास गेला व तेथें मोठी सरदारी पावला. नंतर तो तेथून विजयनगरचा राम राजाकडेस गेला, आणि आपलें वजन खर्च करून राम राजा, अलि आदिलशाह व अलि बरीदशाह, यांचा कट करिता झाला. मग त्या कटानें इब्राहिमाचा राज्याचा बहुतेक भाग लुटून त्यास त्याचा राजधानींत अडकविलें: तथापि पुढें सल्ला झाला, व पुढें राम राजाचा विरुद्ध जी सर्वांची जूट झाली तींत इब्राहीम मिळाला.

कुतुबशाही राजे दुसऱ्या मुसलमान राजांचा लढायांत व दोस्तींत पडत; परंतु त्यांत ते बहुतकरून अहमदनगरचा राजांशीं मिळून असत. या लढाया वगैरे कारणांनीं त्यांचा स्थितींत बदल होत नसे. त्यांचें जें राज्य वाढवावयाचें तें ते हमेशा हिंदूंस मारून वाढवित असत. जेव्हां ब्राह्मणी

राज्य मोडलें, तेव्हां राजमंद्री परगणा व गोदावरीचा उत्तरेस शिकाकोळपर्यंत प्रदेश हे हिंदूंनीं बळकाविले होते; पुढें आंवढ्या देशांत बखेड झाले, व तेथें बंगाल्याकडून हल्ला आला, अशी संधि पाहून इब्राहिमानें ते प्रदेश परत घेतले. त्याचा मागून महम्मद कूली हा राजा झाला. त्याणें कृष्णेचा दक्षिणेसहि मुलुक घेऊन, गंदीकोट व कडपा व पेनारनदीपर्यंत बाकी सर्व प्रदेश, इतका आपल्या राज्यास मिळविला.

चोलमंडलचा किनाऱ्यावरील जिंकिलेले प्रांत.

याच राजानें हैदराबादशहराची रचना केली. या शहरास भागानगर असें याणें प्रथम नाव दिलें होतें, तेंच नाव हिंदुलोकांत अद्यापि चालत आहे; व त्याणें गोंवळकोंडें एथील जवळचा ठिकाणावरून आपली राजधानी एथें आणिली.

अकबरानें अहमदनगर घेतल्यावर महम्मद कूली पुष्कळ वर्षें राज्य करित होता, परंतु त्या दूरचा गोष्टी यास फारशा बाधल्या नाहींत.

---

## वऱ्हाड एथील इमादशाही वंशाचे राजे.

( या वंशाचा मूळपुरुष फत्ते उल्ला, त्याचा पूर्वज एक हिंदूचा मुसलमान झालेला पुरुष होता.)

| | इ० स० | हि० स० | | इ० स० | हि० स० |
|---|---|---|---|---|---|
| फत्ते उल्ला. ( मूळपुरुष ) | १४८४ | ८९० | बुऱ्हाण ( कदाचित् ) | १५६० | ९६८ |
| अल्लाउद्दीन. | १५०४ | ९१० | तुफलू ................ | | |
| दरिया .. ( सुमारें ) | १५२९ | ९३६ | | | |

या लहानशा राज्याविषयीं जी थोडीशी माहिती आहे, ती जवळचा राज्यांचा इतिहासांत आली आहे.

या राज्याचा विस्तार सातपुड्या पर्वतापासून गोदावरीपर्यंत होताः पश्चिमेस त्याची सरहद्द अहमदनगर व खानदेश या राज्यांपर्यंत पोंचली होती; ती ७६ व्या पूर्वरेखांशाचा मध्यभागाचा सुमारें होती. त्याचा पूर्वेकडील हद्दींविषयीं निश्चय सांगवत नाहीं, परंतु त्यांत नागपुर नव्हतें असें संभवतें.

फत्ते उल्ला हा राज्याचा कारभार चालवित होता; परंतु राजा असा किताब अल्लाउद्दीनानें प्रथम घेतला.

पुढें बुऱ्हाण इमादशाह, जो बहुधा इ० स० १५६० चा सुमारास गादीवर आला होता, तो लहान असतां त्याचा मुख्य प्रधान तुफलू, याणें राज्य बळकाविलें. मग इ० स० १५७२ म्हणजे हि० स० ९८०, यामध्यें हें राज्य अहमदनगरचा राज्यांत मिळून गेलें.

---

## बेदर एथील बरीदशाही राजे.

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| कासिम | १४९८ | ९०४ | दुसरा कासिम | १५६९ | ९९७ |
| अमीर | १५०४ | ९१० | मिर्झा अलि | १५७२ | १००० |
| अलि | १५४९ | ९४५ | दुसरा अमीर | ............ | |
| इब्राहीम | १५६२ | ९९० | | | |

बरीदशाही राजे, हे प्रथम ब्राह्मणी राजांचे प्रधान मुतालिक असे ह्मणवित असत. त्यावरून प्रथम त्यांस कांहीं विशेष महत्व आलें होतें; परंतु तें सोंग कासिमाचा हयातीपुढें चाललें नाहीं; कासिम व अमीर या दोघांतून कोणीहि, राजा, असा किताब घेतला नव्हता.

या राज्याचा मुलुक थोडा होता, व त्याचा हद्दी बराबर लाविलेल्या नव्हत्या. यांचा वंश कधीं समाप्तीस गेला याविषयीं निश्चय नाहीं.

जेव्हां फिरिस्ता या ग्रंथकारानें यांचा इतिहास पुरा केला, तेव्हां (इ० स० १६०९ ह्मणजे हि० स० १०१८ मध्यें) दुसरा अमीर, हा राज्य करित होता.

# गुजराथचे राजे.

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| मुझफ्फरशाह | १३९६ | ७९९ | सिकंदरशाह | १५२६ | ९३२ |
| अहम्मदशाह | १४१२ | ८१५ | दुसरा महमूदशाह | १५२६ | ९३२ |
| महम्मदशाह | १४४३ | ८४७ | बहादुरशाह | १५२६ | ९३२ |
| कुतुबशाह | १४५१ | ८५५ | मीरान् महम्मदशाह फरुखी. | १५३६. | ९४३ |
| दाऊदशाह, (याणें एक आठवडा राज्य केलें.) | | | तिसरा महमूदशाह | १५५३ | ९६१ |
| | | | दुसरा अहमदशाह | १५६१ | ९६९ |
| महमूदशाह बेगर | १४५९ | ८६३ | तिसरा मुझफ्फरशाह | १५६१ | ९६९ |
| दुसरा मुझफ्फरशाह | १५११ | ९१७. | | | |

गुजराथेचें वर्णन.

गुजराथ देशाचा इशान्येस व पूर्वेस एक डोंगराळ देश आहे, तो अरवली पर्वत व विंध्यापर्वताची ओळ, यांस जोडतो; याचा दक्षिणेस समुद्र आहे, त्याणें यांतील एक भाग बहुतकरून वेष्टून त्याचें एक द्वीपकल्प झालें आहे: त्या द्वीपकल्पाचा विस्तार बाकी सर्व प्रांताएवढा आहे; याचा पश्चिमेस एक ओसाड प्रदेश आहे, त्यांत रण ह्मणून जें एक खारें रान तेंहि आहे. या देशाची अगदीं मोकळी सरहद्द अशी वायव्येकडेस मात्र आहे; तेथें वर सांगितलेले डोंगर व ओसाड प्रदेश यांचा मध्यें एक तळवट आहे, तें हा देश व मारवाड, यांस जोडतें.

या देशाचा उत्तरेस जे डोंगर आहेत, ते उभे सूळ असून तुटलेले खडबडित आहेत. त्यांचा जा शाखा दक्षिणेकडे गेल्या आहेत, त्या चिकार रानानें भरलेल्या आहेत. तशाच त्या डोंगरांचा पायथ्यापासून मुख्य नद्यांपर्यंत जा चिलनी लागत गेल्या आहेत, त्याहि तशाच दाट जंगलानें भरलेल्या आहेत. जसजसें पर्वत सोडून अलीकडे यावें, तसतसा मुलुक हळूहळू अधिक मैदान होत गेला आहे,

आणि खालचा भाग समुद्रकिनाऱ्यानें सुमारें तीस कोशपर्यंत एकसारखा तळवट आहे; त्यांत अतिशय पीक येतें.

वर सांगितलेल्या द्वीपकल्पास गुजराथचा दुसऱ्या भागापासून केव्हां केव्हां निराळें लेखित असतात; त्यास पूर्वी **सोरट** ह्मणजे **सौराष्ट्र** असें ह्मणत असत: सांप्रत त्यास **काठेवाड** असें ह्मणतात.

यांत बहुतेक ठिकाणीं सखल टेंकड्या आहेत, आणि हा देश बहुतेक ठिकाणीं भणभणीत व नापीक आहे; परंतु वरील प्रदेशास सोडून कोठें कोठें समुद्रकिनाऱ्यानें निराळीं, तळवटें आहेत, त्यांचा विस्तार आंत दूर गेला असून त्यांची जमीन दळदार व मैदान आहे.

याचा अगदीं दक्षिणेजवळजवळ एक डोंगराळ प्रदेश आहे, त्यास **बाभ्रियावाड** असें ह्मणतात: तो सगळा अरण्यांनीं भरलेला आहे.

राज्याचा मूळचा विस्तार.

जेव्हां **गुजराथ** देश **दिल्लीपासून** निराळा झाला, तेव्हां एथील नव्या राजाकडेस सपाटीवरील अगदीं थोडा मुलूक होता. त्याचा वायव्येस **झालोर** व **सिरोही** एथील स्वतंत्र राजे होते, त्यांपासून तो केव्हां केव्हां खंडण्या घेत असे. **ईदर** एथें एक दुसरा **राजपूत** रजवाडा होता, त्याकडेस त्या डोंगराचा पश्चिमभाग होता. या राजास वारंवार द्रव्य द्यावें लागे व कधीं कधीं नियमित खंडणी देणें पडे; तरी हे फायदे **गुजराथचा** राजास बहुतकरून लढाईशिवाय प्राप्त होत नसत. तसाच हा **गुजराथचा** राजांचा शत्रूंस मिळून, व यांचा देशांतील पळून गेलेल्या लोकांस आश्रय देऊन, सार्वकाळ बखेडे उत्पन्न करित असे. बाकीचा डोंगराळ व रानवट प्रदेश **भिल्ल** व **कोळी** या पहाडी जातींचा लोकांचा हातांत होता; त्यांमध्यें कित्येक **राजपूत** राजांनीं लहान लहान संस्थानें[१] स्थापिलीं होतीं; त्यांचा बहुतकरून **मेवाडचा** राज्याशीं संबंध होता.

---

१. डोंगरपुर, भांसवाडा, इत्यादि संस्थानें आजतागाईत आहेत.

काठेवाड, हें द्वीपकल्प, नऊ दहा जातींचा हिंदुलोकांचा स्वाधीन होतें. ते लोक कित्येक शतकांपूर्वीं, निरनिराळ्या वेळीं, बहुधा कच्छ व सिंध एथून आलेले होते. ते गुजराथचा राजांस खंडणी देत असत असें संभवतें, परंतु केवळ त्यांची हुकमत मानित असत असें नाहीं. जेव्हां मोगललोकांचें पारडें चढलें होतें, तेव्हां हीं लहान लहान संस्थानें आपला जीव बाळगून होतीं, आणि त्या थोड्या मुदतींत, जशीं पूर्वीं गुजराथचा राजांचा कारकीर्दींत हीं स्वतंत्र होतीं, तशींच बहुधा होतीं. यास्तव, डोंगर व समुद्र यांचा मधील जें मैदान, तेवढा मात्र मुलुक गुजराथचा राजांचा वास्तविक ताब्यांत होता; किंबहुना त्यांतीलहि पूर्वेकडील भाग एका स्वतंत्र राजाकडे होताः तो राजा चंपानेरचा पहाडी किल्ल्यांत राहत असे. इकडे समुद्रकिनाऱ्यानें ईशान्येस गुजराथचें राज्य लांब पसरलें होतें; त्यांत सुरत शहर व त्यापलीकडील कांहीं देश, यांची व्याप्ति होत असे.

याप्रमाणें थोडीं साधनें असून गुजराथचा राजांनीं दक्षिणेंतील ब्राह्मणी राजे खेरीज करून, दुसऱ्या लहान राजांप्रमाणें बरीच कीर्ती गाजविली.

---

## मुझफ्फरशाह.

दिल्लीचा बादशाह फिरुझ तघलख, याचा कारकीर्दींत फर्हतुल्मुल्क हा गुजराथचा सुभेदार झाला. त्याणें हिंदुलोकांची कृपा संपादन करण्याकरितां जे उपाय योजिले, तींहींकरून प्रांतांतील मुसलमानलोकांस फार संताप आला, आणि दिल्लीचा दरबारासहि त्याविषयीं अंदेशा उत्पन्न झाला; तेव्हां दुसऱ्या महमूदानें त्यास त्या कामावरून काढून मुझफ्फरखान यास त्याचा जागीं नेमलें, फर्हत हा मुख्यत्वेंकरून हिंदूंची एक फौज घेऊन या नव्या सुभेदारास आडवा आला; परंतु

या राज्याची स्थापना मुझफ्फरानें केली. तो एका धर्मांतर केलेल्या राजपूताचा मुलगा होता.

इ० स० १३९१, हि०स०७९२-९३.

त्याचा पराजय होऊन मुझफ्फरानें तें शहर घेतलें. मुझफ्फर हा एका धर्मांतर केलेल्या राजपूताचा मुलगा होता. त्याचा बाप दरबारांतील एका अगदीं नीच हुद्यापासून अतिशय उंच पदव्या पावला होता. मुझफ्फर हा लहानपणापासूनच मुसलमान होता, व त्यास उमरावाची शिक्षा होती, आणि हिंदुलोकांशीं द्वेष करून आपल्या मूळाचा विसर पडे असें करावें, अशी त्याची इच्छा होती असें दिसतें.

याणें बादशाह असा किताब कधीं घेतला याचा निश्चय नाहीं. वास्तविक पाहतां जेव्हां तो सुभेदार झाला, तेव्हांपासूनच त्याचा कारकीर्दीस आरंभ झाला. त्याणें जा लढाया मारल्या, त्यांत त्याची फत्ते होत गेली. त्याणें ईदर घेऊन तेथील राजास रकमेस आणलें. त्याणें काठेवाडांत एक मोठी लढाई मारली, आणि नंतर त्या प्रांताचा पश्चिमकिनाऱ्यावरील दींव हें शहर घेऊन आपल्याकडेस ठेविलें. तो सुल्तानपुर परगण्याबदल खानदेशचा राजाशीं युद्ध करण्यास प्रवृत्त झाला, आणि जरी पुढील बादशाहांचा कारकीर्दींत याबाबद पुनः लढाया होत, तथापि या वेळीं त्याचें ह्मणणें सिद्धीस गेलें. त्याणें एकदा मेवाडामध्यें मंडळगडास वेढा देऊन, तेथील अधिकाऱ्यापासून सक्तीनें खंडणी घेतली: तेथून तो अजमीर एथें यात्रेस गेला, आणि परत जातांना झालोर हें लुटून तेथील देवालयें मोडून टाकिता झाला.

इ०स० १३९१,
हि० स० ९९३.

त्याची अति मोठी लढाई माळव्याचा राजाशीं झाली. तो प्रकारः— तेथील दुसरा राजा हुशंगशाह याणें आपल्या बापास विष घातल्याचा अंदेशा आला होता; आणि मुझफ्फराची मयताशीं फार दोस्ती होती, ह्मणून त्याचा खुनाचा सूड घेण्याचा निमित्तानें याणें माळव्यावर स्वारी केली. तींत याचा आशेपेक्षां यास अधिक प्राप्ति झाली: याणें हुशंगास पराजित करून कैद केलें, आणि त्याचें सर्व राज्य हस्तगत करून

त्याणें माळवा घेऊन पुनः सोडून दिला.

इ०स० १४०७,
हि० स० ८१०.

घेतलें. हा देश आपल्याचानें राखववणार नाहीं असें याचा लवकर लक्षांत आलें; ह्मणून त्या देशांतील लोक दुसऱ्यास गादीवर बसविण्याचा तजविजींत आहेत असें पाहून, याणें, शाहाणपण करून, याचा कैदेंत हुशंग होता त्यापासून जेवढें घेववलें तेवढें घेतलें, आणि त्यास पुनः गादीवर बसविलें. मुझफ्फराचा कारकीर्दींत महमूद तघलख् दिल्लीहून पळाल्यावर गुजराथेंत आला होताः त्याचा वाईट रीतीनें स्वीकार झाला आणि त्यास माळव्यांत परत जावें लागलें.

इ० स० १४०८, हि० स० ८००.

---

## अहमदशाह.

हुशंगशाहास मुझफ्फरशाहानें गादीवर बसविलें, परंतु असें केल्यानें मुझफ्फरानें आपणावर कांहीं उपकार केला असें हुशंगास वाटलें नाहीं; कारण मुझफ्फर मेल्यावर त्याचा मागें त्याचा नातू अहमदशाह यास त्याचा गादीवर बसण्यास जी फळी आड आली होती तीस हा मिळाला, आणि याणें लढायांस आरंभ केला. त्या या दोन राज्यांमध्यें पुष्कळ वर्षें चालत होत्या. अहमदशाहानें तीन वेळा माळव्यावर स्वारी केली, आणि एके वेळीं त्या देशाचा उत्तरेस साहरणपुरापर्यंत चाल करून, तेथें एका लढाईत जय मिळविला. इकडे माळव्याचा राजा अहमदाचा शत्रूंस मदत करित असे, मग ते हिंदु असोत किंवा मुसलमान असोत; तसाच अहमदाचा हुकूम न मानणाऱ्या अशा गुजराथेंतील राजांस मिळून तो दोन वेळा राजधानीपर्यंत गेला होता; परंतु त्यापासून कांहीं सांगावयासारखा परिणाम झाला नाहीं.

अहमदशाह, इ० स० १४११, हि० स० ८१४.

माळव्याचा राजा व याचे शेजारी दुसरे हिंदु राजे यांशीं याचा लढाया.

इ० स० १४२२, हि० स० ८२५.

अहमदशाहानें चालीप्रमाणें ईदर, झालोर, व कांठेवाड

त्याचा पराजय होऊन मुझफ्फरानें तें शहर घेतलें. मुझफ्फर हा एका धर्मांतर केलेल्या राजपूताचा मुलगा होता. त्याचा बाप दरबारांतील एका अगदीं नीच हुद्यापासून अतिशय उंच पदव्या पावला होता. मुझफ्फर हा लहानपणापासूनच मुसलमान होता, व त्यास उमरावाची शिक्षा होती, आणि हिंदुलोकांशीं द्वेष करून आपल्या मूळाचा विसर पडे असें करावें, अशी त्याची इच्छा होती असें दिसतें.

याणें बादशाह असा किताब कधीं घेतला याचा निश्चय नाहीं. वास्तविक पाहतां जेव्हां तो सुभेदार झाला, तेव्हांपासूनच त्याचा कारकीर्दीस आरंभ झाला. त्याणें जा लढाया मारल्या, त्यांत त्याची फत्ते होत गेली. त्याणें ईदर घेऊन तेथील राजास रकमेस आणलें. त्याणें काठेवाडांत एक मोठी लढाई मारली, आणि नंतर त्या प्रांताचा पश्चिमकिनाऱ्यावरील दीव हें शहर घेऊन आपल्याकडेस ठेविलें. तो सुलतानपुर परगण्याबद्दल खानदेशचा राजाशीं युद्ध करण्यास प्रवृत्त झाला, आणि जरी पुढील बादशाहांचा कारकीर्दांत याबाबद पुनः लढाया होत, तथापि या वेळीं त्याचें ह्मणणें सिद्धीस गेलें. त्याणें एकदा मेवाडामध्यें मंडळगडास वेढा देऊन, तेथील अधिकाऱ्यापासून सक्तीनें खंडणी घेतली: तेथून तो अजमीर एथें यात्रेस गेला, आणि परत जातांना झालोर हें लुटून तेथील देवालयें मोडून टाकिता झाला.

इ०स० १३९१, हि० स० ७९३.

त्याची अति मोठी लढाई माळव्याचा राजाशीं झाली. तो प्रकारः— तेथील दुसरा राजा हुशंगशाह याणें आपल्या बापास विष घातल्याचा अंदेशा आला होता; आणि मुझफ्फराची प्रयताशीं फार दोस्ती होती, ह्मणून त्याचा खुनाचा सूड घेण्याचा निमित्तानें याणें माळव्यावर स्वारी केली. तींत याचा आशेपेक्षां यास अधिक प्राप्ति झाली: याणें हुशंगास पराजित करून कैद केलें, आणि त्याचें सर्व राज्य हस्तगत करून

त्याणें माळवा घेऊन पुनः सोडून दिला.

इ०स० १४०७, हि० स० ८१०.

घेतलें. हा देश आपल्याचानें राखववणार नाहीं असें याचा लवकर लक्षांत आलें; ह्मणून त्या देशांतील लोक दुसऱ्यास गादीवर बसविण्याचा तजविजींत आहेत असें पाहून, याणें, शाहाणपण करून, याचा कैदेंत हुशंग होता त्यापासून जेवढें घेववलें तेवढें घेतलें, आणि त्यास पुनः गादीवर बसविलें. मुझफ्फराचा कारकीर्दींत महमूद तघलख् दिल्लीहून पळाल्यावर गुजराथेंत आला होता: त्याचा वाईट रीतीनें स्वीकार झाला आणि त्यास माळव्यांत परत जावें लागलें.

इ० स० १४०८, हि० स० ८००.

---

## अहमदशाह.

हुशंगशाहास मुझफ्फरशाहानें गादीवर बसविलें, परंतु असें केल्यानें मुझफ्फरानें आपणावर कांहीं उपकार केला असें हुशंगास वाटलें नाहीं; कारण मुझफ्फर मेल्यावर त्याचा मागें त्याचा नातू अहमदशाह यास त्याचा गादीवर बसण्यास जी फळी आड आली होती तीस हा मिळाला, आणि याणें लढायांस आरंभ केला. त्या या दोन राज्यांमध्यें पुष्कळ वर्षें चालत होत्या. अहमदशाहानें तीन वेळा माळव्यावर स्वारी केली, आणि एके वेळीं त्या देशाचा उत्तरेस साहरणपुरापर्यंत चाल करून, तेथें एका लढाईंत जय मिळविला. इकडे माळव्याचा राजा अहमदाचा शत्रूंस मदत करित असे, मग ते हिंदु असोत किंवा मुसलमान असोत; तसाच अहमदाचा हुकूम न मानणाऱ्या अशा गुजराथेंतील राजांस मिळून तो दोन वेळा राजधानीपर्यंत गेला होता; परंतु त्यापासून कांहीं सांगावयासारखा परिणाम झाला नाहीं.

अहमदशाह, इ० स० १४११, हि० स० ८१४.

माळव्याचा राजा व याचे शेजारी दुसरे हिंदु राजे यांशीं याचा लढाया.

इ० स० १४२२, हि० स० ८२५.

अहमदशाहानें चालीप्रमाणें ईदर, झालोर, व काठेवाड

दुसऱ्या मुसलमान राजांशीं त्याचा लढाया.

एथें स्वाऱ्या केल्या; व खानदेशचा राजांबरावर दोन लढाया मारिल्या. एका वेळीं मारवाडचा उत्तरेस नागोरापर्यंत त्याणें स्वारी केली होती; तेथें त्याचा काका, दिल्ली एथील पादशाह सय्यद खिजर याजवर बंड करून, राहिला होता. पुढें तो पादशाह चालून आल्यावर यास पळून यावें लागलें, तेव्हां त्याणें झालोरपर्यंत त्याचा पाठलाग केला होता.

इ० स० १४१६, हि० स० ८१९.

जेव्हां दक्षिणेंतील ब्राह्मणी राजांनीं, कोंकण जिकण्याचा यत्न करित असतां, मुंबई व साष्टी हीं बेटें घेतलीं, तेव्हां यास त्या नवीन शत्रूबराबर लढाई करावी लागली.

इ० स० १४२९, हि० स० ८३३.

मुंबई व साष्टी हीं ठिकाणें गुजराथचा राजांचा हातीं कशीं लागलीं, हें समजत नाहीं; परंतु तीं परत घेण्यास जी गुजराथचा राजानें स्वारी केली ती जहाजांतून केली, यावरून हीं सुटींच गुजराथचा ताब्यांत होतीं, दरम्यानचा देशासुद्धां नव्हतीं, असें दिसतें. त्याणें त्या वेळचा ब्राह्मणी राजास त्या बेटांतून घालवून दिलें; परंतु तो याचा द्वेष करित असे, आणि खानदेशचा राजा, जो याशीं लढाया करी, त्यांत तो पुष्कळ वेळा त्यास मिळत असे. इतके बखेडे असतांहि, अहमदशाहानें गुजराथेंत चांगला बंदोबस्त केला. फसाद करणाऱ्या लोकांचीं तोंडें बंद करण्याकरितां त्याणें निरनिराळ्या ठिकाणीं किल्ले बांधले, आणि ईदरचा राजावर शह बसविण्याकरितां अहमदनगर हें शहर बांधिलें: त्याचे मजबूद व मोठे तट अद्यापि आहेत. तसेंच त्याणें अहमदाबाद हें शहर वसवून पुढें आपली राजधानी तेथें नेली: वस्तीचा मानावरून व इमारतींचा शोभेवरून हिंदुस्थानांतील अति मोठ्या शहरांत अहमदाबादेची गणना आहे.

---

८७ अर्ध्या वर्षाचा पगारा इतक्या उत्पन्नाची जमीन प्रत्येक शिपायास देण्याचा अहमदानें पाठ घातला; पूर्वीं सगळा पैसा देत असत. गुजराथेचा

अहमदशाह हा मोठा अभिमानी मुसलमान होता. त्याणें, देवळें मोडून, मशीदी बांधिल्या, आणि आपल्या रयतेमध्यें आपल्या धर्माचा प्रसर होण्यास विशेष सहाय्य केलें, असें म्हणतात.

---

## महम्मदशाह व कुतुबशाह.

यापुढें महम्मदशाह व कुतुबशाह हे जे दोन राजे झाले, त्यांचा कारकीर्दींत माळवा व ईदर एथें नेहेमीं तंटे चालले होते. त्यांतून कुतुबशाहानें मेवाडचा राणा कुंभ याशीं मोठी लढाई आरंभिली: त्या राण्याची राजधानी चितूर एथें होती. कुंभाचा पूर्वी मोकल ह्मणून मेवाडांत राणा होता; त्याचा वेळीं अहमदशाहानें मेवाडावर स्वारी केली होती; परंतु सांप्रत नागोर एथें कुतुबशाहाचा कोणी सगा होता; त्यास त्याणें मेवाडचा राण्याबराबर लढण्यास मदत केल्यावरून लढाई उद्भवली. तो राणा सांप्रत आपल्या मोठ्या सत्तेचा पाया घालित होता; पुढें त्याचा नातू राणा संग याणें तिचा उपयोग बाबराजवळ लढाई करण्यांत केला. या लढायांमध्यें बहुतकरून हमेशा गुजराथचा राजाची फत्ते होत असे. त्याणें दोन लढाया जिंकिल्या, चितूरास वेढा दिला, आबू नामें पर्वत, जाचा पवित्रतेविषयीं प्रख्याति आहे तो, घेतला, आणि कुंभाचा एक दोस्त सिरोही एथील राजा, यास जेरदस्त केला.

महम्मदशाह. इ० स० १४४९, हि० स० ८५३.
कुतुबशाह. इ० स० १४५१, हि० स० ८५५.
त्याचा मेवाडांतील लढाया.
इ० स० १४५७, हि० स० ८६१.

---

## दाऊद खान.

कुतुबशाह मरण पावल्यावर त्याचा चुलता दाऊद

---

इतिहासकार या बंदोबस्तास नावाजतो, परंतु शिपायांची कैद व सुख हीं दोन्हीं बिघडण्याजोगा हा ठराव होता, असें दिसतें.

दाऊद खान इ० स० १४५९, हि० स० ८६३.

खान यास सिंहासनावर बसविलें, परंतु त्याचा हातून कारभार होईना ह्मणून थोड्याच दिवसांत तो पदच्युत झाला, आणि पुढें मख्यात दरवेशी होऊन गेला.

---

## महमूद बेगर.

महमद बेगर.

त्याचा मागून कुतुबशाहाचा भाऊ महमूद गादीवर बसला; त्याचें आडनाव बेगर असें होतें. जेव्हां महमूद गादीवर बसला, तेव्हां त्याचें वय १४ वर्षांचें होतें. त्याणें ५२ वर्षें राज्य केलें, आणि गुजराथेंत जे अति मोठे राजे होऊन गेले त्यांतील हा एक होता.८ त्याणें आपल्या उमराव लोकांचा कज्जेदलालपणा बंद करून लवकरच आपला कडाका दाखविला.

त्याचा कडाक्याचा अम्मल.

याचा कारकीर्दीचा अवेलीस, याचा कुळाचा जो पूर्वीचा शत्रु दक्षिणेंतील ब्राह्मणी राजा, त्यास माळव्याचा राजानें त्याचाच राजधानींत वेढा देऊन

त्याणें दक्षिणेंतील ब्राह्मणी राजास सोडविलें. इ० स० १४६२, हि० स० ८६६.

---

८ त्या वेळचे युरोपीयन पांथस्थ या राजाविषयीं अकटोविकट कल्पना करित असत. बारतेमा व बारबोसा या दोघांनीहि याविषयीं खूब लिहिलें आहे; त्यांतून एकानें याचा शरीराविषयीं भयंकर वर्णन केलें आहे; आणि त्याचा भक्ष मुख्यत्वेंकरून (सोमलादि) घातक विषांचा असे, असें दोघेहि सांगतात. या प्रकारचें खाणें याचा शरीरांत इतकें भिनून गेलें होतें, कीं याचा शरीरावर माशी बसतांच मरून पडे असें ह्मणतात. कोणी मोठ्या लोकांस मारावयाचें असलें तर तो पानसुपारी खाऊन त्यांजवर निःश्वास टाकी, अशी त्याची नेहमींची रीति असे. बटलर नामें ग्रंथकारानें "खंबायतचा राजा" म्हणून एक काव्य केलें आहे, ती रचना मूळीं यावरून केली आहे; याचा बायकांची कशी दशा होत असे, त्याविषयीं हे ग्रंथकार वास्तविक गांभीर्यानें (खरें असें मानून) वर्णन करितात.

अडकावून त्याची शिकस्त करून सोडिली; असें झालें तेव्हां याणें त्याचा वतीनें तरवार मारिली.

पुढें याचा राज्यावर कच्छदेशांतून हल्ले आल्यामुळें, याणें रण उतरून तो देश लुटला, आणि सिंधुनदापर्यंत तलवार मारून त्याचा कांठावर बलूची लोकांचा मोठ्या फौजेचा पराजय केला.

तो सिंधुनदापर्यंत गेला.

याणें गिरनार, ह्मणजे जुनागड, व चंपानेर, हीं दोन स्थळें घेतलीं: हे याणें अति मोठे पराक्रम केले. यांतून पहिलें ठिकाण (ह्म० गिरनार) हें काठेवाडाचा दक्षिणेस आहे; तें स्थान एका पर्वतावर असून, त्याची पवित्रतेविषयीं व मजबूदीविषयीं सारखीच प्रख्याति आहे.

त्याणें गिरनार व चंपानेर हीं घेतलीं.

या कृत्यांत पुष्कळ वर्षे लोटलीं. त्यांत जीवाची आशा सोडून दाखविण्याचें राजपूतांचें शौर्य, व अतिशय धर्माभिमानामुळें मुसलमानांचा जुलूम या दोहोंचीहि उदाहरणें प्रत्ययास आलीं. गिरनारचा राजानें जुलुमामुळें मुसलमानी धर्म घेतला, आणि चंपानेरचा राजा आपला धर्म बळकट धरून बसल्यामुळें मारला गेला.

महमूदानें आपल्या देशांतील बंडें मोडिलीं, आणि ईदरचा राजापासून खंडणी घेतली. खानदेशचा राजाबराबरील एका लढाईमध्यें तो अशीरगडापर्यंत कूच करून गेला होता, आणि पूर्वी एके वेळीं त्याणें दक्षिणेंतील अहमदनगरचा निजामशाही राजाकडून दौलताबादेचा वेढा उठविला होता.

त्याचा मुसलमान राजांबराबर लढाया.

इ० स० १५००, हि० स० ९१३.

इ० स० १५९९, हि० स० ९०५

या बादशाहानें समुद्रांतून पुष्कळ स्वाऱ्या केल्या.

---

१ इ० स० १४६८ पासून इ० स० १४७० पर्यंत, ह्मणजे हि० स० ८७३ पासून हि० स० ८७५ पर्यंत, गिरनारावर दर वर्षास हल्ले होत असत; आणि चंपानेर हा किल्ला इ० स १४८३ ह्मणजे हि० स० ८८८ पर्यंत मुसलमानांचा हातीं आला नव्हता.

त्याचा आरमाराचा जोर.

त्यांमुळेंच मुख्यत्वेंकरून पूर्वींचा मुसलमान राजांपेक्षां याची विशेष प्रसिद्धि आहे. याणें जीगत व बेट हे दोन टापू घेतले; तेथें हल्लींचा प्रमाणें, तेव्हांहि, चांचे लोक राहत असत; शिवाय

इ० स० १४८२, हि० स० ८८७.

त्याणें तोफाबरदार तारवें खंबायतेहून पाठविलीं: त्यांणीं समुद्रांत लढाई मारून बलसाडचा चांचांचा मोड केला.

त्या वेळीं ब्राह्मणी राजांचा एक बंडवाला सरदार

इ० स० १४९४, हि० स० ९००.

मुंबई बळकावून राहिला होता, त्यावर याणें समुद्रांतून व जमीनीवरून लढणाऱ्या अशा फौजा पाठविल्या. या प्रसंगीं याचा आरमाराचा वादळानें नाश झाला. पुढें यास दक्षिणचा राजाचा कुमकेनें मुंबई परत मिळाली.

पुढें यास समुद्रयुद्ध करून आपला पराक्रम गाजविण्यास

मिश्रदेशांतील मम्लूकांस पोर्टुगीस लोकांबरोबर समुद्रयुद्ध करण्यास तो सहाय झाला.

मोठी संधि सांपडली. ती अशी:— मिश्रदेशांतील मम्लूक सुलतानानें हिंदुस्थानांतील पोर्टुगीस लोकांवर हल्ला करण्याकरितां बारा तारवें तांबड्या समुद्रांत तयार केलीं होतीं; त्याचा मसलतींत महमूद मनःपूर्वक शिरला, तो स्वतः जहाजांतून प्रथम दमण एथें, व नंतर मुंबई एथें गेला, आणि शेवटीं ऐय्याझ सुलतानी नामें ज्या एका सरदारानें चंपानेर एथें कीर्ति मिळविली होती, त्याचा हाताखालीं एक आरमार देऊन दीव एथून येऊन पाठविता झाला. त्याचीं गुजराथी तारवें मम्लूकांचा तारवांहून फार लहान होतीं; परंतु त्यांची संख्या पुष्कळ होती; आणि तीं दोन्ही आरमारें एकत्र झाल्यावर मुंबईचा दक्षिणेस चौलचा बंदरांत पोर्टुगीस लोकांचें आरमार होतें त्यावर हल्ला करण्याजोगीं बळकट होतीं. पुढें ज्या लढाया झाल्या त्यांचा तफसील पोर्टुगीस लोकांचा इतिहासापैकीं आहे; ह्मणून तो एथें सांगत नाहीं. त्यांची जी प्रथम चौलास लढाई झाली, तींत मुसलमानांचा

जय झाला; त्या वेळीं ऐय्याझानें दयेनें व गृहस्थाईनें वर्तणूक केली त्याविषयीं पोर्टुगीस ग्रंथकारांनीं स्तुति करून लिहिलें आहे; एवढी हकीकत एथें सांगितली असतां पुरे. पुढें दीव एथें एक मोठी लढाई झाली; तींत त्या जमा झालेल्या आरमारांचा पराजय होऊन, त्यांतील ममूलुकांचा तारवांचें निर्मूळ झालें.

इ० स० १५०९, हि० स० ९१३.

ममूलूक लोक हे पुढेंहि हिंदीमहासागरांत आरमारें पाठवित असत; ती वहिवाट तुर्कलोकांनींहि मिश्रदेश घेतल्यावर चालविली होती. असें करण्याचें कारण तांबडा समुद्र व इराणी आखात, यांतून जहाजें जाण्यायेण्याची शुरुवात करावी असा त्यांचा उद्देश होता. या कारणास्तव, पोर्टुगीस लोकांबराबरील लढायांमध्यें ते हिंदुस्थानाचा राजांस मदत करित असत; परंतु या देशांत स्वतांकरितां मुलुक मिळवावा असा त्यांचा कधींहि उद्देश नव्हता.

---

## दुसरा मुझफ्फरशाह.

मुझफ्फरशाहाचा कारकीर्दीचा आरंभीं एक मोठी वकालत इराणचा राजा शाह इस्मायल् याजकडून आली होती. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर राजांसहि त्याणें मान दिला असें दिसतें. याचें कारण असें होतें कीं त्या वेळीं शिया मत शुरूकरण्यास इस्मायल् उत्सुक होता, त्यावर या सर्वांची कृपादृष्टि व्हावी हागून बहुधा

दुसरा मुक्षफ्फर शाह, इ० स० १५११ हि० स० ९१७.

१० या पराजयाची हकीकत मुसलमान ग्रंथकार छपवितात, आणि पोर्टुगीसांबराबर जा त्यांचा लढाया झाल्या त्यांचें विशेष वर्णन करित नाहींत; जेथें मुसलमानांचा जय झाला तेथेंहि वर्णन करित नाहींत. वरील लढाईनंतर तीन चार वर्षांनीं अल्बूकर्क व ऐय्याझ यांची भेट झाली; मग त्या पोर्टुगीस सरसुभेदारानें ऐय्याझाचें वर्णन केलें आहे, तें असें:—"याहून पक्का दरबारी उमराव आपण कधींहि पाहिला नाहीं, समजदार मनुष्यास खुश करून ठकविण्याविषयीं जें यांचें सामर्थ्य आहे, तसें दुसऱ्यांचें नाहीं.

तसा त्याणें त्यांचा सन्मान केला असावा असें दिसतें.

याचीं पुढील सहा वर्षें ईदरचा राजाबरोबर अपकीर्ति-कारक लढायांमध्यें निघून गेलीं. त्यानंतर एक विशेष अब्रूचें काम याचा दृष्टीस पडलें तें हें:— माळव्याचा राजा महमूद याणें आपलें काम मेदिनीराय नामें एका हिंदु सरदारावर सोंपलें होतें; त्याणें त्याची बहुतेक सत्ता हरण केल्यामुळें तो गुजराथेंत पळाला, आणि मुझफ्फर याची मदत मागता झाला. तेंव्हां मुझफ्फर स्वतः माळव्यांत जाऊन राजधानी घेऊन हिंदूंचा पक्षास मदत करण्याकरितां राणा संग येत होता त्यास हटवून लाविता झाला, आणि महमूदाची पुनः त्याचा अधिकारावर स्थापना करून, त्याबदल त्यापासून कांहीं न घेतां परत गुजराथेस आला. परंतु त्यास माळवा सोडून फार दिवस झाले नाहींत, इतक्यांत संगानें पुनः येऊन महमूदास पराजित करून कैद केलें, परंतु उदारपणानें त्यास सोडून देऊन त्याशीं मोठ्या नीतीनें तह केला. त्या वेळीं ईदरचा राजास मदत देऊन व अहमदाबादेपर्यंत गुजराथ लुटून संगास दुसऱ्या मुझफ्फराचा सूड उगवितां आला.

त्याचें माळव्याचा राजाविषयीं औदार्य.

इ०स० १५१९, हि०स० ९२४.

मेवाडचा राणा संग याजबरोबर लढाई.

दुसऱ्या वर्षी दुसऱ्या मुझफ्फरानें त्याचा सूड घेण्याकरितां ऐय्याझ सुलतानी याजबरोबर फौज देऊन संगावर पाठविलें. ऐय्याझानें मंदेसूर एथें त्या राण्यास घेरलें, आणि त्याबरोबर ठराव केला, इतक्यांत माळव्याचा राजा आपल्या फौजेनिशीं त्याचा कुमकेस आला; त्यावरून ही संधि साधण्याविषयीं ऐय्याझास त्याचा राजानें फार उत्सुकतेनें आग्रह केला; परंतु ऐय्याझ हा आपला करार दृढ धरून होता, तो आपल्या राजाचा तक्रारी न ऐकतां आपली फौज घेऊन परत जाता झाला.

याप्रमाणें १४ वर्षें राज्य करून दुसरा मुझफ्फरशाह

( इ० स० १५२६ म्हणजे हि० स० ९३२ त ) मरण पावला.

## बहादुरशाह.

मुझफ्फरशाहाचा मागून त्याचे दोन मुलगे ( सिकंदर व दुसरा महमूद हे ) एकामागून एक गादीवर बसले, ते ( पुढें सांगितल्याप्रमाणें )लवकरच नाहींसे झाल्यामुळें बहादुरास गादी मिळाली. हा शाहजादा मुझफ्फराचा तिसरा मुलगा होता, तथापि बापामागें हा वारीस होईल असा संभव असून लोकांची त्याजवर तशी दृष्टी असे; पुढें कांहीं नाखुशीचें कारण उत्पन्न झाल्यामुळें तो दरबार सोडून दिल्लीस गेला होता, तेथें बाबराचा स्वारीपर्यंत, तो सुलतान इब्राहीम लोदी याजवळ होता. तो गैरहजर असल्यामुळें कांहीं वेळपर्यंत तो राज्यपदापासून दूर राहिला; परंतु त्याचा एक भाऊ मारेकऱ्यांनीं मारिल्यावर व दुसरा पदच्युत झाल्यावर याची जागा यास मिळाली. तरीहि याचा तिसऱ्या भावास संग व दुसरे कांहीं हिंदु सरदार यांची मदत होती, त्याजबराबर यास तोंड द्यावयाचें होतें. पुढें एका लढाईंत हा शेवटचा आगंतुक मारला गेल्यावर बहादूर हाच काय तो गादीचा वारीस राहिला.

बहादुरशाह.

त्याणें ईदर एथील व जवळील पहाडांतील दुसरे राजपूत रजवाडे यांस ताब्यांत आणिलें, हा प्रथमचा पराक्रम केला. पुढें लवकरच त्याचा भाचा खानदेशचा राजा, व वऱ्हाडचा राजा या दोघांनीं अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशाहावर कट केला होता, त्यांत आमचा मदतीस यावें म्हणून त्याचा भाचानें त्याची प्रार्थना केली.

दक्षिणेंतील लढायांत त्याणें हात घातला.

वरील लढाई चालविण्याचें सर्व काम त्यांणीं बहादुरशाहावर सोपिलें, आणि बाकीचा राजांनीं त्याचें कायम वर्चस्व यथाविधि कबूल केलें. त्याचें युद्ध असें पार पडत चाललें, कीं जरी बेदरचा राजा बरीदशाह, हा निजामशाहास मिळाला होता, तरीहि खानदेश व वऱ्हाड यांचा जा प्रकरणीं निजामशाहाबराबर

खानदेश, वऱ्हाड व अहमदनगर एथील राजांनीं त्याचें वर्चस्व कबूल केलें.

तंटा होता त्या गोष्टी निजामशाहास कबूल कराव्या लाग-ल्या, आणि पूर्वीचा इतिहासांत सांगितल्याप्रमाणें बहा-दुरशाहाचा गर्व संतुष्ट करण्याकरितां निजामशाहास स्वतः त्याची विनवणी करणें आलें.

माळवदेश जिंकून गुजराथेस मिळविला.

बहादुरशाहाचा पुढील पराक्रमानें याहूनहि विशेष कीर्तिकर परिणाम झाला. तो असाः— माळव्याचा राजा महमूद यास दुसऱ्या मुझफ्फरानें पुनः गादीवर स्थापिलें, तरी आपणावर जाणें उपकार केला त्याचा मुलावर फितूर करण्यास तो मागसावला नाहीं, आणि त्याचप्रमाणें कृतघ्नतेनें राणा संग मेला ही संधि पाहून, त्याचा मागून गादीवर बसणारा राणा रतनसिंग, याजवर त्याणें हल्ला केला. त्या राण्याची बहादुरशाहाबरोबर पूर्वीचीच चांगली दोस्ती होती, म्हणून ते आपल्या उभयतांचा दुःखांचा सूड घेण्यास सांप्रत एकत्र झाले. नंतर त्यांणीं महमूदास त्याचाच राजधानींत कैद करून गुजराथेंत पाठविलें; तेथें तो पुढें मारला गेला; व त्याचें राज्य बहादुरशाहानें घेऊन आपल्या वंशपरंपरेचा राज्यांत भिडविलें.

माळव्यांतील बखेडे.

एवढें मोठें वैभव पुष्कळ दिवस भोगण्यास बहादुरशाहास अल्पसंतोषीपणा नव्हता. वर सांगितल्याप्रमाणें त्याणें जी माळव्यामध्यें घालमेल केली, तींत सिलहदी म्हणून एक मुख्य सहाकारी होता; तो जातीनें राजपूत असून महमूदाचा कारकीर्दीत माळव्याचा पूर्वेकडील रायसीन, भिल्सा, व दुसरीं ठिकाणें यांचा कारभार पावला होता; शिवाय त्याणें मागाहून उज्जनी ही त्या प्रदेशास मिळविली होती. एवढा बलाढ्य सरदार शिल्लक आहेपर्यंत आपली पुरी फत्ते झाली नाहीं, असा बहादुराचा मनांत विचार आला असें दिसतें; त्यांतहि दुसरें असें कारण झालें होतें, कीं सिलहदी यास मेवाडचा राण्याचा कांहीं आश्रय होता; म्हणून एके दिवशीं बहादुरशाहाचा छावणींत तो भेटावयास आला

असतां याणें त्यास कैद केलें, आणि, या विश्वासघाताचा कृत्यामुळें लोक दचकले ही संधि पाहून, उज्जनीशहर हाताखालीं घातलें. सिलहदीचा मुलगा भूपतराय हा चितूर एथें पळाला; आणि रायसीन नामें त्या सरदाराचा एका मजबूद पहाडी किल्ल्यावर त्याचा भाऊ टिकाव धरून राहिला. यामनाणें जी हरकत उत्पन्न झाली, तिचें निवारण करण्यास बहादुरास बरेच दिवस लागले; परंतु चितूरचा राणा रतनसिंग हा इतक्यांत मरण पावला, व त्याचा मागून त्याचा मुलगा विक्रमाजित त्याचा गादीवर बसला, तेणेंकरून त्या राज्याचा बहुतेक पुष्कळ जोर नाहींसा झाला: नाहीं तर वरील हरकतींचा बंदोबस्त याचानें अगदींच झाला नसता.

जेव्हां बहादुर या स्वारीस गेला होता, तेव्हां पोर्टुगीस लोकांचा एका मोठ्या आरमारानें दीविवर जबरदस्त हल्ला केला, परंतु तेथील रखवालदारांनीं तो शौर्यकरून हटविला ( फेब्रुआरि, इ०स० १५३१. )

बहादुरशाहानें आपल्या शत्रूंविषयीं, जरूर होता तितका, बंदोबस्त करून, आपलें लक्ष पुनः चितूराकडे वळविलें. त्या वेळीं मेवाडचा राजाची सत्ता इतकी कमी झाली होती, कीं लढाईचा आरंभींच याणें त्या राजधानीस वेढा दिला, आणि तीन महिन्यांमध्यें मोठी खंडणी देऊन तह करणें त्या राजास जरूर पाडिलें.[११] या सुमारास बहादुरशाहानें हुमायूनाबराबर लढाईची कळ पेटविली. तिचा परिणाम कसा झाला, तो पूर्वींच वर्णन करण्यांत आला आहे.[१२]

मेवाडाबराबर लढाई. इ० स० १५३२, हि० स० ९३८.

इ० स० १५३३, हि० स० ९४०. हुमायूनाबराबर लढाई.

---

११ पूर्वी गुजराथचा एका राजापासून मिळविलेला रत्नांचा हार त्याजवळ होता, तो त्याणें बहादुरास दिला. तो पुढें बहादुराचा कुटुंबाबराबर मदीनेस जाऊन शेवटीं कुन्स्तन्तुनियाचा पादशाहाचा जामदारखान्यांत गेला.

१२ पृष्ठ ३३० पाहा.

बहादुरशाहास गुजराथंतून हांकून लाविलें. बहादुरानें आपलें राज्य परत घेतलें.

पुढें जेव्हां बहादुर पळून दीव एथें राहिला होता, तेव्हां त्याणें पोर्तुगीस लोकांबरोबर बोलणें लाविलें होतें. त्या वेळीं जा त्याणें त्यांस देहेनग्या दिल्या, त्यांत दीव एथें एक वखार बांधण्यास परवानगी दिली, आणि त्याबद्ल यास याचें राज्य मिळविण्याविषयीं मदत करण्याकरितां त्यांणीं ५०० युरोपीयनांची टोळी दिली. मोगललोक परत निघून गेल्यावर गुजराथ जशी स्थीरस्थावर झाली, तसें बहादुरशाहाचें लक्ष पुनः दीवकडे लागलें. कारण पोर्तुगीस

दिव एथें पोर्तुगीस लोकांशीं त्याचे तंटे.

लोक हे आपल्या तेथील नव्या वखारीस तटबंदी करित होते; तेव्हां ते त्या वखारीचा किल्ला करित आहेत असें त्यास वाटलें. तो तेथें गेला, आणि पाहतो तों नुनो डिकुना ह्मणून, हिंदुस्थानांतील पोर्तुगीस लोकांचा राज्याचा सरसुभेदार, तेथील नव्या मिळविलेल्या जाग्याचा बंदोबस्त करण्याकरितां आरमार घेऊन आला होता. त्या वेळीं तकरारी होऊन परस्परांचीं बोलणीं झालीं; तीं बाहेरून दिसण्यांत मैत्रीचा नात्याचीं होतीं, परंतु मुसलमानी व पोर्तुगीस या दोन्ही भाषांतील इतिहासकार जें लिहितात त्यावरून, उभय पक्षीं विश्वासघात करण्याचा बेत होता, व प्रत्येक आपली मसलत पार पाडण्यास संधि पाहत होता असें दिसतें. नुनोडिकुना, यास जेव्हां बहादुरानें भेटावयास बोलाविलें, तेव्हां त्याणें आजारीपणाचें

पोर्तुगीस प्रतिनिधीची मुलाकत.

सोंग घेतलें, ह्मणून त्याचा अंदेशा मोडण्याकरितां बहादुर थोड्या लोकांनिशीं त्याचा गलबतावर गेला. जहाजावर असतां त्या प्रतिनिधीचीं व त्याचा जवळचा लोकांचीं कांहीं खलबतें व खुणा झाल्या, तेणेंकरून बहादुर भयाभीत झाला, आणि त्वरेनें निरोप घेऊन तडीस जाण्याकरितां आपल्या मचव्यांत

बहादुरशाह मरण पावला.

बसला. त्या वेळीं तेथें एक कज्जा झाला: तो सहज झाला असें पोर्तुगीस लोक सांगतात, व मुद्दाम केला असें मुसलमान

लोक वर्णन करितात: त्याचा परिणाम असा झाला, कीं म-त्येकांचा तर्फेचे पुष्कळ लोक माणास मुकले, आणि बहादु-रशाहानें समुद्रांत उडी टाकली: त्यास वल्याचा सपाटा बसू-न तो बेशुद्ध झाला, आणि नंतर एका भाल्याचा तडाक्यानें मारला गेला.

काफर ( परधर्मी ) लोकांवर विश्वास ठेवूं नये, असा त्या दोन्ही पक्षांचा लोकांचा सारखाच अभिप्राय होता, म्ह-णून एकाचाहि कृत्यांवर रहिम नजर करावी अशी त्यांची यो-ग्यता नाहीं; परंतु जेव्हां बहादुर हा पोर्टुगीस लोकांचा ज-हाजावर परिवाराशिवाय आला, तेव्हां त्याचा मनांत त्याच वेळीं कांहीं विश्वासघात करण्याचा उद्देश असेल असें दि-सत नाहीं; आणि पोर्टुगीस लोकांचा उद्देश तरी त्यास पक-डण्याचा असावा, मारण्याचा नसावा; यास्तव जर तसें कर-ण्याची त्यांची तयारी असती तर ते यास तें तारूं सोडून जा-ऊं देते हें असंभाव्य आहे. यास्तव जो तंटा झाला, तो परस्परांचा भीतीमुळें न समजून झाला असें संभवतें: त्यांत पूर्वीपासून विश्वासघात कर-ण्याचा कोणा एका पक्षाचा हेतु होता अ-सा जर कोणाकडे अपराध आणणें असला, तर त्याविषयीं पोर्टुगीस लोकांवर अतिशय वहमा येतो.

इ० स० १५३७, हि० स० ९४३.

---

## मीरांमहम्मदशाह.

बहादुरशाहाचा मागें त्याचा पुतण्या महमूद हा त्या-चा स्वाभाविक वारीस होता. तो त्याचा पूर्वीचा मतिस्पर्धी लतीफखान याचा मुलगा असून सांप्रत त्याचा माऊस भाऊ खानदेशचा राजा, मि-रांशाह, याचा कैदेंत होता. ह्मणून त्या मिरांशाहानें त्या राज्यावर आपला हक्क लागू करण्याची संधि साधली. पुढें तो मीरांशाह सहा आठवड्यांचा आंतच आपसुखानें मरण पावला, आणि त्याचा मागून त्याचा जो भाऊ खानदेशचा गादीवर बसला त्यासहि जरी तशी अनुकूलता होती,

मीरांमहम्मदशाह.

तरी तिजपासून त्यास तसा फायदा झाला नाहीं; म्हणून शेवटीं त्याणें महमूदास बंदींतून मुक्त करून आपला हक्क संपादूं दिला.

## तिसरा महमूद.

तिसरा महमूद, इ० स० १५३८, हि० स० ९४४.

नंतर त्याणें तिसरा महमूद हा किताब घेतला, आणि सोळा वर्षे राज्य केलें; त्यांत त्याचा सरदारांचा मसलती व कज्जे चालले होते; यांशिवाय दुसरी प्रख्यात गोष्ट त्याचा कारकीर्दींत झाली नाहीं. पुढें तो बऱ्याच विलक्षण रीतीनें मरण पावला. तो असाः— त्याणें आपल्या वाड्यांतील मुल्लयास एका वेळीं गळ्यापर्यंत भिंतींत गाडून टाकून उपाशीं मरूं देण्याविषयीं हुकूम केला होता, आणि तो त्या शेवटचा प्रसंगांत असतां महमूद तिकडून जात होता, त्यास त्याणें मस्तक खालवून सलाम करण्याचा यत्न केला; तेव्हां त्यास अगदीं मरावयास टेंकलेला असा त्याणें सोडून दिला. पुढें त्या मुल्लयानें मारेकरी घालून त्या बादशाहास मारविलें, आणि तो खून केल्यानंतर त्याणें मुख्य उमरावांस बलावून, प्रत्येक आला तसतसा त्यास गुप्त रीतीनें मारून टाकिला.

इ०स०१५५३।५४, हि० स० ९६१.

नंतर त्या मुल्लयानें मुकुट धारण केला, परंतु तो प्रसिद्ध रीतीनें बाहेर पडतांक्षणींच त्यास बाकी राहिलेल्या सरदारांनीं मारून टाकिलें; ही गोष्ट सहजच ओघानें घडून आली.

महमूदानें सुरतेचा किल्ला बांधला, तो अद्यापि आहे; तसाच त्याणें शिकारीचा रानासभोंवार सात कोश घेऱ्याचा तट बांधला. ( त्या देशांत हरीण व सर्व प्रकारची शिकार पुष्कळ आहे, असें असून हें असाधारण काम याणें केलें होतें. )

## दुसरा अहमद.

महमूदामागें एका फळीनें एका मुलास दुसरा अहमद

असें नाव देऊन गादीवर बसविलें. तो याच्या मुलगा असें म्हणत. तो स्वतांचा मर्जीनें वागण्याजोगा मोठा होईपर्यंत जीवंत राहिला असावा असें वाटतें, कारण आठ वर्षें राज्य केल्यानंतर कोणी मारेकरी घालून त्यास मारविलें.

दुसरा अहमद.
इ० स० १५६१.
हि० स० ९६९.

## तिसरा मुझफ्फर.

त्यानंतर कांहीं बंडवाल्या लोकांनीं मसलत करून तिसरा मुझफ्फरशाह या नावानें एक तसेंच सोंग उभें केलें, आणि मुख्य मसलतदारांनीं सर्व राज्य वांटून घेतलें. नंतर त्यांमध्यें कज्जे पेटले, आणि सर्व मुलुकांत एक सारखी लढाई, गोंधळ, व धुमाळी माजली: शेवटीं अकबरानें गुजराथ घेऊन सर्व बंदोबस्त केला; ती हकीकत त्याचा वृत्तान्त पाहिल्यावर समजेल.

तिसरा मुझफ्फर.
अकबरानें गुजराथ घेतली.
इ० स० १५७२,
हि० स० ९८०.

## माळव्याचें राज्य.

( घोर देशांतील एका वंशांतल्या दिलावर नामें एका पुरुषानें स्थापिलें.)

### माळव्याचे राजे.

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| दिलावर घोरी. ( मूळपुरुष ) | १४०१ | ८०४ | ग्यासुद्दीन खिलजी .... | १४८२ | ८८७ |
| हुशंग घोरी .. | १४०५ | ८०८ | नासरुद्दीन खिलजी .... | १५०० | ९०६ |
| महम्मद घोरी | १४३२ | ८३५ | दुसरा महमूद खिलजी .. | १५१२ | ९१६ |
| महमूद खिलजी | १४३५ | ८३९ | | | |

सुलतान फिरुझ तघलख याचा कारकीर्दींत माळवा देश स्वतंत्र झाला, असें पूर्वींच वर्णन झालें आहे. एथील पहिला राजा दिलावर घोरी होता; त्याचे पूर्वज घोर दे-

शांतील राहणारे होते, व त्या देशांतील पादशाहांचा वंशाशीं त्याचा आईकडून त्याचा संबंध होता, असें तो ह्मणत असे.

त्यामागून जो राजा झाला त्याणें मांडू ही राजधानी स्थापिली. तें शहर १८-३/४ कोश वेढ्याचा अशा मातबर उंच प्रदेशांत असून त्यासभोंवते तुटलेले कडे आहेत; त्यावरून व त्यांतील इमारतींचा शोभेवरून त्या शहराची मख्याति आहे.

उत्तरहिंदुस्थानांत व दक्षिणेंत लढाया.
इ० स० १४०७, हि० स० ८१०, पासून इ० स १४३२, हि० स० ८३५, पर्यंत.

गुजराथेंतील पादशाहांशीं त्याचा हमेशा लढाया होत असत; त्यांविषयीं पूर्वीं गुजराथचा राज्याचा इतिहासांत हकीकत सांगितलेलीच आहे. त्यापुढील राजे बहुधा गुजराथेंतील राजांशीं दोस्तीनें असत, परंतु यमुनेवरील जवानपुरचा राजांशीं व तापीवरील खानदेशचा राजांशीं त्यांचा सरहद्दींवर लढाया होत असत. त्यांशिवाय वऱ्हाडचा

इ० स० १४४०, हि० स० ८४४.

ब्राह्मणी राजांशींहि त्यांचा लढाया चालल्या होत्या, आणि एका वेळीं इ०स०१४६१ त त्यांणीं त्यांची राजधानी, बेदर, तिलाहि वेढा दिला होता. पहिल्या महमूदानें दिल्ली शहरास वेढा दिला होता; त्याचा बहिलोल खान लोदी याणें पराजय केला, असें पूर्वींच वर्णन झालें आहे. त्याच राजानें चितूर ह्मणजे मेवाड एथील राजा कुंभसिंग, याजबराबर लढाया

इ० स० १४४३, हि० स० ८४६, पासून इ० स० १४५८, हि० स० ८६३, पर्यंत.

आरंभिल्या. या लढाया १५ वर्षांहून अधिक मुदतपर्यंत चालल्या होत्या; त्यांत दुसरे हिंदुराजेहि मिसळले होते, आणि त्यांत पुष्कळ युद्धें व वेढेहि झाले; तथापि त्यांपासून मुसलमानांचा माळव्यांतील मुलुकाचा सांगावयासारखा फेरफार झाला नाहीं.

पूर्वींचा सर्व राजांचा कारकीर्दींत जा बिना घडून आल्या, त्यांहून दुसऱ्या महमूदाचा कारकीर्दींत पुष्कळ झाल्या; यास्तव या राजाविषयीं तफ़सीलवार हकीकत वर्णिली पाहिजे.

दुसरा महमूद.

हा राजा गादीवर आल्यानंतर लागलीच त्याची, त्याचा भाऊ साहेब खान याजबराबर, लढाई चालली; तींत मेदिनीराय नामें एक राजपूत सरदार, हा आपल्या जातीचा पुष्कळ लोकांनिशीं आरंभापासून यास येऊन मिळाला होता, त्याचा मदतीनें मुख्यत्वेंकरून याचा जय झाला. त्यांचें भांडण पुष्कळ दिवस सक्त चाललें होतें; तें कांहीं वेळपर्यंत तहकूब राहून, दिल्लीचा बादशाहाकडून त्याचा आगंतुक भावास मदत मिळाल्यामुळें पुनः सुरू झालें होतें; परंतु मेदिनीरायानें, शौर्य व बुद्धि यांचा योगानें पुनः आपलेंसेंच केलें.

इ० स० १५१२, हि० स० ९१६. मेदिनीरायनामक हिंदु राजाचें वर्चस्व.

याप्रमाणें पुष्कळ दिवस मेदिनीरायानें चाकरी बजाविल्यामुळें त्या राजपूत सरदाराची त्याचा धन्यावर पुरी छाप बसली, आणि सर्व राज्याचा कारभार त्याचा हातांत आला.

याप्रमाणें एका हिंदूचें वर्चस्व झालेंसें पाहून, सर्व मुसलमानलोकांस कंटाळा आला, आणि प्रांतांतील निरनिराळ्या सुभेदारांनीं बंडें केलीं तीं सर्व मेदिनीरायानें एकामागून एक चुरडून टाकिलीं.

या तंट्यांचे परिणाम वर सांगितल्याप्रमाणें झाल्यामुळें मेदिनीराय सर्वशक्तिमान् झाला, आणि बादशाहाचा हुजूरांतील सर्व मुसलमान काढून दरबार व लश्कर सर्व राजपूतांनीं भरून टाकिता झाला. शेवटीं महमूद भयाभीत झाला, आणि आपली सत्ता पुनः मिळविण्यासाठीं त्याणें प्रयत्न केला. तो फुकट गेल्यावर, आपण आपल्याच राजधानींत बंदीवान् होऊन गेलों आहों असें त्यास वाटलें, आणि तो संधि पाहून गुजराथेंत

इ० स० १५१७, हि० स० ९२३. महमूद गुजराथेंत पळून गेला.

निसटून गेला. त्या देशचा राजा मुझफ्फरशाह हा त्यां-
चा मदतीस आला. त्या वेळीं त्यांची लढाई एक वर्षाहून
अधिक चालली होती: तींत राजपूतलोक
मान्दू शहराचा बचाव करण्याकरितां निकरानें
लढले; तथापि तें शहर मुसलमानांनीं घेतलें,
आणि गुजराथचा राजा, हा, महमूदास पु-
नः गादीवर बसवून आपल्या राज्यांत परत
निघून गेला. त्या वेळीं मेदिनीराय हा चंदेरीस परत
गेला; तो बहुधा तेथील वंशपरंपरेचा सरदार होता असें
दिसतें. नंतर महमूद त्याजवर चालून
गेला, परंतु पाहतो तों राजा संग,
आपल्या सर्व लश्करासुधां, चंदेरी कि-
ल्ल्याचें रक्षण करण्याकरितां त्याचा मद-
तीस आला आहे. नंतर लढाई झाली, तींत
महमूद पराजित झाला आणि, जरी दुसरे गुण महमूदांत क-
मी होते तरी शौर्याविषयीं तो विख्यात होता म्हणून, त्याणें
लढाई चालविण्यास प्रयत्न केला: शेवटीं त्याचा सर्वाङ्गाव-
र वार झाले, त्याचा खालचा घोडा मेला, आणि तो कैदें-
त सांपडला, त्या वेळीं त्या राजपूत राजानें त्याशीं थोरपणानें
वागणूक केली, आणि थोड्या वेळानंतर उदारबुद्धीनें
त्यास सोडून दिलें.

इ० स० १६१९,
हि० स० ९३४.
त्यास बहादुरशाहानें पुनः गादीवर स्थापिलें.

मेवाडचा राण्या संगानें त्याचा पराजय करून त्यास कैद केलें, परंतु पुढें सोडून दिलें.

महमूदाची बुद्धि नीच होती, यामुळें त्याचानें त्याचा
शत्रुसारखी उदार बुद्धि करवली नाहीं;
आणि पुढें राणासंग मरण पावल्यावर त्याचा
मुलगा रतनसिंग राज्य करित असतां, नवीन
राज्याचा आरंभीं जा अडचणी येत असतात
ती संधि साधावी असा त्याणें विचार केला,
आणि रतनसिंगावर हल्ला केला. त्या वे-
ळीं गुजराथचा तक्तावर मुझफ्फरशाहाचा
मागून बहादुरशाह बसला होता, त्याशींहि
माळव्याचा राजानें कृतघ्नता केली होती:

महमूदाची कृतघ्नता.
इ० स० १५२५,
हि० स० ९३२.
त्याचा पराजय होऊन त्याचें राज्य गुजराथेस जोडलें गेलें.
इ० स० १५३१,
हि० स० ९३७.

त्याजवळ रतनसिंगानें मदत मागितली. एवढ्या बलाढ्य कटाचा समोर उभें राहण्याची महमूदास शक्ति नव्हती: नंतर बहादुरशाहानें त्याचा देखत त्याची राजधानी घेतली, आणि पुढें तोहि कैद केला जाऊन, माळव्याचें राज्य गुजराथेचा राज्यांत कायम मिळविलें गेलें.

## खानदेशचें राज्य.

( आरबापासून उत्पन्न झालेल्या मलिक राजा नामें एका पुरुषानें स्थापिलें)

फरूखी वंशाचे खानदेशचे राजे.

| | इ०स० | हि०स० | | इ०स० | हि०स० |
|---|---|---|---|---|---|
| मलिकराजा | ...... | ...... | दुसरा आदिल्-खान | १५१० | ९१६ |
| नसीरखान ( पहिला राजा ) | १३९९ | ८०१ | मीरांमहम्मद-शाह | १५२० | ९२६ |
| मिरांआदिल्-खान | १४३७ | ८४१ | दुसरा मीरांमुबारिक | १५३५ | ९४२ |
| मिरांमुबारिक | १४४१ | ८४४ | मीरांमहम्मद-खान | १५६६ | ९७४ |
| पहिला आदिल्-खान | १४५७ | ८६१ | राजा अलीखान | १५७६ | ९८३ |
| दाऊदखान | १५०३ | ९०९ | बहादुरशाह | १५९६ | १००५ |

तापीनदीचा कांठचा देशांतील वरचा भागाची वऱ्हाडप्रांतांत व्याप्ति होत्ये, व जो खालचा देश तेंच खानदेशचें राज्य होतें. त्याचा दक्षिणेस डोंगर आहेत; त्यांचा, दक्षिणेंतील घाटावरचा जो उंच प्रदेश त्यास, टेंका आहे; त्याचा उत्तरेस सातपुडा डोंगर आहे या राज्यामध्यें व गुजराथेमध्यें फकत रानें मात्र आहेत. हा देश श्रीमान् होता. यांतून असंख्य नद्या वाहत होत्या. या राज्याचा लढाया व तह यांविषयींचा इतिहासापासून जवळचा देशांचा इतिहासांत जी भर पडली आहे तेवढाच काय तो या देशाचा थोडासा इतिहास आहे.

या देशचा जो पहिल्या राजानें दिल्लीचें तंत्र सोडिलें, तो खलीफा उमर यांचा वंशांतील मी आहें, असें ह्मणत असे. त्याचें गुजराथचा बादशाहाचा मुलीशीं लग्न झालें होतें. आणि त्या राजापासूनच याचा मुलास राजा असा किताब मिळाला होता. पुढें हा व याचे वंशज हे आपणास गुजराथचा पादशाहांचे मांडलिक असें ह्मणवित असत.

या देशांतील एका राजानें एका हिंदु सरदारापासून अशीरगड हा किल्ला विश्वासघातानें घेतला, आणि त्या किल्ल्याजवळ बऱ्हाणपुर शहर वसविलें; त्या गोष्टीशिवाय या राज्याचा आंतील इतिहासामध्यें सांगावयासारखें दुसरें कांहीं नाहीं. या राजांनीं बऱ्हाणपुर एथें आपली राजधानी केली. हें शहर अद्यापिहि मोठें आहे आणि त्याचा आजूबाजूस जा मोठमोठ्या लोकोपयोगी इमारती नाश होऊन पडल्या आहेत त्यांवरून हें शहर पूर्वी याहूनहि मोठें होतें असें दिसतें.

खानदेशाचा भरभराट.

जेव्हां खानदेश स्वदेशांतील राजांचा ताब्यांत होता तेव्हां त्या सर्व देशाची अतिशय चलती होती, असें दिसतें; त्या देशांतील नद्या शेतकीस उपयोगी पडाव्या ह्मणून त्यांस जीं पुष्कळ चिरेबंदी धरणें बांधिलीं आहेत तीं हिंदुस्थानांत लोकोपयोगार्थ उद्योग करून जे दुसरे कारखाने बांधले आहेत, त्यांतून कोणत्यांशींहि त्यांची तुलना केली असतां त्यांची बरोबरी करितील. हीं धरणें हिंदुलोकांनीं बांधलीं किंवा खानदेशाचा राजांनीं बांधिलीं तें कसेंहि असो; परंतु जरी सांप्रत त्यांची बेमरामत होऊन नाश झाला आहे, आणि कितीएक जंगलामध्यें गर्क होऊन गेलीं आहेत तरी या राजांचा कारकीर्दींत त्यांचा उपयोग होत होता हें खचित आहे.

खानदेश अकबरानें घेतला. इ०स० १५९९, हि० स० १००८.

पुढें इ०स० १५९९ त, अकबरानें खानदेश घेऊन पुनः दिल्लीचा राज्यांत मिळविला.

# बंगाल.

| | इ० स० | हि० स० | | इ० स० | हि० स० |
|---|---|---|---|---|---|
| फकरुद्दीन[१३] | १३३८ | ७३९ | फत्ते | १४६१ | ८६६ |
| अल्लाउद्दीन | १३४० | ७४१ | शाहजादा | १४८१ | ८८६ |
| हाजीइलियास (ऊर्फ शम्सुद्दीन) | १३४२ | ७४३ | फिरुझ. | १४८१ | ८८६ |
| सिकंदर | १३५७ | ७५९ | महमूद. | १४९३ | ८९९ |
| ग्यासुद्दीन | १३६७ | ७६९ | मुझफ्फर. | १४९४ | ९०० |
| सुल्तानुस्सलातीन. | १३७४ | ७७५ | दुसरा अल्लाउद्दीन. | १४९७ | ९०४ |
| दुसरा शमसुद्दीन | १३८३ | ७८५ | नसरत. | १५२१ | ९२७ |
| राजा कंस | १३८६ | ७८८ | दुसरा महमूद. | १५३४ | ९४० |
| जितमल्ल (ऊर्फ जल्लालुद्दीन) | १३९२ | ७९५ | शीरशाह. | १५३७ | ९४५ |
| अहमद | १४०९ | ८१२ | सलीम. | १५४५ | ९५२ |
| नासरुद्दीन | १४२६ | ८३० | आदिली. | १५४८ | ९५५ |
| नासिर | १४२६ | ८३० | बहादुर. | १५५३ | ९६१ |
| बार्बिक | १४२८ | ८३२ | जल्लालुद्दीन. | १५६० | ९६८ |
| यूसफ | १४४५ | ८४९ | सुलेमान किराणी | १५६३ | ९७१ |
| | | | बायझीद. | १५७३ | ९८१ |
| | | | दाऊद. | १५७३ | ९८१ |

महम्मद तघलखाचा कारकीर्दींत बंगालप्रांतांत बंड होऊन तेथें एक नवीन राज्य झालें; तें २०० वर्षांवर चाललें, त्यांत पुष्कळ वेळा राजांचा वंशांची अदलाबदल झाली; परंतु त्यांचा कारकीर्दींत सांगावयाजोग्या कांहीं गोष्टी घडून आल्या नाहींत. जा आगंतुकांनीं राज्यें बळकाविलीं त्यांत राजा कंस म्हणून एक हिंदु जमीनदार होता. पुढें त्याचा मुलानें मुसलमानी धर्म स्वीकारिला.

एका वेळीं उत्तरबहारप्रांत या राजांकडे चालत होता. सोनारगांव, जास धाका असें म्हणतात, तेंहि या राज्यांत

---

१३ या वंशांतील अवेलीचा राजांचा तारखांविषयीं निश्चय सांगवत नाहीं. कारण इबनभतूता हा इ० स० १३४२ त दिल्लीहून निघाला, त्यास फकरुद्दीन हा निदान वर्ष दोन वर्षांनंतर बंगाल्यांत आढळला होता.

होतें: जाजनगर म्हणजे तिपेडाप्रांत याकडून बंगालचा राजांस खंडणी पोंचत असे: एथील राजे केव्हां केव्हां आसामप्रांत लुटित असत: कटक व त्या जवळील आंवढ्या ऊर्फ ओढिसा प्रांताचा भाग, इतका प्रदेश हें राज्य समाप्त होण्यापूर्वी नुकताच त्याचा ताब्यांत आला होता.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें हा देश शीरशाहानें जिकला होता, आणि जेव्हां अकबर गादीवर आला, तेव्हां हा प्रांत शीरशाहाचा वंशजांचा एका बंडवाल्या सरदाराचा हातांत होता.

---

## जवानपुर.

| | इ० स० | हि० स० | | इ० स० | हि० स० |
|---|---|---|---|---|---|
| ख्वाजा जहान .. | १३९४. | ७९६ | महमूद ..... | १४४०. | ८४४ |
| मुबारिक .... | १३९९. | ८०२ | महम्मद .... | १४५७. | ८६२ |
| इब्राहीम .... | १४०१. | ८०४ | हुसेन ...... | १४५७. | ८६२ |

जेव्हां महम्मद तघलखू हा गादीवर आला, तेव्हां ख्वाजा जहान हा वजीर होता. पादशाहाचा लहानपणीं त्याचा पगडा एकसारखा राहिला नाहीं, यामुळें तो आपल्या जवानपुरचा सुभ्यावर जाऊन स्वतंत्र झाला, असें दिसतें. त्यामागून त्याचा वंशांतील ४ राजे झाले: ते, माळवा व दिल्ली एथील राजांशीं, लढाया करित असत. त्यांणीं दोन वेळा दिल्लीस वेढा घातला होता, परंतु शेवटीं इ० स० १४७६ मध्यें बेहिलोल खान लोदी याणें त्यांचा राज्याची समाप्ति करून त्यांचा मुलुक पुनः दिल्लीचा राज्यांत आणिला.

बाबरानें दिल्लीचें राज्य घेतल्यावर लवकरच हा मुलुक घेतला; पुढें तो शीरशाहानें घेतला; नंतर जेव्हां त्याचा वंशाची समाप्ति झाली, तेव्हांपासून तो निरनिराळ्या लोकांचा हातांत होता. तो शेवटीं अकबरानें आपल्या कारकीर्दीचा अवेलीस जिकला.

वायव्येस कनोजशहरापासून, ईशान्येस बंगाल व

दक्षिणबहार यांचा सरहद्दीपर्यंत, गंगानदीचा कांठानें हा मुलुक लागलेला होता.

## सिंध.

इ० स० ७५० मध्यें आरबलोकांस हांकून लाविल्यानंतर बकरकिल्ल्यापासून समुद्रापर्यंत सिंधदेश, हा बाराव्या शतकाचा अखेरीपर्यंत सुमेरे नावाचा राजपूतलोकांचा हातांत राहिला होता. त्यानंतर त्या राजवंशाचा क्षय झाला, आणि कांहीं उलटापालटी होऊन समे म्हणून दुसऱ्या जातीचा राजपूतलोकांचा हातीं या राज्यांतील सत्ता आली.

सुमेरे लोकांनीं मुसलमानलोकांस प्रथम केव्हां कर दिला याचा निश्चय नाहीं; बहुधा बाराव्या शतकाचा आरंभीं शाबुद्दीन घोरी अगर त्याचा मागून लागलेच गादीवर बसलेले राजे यांचा कारकीर्दीत दिला असावा.

प्रथम जे समे राजे झाले ते बदमामलीस येत असत, असें दिसतें; कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें सुमारें इ० स० १३६१ त, फिरुझ तघलखानें त्यांतून एकावर स्वारी केली होती. पुढें लवकरच समे, हे आपला धर्म पालटून, मुसलमान झाले, आणि जो देश त्यांकडे होता तो शेवटीं अर्घूनांनीं त्यांस घालवून घेतला; तो अकबर गादीवर आला त्या वेळीं त्यांकडेच होता.

## मुलूतानचें राज्य.

तैमूरलंगाचा स्वारीनंतर जो गोंधळ झाला, त्या वेळीं मुलूतान एथें बंड झालें, आणि तेथील राज्य लंगनामें एका अफगाण वंशाचा हातांत आलें. त्या राजांनीं सुमारें १०० वर्षं पर्यंत तेथें सत्ता चालविली.

पुढें सोळाव्या शतकाचा अवेलीस सिंध एथील अर्घूनांनीं तो देश त्यांपासून हिसकावून घेतला. त्यांस शाहजादा कामरान याणें हाकून लाविल्यानंतर मुलूतान देश मोगलांचा ताब्यांत आला.

हिंदुस्थानाचा दुसऱ्या भागांची स्थिति.

दुसरे जे सर्व देश कोणा एका काळीं दिल्लीचा राज्याखालीं होते, ते सर्व तैमूरलंगाचा स्वारीनंतर स्वतंत्र झाले, आणि पुढें बहिलोल खान लोदी, बाबर, हुमायून आणि शीरशाह यांणीं जरी त्यांतून पुष्कळ परत घेतले होते, तरी ( पंजाब प्रांताचा धनीपणाविषयीं सिकंदर सूर भांडत होता तेवढा प्रांत खेरीज करून बाकी ) सर्व देश अकबर सिंहासनारूढ झाला तेव्हां, अफगाणी राज्याचा आश्रितांचा ताब्यांत होता.

समाप्त.